"वीर उत्तमराव मोहिते यांच्या इतिहासलेखनाचा चिकित्सक अभ्यास"
(इ.स. १९१० ते १९९६)

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

सामाजिकशास्त्रे विद्याशाखेंतर्गत इतिहास विषयाच्या पीएच.डी. (विद्यावाचस्पती) पदवीसाठी सादर केलेला शोधप्रबंध

*** अभ्यासक ***

शिंदे इंद्रजित बालासाहेब

*** मार्गदर्शक ***

प्रा.डॉ. अनिल सिंगारे

फेब्रुवारी – २०१३

।। प्रतिज्ञापत्र।।

मी प्रस्तुत प्रबंधाचा लेखक **श्री. शिंदे इंद्रजित बालासाहेब** असे प्रतिज्ञापूर्वक जाहीर करतो की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या सामाजिकशास्त्रे विद्याशाखेंतर्गत इतिहास विषयातील पीएच.डी. पदवीसाठी सादर केलेला **''वीर उत्तमराव मोहिते यांच्या इतिहासलेखनाचा चिकित्सक अभ्यास'' (१९१०–१९९६)** हा शोधप्रबंध मी स्वत: लिहिलेला असून तो पूर्णपणे स्वतंत्र आहे.

हा शोधप्रबंध व त्याचा अंश यापुर्वी मी इतर कोणत्याही विद्यापीठात अन्य कोणत्याही पदवीसाठी सादर केलेला नाही.

अभ्यासक
शिंदे इंद्रजित बालासाहेब

स्थळ : पुणे
दिनांक : फेब्रुवारी २०१३

।। प्रमाणपत्र।।

प्रमाणित करण्यात येते की, **श्री. शिंदे इंद्रजित बालासाहेब** यांनी टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या सामाजिकशास्त्रे विद्याशाखेंतर्गत सादर केलेला **''वीर उत्तमराव मोहिते यांच्या इतिहासलेखनाचा चिकित्सक अभ्यास'' (१९१०–१९९६)** हा शोधप्रबंध इतिहास विषयातील पीएच.डी. पदवीसाठीचा एक भाग म्हणून सादर केलेला आहे.

माझ्या मार्गदर्शनाखाली **श्री. शिंदे इंद्रजित बालासाहेब** यांनी हा शोधप्रबंध स्वतंत्ररित्या लिहिलेला असून तो इतर कोणत्याही विद्यापीठात अन्य पदवीसाठी सादर केलेला नाही.

मार्गदर्शक

प्रा.डॉ. अनिल सिंगारे

स्थळ : पुणे

दिनांक : फेब्रुवारी २०१३

अनुक्रमणिका

अ.क्र.	प्रकरणाचे नाव	पान क्र.
	प्रस्तावना	१ ते ६
१	एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्र	७ ते ४१
२	वीर उत्तमराव मोहिते यांचे जीवनचरित्र	४२ ते १४३
३	इतिहासलेखन परंपरा व उत्तमरावांचे इतिहासलेखन	१४४ ते १९७
४	वीर उत्तमराव मोहिते यांच्या ग्रंथांची चिकित्सा	१९८ ते २७४
५	वीर उत्तमराव मोहिते यांचे सामाजिक, धार्मिक, सत्यशोधकीय व राजकीय क्षेत्रातील योगदान	२७५ ते ३५२
६	उपसंहार	३५३ ते ३७०
७	संदर्भग्रंथ सूची	३७१ ते ३९०
८	परिशिष्टे	३९१ ते ४२०

ऋणनिर्देश

आपल्याला दिसतं त्या क्षितिजापलीकडे काय असेल, आणखी कोणती भूमी असेल. गृह, तारे, आकाशगंगा कशा आहेत व त्यांचा आधार काय याची उत्कंठा माणसाला नेहमीच लागून राहिली. मानवाची महत्त्वाकांक्षा व त्यातून साकारलेले विचार दैनंदिन जीवन व्यवहारासाठी सुखकारक व दु:खदायक ठरले. मानवी जीवनव्यवहार सुरळीत चालावा म्हणून अनेक प्रज्ञावंत तत्त्वज्ञानी यांनी समाजाला दीपस्तंभासारखे मार्गदर्शन केले. अज्ञानाच्या अंधारातून पुढे जाण्यासाठी दिशादर्शन करताना तत्त्वज्ञान, इतिहास यांचा मानवी जीवनव्यवहारासाठी उपयोग व्हावा यासाठी वीर उत्तमराव मोहिते यांचे विचार महत्त्वपूर्ण आहेत. त्यांनी विसाव्या शतकातील महाराष्ट्रीयन संस्कृतीत परिवर्तन होण्यासाठी प्रचंड प्रयत्न केले आणि २० व्या शतकातील महाराष्ट्राच्या इतिहासात कायमचा ठसा उमटविला.

''वीर उत्तमराव मोहिते यांच्या इतिहासलेखनाचा चिकित्सक अभ्यास : १९१०–१९९६'' या प्रबंधाला सैद्धांतिक व वैचारिक विवेचन करण्यासाठी श्री. संत जनाबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील इतिहास विभाग प्रमुख व माझे मार्गदर्शक आदरणीय डॉ. अनिल गणपतराव सिंगारे यांनी अनमोल मार्गदर्शन केले. त्याबरोबरच माझ्या जडण–घडणीत व व्यक्तिमत्त्व विकासाबरोबरच माझ्यात संशोधकाचे गुण रूजवले व मला एक विशिष्ट संशोधनात्मक दृष्टी दिली. संशोधकाला संशोधनासाठी आवश्यक असणारी शिस्त, कठोर परिश्रम, चिकाटी, धाडस असे गुण माझ्यात विकसित करून संशोधन क्षेत्रात आयुष्यभर पुरेल अशी ज्ञानरूपी शिदोरी मला दिली. आयुष्यभर त्यांचा सहवास लाभावा असे मनोमन वाटते तरी कर्तव्य म्हणून त्यांच्याविषयी ऋण व्यक्त करतो.

शेतकऱ्यांच्या वाट्याला आलेले खडतर दु:ख सोसून खंबीर बनलेल्या मनोवृत्तीतून माझ्यावर संस्कार करणाऱ्या आणि मला योग्य सामाजिक भान देणाऱ्या मातापिता यांच्या ऋणातून मुक्त होणे अशक्य आहे तरी कर्तव्य म्हणून माझे वडील श्री बालासाहेब पंढरी शिंदे व आई सौ. सुकुमार बालासाहेब शिंदे तसेच ज्येष्ठ बंधू श्री. नवनाथ शिंदे वहिनी सौ. राधा शिंदे, अभिजीत, अक्षता तसेच संशोधनात सतत मदत करणारी माझी पत्नी सौ. मीरा या सर्वांचे ऋण व्यक्त करतो.

सदरील शोधप्रबंधाचे लिखान करताना प्राथमिक स्वरूपाची माहिती उत्तमराव

मोहिते यांच्या पत्नी मैनाबाई मोहिते यांनी दिली. तसेच उत्तमरावांचे नातू भालचंद्र देशमुख यांच्या मदतीमुळेच हा प्रबंध पूर्ण होवू शकला. उत्तमराव मोहिते यांची मुलगी प्राचार्या भाग्यरेखा देशमुख यांनी वेळोवेळी माहिती दिली. तसेच मानवेंद्र देशमुख यांनी मदत केली. भालचंद्र देशमुख यांनी त्यांचा अमूल्य वेळ देवून उत्तमराव मोहिते यांच्या संग्रहातील साहित्य उपलब्ध करून दिले. वेळोवेळी त्यांच्या पत्नी व मुलगा अद्वैत असे या सर्व कुटुंबियांनी पूर्णत: मदत केली. म्हणून हा प्रबंध पूर्ण झाला तसेच भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था, पुणे यांचे मी मनातून ऋण व्यक्त करतो.

महाविद्यालयीन जीवनापासून जीवनाला योग्य दिशा देणारे आदरणीय प्राचार्य डॉ. अरूण दळवे यांनी स्वत:चे ग्रंथालय माझ्यासाठी खुले केले व वेळोवेळी मार्गदर्शन केले. तसेच प्राचार्य डॉ. एस.एस. गाठाळ, डॉ. शरद हेबाळकर, डॉ. वसंत सानप, डॉ. दिपक भारती, प्रा. जगन्नाथ किर्दंत, पवार मॅडम, प्रा. सुभाष कदम, डॉ. भिसे, डॉ. मुकुंद राजपंखे, प्रा. अरविंद घोडके, प्रा. अनंत मरकाळे, प्रा. सतीश देशमुख, बी.टी. सर, पटेल सर, विशेष म्हणजे प्रा. विठ्ठल केदारी यांनी आपला अमूल्य देवून संपूर्ण प्रबंधाचे मुद्रित शोधनाचे काम केले. यामुळे मी या सर्वांचे ऋण व्यक्त करतो. मा. दिगंबर वामनराव सोळूंके यांनी आपले खाजगी ग्रंथसंग्रह माझ्यासाठी खुला ठेवला. प्रा. जयपाल घोगरे, प्रा. राजासाहेब शेख, प्रा. श्रीकृष्ण चाटे, प्रा. प्रताप सूर्यवंशी, डॉ. अविनाश खोखले, प्रा. सुभाष पटेकर, श्री. अविनाश नांदूरे, प्रा. अरूण गंगणे, प्रा. अमोल गंगणे, प्रा. विलास सोमवंशी, प्रा. संजय जाधव, प्रा. राजाभाऊ भगत, प्रा. रंजना देशमुख, प्रा. अश्रुबा गायकवाड, श्री. श्रीराम माने, श्री. धनराज माने, श्री. यादव सर, डॉ. अर्जुन मोरे यांनी ह्या संशोधन कार्यासाठी मदत केली, त्याबद्दल त्यांचे ऋण व्यक्त करतो.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिपक टिळक, कुलसचिव डॉ. उमेश केसकर, अधिष्ठाता प्रा. विजय केसकर, इतिहास विभाग प्रमुख डॉ. श्रद्धा कुंभोजकर तसेच पीएच.डी. विभागातील श्री. पाटील सर व श्री. नवनाथ यांनी वेळोवेळी योग्य मागदर्शन केले. त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे.

अंबाजोगाई येथील अतुल पवार व आशिष पवार यांनी शिवम् जॉब वर्क्स येथून लेखनाची सुबक छपाई वेळेवर करून दिली त्याबद्दल त्यांचे मी ऋण व्यक्त करतो.

शिंदे इंद्रजित बालासाहेब

प्रस्तावना

प्रकरण पहिले

एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्र

प्रकरण दुसरे

वीर उत्तमराव मोहिते यांचे जीवनचरित्र

प्रकरण तिसरे

इतिहासलेखन परंपरा व उत्तमरावांचे इतिहासलेखन

प्रकरण चौथे

वीर उत्तमराव मोहिते यांच्या ग्रंथांची चिकित्सा

प्रकरण पाचवे

वीर उत्तमराव मोहिते यांचे सामाजिक, धार्मिक, सत्यशोधकीय व राजकीय क्षेत्रातील योगदान

प्रकरण सहावे

उपसंहार

संदर्भसूची

अ) अस्सल किंवा प्राथमिक साधने

ब) दुय्यम साधने

परिशिष्टे

प्रस्तावना

भारताच्या विस्तीर्ण भू–भागावर अनेक धर्म, पंथ, जाती प्राचीन काळापासून आजतागायत आहेत. यामध्ये जैन धर्म, बौद्ध धर्म, हिंदू धर्म, इस्लाम धर्म आधुनिक काळात भारतात आलेला ख्रिचन धर्म यांचा प्रभाव भारतीयांवर दिसून येतो. धर्माबरोबर अनेक पंथांनी आपली भूमीका स्पष्ट मांडल्याचे दिसते. नाथपंथ, हिनयान, महायान, श्वेतांबर, दिगांबर, शिया, सुन्नी, शैव, वैष्णव, वारकरी अशा पंथाच्या माध्यमातून मानवी जीवनाविषयी सखोल चिंतन झाले. या चिंतनाचा सर्वसामान्यांच्या दैनंदिन जीवनावर प्रभाव पडला. पण या चिंतनातून अनेक श्रद्धा, अंधश्रद्धा निर्माण होऊन बहुतांशी समाज अज्ञान व अंधश्रद्धेमध्ये वावरताना दिसून येतो.

व्यक्ती जीवनावर धर्माचा प्रभाव असल्याने आणि धर्माच्या माध्यमातून अंधश्रद्धा जोपासल्याने सामाजिक जीवन स्थितिशील बनले. अनेक पंथ व संप्रदयाने यात बदल घडवण्याचा प्रयत्न केला. हा बदल पारंपरिक विचारांच्या मंथनातून पारंपरिक पद्धत कायम ठेवण्यात आली तर काही विचार नव्याने साकारल्याचे दिसते.

भारतात ब्रिटिशांचे वर्चस्व प्रस्थापित झाल्यानंतर त्यांच्या आधुनिकिकरणाच्या पद्धतीने भारतीयांस परिवर्तनास चांगला वाव मिळाला. लेखन व वाचन यांच्या विकासामुळे स्व: अस्तित्वाची जाणीव निर्माण झाली व तसा विचार प्रबळ होऊ लागला. यातच इ.स. १९२१ मध्ये लागलेल्या शोधाने (सिंधू संस्कृती) भारतीय इतिहासाच्या अभ्यासाची कक्षा रूंदावली व प्राचीन समृद्ध वारसाची ओळख झाली.

ब्रिटिशांच्या संशोधक वृत्तीचा भारतीयांवर परिणाम झाला. धर्मग्रंथाची चिकित्सा सुरू झाली. यामुळे अनेक विचारप्रवाह निर्माण झाले. धर्मसुधारणा करणे आवश्यक मानून तसा प्रयत्न होत असताना पूर्वापार आलेला धर्म कायम ठेवणारा वर्ग कार्यरत होता. सत्यशोधक विचारधारेने पूर्णत: सांस्कृतिक परिवर्तनाची संकल्पना दिली. यामुळे १९ व्या व २० व्या शतकात घडणाऱ्या घटनांचा तत्कालीन विचारवंतावर, लेखकांवर प्रभाव पडला व इतिहास लेखनाला नवा आयाम प्राप्त झाला.

बहुसंख्य समाज व त्यांच्या अज्ञानाचे कारण अनेक संशोधक शोधू लागले. यात खरा धर्म, खरी संस्कृती, खरा इतिहास लोकांपर्यत नेण्याची गरज निर्माण झाली. समाजाची ही गरज पूर्ण करण्यासाठी लेखणी उचलणाऱ्यांमध्ये 'वीर उत्तमराव मोहिते' यांचे महत्त्वपुर्ण योगदान आहे. समाज परिवर्तन व इतिहासाचे पुनरलेखन करण्यासाठी वीर उत्तमराव मोहिते यांनी वेगवेगळ्या अंगाने परिवर्तनासाठी आणि निश्चित दिशा देण्यासाठी अज्ञान अंधश्रद्धा यांना मूठमाती देण्याच्या उद्देशाने अनेक ग्रंथ लिहिले.

इ.स. १९१० साली जन्माला आलेल्या उत्तमराव मोहिते यांनी इ.स. १९९६ पर्यंत परिवर्तनशील भूमिका घेऊन वैज्ञानिक मार्गाचा अवलंब केला. सत्य इतिहास, सत्यशोधक, भारतीय स्वातंत्र्य आणि सामाजिक परिवर्तन यासाठी संपुर्ण आयुष्य खर्च केले आणि एकविसाव्या शतकाला नव्या तत्त्वज्ञानाचा डोस दिला.

संशोधन विषयाचे महत्त्व

आजतागायत अनेकांनी आपले विचार मांडले त्यात परखडपणे विचार मांडणाऱ्यांची संख्या कमी दिसते. असे असले तरी परखड विचारांनी प्रभावी परिवर्तन केल्याचे निदर्शनास येते. एका विचारातून लोक विचार करायला लागतात आणि मुळच्या एका विचारातून या विचारानुसार चालणारे अनेक निष्ठावंत तयार होतात. म्हणून एखादी विचारधारा अनेकांच्या मनातील विचारही असतो असे विचार अनेकदा दडपले जातात. मात्र हा विचार बहुसंख्य समाजाच्या हिताचा असतो. म्हणून काही लोक आपल्या फायद्यासाठी अशा विचारांकडे दुर्लक्ष करतात यातून स्वार्थ साधतात. या समाजोपयोगी विचाराला न्याय देण्यासाठी आणि लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी उत्तमरावांचे विचार महत्त्वाचे आहेत.

समाजहीत हे ध्येय ठेवून कार्य करणारांना तीव्र विरोध झाल्याची अनेक उदाहरणे सापडतात. राजाराममोहन रॉय, म. फुले यांच्या विचारांना विरोध झाला. आपले विचार परखडपणे मांडल्याने उत्तमराव मोहिते यांना तुरुंगवास भोगावा लागला. अशा धडाडीच्या परखड विचारांच्या व्यक्तींची व त्यांच्या विचाराची ओळख समाजाला

व्हावी व त्यांच्या कार्यातून प्रेरणा मिळावी म्हणून हा विषय निवडला आहे.

उत्तमराव मोहिते पारतंत्र्य व स्वातंत्र्य अशा दोन्ही काळात वावरल्याने स्वातंत्र्यापुर्वी व स्वातंत्र्योत्तर परिस्थितीचा आढावा त्यांनी घेतला. यामुळे यापुढील वाटचाल करणाऱ्यांना प्रेरणा मिळावी. यासाठी हा विषय महत्त्वाचा आहे.

उत्तमराव मोहिते यांचे कार्य जागतिक पातळीवरचे असताना महाराष्ट्रातील विदर्भात अमरावती पर्यंत मर्यादित राहिले. यांच्या विचारांची ओळख सर्वत्र होण्यासाठी यावर संशोधन करण्यात येत आहे. यातून त्यांचे वास्तववादी वैज्ञानिक विचार मानवी समाजाला उपयोगी आहेत.

महाराष्ट्रातील मराठा समाज अज्ञान आणि अंधश्रद्धेमध्ये जीवन जगतो. आपल्या संस्कृतीचा वारसा त्याला व्यवस्थित न समजल्याने तो खोट्या अभिमानातही वावरतो त्याला सत्याची जाणीव करून देण्यासाठी आणि अन्य व्यक्तीसारखे आपणही एक व्यक्ती आहोत. ही भावना रूजविण्यासाठी उत्तमरावांनी मराठ्यांचा इतिहास व संस्कृतीवर केलेले लेखन मराठ्यांसमोर ठेवण्यासाठी या विषयावर संशोधन होणे आवश्यक वाटले.

स.मा. गर्गे यांच्या 'अंधार असेल तेथे बॅटरी मारा' या उक्तिप्रमाणे उत्तमरावांचे लेखन अंधारातून प्रकाशात आणण्यासाठी संशोधनाची आवश्यकता आहे. एक स्वातंत्र्य सैनिक, सत्यशोधक, समाजसुधारक, क्रांतिकारक, इतिहाससंशोधक व इतिहासकार असणाऱ्या उत्तमराव मोहिते यांची ओळख करून देण्यासाठी हे महत्त्वाचे आहे.

संशोधनाचा उद्देश

१. शास्त्रशुद्ध पद्धतीने उत्तमराव मोहिते यांचे लेखन तपासणे.

२. उत्तमराव मोहिते यांच्या कार्याची तपासणी करणे.

३. इतिहासकार म्हणून उत्तमरावांचे स्थान निश्चित करणे.

४. समाजवादी दृष्टिकोनातून उत्तमरावांचा विचार तपासणे.

५. सत्यशोधक चळवळ व उत्तमराव यांचा संबंध पाहणे.

६. मराठ्यांचा इतिहास व संस्कृती याबाबत उत्तमराव मोहिते यांची भूमिका पडताळून पाहणे.

संशोधनाची गृहीतके

वीर उत्तमराव मोहिते यांच्या इतिहास लेखनाचा चिकित्सक अभ्यास करताना त्यांच्या कार्याचा आवाखा पाहून आणि संशोधन सुलभ होण्यासाठी काही तत्त्वे गृहीत मानली होती ती पुढीलप्रमाणे,

१. उत्तमराव मोहिते एक इतिहासकार आहेत.

२. उत्तमराव मोहिते सत्यशोधक आहेत.

३. रूढी, परंपरा व जातीप्रथेच्या विरूद्ध आहेत.

४. बहुजन समाजासाठी उत्तमराव मोहिते मार्गदर्शक आहेत.

५. महाराष्ट्रामध्ये बहुसंख्य समाज अज्ञानी असून तो अंधश्रद्धाळू आहे.

६. उत्तमरावांच्या लेखणीचा केंद्रबिंदू सर्वसामान्य माणूस आहे.

७. उत्तमराव मोहिते यांची विचारधारा विज्ञानवादी आहे.

८. शोषक व शोषीत यावर आधारित लिखाण आहे.

९. उत्तमराव मोहिते एक क्रांतिकारक आहेत.

१०. उत्तमराव मोहिते यांचे व्यक्तिमत्त्व नीडर आहे.

संशोधन पद्धती

उत्तमराव मोहिते यांच्या लेखनाचा अभ्यास करत असताना तो कोणत्या पद्धतीनुसार असावयास हवा. यासाठी कोणतीही एक पद्धत पुरेशी होत नसून अनेक पद्धतीचा वापर करावा लागतो. त्यासाठी पुढील पद्धतींचा वापर केला आहे.

१. ऐतिहासिक पद्धत.

२. संदर्भ पद्धत.

३. सर्वेक्षणात्मक पद्धत.

४. मुलाखत पद्धत.

५. विश्लेषण पद्धत – गुणात्मक, तुलनात्मक

या संशोधन पद्धतीचा योग्य त्या ठिकाणी वापर करण्यात आलेला आहे.

गृहितकाची पडताळणी

''वीर उत्तमराव मोहिते यांच्या इतिहासलेखनाचा चिकित्सक अभ्यास''

१९१० ते १९९६ या विषयावर संशोधन करण्यासाठी गृहित धरलेली तत्त्वे एकूण १० असून ती संशोधन पूर्ण झाल्यावर साध्य झाल्याची दिसून येतात. तसेच संशोधनाचा उद्देशही पूर्णत्त्वास गेला असे म्हणता येईल.

समस्या विधान

महाराष्ट्राच्या इतिहासाचा प्राचीन काळापासून अभ्यास केला असता इतिहासाची व्याप्ती वाढत गेलेली दिसते. नव्या साधनांमुळे इतिहासाचे स्वरूप बदलत आहे. इतिहासाचे पुनरलेखन हा त्याचाच भाग असून यामुळे इतिहासातील घटना, प्रसंग, व्यक्तींची स्थाने व आधुनिक काळात इतिहासाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला आहे. परंपरागत इतिहास लेखन व आधुनिक काळातील इतिहास लेखन यात वैचारिक व संकल्पनात्मक बदल इ.स. १९१० ते १९९६ या काळात उत्तमराव मोहित्यांच्या लेखनातून अभ्यासणे हा संशोधनाचा महत्त्वाचा उद्देश आहे. हा पूर्ण करत असताना संदर्भ साहित्याची मर्यादा वीर उत्तमराव मोहिते यांचे समकालीन, मित्र आज हयात नसल्याने यांच्याकडून उपलब्ध होणारी माहितीला मर्यादा पडते. तसेच संशोधनासाठी निवडलेल्या विषयाची कालमर्यादा १९१० ते १९९६ असल्याने काळाची मर्यादा ही विचारात घ्यावी लागते.

संशोधन आराखडा

संशोधन प्रारंभ करण्यापुर्वी प्रथम संशोधन आराखडा तयार करावा लागतो. त्यात संशोधनाचा उद्देश, अध्ययन, संशोधन क्षेत्र, कालावधी, संशोधनासाठी आवश्यक माहिती गोळा करावी. ही माहिती किती व कशी गोळा करावी इ. बाबी या प्रारंभीच

ठरवाव्या लागतात. भविष्यात उद्‌भवणाऱ्या समस्या व अडचणीचा देखील अंदाज घ्यावा लागतो. यालाच संशोधन आराखडा म्हणता येईल.

संशोधनाची साधने

१. प्राथमिक साधने.

२. दुय्यम साधने.

परिशिष्टे

संशोधन प्रबंधाच्या शेवटी संशोधनासंबंधीचे काही परिशिष्ट जोडणे आवश्यक आहे. कारण संशोधनाची प्रामाणिकता सिद्ध करण्यासाठी परिशिष्टे अतिशय महत्त्वाची असतात. प्रस्तुत संशोधनात परिशिष्टात वीर उत्तमराव मोहिते यांचा जीवनपट, वंशावळ, छायाचित्रे, त्यांना मिळालेले सन्मानपत्र, त्यांनी केलेला पत्र व्यवहार, इत्यादींचा समावेश केलेला आहे.

***

प्रकरण पहिले

एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्र

१ प्रास्ताविक

महाराष्ट्राला प्राचीन इतिहास आहे. महाराष्ट्र हा शब्दप्रयोग पुराणांनी रूढ केल्याचे दिसते. ''वायू, मत्स्य, ब्रह्म आणि मार्कंडेय पुराणांनी महाराष्ट्राचा स्पष्ट उल्लेख केला आहे.''[१] भूस्तरशास्त्राच्या दृष्टीने ''ट्रॅप नावाच्या दगडांचा प्रदेश तो महाराष्ट्र''[२] अशी महाराष्ट्राची ओळख सांगितली जाते. महाराष्ट्र भारतातील एक घटकराज्य असून भारताच्या पश्चिम दिशेला आहे. याचा शिलालेखातून प्रथम उल्लेख सातवाहन काळात झालेला आढळतो. तो ''शकवंशीय महाक्षत्रप राजन श्रीधरवर्मा याचा आरसिक सत्यनाग याने एरण येथे झालेल्या युद्धात धारातीर्थ पडलेल्या नाग सैनिकांच्या स्मृत्यर्थ एक यष्टी उभारल्याचा उल्लेख आहे. येथे सत्यनागास महाराष्ट्रक म्हटले आहे.''[३] म्हणून काय सातवाहन काळापासून महाराष्ट्राला इतिहास आहे असे नाही तर इतिहासपूर्व काळात महाराष्ट्रात वसाहतीबाबत नवसंशोधन प्रकाशात आले आहे व येत आहे. यावरून महाराष्ट्राच्या भू-प्रदेशात अश्मयुगापासून मानव वावरत असल्याचे अनुमान काढता येते. या भू-प्रदेशाला वेगवेगळ्या काळात वेगवेगळ्या नावांनी संबोधले ''दक्षिणपथ'' दण्डकारण्य व मरहट्ठा असे नामाभिधान झाले. जातकामधील हा श्लोक ''जटिलो नाम महारट्ठियो हुत्वा''[४] असा येतो तर वरूचीच्या व्याकरण ग्रंथात ''शेष महाराष्ट्रीवत''[५] असा उल्लेख आहे तर ज्ञानेश्वरीमध्ये ''माझा मऱ्हाठा चि बोलू कवतिके

---

१. *मोरवंचीकर रा.श्री., सातवाहनकालीन महाराष्ट्र, पृष्ठ – १९.*
२. *शेणोलीकर ह.श्री., देशपांडे प्र.न., महाराष्ट्र संस्कृती घडण आणि विकास, पृष्ठ – १८.*
३. *मोरवंचीकर रा.श्री., पूर्वोक्त, पृष्ठ – २०*
४. *शेणोलीकर ह.श्री., देशपांडे प्र.न., पूर्वोक्त, पृष्ठ – ३२*
५. *कित्ता, पृष्ठ – ३२*

मऱ्हाटियेचां नगरी। ब्रम्हविद्येचा सुकाळू करी'' असे वर्णन येते. शिवकाळात महाराष्ट्राविषयी ''मराठा तेतूका मेळवावा। महाराष्ट्र धर्म वाढवावा।''[६]

यानंतर मराठा राज्याचा अस्त व ब्रिटिशांची या भू–भागात सत्ता आली. तेंव्हा या भागाला ''मुंबईइलाखा'' असे संबोधण्यात येऊ लागले. पुढे भारताला स्वातंत्र्य मिळाले. १९५६ मध्ये द्वैभाषिक मुंबई राज्य निर्माण झाले आणि १ मे १९६० रोजी गुजरात राज्य वेगळे होऊन महाराष्ट्र राज्य निर्माण झाले व मुंबई राजधानी झाली. आज भौगोलिक विभाग व बहुसंख्य भाषा बोलणाऱ्या लोकांचा प्रदेश म्हणून महाराष्ट्र ओळखला जातो.

एकंदरीत महाराष्ट्र हा प्राचीन वारसा लाभलेला प्रदेश आहे. अश्मयुगापासून आजतागायत याच्या नावामध्ये व येथील वर्तमानामध्ये काळपरत्वे बदल झाला आणि आजचा महाराष्ट्र साकार झाला. आधुनिकता, परंपरा, संमिश्र जात व धर्मव्यवस्था येथे पाहवयास मिळते. अनेक पारंपरिक चालीरिती बरोबरच नवविचार महत्त्वाचा मानणारा समाज येथे निर्माण झालेला दिसतो.

एकोणिसावे शतक महाराष्ट्राच्या इतिहासात एक परिवर्तन करणारे शतक आहे. या शतकामध्ये अनेक स्थित्यंतरे घडून आली. ''इ.स. १८१८ मध्ये ब्रिटिशांनी पेशवाईची सत्ता संपवून आपल्या साम्राज्य विस्तारास सुरूवात केली.''[७] यामुळे परिवर्तन व प्रबोधनाला गती मिळाली. इंग्रजी शिक्षणाचे प्रमाण वाढल्याने शिक्षितांचा एक नवगट निर्माण झाला. या गटाने महाराष्ट्रीयन समाजाला शिक्षित बनवण्याचा प्रयत्न सुरू झाला. यातून सामाजिक उन्नतीतील अडसर दूर करण्यासाठी अनेक समाजसुधारक निर्माण झाले.

महाराष्ट्रात समाजसुधारणेचा पाया म. जोतीराव फुले यांनी घातला व त्यांच्यानंतर विठ्ठल रामजी शिंदे, धोंडो केशव कर्वे, गोपाळ गणेश आगरकर, छ. शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाज जीवनात महत्त्वपुर्ण योगदान दिले.

---

६. *दाते य.रा. व कर्वे चि.ग. (संपा.), सुलभ, विश्वकोष भाग २, पृष्ठ – ७७४.*

७. *फडके य.दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड – १, पृष्ठ – २९.*

समाज म्हटले की, अनेक विचारधारा असे सहज म्हणता येते. कारण अनेक व्यक्ती एकत्र येऊन समाज बनत असतो आणि प्रत्येक व्यक्तीची विचारधारा भिन्न असते. म्हणूनच समाजामध्ये पारंपरिकता आणि आधुनिकता ही विचारधारा निर्माण झालेली असते. पारंपरिक पद्धतीनुसार पूर्वापार चालत आलेल्या व्यवस्थेमध्ये बदल नको असा विचार प्रबळ होता तर आधुनिक विचारधारेत पूर्वापार चालत आलेला विचार जशाच तसा किंवा काही विचार बदल करून ही उपयोगाचा नाही असा विचार प्रबळ होता. ''महाराष्ट्रीयन समाज समन्वयवादी असल्याने जुन्या व नव्या विचारांचा संगम आढळतो.''[८] या समन्वयवादी विचारधारेनुसार काहींनी जुने स्वीकारले तर काहीनी जुने विचार कुचकामी आहेत म्हणून ते त्यागले पाहिजेत यासाठी प्रयत्न केले. या बदलाच्या वातावरणात परकीय राज्य नष्ठ व्हावे म्हणून मातृभूमीच्या रक्षणासाठी ब्रिटिशांना हाकलण्यासाठी अनेक क्रांतिकारक जन्माला आले.

महाराष्ट्रीयन समाजात संभ्रममय परिस्थिती एकोणिसाव्या शतकात निर्माण झाली व यातून विचार तावून सुलाखून पाहिले व संक्रमणाची गती वाढली. या काळातील महाराष्ट्रीयनांच्या जीवनामध्ये सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक क्षेत्रात हीच परिस्थिती कमी अधिक प्रमाणात कायम राहिल्याचे दिसते.

२ एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्राची सामाजिक, धार्मिक, राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक स्थिती

महाराष्ट्रामध्ये एकोणिसावे शतक महत्त्वपुर्ण शतक ठरले या शतकाच्या प्रारंभी आधुनिक युग अवतरले. आजपर्यंत महाराष्ट्रीयन समाज अंधारयुगातच वावरत होता आणि कल्पनाशक्तीच्या विचारात गुरफटून गेला. यामुळे समाज, संस्कृती, धर्म, राजकारण, अर्थव्यवस्था या मानवी जीवनाच्या वेगवेगळ्या अंगावर मध्ययुगाचाच प्रभाव होता आणि मध्ययुगामध्ये मानवी जीवनाच्या अंगावर धर्माचा प्रभाव होता.

---

८. *दीक्षित दुर्गा, डायमंड प्रकाशन, महाराष्ट्र संस्कृतिकोश, पृष्ठ – ५.*

या काळातील तत्त्ववेत्यांनी सुद्धा 'देह नासिवंत आणि आत्मा अविनाशी आहे' असा विचार बिंबवला. यामुळे जीवन क्षणिक आहे व दु:खमय आहे या दु:खातून मूक्त होण्यासाठी व कायमची सुटका मिळवण्यासाठी 'मोक्ष' हेच अंतिम साधन बनले होते. ऐहिक जीवनआनंदी असेल असा आशावाद महाराष्ट्रीयन समाजात कुठेच दिसत नाही. ईश्वरीसत्ता, दैवी आविष्कार, दैवी योजना, कर्म व कर्मयोग, नशीब, विधिलिखित या कल्पना तत्कालीन जीवनसरणीत सर्वत्र असल्याचे दिसते.

इ.स. १८१८ मध्ये इंग्रजी राज्य स्थापन होऊन मराठ्यांचे (पेशव्यांचे) राज्य लयाला गेले. या काळात राजकीय बाबतीमध्ये खेड्यातील जनता उदासीन होती आणि त्यांच्यात रूढ असलेल्या पद्धतीला धक्का लागला नाही, तर हा समाज बाकी कशाचीच फिकिर करत नसे. मात्र जो राज्यकर्ता व राजाश्रीत वर्ग होता. तो असंतोषी असल्याने शेतकरी वर्गापेक्षा या वर्गाकडून उठावाची विरोधाची शक्यता वाटत होती.

आपले राज्य सुरक्षित राखण्यासाठी भारतीयांना शिक्षित करणे या इंग्रजांच्या धोरणामुळे शिक्षणाचे सार्वत्रिकिकरण व गरिबांचे शिक्षण ही सरकारची जबाबदारी मानली. यामुळे अनेकांचा ओढा शिक्षणव्यवस्थेकडे जाऊन महाराष्ट्रीयन समाज जसा शिकू लागला तसा त्याला आपल्या सर्वांगीण जीवनातला फोलपणा दिसू लागला व तो दूर केल्याशिवाय आपली प्रगती नाही असा विचार प्रबळ होऊन त्या दृष्टीने वाटचाल झाली.

अव्वल इंग्रजी काळात महाराष्ट्रात सुधारणावादाचा उदय झाला आणि १८५० नंतर सामाजिक प्रबोधनाचे नवे पर्व सुरू झाले. इथे सुधारणेचे अनेक मार्ग निर्माण झाले. याचा परिणाम १९ व्या शतकातील समाज, धर्म, संस्कृती, अर्थ, राजकीय, पटलावर झाला तो पुढीलप्रमाणे,

अ) सामाजिक स्थिती

मानवी समाज हा वेगवेगळ्या संस्थामध्ये विभागला आहे. या संस्था म्हणजे

कुटुंब, विवाह, जात या संस्थांच्या माध्यमातून मानवी जीवन नियंत्रित केले जाते. मानवी जीवनाचा अभ्यास म्हणजे या संस्थांचा अभ्यास आहे.

१. कुटुंब संस्था

कुटुंब हा समाजातील महत्त्वपुर्ण असा प्राथमिक समूह आहे. 'मॅरडॉक'[९] या अभ्यासकाने अभ्यासलेल्या दोनशे पन्नास (२५०) समाजात ही संस्था अस्तित्वात आहे. हीच संस्था मानवाची जडण–घडण करते. शील, चारित्र्य, प्रेम, कर्तव्य अधिकार, सहानुभूती, जिव्हाळा, आपुलकी या कुटुंबाच्याच देण आहेत. अनेक कुटुंबाच्या एकत्रीकरणातून समाज बनतो. समाजावर कुटुंबाचा प्रभाव कायम राहतो. प्राचीन काळापासून आजतागायत कुटुंबाची वाटचाल होत आहे. वाटचालीत कुटुंबाची संरचना व कार्यपद्धतीत बदल झाला असेल पण कुटुंबाचे महत्त्व कमी झाले नाही. ''एलसर''[१०] Sociology of Family या ग्रंथात Family या शब्दाबाबत म्हणतात. "Family हा शब्द Famaily" या लॅटिन शब्दापासून झाला असून तो मानवी समुदायाचा निर्देश करतो की, ''ज्यात माता, मुले, पिता, गुलाम व नोकरांचा समावेश होतो.'' अनेक व्यक्तीचे एका घरातील वास्तव्य व सहसंबंध कुटुंब म्हणून ओळखले जाते.

''मॅकआयव्हर व पेज''[११] ''प्रजोत्पादन व प्रजासंगोपनासाठी निश्चित स्वरूपाचा दीर्घकाळ टिकणारा शारीरिक संबंधावर आधारलेला गट'' आहे. म्हणून कुटुंब एका घरात राहणाऱ्या व्यक्तींचा समूह आहे जे परस्परांचे रक्तसंबंधी असतात. हीत आणि परस्पराविषयी असणारी कर्तव्याची जाणीव या आधारावर समानतेची भावना ठेवतात. अशी कुटुंब व्यवस्था १९ व्या शतकात महाराष्ट्रामध्ये प्रामुख्याने प्रचलित होती अशा व्यवस्थेमध्ये कुटुंबातील सर्व व्यवहार व कुटुंबाचा कारभार चालवण्यासाठी घरातील ज्येष्ठांची कारभारी म्हणून अनौपचारिक निवड होत असे व कुटुंबातील अन्य सभासद त्याला मदत करत असत. कुटुंबातील सर्व सभासदांचा

---

९. *कुलकर्णी पी.के., गंदेवार एस.एन., सामाजिक संस्था आणि सामाजिक गट, पृष्ठ – ६०.*

१०. *कित्ता, पृष्ठ – ६०.*

११. *बोबडे प्रकाश, भारतीय समाजशास्त्र, पृष्ठ – २४९.*

देव, धर्म, एकच असून एकाने केलेले कोणतेही कार्य ते कुटुंबाचे कार्यच असे. एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्रामध्ये ''पितृसत्ताक कुटुंब पद्धती प्रचलित होती.''[१२] हे असे कुटुंब की ज्यात पिता किंवा भाऊ कुटुंबप्रमुख असतो. वंश पित्याच्या नावाने चालतो. अशा कुटुंबात स्त्रीयांचा दर्जा दुय्यम असे. लग्नानंतर पत्नी पतीच्या घरी राहावयास जाते. 'पुत्र' हा कुटुंबाचा आधार घटक मानला जात असे. ज्या कुटुंबात पुत्र जन्माला येत नाही अशा कुटुंबाचा वंश पुढे चालावा म्हणून संबंधिताचा पुत्र दत्तक घेऊन वंश चालवला जात असे.

महाराष्ट्रामध्ये संयुक्त कुटुंब प्रचलित होते हे ''ज्या कुटुंबातील व्यक्ती एकाच घरात राहून एकाच स्वयंपाक घरात शिजवलेले अन्न ग्रहण करणाऱ्या मालमत्तेवर सामाईक मालकी असणाऱ्या, सामाजिक, धार्मिक कार्यात सहभागी होणाऱ्या व बंधुत्वाच्या विशिष्ट प्रकाराने एकमेकांशी जोडला गेलेला लोकांचा गट म्हणजे संयुक्त कुटुंब.''[१३] अशी कुटुंब पद्धती एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्रात प्रचलित होती. ग्रामीण भाग शेतीवर अवलंबून असल्याने संयुक्त कुटुंब पद्धतीमुळे मनुष्यबळ मिळत असे. सुरक्षितता लाभत असून कुटुंबातील कमकुवत घटकांना आधार मिळत असे. लहान मुलांना विपुल प्रमाणात प्रेम मिळून त्यांच्यात आपलेपणाची भावना वाढण्यात मदत होते. याबरोबरच कुटुंब प्रमुख बेजबाबदार असेल तर कुटुंबातील सर्वांना त्याचे परिणाम सहन करावे लागत असत. एकमेकांच्या आधारामुळे या कुटुंबव्यवस्थेत एक प्रकारची स्थितिशीलता येऊन नवीन विचारांचा स्वीकार केला जात नसे.

२. विवाह

मानवाची एक नैसर्गिक गरज 'कामवासना' आहे. याची पूर्तता करण्याचे मार्ग अनेक आहेत. पण ती कोणत्या मार्गाने पूर्ण करावी यासाठी काही नियम केले आहेत. स्त्री आणि पुरुषांच्या मिलनातून पूर्ण होणारी कामभावना व्यभिचार न करता समाजव्यवस्थेने घालून दिलेल्या नियमांनी पूर्ण करावी लागत असे. यासाठी 'विवाह'

---

१२. सिंगारे अनिल, महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळीचा इतिहास, पृष्ठ – १०

१३. बोबडे प्रकाश, पूर्वोक्त, पृष्ठ – २६५.

हा योग्य मार्ग सांगितला आहे. हिंदू धर्मानुसार व्यक्तिवर केल्या जाणाऱ्या संस्कारापैकी 'विवाह' महत्त्वाचा संस्कार मानला जातो. विवाहामध्ये अनेक प्रकार असून त्यातील चार प्रकार समाजमान्य म्हणून ओळखले जातात. या चार प्रकाराशिवाय अन्य मार्गाने केलेला विवाह समाजात अमान्य ठरवला जात असे.

विवाहाचे नियम सर्वांसाठी सारखेच होते असे नाही तर समाजातील उच्च घटकांकडून समाजमान्य विवाहाचे नियम तुटले तर त्यांना शिक्षा होत नसे. पण अन्य (खालच्या) व्यक्तींकडून नियम तुटल्यास त्यांना शिक्षेस सामोरे जावे लागत असे. श्रेष्ठ वर्ण म्हणून 'ब्राह्मण' गणला जात असे. ''मंत्राची धर्मग्रंथाची रचना करणारे, धर्माचे स्वरूप ठरवणारे आचरणाची पद्धती ठरवणारे व कायद्याची निर्मिती करणारे एकूण लेखनाची जबाबदारी असणारा वर्ग ब्राह्मण होय.''[१४] विवाहातील विधी ब्राह्मणांकडून व्हायचे तेच विवाह ग्राह्य असायचे.

विवाह निश्चित करताना वधू आणि वर दोघांचाही विचार घेतला जात नसे. घरातील जेष्ठ व्यक्ती हे कार्य करायचे ते दोन्ही उमेदवारांना मान्य असायचे. विवाह करतेवेळी बालकांचा विवाह करण्याची पद्धत होती. विवाहाची जिम्मेदारी समजण्याअगोदरच ''बालविवाह''[१५] केल्याने अनेक समस्या निर्माण होत असत आणि त्या समस्या 'नशीब' म्हणून निमुटपणे सहन कराव्या लागत असत. या विवाहाच्या पद्धतीला व त्यामुळे उद्‌भवणाऱ्या प्रश्नांना धर्माचा आधार असून त्यात बदल करता येत नसे.

३. आहार

एकोणिसाव्या शतकामध्ये उदरनिर्वाह करण्यासाठी मुख्यत्वे शेती उत्पादनावर अवलंबून राहावे लागत असे. आहार म्हणून शाकाहार व मांसाहार दोन्हीचा वापर केला जात असे. आहार हा धर्म जात व आर्थिक स्थितीनुसार बदलत असे. सामान्यत: ज्वारी, बाजरी, तूर, मूग, उडीद, तांदूळ, गहू, फळे, पालेभाज्या, दूध व दूधापासूनचे

---

१४. *जोशी पंडित महादेव शास्त्री, भारतीय संस्कृतिकोश, खंड सहावा, पृष्ठ – ३२५.*

१५. *घोडके ह.मो., महाराष्ट्र गाथा, भाग – १, पृष्ठ – १०.*

पदार्थ आहार म्हणून वापरत असत. गहू, ज्वारी, बाजरीपासून कुरवड्या, पापुड्या, सांडगे केले जात. भटक्या व कनिष्ठ जातीत मांसाहार केला जात असे. मुस्लीम समाजात मांसाहाराला विशेष महत्त्व होते.

४. कुटुंबात पुरुषाची सत्ता

"Woman in midieval Maharashtra no social freedom"[१६] महाराष्ट्रातील स्त्रीयांना कुटुंबामध्ये स्वतंत्र अस्तित्व नव्हते. पुरुषाची सेवा करणे हे तिचे महत्त्वाचे कार्य होते. सर्व कुटुंबावर पुरुषाचे वर्चस्व असे. खाण्याचे पदार्थ, कपडे व अन्य भौतिक गरजांच्या पूर्तता प्रथम पुरुषांच्या पूर्ण केल्या जात असत हे लहान वयापासून बिंबवले जाई. पुरुषाचे स्थान आदराचे व श्रेष्ठ होते. येथील समाजव्यवस्था व धर्मव्यवस्था तसे प्रयत्न करत असे. धर्मानुसार मृत व्यक्तीच्या पिंडदानासाठी पुत्राची गरज असते त्याशिवाय मृतास गती मिळत नाही म्हणून पुत्र प्राप्तीसाठी नवस करण्याची पद्धत होती. ''पुत नाम नरकात त्रायते इतिपुत्र''[१७] पुरुषांना कुटुंबात अनन्यसाधारण महत्त्व होते. पुरुषांना फारशी नैतिक बंधने नसून एकापेक्षा जास्त स्त्रीयांशी लग्न करू शकत असत आणि कुटुंबातील सर्व निर्णय पुरुष घेत असत. एकंदरीत पुरूषप्रधान समाजव्यवस्थेमध्ये पुरूषांची अधिसत्ता असून वंशाचा दिवा म्हणून महत्त्व प्राप्त झाले होते.

५. एकोणिसाव्या शतकातील स्त्रीयांचा दर्जा

मानवी जीवनाच्या इतिहासात स्त्रियांचे योगदान महत्त्वाचे आहे. स्त्री पासूनच उत्पत्ती झाली. ''कृषिकार्याची सुरूवात स्त्रियांनी केली'' ऋग्वेद काळात ''यत्र नार्यास्तू पुज्यन्ते रमन्ते तत्र देवता''[१८] असे वंदनीय, पूजनीय, आदराचे स्त्रियांना स्थान होते. मात्र नंतरच्या काळात दर्जा घसरला. ''पिता रक्षति कौमारे भार्ता रक्षति यौवने। रक्षन्ति स्थविरे पुत्रा न स्त्री स्वातंत्र्यमर्हति''[१९] विवाहापूर्वी पिता विवाहानंतर पती व पतीनंतर

---

१६. *Chitinis K.N., Socio- Economic History of Midival India, page - 112.*
१७. *शहा मृणालिनी, स्त्री सुधारणाविषयक मराठी नाट्यलेखन, पृष्ठ – ८७.*
१८. *जोशी पी.जी. भारताचा इतिहास, पृष्ठ – २२७*
१९. *बापट विष्णूशास्त्री, सार्थ श्रीमनुस्मृति, पृष्ठ – २३९.*

पुत्रांने म्हणजे जीवनभर स्त्रियांनी दुसऱ्याच्या अधीन राहावे. ती स्वातंत्र्यास योग्य नाही हा 'मनुस्मृति' मध्ये दिलेला दंडक १९ व्या शतकापर्यंत टिकून होता. यानुसार स्त्री उपभोगाची वस्तू बनून चूल आणि मूल यातच तिचे जीवन बंदिस्त असल्याचे दिसते. यामध्ये अनेक दुष्ट रीतींचा समावेश होऊन स्त्रियांचे जीवन दु:खमय झाले.

स्त्रीयांचा मानसिक नैतिक आधार पती असला आणि स्त्री अर्धांगिणी मानली तरी स्त्रीयांना कधीच बरोबरीचे स्थान मिळाले नाही. पती हाच परमेश्वर मानून जीवन जगावे लागत असे. "There were no close relations between husband & wife in the family, which was usually a joint family."[२०] पतीच्या सु:ख दु:खात स्त्रियांचे सर्वस्व होते. तिला स्वत:ची ओळख नव्हती. ब्रिटिशांनी १८१८ मध्ये महाराष्ट्राची राजकीय सत्ता घेतली तरी हजारो वर्षांपासून चालली. स्त्रीयांची स्थिती १९ व्या शतकात कायम होती.

५.१ बालविवाह

मानवी जीवन जगताना येणाऱ्या दु:खामध्ये 'मुलीचा जन्म' हे एक दु:ख मानण्यात येत असे. "The birth of a female child was not welcome event the girl had no freedom to choose their partners in life."[२१] विवाहप्रसंगी स्वत:चा पती निवडण्याचा अधिकार नव्हताच पण 'विवाह' म्हणजे काय? ही समज येण्याआधीच विवाह केले जात. ''मुलीचा विवाह सहाव्या किंवा जास्तीत जास्त आठव्या वर्षी झालाच पाहिजे असा रीवाज होता.''[२२] रजोदर्शनापूर्वी विवाह झाला नाही तर समाज अशा कुटुंबावर बहिष्कार घालत असे.

बालविवाहाची प्रथा फक्त हिंदूमध्येच होती. असे नव्हे. ''मुस्लीम व पारशी समाजात ही पद्धत रूढ होती.''[२३] ज्याचे बालपणच अजून सरले नाही अशा कोवळ्या वयात कोवळ्या मनावर, बुद्धिवर न पेलणारी जबाबदारी पडल्याने सूप्त शक्तीचा विकास

---

२०. *Chitinis K.N., पूर्वोक्त, पृष्ठ – ११२.*
२१. *Chitinis K.N., पूर्वोक्त, पृष्ठ – ९२, ९३.*
२२. *घोडके ह.मो., पूर्वोक्त, पृष्ठ – ७१.*
२३. *फडके य.दि., पूर्वोक्त, पृष्ठ – ३७.*

खुंटला होता. ब्रिटिशांच्या सुधारणावादी वृत्तीने इ.स. १८९१ मध्ये संमती वयाच्या विधेयकावर चर्चा झाली. ते वय १२ वर्ष असावे असे विधेयक असूनही परंपरावाद्यांनी पूर्वापार चालत आलेली चौकट कायम ठेवण्याचा प्रयत्न केला. यामुळे अपवाद वगळता १९ व्या शतकामध्ये स्त्री विवाहाच्या संदर्भात ''अष्टवर्षा भवेत कन्या''[२४] याप्रमाणे आठ वर्षाची मुलगी विवाहयोग्य समजण्याचा प्रघात झाला आणि पद्धतही चालूच राहिली.

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात या सामाजिक रूढी साहित्यात पाहवयास मिळतात. ''मनोरमा हे म.वा. चितळे यांचे नाटक तर सध्या स्थित्यदर्शक नाटक अर्थात आजची सामाजिक स्थिती'' ह.रा. पाठक यांचे लेखन. अशांनी समाज जागृती करण्याचा प्रयत्न केला. पण बालविवाह बंद झाले नाहीत. ब्रिटिशांनी व सुधारकांनी प्रयत्न केले. तरीही बालविवाहाची समाजाची बनलेली मानसिकता तोडण्यास यश आले नाही.

५.२ बहुपत्नीत्व

'बहुपत्नीत्व' ही पूर्वीपासून चालत आलेली पद्धत असून मुस्लीम कालखंडात राज्यकर्ते जनानखाना ठेवत. एकापेक्षा जास्त बायका असणाऱ्यास सामाजिक प्रतिष्ठा होती. राजघराण्यामध्ये ही पद्धत सर्रास होती. ''दुसऱ्या बाजीरावास अकरा बायका होत्या.''[२५] पुरुषांच्या इच्छा व सुखोपभोगासाठी अनेक विवाह करण्याचा प्रघात तत्कालीन समाजव्यवस्थेत होता. यास पुत्रप्राप्ती हे एक कारण आहे. वंशाचा दिवा म्हणून पुत्रास महत्त्व आल्याने एका पत्नीपासून तो न झाल्यास अनेक विवाहास परवानगी धर्माने दिली होती.[२६] १९ व्या शतकातील महाराष्ट्राची समाजव्यवस्था 'मनुस्मृति' या हिंदूच्या ग्रंथावर आधारित होती. स्त्रीयांना मात्र बहुपतीत्वाचा अथवा पती निधनानंतर पुनरविवाहाचा अधिकार नव्हता.[२७]

---

२४. *शहा मृणलिनी, पूर्वोक्त, पृष्ठ ८७.*

२५. *गवळी पी.ए., पेशवेकालीन महाराष्ट्र, पृष्ठ – ९६.*

२६. *घोडके ह.मो., पूर्वोक्त, पृष्ठ – ८०.*

२७. *मालशे स.ग., आपटे नंदा, विधवा विवाह चळवळ १८०० ते १९०० पृष्ठ – ५.*

५.३ विधवा विवाह

एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्रामध्ये ''विषम विवाह, बालविवाह, जरठ सर्रास होता.''[२८] यामुळे स्त्रीयांना अकाली वैधव्य प्राप्त होई. विधवांना पुनरविवाहाचा अधिकार नाकारल्याने ''गुरूचरित्रात विधवांसाठी दिलेल्या नियमांचे पालन केले पाहिजे असे १९ व्या शतकात सर्वत्र समजूत होती.''[२९] यानुसार विधवांना अशुभ मानले जाई. सकाळी विधवाचे तोंड पाहू नये ते अशुभ असते असे सर्वत्र मानले जात. विधवा स्त्री कामभावनेने पुरूषाच्या संपर्कात येऊ नये व आली तर तिच्यावर पुरूषाची भावना जाऊ नये. म्हणून तिला कुरूप बनविले जात असे. ''अशा स्त्रीयांना आयुष्यभर नातेवाईकांची लेकरे सांभाळावी लागत''[३०] स्त्रीयांना बंधनात ठेवले जाई. ''स्त्रीला जेवढे ताब्यात ठेवले जाईल तेवढे बरे असे बाबा अदमच्या काळापासून चालत आलेली पद्धत आहे.''[३१] एखाद्या मोठ्या मनाच्या पुरूषाने विधवेशी विवाह केला तर समाज त्याला वाळीत टाकत असे व त्यास सामाजिक व धार्मिक मान्यताही नव्हती. इ.स. १८५६ मध्ये विधवा विवाहाला मुभा देणारा कायदा झाला पण तो कृतीत उतरला नाही. सामान्य माणूस तर या विवाहापासून दूर होताच पण सामाजिक सुधारणा व्हाव्यात यासाठी प्रयत्न करणारे सुधारक ही मागे हटताना दिसतात. ''वेळ आल्यावर न्या. रानडे व रंगनाथसिंह मुधोळकर यांनी कच खाल्याचे दिसते.'' एकोणिसावे शतक संपेपर्यंत मुंबई इलाख्यात मध्य प्रांतात व वऱ्हाडात झालेल्या विधवा पुनरविवाहाची संख्या ४० चाळीस देखील नव्हती.[३२] १९ व्या शतकात बालविधवांची संख्यात्मक पाहणी केली असता सुधारणाही कशा तुटपुंज्या होत्या ते समजते. यापैकी १६,००० विधवा पुनरविवाह निषेध मानणाऱ्या ब्राह्मण जातीपैकी होत्या.[३३] यावरून पुरुषांच्या

---

२८. *फडके य.दि., पूर्वोक्त, पृष्ठ – ३६.*
२९. *घोडके ह.मो., पूर्वोक्त, पृष्ठ – ७२.*
३०. *फडके य.दि., पूर्वोक्त, पृष्ठ – ३६.*
३१. *घोडके ह.मो., पूर्वोक्त, पृष्ठ – ७३.*
३२. *फडके य.दि., पूर्वोक्त, पृष्ठ – ३७.*
३३. *मालशे स.ग., आपटे नंदा, पूर्वोक्त, पृष्ठ – ६६.*

विरोधाबरोबरच बहुतांशी स्त्रियांचीही मानसिकता विधवा विवाहविरूद्ध बनली होती असे म्हणावे लागेल.

५.४ सती प्रथा

शतकानुशतके चालत आलेली प्रथा असून पतीच्या मृत्युनंतर कुटुंबात आणि समाजात मानहानी होणार म्हणून सती जाणे योग्य आहे अशी समाजाची समजूत होती. ''पेशवाईत सतीची चाल प्रतिष्ठेची मानली जात असे''[३४] ''इ.स. १८१६ मध्ये पुण्यातील संगमावरच स्त्रीला सती जाताना एल्फिस्टन याने पाहिले.''[३५] महाराष्ट्रात असणारी ही पद्धत धर्मशास्त्रानुसार होती. ''विज्ञानेश्वर अनुमरण विधवांचा सामान्य धर्म असल्याचे सांगतो.''[३६] ''सती प्रथेतून सर्वात जास्त फायदा ब्राह्मणांचा होता. सती जाताना स्त्री आपले सर्व अलंकार काढून ब्राह्मणांना देत असे.''[३७] इ.स. १८२१ ते १८२७ या कालखंडात २६३ बळी सती प्रथेमुळे गेलेले दिसतात.

कलेक्टोरेट	१८२१	१८२२	१८२३	१८२४	१८२५	१८२६	१८२७	एकूण बळी
उत्तर कोकण	–	–	–	१	१	१	–	३
दक्षिण कोकण	५०	४७	३८	२७	३२	२८	२७	२४९
खानदेश	–	–	–	१	१	२	६	१०
पुणे	–	–	–	–	–	–	१	०१
अहमदनगर	–	–	–	–	–	–	–	–

स्त्रीयांच्या स्वप्नांची होळी केली जायची. त्यांची इच्छा नसताना त्यांना जिवंत जाळण्याची पद्धत १९ व्या शतकातील महाराष्ट्रात होती. ''इ.स. १८२३ मध्ये राधाबाई नावाची स्त्री अग्नी सहन न झाल्याने बाहेर आली. तेव्हा इंग्रज अधिकाऱ्यांनी तिला वाचविण्याचा प्रयत्न केला पण तो असफल झाला.''[३९] इंग्रज अधिकारी सतीबंदीच्या

३४. *शेणोलीकर ह.श्री., देशपांडे प्र.न., पूर्वोक्त, पृष्ठ – ३१३.*
३५. *घोडके ह.मो., पूर्वोक्त, पृष्ठ – ७७.*
३६. *पाटील शरद, जातीव्यवस्थाक संमती सेवकत्व, पृष्ठ – ७४.*
३७. *कित्ता, पृष्ठ – ७४.*
३८. *घोडके ह.मो., पूर्वोक्त, पृष्ठ – ८१.*
३९. *कित्ता, पृष्ठ – ७८.*

कायद्याची माहिती देत पण ही पध्दत समाजमनावर बिंबलेली असल्याने स्त्री सती जाण्याच्या मानसिकतेतच होती. ''कोंडोपंताची पत्नी वनारसीबाई यांनी सहगमनाची तयारी केली तेव्हा इंग्रजांनी समजावले पण ऐकण्यास तयार झाली नाही. घराला पहरा होता. सती जाणे अवघड म्हणून पतीच्या अग्नीसंस्कारास परवानगी देऊन अस्तीसोबत घेऊन वाईला जाऊन तेथे सती गेली.''[४०] १९ व्या शतकात सतीप्रथा चालू होती. ती बंद करण्यासाठी शासनाने प्रयत्न केले. पण परंपरेने मनावर बिंबलेल्या बाबी सोडावयास समाज तयार नव्हता.

५.५ केशवपन

स्त्रीयांच्या सौंदर्याची हानी करून पुरूषी आततायीपणाची पूर्ती करणारी एक पद्धत म्हणून 'केशवपन' सांगता येईल. आपल्या मृत्यूनंतर आपल्या पत्नीकडे कोणी वाईट नजरेने पाहू नये, म्हणून सौंदर्याचा नायनाट करण्याची पद्धत केशवपन होय. केशवपन करून स्त्रीयांना कुरूप बनवण्यात येई. ''ही चाल ब्राह्मणांमध्ये मोठ्या प्रमाणात होती.''[४१] या चालीला शास्त्रीय आधार देण्यात आला. तत्कालीन शंकराचार्यांनी या सर्व चालींचे समर्थन केले. ''इ.स. १८५४ साली शंकराचार्यांचे अहमदनगर येथे आगमन झाले. त्यांच्या प्रत्यक्ष प्रवेशाअगोदर त्यांनी नगरच्या सर्व नागरिकांना विधवांची डोकी भादरण्याची मुभा दिली.''[४२] स्त्रीयांना आपल्या सौंदर्याची हानी नकोशी वाटे म्हणून या प्रथेला तरूण विधवा विरोध करत. अशा वेळी दया, माया न दाखवता हात–पाय बांधून केस कापले जायचे. प्रत्येक महिन्याला भादरले जायचे. ''केस भादरले नाही तर मृत पतीच्या आत्म्याला शांती लाभत नाही.''[४३] म्हणून मृत आत्म्याला शांती लाभण्यासाठी करावयाचा एक धार्मिक विधीच बनला होता.

---

४०. घोडके ह.मो., पूर्वोक्त, पृष्ठ – ८२.

४१. कित्ता, पृष्ठ – ७५.

४२. मालशे स.ग., आपटे नंदा, पूर्वोक्त, पृष्ठ – ५.

४३. सिंगारे अनिल, पूर्वोक्त, पृष्ठ – ६३.

केशवपनाची अमानुष चाल बंद झाली पाहिजे आणि स्त्रीयांची मानसिक व शारिरीक सौंदर्याची हानी धर्माच्या नावाने होते. त्यामुळे ही प्रथा बंद व्हावी म्हणून, ''महात्मा फुले यांनी न्हाव्यांचा संप घडवून आणला.''[४४] यावर पुण्यातील वातावरण चिघळले. सनातनी वृत्ती व सुधारक वृत्ती यांत बाचाबाची होऊन सुधारकांना अनेक हाल अपेष्टा सहन कराव्या लागल्या. तेव्हा काही प्रमाणात बदल घडू लागला. या शतकात ही पद्धत सुरू असताना ती जपण्याचा कसोशीने प्रयत्न होत होता. त्याचबरोबर ब्रिटिश राजवटीत ही प्रथा बंद करण्यासाठी प्रयत्न झाले. पण समाजाची मानसिकता बहुतांशी रूढीला अनुसरून राहिली असे म्हणता येईल.

५.६ स्त्री शिक्षण

या काळातील स्त्री शिक्षणाचा विचार करता त्यांची अवस्था 'श्वापदांसारखी' होती. सर्व वर्णातील व धर्मातील स्त्रिया शिक्षणापासून वंचित होत्या. पेशवाईच्या अस्तानंतर आणि महात्मा फुल्यांच्या प्रयत्नांने शिक्षणाची सुरवात झाली. आगरकर, धोंडो केशव कर्वे यांनी स्त्री शिक्षणाचा प्रसार केला. ताराबाई, रमाबाई, आनंदीबाई अशा थोडक्याच महिला शिक्षित होत्या. अन्य महिला पारंपरिक पद्धतीने अज्ञानाचे पोषण करत होत्या. ''समाजातील कर्मठ सनातन्यांचा स्त्री शिक्षणाला विरोध होता.''[४५] तत्कालीन समाजातील इंग्रजी शिक्षण घेतलेल्यांना व समाज ज्यांना लोकमान्य म्हणतो अशांना ''स्त्री व पुरुषांना एकाच प्रकारचे व प्रतीचे शिक्षण मान्य नव्हते.''[४६] अशा परिस्थितीत महात्मा फुले यांनी स्वत:च्या पत्नीला शिकवून स्त्री शिक्षणाची ज्योत पेटवली. यामुळे स्त्री शिक्षणात बदल झाला. त्यात संख्यात्मक वाढ झाली. पण स्त्रीयांची परिस्थिती सुधारेल. स्वावलंबी व कणखर स्त्री या काळात निर्माण झाली नाही. पण पूर्वापार स्थितीमध्ये बऱ्यांच अंशी बदल झाला हे नक्की.

---

४४. *सिंगारे अनिल, पूर्वोक्त, पृष्ठ – ६४.*
४५. *फडके य.दि., पूर्वोक्त, पृष्ठ – ४१.*
४६. *कित्ता, पृष्ठ – ४१.*

६. वर्णव्यवस्था

भारतीय समाजाची आधारभूत व्यवस्था म्हणून याकडे पाहिले जाते. वर्णव्यवस्थेचा उगम ''ऋग्वेदातील दहाव्या मंडलात आहे.''[४७] ही वर्णव्यवस्था उत्तर वैदिक काळात दृढमूल झाली. काळाच्या ओघात यात बदल होऊन ती जातीव्यवस्थेची जननी ठरली आणि १९ व्या शतकात ''क्षत्रिय व वैश्य वाद झाले आणि ब्राह्मण, शूद्र व अतीशूद्र अशी समाजव्यवस्था झाली.''[४८]

'वर्ण' हा शब्द अनेक अर्थाने वापरला जातो. ''मुखावाटे स्पष्ट उच्चारले जाणारे मूल ध्वनी, अक्षर, रंग, ब्राह्मण, क्षत्रियादी मुख्य जाती''[४९] ''ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र हे चार वर्ण प्रजापतीपासून झाले.''

ब्राह्मण हा चार वर्णातील अग्रगण्य असून ''ब्रह्म मंत्र किंवा स्त्रोत रचणारे व म्हणवणारे ब्राह्मण होत ग्रंथाची रचना करणे, धर्माचे स्वरूप ठरवणे, कायद्याची निर्मिती व एकूण लेखनाची जबाबदारी असणारा हा वर्ण समाजात श्रेष्ठ ठरला.''[५०] ब्राह्मण भूदेव आहेत त्यांना सतत संतुष्ट ठेवले पाहिजे. ''ब्राह्मणांनी यज्ञ करणे बंद केले तर सूर्य उगवणार नाही.''[५१] अशी भीती समाजमनावर होती. वर्ण व्यवस्थेतील अधिकाराबाबतची तंट्यांचा निकाल देण्याचा जन्मसिद्ध अधिकार ब्राह्मणांनाच होता.[५२] सर्व समाजव्यवस्थेची सूत्रे ब्राह्मणांकडे एकवटली याला ब्राह्मणेत्तरांचे अज्ञान जबाबदार होते.

एकोणिसाव्या शतकात ''महात्मा फुले यांनी मूलभूत मानवी हक्काच्या आधारावर, मानवी समतेचा पुरस्कार करणारी आणि जातिभेद व धर्मभेद यांना धिक्कारणारी विचारसरणी जोतिबारावांनी आवेशाने सांगितली''[५३] आणि हजारो

---

४७. *कित्ता, पृष्ठ – ४१.*
४८. *सिंगारे अनिल, पूर्वोक्त, पृष्ठ – १७.*
४९. *आपटे वा.घो., मराठी शब्दरत्नाकर अर्थात मराठी–मराठी शब्दकोष, पृष्ठ ५२२.*
५०. *जोशी पंडीत महादेवशास्त्री (संपा.), पूर्वोक्त, पृष्ठ – ३२५.*
५१. *कित्ता, पृष्ठ – ३२३.*
५२. *फडके य.दि., पूर्वोक्त, पृष्ठ – ३२६.*
५३. *कीर धनंजय, मालशे स.ग. (संपा.) महात्मा फुले समग्र वाङ्मय, पृष्ठ – ०५.*

वर्षापासूनच्या मक्तेदारीला खिंडार पाडण्याचे युगप्रवर्तक कार्य केले. या प्रयत्नामुळे बहुजनांच्या विचारसरणीत बदलाची भूमिका निर्माण झाली. तरी १९ व्या शतकात पूर्णत: बदल झाला नाही. समाजावर ब्राह्मणांचे वर्चस्व अजूनही होते असेच म्हणता येईल. पुढे २० व्या शतकात सनातनी वृत्तीच्या हट्टामुळेच हिंदू कोडबिलामुळे आंबेडकरांना त्रास झाला.

एकोणिसाव्या शतकात ''समाजाचे धार्मिक, सांस्कृतिक आणि वैचारिक नेतृत्व उच्च वर्णीयांकडेच होते.''[५४] ब्राह्मण वर्ग समाजाची सूत्रे आपल्या हाती घेऊन वाटचाल करतानाचे चित्र १९ व्या शतकात दिसते.

वर्णव्यवस्थेत क्षत्रियांकडे रक्षणाचे कार्य असे. ''युद्धात मिळालेल्या स्त्रिया, वस्तू, धन, धान्य यावर क्षत्रियांचा अधिकार होता. वैश्य व शूद्रांकडून भेटवस्तू घेण्याचा अधिकार होता. इतरांना शिकवण्याचा अधिकार नव्हता. पण थोडेफार शिक्षण घेण्याचा अधिकार होता व त्यास वैश्याचा व्यवसायही करता येत असे.''[५५] म्हणजे क्षत्रिय हा ब्राह्मणानंतरचा वर्ण असून त्यास अल्प प्रमाणात शिक्षण, धनधान्य, व्यवसाय बदलण्याचा अधिकार होता.

समाजात वैश्याचे स्थान तिसऱ्या क्रमांकला असून ''समाजाच्या मूलभूत गरजा पुरवणे, शेती, व्यापार, पशुपालन हे काम असून यज्ञ करणे, दान देणे, गोरक्षण हे प्रमुख कर्तव्य होते. हा जास्त कर देणारा वर्ण होता. वैश्यांना मद्य, मांस, श्रीखंड व चमड्यांचा व्यापार निषिद्ध होता. आपत्कालीन परिस्थितीत शूद्रांना कार्य करता येत असे.''[५६]

वर्णव्यवस्थेत शूद्र शेवटचा घटक असून त्याने सर्व वर्णियांची सेवा करावी लागे. वरिष्ठ वर्णाच्या सहानुभूतीवर, त्याच्या उरलेल्या टाकाऊ अन्नावर जीवन जगावे

---

५४. *शहा मृणालिनी, पूर्वोक्त, पृष्ठ – ११.*
५५. *सिंगारे अनिल, पूर्वोक्त, पृष्ठ – १९.*
५६. *कित्ता, पृष्ठ – १९.*

लागे. याच बरोबर शिल्पकला, वाद्यवादन, गायन इ. कलेचे कार्य करावे लागत असत.[५७]

६.१ वर्णव्यवस्थेत शिक्षेचे स्वरूप

धर्मशास्त्रकारांनी सर्वप्रकारच्या शिक्षेतून ब्राह्मणांना सूट दिली होती. समाजामध्ये सर्व क्षेत्रात त्यांना विशेषाधिकार प्राप्त असून राजकीय क्षेत्रात पुरोहिताला विशेष स्थान होते. विजयासाठीच्या मंत्र पठनापासून राजाच्या अनुपस्थितीत राज्य चालवण्याचा अधिकार प्राप्त होता. राजाचा राज्याभिषेक करण्यामुळे राजापेक्षा श्रेष्ठ स्थान प्राप्त झाले. ''जसा शिष्य गुरुला, पुत्र पित्याला, सेवक स्वामीला आदरस्थानी मानतो तसे राजाने पुरोहिताला पुज्य मानावे''[५८] समाजात पुरोहिताला देवता समान मानून पूजा केली जात असे. धार्मिक क्षेत्रातील ब्राह्मण हा अढळ होता. ब्राह्मण सर्वस्वी असल्याने शिक्षेचे स्वरूपही तोच दाखवत असे. यामुळे त्याने शिक्षेपासून जवळपास स्वत:ला वंचित ठेवले होते. ''जरी झाला भ्रष्ट तरी तिन्ही लोकी श्रेष्ठ''[५९] असे ब्राह्मणांना स्थान होते. अन्य वर्णियांना मात्र साधारण गुन्ह्याबद्दल कठोर शिक्षा आणि ब्राह्मणाला कठोर गुन्ह्यासाठी अतिसाधारण शिक्षा होत्या.

६.२ वर्णव्यवस्थेतील परिवर्तन : क्षत्रिय व वैश्याची उचलबांगडी, अतिशूद्र वर्णाची निर्मिती

वैदिक काळात अस्तित्वात असलेली वर्णव्यवस्था १९ व्या शतकापर्यंत कायम असून या व्यवस्थेत ताठरता आली. ब्राह्मण व क्षत्रिय वर्णात श्रेष्ठ कोण? यावरून संघर्ष निर्माण झाला. ब्राह्मण स्वत:स देवापेक्षा श्रेष्ठ समजत. ''देवांना हवे तसे वाकवण्याचे सामर्थ्य मंत्रात आहे व हे मंत्र आपल्याजवळ आहेत हे त्यांना माहीत होते.''[६०] श्रेष्ठत्वाच्या या संघर्षात ब्राह्मणांनी क्षत्रियांवर मात केली, तरी परशुरामाने

---

५७. *कित्ता, पृष्ठ – २१.*
५८. *सिंगारे अनिल, पूर्वोक्त, पृष्ठ – २१.*
५९. *कित्ता, पृष्ठ – २१, २२.*
६०. *कित्ता, पृष्ठ – २१.*

एकविसवेळा पृथ्वी निक्षत्रिय केली. या आख्यायिकेवरून मध्ययुगीन काळात वैश्य आणि शूद्राचे कार्य सारखेच झाल्याने वैश्य वर्णाचेही स्वतंत्र अस्तित्व संपुष्टात आले. शूद्रातील काही कनिष्ठ जातींना गावकुसाबाहेर घालवून अतीशूद्र वर्णाची निर्मिती केली व मुळातील चातुवर्ण्य व्यवस्थेत परिवर्तन होऊन तीन वर्गात सर्व समाज विभागला गेला तो असा.

विष्णूच्या दशावतार कथेत सहावा परशुरामाचा अवतार सांगितला असून याने ''क्षत्रिय राजा कार्तवीर्याला ठार करून सर्व क्षत्रियांना एकवीस (२१) वेळा ठार मारले''[६१] आता पृथ्वीवर कोणीही क्षत्रिय उरला नाही. म्हणून वर्णव्यवस्थेतून क्षत्रियांची उचलबांगडी केली. हाच मुद्दा धरून ब्राह्मणांनी ''छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकास विरोध केला.''[६२] ''वैदिक काळात तिन्ही वर्णासाठी असलेला उपनयनाचा विधी फक्त ब्राह्मणांतच होत असे.''[६३] हे कारण आणि छत्रपती शाहू महाराजांचे वेदोक्त[६४] यावरून हे स्पष्ट आहे की क्षत्रियांची वर्णव्यवस्थेतून उचलबांगडी केली.

''वैश्य वर्ण शूद्राचे कार्य आपत्काळात करत.''[६५] यामुळे शूद्र व वैश्यांच्या कार्यात रसमिसळ झाली. यामुळे वैश्य कोण व शूद्र कोण ओळखणे अवघड झाले. यामुळे व उपनयन वैदिक काळात होत होता तो होईना यामुळे क्षत्रियांबरोबर वैश्याचीही उचलबांगडी केली.

आता समाजाचे चित्र ब्राह्मण व ब्राह्मणेत्तर सर्व शूद्र आणि पूर्वीच्या शूद्र वर्णातील घाणेरडे कार्य करणाऱ्या जाती अस्पृश्य वर्णात टाकल्या. यामुळे एकोणिसाव्या शतकात ब्राह्मण, शूद्र व अतिशूद्र असे झाल्याचे दिसते.

---

६१. *सिंगारे अनिल, पूर्वोक्त, पृष्ठ – २१.*
६२. *कित्ता, पृष्ठ – २१.*
६३. *कित्ता, पृष्ठ – २१.*
६४. *पवार जयसिंग भाऊसाहेब, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, पृष्ठ –*
६५. *सिंगारे अनिल, पूर्वोक्त, पृष्ठ – २२.*

७. जातीव्यवस्था

जातीव्यवस्था हे भारतीय समाजाचे वैशिष्ट्ये आहे. भारतीय सामाजिक स्थिती पाहता अन्याय आणि विषमतेने बरबटलेली दिसते. ''अन्याय आणि विषमता हा नेहमीच जातीव्यवस्थेचा स्थायीभाव राहिला आहे.''[६६] यामुळे समता निर्माण होण्यात मोठा अडसर निर्माण झाला आहे. ''पारंपरिक समाजरचनेत व्यक्तीची प्रतिष्ठा आणि तिने कोणत्या कुळात जन्म घेतला यावर अवलंबून असते.''[६७] व्यक्तीच्या कर्तव्याला वाव देण्यापेक्षा त्याच्या जातीला महत्त्व दिले जाते. म्हणून जात नेमकी काय आहे हे पाहणे महत्त्वाचे ठरते.

७.१ जात म्हणजे काय ?

जात या शब्दाला पर्यायी इंग्रजीत Caste हा शब्द आहे. तो Casta या लॅटिन शब्दापासून तयार झाला. त्याचा अर्थ प्रजाती किंवा जन्मभेद असा आहे. ''जात म्हणजे जन्मभेदाच्या आधारावर निर्माण झालेली व्यवस्था''[६८] म्हणून जातीला ओळखले जाते.

Dr. V.A. Smith[६९] says, "A cast may be definded as a group of families internally united by perticular rules for the observance of ceremonial purity. Specially in the matter of diet & marriage." Sam Shastri "Cast means social exclusivences with reference to diet & marriage. Birth & rituals are secondary."

एकंदरीत अनुवांशिकता, अंतर्विवाही समूह स्वत:चे नाव सांगेल अशा कुटुंबसमुहाचे संघटन, एका मानवी किंवा ईश्वरी पूर्वजांचे वंशज, परंपरागत व्यवसाय, धार्मिक पंरपरागत समानता, एकजीनसीपणा या सर्व वैशिष्ट्यांनी जात निर्माण होते.

---

६६. *समाज प्रबोधन संस्था, पुणे (संपा.), जाती व्यवस्थेचे बदलते आधार, पृष्ठ – १५.*

६७. *कित्ता, पृष्ठ – ११.*

६८. *बोबडे प्रकाश, पूर्वोक्त, पृष्ठ – ९८.*

६९. ***Keswani K.B., History of modern India 1800-1984, Page no. 11.***

'ब्राह्मण' ही समाजव्यवस्थेत एक प्रमुख जात असून ब्राह्मणेत्तर शूद्र जाती आहेत आणि यातही शूद्रातील घाणेरडे कार्य करणारे अस्पृश्य ठरले. वैश्य आणि क्षत्रियांची उचलबांगडी केल्याने शूद्र जाती व अस्पृश्य जातीच राहिल्या. १९०१ साली देशातील अस्पृश्यांची आकडेवारी ५,३२,३६,६३२ अशी आहे यावरून ''एक षष्ठांश भारत अस्पृश्य''[७०] आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. अस्पृश्यता स्वच्छ व अस्वच्छ अस्पृश्य[७१] असून ''मुंबईतील १९०१ च्या खानेसुमारीनुसार स्वच्छ – १,३९,१७१ अस्वच्छ २०,५०,०१४ असून एकूण २१,८९,१८५ आहे. यामध्ये आगर, अलितकर, भांगी, भावय, चुन्नर, भंगी, चामठा, चांभार, चन्नयन (व्हलियार) हुलुसार, ठोस, दुरगभुरगी, डवगार, दुबळा गारूडी, सिंधवा, तुरी, च्छुरा दास, कोतवाल, मोगर, मुक्ती अनेक अनिश्चित जाती आहेत.''[७२]

७.२ गावकुसाबाहेर अस्पृश्याची वस्ती

मनुस्मृतीत सांगितल्याप्रमाणे ''चांडाळाची वस्ती गावकुसाबाहेर असावी''याप्रमाणेच खेड्यापाड्यात परिस्थिती दिसते. गावच्या ''पूर्वेकडील भागात गावची वेस संपल्यावर अस्पृश्याची वस्ती असते. अस्पृश्यांची जातीवरून नावे पडलेली असतात.''[७३] यात भारतीय समाजातील निंदनीय प्रथा 'शिवाशिव' असून मानवाच्या स्पर्शाने मानव अस्पृश्य बनत असे. यावरून मानवापासून मानवता कोसो मैल दूर असल्याची वाटते. जन्माला आल्यावर तो अपवित्र म्हणून जन्मतो. जीवनात कितीही चांगले कार्य केले तरी अपवित्र म्हणूनच मरतो. ''पेशवेकाळात तर अस्पृश्यांना सकाळ–संध्याकाळ सावली पडते व सावलीमुळे ब्राह्मण अपवित्र होतात म्हणून फिरणे बंद असे. ते दुपारी बारा वाजता फिरत.''[७४] अस्पृश्यांना कुत्र्यापेक्षा जास्त गलिच्छ जीवन जगण्यास भाग पाडले जात असे.

---

७०. *शिंदे विठ्ठल रामजी, भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न, पृष्ठ – ७६, ७७.*

७१. *कित्ता, पृष्ठ – ८५.*

७२. *कित्ता, पृष्ठ – ९०, ९१.*

७३. *बापट विष्णूशास्त्री, पूर्वोक्त, पृष्ठ – ७९.*

७४. *सिंगारे अनिल, पूर्वोक्त, पृष्ठ – ३१.*

अस्पृश्यांच्या व्यवसायाच्या संदर्भात त्यांना सर्वात खालची कामे करावी लागत असत. अस्पृश्यांना कामातून सुटका म्हणजे मृत्यु असे. कामाच्या मोबदल्यात अन्न दिले जाई त्यात नाही भागल्यावर चोऱ्या दरोडेखोरीचा व्यवसाय करत.

८. गुलामगिरी व वेठबिगारी

गुलामगिरी ही समाजव्यवस्थेतील पूर्वापार चालत आलेली पद्धत आहे. ही पद्धत एकोणिसाव्या शतकातही महाराष्ट्रात अस्तित्वात होती. भारतीय गुलामगिरी ही ग्रीक व रोमन या पाश्चात्य देशातील गुलामगिरीसारखी नव्हती, असे असले तरी प्राचीन काळापासून गुलामगिरी ही संस्था अस्तित्वात होती. अनेक ''प्राचीन संस्थांचे पुनरूज्जीवन करण्यात आले. गुलामगिरीची निर्मिती ही त्यापैकी एक होय,''[७५] आणि ही गुलामी कशामुळे आणि कोणाला भोगावी लागते यावर प्रकाश टाकला असता युद्धातील पराभूत लोक प्रामुख्याने स्त्रियांना गुलाम केले जाई. 'कर्जबाजारीपणा, दुष्काळ, बदकर्म करणाऱ्या स्त्रिया, (शूद्र) बटिका किंवा कुणबीनी भेट दिल्या जायच्या. व्यंग असलेली संतती, फुस लावून केलेले गुलाम' या सर्व प्रकारच्या गुलामांना ''कुणबिनी व पोरगे''[७६] म्हणत. त्यांचे जीवनमान फार वाईट नव्हते पण अतिशय चांगले होते असे ही नव्हे. याबाबत सर्वत्र सारखी स्थिती होती असे म्हणता येत नाही. कारण गुलामांचे जीवनमान मालकावर अवलंबून असे.

भारतीय समाजजीवन जातीव्यवस्थेने प्रभावित झाले असल्याने गुलाम व जातीव्यवस्था यांचा संबंध पाहणे आवश्यक ठरते. जातीव्यवस्थेने पछाडलेल्या समाजजीवनात गुलामगिरी आपले अस्तित्व वेगळे ठेवू शकली नाही. कारण ''धर्मशास्त्राप्रमाणे ब्राह्मण गुलाम होऊ शकत नाही'' म्हणून ब्राह्मण सोडून अन्य जातीतून गुलामांचा पुरवठा होत असे. यात मुसलमानांचाही समावेश असे. ''पेशवे काळात अतिशूद्र जाती सोडल्यास बहुतेक शूद्र जातीतून गुलामांचा पुरवठा होत असे.''[७७]

---

७५. *डॉ. गवळी पी.ए., पूर्वोक्त, पृष्ठ – ३१९.*

७६. *कित्ता, पृष्ठ – ३२३.*

७७. *कित्ता, पृष्ठ – ३३६.*

इ.स. १८०९ पासून या प्रथेचे उच्चाटन करण्याचे प्रयत्न सुरू झाले. इंग्रजांनी हिंदू व मुसलमान या दोन्ही समाजातील या गुलामगिरी प्रथेचे संगोपन केले. ''मुंबई इलाख्यातील सरकारी दप्तरात गुलामांच्या खरेदी–विक्रिच्या व आयात–निर्यातीच्या नोंदी पहावयास मिळतात.''[७८] १९ व्या शतकाच्या अखेरपर्यंत गुलाम पळवण्याचे प्रकार चालू होते. यावरून असे म्हणता येईल की १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात भारतामध्ये महाराष्ट्रात गुलामगिरीची पद्धत बऱ्याचअंशी संपुष्टात आली पण नष्ट झाली नव्हती. ती भारतीय समाजव्यवस्थेचे एक महत्त्वपूर्ण अंग बनून राहिली होती आणि हिंदू, मुस्लिम, ख्रिस्ती या समाजाची मान्यताही होती.

८.१ वेठबिगारी

प्राचीन काळापासून वेठबिगारी अस्तित्वात असल्याची दिसते. 'वेठबिगार हे सरंजामशाहीचे प्रतीक आहे.' राजा प्रजेच्या संरक्षणाच्या बदल्यात कर घेत असे. समाजातील ज्या घटकांची हा कर देण्याची ऐपत नव्हती त्यांनी विनावेतन काम करून मोबदला चुकवावा लागत असे त्यास 'विष्टि' म्हणत असत. आणि जो व्यक्ती विष्टि देत असे त्यास 'वेठेकरी–बिगारी' म्हटले जाई. वेठबिगार समाजातील सर्वांनाच किंवा सर्वच जातींना होती असे नव्हे. तर ब्राह्मण जातीच्या लोकांना वेठबिगारी नव्हती. शूद्र व अतिशूद्र जातीतील काही जातींना वेठबिगारी होती. वेठबिगारी घेण्याचे कार्य ''पाटील'' करत असे. वेठबिगारी ही जाती व्यवस्थेशी निगडीत आहे. सरकारने एखाद्या गावाकडून वेठबिगारी द्यावी असे ठरले तर गावातील पाटील व अन्य वरिष्ठ समाज हलक्या समजल्या जाणाऱ्या लोकांकडून वेठबिगारी घेत असत.

एकंदरीत समाजव्यवस्थेचा घटक असलेली वेठबिगारी अमानवीय होती. अंधारात खितपत पडलेल्या समाजाचे अधिकच शोषण करण्याची ही एक पद्धती होती, असे म्हणता येते.

एकंदरीत एकोणिसाव्या शतकातील सामाजिक स्थिती पाहता समाज संमिश्र

---

७८. घोडके ह.मो., पूर्वोक्त, पृष्ठ – ८५–८६.

व संभ्रममय विचारात होता. हजारो वर्षांपासून चालत आलेली सामाजिक स्थिती कायम होती. त्यात परिस्थितीजन्य व जाणीवपूर्वक काही बदल झाले हे बदल सर्वसामान्य जनजीवनाला पोषक नव्हते. यात इंग्रजांचा त्रास पण त्यांची सुधारक विज्ञानवादी वृत्ती भारतीयांना बदलण्यास कारणीभूत ठरली. त्यामुळे महात्मा फुले यांनी सामाजिक व सांस्कृतिक बदलाची संकल्पना मांडली. आता उच्चवर्गीय शिक्षणाबरोबर सर्वसामान्य शिक्षण घेऊन स्वत:च्या अस्तित्वाचा शोध घेऊ लागला म्हणून हे शतक सामाजिक विचार, आचार व कृतीतील परिवर्तनाची मनोभुमिका निर्मितीचे होते, असे म्हणता येईल.

ब) धार्मिक स्थिती

'धर्म' हा सर्व मानवाशी निगडीत संज्ञा आहे. जगातील अनेक विचारधारेचा व्यक्तीचा एक विशिष्ट 'धर्म' असतो. 'धर्म' या शब्दावरून वेगवेगळे विचार व तत्वज्ञान मांडले, अनेकांनी आपली मते मांडली. ''धृ'' या धातूपासून बनलेल्या 'धर्म' या शब्दाचा अर्थ 'धारण करणे' असा होतो. पुण्यात्म पुरूषाकडून धारण केला जाणारा व समाजधारणेची तत्त्वे सामाजिक आचारसंहिता धर्म असते.[७९] ''प्रतिके, श्रद्धा, मूल्य आणि प्रथा यांच्या अर्थावर प्रकाश टाकणारी संस्था धर्म म्हणून संबोधली जाते.''[८०] ''मनुष्यास सदाचरण, परमेश्वर चिंतनाचा मार्ग दाखवणारा धर्म''[८१] धर्माचा अर्थ ''शास्त्रविहित कर्म, दान, गुण, कर्तव्य, न्याय.''[८२] धर्म या शब्दात 'डॉ. आ.ह. साळुंखे'[८३] म्हणतात, ''बहुसंख्यासाठी मानसिक आधार जीवनाची नियंत्रक शक्ती असते. मानव म्हणून कसे जगावे व कसे वागावे या विषयी मार्गदर्शन करतो.'' कृ.पा.

---

७९. *जोशी ज.वा., धर्माचे तत्त्वज्ञान, पृष्ठ – ६.*

८०. *जोशी बी.आर. (संपा.), डायमंड सामाजिक ज्ञानकोष, खंड – ३, १८५१.*

८१. *जोशी ज.वा., पूर्वोक्त, पृष्ठ – २३.*

८२. *आपटे वा.गो., पूर्वोक्त, पृष्ठ – २९४.*

८३. *साळुंके आ.ह., गुलामांचा आणि गुलाम करणाऱ्यांचा धर्म एक नसतो, पृष्ठ – ५.*

कुलकर्णी[८४] धर्म शब्दाची व्याख्या, '''कर्मकांड, वेदांत, नीती'' या बाबींना मुख्य मानतात.''

उपरोक्त विवेचनावरून असे म्हणता येते की, 'धर्म' ही बाब मानवी जीवनाशी निगडीत असून आयुष्यभर येणाऱ्या सुख दु:खाच्या वेळी काढावयाचा मार्ग आहे. 'धर्म' याबाबत विचारवंतात एकमत नाही.

१) हिंदू धर्म

भारतीय धर्मातील प्राचीन धर्म म्हणून हिंदू धर्म ओळखला जातो.

''प्रमाण्य बुद्धिर्वेदेषू साधनामनेकता।
उपस्थानामनियम एतध्दर्मस्य लक्षणम्।।''[८५]

वेदप्रमाण, अनेक पद्धतीची साधना, उपास्थ कोणते असावे या विषयी निश्चित नियम नसणे, हे हिंदू धर्माचे लक्षण आहे. ''हिंदू धर्माला श्रुतीस्मृती पुराणोन्त म्हटले आहे.''[८६] हा श्रृती, स्मृती, पुराण, वेद या वैदिक साहित्यावर वाटचाल करणारा धर्म १९ व्या शतकात टिकून राहिला. ''नाना तत्व असून एकत्व आणि परिवर्तन असूनही अखंडत्व''[८७] या तत्वावर टिकून राहिला. यामुळे प्राचीन काळापासून चालत आलेली चातुवर्ण्य पद्धती १९ व्या शतकात होती. धर्मावर ब्राह्मणाचे वर्चस्व होते. ''क्षत्रिय व ब्राह्मण यांचा वाद असून महाराष्ट्रातील मराठा समजला जाणारा क्षत्रिय ब्राह्मणांनी 'शूद्र' ठरवला. यामुळे शाहू महाराजांनी 'क्षात्रजगतगुरूपीठ' निर्माण केले.''[८८] हा धार्मिक बदलाचा काळ १९ व्या शतकाच्या शेवटी झाला.

१.१ धर्मांधता

१९ व्या शतकातील महाराष्ट्रातील धर्म चालीरिती, रीतीरिवाज, रूढी परंपरा, कर्मकांड यांच्या आधाराने चालत होता. समाज स्थितीशील असून बदलास नकारात्मक

---

८४. जोशी ज.वा., पूर्वोक्त, पृष्ठ – ३.
८५. जोशी पंडीत महादेवशास्त्री (संपा.), भारतीय संस्कृतिकोष, खंड – १०, पृष्ठ – ३४६.
८६. डांगे स.अ., हिंदू धर्म आणि तत्त्वज्ञान, पृष्ठ – ३.
८७. जोशी पंडीत महादेवशास्त्री (संपा.), भारतीय सांस्कृतिकोश, खंड – आठवा, पृष्ठ – ५००.
८८. गरूड साहेबराव, सावंत बी.बी., महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास, पृष्ठ – १४८.

प्रतिसाद होता. धर्माचा पगडा सर्व स्तरावर असून ''देवभोळेपणा होता. देवऋषी, तांत्रिक, मांत्रिक, देव अंगात येणे, भूतबाधा, भानामती, जरीमरी चेटकी, ग्रामदेवाला बळी, नवस बोलणे व फेडणे, ब्राह्मणास भोजन, विविध अनुष्ठाने, शकून–अपशकून, मौल्यवान दागिने दान देणे, अर्पण करणे, दक्षिणा, प्रायश्चित, शांती करणे, दिव्य करणे.''[८९] या प्रकारे धर्माच्या नावाने धर्मांधता १९ व्या शतकात महाराष्ट्रात सुरू होती.

२.२ ख्रिस्ती धर्मोपदेशकांचा प्रभाव

ब्रिटिशांच्या राज्यव्यवस्थेसोबत ख्रिश्चन धर्माचा प्रसार करण्यास सुरूवात झाली. मिशनऱ्यांच्या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांवर त्याचा प्रभाव दिसू लागला. हिंदू लोकांचा मात्र हिंदूंना बाटवण्यासाठी, धर्मभ्रष्ट करण्यासाठी शाळा सुरू केल्या असा समज झाला. इंग्रजी शिकू नये यामुळे ''धर्मावरचा विश्वास उडतो, नास्तिक मत बनते, खाणपान आणि सोवळ्या ओवळ्याबद्दल विधिनिषेध बाळगत नाही, व्रतवैकल्याची टर उडवतात. संध्या, पूजापाठ आणि एकूणच धर्मविधी करत नाहीत.''[९०] यामुळे पूर्वापार चालत आलेला व त्याविषयीचा अभिमान नष्ट होतो. हिंदू धर्मातील व्यक्तीचे कर्तव्य पार पाडत नाहीत यामुळे हिंदू धर्म नष्ट होईल. याला वेळीच आवर घातली पाहिजे असा विचार महाराष्ट्रीयनांकडून होत असे. १८९७ ला रमाबाईंनी शाळा कोंडवला नेली. या वेळी 'शारदा सदनातील १५० विद्यार्थ्यांपैकी ४९ जणींनी बाप्तिस्मा घेऊन ख्रिश्चन धर्म स्वीकारला. इ.स. १८४३ मध्ये श्रीपत शेषाद्री प्रकरण उद्‌भवले. यात बाळशास्त्रींनी पुढाकार घेऊन त्याला धर्मात परत आणले. ''१५ एप्रिल १८५७ रोजी नाना शंकरशेठ यांनी तक्रार केली. सरकारी शाळेतून विद्यार्थ्यांना शिकवताना ख्राईस्ट, विष्णू, शिव, महंमद व झुरतुष्ट या संबंधी बोलायचे नाही किंवा स्पष्टीकरण करायचे नाही असे बजावले.''[९१]

यावरून ख्रिस्ती धर्मोपदेशकांनी महाराष्ट्रामध्ये ख्रिस्ती धर्माचा प्रसार चालवला

---

८९. *सिंगारे अनिल, पूर्वोक्त, पृष्ठ – ३९.*

९०. *फडके य.दि., पूर्वोक्त, पृष्ठ – ४२.*

९१. *कित्ता, पृष्ठ – ४४.*

होता व त्यांना प्रतिसादही मिळत होता. हा प्रतिसाद हिंदू धर्म अभिमान्यांना मान्य नव्हता. मिशनऱ्यांच्या अशा धोरणावर व त्यांच्या शाळांवर बहिष्कार सनातनी वर्ग घालत होता. ज्यांना इंग्रजी विद्या समजली होती पण पारंपरिकता, जात नव्हती अशा वर्गाने समर्थन केले. महाराष्ट्रीयन व्यक्तिवर ख्रिश्चन धर्माचा प्रभाव टाकून ख्रिस्ती बनवण्यात मिशनऱ्यांना काही प्रमाणात का असेना यश मिळाले आणि यामुळे आता पाश्चात्य ख्रिश्चनाबरोबर महाराष्ट्रीयन ख्रिश्चन निर्माण होऊ लागले.

३) मिशनऱ्या विरूद्ध मोहीम

मिशनऱ्यांचा हिंदू धर्माविरूद्धचा प्रचार याला उत्तर व्याख्याने, वादविवाद, पुस्तके, पत्र यातून देण्यात येऊ लागली. याचाच एक भाग ''मोरभट दांडेकरांचा रेवरंड वित्सनबरोबरचा वाद, कृष्णशास्त्रीचे विचारलहरीपत्र, कृष्णशास्त्री साठे यांची ख्रिश्चन धर्मविरोधी व्याख्यानमाला, विष्णुबुवा ब्रह्मचारी यांचा 'समुद्रकिनारीचा वादविवाद, वेदोन्त धर्मप्रकाश' मिशनऱ्या विरूध्दच्या मोहिमेवरून वैदिक धर्म, संस्कृत विद्या, चातुवर्ण्य यांचा अभिमान बाळगताना भारतीय दिसतो.''[९२] महाराष्ट्रामध्ये आपले अस्तित्व टिकवायचे असेल तर मिशनऱ्यांच्या ख्रिस्ती प्रसाराला आळा बसला पाहिजे आणि यासाठीचा महत्वाचा उपाय म्हणजे लोकांच्या मनात धर्माभिमान वाढवणे.

मिशनऱ्यांना सत्ताधाऱ्यांचा पाठिंबा आहे आणि पाश्चात्य विद्या घेतलेल्या भारतीयांच्या मनात हिंदू धर्माविषयी शंका असल्याने मिशनऱ्यांच्या प्रचाराला तोंड देण्यासाठी वैदिक कालखंडाचे उदात्तीकरण केले. ''भारतीय संस्कृती जगात श्रेष्ठ होती व प्राचीन युरोपीयनांची मागास अवस्था होती'' या आशयाने मिशनऱ्यांना विरोध केला. हिंदू धर्मातील कर्मठता, अनिष्ठ रूढी, जातीयता, असमानता यामुळे व ख्रिश्चनांचा बंधुभाव, प्रेम, सहानुभुती याकडे लोक आकर्षित होऊ लागले. हिंदू धर्मातील या पद्धतीस ब्राह्मण जबाबदार असल्याने ''एकोणिसाव्या शतकातील सनातनी समाजाला आपल्याच धर्म व संस्कृतीची टीका करणारा गोपाळ हरी देशमुख

---

९२. *कित्ता, पृष्ठ – ४७.*

खलपुरूष वाटले.''[९३] पण लोकहितवादींची अशी टीका करण्यामागचा हेतू हिंदू धर्माची होत असलेली अवनती व यामुळे ब्राह्मणांचे होणारे नुकसान दिसत असावे ते म्हणतात, ''ब्राह्मणांना त्यांच्या दैवी भुमिकेचे, ईश्वरदत्त कार्याचे विस्मरण झाले.''[९४] यातून त्यांना गत वैभव सांगून धर्माभिमान वाढवण्याचा प्रयत्न होता.

एकंदरीत मिशनऱ्यांवर उलट टीका, स्वधर्म अभिमान, स्वधर्मातला कुचकामी विचार, त्याग व कर्तव्यांची जाणीव स्वधर्माविषयी धर्माभिमान निर्माण करून मिशनऱ्यांना विरोध केला.

४) धार्मिक सुधारणा आंदोलन

ख्रिश्चन धर्माचा प्रसार, हिंदूधर्मातील अनिष्ठता व अमानवीयता यामुळे उदास लोकमन आणि इंग्रजी विद्यामुळे कारण शोधणारा शिक्षित यांना हिंदू धर्मातील मागासपणाचे मर्म समजून धर्म सुधारणा सर्व सुधारणेच्या मुळाशी आहे हे समजले व धार्मिक बाबतीत सुधारणास सुरूवात झाली. यासाठी ''३१ मार्च १८६७ मध्ये प्रार्थना समाजाने''[९५] स्वत:च्या खोट्या अभिमानाऐवजी धर्माला आलेली ग्लानी दूर केली व समाजाला आधार देऊन सोयीस्कर जीवन जगण्याचा मार्ग दिला व सर्व धर्मातील सत्य विवेचक बुद्धीने घ्यावे सत्याचा स्वीकार व असत्याचा त्याग सांगितला. यामुळे चिकित्सक दृष्टीने धर्माकडे पाहण्याची दृष्टी निर्माण झाली. ''१० एप्रिल १८७५ मध्ये मुंबईत आर्य समाज स्थापन झाला.''[९६] याने वेदप्रामाण्य व पुराणावर झोड उठवली आणि जातीभेद, अस्पृश्यता, स्त्रीशिक्षण, पुनर्विवाह यास पाठिंबा दिला, मात्र सनातन्यांनी विरोध केला. कसलाही बदल नको म्हणून पारंपरिक हिंदू धर्माचे रक्षण करण्यासाठी 'धर्म महापरिषद'[९७] प्रसिद्धीस आली. या पारंपरिक व सुधारवादी धर्मविचारापेक्षा सर्व घटकांना बांधणारा विचार ''महात्मा फुले''[९८] यांनी मांडला.

---

९३. *घोडके ह.मो., महाराष्ट्र गाथा भाग – २, पृष्ठ – १२.*
९४. *कित्ता, पृष्ठ – १०.*
९५. *फडके य.दि., पूर्वोक्त, पृष्ठ – ४७.*
९६. *कित्ता, पृष्ठ – ५८.*
९७. *जोशी बी.आर., राऊत तोरणीकर, डायमंड सामाजिक ज्ञानकोश, खंड – १, पृष्ठ – २४१.*
९८. *फडके य.दि., पूर्वोक्त, पृष्ठ – ५४.*

सर्वांना समान ठेवणारा 'सार्वजनिक सत्यधर्म' सांगितला. यामुळे शूद्रातिशूद्र, सर्व जातीच्या स्त्रिया, शेतकऱ्यांची दुर्दशा दूर करण्याचा प्रयत्न केला. यास जबाबदार असणाऱ्या वैदिक धर्म व वर्ण वर्चस्वावर हल्ला चढवला.

अशाप्रकारे १९ व्या शतकात आहे त्या धर्मात सुधारणा कराव्यात, असा विचारप्रवाह वाहत असताना हा वरवरचा बदल परिणामकारक नाही. म्हणून मुळातूनच बदलण्याचा विचार ही झाला.

५) बौध्द धर्म

गौतम बुद्धाच्या काळात महाराष्ट्रात बुद्ध धम्माचा प्रवेश झाला होता. ''पूर्णाने बुद्ध धम्माची दीक्षा गोदावरी नदी किनारी पैठण जवळ घेतली.''[९९] महाराष्ट्रात ''कन्हेरी, जुन्नर, नाणेघाट, नाशिक, कार्ली, अजिंठा, वेरूळ, पितळखोर, औरंगाबाद, शिखळ, वाई, कऱ्हाड, कोल्हापूर, कुडा, वार्ला, महाड, सुधागड, नेनावली, शेलारवाडी, कोंडीवते, कोंडाणे, बेडसा या ठिकाणी बुद्ध धम्माच्या खुणा दिसतात.''[१००] महाराष्ट्रात रूजलेला आणि महाराष्ट्राला नवा विचार देणारा बुद्ध धम्म १९ व्या शतकात नावालाच राहिला. मानवाला मानव बनवून ठेवणारा 'धर्म' खडक, दगड, पाषाण व ग्रंथातच राहिला असे म्हटले तर अतिशयोक्ती नाही. कारण ''महाराष्ट्रातील बौद्ध धर्मीय व ब्राह्मण धर्मियांनी हिंदूकरण केले.''[१०१] पुढे धर्मानंद कोसंबी व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धम्माला सार्वत्रिक बनवले. याबाबत असे म्हणावे वाटते की, भारतात उगम पावलेला आणि जगभर पसरणारा बौद्ध धम्म १९ व्या शतकात मात्र जन्मभूमिला परका झाला.

६) इस्लाम धर्म

महमंद पैगंबरांनी स्थापन केलेल्या धर्माला इस्लाम अशी संज्ञा आहे. इस्लाम धर्म एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्रात प्रचलित होता. ''माऊंट स्टुअर्ट

---

९९. *मोरे मा.श., महाराष्ट्रातील बुद्ध धम्माचा इतिहास, पृष्ठ – ३४.*

१००. *कित्ता, पृष्ठ – ८१ ते ९३.*

१०१. *कित्ता. पृष्ठ – १०३.*

एलफिस्टनच्या''[१०२] इ.स. १८३९ च्या History of India या ग्रंथात हिंदू कालखंड व मुस्लीम कालखंड अशी इतिहासाची विभागणी इस्लाम धर्माचे अस्तित्व स्पष्ट करते. महाराष्ट्रात राज्यकर्ते म्हणून इस्लाम परिचित आहेत. ''इस्लाममध्ये प्रामुख्याने दोन पंथ असून एक शिया आणि दुसरा सुन्नी. इस्लाम आणि हिंदू यांच्यात मतभेद असूनही ऐक्यही होते.''[१०३] इस्लाम धर्म एकच ईश्वर मानतो. नमाज, रोजा, जकात यांना महत्त्व असून 'ईद' हा महत्त्वपूर्ण सण आहे. ''महाराष्ट्रीयन मुसलमानांवर सुफी संघाचा प्रभाव जास्त आहे,''[१०४] म्हणूनच महाराष्ट्रात 'पीर' यांची पूजा व नवस हिंदू मुस्लीम दोन्ही धर्मीय आजही करतात. इस्लाम धर्म ऐहिक इहवादी धर्म आहे. ''धर्मग्रंथ कुराण यात ऐहिक जीवनाचा विचार केला आहे.''[१०५] महाराष्ट्रात हिंदू मुस्लीमांचे दंगे वेगळेपणाची भावना ही होती. ''इ.स. १८९९ मध्ये हिंदू मुसलमानांच्या मुंबईत दंगली पेटल्या.''[१०६] यामुळे ''मुस्लीम वेगळेपणाला विरोध करणारा हिंदूत्वाच्या जाणीवेवर आधारलेला हिंदूच्या हिताचे रक्षण करणारा विचार बळावला तो हिंदू राष्ट्रवाद निर्माण झाला.''[१०७] तर ''आर्य समाज व ख्रिश्चन मिशनऱ्या यांच्या शिकवणुकीपासून इस्लाम धर्माचे रक्षण करण्यासाठी अहमदिया चळवळ इ.स. १८८९ मध्ये मिर्झा गुलाम अहमद यांनी सुरू केली.''[१०८]

७) जैन धर्म

महाराष्ट्रात असणाऱ्या अनेक धर्मापैकी जैनधर्म हा एक असून ''दक्षिण भारतात जैन सभा ही या भागातील प्रातिनिधिक संस्था १८९९ पासून कार्यरत आहे.''[१०९] ''२० व्या शतकापूर्वी जैन धर्माचा समन्वय नष्ट झाल्याने उतरती कळा आली होती व

---

१०२. *सिंगारे अनिल, इतिहासकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पृष्ठ – २२.*
१०३. *जोशी महादेव शास्त्री (संपा.), भारतीय संस्कृतिकोष खंड –१, पृष्ठ – ५७१.*
१०४. *सुराणा पन्नालाल, बेडके हाळकिशोर,आजचा महाराष्ट, प्रस्तावना, पृष्ठ – ११.*
१०५. *जोशी पंडीत महादेव शास्त्री (संपा.), पूर्वोक्त, पृष्ठ – ५६५.*
१०६. *फडके य.दि., पूर्वोक्त, पृष्ठ – ५८.*
१०७. *जोशी बी.आर., तोरणीकर सुलभा (संपा.), डायमंड सामाजिक ज्ञानकोश, खंड – २, पृष्ठ – २४०.*
१०८. *जोशी बी.आर., तोरणीकर सुलभा (संपा.), डायमंड सामाजिक ज्ञानकोश, खंड – १, पृष्ठ – २४१.*
१०९. *शांतीसागरजी महाराज, सत्कार भारती, भाग –१, पृष्ठ – १.*

जैन मुनी परंपरा खंडीत झाली होती.''[११०] जैन धर्म ऋषभदेव पासून वर्धमान महावीर अशा प्रमुख चोवीस तीर्थंकारांनी प्रामुख्याने चालवला. यात दिगांबर व श्वेतांबर असे दोन पंथ आहेत. इंद्रियनियंत्रण यास सर्वस्वी महत्त्व जैनधर्म देतो.

एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्रात धार्मिक चिंतन व धार्मिक बदल घडले. प्रामुख्याने असणारा हिंदू धर्म तर्क, वैज्ञानिकता या माध्यमातून तपासला जाऊन त्यातील फोलपणा उघडकीस आला म्हणून अनेकजण अन्य धर्माकडे जाऊ लागले. याउलट आपलाच धर्म कसा पवित्र, श्रेष्ठ व प्राचीन आहे हे सांगणारा सनातनी वर्ग ही उदयास आला. अनेक वर्ष राज्य करणारा इस्लामचा प्रभावही या काळात महाराष्ट्रात असून तात्विक विरोधाबरोबरच भावनिक व श्रद्धेत एकताही जपणारा हिंदू मुस्लीम संबंध या काळात होता. ख्रिश्चनांच्या प्रभावाने ख्रिश्चन धर्माचाही स्वीकार अनेकांनी केला. हिंदू धर्म अनेक पंथामध्ये विभागला आणि जातीसारख्या भयानक आजाराने कमकुवत बनलेला असतानाही उपचार घेण्यास तयार नव्हता. प्रार्थना समाज, आर्यसमाज, सत्यशोधक समाज यांनी धार्मिक परिवर्तनाचा विचार देऊन या काळात धर्मावर धर्मग्रंथावर शंका घेण्यास आणि धर्माचे सत्य, असत्य, पडताळून पाहण्यास लोकमानस तयार करत असताना दिसतात.

क) राजकीय स्थिती

महाराष्ट्राच्या इतिहासात डोकावून पाहिले तर राज्यात असलेली अंदाधुंदी नाहीसी करून प्रत्येकाला आपले वाटावे असे स्वराज्य छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केले. दिल्लीचा बादशाहा 'स्वराज्य' ताब्यात घेण्यासाठी आला स्वराज्य तर त्याच्या हाती लागले नाहीच पण तो दिल्लीला परत ही जाऊ शकला नाही. शिवाजी नंतर संभाजी, राजाराम, ताराबाई आणि अनेक मराठा सरदारांनी स्वराज्याची जिवापाड काळजी घेतली. शाहू नंतर मराठा राज्याचे हस्तांतरण पेशव्याकडे गेले आणि समतावादी

११०. *कित्ता, पृष्ठ – ४४.*

राज्याच्या जागी ब्राह्मणी हिताचे राज्य अवतरले. या काळातही अनेक राजकीय गतींना वेग आला पण उत्तरोत्तर क्षमताहीन नेतृत्व येऊन मराठा राज्य मानसिक, आर्थिक आणि लष्करीदृष्ट्या दुबळे बनले.

ईष्ट इंडिया कंपनीने संबंध भारतात आपली सत्ता स्थिरावण्याचा प्रयत्न चालवला. यासाठी पोषक वातावरण त्यांना मिळाले. येथील अस्थिरतेचा राजेरजवाड्यामधील दुहीचा, गटबाजीच्या स्पर्धेचा फायदा उचलला. महाराष्ट्राचे राजधानीचे ठिकाण म्हणून पुणे समजले जाते आणि या दरबारात ब्रिटिशांचा शिरकाव होण्यास आपआपसातील हेवे–दावे कारणीभूत ठरले. ''पुण्यात इंग्रज वकील ठेवण्यास नाना फडणीसाने शिफारस केली. ती मराठ्यांचा प्रमुख प्रवक्ता म्हणून महादजी शिंदे यांचे वर्चस्व वाढीस लागले म्हणून''[१११] इंग्रजांनाही महादजीचा राजकारणातील वाढता प्रभाव रोखावयाचा होता. ही संधी साधली व महाराष्ट्राच्या राजकारणात इंग्रजांचा हस्तक्षेप सुरू झाला.

दिवसेंदिवस परिस्थिती नाजूक होत होती. अनाचाराचे आणि गोंधळाचे साम्राज्य पसरले असून अस्थिरता निर्माण झाली. यास ''पुणे दरबारातील ब्राह्मणांचे वर्चस्व, अंतर्गत भांडणे आणि राजकर्त्यांची सनातन वृत्ती या राष्ट्राच्या प्रगतीला आळा घालण्यास कारणीभूत ठरल्या''[११२]

पेशवाई ही सर्व अर्थाने कमकुवत व जाचक बनलेली राजेशाही ब्रिटिशांनी मोडली आणि महाराष्ट्रामध्ये राज्य केले. असे करताना राजकारणाचा लवलेश नसलेल्या आणि आजतागायत व्यवस्थेने टाकलेल्या माणसाला याचा अर्थ कळत नव्हता. पण ब्राह्मण वर्ग संमुख ठेवण्यात इंग्रजांनी मागे पाहिले नाही. लोकभावना ज्या व्यक्तिठायी आहेत अशा व्यक्तींच्या नावे मेवा खाण्याचे कार्य ब्रिटिशांनी केले.

१८५७ च्या उठावाने महाराष्ट्रातही 'स्व' चा विचार पेटला आणि राजकारणाचा

---

१११. कुलकर्णी अ.रा., कंपनी सरकार, पृष्ठ – ४७.

११२. कित्ता, पृष्ठ – ५३.

संघटित प्रारंभ १८८५ च्या राष्ट्रीय सभेने करून ब्रिटिशांच्या इशाऱ्याची वाट पाहिली. मात्र या सर्व राजकीय स्थितीतून सामान्य दुर्लक्षित राहिल्याचे दिसते.

ड) आर्थिक स्थिती

मानवी जीवनाचा इतिहास पाहता कोणत्याही काळी व कोणत्याही समाजात 'अर्थव्यवस्था' ही परिणामकारक असते व त्याचे स्थान महत्त्वाचे असते. १९ व्या शतकातील आर्थिक परिस्थिती तेथील शेती, पशुपालन, व्यापार, उद्योग एकंदरीत मिळकतीची साधने कोणती व ती साधने किती सक्षम आहेत यावरच अर्थव्यवस्था आधारलेली असते. ब्रिटिशांनी जिंकलेला पेशव्यांचा प्रदेश या ठिकाणी सुव्यवस्थित ब्रिटिश प्रणालीची व्यवस्था निर्माण करणे महत्त्वाचे होते. पेशवा बाजीराव दुसरा याने प्रशासनाच्या जवळपास सर्व विभागामध्ये गोंधळ निर्माण केला होता. हा गोंधळ नष्ट करून स्थीर व्यवस्था निर्माण करणे ब्रिटिशांपुढील एक समस्या होती. उजाडलेली गावे आणि उध्वस्त ग्रामीण अर्थकारणास सावरण्यासाठी नवीन उपायांची आवश्यकता होती.

एकंदरीत एकोणिसाव्या शतकाची अर्थव्यवस्था पाहता ब्रिटिशांच्या आगमनाने पूर्ण पूर्वापार चालत आलेली अर्थव्यवस्था नष्ट होऊ लागली. खेड्याऐवजी शहरांचे महत्व वाढू लागले. तसेच खेडी ओस पडू लागली. शिक्षणाच्या प्रसारामुळे नवशिक्षितांचा वर्ग निर्माण झाला व तो महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेवर विचार करू लागला. सामान्य मात्र त्रस्तच राहिला. शेती, व्यापार यात सुधारणा करण्याचा प्रयत्न केला पण त्याचा फायदा इंग्रजांना झाला. महाराष्ट्रातील सर्वसामान्य नैसर्गिक संकटे, पावसाचा लहरीपणा यामुळे खचला. त्यात धर्माचा बोजा आणि सक्तीचे ब्रिटिशांची वसूली यामुळे बहुसंख्य समाज दयनीयच होता, असे म्हणता येईल.

संस्कृती

एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्राच्या सांस्कृतिक स्थितीचा अभ्यास प्रस्तुत प्रबंधाच्या पार्श्वभूमीतील एक भाग म्हणून करावयाचा असल्याने 'संस्कृती'चा सखोल अभ्यास संस्कृतीच्या व्यापकतेमुळे कालखंडाच्या व्यापकतेने शक्य नाही. इथे एकोणिसाव्या शतकातील सांस्कृतिक स्थिती नेमकी कशी होती याचा ढोबळ अभ्यास योग्य आहे.

आपण दैनंदिन जीवन जगताना ही आमची संस्कृती आहे ती आमची संस्कृती नाही असे म्हणतो; नेमके संस्कृती म्हणजे काय? हे पाहिल्यावर ''कृ = करणे या धातूपासून बनलेल्या 'कृती' या शब्दाला प्र.वि. आणि सम् असे उपसर्ग लागून प्रकृती, विकृती, संस्कृती असे शब्द अनुक्रमे बनतात. प्रकृती म्हणजे निसर्ग, विकृती म्हणजे त्यात होणारा विकार किंवा बिघाड, संस्कृती म्हणजे प्रकृतीत विकार किंवा बिघाड होऊ नये या उद्देशाने तिच्यावर करावयाचे सम्यक संस्कार होत.''[११३] मानव हा निसर्गाचाच भाग असल्याने नैसर्गिक परिस्थितीबरोबर स्वत:चा देह, मन, बुद्धी यांच्यावर संस्कार करून बदल घडविण्याचा प्रयत्न करतो. मनुष्य सुखाचा भोक्ता आहे. तो ते मिळवण्याचा सातत्याने प्रयत्न करतो. असे करताना त्याला नैसर्गिक व स्वत:च्या आंतरिक परिस्थितीशी एकट्याने किंवा अनेक मानवांच्या साहाय्याने सतत झटपटत असतो. यातून भौतिक सृष्टी व मानसिक सृष्टी निर्माण होते. ''ही द्विविध प्रकारची निर्मिती म्हणजे संस्कृती होय.''[११४]

डॉ. इरावती कर्वे यांच्या मते, ''संस्कृती म्हणजे एखाद्या मनुष्य समाजाची दृष्य अशी भौतिक वस्तुरूप निर्मिती तसेच मनुष्य समाजाचे असे चित्र की जे डोळ्यांना दिसू शकत नाही. परंतु त्याचे आकलन विचारांनी होऊ शकते.''[११५] 'इरावती कर्वे'

---

११३. *जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा.), भारतीय संस्कृतिकोश, खंड – १, प्रस्तावना.*

११४. *शेणोलीकर ह.श्री., देशपांडे प्र.न., पूर्वोक्त, पृष्ठ – ३.*

११५. *अत्रे शुभांजना, रायरीकर कल्पना, महाराष्ट्र संस्कृती, पृष्ठ – १.*

यांनी संस्कृतीला दृष्य व सूप्त प्रकारात मांडून त्याला मानवी जीवनाशी जोडले म्हणून संस्कृतीचे स्वरूप नैसर्गिक व मानवनिर्मित आहे. म्हणून संस्कृती हे मानवाचेच वैशिष्ट्य आहे.

मानवाला जीवन जगताना वेगवेगळ्या प्रसंगांना सामोरे जावे लागते. या प्रसंगातून खरे–खोटे, बरे–वाईट, सत्य–असत्य, पाप–पुण्य, धर्म–अधर्म, नीती–अनीती, देव–दानव अशा विविध प्रश्नांवर विचार करून जीवन जगण्याची एक पद्धती निर्माण होते. या पद्धतीनुसार तो मानवसमूह जीवन जगतो हे जीवन पिढ्यान्पिढ्या जगले जाते तेव्हा ती त्या मानव समुहाची 'संस्कृती' बनते.

एकंदरीत एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्रात सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय क्षेत्रात बदल झाल्याने ओघानेच सांस्कृतिक परिस्थिती बदलली आणि वैचारिक वादळ होऊन शिक्षित समाज कार्यक्रम झाला. यातून बहुजन शिक्षितांना आपली संस्कृती ही प्रचलित संस्कृतीपेक्षा भिन्न आहे. समाज, धर्म, अर्थराजकारण या सर्व बाबतीत आमची भिन्नता असल्याने प्रतीसंस्कृती निर्मितीचा प्रयत्न सुरु झाला. हा सांस्कृतिक क्षेत्रातील सर्वात मोठा बदल म्हणता येईल.

एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्राचा व उत्तमराव मोहिते यांच्या जन्मापूर्वीची परिस्थिती पाहिली असता असे दिसून येते की, महाराष्ट्रीयन समाज जीवन व राजकारण यांच्यावर धर्माचा प्रभाव असून हजारो वर्षापासूनची हिंदू–वैदिक, धार्मिक पध्दत चालू होती. चातुवर्ण्य व्यवस्था अधिक बळकट स्वरुपात खंबीरपणे उभी असल्याचे दिसते. श्रुतीस्मृती पुराण आणि महाकाव्य या आधारावर जीवनव्यवस्था व जीवनव्यवहार चालत असे. हिंदूनंतर मुस्लीम समाज असून तो पारंपरिक इस्लाम धर्म व धार्मिकता यावर अवलंबून होता.

ब्रिटिशांच्या सुधारणावादी व वैज्ञानिक धोरणाचा भारतीयांना फायदा मिळाला. यातून अनेक भारतीय सुधारक म्हणून पुढे आले. पारंपरिक चौकटीत राहून सुधारणा व चौकट मोडून सुधारणा असा सुधारकांमध्ये भेद होता. इंग्रजांमुळे आधुनिकता येण्यास

मदत झाली आणि शाळा, महाविद्यालये सुरु झाल्याने पारंपरिक, सामाजिक, धार्मिक, आर्थिक व सांस्कृतिक स्थिती परिवर्तनाचा विचार आकार घेऊ लागला. परंतु, जीवनाच्या सर्वच क्षेत्रात पराकाष्ठेची विषमता एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्रात होती. विषमता नष्ट करण्यासाठी वैयक्तिक व संघटनात्मक प्रयत्न सुरु होते. म्हणून एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्र म्हणजे पारंपरिकता व आधुनिकता यांच्यातील संघर्ष होता, असे म्हणता येईल.

***

प्रकरण दुसरे

वीर उत्तमराव मोहिते यांचे जीवनचरित्र

२.१ प्रस्तावना

२० व्या शतकातील महाराष्ट्रात सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक व सांस्कृतिकदृष्ट्या समाजजीवनात नाविन्य आले होते. भारतीय स्थिती ही ब्रिटिश अंमलाखाली ब्रिटिश वर्चस्वाखाली होता. यापासून महाराष्ट्र वेगळा करता येत नाही. ब्रिटिशांच्या शोधक वृत्तीमुळे भारतातही विचार करणाऱ्या शोध घेणाऱ्यांच्या संख्येत भर पडली. कोणत्याही क्षेत्रातील अशा कर्तबगार व्यक्तींना महत्त्व प्राप्त झाले. भारतात तर व्यक्ती सार्वजनिक बाबींकडे झुकण्याची वृत्ती समाजात श्रेष्ठ ठरत होती. कारण परकियांना हाकलून स्वत:ची राजवट, सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक स्थितीची पुनर्रचना करण्याचा खटाटोप व संकल्प तयार झालेला होता. परकीय हाकलण्याबरोबर देशातंर्गत समता स्थापने व अंतर्गत कलह थांबवून एकात्मता निर्मितीच्या या काळात सत्यवादी व परखड आणि पुनर्मांडणी करण्याचा तत्कालीन काळाचा मानस होता.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस राजकीय संघटन राजकारणात सक्रिय होते. ब्रिटिशांच्या 'फोडा आणि राज्य करा' या नितीमुळे अव्यवस्था निर्माण झाली होती. देशाचे पारतंत्र्य व ते घालविण्यासाठीचा उपाय जागृत मंडळी शोधत होती. देशाचे अज्ञान, अंधश्रद्धा, धर्मभोळेपणा या कारणाने दुर्दशा झाली. म्हणून म. फुले यांनी सांगितलेला मार्ग, राजश्री शाहूंचा विचार, तसेच अंधश्रद्धा अज्ञान आणि धर्मभोळेपणा जोपासणारा वर्ग इथे कार्यरत होता. नव्याने विचार संकल्पना मांडल्या जात होत्या. जुन्यांची हकालपट्टी व दुरूस्ती होत होती. यात एक वादाची अवस्था चालत आली होती. या सर्वांवर उपाय म्हणून ज्ञानाची गरज होती. याचा अर्थ भारतात ज्ञान नाही असा होत नाही.

''आपल्यामध्ये मागच्या हजारो वर्षाचा वारसा आहे पण हे ज्ञान मृत आहे ते आपल्या पायाखालचा आधार आणि हातातील शस्त्र असावयास पाहिजे होते पण तसे असण्याऐवजी ते आपल्यालाच खाऊन टाकणारे विष बनले आहे.''[१] यामुळे ज्ञानाच्या क्षेत्रात प्रचंड बदलाची गरज विसाव्या शतकाच्या प्रारंभी निर्माण झाली होती. विसाव्या शतकात महाराष्ट्र या परिस्थितीपासून वेगळा नव्हता. ''मराठी भाषिक माणूस शरीराने विसाव्या शतकात वावरत असला तरी मनाने तो मध्ययुगातच रमलेला आहे.''[२] या काळात समाजाला एक योग्य व निश्चित दिशा देणाऱ्या विचारांची गरज होती.

२.२ अमरावती

अमरावतीचा बहुतांश भाग आपण जसजसे मागे जाऊ तसा तो घनदाट जंगालाचा आणि विरळ लोकवस्तीचा आढळतो. इ.स. ७२२ मधील राष्ट्रकुट घराण्यांच्या ताम्रपटात राणी 'अंबरमतीचा उल्लेख' आढळतो. औदुंबर तसेच उंबराची झाडे भरपूर असल्याने आणि प्राचीन विदर्भाची ऐश्वर्यसंपन्न नगरी स्वर्गातल्या इंद्राच्या राजधानीशी साधर्म्य करणारी असल्याने कदाचित अमरावती हे नाव पडले असावे. अमरावतीचा इतिहास महाभारत काळापासून चांगला ज्ञात आहे. 'चिखलदरा' हे महाभारत काळापासून प्रसिद्ध आहे. पाच पांडवातील बलदंड भिमाने कीचकाचा वध या ठिकाणी केल्याची आख्यायिका आहे. यामुळेच कीचकधरा चे अपभ्रंश होऊन चिखलदरा झाले.

मोगल काळात दक्षिण भारताची विभागणी प्रशासनाच्या सोयीसाठी खानदेश, वऱ्हाड, औरंगाबाद, बिदर, विजापूर व हैदराबाद या सहा सुभ्यात करण्यात आली होती. या सहा सुभ्यांत कारभाराचे मुख्यालय औरंगाबाद असून सुभेदाराची नेमणूक मोगल बादशहा करत असे. यातील 'मीर कामरूद्दीन निजाम उल् मुल्क फिरोजजंग खान खानान चिन कुलीज खान' या सुभेदाराने मोगल सम्राट दुबळे झाल्याचा फायदा

१. *नरहर सुजाता, पश्चिमेच्या भग्नावशेषातून भारताचा पुनर्जन्म, पृष्ठ – १५.*

२. *फडके यशवंत दिनकर, विसाव्या शतकातील महाराष्ट्र, प्रस्तावना, पृष्ठ – १.*

घेऊन आपल्या सहा सुभ्यांचे मिळून स्वतंत्र अशा हैदराबाद राज्याची स्थापना करून हैदराबाद राजधानी केली. (इ.स. ३१ जुलै १७२४) ब्रिटिश अंमलापूर्वी वऱ्हाड हैदराबादच्या निजामाच्या अधिपत्याखाली असून यात सोळा (१६) जिल्ह्यांचा समावेश होता. अमरावती यावेळी वणी (उन) जिल्हा म्हणून ओळखला जायचा याचे मुख्यालय यवतमाळ (यवत) हेच होते. इ.स. १८६४ पूर्वी यवतमाळ जिल्ह्याचा बहुतांशी भाग अमरावती जिल्ह्यातच समाविष्ठ झाला.

इ.स. १७०७ ते १७२२ या काळात दुष्काळामुळे हा भाग उजाड झाला होता. नंतर छत्रपती शाहू महाराजांनी १७२२ मध्ये हा मुलुख 'राणोजी भोसले' यांना वंशपरंपरागत दिला. यापूर्वी बहनेर बीबी मध्ये अमरावती हा एक 'कसबा' होता. राणोजी भोसल्यांनी इ.स. १७६० पर्यंत वैभवाच्या शिखरावर नेहवून पोहचवले. म्हणून राणोजी भोसल्यांना अमरावतीचे जनक म्हणून ओळखतात. पुढे इ.स. १३ ते १५ डिसेंबर १८०३ ला इंग्रजांनी निजामच्या ताब्यात दिला.

अमरावती शहराचा हा भाग ठग आणि पेंढाऱ्यांपासून बचाव करण्यासाठी शहराभोवती परकोट बांधला. या परकोटास नागपूरी गेट, जवाहर गेट, अंबा गेट, खोलापूरी गेट व महाजन गेट अशी नावे असलेली पाच महाद्वारे असून खिडक्या ही आहेत. हा प्रांत निजामाने ईस्ट इंडिया कंपनीला इ.स. १८५३ साली सुपूर्द केला. तर इ.स. १९०३ साली हा भाग केंद्र शासनाच्या अखत्यारीत येऊन इ.स. १९५६ सालच्या राज्य निर्मितीमध्ये महाराष्ट्राचा महत्त्वाचा भाग बनला.

अमरावती जिल्हा सहा महसूली उपविभागांचा व साडेबारा हजार चौरस फुटांचा, सध्या १४ तालुके असणारा, ऐतिहासिक, पर्यटन, शैक्षणिक, सांस्कृतिक राजकीय व औद्योगिकदृष्ट्या महत्त्वाचा जिल्हा असून सातपुडा पर्वतरांगेतील गविलगडचे डोंगर तापी व पूर्णा या महत्त्वाच्या नद्या आहेत. इ.स. १ मे १९६२ रोजी अमरावती जिल्हा परिषदेची निर्मिती झाली. अमरावतीला सहा जिल्हे व एक राज्याची सीमा लागून आहेत.

एकोणिसाव्या शतकाचा शेवट आणि विसाव्या शतकाच्या प्रारंभी ''वऱ्हाडात सुधारणावादी प्रयत्न सुरू झाले. याचीच प्रतिक्रिया '१९१० मध्ये अमरावती येथे महार सुधारणा मंडळाची स्थापना झाली' तर १९०४ ते १९१० या काळात कृष्णराव भालेकर यांनी सत्यशोधक समाजाचे कार्य केले.''[३] अशा प्रकारची कार्य विसाव्या शतकाच्या प्रारंभी होत असले तरी वऱ्हाड प्रांत सत्यशोधकी झाला किंवा समतावादी झाला असे म्हणता येत नाही. कारण याच काळात जसे पुरोगामी विचारांची वाटलाच अमरावतीत होत होती. तशीच प्रतिगामी विचारांची वाटचाल सुरू होती. समाजामध्ये सुधारणा, समाजाची जागरूकता निर्माण करून जातीभेद निर्मुलन, स्पृष्यास्पृष्यता, दास्यता, अंधश्रद्धा घालवल्याशिवाय समाजाची प्रगती होणार नाही. म्हणून पुरोगाम्यांनी स्वीकारलेला मार्ग सामाजिक उत्थानाचा होता तर राजकारणात जाऊन वर्चस्व प्रस्थापित केले आणि ब्रिटिशांना घालवून सत्ता आपल्या हाती घेतली म्हणजे 'राजा बोले दल हले' या उक्तीप्रमाणे हवी तशी व्यवस्था राबवता येईल या उद्देशाने काँग्रेसच्या माध्यमातून 'लोकमान्य टिळक प्रतिगामी विचारधारा जोपासून वाटचाल करत होते' आणि अमरावती या पासून वंचित नव्हता. सेंट्रल प्रोव्हिजन अँड बेरार (सी.पी. अँड बेरार) असे नाव असलेल्या या राज्यात नागपूर आणि अमरावती महत्त्वाची राजकीय केंद्रे होती. ''अमरावतीचे बाबासाहेब खापर्डे हे लोकमान्य टिळकांचे विश्वासू मित्र व काँग्रेसचे नेते होते. तसेच वामनराव जोशी, मोरोपंत जोशी हे नेते होते.''[४] उच्चवर्णीय आपला पारंपरिक हक्क सोडण्यास तत्पर नव्हते तर ज्यांना जीवन अडचण वाटू लागली अशा कनिष्ठ वर्णियांना हे नेतृत्व नको वाटत होते. म्हणून ''उच्च वर्णिय नेतृत्वाविरुद्ध संघर्ष करत नवे नेतृत्व ब्राह्मणेत्तर मराठा–कुणबी जातीतून याच काळात तयार होऊ लागले.''[५]

एकंदरीत अमरावतीला प्राचीन काळापासूनचा वारसा असून आधुनिक काळात

---

३. *रिंढे नितीन, लोकनेते डॉ. पंजाबराव देशमुख, पृष्ठ – ४६.*

४. *कित्ता, पृष्ठ – ४५.*

५. *कित्ता, पृष्ठ – ४६.*

अमरावतीमध्ये पारंपरिक व आधुनिक या दोन्ही विचारधारा आपल्या अस्तित्वासाठी लढत होत्या, असे दिसून येते.

२.३ मोहिते घराणे

महाराष्ट्रामध्ये निंबाळकर, शिर्के, मोरे, जगताप, बांदल, मोहिते, जाधव अशी अनेक व परकियांची चाकरी करणारी शूर घराणी होती. ''मराठ्यांच्या ९६ कुळी घराण्याच्या यादीत 'मोहिते' घराण्याचा समावेश होतो.''[६] या घराण्याचे मुळ कुळ चहमान (चव्हाण) असून वंशाने सुर्यवंशी व वेद ऋग्वेद गादी संबरीगड रणथंब असून निशाण श्वेत व देवक अष्टव आहे.

''मोहिते घराण्यातील 'रतोजी मोहिते' यांचा पुत्र 'तुकोजी मोहिते' यांचे महाराष्ट्रातील घोरपडे व घाटगे यांच्याशी सोयरसंबंध झाले.''[७] यामुळेच मोहिते इ.स. १६२२ मध्ये आदिलशाहाच्या चाकरीत आले. यानंतर 'मोहिते यांचा संबंध भोसले घराण्याशी आला.' मोहिते घराण्यातील स्त्रीया भोसले घराण्यात सुन म्हणून देण्यात आल्या. त्यात तुकाबाई, सोयराबाई व ताराबाई या मोहित्यांच्या मुलींचा भोसले घराण्याने सुन म्हणून स्वीकार केला. ''शहाजी राजे भोसले यांनी संभाजी मोहिते यांना १० जानेवारी १६२६ रोजी तळबीडची देशमुखी मिळवून दिली. यामुळेच ते तळबीडकर मोहिते पाटील व तळबीडकर मोहिते देशमुख म्हणून नावाला आले.''[८] अशा पद्धतीने कऱ्हाड जवळच्या वसंतगड किल्याच्या पायथ्याशी असणाऱ्या तळबीड येथे मोहिते स्थिरावले व पुढील काळात महाराष्ट्रभर पसरले आणि पाटील व देशमुखी संपल्यानंतर सामान्य नागरीकांप्रमाणे जीवन जगू लागले.

अमरावती जिल्ह्यातील 'कुरळपूर्णा' या गावी वास्तव्यास असणाऱ्या परसरामजी मोहिते यांना पांडूरंगजी मोहिते हा मुलगा झाला. परसराम मोहित्यांनी

---

६. *वैद्य चिं.वि., शिवाजी निबंधावली खंड १, २, पृष्ठ – ५६, ५७.*

७. *पवार जयसिंगराव, महाराणी ताराबाई, पृष्ठ – ३१.*

८. *डॉ. शिवदे सदाशिव, सेनापती हंबीरराव मोहीते, पृष्ठ – ६.*

पांडूरंगचा विवाह जाईबाशी केला व पांडूरंग मोहित्यांचा संसार उभा राहिला. पांडुरंग यांना आपल्या वडीलांकडून जेमतेम मालमत्ता मिळाली. परसराम हे साधारण कुटुंबातील होते तसेच शिक्षणाचा अभाव असल्याने आणि त्याकाळची परिस्थिती शिक्षणास पोषक नसल्याने ते स्वत: व मुलगा पांडुरंग यांना शिक्षण देवू शकले नाहीत. यांची विचारधारा ही पारंपरिक विचारधारा असून नव्या विचारापासून दूर राहिले.

''पांडुरंगजी मोहिते यांना एकूण पाच अपत्य झाली.''[९] ''रामराव हा सर्वात मोठा मुलगा इ.स. १८८५ साली जन्माला आलेल्या मुलाने प्रोव्हेट इंटर केलेले असून पुढे छत्रपती शाहू महाराजांकडे पुरोहित म्हणून कार्य केले. छत्रपती शाहू महाराजांच्या वडिलांची पिंड 'मटनाने' पाडली.''[१०] शारीरिक आजाराने त्यांचा मृत्यु झाला.

'कौशल्या' ही रामरावांनंतर जन्माला आली. विश्वासराव देशमुख यांच्या बरोबर विवाह लावला पण कौशल्याला वैवाहिक जीवन लाभले नाही. वयाच्या आठव्या वर्षीच पतीशोक पत्करावा लागला. त्या माधन, ता. चांदूर येथील कस्तुरबा आश्रमात राहिल्या. 'पंजाबराव मोहिते' हे पांडुरंगजी यांचे तिसरे अपत्य यांना मूळ बाळ झाले नाही. चौथे अपत्य उत्तमराव मोहिते असून पाचवे व शेवटचे शामराव मोहिते हे पोलीस सब इनस्पेक्टर (P.S.I.) होते. त्यांचा वयाच्या ३५ व्या वर्षी अचानक मृत्यु झाला.

''मोहिते आडनाव आहे 'मोहड' अपभ्रंशाने झाले. आजही 'मोहड' आडनावाच्या व्यक्ती मोहिते आहेत असा छत्रपती शाहूंकडून सुगावा रामराव मोहित्यांना लागल्यावर 'मोहड' ऐवजी मोहिते असे अडनाव लावण्यास प्रारंभ झाला.''[११]

२.४ उत्तमरावांचा जन्म व बालपण

पांडुरंग मोहित्यांचे वास्तव्य असणाऱ्या अमरावती जिल्ह्यातील 'कुरळपुर्णा'

---

९. *वैद्य चिं.वि., पूर्वोक्त, पृष्ठ – ५६, ५७.*

१०. *मोहिते मैनाबाई, जीवनगाथा, पृष्ठ – ६.*

११. *मोहिते मैनाबाई यांची मुलाखत, २९ जून २०१०.*

हे लहान पण महान गाव आहे. या गावापासून विदर्भातील महत्त्वूपर्ण नदी 'पुर्णा' वाहत असल्याने या गावाला 'कुरळपुर्णा' हे नाव पुर्णाच्या जवळ असल्याने पडले. या गावातच पांडुरंगजी व जाईबाई या दाम्पत्याच्या पोटी चौथ्या क्रमांकाला जन्माला आलेले अपत्य म्हणजे 'उत्तमराव मोहिते' होय. ''उत्तमरावांचा जन्म दि. ०७ सप्टेंबर १९१० या साली सर्वसाधारण शेतकरी कुटुंबात झाला.''[१२]

उत्तमरावांचे आई वडील अशिक्षित तसेच पारंपरिक विचारांचे असल्याने आणि घरची परिस्थिती सामान्य यामुळे आई वडिलांकडून विशेष शिक्षणाची व्यवस्था झाली नाही. गावामध्ये असणाऱ्या परिस्थितीकडे हसत खेळत पाहणारा हा बालक वाढत होता. गावात फिरणे, खेळणे, शेताकडे जाणे, नदीवर पोहणे, आपल्या सवंगड्यासोबत खेळणे. गरिबी काय श्रीमंती काय, दु:ख काय, सुख काय याची कल्पना अजून उत्तमरावांना आली नव्हती. जात काय, धर्म काय, हलके काय, भारी काय, स्पृश्य कोण, अस्पृश्य कोण याची जाणीव नव्हती. मोकळ्या मनाचे जे कोणत्याही बालकाला कळत नाही, एकमेकांकडे जाणे, बसणे, उठणे, खेळणे, आनंद घेणे, रागावणे, भांडणे पण लगेच विसरणे अशी निरागस अवस्थेत बालकाची वाढ होते, अशी उत्तमरावांची झाली.

उत्तमरावांची वाढ होत असताना म्हणजे एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी सामाजिक व्यवस्था गुंतागुंतीची व जटील बनली होती. ज्या जातीत जन्मला त्या जातीचा प्रभाव अनौपचारिक पडत असतो. उत्तमरावांना ही घरातून उपदेश मिळत. याच्याकडे जायचं नाही, याला शिवायचे नाही, कोणाचे खावे, कोणाचे प्यावे, कोणासोबत रहावे या बाबी कुटुंबाकडून सांगितल्या जावू लागल्या. पण याचा फारसा फरक त्यांच्यावर पडला नाही. ''व्यायाम व बैल पोहणी घालणे हे दोन छंद विशेष सांगता येतील. लहानपणापासून सकाळी लवकर उठण्याची सवय जोपासली. पहाटे चार ते पाच च्या दरम्यान उठत.''[१३]

---

१२. *मोहड सुधाकर, विदर्भाचा अग्निपुरूष स्वातंत्र्यसंग्राम सेनानी वीर उत्तमराव मोहिते, पृष्ठ – १.*

१३. *मोहिते मैनाबाई यांची मुलाखत, २९ जून २०१०.*

''डॉ. पंजाबराव देशमुख उत्तमरावांना आपले मानसपुत्र मानित त्यांनी उत्तमरावांचे नाव अनिलकुमार असे ठेवले होते आणि अनंतकुमार स्वत:च्या मुलाचे.''[१४] उत्तमराव यांचा स्वभाव शिस्त प्रिय व हट्टी बनत चालला स्वत:चे मत हिरीरीने मांडण्याची उत्तमरावांना बालपणापासूनच सवय जडल्याचे दिसते. याचा राग आई वडीलांना येत असे.

आई वडील पारंपरिक असले तरी उत्तमराव या विचारात रमले नाहीत. लहान वयातच चिकित्सक विचार करायला लागले. यामुळे धाडस त्यांच्या अंगी निर्माण झाले होते हे त्यांच्या पुढील कृतीवरून दिसते.

तत्कालीन समाजजीवनावर अंधश्रद्धेची फार मोठी पकड असल्याने लोक भूत, करणी, भानामती, हाडळ अशा बाबींवर विश्वास ठेवत आणि यासाठी उपाय म्हणून तांत्रिक, मांत्रिक, बुवा अक्का यांच्या सल्ल्याने बंदोबस्त करत. तोडगा म्हणून किंवा 'भईरवासा' याचा उतारा नदीकडे सोडायला लावत. हा भुताखेतापासून रोगराईपर्यंतचा बंदोबस्त समजला जायचा.

एकदा पोर्णिमेला ''महारवाड्यात राहणाऱ्या एका गुराख्याने उत्तमराव या लहान मुलास बरोबर घेतले व सोबत काळ्याभोर घोंगड्या व बैलांच्या घाघरमाळा घेतल्या. एका काटावर सात वर्षाचा उत्तम आणि दुसऱ्या काठावर गुराखी, जशी पुजाऱ्यांने नदीवर येऊन पुजा सुरू केली तसे एका काठावर काळेशार छोटे भूत नाचू लागले याची छम–छम बंद झाली की, दुसऱ्या काठावर आडदांड काळेशार भूत नाचायचे हा प्रकार पाहून पुजारी भयभीत झाला व पळून गेला.''[१५] मग या दोघांनी पुजेसाठी आणलेला मेवा, मिठाई, फळ घेऊन महारवाड्यातील गुराख्यांच्या घरी गेले. प्रत्यक्षातील भुताटकी उत्तमरावांनी पाहिली. ''ही बातमी जाईबाईच्या कानावर गेली आणि जबरदस्त मार दिला. वरती महारवाड्यात बाटला म्हणून आठ दिवस

---

१४. *मोहिते मैनाबाई यांची मुलाखत, २९ जून २०१०.*

१५. *देशमुख भाग्यरेखा , माझे आबा, (लेख). संशोधन त्रैमासिक, सिंगारे अनिल (संपा.), पृष्ठ – २२.*

हिवाळ्याच्या थंडीत गोणपाट्यावर अंगणात झोपण्याची शिक्षा दिली.''[१६] यावरून असे दिसते की उत्तमराव आई वडिलांच्या पारंपरिक जीवनात रस घेत नव्हते. ते महत्त्वकांक्षी बनत चालले असून श्रद्धा, अंधश्रद्धेचा न विसरणारा धडा महारवाड्यातील गुराख्याने उत्तमरावांना शिकवला व अंधश्रद्धेची शवविच्छेदन केले. अज्ञान, अंधश्रद्धा व कर्मठ रूढी विरोधी खंबीर मनोभूमिका बनवणारा उत्तमरावांचा पहिला सामाजिक गुरू 'गुराखी' ठरला.

''पांडुरंग पाटलाच्या वाटणीला आलेली २० एकर जमीन आणि २ तसम्याचे (१२ फुट) घर होते. हे ही सावकाराच्या तडाख्यात सापडून त्याची केव्हाच वसालत लागली. देशोधडीला लागलेल्या आई वडीलांबरोबर उत्तमरावांनी 'कुरळपुर्णा' सोडले. पण आयुष्यभर ते कुरळ आणि पुर्णेच्या डोहावर प्रेम करत राहिले व मोर्शीच्या गेडामपुऱ्यात वास्तव्य करू लागले. आपल्या परस्थितीची ओळख उत्तमरावांना होऊ लागली.''[१७]

उत्तमराव मोहिते सामान्य कुटुंबात जन्माला आले. लहानपणापासून हट्टी स्वभाव उत्तमरावांना निर्भय बनवत राहिला. पारंपरिक चौकट त्यांना कधी मानवली नाही. लहानपणापासूनच परिस्थितीची जाणीव ठेवून व्यवस्था बदलण्याचा प्रयत्न केला असावा.

२.५ शिक्षण व वैचारिक जडण–घडण

इ.स. १९१८ पासून मोर्शी येथे आल्याने तेथील वातावरणाचा परिणाम त्यांच्यावर होऊ लागला. ''मोर्शी येथे भाऊसाहेब गुंडाच्या देखरेखीखाली उत्तमरावांच्या शिक्षणास सुरवात झाली.''[१८] भाऊसाहेब उर्फ शामराव यादवराव गुंड या सत्यशोधकाच्या देखरेखीखाली असल्याने सत्यशोधकीय बाळकडू इथेच पाजले गेले.

---

१६. *कित्ता, पृष्ठ – २२.*

१७. *कित्ता, पृष्ठ – २३.*

१८. *कित्ता, पृष्ठ – २०.*

अस्पृश्यता विरोधी चळवळ अशी सामाजिक बांधिलकी उत्तमरावांच्या मनावर कायमची ठसली. ''काशीरावबापू देशमुख, लढके गुरजी, पंढरीनाथ पाटील यांची सत्यशोधकी वैचारिक लढाई उत्तमरावांनी पाहिली होती. यात शामराव उर्फ भाऊसाहेब गुंड यांनी उत्तजमरावांना पक्के निरिश्वरवादी घडवले. तर काशीरावबापू देशमुखांनी आपली मते त्यांच्यांकडून पक्की केली.''[१९] ''काशीराव बापू देशमुख म्हणजे महाराष्ट्रातील एक जड विद्वान सखोल व्यासंगी म्हणून परिचत असणारे सत्यशोधक व ब्राह्मणेत्तर चळवळीतील एक वैचारिक नेतृत्व असून यांनी महत्त्वपूर्ण लिखाण केले आहे.''[२०] त्यांच्या क्षत्रियांची वेदोक्त श्रावणी, क्षत्रिय वैश्यांचा ब्राह्मणांशी सामना, क्षत्रियांचा प्राचीन अर्वाचीन सचित्र इतिहास, क्षत्रियांचा जातवार सचित्र इतिहास, सुबोध सत्यनारायणाची पोथी असे ग्रंथ उत्तमरावांच्या वैचारिक जडणघडणीत उपयोगी पडले. शामराव गुंड यांची महाराणी ताराबाई आणि छत्रपती शिवाजी महाराज आणि रामदास यांचे संबंध यांनी दिशा दाखवली. उत्तमरावांना यामुळे सत्यशोधनाची आवड निर्माण झाली. यातूनच पुढे 'सत्यशोधन' हेच त्यांचे ध्येय बनले.

उत्तमरावांना शिक्षण घेण्यासाठी घरची प्रतिकूलता होती तरी १० वी पर्यंतचे शिक्षण मोर्शीला पूर्ण केले. पुढे शिकण्याची इच्छा असतानाही शिकू शकले नाहीत. मोठ्या भावाच्या मृत्युमुळे कुटुंबाची जबाबदारी आली म्हणून १० वी ला शिक्षण सोडून सकारी नोकरी पत्करली. पण या नोकरीत त्यांचे मन रमले नाही. लहानपणापासून अंधश्रद्धा निर्मूलन, निवारण, अभ्यासाचा छंद, चिकित्सक वृत्ती, सत्यशोधकीय विचार यामुळे आणि त्यांचे मित्र व त्यांच्या कार्यामुळे उत्तरमराव वास्तववादी बनले होते. कल्पना, दंतकथा ह्या अज्ञानातून जन्मतात प्रत्यक्षात त्यांचा काही उपयोग नाही याची त्यांना खात्री झाली.

उत्तमराव शिक्षणात तल्लक बुध्दिचे होते आणि वास्तवाचा आणि जीवनाचा अर्थ शोधत असत. १० वी पास झाल्यावर पुढे आपले वाचन सुरूच ठेवले. ते रस्त्याने

---

१९. *कित्ता, पृष्ठ – २३.*

२०. *डॉ. चोपडे अशोक, विदर्भातील सत्यशोधक चळवळीचे साहित्य, पृष्ठ – ३५.*

चालतानाही वाचत चालत असत. त्यांनी सरकारी नोकरी केली नोकरी करत इंटरमिडीयट करत होते. यावेळी त्यांच्या सोबत कंधार (नांदेड) येथील शंकरराव धोंडगे शिकत होते. त्यांनी सरकारी नोकरी सोडली शिक्षण मात्र सुरू ठेवले. पुढे पंजाबरावांच्या प्रचारासाठी शिक्षण सोडले. त्यांनी जीवनात पैसा कधीच महत्त्वाचा मानला नाही. 'धन' मिळवण्यापेक्षा सामाजिक चळवळ लक्ष बनले.

२.६ उत्तमरावांची ग्रंथसंपदा

उत्तमराव मोहिते यांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात ग्रंथनिर्मितीला विशेष महत्त्व दिले. त्यांनी वयाच्या १९ व्या वर्षी आपले छोटेशे काव्यमय पुस्तक प्रकाशित केले आणि आयुष्यभर ग्रंथनिर्मिती करत राहिले. हे कार्य करताना त्यांना अनेक अडचणी आल्या. वेळ प्रसंगी पदरमोड करून ग्रंथाचे प्रकाशन केले. यामागे पैसा मिळावा हा हेतू नसून पुरोगामी, चिकित्सक, विज्ञानवादी विचार समाजापर्यंत पोहोचविणे हाच हेतू असल्याचे दिसते. आर्थिक अडचणीमुळे इच्छा असूनही ते अनेक ग्रंथ प्रकाशित करू शकले नाहीत. या ग्रंथांची हस्तलिखिते आजही त्यांच्या कपाटात ठेवलेली आहेत.

२.६.१ अप्रकाशित ग्रंथ

१. ओंजळ बालकाव्यसंग्रह.

२. पंजाबराव देशमुखांचे इंग्रजी चरित्र.

३. समाजभूषण पंढरीनाथ पाटलांचे चरित्र हा ग्रंथ रूपाने न येता पंजाबराव देशमुखांच्या संपादकत्त्वाखाली निघणाऱ्या 'संदेश' या साप्ताहिकातून क्रमश: प्रकाशित झाला आहे. इ.स. १९४९ पण प्रस्तुत चरित्र आज उपलब्ध नाही.

२.६.२ उत्तमरावांचे उपलब्ध नसणारे ग्रंथ

उत्तमरावांच्या प्रकाशित ग्रंथांपैकी काही ग्रंथ आज उपलब्ध होत नाहीत. उत्तमरावांच्या मुलीने व नातू भालचंद्र देशमुख यांनी त्यांच्या मृत्यूनंतर सर्व साहित्य जपून ठेवले पण त्या साहित्यात या ग्रंथाचा अपवाद आहे.

१. Youga in the light of Science.

२. तमाशा दर्शन चित्रमय पंजाबराव देशमुख

३. Letters to Indian Magnates.

४. Biography of Dr. Panjabrao Deshmukh.

५. ब्रह्मविद्या कामशास्त्राचे विकृत स्वरूप आहे.

६. विदर्भाचा लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख.

वीर उत्तमराव मोहिते यांचे हे ग्रंथ उपलब्ध नसले तरी वीर उत्तमराव मोहिते यांच्या अन्य ग्रंथातून या ग्रंथाविषयी माहिती मिळते. तसेच त्यांच्या घरी मिळालेल्या हस्तलिखितांत यातील बराच भाग निदर्शनास येतो. चित्रमय पंजाबराव देशमुख त्यांच्या संग्रही पहावयास मिळतात. यावरून हे हस्तलिखिते आज उपलब्ध नसली व प्रकाशित झाली नसली तरी उत्तमराव मोहिते यांच्या वैचारिकतेची साक्ष अन्य ग्रंथांच्या माध्यमातून होते हे नक्की. 'ब्रह्मविद्या कामशास्त्राचे विकृत स्वरूप आहे' याची हस्तलिखित प्रत वीर उत्तमराव मोहिते यांच्या संग्रही आजही पहावयास मिळते.

२.६.३ उत्तमराव मोहित्यांची प्रकाशित व उपलब्ध ग्रंथसंपदा

१. देवीच्या देवळात गोहत्या – इ.स. १९३८ मध्ये प्रकाशित

२. जीवनगाथा – इ.स. १९६० पूर्वी लिहिली असावी.

३. राहुरीचा निर्णय.. विदर्भातील जनतेविरुद्ध एक भयंकर षडयंत्र – इ.स. १० नोव्हेंबर १९६८.

४. मराठ्यांच्या सांस्कृतिक क्रांतीचा इतिहास – २७ डिसेंबर १९८८.

५. जागतिक कृषक क्रांतीचा विधाता लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख – २६ जानेवारी

६. कार्ल मार्क्सचा भौतिकवादी वैज्ञानिकतेचा सिद्धांत – २७ डिसेंबर १९७७.

७. शिवाजी की रामदास –

८. Exposition of Cosmic Truth (कलगीतुरा)

९. ATHEISM IN INDIAN PHILOSOPHY - आणि त्यावरील मराठी भाष्य

१०. Universal Songs Of Life & Truth – नोव्हेंबर १९५७.

११. Cultural Renaissance.

१२. New Conception Of Indian Revolution.

१३. इंदिरे तुझाच जयजयकार.

१४. क्रांति–गीता.

उत्तमरावांची तीन ग्रंथ प्रकाशित होऊ शकले नाहीत. ते हस्तलिखितांत उपलब्ध आहेत. तर प्रकाशित झालेल्या ग्रंथांमधून सहा ग्रंथ उपलब्ध नाहीत आणि १४ ग्रंथ उपलब्ध आहेत. यावरून उत्तमरावांनी इतिहास, संस्कृती, समाज काव्य, सत्यशोधन यावर लिखान केल्याचे दिसते. त्यांच्या ग्रंथाला पुरस्कार ही मिळाला आहे.

वीर उत्तमराव मोहिते यांच्या 'कार्लमार्क्सचा भौतिकवादी वैज्ञानिकतेचा सिध्दांत' व ATHEISM IN INDIAN PHILOSOPHY या ग्रंथांना रशियन पुरस्कार मिळाला आहे. रशियाचा कोणता पुरस्कार मिळाला याबाबत निश्चित माहिती मिळत नाही. तरी मुलाखतीतून व अन्य ग्रंथातून रशियन पुरस्कार अशीच माहिती मिळते.

२.७ उत्तमरावांवरील प्रभाव

उत्तमरावांना लहानपणी कुटुंबात पुरोगामी विचार मिळाला नाही. त्यांचा जन्म पारंपरिक खेड्यातील शेतकरी कुटुंबात झाला तरी गावात असतानाच उत्तमरावांना घट्ट, धाडसी बनवले. अंधश्रद्धा व कर्मकांड हे कसे थोतांड आहे. याचा प्रायोगिक अभ्यास उत्तमरावांनी केला. या अभ्यासात गावातील गुराखी (महार) उत्तमरावांचा मार्गदर्शक ठरला. यामुळे उत्तमरावांची जिज्ञासा व चिकित्सा करण्याची वृत्ती वाढत राहिली. या वृत्तीला योग्य ते वळण देण्याचे कार्य मोर्शीच्या भाऊसाहेब गुंड या व्यक्तीने

केले आणि त्यांचा सत्यशोधकीय ठसा कायमचाच उत्तमरावांवर पडला.

उत्तमराव ज्या काळात मोठे होत होते. तो काळ परकियांच्या गुलामगिरीचा होता. गुलामीच्या जोखडातून देशाला सोडवण्यासाठी अनेकांनी आपले सर्वस्व पणाला लावले होते. तर स्वकियातील प्रतिगामी गट आपल्या बांधवाचे शोषण करतो हे निदर्शनास आले म्हणून या परकिय व स्वकियांच्या बंधनातून स्वातंत्र्य मिळवण्याची प्रेरणा त्या वेळच्या काळ व परिस्थिती ने दिली. म्हणून तत्कालीन परिस्थितीचा प्रभाव उत्तमरावांवर पडल्याचा दिसतो.

म. फुले यांनी दाखलवलेला मार्ग स्वकियांच्या मुक्तीसाठी उपयोगी समजून म. फुल्यांच्या विचाराने प्रभावित होऊन उत्तमरावांनी कार्य केले. तर तेच कार्य शाहू, आंबेडकर यांनी प्रभावी केले. यांच प्रभावापासून उत्तमराव वेगळे राहू शकले नाहीत. उत्तमरावांचे जेष्ठ बंधू रामराव मोहिते छत्रपती शाहू महाराजांकडे मराठा पुरोहित असल्याने शाहू महाराजांशी उत्तमरावांच्या घराचा संबंध जोडला होता. तर पंजाबराव देशमुख यांच्याशी जवळून संपर्क होता. यांचा प्रभाव उत्तमरावांवर पडला.

राष्ट्रीय काँग्रेसच्या माध्यमातून महात्मा गांधी यांनी संपूर्ण भारतात स्वातंत्र्याची आशा जागवून लोक सहभाग मिळवला. हे उत्तमरावांनी प्रत्यक्ष पाहिले यातून प्रेरणा घेऊन ते राष्ट्रीय कार्याला लागले. गांधीजींच्या विचारांचा प्रभाव उत्तमरावांवर पडला. तसेच बुध्द, चार्वाक, सांख्य, तुकाराम महाराज, छत्रपती शिवाजी महाराज यांचा प्रभावही उत्तमराव मोहितेंवर दिसतो. कार्लमार्क्स यांच्या विचारांचा प्रभाव उत्तमराव मोहिते यांच्यावर स्पष्ट जाणवतो.

२.८ उत्तमरावांचे जीवन व कार्य

'कुरळपुर्णा' व मोर्शी या ठिकाणी वास्तव्य करून आपल्या जीवनाची एक निश्चित दिशा उत्तमरावांनी निर्माण केली. उत्तमराव यांचा वैचारिक प्रवास सामाजिक व देशभक्तीच्या दिशेने होत असताना त्यांना गाडगे महाराज यांनी मार्गदर्शन केले. ते

आपल्या जीवन गाथेत सांगतात.

''गाडग्याने मला अनुग्रह केला।

प्रकाश पाडला हृदयात।।''[२१]

सामाजिक कार्यासाठी गाडगेमहाराजांनी मार्गदर्शन केले. आपला देश व सामाजिक स्थिती याचे आकलन झाले. उत्तमरावांनी या कार्यास मनापासून प्रारंभ केला. उत्तम आता विवाहस योग्य झाल्याने घरून विवाहाबाबत विचार सुरू झाले. घरच्या व्यक्तिंकडून उत्तमरावांसाठी एक स्थळ निश्चित झाले. ते वर्धा जिल्ह्यातील एका धनाढ्य (मालगुजार) यांची मुलगी 'त्रिवेणी' सोबत उत्तमराव यांचे लग्न झाले. पण वैवाहिक सुख उत्तमरावांना फारसे लाभले नाही. त्रिवेणी सतत आजारी असे अशा आजारात तिचा मृत्यु झाला. उत्तमराव संकटाच्या विळख्यात सापडले अशी स्थिती निर्माण झाली. जेष्ठ बंधूचा मृत्यु, पत्नीचा मृत्यु यामुळे सर्व जबाबदाऱ्या उत्तमरावांवर आल्या. हा पत्नीशोक त्यांच्या जिव्हारी लागला. लग्नानंतर एकमेकांना व्यवस्थित समजून घेण्याआधीच म्हणजे सहा महिन्यानीच घटना घडली हे इ.स. १९३५ चे साल असावे. उत्तमराव त्रिवेणी संगमावर मनाला विरंगुळा देण्यासाठी जायचे.

''श्रीमंताची कन्या विमले, प्रधानाची तू सून

पैठणी सोडून पांढरे वस्त्र, का केले परिधान''[२२]

त्रिवेणीच्या आठवणीत असे गीत उत्तमराव गुणगुणत असत. यावरून पहिल्या पत्नीसोबत उत्तमरावांचा चांगला जिव्हाळा असल्याचे सहज लक्षात येते. यानंतर तीन वर्ष त्यांनी एकाकी घालवले.

''इ.स. १९३९ म्हणजे दुसऱ्या महायुद्धाला सुरूवात झाली.''[२३] यावर्षी उत्तमरावांचा दुसरा विवाह अमरावती पासून ४० कि.मी. अंतरावर असणाऱ्या रामासाऊर येथील सावकार राजारामजी गंगारामजी बोंडे यांची मुलगी मैनाबाई हिच्याशी झाला.

---

२१. *मोहिते वीर उत्तमराव, जीवनगाथा, पृष्ठ – १.*

२२. *मोहिते वीर उत्तमराव, ओंजळ बालपुष्प, पृष्ठ – ८.*

२३. *सिंगारे अनिल, अमेरिकेचा इतिहास, पृष्ठ – १०७.*

मैनाबाईचा जन्म १९२२ साली झाला. म्हणजे वयाच्या १८ व्या वर्षी या वेळी उत्तमरावांचे वय ३० वर्ष होते. मैनाबाईचे शिक्षण ७ वी पर्यंत झाले. मैनाबाई हुशार होती. लहान असताना अमरावतीत म्युनिसीपल मराठी मुलींची शाळा होती. तसेच गव्हर्नमेंट गर्ल हायस्कूल आणि न्यू हायस्कूल या शाळाही होत्या. ''मैनाबाईचे हजेरीत नाव नसताना निनावे यादीत शाळेत बसवले एम.एस. दांडेकर स्कूल इनस्पेक्टर होते त्यांनी सांगितले की, ज्या वर्गाचा अभ्यास झाला असेल त्या वर्गात बसवा. त्यानुसार तिसऱ्या वर्गात बसवले व शाळा सुरू झाली.''[२४] मैनाबाईला आईची माया फारशी मिळाली नाही. लहानपणी आई वारली पण सर्व परिस्थितीशी सामना करण्याची मनोभूमिका वडिलांनी मैनाबाईच्या अंगी निर्माण केली. अशी मैनाबाई उत्तमरावांच्या आयुष्यात आल्याने उत्तमरावांना निर्माण झालेली निराशा दूर सारू लागली.

''उत्तमराव मोहिते यांनी 'जरूड, वरूड' या गावी प्राथमिक शिक्षक म्हणून नोकरी केली पण फारकाळ टिकली नाही.''[२५] नोकरी करून सामाजिक कार्य करता येत नसे. यासाठी लागणारा वेळ आणि मनातील देशभक्तीची भावना यामुळे ही नोकरी सोडली. घरची परिस्थिती बेताचीच म्हणून भीमराव पाटलांनी ब्रिजलाल बियाणी यांच्याकडे शिफारस केली. मोहिते बियाणींना भेटल्यावर ते म्हणाले काम पाहिजे मोहिते यावर उत्तमराव म्हणाले ''मला जे पाहिजे ते तुमच्याजवळ नाही.'' याच काळात उत्तमरावांनी आपली ध्येयवादी, स्वाभिमानी वृत्ती जोपासली ती कायम.

''लग्नावेळी म्हणजे इ.स. १९३९ मध्ये उत्तमराव माहोली येथे शिक्षक म्हणून कार्यरत होते. येथे त्यांना समाधान लाभले नाही. त्यांची माहोलीहून ऋटगाव येथे बदली झाली. येथेच त्यांनी नौकरीचा राजीनामा दिला व सत्याग्रहात पडले.''[२६] हाताला काम नाही कुटुंब व्यवस्थित चालावे म्हणून सासऱ्याने म्हैस घेऊन दिली व घरचे सोने मोडून गाय घेतली. डी.बी. पाटील यांनी २००० रू. दिले धंदा सुरू करण्यासाठी

---

२४. *मोहिते मैनाबाई, जीवनगाथा, पृष्ठ – ४.*

२५. *मोहिते मैनाबाई, मुलाखत, दि. ११ ऑगस्ट २०११.*

२६. *कित्ता.*

यातून लाकडाचा धंदा टाकावयाचा होता पण मैनाबाईंना हा व्यवसाय मान्य नसल्याने पैसे परत केले.

''उत्तमराव मोहित्यांना शिवाजी कॉलेजवर राहण्यासाठी जागा दिली व हॉस्टेलचे काम सोपवले. याचा मोबदला देत असत. लोंडे यांनी पंजाबरावांना सांगितले की, याला नोकरीमध्ये अडकवले पाहिजे नाही तर भटकेन. पंजाबराव देशमुखांनी स्टेशन ब्रँच शाळा हायस्कूलवर नोकरी दिली.''[२७] पंजाबरावांचा सहवास व उत्तमरावांना हवे असणारे वातावरण मिळाले आणि येथे उत्तमराव रमले मग घराची फिकिर केली नाही. बिनधास्त आपल्या कार्याला वाहून घेतले. प्रमोदचा जन्म होईपर्यंत लोंढेनी दिलेल्या शिवाजी कॉलेजच्या जागेवर राहिले.

उत्तमरावांवरच्या जबाबदाऱ्या दिवसेंदिवस वाढत होत्या. कुटुंब वाढत होते आणि राष्ट्रीय आंदोलन तीव्र होत होते. जागतिक शांतता भंग पावली होती. महायुद्धाचा वणवा पेटला होता. अशा परिस्थितीत उत्तमरावांना पहिले अपत्य झाले. पहिली मुलगी झाली. तत्कालीन परिस्थिती मुलांना महत्त्व देणारी असताना मुलीचे स्वागत उत्तमरावांनी केले. मुलीचे नाव उषा ठेवले. यानंतर दुसरे अपत्य मुलगीच झाली. मुलीचा जन्म अभागी नसून ते भाग्यच आहे. म्हणून मैनाबाई व उत्तमरावांनी तिचे नाव भाग्यरेखा ठेवले आणि उत्तमरावांचे तिसरे आणि शेवटचे अपत्य मुलगा झाला. त्याचे नाव प्रमोद ठेवले. आता उषा, भाग्यरेखा, प्रमोद, मैनाबाई व उत्तमराव असे कुटुंब बनले.

उत्तमरावांनी मुलगा–मुलगी असा भेद न करता मुलींना उच्च शिक्षण दिले. शिक्षित घरामध्ये आपल्या मुली दिल्या. उषाताई हिचे लग्न मौसांग, जि. अकोला येथील शिक्षक शंकरराव देशमुख यांच्याशी लावून दिला. यांना भालचंद्र व मानवेंद्र अशी दोन मुले झाली. भालचंद्र उत्तमरावांचा आवडता नातू तसेच आज भालचंद्रचे बुलढाण्यात चांगले नाव आहे. मानवेंद्र शिवाजी ॲग्रीकल्चर कॉलेजात प्राध्यापक आहे.

---

२७. *कित्ता.*

''उत्तमरावांनी दुसरी मुलगी भाग्यरेखा हिला तत्कालीन परिस्थितीत खूप शिकवले. एम.एस.सी. ॲग्री झालेली ही मुलगी पंढरीनाथ पाटलांच्या डोळ्यात बसली आणि त्यांनी भाग्यरेखास नोकरी मिळवून दिली.''[२८] भाग्यरेखाचे लग्न इंजिनिअर मुलगा अविनाश देशमुख यांच्या बरोबर २१ नोव्हेंबर १९७१ रोजी लावले. उत्तमरावांनी आपल्या मुलींच्या लग्नपत्रिकेवर कोणत्याही देवाचा फोटो छापला नाही. पंजाबराव देशमुख व छत्रपती शिवाजी महाराजांचा फोटो छापला. भाग्यरेखा अविनाश देशमुख प्राचार्य झाल्या. ती महाराष्ट्रातील पहिली महिला प्राचार्य असावी. उत्तमरावांनी मुलांना स्वातंत्र्य दिले. त्या स्वातंत्र्याचा योग्य उपयोग मुलीने केला म्हणूनच विजय भटकर यांच्या हस्ते सत्कार झाला.

उत्तमराव मोहित्यांना प्रमोद उर्फ पंजाबराव हा मुलगा असून यास ही उत्तमरावांनी एम.एस.सी. शिकवले आणि शिवाजी ॲग्रीकल्चर कॉलेज अमरावती येथे नोकरी मिळाली. एकंदरीत मोहित्यांचे सर्व कुटुंब उच्च शिक्षित झाले. पण प्रमोदच्या लग्नानंतर उत्तमराव मोहिते व प्रमोदचे जास्त जमेनासे झाले. मैनाबाई आपल्या जीवनगाथा या अप्रकाशित हस्तलिखित वहीत सांगतात, ''वीर मोहिते पूर्ण समजून होते की हीचे मुलावर अतिशय भोळे प्रेम आहे त्यामुळे ही केव्हाही फसू शकते.''[२९] यावरून उत्तमरावांचा त्यांच्या मुलावर विश्वास राहिला नव्हता असे समजते. मोर्शी येथे उत्तमरावांना मिळालेली १० एकर जमीन त्यांनी शिवाजी शिक्षण संस्थेला दान दिली. आपल्या हयातीत मुलींनाही आपल्या संपत्तीचा वारसा दिला. कोणत्याही बाबतीत त्यांनी मुलगा मुलगी भेद केला नाही. शक्यतो याच कारणावरून उत्तमरावांचा मुलगा व अन्य कुटुंबीयांचे जमले नाही. गाडगे नगर अमरावती येथे उत्तमरावांनी घरासाठी घेतलेली जागा मुलींच्या मालकीची केली. यामुळेच उत्तमरावांना व मैनाबाईंना मुलाने मारहाण केली. प्रमोद, उत्तमराव, मैनाबाई, भाग्यरेखा यांचे नाते जवळपास संपुष्टात आले होते. भाग्यरेखा देशमुख सांगतात, रक्षाबंधन सारख्या सणाच्या वेळी तो

---

२८. *कित्ता.*

२९. *मैनाबाई मोहिते, जीवनगाथा, पृष्ठ २३.*

माझ्याकडून राखी बांधून घेत नाही. समाजासाठी झिजणारा हा उत्तमराव कौटुंबिक कलहाने झिजू लागला पण उत्तमरावांना पत्नीची खंबीर साथ होती.

जीवनभर परिस्थितीचे चटके उत्तमरावांना सोसावे लागले. यामुळे ते कमजोर झाले नाहीत तर यातून त्यांचे विचार टणक झाले. याचे कारण उत्तमरावांना आपल्या घरात घरपणा मिळाला . यामुळे आपदा कुणाला टळल्या तर त्या उत्तमरावांना असे म्हटले तर वावगे होणार नाही. यात त्यांना खंबीरपणे साथ मैनाबाईंनी दिली. ते वैवाहिक जीवनामध्ये विचाराने राहिले त्यांच्या समग्र आयुष्यात पत्नीबरोबर एकदाच वाद झाला. या वादामुळे पत्नी मैनाबाई माहेरला निघून गेल्या. पण उत्तमराव मात्र बैचेन झाले. पती आहे म्हणून मान. अरेरावी ही उत्तमरावांची कृती नाही. पत्नीला समतेने वागवत हे त्यांच्या पत्रावरून दिसून येते. पत्नीने सासरी परत यावे म्हणून लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात, ''प्रिय सौभाग्यवतीस उत्तमोत्तम शुभकामना, घालीन लोटांगण, वंदीन चरण, डोळ्याने पाहीन रूप तुझे.....''[३०] हे पत्र मिळातच मैनाबाई परत आल्या. त्या कधीही रागावून माहेरला गेल्या नाहीत आणि उत्तमरावांसारखा पती मिळाला म्हणून त्या खूष आहेत असे दिसते. नोकरी नाही तर काय करायचे म्हणून ''उषाच्या अंगावर घातलेले (आजोबांनी) ६ मासे सोन्याची अंगठी मोडून गाय घेतली आणि माझ्या दादांनी दीडसे रुपयांची म्हैस घेऊन दिली.'' यात उत्तमरावांचे मन लागले नाही. लोंढे यांनी पंजाबराव देशमुखांच्या कानावर घातले की उत्तमराव मोहित्यांना कुठेतरी अटकवा नाही तर हा कुठे काय करीन याचा नेम नाही. पंजाबरावांनी स्वत:समोर त्यांचा अर्ज लिहून घेतला व स्टेशन ब्रँच शाळेवर त्यांना शिक्षक नेमले. येथे कौटुंबिक स्थिरत्व लाभले आणि उत्तमरावांना आपल्या सुप्तगुणांना वाव देण्यास वेळ मिळाला.

शिक्षणतज्ज्ञ उत्तमराव मोहिते

आधुनिक भारताच्या इतिहासात शिक्षणामध्ये अनेक बदल होत होते. नव्याने

---

३०. *मोहिते वीर उत्तमराव, जागतिक कृषक क्रांतीचा विधाता लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख, प्रस्तावना, सुधाकर मोहड, पृष्ठ १९.*

निर्माण होणाऱ्या भारताला शिक्षणाशिवाय पर्याय नव्हता. प्राचीन व मध्ययुगीन काळात शिक्षणाचे स्वरुप अल्प व धार्मिक स्वरुपाचे होते. ब्रिटिशांनी भारतात काही प्रमाणात आधुनिकीकरण केले. शिक्षणात बदल करुन नव्या ज्ञानाची ओळख समाजास देणाऱ्या वर्गाबरोबर पारंपरिक, धार्मिक व वर्णवर्चस्वाच्या माध्यमातून शिक्षण हवे असे दोन्ही विचार प्रबळपणे रुजवण्याचा प्रयत्न होत होता. स्वतंत्र भारताचे सरकार नव्या शिक्षणासंदर्भात तज्ज्ञांकडून शिफारसी मागवून निर्णय घेत होते. पण हे तज्ज्ञ कोणत्या विचाराने प्रभावित आहेत यावर त्या शिक्षणाचे महत्त्व अवलंबून असे.

राधाकृष्णन आयोग, मुदलियार आयोग अशा आयोगांनी शिफारसी केल्या होत्या. पण त्यात उणीव असल्याने शासनाने राष्ट्रीय पातळीवर शिक्षणाचा आराखडा तयार करण्यासाठी तज्ज्ञ सल्लागारांची नेमणूक केली गेली. या सल्लागारांना सल्ला देताना ''वीर उत्तमराव मोहिते म्हणतात''[३१], गेल्या तीस–पस्तीस वर्षात शिक्षण क्षेत्रात अनेक सुधारणा करण्यात आल्या. त्याचा देशाला किती फायदा झाला याचा हिशोब घ्यायला हवा. आपल्या सोयीसाठी शिक्षणाचे चार विभाग पाडून त्यातील उपाधीनंतरच्या शिक्षणापेक्षा मला प्राथमिक शिक्षणाचा विचार करावयाचा आहे. कारण, पाया पक्का असेल तर इमारत पक्की होईल.

१९३५ पूर्वीच्या लेखन वाचन व गणित या दोन विषयांकडे फारसे लक्ष होते. प्रथम मुळाक्षरे नंतर शब्दज्ञान व शेवटी वाक्यरचना ही पंतोजी पध्दत चूक ठरवली. यामुळे वर्ग वाढले पण दर्जा घसरला. यासाठी नव्याने येणाऱ्या शैक्षणिक धोरणात ते शिफारसी करतात.

- व्यक्तिगत संसारात व राष्ट्रीय जीवनात गणित महत्त्वाचे आहे. गणित पहिले विज्ञान असून तत्त्वज्ञानही आहे. नव्याने निर्माण होणाऱ्या भारताला विज्ञानाची आवश्यकता आहे. गणितात बुध्दीला वाव मिळतो आणि प्राथमिक शाळांचा अभ्यासक्रम राष्ट्रीय जीवनाचा मूळ आधार आहे. हा आधार कोसळून पडल्याने राष्ट्रीय जीवन अंधारात आहे.

---

३१. *Subbarao V. (Edi.), Shivaji Patrika, Page - 2, 3.*

- चौथी प्रायमरी शाळेच्या परीक्षा काढून टाकल्यामुळे शिक्षणाचा दर्जा खालावणार आहे. खेड्यांतील विद्यार्थ्यांचे सर्वाधिक नुकसान होऊन वरिष्ठ शिक्षणाचा लाभ वरिष्ठ लोकांनाच मिळतो.
- माध्यमिक शाळेत गणित विषय आवश्यक असावा तसेच पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र यांना अभ्यासक्रमात प्रमुख स्थान देण्यात यावे. भूगोल विषय ऐच्छिक असू नये.
- चित्रकलेला मॅट्रीकच्या परीक्षेतून गचांडी देण्यात आली.
- मराठी सारख्या विषयातून अर्धे पाठ शास्त्रीय विषयावर देण्यात यावे यामुळे वाङ्मय इतिहासाच्या नावावर शुद्ध जातीवादाचे विष पाजले जाते ते थांबेल.
- फुले, शाहू, आंबेडकर, राजा राममोहन रॉय, दयानंद सरस्वती, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. पंजाबराव देशमुख, विठ्ठल रामजी शिंदे यांच्या कार्याचे योग्य मूल्यमापन होत नाही. योग्य मूल्यमापन होईल असा अभ्यासक्रम असावा.
- शेतकरी वर्गावर शिक्षणाचा अन्याय होतो. यामुळे ग्रामीण मुलांच्या शिक्षणाकडे सरकारने विशेष लक्ष द्यावे.
- मराठी चौथीची सामान्य (Common Examination) परीक्षा सुरु करावी.
- चांगल्या गोष्टी, चांगले मूल्य कोणाच्या मालकीची नसतात. म्हणून इंग्रजी राज्याबरोबर इंग्रजी भाषा व विज्ञानाचा द्वेष करणे गाढवपणा आहे.
- विद्यापीठातून इंग्रजी माध्यम काढून टाकल्यामुळे नुकसान झाले.

एकंदरीत वीर उत्तमराव मोहिते यांनी शिक्षणव्यवस्थेतील दोष सांगून त्यावर उपाययोजना सुचवल्या त्या भारतीय परिस्थितीला अनुसरून. प्राथमिक शिक्षणाचा खालावलेला दर्जा व माध्यमिक शिक्षणातील फोलपणा उघडा करुन सक्षम, सुदृढ, वैज्ञानिक आधारावर भारताची निर्मिती करण्यासाठी उत्तमराव मोहिते यांचे विचार महत्त्वाचे आहेत. त्यांच्या शिफारसीतील अजून काही बाबींची पूर्तता झाली नाही. याकडे शिक्षणतज्ज्ञांनी व शासनाने लक्ष घालण्याची गरज आहे.

२.८.१ भारत सेवक दल व उत्तमराव मोहिते

देश सेवा, समाज सेवा, शिक्षण असा हेतू बाळगूण चालणाऱ्या भारतभूमीवर प्रेम करणाऱ्या व्यक्ती मनाला सांघिक गरज भासत होती तर राष्ट्रवादाच्या नावाने हिंदूनाच अग्रक्रम देऊन वाटचाल करणारी संघटना ''राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आर.एस.एस.) इ.स. १९२५ मध्ये जन्माला आली. ही संघटना भारतीय सामाजिक विचार करता भेसूर होती. हिंदू राष्ट्रवादाची निर्मिती करणे असा या संघटनेचा हेतू होता.''[३२] आणि निवडक पुढाऱ्यांच्या ध्यानी याचे परिणाम येऊ लागले.

महाराष्ट्रामध्ये डॉ. हार्डीकर यांनी राष्ट्रसेवादलाची स्थापना केली. विदर्भात ब्रिजलाल बियाणींची काँग्रेस सेवा दल नावाची संघटना काम करत होती. या संघटना विदर्भाच्या परिवर्तनासाठी अपूर्ण असल्याचे डॉ. पंजाबराव देशमुखांना वाटले आणि विदर्भाच्या भूमितील समाज जीवनात नाविन्य निर्माण करण्यासाठी तरुणांची निमलष्करी संघटना असावी असे त्यांना वाटले. भाऊ भटकर, गुलाबराव होनाडे, के.बी. कदम, एकनाथराव मोहड यांची बैठक फेब्रुवारी १९३८ मध्ये पंजाबराव यांनी घेतली व विचार विनिमय झाला.[३३]

''अभिमन्यू व्यायाम प्रसारक मंडळ, बलभीम व्यायाम प्रसारक मंडळ, शिवाजी व्यायाम प्रसारक मंडळ या तीनही संघटना अमरावती येथे 'भारत सेवक दल' या संटनेत समाविष्ट करण्यात आल्या आणि भारत सेवक दलाचे कार्य सुरू झाले.''[३४] मराठा हायस्कूल मधील कृष्णा विरूळकर, नारायण महल्ले, भगवान देशमुख या विद्यार्थ्यांनी भारत सेवक दलाचा कॅम्प घेण्यासाठी विना परवाना काठ्या, डंबेल्स, लेझीम मराठा हायस्कूलमधून नेले. ही बातमी मुख्याध्यापक हरी अबाजी येवले यांनी पंजाबरावांना सांगितली. या कॅम्पचा समारोह प्रसंगी ''पंजाबराव म्हणाले, या नवीन उमलत्या पिढीसाठी कोणीच काही करणार नसेल तर शिवाजी हायस्कूल सारखी

---

३२. *मोहिते वीर उत्तमराव, पूर्वोक्त, पृष्ठ – २१७.*

३३. *कित्ता, पृष्ठ – २१७.*

३४. *कित्ता, पृष्ठ – २१९.*

माझी दहा विद्यालये नष्ट झाली तरी मी फिकीर करणार नाही.''[३५] यावरून पंजाबराव देशमुखांची देशहिताची तळमळ लक्षात येते. डॉ. पंजाबराव देशमुख अनेक कामात उत्तमरावांशी विचार विमर्श करत असत. भारत सेवक दलाच्या पाठीमागे उत्तमरावांचा विचार असावा असे वाटते.

पुढील दोन वर्षातच नागपूर वर्धा, अकोला, मूर्तिजापूर, दर्यापूर, यवतमाळ, कारंजा, आर्वी, अमरावती, पुणे, इ. ठिकाणचे कॅम्प चांगलेच गाजले. भारत सेवक दल या बाबत म. गांधी म्हणतात, ''इस दल मे विविध जातीयों कें पदाधिकारी देखकर मुझे बडी खुशी हुई'' तर ''मध्यप्रांत वऱ्हाड चे मुख्यमंत्री रविशंकर शुक्ल यांनी भारत सेवक दलाच्या बौध्दिकाची मनापासून तारीफ केली.''[३६]

इ.स. १९४१ साली डिसेंबर मध्ये अमरावतीच्या कॉटन मार्केट मधील आवारात नागपूरचे ॲड. वऱ्हाडे यांच्या अध्यक्षतेखाली भारत सेवक दलाचा भव्य मेळावा भरला यात प्रमुख पाहुणे म्हणून कृष्णानंद सोक्ता होते. पुढे उत्तमराव मोहिते व कृष्णानंद सोक्ता यांचे सोबत जेलमध्ये वास्तव्यास होते. या प्रसंगी पंजाबराव देशमुख म्हणाले, ''भारत सेवक दल आमची नि:पक्षपाती संघटना आहे. पण संधी आल्यास हीच संघटना या मुलखात देशभक्तीची मशाल पेटवेल.''[३७] पंजाबरावांचे हे उद्‌गार सत्यातही उतरले. उत्तमराव मोहिते, कृष्णानंद सोक्ता यांनी आंदोलनात उड्या घेतल्या. त्यामागे भारत सेवक दलाचे प्रेरणादायी विचार होते.

पंजाबरावांबरोबर राहून सल्ला मसलती बरोबर प्रत्यक्ष कार्य करणाऱ्या उत्तमरावांना भारत सेवक दलाचा अधिकाधिक विस्तार व्हावा असे सतत मनातून वाटत असे. या संघटनेचे कार्य देशव्यापी व्हावे ही त्यांच्या मनातील तळमळ होती. यासाठी मोठ्या व्यक्तींची गरज त्यांना वाटत होती आणि दलाचा प्रसार करण्यासाठी 'भारत सेवक दल' कार्यरत होते. इ.स. १९४२ च्या जानेवारीमधील दुसऱ्या आठवड्यात

---

३५. *कित्ता, पृष्ठ –२१९–२०.*

३६. *कित्ता, पृष्ठ – २१९–२२०.*

३७. *कित्ता, पृष्ठ – २०.*

वर्धा येथे अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे अधिवेशन भरले. येथील व्यवस्थेसाठी भारत सेवक दलाने एक पथक पाठवले होते.

भारत सेवक दलांच्या पदाधिकाऱ्यांनी पंडीत नेहरूंची भेट घेऊन माहिती देण्याचे ठरवले. पण एवढ्या मोठ्या अधिवेशनात एका मोठ्या नेत्याची भेट कशी घ्यावी असा प्रश्न निर्माण झाला. अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी संध्याकाळी पंडीत जवाहरलाल नेहरू जनरल मेसमध्ये जेवण आटोपून जमानालाल बजाज यांच्या बंगल्याकडे निवासस्थानी पायीच निघाले. उत्तमराव मोहिते अशाच संधीची वाट पाहात होते. उत्तमराव मोहिते त्यांच्या पाठीमागून गेले व वाटेतच त्यांनी नेहरूंचे लक्ष वेधण्यासाठी त्यांचा सदरा ओढला पंडीत नेहरूंनी विचारपूस करताच उत्तमराव म्हणाले, ''भारत सेवक दलाच्या संघटनेची माहिती सांगण्यासाठी आपली भेट घ्यावयाची आहे.''[३८] अशा अर्थाने हिंदी भाषेत उत्तमराव म्हणाले यावर दुसऱ्या दिवशी सकाळच्या वेळी भेटू यावर उत्तमरावांनी गुलाबराव होनाडे, भाऊ भटकर, के.बी. कदम, पुंडलिकराव तायवाडे यांना घेऊन पंडीतजींच्या निवासस्थानी ठरल्या वेळेला उपस्थित राहिले. बराच वेळ थांबूनही पंडीत नेहरू बाहेर येत नाहीत तेंव्हा उत्तमरावांची बैचेनी वाढली आणि दारावरील स्वयंसेवकामार्फत चिठ्ठी पाठवली. पंडीत नेहरू बाहेर येऊन म्हणाले, ''मला अत्यंत महत्त्वाच्या बाबींवर सेवाग्रामला जाऊन बापूजींशी भेटावयाचे आहे तरी आपण उद्या सकाळी याच ठिकाणी भेटू म्हणून पंडीत नेहरू निघून गेले.'' दुसऱ्या दिवशी म्हणजे उत्तमरावांच्या भेट नियोजनाच्या चौथ्या दिवशी पंडीतजी स्वत:च बाहेर आले. ठरल्या वेळी सकाळी ९ वाजता भेट झाली व दलाच्या कार्याची माहिती दिली, फोटो दाखवले यावर पंडीत नेहरू म्हणाले,''हमे सिर्फ फौजी जवानही नही चाहिये। विधायक कार्यकर्ताओंकी हमे निहायत जरूरी है। भारत सेवक दल को चाहिये कि वह जहाँ तक बन सके काँग्रेस कार्यकर्ताओ से निकट संपर्क रखकर अपने विधायक कार्यक्रमो को चलावें। लेकिन राजनैतिक क्षेत्र में प्रत्यक्ष संबंध न रखना ही

---

३८. कित्ता, पृष्ठ – २२०.

अच्छा है। जहाँ तक मेरा ख्याल है, इस दल पर ही काँग्रेस अपना कुछ विधायक काम सोंप दे तो अच्छा है। देहातो मे ऐसे संघटन की जादा आवश्यकता है। मुझे बडी खुशी हुई यह देखकर की डॉ. पंजाबराव देशमुख का कार्य जाती धर्म से परे है। आज से मुझे भी इस भारत सेवक दल का सेवक समझियें। और जरूरत समझकर लिखते रहियें।''[३९]

'भारत सेवक दल' अनेक छोट्या स्थानिक संघटनांचे एकत्रिकरण करून डॉ. पंजाबराव देशमुखांनी निर्माण केले. त्यात उत्तमराव मोहित्यांसारख्या धाडशी विचारी तरूणाने विस्तार करण्याचे कार्य केले. 'भारत सेवक दल' या विदर्भ स्तरावर कार्य करणाऱ्या संघटनाला राष्ट्रीय काँग्रेसच्या जबाबदारीचे कार्य सोपण्याचा विश्वास आणि पंडीत जवाहरलाल नेहरूंसारखा नेता 'भारत सेवक दलाचा सेवक' झाला ही उत्तमरावांची महत्त्वाची कामगिरी ठरली असे म्हणता येईल. ''उत्तमराव मोहिते पंजाबरावांचे कार्य पूर्णत्वास नेण्यास सतत तत्पर असत. डॉ. पंजाबरावांच्या श्री शिवाजी शिक्षण संस्था आणि भारत कृषक समाजाचे अजीवन व कुटुंब सदस्य म्हणून कार्य केले.''[४०] भारत सेवक दलाच्या माध्यमातूनही उत्तमरावांनी सामाजिक बांधीलकी पार पाडली असे म्हणता येईल.

२.८.२ भगवा झेंडा व उत्तमराव मोहिते

''इ.स. १९३८ साली शंकर श्रीकृष्ण देवाचे श्री समर्थ रामदास यांच्या जीवनावर प्रवचन मोर्शी येथे होणार होते. शंकर श्रीकृष्ण देव धुळ्याचे असून या विचारधारेचा बराच प्रचार झालेला होता. 'दासविश्रामधाम' नावाचा ग्रंथही प्रकाशित झाला. शंकर देवाचे प्रवचन ज्या गावात होणार त्या गावचे मोर्शीचे 'शामराव गुंड' छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाचे अभ्यासक व संशोधक होते. त्यांनी या संशोधनांसाठी २० वर्ष अभ्यास केला. होता. आता एकाच गावात दोन परस्परविरोधी विचारधारा आल्या. पण कार्यक्रमाच्या दिवशी गुंडांना ताप आल्याने ते कार्यक्रमाला उपस्थित राहू शकले

---

३९. *कित्ता, पृष्ठ – २२१.*

४०. *प्रा. मोहड सुधाकर, पंजाबरावांच्या शिवकुटुंबाचा मालुसरा – दौलतराव उपाध्य, दादासाहेब गोळे, पृष्ठ – ४.*

नाहीत.''[४१] गुंडांचा शिष्य उत्तमराव मोहिते अचानक अमरावतीहून मोर्शीला आले होते. मोहिते यांचे मित्रमंडळ कार्यक्रमाला निघाले असता मोहित्यांची भेट झाली व आग्रह केला की, कार्यक्रमास उपस्थित रहावे. उत्तमराव मोहिते यांनी आमंत्रण नाही म्हणून नकार दिला पण ''इष्टमित्रांसह यावे असे लिहिल्या कारणाने 'केचे' यांनी उत्तमराव मोहित्यांना कार्यक्रमास नेले.''[४२] 'जय जय रघुवीर समर्थ' म्हणून कार्यक्रम सुरू झाला आणि हनुमंत स्वामी यांच्या बखरीवरून श्री समर्थ रामदास यांच्या जीवनातील चमत्कार सांगण्यास सुरूवात केली. यास उत्तमराव मोहित्यांनी विरोध केला व चमत्कार सिद्ध केल्यास शंकरदेवाचा सत्कार करण्याचे आव्हान केले. यावर शंकरदेव गप्पच राहिल्याने अकर्ते, नागापूरे यांनी आवाज उठवला यामुळे रामदासी भक्तगण चिडला आणि उत्तमराव व त्यांच्या सहकार्यांना निघून जा असे सांगू लागला धमकी दिली. पण आम्ही आमंत्रित आहोत तुम्ही आम्हांला हाकलू शकत नाही असे उत्तर उत्तमराव टीम ने देताच आजचा कार्यक्रम इथेच स्थगित करण्यात आला.

कालच्या वादामुळे आज (दुसऱ्या दिवशी) जास्तीची गर्दी झाली. समर्थ प्रतापातील ''समर्थे आकारपूर्वक यवनाशी मारविले येथून शंकरदेवांनी व्याख्यानास सुरूवात करताच उत्तमराव मोहित्यांनी 'रामदास–शिवाजी' संबंधाला आपला विरोध नोंदविला.''[४३] मोहित्यांनी आपली बाजू प्रथम मांडावी असा शंकरदेवांनी सवाल केला त्यावर 'सीताराम अकर्ते' शंकरदेवांना म्हणाले, ''तुमची बाजू प्रथम मांडा आम्हांला पोषक असेल तर नंतर आम्हाला मांडण्याची आवश्यकता राहणार नाही. रामदास छ. शिवाजी महाराजांचे गुरू होते असे प्रतिपादन करणार असाल तर आम्ही त्याला उत्तर देऊ'' यावर रामदासी भक्तगण चिडून बळजबरीने बाहेर काढण्याच्या बेतात असतानाच जवळच्या शासकीय विद्यालयाच्या मैदानावरील खेळत असणारे ५०–६० विद्यार्थी आले व हा प्रसंग टळला. उत्तमराव मोहिते व त्यांचे सहकारी यांना

---

४१. *कित्ता, पृष्ठ – २२२.*

४२. *कित्ता, पृष्ठ – २२२.*

४३. *कित्ता, पृष्ठ – २२२.*

कोणाची दुष्मनी किंवा भांडण करावयाचे नव्हते तर अभ्यासाच्या आधारावर सत्यशोधन करावयाचे होते. यासाठीच त्यांनी शंकरदेवांच्या प्रवचनात प्रश्न उपस्थित केला पण प्रश्नांचे उत्तर न देताच शंकरदेवांच्या अन्य श्रोत्यांनी कुदांड भांडण घालण्याचा प्रयत्न केला. शंकरदेवांना कसालाही धक्का लागणार नाही. आपण या प्रश्नावर जाहीर सभा घेऊ अशी विचारणा केली असता शंकरदेव काही न बोलताच निघून गेले. यावरून ''शंकरदेवांची बाजू पुराव्यानिशी सिद्ध होत नसून काल्पनिक व चमत्कारीक प्रसंग रंगवणारे शंकरदेव होते म्हणूनच आव्हान न स्वीकारता पलायण केले.''[४४]

उत्तमराव मोहित्यांनी शंकरदेवांबरोबर घातलेला वाद केवळ शंकरदेव उत्तमराव वाद न राहता महाराष्ट्राच्या ऐतिहासिक सत्यशोधनाचा वाद बनला आणि हा वाद शंकरदेवांच्या पलायनाने संपला नाही तर खऱ्या अर्थाने सुरू झाला असे म्हणावे लागेल. कारण शंकरदेव किंवा त्याच विचारसरणीत वावरणारे अन्य समर्थभक्त यांना समर्थांना प्रसिद्धी मिळवून द्यावयाची होती आणि ही प्रसिद्धी छत्रपती शिवाजी महाराजांना धरून द्यावयाची होती. छत्रपती शिवाजी यांना जर महाराष्ट्र आदराने पाहत असेल तर श्री समर्थ रामदास त्यांचे गुरू होते म्हणून समर्थांना आपोआपच मानाचे स्थान मिळेल असा विचार समर्थ भक्तांचा होता. म्हणूनच हा वाद संपतो ना संपतो तो पर्यंत महाराष्ट्रात दुसरा वाद निर्माण होतो.

''कोल्हापूरच्या भालजी पेंढारकरांनी 'भगवा झेंडा' नावाचा बोलपट काढला. या बोलपटात 'समर्थ रामदास छत्रपती शिवाजीचे गुरू दाखवले' आणि रामदासांच्या कृपेनेच छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापन केले असे दाखवले. हे उत्तमराव मोहित्यांना मान्य नव्हते.'' हा खोटा इतिहास आहे म्हणून विरोध दर्शविला. महाराष्ट्रात कोल्हापूर, नाशिक, बेळगाव आणि अमरावती या ठिकाणी 'भगवा झेंडा' बोलपट विरोधी उद्रेकाला तोंड फुटले. ''इ.स. १९३९ च्या डिसेंबर शेवटच्या आठवड्यात उत्तमराव मोहिते या तरूणाने विद्यालयीन १० मुले घेऊन अमरावती शहरात भगवा

---

४४. *कित्ता, पृष्ठ – २२३.*

झेंडा विरोधी मिरवणूक काढली. पुढे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांत प्रचार करून भगवा झेंडा बोलपटाविरूद्ध वातावरण तयार केले. त्यांच्या सोबत चंपतराव, नगापूरे, शंकरराव इंगोले, एल.एम. देशमुख, गुणवतंराव वैद्य यांना सोबत घेऊन दि. २०/०१/१९४० रोजी शनिवार भगवा झेंडा विरोधी निषेधाची मिरवणूक अमरावती शहराच्या प्रमुख मार्गावरून काढली. यात भर टाकली ती मोर्शीच्या देवराव सदातपूरे यांनी तेथूर दोनशे विद्यार्थ्यांचे एक पथक आणले आणि अमरावती शहरात मिरवणूक निघाली.''[४५] देवराव सदातपूरे यांचे पथक पहाडी आवाजात हे गीत म्हणत होते.

''फडकला उंच जरिपटका मराठा पातशाहीचा
शिवाचा वंद्य ध्वज भगवा नव्हे हा रामदासाचा ।।
जन्मले थोर कैवारी शिवाजी मूर्त शिव वाटे
जमविले तरूण देशाचे मावळे पिडीत लंगोटे ।।
.....
तरूण हो जागुनी जगता जागवा सत्य ब्रीदाला
उध्दारा मानवी तेजा तोषवा पुण्य शिवबाला ।।''[४६]

असे गीत गात जवाहर गेट, बुधवार बाजीबाजार, वकील ओळ या विभागातून ही मिरवणूक चालत जावून नेहरू मैदानावर विसर्जित झाली.

''नेहरू मैदानावर डॉ. पंजाबराव देशमुखांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरली. या सभेत दादासाहेब वाटाणे व शामराव यादवराव गुंड यांची भाषणे झाली. 'भगवा झेंडा' या अनैतिहासिक बोलपटावर शासनाने बंदी घालावी अशी मागणी या सभेत करण्यात आली व तसे पत्रक काढून जनता व लोकप्रतिनिधींच्या सह्यानिशी शासनाकडे पाठवण्यात आले.''[४७]

१९४० च्या फेब्रुवारीमध्ये राजकमल टॉकीजमध्ये हा बोलपट दाखवण्यात

---

४५. *कित्ता, पृष्ठ – २२५.*
४६. *कित्ता, पृष्ठ – २२६.*
४७. *कित्ता, पृष्ठ – २२८.*

येणार होता पण दाखवला नाही. ''अमरावतीच्या श्री समर्थ भक्तांनी या बोलपटात काही आक्षेपार्ह नाही असे पत्रक काढले.''[४८] आता परस्पर विरोधी दोन्ही गट कार्यरत झाले. हा प्रश्न जास्तीत जास्त छेडला जावू लागला. याचाच भाग म्हणून ''दि. २७ जानेवारी १९४० रोजी 'भगवा झेंडा' बोलपट विरोधी सभा अमरावती म्युनिसिपल हिंदी स्कूलच्या हॉलमध्ये घेण्यात आली. राजकमल टॉकीजमध्ये बोलपट सुरू झाल्यास निदर्शने कशी करावयाची या संबंधी तपशिल ठरवण्यात आला.''[४९] मोर्शीतून शंकरदेवाच्या पलायनाला उत्तमरावांनी उजाळा दिला असता ''शिवाजीराव पटवर्धन म्हणाले, या बाबत तुम्ही लेखी जबाब द्याल काय?'' पटवर्धनांच्या प्रश्नाला डॉ. पंजाबराव देशमुख यांनी उत्तर दिले व म्हणाले, ''तुम्ही यांना लेखी काय मागता तुम्हाला पाहिजेच असेल तर ते तुम्हाला तोंडीही देवू शकतात.''[५०] यावरून उत्तमराव मोहिते काही वाईट किंवा विनाकारण वाद उपस्थित करत होते असे नाही. जर उत्तमराव खुळचटपणे एखाद्याची निंदा म्हणून हे कृत्य करत असते तर डॉ. पंजाबराव व शिवाजीराव पटवर्धनासारखी मंडळी उत्तमरावांच्या पाठीशी उभी राहिली नसती.

एप्रिलच्या तिसऱ्या आठवड्यात राजकमल टॉकीजमध्ये भालजी पेंढारकरांचा 'भगवा झेंडा' बोलपट सुरू झाला. एप्रिलमध्ये परीक्षा आटोपून विद्यार्थी घरी जातात म्हणून ही वेळ निश्चित केली असावी. विद्यार्थ्यांचा पाठिंबा मिळाला नाही तर आंदोलन होणार नाही असा समजही झाला असावा कारण, ''धनिक वर्ग, श्रीमंत सरंजामदार वर्ग यांचा पाठिंबा आंदोलकांना नव्हता तो स्तब्ध होता.''[५१] आणि मधल्या वेळात अनेकांनी आंदोलनातून पळ काढला होता. जणू काय हे आंदोलन संपलेच असे श्री समर्थभक्तांना वाटले असावे म्हणून एप्रिलमध्ये 'भगवा झेंडा' सुरू केला. आता विरोध होणार नाही अशी राजकमल टॉकीजच्या मॅनेजरची खात्री झाली. बोलपट गृहात

---

४८. *कित्ता, पृष्ठ – २२६.*

४९. *कित्ता, पृष्ठ – २२६.*

५०. *कित्ता, पृष्ठ – २२६.*

५१. *कित्ता, पृष्ठ – २२७.*

पोलिसांची संख्या ६० ते ७० असावी, बाहेरही पोलिसांचा गराडा पडला होता आणि राष्ट्रीय स्वंयसेवक दलाचे एक तृतीयांश संख्या होती. अशा कटेकोट बंदोबस्तात आंदोलन करणारे पोशाख बदलून व तिकिटे काढून टॉकीजमध्ये गेले. आंदोलन करणाऱ्यांना ओळखणे कठीण होते. आंदोलकांनी आपले नियोजन केलेले होते. बसण्याच्या जागा ठरल्या होत्या, वेळ ठरली होती. नक्की आठ वाजता कार्यवाही होणार होती पण झाली नाही. सेकंड क्लासमध्ये शामराव यादवराव गुंड टिपणे घेत होते. शंकरराव इंगोले आणि चंपतराव नागापूरे सोबतच होते. उत्तमराव मोहिते व देवराव सदातपूरे तिसऱ्या वर्गाच्या दुसऱ्या बाकावर होते व कार्यवाहीची प्रतीक्षा करत होते. ठरल्यावेळी कार्यवाही झाली नाही आणि पर्यायी व्यवस्था केलेली नव्हती अशात मध्यांतर झाली.

''मध्यांतरानंतर उत्तमराव मोहिते यांनी समोरच्या बाकावर जागा घेतली आणि त्याच ओळीत देवराव सदातपूरे बसले. रामदास समोर येताच उत्तमराव मोहित्यांनी ऑडिटोरियमवर उडी घेऊन चित्रपटाच्या पडद्यावर हल्ला केला व चित्रपटाचा पडदा हातातील सुऱ्याने चरचरा फाडून काढला. येथे गोंधळ उडाला आणि कोणास काही समजेनासे झाले तेवढ्यात आर.एस.एस. च्या स्वयंसेवकाने उत्तमरावांचा पाय धरून ओढला. ताबडतोब पोलीस इन्स्पेक्टर गद्रे पोलीस गॅटसह ऑडिओरियम वर चढून उत्तमराव मोहित्यांना व सदातपुऱ्यांना अटक करण्यात आली आणि सिटी कोतवालीत घेवून गेले.''[५२]

अटक झाल्यावर तासाभरातच डॉ. पंजाबराव देशमुख कोतवालीत पोहचले. ''जमानत घेऊन या पोरांची मुक्तता करा'' असे म्हणाले. यावर सिटी इन्स्पेक्टर म्हणतात, ''हा समाज द्रोहाचा खटला आहे. (Social Provocative Offence)'' यावर डॉ. पंजाबराव म्हणाले, ''ही ऐतिहासिक सत्याची बाब आहे. यात सामाजिक चितावणी वगैरे काही नाही तुम्ही म्हणतात तो गुन्हा या पोरांनी केला नसता तर मला

---

५२. *कित्ता, पृष्ठ – २२८.*

करावा लागला असता.''[५३] यावर विचार करून बाबासाहेब महल्ले यांच्या जामीनावर सोडण्यात आले. यावरून वीर उत्तमराव मोहिते यांची लेखनी व कृती दोन्ही कुशाग्र पध्दतीने चालते. शंकरदेवाचे प्रवचन व श्री रामदास स्वामी यांच्यावरील चित्रपट ऐतिहासिक सत्यावर आधारित नसल्याने खोट्या इतिहासावर टीका करून वस्तुनिष्ठ इतिहासाची आग्रही भूमिका, सत्यशोधनाची तळमळ दिसून येते.

२.८.३ उत्तमरावांना वीर पदवी

उत्तमराव मोहिते धाडशी व्यक्तिमत्व आहे हे त्यांनी दाखवून दिले. कोतवालीतून बाहेर आल्यावर त्यांच्या या धाडसाने केलेल्या महत्त्वपूर्ण कार्याबाबत त्यांचा गौरव करण्यासाठी जाहीर सभा घेण्यात आली. सभेचे ठिकाण अमरावती येथील नेहरू मैदान होते. मैदानावर गर्दी जमली होती. अर्धे मैदान गच्च भरले होते. पदवी देण्यापूर्वी अकोल्याचे कीर्तन सम्राट नित्यानंद विठोजी मोहिते यांचे भाषण झाले या भाषणात नित्यानंद मोहिते म्हणाले, ''रामदास छ. शिवाजी महाराजांचे गुरू होते हे ऐतिहासिक पुराव्याने सिद्ध करून द्यावे. त्यांचे आव्हान स्वीकारण्यास आम्ही तयार आहोत हे आव्हान कोणी स्वीकारले नाही.''[५४]

''काशीराव बापू देशमुख यांनी उत्तमराव मोहित्यांच्या धाडसाबद्दल त्यांना 'वीर' पदवी देण्याचा प्रस्ताव मांडला. यास पंजाबराव देशमुखांनी अनुमोदन दिले व सभेने मान्यता दिली. पंजाबराव देशमुखांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या सभेत उत्तमराव वीर उत्तमराव झाले.''[५५]

उत्तमरावांची पोलीस केस संपली नव्हती सिटी इन्स्पेक्टर उत्तमरावांकडून लेखी जबाब मागत होते की, भगवा झेंडा बोलपटाविरूद्ध कोणतीही कृती करणार नाहीत पण उत्तमराव मोहित्यांनी ते मान्य केले नाही.

अमरावतीचे एस.डी.ओ. गजानन वासुदेव बेंद्रे यांच्या कोर्टात वीर उत्तमरावांवर

---

५३. *कित्ता, पृष्ठ – २२८.*

५४. *कित्ता, पृष्ठ – २२८.*

५५. *कित्ता, पृष्ठ – २२८, २२९.*

पोलीस केस सुरू झाली. दोन महीने खटला चालल्यावर गुन्हा का केला याचे लेखी निवेदन उत्तमरावांनी कोर्टात सादर केले व चित्रपटाचा पडदा फाडल्याचा गुन्हा कबूल केला. बॅरिस्टर पंजाबराव आणि पी. के. देशमुख यांनी उत्तमरावांची बाजू मांडली. शेवटी वीर उत्तमरावांना ''कायदा हाती घेतला या आरोपावरून एक महिना सक्त मजूरीची शिक्षा व २५ रु. दंड ठोठावण्यात आला.''[५६]

एकंदरीत 'भगवा झेंडा' या बोलपट प्रकरणात अनेक संकटानंतरही उत्तमराव आपल्या मतावर ठाम असून आपले मत सिद्ध करण्यास तयार आहेत. महाराष्ट्राचा इतिहास पाहिला असता सत्य संशोधनासाठी घराचा विचार न करता जेल भोगणारा उत्तमराव मोहिते धाडसी शूर, बुध्दिवादी असून खरोखरच वीर आहेत असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. कारण, या काळाचा विचार करता ज्यांना हे समजले त्यांनी समजून गप्प राहिले तर काहींनी लेखी व व्याख्यानांच्या माध्यमातून विचार मांडण्याचा प्रयत्न केला पण उत्तमराव मोहिते हे एकमेव निघाले की, ज्यांनी लेखी, व्याख्यान व कृती या मार्गाचा अवलंब केला. ते केवळ बोलून किंवा लिहून थांबले नाहीत तर प्रत्यक्ष कृती केली म्हणून उत्तमराव कृतीप्रधान व्यक्तिमत्व होते असे म्हणता येईल.

२.८.४ उत्तमराव मोहिते एक स्वातंत्र्य सैनिक

२३ जून १७५७ व २२ ऑक्टोबर १७६४ या बक्सार व प्लासीच्या लढाईने भारतात इंग्रजी सत्ता स्थिरावली. १८५७ पर्यंत संपूर्ण भारतात आपले साम्राज्य स्थापन केले. भारतीयांच्या असंतोषाला व्यक्त करण्यास वाव मिळावा म्हणून भारतात सर्वव्यापी निर्माण झालेली पहिली संघटना म्हणून 'भारतीय राष्ट्रीय काँग्रेस' ची स्थापना होऊन मवाळ पद्धतीचे राजकारण १९०५ पर्यंत झाले. यानंतर जहाल पंथ निर्माण होऊन १९२० पर्यंत कार्यरत होता. त्यानंतर गांधीजींनी आपले अहिंसात्मक आंदोलन सुरू केले ते स्वातंत्र्य मिळेपर्यंत.

१९३५ नंतर जागतिक राजकारणाची वाटचाल वेगाने सुरू झाली. याचाच

---

५६. *कित्ता, पृष्ठ – २३०.*

परिणाम म्हणून इ.स. १९३९ ला दुसरे महायुद्ध सुरू झाले. भारत आता ब्रिटिशांच्या धोरणांना व त्यांच्या राजवटीला कंटाळला होता. म. गांधीचे नेतृत्व लोक स्वीकारत होते. अशातच ''दि. १४ सप्टेंबर १९३९ रोजी अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने पुढील आशयाचा ठराव पास केला. भारतीय जनता लोकशाहीच्या बाजूची आहे पण हे महायुद्ध लोकशाहीच्या रक्षणासाठी सुरू आहे. यावर भारतीयांचा विश्वास बसत नव्हता. कारण भारतीयांना असे वाटत होते की, इंग्लंड जर लोकशाहीच्या बाजुने लढत असेल तर भारतीयांना स्वातंत्र्य द्यावे असा ठराव मांडला.''[५७] नोव्हेंबर १९३९ मध्ये ब्रिटिश सरकारने भारतातील प्रांतिक स्वायत्ता संपुष्टात आणली. तर काँग्रेसने प्रांतिक मंत्रिमंडळे सोडली आणि महायुद्धाबाबत आपली भूमिका स्पष्ट करून युद्धाचा हेतू जाहीर करावा अशी मागणी ही केली होती.

''इ.स. १९४० च्या मार्चमध्ये रामगडला काँग्रेसचे अधिवेशन भरले. मौलाना अब्दुल कलाम आझाद अध्यक्ष होते. ब्रिटिश सरकारशी चर्चा करूनही मार्ग निघेना म्हणून म. गांधी यांनी ऑक्टोबर १९४० मध्ये वैयक्तिक सत्याग्रहाची भूमिका घेतली व मोहिम सुरू केली. या आंदोलनाचे प्रमुख लक्ष होते अभिव्यक्ती स्वातंत्र्य स्थापन करणे या बाबीवर जोर देणे. यानुसार महाराष्ट्रात इ.स. १७ ऑक्टोबर १९४० मध्ये पवनार येथे विनोबा भावे यांच्या युद्ध विरोधी आंदोलनाने वैयक्तिक सत्याग्रहाची सुरूवात केली. आणि जवाहरलाल नेहरू यांची सत्याग्रही म्हणून नेमणूक केली.''[५८]

या आंदोलनाचा परिणाम अमरावतीवर झाला आणि अमरावतीमध्ये सत्याग्रहामध्ये पडलेल्यांमध्ये वीर उत्तमराव मोहिते होते. यांनी युद्ध विरोधी लोकभावना निर्माण केल्या म्हणून ''युद्धविरोधी व्यक्तिगत सत्याग्रह (Civil Disobedience Movement) केला म्हणून दि. ११ फेब्रुवारी १९४१ मध्ये सहा महिने सश्रम कारावास Under Section Clause (B) Subrwe (I) Of 26 D.I.R. म्हणून उत्तमराव

---

५७. *शुक्ल आर.एल. (संपा.), आधुनिक भारत का इतिहास, पृष्ठ – ८२१.*

५८. *कित्ता, पृष्ठ – ८२५.*

मोहित्यांनी कारावास भोगला.''[५९] उत्तमरावांचे भाषण कौशल्य ही प्रभावी होते. अमरावती व परिसरात इंग्रज सरकार विरोधी वातावरण निर्माण करत जाहीर सभा बैठका या माध्यमातून त्यांनी स्वातंत्र्याची आशा जिवंत केली.

उत्तमराव मोहिते आंदोलनात कार्य करताना अनेक आंदोलनकर्त्यांना आपल्या घरी आश्रय दिला. कॉम्रेड शंकरराव दिघडे यांना घरी भूमिगत आश्रय दिला तसेच कॉम्रेड बाळासाहेब हुद्दार वर्धा आं.रा. कम्युनिष्ट फॉक्रो विरूद्ध स्पेनमधील मुक्ती सेनेत लढले आणि काही काळ इंग्लंड मध्ये वास्तव्य केले. यांनाही आपल्या घरी भूमिगत आश्रय दिला. तर काही वेळा उत्तमरावही भूमिगत होते. वैयक्तिक सत्याग्रहात सामील होणारे जवान आणि प्रभावी कार्यकर्ते हे ग्रामीण भागातून शोषण झालेल्या गटातील अधिक होते आणि त्यांनी स्वयंप्रेरणेने सहभागी झाले होते आणि प्रत्येकजण आपापल्या पातळीवर हे कार्य चालवत होते.

एकदा जेलमधून आले म्हणून उत्तमराव गप्प बसले नाहीत तर अमरावती परिसरात मोर्शी, ऱ्हटगाव, वरूड, बेनोडा, उत्तमगाव इ. ठिकाणी इंग्रज विरोधी प्रसार व प्रचार करत. रात्री अपरात्री प्रवास करत असून कुटुंब, पत्नी, मुले–बाळे यांचा विचार न करता पूर्ण वेळ सत्याग्रहासाठी देत असत. ११ फेब्रुवारी १९४१ ला सहा महिने सश्रम कारावास झाला आणि सहा महिने शिक्षा भोगून म्हणजे ऑगस्ट १९४१ मध्ये सुटले. या सहा महिन्यात जेलमध्ये उत्तमराव अभ्यास व चिंतन करत यामुळे त्यांचे व्यक्तिमत्व ताजे व उबदार वाटत असे. ऑगस्टमध्ये सुटल्यावर ते स्वस्थ बसले नाहीत तर परत कार्यवाही करण्यास सुरूवात केली. ब्रिटिश सरकारला विरोध, युद्धविरोधी व्यक्तिगत सत्याग्रह जोराने सुरू केला. पोलीस उत्तमरावांच्या पाळतीवरच होते. एक महिन्याच्या आतच उत्तमरावांना पुन्हा जेलमध्ये टाकण्यात आले.

''Under Section 34 (6) (F) (K) r/u rule 38 (1) (A) (S) D.I.R. दि. १ सप्टेंबर १९४१ ला एक वर्षांचा सश्रम कारावास सुनावला''[६०] आणि उत्तमराव

---

५९. *Mohite Veer Uttamrao, ATHEISM IN INDIAN PHILOSOPHY, Page - 1.*

६०. *कित्ता, पृष्ठ – १.*

कुटुंबाचे व समाजाचे दु:ख ऱ्हदयात साठवून आनंदाने जेलमध्ये गेले. यावेळी त्यांच्या कुटुंबाची अत्यंत वाईट अवस्था होती. कुटुंबातील कर्ता उत्तमराव असून लहान मुलगी व पत्नी उत्पन्नाचे साधन नाही तरी घराची पर्वा केली नाही. उत्तमराव सतत देशहिताचा विचार करत असत. त्यांना मैनाबाई सारखी पत्नी लाभली हेच त्यांच्या यशातील एक महत्त्वाचे कारण ठरले. उत्तमरावांनी जे जेलमध्ये भोगले नाही त्यापेक्षा अधिक जेलबाहेर असून त्रास सहन करावा लागला असेल. उत्तमरावांना जेलमध्ये राहण्याची आता चांगली सवय झाली होती आणि ही तिसऱ्यांदा शिक्षा भोगत होते.

वैयक्तिक सत्याग्रह अनेकांना असमाधानकारक वाटत होता. यास देशव्यापी जनआंदोलनाचे स्वरूप देण्यास गांधीजी तयार नव्हते आणि व्यक्तिगत पातळीवरून केला जाणारा विरोध टप्प्या टप्प्याने केला जात होता. यामुळे सरकारचा व्यवस्थित बंदोबस्त होत नव्हता. तर गांधीजी आपला तसा हेतू नसल्याचा खुलासा करत होते. ''२२ एप्रिल १९४१ रोजी ब्रिअनच्या चर्चेत उत्तर देताना भारत मंत्री अमेरिने चालेल्या वैयक्तिक सत्याग्रहाच्या मोहिमेबद्दल तुच्छतेचे उद्‌गार काढले आणि गांधीजींची मोहिम खेदजनक आणि अविवेकी असल्याचा अभिप्राय दिला.''[६१] याचा अर्थ हे आंदोलन निरर्थक होते असा होत नाही. पण भारतभर हे आंदोलन सुरू केले असते तर हिंसात्मक वळण लागले असते म्हणून गांधींनी तसा पवित्रा घेतला नाही. ढाका, अहमदाबाद येथे जातीय दंगली उद्‌भवल्या तेव्हा शांततामय मार्गाने अहिंसात्मक प्रतिकार करण्यासाठी दंगलग्रस्त भागात शांतता पथके स्थापावित असे गांधीजींनी सुचवले होते. अशात युद्ध परिस्थिती ही बदलली २३ डिसेंबर १९४१ रोजी बार्डोलीस काँग्रेस कार्यकारिणीची बैठक होऊन बदललेल्या युद्ध परिस्थितीची दखल घेण्यात आली. १६ सप्टेंबर १९४० च्या काँग्रेसने मंजूर केलेल्या ठरावाने त्यांच्यावरील जबाबदारीतून मुक्त करण्याची विनंती केली व काँग्रेस कार्यकारणीने ती मान्य केली. अशा पद्धतीने वैयक्तिक सत्याग्रह थंडावला. या सत्याग्रहाने भारतीय तरूणांच्या मनात देशभक्तीची

---

६१. *फडके य.दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र – खंड ५ वा, पृष्ठ – ५६.*

लाट निर्माण केली आणि वेळ आल्यावर प्रत्येक भारतीय सैनिक होऊ शकतो असे दाखवून दिले असे म्हणता येईल.

उत्तमराव मोहित्यांच्या कारवासाची मर्यादा संपण्याआधीच ''मुंबईच्या ग्वालियार टँकच्या मैदानावर ८ ऑगस्ट १९४२ रोजी अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने 'चले जाव' चा ठराव पास केला आणि इंग्रजांना भारत सोडून जाण्यास मजबूर करण्यासाठी जनआंदोलन सुरू केले आणि याच आंदोलनात गांधीजींनी आत्मरक्षणासाठी हथियार उचलण्यास मुभा दिली.''[६२] यामुळेही हे आंदोलन अधिकच तीव्र होण्याची चिन्हे दिसू लागली. म. गांधी यांच्या 'करेंगे या मरेंगे' या आदेशाने संपूर्ण हिंदूस्थान खवळला. या आंदोलनाने अमरावतीला ठिणगी टाकली ती प्रथम शिवाजी शिक्षण संस्थेच्या श्रद्धानंद बोर्डिंगच्या विद्यार्थ्यांनी आष्टी पेटवली, चिमूर पेटला, बेनोडा पेटला, यावली भडकली, बेफाम गोळीबार झाला. उत्तमराव मोहिते जनआंदोलनाबाबत प्रबोधन करत आंदोलन कसे करावे याचे मार्गदर्शन करत या आंदोलनावेळी उत्तमराव मोहिते नुकतेच शिक्षा भोगून आले होते. देशभक्तीची उर्मी त्यांना गप्प बसू देत नव्हती.

मोर्शी–वरूड रस्त्यावर बेनोडा हे गाव धवलगिरी नदीच्या तीरावर वसलेले आहे. ''उत्तमराव मोहिते आणि ज.सी. अकर्ते वकील यांनी बेनोड्यात सभा घेतली. या सभेचे अध्यक्ष अकर्ते असून प्रमुख वक्ते वीर उत्तमराव मोहिते हे होते. सभा आटोपून पहाटे चार वाजता घरी आल्यावर पोलिसांनी पकडले आणि पुन्हा उत्तमराव जेलमध्ये वास्तव्यास गेले. 'स्थानबद्ध' म्हणून (Detained By Secretary to Provincial Government, C.P. & Berar, Nagpur Under, Section 26 (1) D.I.R.) २० महिने बंदिस्त राहण्याची सजा झाली.''[६३]

उत्तमराव मोहिते एक सामान्य कुटुंबातील होते. या आंदोलनाचे वैशिष्ट्य उत्तमराव मोहिते जागतिक कृषक क्रांतीचा विधाता या पंजाबरावांच्या चरित्रग्रंथात

---

६२. *शुक्ल आर.एल. (संपा.), पूर्वोक्त, पृष्ठ – ८२९.*

६३. *मोहिते मैनाबाई यांची मुलाखत, दि. ११ ऑगस्ट २०११.*

सांगतात की, ''१९४२ च्या स्वातंत्र युद्धाचे वैशिष्ट्य असे आहे की, या धगधगत्या स्वातंत्र्य कुंडात आनंदाने उड्या घेतल्या त्या खेड्यापाड्यातील श्रमजीवी युवक तरूणांनीच.''[६४] पंजाबरावांचा पाठिंबा होता. तसेच ब्रिजलाल बियानींचे कार्य चांगले होते. त्यांची पत्नी सौ. सावित्रीबाई सर्व कार्यकर्त्यांची आई होती. आंदोलनाच्या काळात नागपूर सेंट्रल जेलमध्ये 'क' वर्गाच्या कैद्याची सुद्धा स्वत:च्या मुलाप्रमाणे काळजी घेत असत असे क्वचित नेते होते जे देशाला कुटुंब समजून देशहितासाठी झगडणारांना साथ देणारे होते.

इथे उत्तमराव मोहिते चांगली व्यक्ती म्हणून एखाद्याला महत्त्व देत नाहीत किंवा द्वेष म्हणून एखाद्या व्यक्तीची निंदा करत नाहीत. प्रत्यक्ष जसे कार्य आहे तसा उल्लेख करतात. डॉ. पंजाबराव देशमुख यांचा पाठिंबा मोहिते यांना होता. तसेच पंजाबरावांसाठी अनेक कार्य उत्तमराव करत असत. पंजाबरावांचा विशेष लळा उत्तमरावांवर होता आणि डॉ. पंजाबराव व ब्रिजलाल बियाणी यांच्यात राजकीय तेढ असून सुध्दा पंजाबराव देशमुख यांच्या चरित्रग्रंथात बियाणींचा उल्लेख चांगला कार्यकर्ता म्हणून उत्तमराव मोहिते करतात, हे उत्तमरावांच्या तटस्थ व नि:पक्षपाती विचारांची साक्ष पटवून देते.

उत्तमराव जेलमध्ये असताना त्यांना अनेक अडचणी आल्या. देश स्वतंत्र होण्यापूर्वी जेलची स्थिती स्वातंत्र्योत्तर जेल सारखी नव्हती. पोटाला पुरेसे अन्न मिळत नव्हते. स्थानिकचे लोक आपल्या कैदी नातेवाईकासाठी खाद्यपदार्थ शिजवलेले अन्न पाठवत उत्तमराव मोहित्यांच्या कुटुंबात त्यांची खास काळजी घेण्यासारखे कोणी नव्हते. उत्तमरावांची जेलमध्ये कशी स्थिती होती हे त्यांनी पाठवलेल्या पत्रावरून समजते. ''उत्तमराव दि. २८ डिसेंबर १९४२ रोजी लिहिलेल्या पत्रात आपल्या मामांना (सासरे) म्हणतात.''[६५] परमपूज्य तीर्थस्वरूप मामासाहेब आपले पत्र ता. १० ला

---

६४. *मोहिते वीर उत्तमराव, जागतिक कृषक क्रांतीचा विधाता लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख, पृष्ठ – २७०.*

६५. *मोहिते वीर उत्तमराव यांचे राजारामजी बोंडे यांना पत्र, दि. २८ डिसेंबर १९४२.*

मिळाले ताबडतोब उत्तर देता आले नाही. आपण पाठवलेले १ ताट, १ वाटी, १ प्याला १ लोटी एवढे सामान मिळाले. आपले मला मिळालेले हे पहिलेच पत्र आहे ..... वास्तविकपणे माझ्या हातून आपली सेवा घडायला पाहिजे. पण परिस्थितीने मला आपणांपासून फार दूर ठेवले. जशी परिस्थिती असेल तसे वागावे म्हणतात. मी येथे जवळ–जवळ पाच महिन्यांपासून पडून आहे. पोलीस अजून केस दाखल करत नाहीत. मला दोन सदरे, दोन हाफ पँटची जरूरी आहे. यापेक्षा माझ्या नावावर १५ रू. जमा करण्याची परवानगी आहे. आपण १५ रुपये पाठवले तर ते मला तीन चार महिने पुरतील. मी पुरवण्याचा प्रयत्न करील. पुढे उत्तमराव म्हणतात की, माझे अनेक अपराध समुद्रासारखे पोटात घेतले. आपल्या मनाविरुद्ध मी सर्व गोष्टी केल्या. काय करू त्याचं कारण परिस्थिती आहे. यामुळे माझी आर्थिक हानी झाली खरी मी सर्वच गमावल पण मी माझं शील राखल. भावांनी नाडलं, दोस्तांनी फसवलं पण माझ्या शीलांनं मला दगा नाही दिला. अगदी शेवटच्या क्षणातही त्यानं बरोबर मार्ग दाखवला. सुरवात जशी दु:खात झाली तसा शेवट गोड झाला म्हणजे पुरे आडाणी मुर्ख लोक आपल्या अपराधांचा भांडणांचा बाजार मांडतात तसा मी मांडला नाही. या बाजाराकरीता मी सर्व नुकसान सहन केले ही माझी आपल्यापुढे पहिली कैफियत आहे. असेच का घडविणार समाजाला प्रसंग येताच माझ्या तोंडून ही बाहेर येत आहे. मामासाहेब माझ्या अपराधाची आपण क्षमा कराल ना? आपल्या मनाचा सागर भरतीस आल्याबरोबर या नावेने भरभर चौफेर फिरावे. यात आश्चर्य कसले? ''पुन्हा खूण गाठ बांधून सांगतो की, पुन: माझ्या हातून वेडेपणा होणार नाही. वाटेल त्या वेळेस पत्र पाठवता येत नाही. काही झालं तरी 'जेलच' माझी प्रकृती या वेळेस बरोबर राहत नाही तरी काळजी करू नये.''[६६]

मोहित्यांच्या या पत्रावरून त्यांची जेल मधील बिकट अवस्था निदर्शनास येते. तसेच ऑगस्ट १९४२ मध्ये त्यांना अमरावतीच्या काराग्रहात पाठवल्याचे समजते.

---

६६. *मोहिते वीर उत्तमराव यांचे राजारामजी बोंडे यांना पत्र, दि. २८/१२/१९४२.*

तसेच ते आपल्या सासऱ्यांकडे माफी मागतात. स्वत:चा निर्णय कसा चांगला असून अनेकांनी अडचणी आणल्या तरी स्वत:चा आत्मविश्वास कायम असल्याचा दिसतो. या कठीण प्रसंगी मदतीसाठी कोणी येत नाही आणि म्हातारपणी तुम्हाला त्रास द्यावा लागतो असा मनाचा खुलासा करतात आणि आपल्या आर्थिक नुकसानीपेक्षा सामाजिक हिताच्या कार्याला महत्त्व देतात. यावरून उत्तमराव मोहिते स्वत:साठी जगले नसून समाजासाठी जगले असेच म्हणावे लागेल.

उत्तमराव मोहित्यांच्या पत्रावरून समजते की, टपाल व्यवस्था अजून व्यवस्थित व सुरक्षित नव्हती आणि अधिकारी व कर्मचारी भ्रष्टाचारी होते. २७ फेब्रुवारी १९४३ च्या पत्रात म्हणतात, ''पैसे पाठवल्यानंतर लगेच पत्राने कळवत जा नाही तर घोळ होण्याचा बराच संभव असतो.'' यातून अधिकाऱ्यांची भ्रष्ट निती व विस्कळीत व्यवस्था निदर्शनास येते. बुध्दिवादी व्यक्तिला निवांत राहणे शक्य नसते कारण त्यांची अंतरिक शक्ती त्यांना गप्प बसू देत नाही. उत्तमराव मोहिते अमरावतीच्या जेलमध्ये असताना गप्प बसले नाहीत. ''लो. टिळकांनी तुरुंगात गीतारहस्य लिहिले.''[६७] तर ''उत्तमराव मोहित्यांनी गीतेचा अभ्यास वर्ग सुरू केला.''[६८] आणि गितेतील थोतांड सांगण्यास सुरवात केली. हा अभ्यासवर्ग म्हणजे पारंपरिक अर्थ नव्हता तर गीतेची समीक्षा करून उत्तमराव गीता आणि वास्तवता तपासत होते. हे कार्य ते लेखी टिपनांनी ठेवीत यासाठी उत्तमराव मोहित्यांनी १२० पानांची वही मागितली आणि सोबत पेन्सिलची मागणी करतात. या गोष्टींची मागणी करणे उत्तमराव मोहित्यांना संकोच वाटतो. पण परिवर्तनाची लढाई संकोच बाळगून होणार नाही हेच त्यांच्या कृतीवरून दिसते.

उत्तमराव मोहिते फक्त ब्रिटिशांना भारतातून हाकलून लावणे म्हणजे स्वातंत्र्य मानणारे नव्हते. तर भारतीयांना त्यांच्या 'स्व' ची जाणीव झाली पाहिजे म्हणून लढणारे आणि अस्तित्वाची ओळख करून देणारे होते. ''कारागृहातील गीतेचा वर्ग व त्यावरील

---

६७. *मोहिते वीर उत्तमराव यांचे राजारामजी बोंडे पत्र, दि. २७/०२/१९४३.*

६८. *स्थानबद्ध कैदी की चिठ्ठी , कैदी क्र. ८२.*

नवीन विचार''[६९] त्यांच्या ध्येयाबाबत परिचय देतो. उत्तमराव मोहित्यांचे सासरे बोंडे यांना आपला जावई कोणत्याही कटकटीत पडू नये. बायको मुले, व्यवसाय असा सुखी संसार करावा वाटत होते. पण उत्तमराव मात्र सतत कटकटीत नवे विचार स्वातंत्र्याची तळमळ, वेळ प्रसंगी जेलमध्ये वास्तव्य अशा अस्थिर जीवनाची वाटचाल करत म्हणजे उत्तमराव समाज परिवर्तन आणि देशहित अशा बाबींसाठी सतत तत्पर असत. यासाठीच की काय त्यांचे भाऊ, नातेवाईक त्यांच्यापासून दूरावले. मग जेलमध्ये असताना सासऱ्यांना समजवण्याचा प्रयत्न करतात.

''भविष्यकाळ अंधारातच असतो अंधारामागून उजेड येईलच कालचक्र नेहमी फिरत असते काळजी मुळीच करू नका माझे जीवन दु:खमय असेल त्याला कोण काय करणार. द्रौपदीने कृष्णाला दु:खाचाच वर मागीतला असे म्हणतात. दु:खामुळे भाग्य थोर बनते. आपले समाधान कोणत्या मार्गाने करू कळत नाही. आपल्या ज्या इच्छा अकांक्षा होत्या त्याप्रमाणे मी निघालो नाही त्याबद्दल आपणास वाईट वाटेत असेल. मी आपल्या पात्रतेस उतरलो नाही म्हणून दु:ख मानत बसणार नाही. मी निराशावादी नाही जमीन खोदून पाणी काढण्याचा उत्साह संपला नाही. मी म्हातारा झालो नाही आणि भर तारूण्यात असे शब्द काढणे मला शोभत नाही.''[७०] अजूनही सुंदर संसार उभारीन आपणास दु:ख देण्याचे कृत्य माझ्या हातून होणार नाही. मी येथे उत्तम रीतीने गीतेच्या अभ्यासात वेळ घालवत आहे. तसेच उत्तमराव चरखा आणून सूत कातण्यास सांगतात आणि सूत कातण्याशिवाय पर्याय नाही असे सूचवतात पुढे म्हणतात, 'दगडाची पूजा करण्यापेक्षा गरिबांची सेवा करायला सांगा गरिबांच्या सेवेइतके जगात पवित्र दुसरे काही नाही.'

उत्तमराव मोहिते हे खरे स्वातंत्र्य सैनिक होते. स्वातंत्र्य सैनिकांच्या रुपात नव्हे त्यांना आपल्या देशबांधवांची प्रगती हवी होती आणि त्यातला एक अडसर म्हणून परकीय सत्ता झुगारायची होती पण परकीयांना झुगारून प्रगती झाली असे चित्र दिसणार

---

६९. *मोहिते वीर उत्तमराव यांचे राजारामजी बोंडे यांना पत्र, दि. २७ फेब्रुवारी १९४३.*

७०. *कित्ता.*

नव्हते कारण आपल्या देशबांधवांचा सर्वांगीण विकास हाच स्वातंत्र्याचा अर्थ उत्तमराव समजत होते. देशातील गोर गरिब जनतेविषयी त्यांच्या मनात सहानुभूती होती आणि ती स्थिती बदलावी असा त्यांचा प्रयत्नही असल्याचे दिसते. जेलमध्ये असताना सुद्धा उत्तमरावांनी सतत आपल्या गरीब, अज्ञानी, धर्मभोळ्या, पारतंत्रिक समाजाची काळजी होती.

उत्तमराव मोहिते हे कणखर स्वातंत्र्य सैनिक होते. त्यांनी आपल्या घर, संसार याचा विचार न करता देश हेच आपले घर समजून आपला संसार थाटला त्यांना अनेक वेळा भूमीगत राहावे लागले. तर 'जेल' हेच घर मानून ऐन तारूण्याच्या उमेदीमध्ये जेलमध्ये राहावे लागले. त्यांना वैयक्तिक सत्याग्रह व चले जाव आंदोलनातील सहभागामुळे अमरावती, अकोला व नागपूर येथील जेलमध्ये राहावे लागले.

राष्ट्र गुलामीत असताना त्याला राष्ट्रसंजीवक मंत्र देऊन नवचैतन्य निर्माण करणारे उत्तमराव मोहिते आधुनिक भारताच्या इतिहासात महत्त्वपूर्ण ठरतात. राष्ट्रासाठी अनेक महापुरुषांनी योगदान दिले. त्या महापुरुषांत दोन प्रकार दिसतात. एक म्हणजे राष्ट्रावर गुलामगीरीचे संकट आले असता स्वाभिमान, स्वातंत्र्याची इच्छा अंतरिक प्रेरणा चेतवून देशाविषयी राष्ट्राविषयी स्वदेशाभिमान जागृत करत असतो. तर दुसऱ्या प्रकारे जुन्या चालीरिती, जुनी समाजरचना, जुने कायदे, जुने मूल्य बदलून समाजातील अन्याय दूर करण्याचा प्रयत्न करत असतो. न्याय तत्वाच्या पायावर नवसमाजाची उभारणी करून सर्वांसाठी बंधुत्व, समता, स्वातंत्र्य प्राप्त करून देण्याचा तो प्रयत्न करतो. उत्तमराव मात्र वरील कोणत्याही एका भूमिकेत बसत नाहीत तर दोन्ही साच्यातील कार्य उत्तमराव मोहिते करतात म्हणून स्वातंत्र्याच्या व्यापक अर्थाची लढाई उत्तमराव करतात जेलमध्ये आपले वाचन चिंतन मनन आणि नवनिष्कर्ष काढत राहिले आणि अनेक वर्षापासून स्वातंत्र्यापासून दूर असलेल्या सामान्य, अतिसामान्य व्यक्तिकरीता स्वातंत्र्य मिळवून देण्यास शेवटपर्यंत धडपडत राहिले.

वीर उत्तमराव मोहिते यांनी स्वातंत्र्याचा अर्थ व्यापकतेने घेतला. परकियांची

गुलामगिरी नष्ट करण्याबरोबर स्वकियांनी राज्य केले म्हणजे स्वातंत्र्य मिळाले असे नव्हे. तर स्वकियांच्या राजवटीबरोबर देशातील प्रत्येक नागरिक कोणत्याही दबावात राहणार नाही. कायद्याने व सामाजिक जीवनात सर्व समान असतील. प्रत्येक समाजघटकाला समान न्याय मिळाला पाहिजे. धर्म, देव, पंथ, जात व लिंग यांच्या माध्यमातून कोणाचेही शोषण होणार नाही. तेच खरे स्वातंत्र्य मानून आयुष्यभर झगडत राहिले. सामाजिक गुलामगिरी, धार्मिक गुलामगिरी व राजकीय गुलामगिरीतून समाज मूक्त करणे हेच खरे स्वातंत्र्य व असाच खरा स्वातंत्र्यसैनिक म्हणता येईल.

२.८.५ सातारचे प्रतिसरकार व उत्तमराव मोहिते :

देशामधील कमालीची अशांतता सुजान देशप्रिय व्यक्तींना गप्प बसू देत नव्हती. सामाजिक, धार्मिक, राजकीय बाबीतील अशांतता नष्ट करून जनहीत साधले जावे या उद्देशाने आपल्या घर संसाराची काळजी न घेता वेळ येता बलिदानाची तयारी ठेवणारे राष्ट्रभक्त मैदानात उतरले. म. गांधीच्या नेतत्वाखाली असहकारतेचे आंदोलन झाले आणि अनेकांनी यात सहभाग घेतला तर ''१९४२ च्या चले जाव आंदोलनात प्रतिसरकार स्थापन्याचे प्रयत्न झाले. असाच प्रयत्न साताऱ्यात होऊन १ जून १९४३ रोजी प्रतिसरकार स्थापन झाले.''[७१]

साताऱ्यात स्थापन झालेल्या प्रतिसरकारचे प्रमुखत्व येडे मच्छिंद्र, ता.जि. सातारा येथे ३ ऑगस्ट १९०० रोजी जन्मलेल्या नाना रामचंद्र पाटील यांच्याकडे राहिले. ''सातारा जिल्ह्यात इ.स. १९११ पासून म्हणजे नाना पाटील ११ वर्षाचे असताना सत्यशोधक चळवळीच्या प्रचाराला सुरूवात झाली. अस्पृश्यता निवारण, सामाजिक शिक्षण, स्त्री शिक्षण यांबाबत समानता निर्माण करण्याबरोबरच सावकारशाही व उच्च वर्णियांचे अन्यायी प्रभुत्त्व नाहीसे करणे इ. प्रश्न हातात घेतले. ''[७२] साम्राज्यशाही विरोधात लढ्याचा एक नवा आविष्कार साताऱ्याला झाला आणि नाना पाटलांच्या नावे हे सरकार घोषित झाले.

---

७१. *फडके य.दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड – ५, पृष्ठ – १४२.*

७२. *कमल भागवत, क्रांतिसिंह कॉम्रेड नाना पाटील, पृष्ठ – ७,८.*

'प्रतिसरकार की पत्रीसरकार' साताऱ्यात निर्माण झालेले सरकार यालाच 'पत्री' सरकार म्हणून ओळखले जाते. मुळातच पत्रीसरकार हे या सरकारचे नाव नसून ''प्रतिसरकारची कुचेष्टा करण्यासाठी इंग्रज राज्यकर्त्यांनी आणि त्यांच्या हस्तकांनी प्रतिसरकारला बदनाम करण्यासाठी पत्रीसरकार हे नामाभिधान दिले. पत्री मारणे म्हणजे पायाच्या तळावर बेदम मार देणे असा समजही होता की पत्री मारल्याने पुरुषत्व जाते. पोलीस जसा गुन्हेगारांकडून गुन्हा कबूल करून घेण्यासाठी सुंद्री या मारहानीच्या प्रकारचा वापर करत. तळपायावर मार देण्याचा प्रकार पत्री मारणे म्हणून संबोधला जाऊ लागला. वास्तविक जनावरांच्या पायात पत्रा ठोकतात असा पत्री मारणे या बाबत संभव वाटण्याची शक्यता आहे पण तसे नाही.''[७३]

''नाना पाटलांच्या प्रतिसरकारचे क्रांतिकारक कीर्तनकार 'जीजाबा पाटील' यांचा प्रचार दौरा वऱ्हाडात आला. अमरावती जिल्ह्यात बापूराव विधातेंच्या प्रेरणेने जीजाबा पाटलांच्या कीर्तनाचे कार्यक्रम घेण्यात आले. या दौऱ्यात उत्तमराव मोहिते सतत उपस्थित असून जीजाबा पाटलांना सहाय्य केले.''[७४] वर्धेचे रामनगरात राहणारे शामराव वसू यांचे जामात जनार्धन पाटील आणि त्यांच्या पत्नी हे उभयता क्रांतिसिंह नाना पाटलांच्या तुफान सेनेचे सैनिक म्हणून काम करत. ''दि. १ ऑक्टो. १९४६ रोजी वर्धेला वसूंच्या घरी प्रतिसरकारचे प्रचारमंत्री शाहीर शंकरराव निकम यांची व उत्तमराव मोहिते यांची भेट झाली. ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात वर्धा, नागपूर व अमरावती येथे लावणी व पोवाड्याचे लीन कार्यक्रम झाले.'' ८ ऑक्टोबर १९४६ ला अमरावतीचा कार्यक्रम आटोपून शंकरराव निकम निघाले. त्यांना सोडण्यासाठी बडनेरला उत्तमराव मोहिते गेले तेथे शंकरराव निकम यांनी क्रांतिसिंह नाना पाटलांचे ग्रामराज्य शिबीर घेण्याचा हट्ट धरला. उत्तमराव मोहिते यांनी शिबीर घेण्याचे वचन दिले.

---

७३. कित्ता, पृष्ठ – ७,८.

७४. मोहिते वीर उत्तमराव, जागतिक कृषक क्रांतीचा विधाता लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख, पृष्ठ – ३०१.

उत्तमराव मोहित्यांची परिस्थिती बेताची होती. या शिबीरासाठी २५ ते ३० हजार खर्च लागणार होता आणि तो खर्च उत्तमरावांना करणे शक्य नव्हते. पण मनातील उर्मी गप्प बसवत नव्हती आणि निकम यांनी दिलेल्या वचनाची पूर्ती करणे महत्त्वाचे होते. याही पेक्षा महत्त्वाचे होते ती नाना पाटलांचे मार्गदर्शन म्हणून उत्तमराव मोहिते चिंताग्रस्त होते आणि मार्ग काढण्याचा प्रयत्न करत होते. तत्कालीन जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष पी.के. देशमुख यांना विचारणा केली पण त्यांनी असमर्थता दर्शवली. आता उत्तमरावांना वाटणारा आधार पंजाबराव देशमुख होते. देशमुखांकडे ही बाब उलगडली तेव्हा पंजाबरावांनी समर्थन दिले व सर्व भार उचलला आणि पंजाबराव देशमुखांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली. यात ''उत्तमराव मोहिते ग्रामराज्य शिबीर समितीचे सरचिटणीस म्हणून राहीले.''[७५]

उत्तमराव मोहिते तत्पर कार्य करणारे हाते. त्यांनी हाताशी धरलेले कार्य पूर्ण करण्यासाठी ते अतोनात मेहनत घेत असत. अवघ्या आठ दिवसात साधनांची सोय, पैसा उपलब्ध नसताना उत्तमराव मोहित्यांनी ग्रामराज्य शिबिराची व्यवस्था करून ''दि. १५ ऑक्टो. १९४६ रोजी नाना पाटलांना आमंत्रित करण्यासाठी उत्तमराव मोहिते 'कुंडलला' आले नाना पाटलांना आमंत्रित केले. नाना पाटलांनी आमंत्रण स्वीकारले.''[७६]

''अमरावती येथे श्री. शिवाजी शिक्षण संस्थेच्या श्रद्धानंद छात्रालयाच्या इमारतीत दि. २ नोव्हेंबर १९४६ पासून दि. ११ नोव्हेंबर १९४६ पर्यंत क्रांतिसिंह नाना पाटलांचे ग्रामराज्य शिबीर सुरू झाले. या शिबीराला विदर्भाच्या आठ जिल्ह्यातून २०० शिबीरार्थी प्रशिक्षणासाठी आले.''[७७] ''पंजाबराव देशमुख यांनी व ब्रिजलाल बियाणींनी नाना पाटलांचा दौरा निश्चित करण्याचे ठरवले व वऱ्हाड प्रांतिक काँग्रेस

---

७५. *कित्ता, पृष्ठ – ३०३.*

७६. *कित्ता, पृष्ठ – ३०४.*

७७. *कित्ता, पृष्ठ – ३०५.*

कमेटीने क्रांतिसिंह नाना पाटलांचा दि. ११ नोव्हें. १९४६ पासून १८ नोव्हें. १९४६ पर्यंत आठ दिवसाचा दौरा जाहीर केला.''[७८]

उत्तमराव मोहित्यांच्या दूरदृष्टीची व कल्पकतेची साक्ष पटते. एका सामान्य व्यक्तिने घेतलेला निर्णय जर वऱ्हाड प्रांतिक काँग्रेस स्वखुशीने साथ देत असेल तर त्या व्यक्तिची दूरदृष्टी किती महत्त्वाची. जीजाबा पाटील, शाहीर शंकराव निकम यांच्याशी संपर्क झाल्यावर उत्तमरावांच्या मनात निर्माण झालेली आशा पूर्णत्वास गेली. संपूर्ण महाराष्ट्रात नाना पाटील फिरले. वऱ्हाडच्या लोकमनावर क्रांतिसिंह नाना पाटलांचा ठसा कायमचाच उमटला. उत्तमराव मोहिते या सामान्य व्यक्तिने हे कार्य मार्गी लावले एवढेच नव्हे तर अमरावतीच्या व्यक्तिचे नानांवर प्रेम जडले आणि नाना पाटील दीर्घकाळ स्मरणात राहावा म्हणून ''महाराष्ट्रातील कोठेही न आढळणारा नाना पाटलांचा पुतळा अमरावतीला उभा राहीला.''[७९]

उत्तमराव मोहिते क्रांतिसिंह नाना पाटील व प्रतिसरकार या बाबत म्हणतात,''हिंदुस्थानच्या अर्वाचीन इतिहासातला प्रतिसरकारचा अदभूत प्रयोग पूर्णपणे यशस्वी झाला. भारताच्या इतिहसातील समाजवादी समाजरचनेचा तो प्राथमिक पाठ होता. क्रांतिसिंह नाना पाटलांसारखे दहा महावीर म. गांधी यांना लाभले असते तर मोहनदास करमचंद गांधींनी हो–चि– मिन्हाचे स्थान मिळविले असते.''[८०]

यावरून उत्तमराव मोहिते एक धडाडीचे व्यक्तिमत्व होते. केवळ त्यांनी आपल्या जिल्ह्यापुरता विचार केला नाही तर संपूर्ण देशाचा व देशातील समाजाचा विचार केला आणि साताऱ्याचे प्रतिसरकार वऱ्हाडात लोकप्रिय वनवण्यात व प्रतिसरकारच्या विस्तारास मदत केली असे म्हणता येईल.

एकंदरीत वीर उत्तमराव मोहिते यांचे भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा एक भाग म्हणून प्रतिसरकार बरोबरचे कार्य अभ्यासले असता भारतीय समाज, भारतीय इतिहास व

---

७८. *कित्ता, पृष्ठ – ३०४.*

७९. *कित्ता, पृष्ठ – ३०७.*

८०. *कित्ता, पृष्ठ – २७४.*

भारतीय परिस्थिती यात बदल घडवण्याची धमक क्रांतिसिंह नाना पाटलांत पाहिली. जर भारतात असे क्रांतिकारी पुरुष महात्मा गांधी यांना लाभणे आवश्यक होते. तरी नाना पाटलांचे भारतीय विषमतेला नष्ट करून समताधिष्ठित समाजनिर्मितीसाठी महत्त्वपूर्ण कार्य होते. यात वीर उत्तमराव मोहिते यांनीही सहभाग घेतल्याचे दिसून येते.

२.८.६ उत्तमराव मोहिते व मराठा विज्ञान मंदीर

मराठा विज्ञान मंदीर हे उत्तमराव मोहिते यांच्या जीवनात महत्त्वपूर्ण ठरले आहे. ''डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या बहुजन हिताच्या कार्याची ओळख करून देण्याच्या उद्देशाने इ.स. १९५५ मध्ये गाडगे नगरात मराठा विज्ञान मंदीर नावाची संस्था स्थापन झाली. या संस्थेला ना स्वतंत्र इमारत ना कार्यालय अशी ही संस्था चालवण्यासाठी उत्तमराव मोहिते, दौलतराव गोळे, प्रा. राम मेघे आणि बापूराव विठोबा पाटील यांनी मराठा विज्ञान मंदीर नावाचा क्लब चालवला. या संस्थेचा जन्म होण्यास जे महत्त्वपूर्ण कारण ठरले त्यात लोककला, लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती या माध्यमातून वैज्ञानिक दृष्टिकोन लोकमासात पेरण्यासाठी या संस्थेचा जन्म झाला.''[८१] म्हणजे लोकांच्या उन्नतीसाठी ही संस्था कार्य करणार असे दिसते.

''देव धर्म व अध्यात्माने मानव समाजाचे सांस्कृतिक जीवन पार धुळीला मिळवले आहे.'' चित्रकला, संगीत, वाद्यकला, नृत्य या साऱ्या ललितकलांना अध्यात्माने गुलाम बनवले आहे. यासाठी मराठा विज्ञान मंदीराने सतत १० वर्ष सांस्कृतिक क्षेत्रात परिवर्तन घडवून आणण्यासाठी सांस्कृतिक सप्ताह साजरे केले. वारकरी परिषदा, तमाशाचे मेळावे भरवले आणि मराठा विज्ञान मंदिराच्या माध्यमातून उत्तमराव मोहिते यांनी सांस्कृतिक परिवर्तनास चालना दिली.

मुख्यमंत्री मुंबई प्रदेश इ.स. ९ डिसें. १९५८ रोजी यशवंतराव चव्हाण यांनी उत्तमराव मोहिते यांना पत्र पाठवून खंत व्यक्त केली. यशवंतराव चव्हाण म्हणतात,

---

८१. *कित्ता, पृष्ठ – ४८५, ४९०.*

''मराठा विज्ञान मंडळाच्या वतीने अमरावती येथे जो सांस्कृतिक महोत्सव साजरा करण्यात येत आहे. त्यासाठी मला प्रत्यक्ष उपस्थित राहता येत नाही त्याबद्दल वाईट वाटते. तथापि या महोत्सवाला ज्या थोर नेत्यांचे मार्गदर्शन लाभले त्यांच्या यशाबद्दल मला बिलकूल संशय वाटत नाही. स्वातंत्र्योत्तर काळात आपल्या देशात सांस्कृतिक पुनरूज्जीवनाची जी लाट उसळली आहे त्याद्वारे लोकांच्या जीवनाबद्दल नव्या आशा, आकांशा स्वयंस्फुर्तीने उफाळून वर आलेल्या दिसतात. या बाबीचा विचार करता एका जागृत राष्ट्राची उभारणी करण्याचे सद्‌भाग्य आपल्या पीढीला लाभले आहे. याचा आनंद वाटतो माझ्या सदिच्छा''[८२] **असे मुख्यमंत्री सांगतात. तर** "H.V. Pataskar, Governor, Madhya Pradesh' **आपले विचार सांगतात,** "I am interested to know that a society named the maratha Vidnyan Mandal has been fromed at Amravati with the object of propagating a scientific view of life & that the society is celebrating its cultural week ours is an age of astounding scientific progress which will have for reaching effects on the outlook of men in all parts of the world. It is necessary therefore that every man & woman is equipped with a fair knowledge of the basic scientific principles so that he or she may be able to comprehend the new discoverise & inventions that are being made. I sent my Best wishes to the mandal for the success of it cultural week."[८३]

उत्तमराव मोहिते यांचे मराठा विज्ञान मंदीर नावावरून एक मोठी इमारत असावी. त्याचे कार्यालय असावे अशी कल्पना येते पण तसे नाही. वरील विचारांवरून हे मंडळ कार्याने मोठे होते हे कळते पण इमारतीने किंवा कार्यालयाने नाही उत्तमराव

---

८२. *चव्हाण यशवंतराव (Chife Minister Government of Bombay) यांचे मोहिते वीर उत्तमराव यांना पत्र, दि. ९ डिसें. १९५८.*

८३. ***Pastaskar H.V.** यांचे मोहिते वी र उत्तमरावांना पत्र, दि. ८ डिसें. १९५८.*

मोहित्यांनी आपले जीवन पणाला लावून अनेक महत्त्वपूर्ण कार्य केले. उत्तमराव मोहिते यांनी तत्कालीन भारताच्या प्रधानमंत्री श्रीमती इंदिरा गांधी यांना पत्र पाठवले या पत्राते ते म्हणतात, ''मराठा विज्ञान मंदीर ज्याला न कसल्या भिंती न छत आहे, तेच माझे वस्तीस्थान जिथून मी निस्वार्थी सेवा करतो.''[८४] उत्तमराव मोहित्यांनी तशी सेवा ही केल्याचे दिसते. त्यांनी मराठा विज्ञान मंडळाच्या माध्यमातून सांस्कृतिक क्रांतीची कल्पना साकारण्याचा प्रयत्न केला.

मराठा विज्ञान मंदिराच्या माध्यमातून वैज्ञानिक संस्कृती निर्मिती करण्याचे कार्य होत असे. यासाठी अज्ञान अंधश्रद्धा यांना यत्कींचितही स्थान न देता समाजात अंधश्रद्धा पसरवणाऱ्या घटनांना विरोध करून मराठा विज्ञान मंडळाने अध्यात्म, धर्म, बुवाबाजी यज्ञ, यांचा समाचार घेतला आणि ज्या ग्रंथामध्ये मानवतेच्या वाटण्या करून अमानवीय बाबींचा भरणा असणाऱ्या अंधश्रद्धा युक्त ग्रंथांवरही हल्ले चढवले. यात उत्तमराव मोहिते सर्वस्वी पुढाकार घेत. ''मराठा विज्ञान मंदिराने गणपती उत्सवा ऐवजी छत्रपती उत्सव सुरू करण्याचे इ.स. १९५६ मध्ये ठरवले. यामागचा मराठा विज्ञान मंदिराचा प्रमुख हेतू असा होता गणेश उत्सवाने समाजाची अद्योगती घडवून आणली आणि छ. शिवाजी महाराज हे सर्वसमावेशक व्यक्तिमत्व व त्यांची ओळख खऱ्या अर्थाने झाली तर गुलामगिरीत वाटचाल करणारी संस्कृती परिवर्तनशील बनेल.''[८५] त्यामुळे दिनदुबळ्यांना व गोर गरीबांना मुक्तपणे सांस्कृतिक आनंद उपभोगता येईल. उच्च–निचता, स्पृश्य–अस्पृश्यता असे प्रश्न निकाली लागतील. कारण छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्व जाती धर्म व पंथातील व्यक्तिंसाठी स्वराज्य निर्माण केले. जर गणपती ऐवजी छत्रपती शिवाजी महाराजांचा उत्सव साजरा केला तर महाराष्ट्रातील जातीयतेची व धार्मिकतेची दरी कमी होऊन समता प्रस्थापित होईल. स्वतंत्र भारतात सांस्कृतिक बदल झाला पाहिजे तसे झाले नाही तर भारत खऱ्या अर्थाने स्वतंत्र झाला

---

८४. मोहिते वीर उत्तमराव यांचे पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांना पत्र, दि. १५ मे १९८४.

८५. मोहिते वीर उत्तमराव, जागतिक कृषक क्रांतीचा विधाता लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख, पृष्ठ – ४८५.

नाही. यासाठी ''छत्रपती उत्सव साजरा करा अशा आशयाचे पत्रक दि. ०१/०९/१९५८ रोजी मराठा विज्ञान मंदिराने काढले.''[८६]

ठरल्याप्रमाणे कृती हे उत्तमरावांचे वैशिष्ट्ये होते. त्याप्रमाणे कार्यक्रम पत्रिका तयार झाली. मराठा विज्ञान मंडळाच्या विद्यमाने सार्वजनिक छत्रपती उत्सव स्थळ जोशी हॉल ब्रह्मविद्या मंदीर अमरावती येथे सुरूवात झाली. यासाठी उत्सव समिती निर्माण केली असून बी.व्ही. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली अजाबराव चोरे, सुरेश बिरे, कु. भाग्यरेखा उत्तमराव मोहिते यांची चिटणीस म्हणून नियुक्ती केली. ठरल्याप्रमाणे दि. १६/०९/१९५८ पासून २५/०९/१९५८ पर्यंत वेगवेगळ्या विषयांनी युक्त कार्यक्रम ठरला. हा कार्यक्रम म्हणजे एकाने सांगावे व अन्य श्रोत्यांनी गप्प ऐकून घ्यावे असा नसून ज्याला जशी शंका निर्माण होईल तसा प्रश्न विचारता येत असे. यात ''विद्यार्थांसाठी वादविवाद १९/०९/१९५८ रोजी ठेवला तर नागरीकांसाठी वादविवाद दि. २१/०९/१९५८ रोजी ठेवण्यात आला. महाराष्ट्राच्या इतिहासातील हा महत्त्वपूर्ण उत्सव पुढे ५ वर्ष जोमाने चाललला पण समाजाचा आर्थिक पाठींबा न मिळाल्याने हा उत्सव करणे सोडून द्यावे लागले.''[८७] मराठा विज्ञान मंदिराने दि. १८/१२/१९५९ पासून २२/१२/१९५९ पर्यंत सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले. हा उत्सव उत्तमराव मोहिते यांच्या सांस्कृतिक परिवर्तनाची कल्पना देते. या कार्यक्रमाला अनेक मान्यवरांना आंमत्रित करण्यात आले होते. अनेकांनी आपले संदेश पाठवले त्यात पंजाबचे मुख्यमंत्री प्रतापसिंह आपला संदेश देतात. ''मराठा विज्ञान मंडलद्वारा १८ से २२ दिसम्बर तक जो सांस्कृतिक आयोजन किया जा रहा है उस से जनता को नई प्रेरणा मिलेगी ऐसी मुझे आशा है। मै इस आयोजन की सफलता की कामना करता हूँ।''[८८] भारताचे पंतप्रधान, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व अनेक राज्यातील मुख्यमंत्री यांनी मराठा विज्ञान मंडळ अमरावती येथून वीर उत्तमराव मोहिते यांनी सांस्कृतिक परिवर्तनाची

---

८६. *छत्रपती उत्सवाबाबत मराठा विज्ञान मंदिराद्वारे काढलेले पत्रक, दि. ०१ सप्टेंबर १९५८.*

८७. *छत्रपती उत्सावाची मराठा विज्ञान मंडळाद्वारे काढलेली पत्रिका, दि. १५ सप्टेंबर १९५८.*

८८. ***Mohiite Veer Uttamrao, Cultural Renaissance, page no. 28***

प्रेरणा दिली. यांचे अभिनंदन करून भारताच्या भविष्यात विकासाचा वाटा उचलण्याचे कार्य असल्याने प्रतिसाद देतात. यावरून उत्तमराव मोहिते यांनी चालवलेला प्रयत्न राष्ट्रीय असल्याचा दिसतो.

मराठा विज्ञान मंदीर या नावातच विज्ञान असल्याने महाराष्ट्र छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श घालून देण्यासाठी अंधश्रद्धेवर प्रहार केला आणि शिवाजी महाराजांचे विचार पसरवण्यासाठी मराठा विज्ञान मंदिराचे कार्य चालत असे. महाराष्ट्रात राहतो तो मराठा अशा व्यापक अर्थाने अज्ञान, अंधश्रद्धा, कर्मठरूढी, परंपरा यांच्यावर हल्ला करून सहज जीवन ज्यामध्ये कोणतीही धार्मिक वा जातीय बंधने न बाळगता व्यक्ती विकास साधण्याचे कार्य मराठा विज्ञान मंदीर या संस्थेने केले. उत्तमराव मोहिते यांनी या संस्थेच्या माध्यमातून सांस्कृतिक बदलाची संकल्पना मांडली आणि धार्मिक नियम कसे व्यक्तीला व त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला गुलाम बनवणारे आहेत हे प्रखरपणे मांडले. डॉ. पंजाबराव देशमुख अशाच प्रकारे कार्य करत असल्याने उत्तमराव मोहित्यांनी पंजाबरावांच्या विचाराला जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी मराठा विज्ञान मंडळ उपयुक्त ठरले. मराठा विज्ञान मंडळाला भेटी दिल्या. सामान्यांपासून नामवंतापर्यंत महाराष्ट्राबाहेर ही बहुजन विकास व सांस्कृतिक परिवर्तन करण्याची गरज कशी आहे हे पटवून महाराष्ट्राच्या पुरोगामित्वाला पुढे नेण्याचे कार्य मराठा विज्ञान मंडळाने केले. यासाठी उत्तमराव मोहिते सतत धडपडत असून त्यांच्या सहाकार्यांचा त्यांना खंबीर पाठिंबा असल्यानेच हे किचकट पण महत्त्वपूर्ण कार्य उत्तमराव करू शकले. यामुळे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहास मराठा विज्ञान मंडळ महत्त्वपूर्ण राहिले असे म्हणावे लागेल.

२.८.७ वीर उत्तमराव मोहिते व डॉ. बाबासाहेब आंबेडकर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म दि. १४ एप्रिल १८९१ रोजी झाला. ''डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपले संपूर्ण आयुष्य दलित, पीडित, शोषीत समाजाच्या उत्थानासाठी खर्च केले. भारतातील जुलमी समाज व्यवस्थेविरुद्ध तब्बल

४५ वर्ष संघर्ष केला व १९५६ ला ते निवर्तले.''[८९] अशा आंबेडकरांच्या विचाराला उत्तमराव आपले कार्य बनवत असत. उत्तमराव मोहिते शिक्षक म्हणून कार्य करत होते. श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती येथे असताना ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या निधनाची वार्ता कळताच ढसढसा रडले. शोक सभा घेतली. पण त्यांच्या तोंडातून शब्दच फुटत नव्हते.''[९०] यावरून उत्तमराव मोहिते यांना डॉ. आंबेडकरांविषयीचा आदरभावही दिसतो. उत्तमरावांच्या मनात असणारा आदर वैचारिक असून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यावर विश्वास ठेवून तशीच कार्य करण्याची प्रेरणा उत्तमरावांकडे होती. महाडच्या सत्याग्रहाबाबत व नाशिकच्या सत्याग्रहाबाबत डॉ. आंबेडकरांनी केलेल्या कामाबाबत उत्तमराव मोहिते म्हणतात,

''काळाराम्याचे मी घेईन दर्शन।
बडवे हो कोण चोर सारे।।
श्रतिमन:स्मृति जाळून टाकील।
दर्शने पुराणे थोतांड ती।।
तलाव महाड पाणी त्याचे गोड।
पईन मी थोडं भीमराया।।
उत्तम नमितो बाबा आंबेडकरा।
ज्याने केला सारा प्रताप हा।।''[९१]

यावरून उत्तमराव मोहिते डॉ. आंबेडकरांच्या कार्यावर विश्वास ठेवून प्रेरणा घेऊन वाटचाल करत असताना दिसतात. आंबेडकरांच्या विचाराला त्यांच्या कार्याला अनेक विरोध झाले. याबाबत उत्तमराव मोहिते आपल्या समाज बांधवांचे आंबेडकरांबाबतचे गैरसमज दूर करताना दिसतात. ''उत्तमराव म्हणतात''[९२], ''आज

---

८९. *कांशीराम (संपा.), बहुजन नायक, विशेषांक, दि. १४ एप्रिल १९९१.*

९०. *मोहिते वीर उत्तमराव, मराठ्यांच्या सांस्कृतिक क्रांतीचा इतिहास, प्रस्तावना – २.*

९१. *मोहिते वीर उत्तमराव, जीवनगाथा, पृष्ठ – १८.*

९२. *मोहिते वीर उत्तमराव, जागतिक कृषक क्रांतीचा विधाता लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख, पृष्ठ – ३५२.*

महाराष्ट्रातील मराठवाड्यात मराठा अस्मिता आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर अस्मिता यांचा वाद मराठा जमातीच्या मारेकऱ्यांनी पेटविला आहे. वर्णश्रेष्ठतेच्या दंभाने हा वाद जाणूनबुजून पेटविला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही मराठ्यांची अस्मिता नाही? हा लोकोत्तर माणूस मराठा मुलखात जन्माला आला हा मराठ्यांना अभिमान नाही? बडोदा नरेश सयाजीराव गायकवाड आणि राजर्षी शाहू महाराजांनी उत्तुंग उंचीचा पुरुष निर्माण केला याचा अभिमान आजच्या मराठ्यांना नाही? मराठ्यांना मराठी शब्दाची अस्मिता कळली असती तर वेरूळच्या मालोजी व विठोजी भोसल्यांच्या समाधीच्या इमारतीत कुत्रे व डुकरांनी वसाहत केली नसती.'' उत्तमराव मोहिते आपल्या समाजबांधवांना समजून सांगतात की, आंबेडकरांचे कार्य आपल्या विरोधी नसून पोषक आहे. यासाठी सयाजीराव गायकवाड व राजश्री शाहू यांनी आंबेडकरांना मदत केली. ते मराठेच असताना करू शकतात. आपण सुद्धा आंबेडकरांना प्रतिसाद देऊन मदत केली पाहिजे. असा उत्तमरावांचा हेतू असावा आणि उत्तमरावांनी या दृष्टीने वाटचाल ही केली.

डॉ. आंबेडकरांच्या विचाराला पाठबळ डॉ. पंजाबरावांनी दिले. ''डॉ. आंबेडकर बॅरिस्टर होऊन आले तेव्हा पंजाबराव देशमुख दलित पीडित अनाथ लोकांना उद्देशून म्हणतात, आता तुमचा पुढारी आला.''[९३] पंजाबराव व उत्तमराव समविचारी होते. उत्तमरावांच्या अनेक बाबी पंजाबराव मान्य करत. यामुळे पंजाबरावांच्या माध्यमातून उत्तमराव मोहिते आंबेडकरांच्या जवळ होते असे म्हणता येईल.

राजकारणाच्या दृष्टीने विचार करता उत्तमराव मोहिते काँग्रेस पक्षाचे समर्थक असून डॉ. आंबेडकरांना काँग्रेस पक्षाची विचारधारा पटत नसे. उत्तमराव मोहिते गांधीवादी असल्याने जरी सामाजिक, सांस्कृतिक बाबतीत उत्तमराव व आंबेडकर समविचारी असले तरी राजकीय बाबतीत त्यांची जवळीकता नव्हती. इ.स. १९५२ सालच्या निवडणुका महिन्यावर आल्या असताना पी.के. देशमुख उत्तमरावांना

---

९३. *मोहिते मैनाबाई यांची मुलाखत, दि. २९ जून २०१०.*

म्हणतात, ''डॉ. आंबेडकरांना भेटलो ते म्हणाले, पंजाबराव देशमुखांचे राजकारण महानंदे सारखे आहे. उत्तमरावांना आंबेडकरांविषयी राग आला नाही किंवा त्यांनी आंबेडकरांविरुद्ध उलट प्रतिक्रिया दिली नाही. गांजलेल्या समाजासाठी महानंदेची नीती महत्त्वाची.''[९४] उत्तमराव मोहित्यांना आंबेडकरांच्या कार्यावर पूर्ण विश्वास व सहानुभूती होती असे म्हणता येईल.

''डॉ. आंबेडकरांनी दि. २५ डिसें. १९२७ रोजी मनु:स्मृतीचे दहन केले.''[९५] ''आंबेडकरांच्या या कृतीची पुढील पायरी म्हणून उत्तमराव मोहिते मी दासबोध जाळणार आहे असे सांगतात.''[९६] यावरून वीर उत्तमराव मोहिते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अधुरे स्वप्न साकार करण्यासाठी अन्यायी व्यक्तीला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करताना दिसतात. म्हणून उत्तमरावांना आंबेडकरांचे अनुयायी म्हटले तर वावगे ठरत नाही.

२.८.८ डॉ. पंजाबराव देशमुख यांना काँग्रेस पक्षात उत्तमरावांनी आणले

उत्तमराव मोहिते आणि पंजाबराव देशमुख यांचा घनिष्ठ संबंध होता. उत्तमरावांना पंजाबरावांचा आधार होता तर पंजाबराव उत्तमरावांवर विश्वास ठेवून होते. त्यांच्या अनेक कामात उत्तमराव सहभागी असायचे त्यांनी उत्तमरावास मानसपुत्र म्हणून संबोधले आणि स्वत:चे मुलाचे नाव अनंतकुमार तर उत्तमरावांना अनिलकुमार हे नाव दिले. ''उत्तमराव मोहिते डॉ. पंजाबराव देशमुखांचे मुखपत्र होते.''[९७] यावरून त्यांचे संबंध किती घनिष्ठ होते याची कल्पना येते. डॉ. पंजाबराव देशमुख इंग्लंडमधले आपले शिक्षण संपवून अमरावतीत आले तेव्हा ''काँग्रेस व राष्ट्रीय पक्ष एका बाजूला तर ब्राह्मणेत्तर पक्ष दुसऱ्या बाजूला होता. नानासाहेब अमृतकर यांनी त्यांना ब्राह्मणेत्तर पक्षात आणण्याचा प्रयत्न केला पण त्यांना यश आले नाही. डॉ. पंजाबरावांनी स्वत:चा

---

९४. *मोहिते वीर उत्तमराव, पूर्वोक्त, पृष्ठ – ३७२.*

९५. *लोखंडे हि.गो., डॉ. आंबेडकरी सत्याग्रह, पृष्ठ – १५.*

९६. *मोहिते वीर उत्तमराव, पूर्वोक्त, पृष्ठ – २४९.*

९७. *मोहड सुधाकर, विदर्भाचा अग्नीपुरुष स्वातंत्र्यसंग्राम सेनानी वीर उत्तमराव मोहिते, पृष्ठ – १४.*

'शेतकरी संघ' पक्ष स्थापन केला. याचा अर्थ ब्राह्मणेत्तर पक्षाशी त्यांचे जुळले नाही असा नव्हे तर ब्राह्मणेत्तर पक्षाशी त्यांचे मैत्रीपूर्ण संबंध होते. त्यांना शेतकऱ्याच्या उन्नतीत सर्व उन्नती होईल अशी अपेक्षा वाटत होती.''[९८] उत्तमराव मोहिते व्यक्तिगत सत्याग्रहात एक वर्षाची शिक्षा भोगत असताना डॉ. पंजाबराव देशमुख यांनी भेट घेतली. या भेटीचा गाजावाजा नागपूरच्या जेलमध्ये कैद्यामध्ये झाला. कारण पंजाबरावांची आता चांगला माणूस म्हणून ओळख झाली होती.

विदर्भ प्रांतीक काँग्रेसचे जनरल सेक्रेटरी 'मारोतराव कन्नमवार' यांना 'क' वर्गच मिळाला होता आणि पंजाबराव देशमुख यांच्या बरोबर उत्तमरावांचे असणारे संबंध माहित होते. कन्नमवार म्हणतात, ''उत्तमराव या स्वातंत्र्याच्या आंदोलनात आपण श्रमजीवी समाजातील सत्याग्रही हजारात ९९९ आहोत. आपण सारे खेड्यांतून आलो. राजकारण आणि अनुशासन यात आपणाला खोलवर असा अनुभव नाही. कष्टकरी समाजाचे आपण काय भले करणार? काँग्रेसकडून मागासलेल्या दलित पीडित समाजाचे भले व्हावयाचे असेल तर डॉ. पंजाबराव देशमुखांसारख्या महापुरुषाने काँग्रेसमध्ये आल्याशिवाय पर्याय नाही.''[९९] पंढरीनाथ पाटलांना सुद्धा असेच वाटत होते. पण हे कार्य कोणी करावे असा प्रश्न होता. उत्तमराव मोहिते व पंढरीनाथ पाटलांनी तशी पत्रे देवासला पाठवली होती. म्हणजे पंजाबरावांना काँग्रेसमध्ये आणण्याचा प्रयत्न चालू होता.

इ.स. १९४५ साली सेंट्रल असेंब्लीची निवडणूक होणार होती. पंजाबराव देशमुख प्रिन्स ऑफ बेरार हॉस्टेलच्या नव्या इमारतीत शिवाजी शिक्षण संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या सभेत होते. उत्तमराव मोहिते इमारती समोरून जात असताना ''पंजाबराव बाहेर आले व उत्तमरावांच्या खांद्यावर हात टाकून म्हणाले मला आता सेंट्रल असेंब्लीच्या निवडणुकीला उभे राहायचे आहे. यावर उत्तमराव म्हणतात मी पक्का काँग्रेसवाला आहे यावर पंजाबराव म्हणाले मी ही काँग्रेसवाला आहे ही बातमी

९८. *रिंढे नितीन, पूर्वोक्त, पृष्ठ – ४८, ४९, ५६.*

९९. *मोहिते वीर उत्तमराव, पूर्वोक्त, पृष्ठ २८२.*

दुसऱ्या दिवशी 'उदय' मध्ये प्रसिद्ध झाली''[१००] आणि सर्व कामाला लागले. उत्तमराव मोहिते चिखलीला जाऊन पंढरीनाथ पाटलांना भेटले आणि हकीकत सांगितली. पंढरीनाथ पाटील म्हणतात, ''गड्या लग्न ठरलं, नवरदेव मांडव टाकून तयार झाला आता ऐनवेळी हा दुसराच नवरदेव येवून थाटला. आता कसं करायचं? पण या नवरदेवाची जुळवा जुळव तुझ्या माझ्या शिवाय होणार नाही.''[१०१] यावरून पंजाबरावांनी होकार देण्यास विलंब केला होता आणि उमेदवार म्हणून दादासाहेब गोळे यांना विदर्भ प्रांतीक काँग्रेस कमिटीने मध्यवर्ती असेंब्लीच्या निवडणुकीसाठी निश्चित केले.

पंढरीनाथ पाटलांशी सल्लामसलत करून उत्तमराव अकोल्यास पुढे आले. मागून पंढरीनाथ पाटील येणार होते. एक दिवस वाट पाहून उत्तमराव ब्रिजलाल बियाणींची भेट घेतली व उद्देश सांगितला. बियाणी म्हणतात, ''मी डॉ. पंजाबराव देशमुखांचा चाहता आहे. त्यांनी भूमीपुत्रांसाठी खूप काम केले. यापूर्वी मी दोनदा प्रयत्न केला. डॉ. पंजाबरावांचे नाव काढले तर सर्व थोवळ्या शक्ती माझ्यावर हल्ला करतील. पण जावू दे ह्या गोष्टी निरोपा निरोपी होत नाहीत.''[१०२]

उत्तमराव मोहिते यांनी ब्रिजलाल बियाणींशी चर्चा केली पण या चर्चेत काही निश्चित उत्तर मिळाले नाही. ब्रिजलाल यांना पंजाबरावांनी स्वत: येऊन भेटावे असे वाटत असावे. मोहित्यांचा प्रयत्न सफल झाला नसला तरी काँग्रेसमध्ये डॉ. पंजाबराव आल्याने वऱ्हाडचा कसा विकास साधता येईल ही बाब समोर ठेवून पंजाबरावांचे मन काँग्रेसकडे वळवले आणि शेवटी पंजाबरावांना काँग्रेसमध्ये आणण्याचा विचार सफल झाला. गोळे या काँग्रेस पक्षाच्या उमेदवाराच्या विरोधात पंजाबरावांनी बी.एम. देशमुख यांची उमेदवारी मागे घेतली आणि बियाणी देशमुख वाटाघाटभ झाल्या.

यावरून असे म्हणता येईल की, डॉ. पंजाबराव देशमुख शेतकरी संघामार्फत

---

१००. कित्ता, पृष्ठ – २८५.

१०१. कित्ता, पृष्ठ – २८६.

१०२. किता, पष्ठ – १.

राजकारण करत असताना अनेकांनी काँग्रेस मध्ये येण्याची शिफासरस केली पण पंजाबराव देशमुख यांनी काँग्रेस प्रवेश केला नाही. मात्र उत्तमरावांशी चर्चा करून त्यांच्या मार्फत काँग्रेस मध्ये पंजाबराव देशमुख आले व काँग्रेस पक्षात शेतकरी संघ विलीन केला. यात उत्तमराव मोहित्यांची भूमिका महत्त्वाची ठरली असे म्हणता येईल.

एकंदरीत डॉ. पंजाबराव देशमुख यांचा सल्ला म्हणजे उर्जा मानून कार्य करणाऱ्या आणि साधा शिक्षक असणाऱ्या उत्तमराव मोहिते यांची विचारसरणी पक्व असल्याचे दिसते. डॉ. पंजाबराव देशमुख यांनी वीर मोहिते यांचा सल्ला मान्य करून काँग्रेस प्रवेश करण्याची इच्छा त्यांच्याकडे प्रकट केली व मोहिते यांनी त्यांच्यासाठी काँग्रेस पक्षात योग्य वातावरण निर्माण केले. यावरून उत्तमराव मोहिते व डॉ. पंजाबराव देशमुख यांची वैचारिक जवळीकता सहज समजते.

२.८.९ संदेश साप्ताहिक व उत्तमराव

उत्तमराव मोहिते यांना चांगले माहित होते की, ज्याच्या जवळ वर्तमानपत्र नाही साप्ताहिक नाही त्याच्या कार्याची माहिती जनतेला होत नाही. पंजाबराव देशमुख यांना या बाबींची कल्पना होती आणि उत्तमराव मोहिते यांच्यासारखी माणसे जवळ असल्याने एखादे वर्तमानपत्र किंवा साप्ताहिक काढले तर काळजी राहणार नव्हती. ''दि. ०१ ऑक्टो. १९४७ रोजी डॉ. पंजाबराव देशमुखांनी अमरावतीला 'संदेश' नावाचे साप्ताहिक सुरु केले. मध्य प्रांत, वऱ्हाड चे राज्यपाल मंगलदास पक्कासा यांच्या हस्ते संदेशच्या शेकडोप्रती शिवाजी महाविद्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी वाटल्या. 'संदेश' साप्ताहिकाला नाव अच्युत बळवंत कोल्हटकर यांच्या स्मृती प्रित्यर्थ डॉ. पंजाबरावांनी 'संदेश' हे आवडीचे नाव दिले. थातरवाड्याचे विष्णुपंत माणिकराव देशमुख संदेशचे संपादक होते. वीर उत्तमराव मोहिते, ॲड. रंगनाथ चौवळ, ठाणेकर, एन.सी. देशमुख, प्रा. शेंडे हे संपादक मंडळात होते.''[१०३] ''वीर उत्तमराव मोहिते यांनी सौ.वनमाला आणि अनिलकुमार या टोपननावाने लेख लिहिले. 'महात्मा गांधी

---

१०३. कित्ता, पृष्ठ – २९५.

वैकुंठाला गेले आता तरी डोळे उघडा', 'बा महाराष्ट्रा आता प्रायश्चिताचे ढोंग कशाला', 'डॉ. पंजाबराव देशमुखांच्या मोटारला ब्रेक नाही, हिंमत असेल तर बसा.', दुखते कुठं अण सांगते कुठं''[१०४] अशी अनेक लेख लिहून उत्तमराव मोहिते यांनी आपली प्रभावी शैली वापरल्याचे दिसते. स्वत: लेख लिहण्याबरोबरच अनेक लेख उत्तमरावांकडे येत असत. ''दि. २७/०५/१९४९ रोजी पंजाबरावांसोबत उत्तमराव लग्नास गेले हे यवतमाळ जिल्ह्यातील किनी चांहांदचे नथ्थूजी जावदे यांच्या कन्येचे लग्न होते. येथे नारायण पाटलांनी उत्तमरावांकडे निवेदन प्रकाशित करण्यासाठी दिले.''[१०५] यावरून उत्तमराव मोहिते संदेशच्या कार्यात सक्रिय होते. फक्त नावाला नसून व्यवस्थित कार्य करणार असल्याचे दिसतात.

२.८.१० एक वारकरी – उत्तमराव मोहिते

उत्तमराव मोहिते यांनी जसा स्वातंत्र्य युद्धात सक्रिय भाग घेतला. तसाच सामाजिक व धार्मिक वाबतीतही उत्तमराव क्रियाशील असल्याचे दिसतात. त्यांना धार्मिक व सामाजिक बाबतीत बदलाची अपेक्षा आहे. म्हणून उत्तमराव म्हणतात,

''वारकरी झालो आता। नाही जात पात मला
नाही टिळा कपाळाला। नाही तुळशीची माळा''[१०६]

यावरून उत्तमराव मोहिते यांचा वारकरी पंथाविषयी काय विचार होता हे समजते. जो जातीयतेच्या कक्षा ओलांडून सर्व समान आहेत मानवतावादी कसलाही भेदा–भेद नाही. असा वारकरी झालो असे उत्तमरावांना सांगावयाचे आहे. केवळ तुळशीची माळ आणि कपाळाला टिळा लावल्याने वारकरी होत नाही. उलट माळ आणि टिळा नसताना विचाराने आणि कार्य कर्तव्याने वारकरी होता येते. असा कार्य कर्तव्य व विचारांचा मी वारकरी आहे हे सुचवायचे असल्याचे दिसते आणि वारकरी यांना खऱ्या अर्थाची ओळख देण्याचे प्रयत्न करतात.

---

१०४. कित्ता, पृष्ठ – २९६.

१०५. कित्ता, पृष्ठ – ३१३.

१०६. मोहिते वीर उत्तमराव, जीवनगाथा, पृष्ठ – २.

डॉ. पंजाबराव देशमुख हीरक महोत्सव दि. २७/१२/१९६० रोजी मराठा विज्ञान मंदिराने घेतला यात भाषण करताना पंजाबराव देशमुख म्हणतात, ''वारकरी संतांना समाज कार्याला जुंपण्याचे उत्तमरावांचे प्रयत्न ही चालू आहेत.''[१०७] उत्तमराव मोहिते म्हणतात, ''वारकरी संप्रदायाच्या उठावात बहुजन समाजाच्या समाज क्रांतीची बीजे होती. वारकरी हरी किर्तनात रामदासी ओवीचे वारकरी अंभगाचा आधार देऊ नये असा कडक निर्बंध होता.''[१०८] यावरून वारकरी व रामदासी यांची भिन्न विचारसरणी असल्याचे दिसते. म्हणजे वारकरी ही बहुजनांच्या हिताची सुधारणावादी विचारधारा असून रामदासी ही उच्च वर्गाच्या आणि पारंपरिक विचारांचा ठेवा असल्याचे दिसते. म्हणून उत्तमराव नव्या विचारांना पाईक राहून वारकरी झाल्याचे सांगतात असे म्हणावे लागेल.

वारकरी संप्रदायात जातीभेदाला स्थान नव्हते. सर्व जातींच्या बांधवांना एकत्र येऊन समानतेच्या तत्त्वावर भेदमुक्त जीवनाचा संदेश पांडुरंगास केंद्रस्थानी मानून रुजला त्यांची आठवण देण्याची गरज उत्तमरावांना वाटते म्हणून उत्तमराव म्हणतात,

''धर्मगुरू धनवंत सोडूनी सोयरे।
शेतकरी कामकरी पांडुरंग सारे।।
माळी वारी कोष्टी तेली कुणबी महार।
धनगर कोणी वाणी पारधी चांभार।।
कसाब खाटिक धोबी गवळी मराठे।
सुतार कुंभार मांग म्हाली गोंड वाटे।।
ग्रामवासी खेडूत हे शूद्र कृष्णरंग।
जात धर्म नाही मला एक पांडुरंग।।''[१०९]

यावरून असे म्हणता येईल की, वारकरी या संज्ञेत पंढरपूर या प्रमुख ठिकाणी

---

१०७. *कित्ता, पृष्ठ – २४५.*

१०८. *कित्ता, पृष्ठ – २४५.*

१०९. *कित्ता, पृष्ठ – १०.*

पांडुरंगाला केंद्रस्थानी मानून तत्कालीन समाजजीवनातील बदल अपेक्षित होता. वेदान्ताविरुद्ध पंढरपूर पेटले आणि संतांनी भौतिक पांडुरंग व सगुण यावर वारकऱ्यांची विचारधारा होती यासाठीच उत्तमराव म्हणतात,

''तुकोबाने केले बाई गे नवल।
सगुणाचे मोल सिद्ध केले।।
पंडितांनी केले भारीच पाखंड।
नका बणू षंढ लंबकर्ण।।
उत्तम म्हणतो पडला रे खंड।
पुन्हा करू बंड ज्ञानासाठी।।''[११०]

एकंदरीत उत्तमराव मोहिते वारकरी संप्रदाय बहुजन समाजाच्या हितासाठी झगडला असून मानवतेला काळीमा फासणाऱ्या जाती व्यवस्थेविरूद्ध लढा दिला व समता निर्मितीचा प्रयत्न केला. पण तुकाराम महाराजांनंतर बहुजन समाजाला योग्य मार्गदर्शन करण्यासाठी खंड पडला आहे. संतांच्या मूळ भूमिका महत्त्वाची होती असे सांगून आता ज्ञान मिळवण्यासाठी बंड केले पाहिजे. पारंपरिक विचार झुगारून नवे ज्ञान मिळवावे असा उपदेश करतात.

वारकरी ही सुधारणावादी चळवळ असून वैदिकधर्माच्या अन्यायी कायद्याविरूध्द उभारलेला लढा असून चातुवर्ण्य व्यवस्था मानवीय नसून मानवतेची हानी करणारी असल्याने वारकऱ्यांनी वर्णव्यवस्था अमान्य करून मानवतेचा विकास घडवून आणला. यात दैवी, चमत्कार असे काही नसून वारकरी भौतिकवादी होता व एकत्र येण्याचे एक ठिकाण म्हणून पंढरपूर केंद्र बनवले असे प्रतिपादन मोहिते करतात. तेव्हा आजचा वारकरी यांना उत्तमरावांची वारकऱ्यांनी भूमिका महत्त्वाची ठरते.

२.८.११ संयुक्त महाराष्ट्र चळवळ व उत्तमराव मोहीते

भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि इंग्रज भारत सोडून गेले म्हणजे अचानक

---

११०. *कित्ता, पृष्ठ – २.*

भारत पुर्णपणे बदलला होता, असे झाले नाही तर, यासाठी सतत परिश्रम घ्यावे लागले. यात अनेकांना त्रास सहन करावा लागला. भारतासमोर विविध प्रश्न तीव्रतेने उफाळत होते तर त्याची सोडवणूक एक समस्या बनत होती. अंतर्गत व्यवस्थापन करणे महत्त्वाचे होते. ब्रिटिशांनी भारत काबीज करताना प्रमुख केंद्रे निर्माण केली. नंतर जिंकलेला भाग या केंद्रांना जोडण्यात आला. या केंद्रांना नॉर्थ प्रॉव्हिन्स, सेंट्रल प्रॉव्हिन्स, बॉम्बे प्रॉव्हिन्स अशी नावे असून मराठीत त्यांना 'इलाखा' म्हणत. इतर भागांचा उल्लेख उत्तर प्रांत, मध्य प्रांत असा केला जात असे. मुंबई इलाखा तर उत्तरेला सिंध प्रांतापासून दक्षिणेला धारवाड पर्यंत पसरलेला होता आणि या प्रदेशातील संस्थाने स्वतंत्र होती. यामुळे हे मोठ–मोठे प्रदेश वेगळे करून छोटे–छोटे राज्य निर्माण करणे आवश्यक होते.

''काँग्रेसने १९१२ साली सिंध भाषिकांचा प्रदेश वेगळा काढून त्याचे एक स्वतंत्र राज्य बनवावे तसेच मुंबई प्रांतापासून तेलंगणा वेगळे करून त्यांचे राज्य निर्माण करावे असे सूचवले पण चर्चा झाली नाही. इ.स. १९२० मध्ये नागपूर अधिवेशनात पुन्हा भाषावार प्रांत रचनेचा मुद्दा चर्चेला आला.''[१११] पण इंग्रजांना यात रस नसल्याचे दिसले. ''बेळगाव साहित्य संमेलनामुळे १८ जुलै १९४६ मध्ये मुंबईत महाराष्ट्र एकीकरण परिषद भरली. भारतातील सर्व मराठी भाषिक प्रदेशाचे एक राज्य निर्माण करण्याचे ध्येय निश्चित झाले. त्यानुसार शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखाली 'संयुक्त मराहाष्ट्र परिषद' ही सर्वपक्षीय संघटना स्थापन झाली.''[११२]

''विदर्भामध्ये महाविदर्भवादी आणि संयुक्त महाराष्ट्रवादी अशी फूट पडली तर बियाणी खेडकर व कन्नमवार यांनी स्वतंत्र महाविदर्भ परिषदेचे अधिवेशन आयोजित केले. यामुळे संयुक्त महाराष्ट्राचे पुरस्कर्ते पूनमचंद रंका, पंजाबराव देशमुख, आचार्य दादा धर्माधिकारी वगैरे यांनी वेगळी सभा भरवली. झाला तर 'संयुक्त महाराष्ट्रच

---

१११. साने रविकिरण, लढा संयुक्त महाराष्ट्राचा, पृष्ठ – ३०

११२. कित्ता, पृष्ठ – ३७.

व्हावा' असे 'दार' आयोगास सूचवले. १३ डिसेंबर १९४८ ला दार आयोगाने आपला ५६ पानी अहवाल सादर केला.हा अहवाल म्हणजे शुद्ध फसवणूक होती.''[११३]

संयुक्त महाराष्ट्र वाद्यांचा प्रश्न भेडसावत होता. चळवळीची आवश्यकता होती. काँग्रेस नेत्यांनी दार आयोगाच्या अहवालावर कडाडून टीका केली. १५ डिसें. १९४८ रोजी अ.भा. काँग्रेसचे अधिवेशन भरले. या अधिवेशनाचे अध्यक्ष पट्टाभी सीतारामय्या होते. सीतारामय्या, जवाहरलाल नेहरू आणि वल्लभभाई पटेल यांची समिती नेमली ती 'जवप' समिती म्हणून ओळखली जाते. ''नुसता वायदा करायचा; पण प्रत्यक्षात काहीही द्यायचे नाही हे काँग्रेसश्रेष्ठीचे धोरण असल्याचे समितीच्या अहवालावरून स्पष्ट झाले.''[११४]

विदर्भामध्ये ब्रिजलाल बियाणी व पंजाबराव देशमुख यांचे गट निर्माण झाले. यावेळी ''उत्तमराव मोहित्यांनी संयुक्त महाराष्ट्राचा विचार विदर्भात रुजवला. ब्रिजलाल बियाणी, डॉ. आबासाहेब खेडकर हे काँग्रेसमधील नेते स्वतंत्र विदर्भाचा पुरस्कार करत होते तर पंजाबराव देशमुख हिरीरिने संयुक्त महाराष्ट्राचा पुरस्कार करत होते आणि त्यांच्या विचाराला साथ देणारे लेखन वीर उत्तमराव करत होते. विदर्भात संयुक्त महाराष्ट्राचा बुलंद नारा 'संदेश' मधून उत्तमराव देत होते.''[११५] यावरून उत्तमराव मोहिते यांनी संयुक्त महाराष्ट्र घडवा यासाठी प्रयत्न केल्याचे दिसतात.

उत्तमराव मोहिते यांचा संयुक्त महाराष्ट्र निर्मितीचा प्रयत्न चालूच होता. 'तरुण भारत' चे संपादक श्री ग.त्र्यं. माडखोलकर म्हणतात, ''अमरावतीच्या मराठा विज्ञान मंदिरातील कार्यक्रम संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती आता अटळच आहे''[११६] या विधानावरून मराठा विज्ञान मंदिर संयुक्त महाराष्ट्राचा पुरस्कार करून त्यासाठी लागणाऱ्या जनआंदोलनासाठी मनोभूमिका तयार करत होते असे म्हटले तर वावगे ठरत नाही.

---

११३. *कित्ता, पृष्ठ – ४४, ४५.*

११४. *कित्ता, पृष्ठ – ४८.*

११५. *खेडेकर पुरुषोत्तम (संपा.), मराठा मार्ग (मासिक), जून १९९६.*

११६. ***Mohite Veer Uttamrao, Cultural Renaissance, page 19.***

मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी शंकरराव देवांनी आमरण उपोषण सुरू केले. शंकरराव देव पाटावर बसून ताटातील कडीचे फुरके मारताना काढलेले छायाचित्र टाईम्स ऑफ इंडियाच्या अंकात छापून आले. शंकरराव देवांचे नेतृत्व विश्वासार्ह नाही याची खात्री महाराष्ट्रातील बहुजन समाजाला होती म्हणूनच केशवराव जेधे पुण्याच्या जाहीर सभेत म्हणतात, ''अरे शंकर देव कसला आमरण उपोषण करतो? त्यांचा उपवास केळी खावून चालू राहील.'' आणि घडले ही तसेच मुंबई सह द्विभाषिकांचा ना मोरारजी देशाईंशी करार होऊन शंकरराव देवांचा पाच दिवसाचा आमरण उपवास संपला 'मराठी गुजराथी द्विभाषिक मुंबई राज्य' १९५६ साली बहुजनांच्या गळ्यात पडले. यावरून जे साध्य होते ते न होता द्विभाषिक राज्य निर्माण झाले. हा संयुक्त महाराष्ट्राचा लढा एकाकी असून संधीसाधू पणाचा असल्याचे दिसून येते.

संयुक्त महाराष्ट्राचा खरा लढा येथूनच सुरु झाला असे उत्तमराव मोहिते म्हणतात, ''क्रांतिसिंह नाना पाटील, केशवराव जेधे, शंकरराव मोरे, पंजाबराव देशमुख, गोपाळराव खेडकर, तुळशीदास जाधव, भाऊसाहेब महागावकर, कृष्णराव घुलूप, भाई माधवराव बागल, दादासाहेब जगताप, उद्धवराव पाटील, केशवराव धोंडगे, पंढरीनाथ पाटील, के.आर. पाटील, देवराव वाघ, बाबुराव भोसले, दाजीबा देसाई, सुदाम देशमुख, पी.के. देशमुख इ. पुढाऱ्यांनी संयुक्त महाराष्ट्रासाठी उग्र लढा दिला.''[११८] यामध्ये विदर्भात पंजाबराव देशमुख प्रमुख असून प्रामुख्याने लढा देत होते तर उत्तमराव मोहिते व पंजाबराव देशमुख यांचे वैचारिक जवळीकता होती आणि प्रा. सुधाकर मोहड म्हणतात, ''उत्तमराव मोहिते पंजाबरावांचे 'मुखपत्र' आहे''[११९] यावरून संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच्या कार्यात आणि वेगळा विदर्भ निर्माण न करता आजचा महाराष्ट्र उभा करण्यात उत्तमराव मोहित्यांचे योगदान आहे असे म्हणावे लागेल.

---

११७. *मोहिते वीर उत्तमराव, जागतिक कृषक क्रांतीचा विधाता लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख, पृष्ठ – ३९४.*

११८. *कित्ता, पृष्ठ – ३९४.*

११९. *मोहड सुधाकर, विदर्भाचा अग्नीपुरूष स्वातंत्र्यसंग्राम सेनानी वीर उत्तमराव मोहिते, पृष्ठ – १४.*

उत्तमराव मोहिते यांनी संयुक्त महाराष्ट्रासंदर्भात आपल्या जागतिक कृषक क्रांतीचा विधाता लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख या ग्रंथात दिली आहे. ही माहिती देत असताना 'उत्तमराव मोहिते' आपल्या विरोधी विचारधारा असणाऱ्या पण संयुक्त महाराष्ट्रासाठी कार्य करणाऱ्या आचार्य अत्रे, जयवंतराव टिळक, यांनी मराठी बहुजन समाजाला साथ दिल्याचे सांगतात. यावरून त्यांच्या लिखानात वस्तुनिष्ठपणा असून लिखाण सत्य व ग्राह्य मानले तर चूक होणार नाही असे वाटते. पुढे ते म्हणतात, ''यशवंतराव चव्हाणांनी काँग्रेस अध्यक्षा श्रीमती इंदिरा गांधींना मुंबई सह संयुक्त महाराष्ट्र द्विभाषिक मुंबई राज्यापासून विभक्त करण्याची विनंती केली व इंदिरा गांधींनी पंडीत नेहरूंचे मन वळवले. नेहरू, अबुल कलाम आझाद आणि गोविंद वल्लभ पंत हे तिघेच भाषावार राज्य पुनर्रचना निर्मितीचे सर्वश्रेष्ठ अधिकारी होते. पंडीत नेहरूंनी गुजरातचे विभक्त राज्य व मुंबईसह महाराष्ट्र राज्य निर्मितीची घोषणा केली आणि १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली.''[१२०] उत्तमराव मोहिते दि. १०/०९/ १९६० रोजी यशवंतराव चव्हाण यांना निवेदन पाठवतात त्यात ते म्हणतात, ''माझे निवेदन संपूर्ण वाचावे, मला आश्चर्य वाटते की, माझी कल्पना आपणास कशी काय आवडली. आपली जरी प्रत्यक्ष भेट झाली नसली तरी मी आपल्या हालचाली १९४२ पासून पाहात आहे. तुमच्या संयुक्त महाराष्ट्रातील सहभागाने मी प्रभावित झालो आहे. त्यामुळे तुम्ही आमचे आदर्श ठरलात. लोकनेता नेहमी लोकांच्या मनातील भावना बोलत असतो. तुम्ही जे बोललात आणि कृती केलीत यामुळे तुम्ही मराठ्यांचे नेता ठरतात. ..... श्री हीरे आणि तुमच्या मध्ये झालेला करार माहित आहे यावरून 'मी' असा निष्कर्ष काढला की खरेच तुम्ही 'पायदळी तुडवलेल्या समाजाचे नायक आहात' आणि म्हणून हे निवेदन आपणास पाठवत आहे. मी अशी इच्छा व्यक्त करतो की, संयुक्त महाराष्ट्रात तुम्हाला सर्व प्रतिनिधी मनाने सहकार्य करत आहेत. आमची ताकद व सामर्थ्य तुमच्या पाठीशी आहे.''[१२१]

---

१२०. मोहिते वीर उत्तमराव, पूर्वोक्त, पृष्ठ – ३९५.

१२१. मोहिते वीर उत्तमराव यांचे यशवंतराव चव्हाण यांना पत्र, दि. १० सप्टेंबर १९६०.

एकंदरीत उत्तमराव मोहिते यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीमध्ये मनापासून रस घेतला आणि आपल्या परीने होता होईल तेवढा प्रयत्न केला. पंजाबराव देशमुखांचे कार्य करण्याबरोबर पंजाबरावाला सल्ला ही उत्तमराव देत असल्याने त्यांच्या कार्यात आपले कार्य म्हणून उत्तमराव चालत असत. आपले लिखाण, भाषण व प्रत्यक्ष कार्य या माध्यमातून उत्तमरावांनी कार्य केले आणि या लढ्याची नोंद घेतली. यशवंतराव चव्हाण ज्यांना महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री होण्याची संधी मिळाली. यांना उत्तमरावांचे विचार आवडतात यावरून उत्तमराव मोहित्यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीत महाराष्ट्राच्या व महाराष्ट्रीयनांच्या हीताचा विचार केला असे म्हणता येईल.

२.८.१२ विदर्भातील कृषी विद्यापीठ आंदोलन व उत्तमराव मोहिते

डॉ. पंजाबराव देशमुख यांनी चांगले ओळखले होते की, शेतकरी कष्टकरी समाजाच्या विकासाशिवाय देशाचा विकास होणार नाही. ''यासाठी त्यांनी तसे प्रयत्न ही केल्याचे दिसते. दि. १५ व १६ जुलै १९५४ रोजी कृषकांचा मेळावा भरविला'' तर ''२७ जून १९५९ दिल्लीत मथुरा रोडला लागून असलेल्या विस्तीर्ण मैदानावर भारत कृषक समाजाने एक भव्य समारंभ आयोजित केला.''[१२२] तर १४ जाने. ते ११ मार्च १९६२ पर्यंत राष्ट्रीय कृषी प्रदर्शिनीचे दुसरे अधिवेशन मद्रासला झाले. ''इ.स. १९४८ साली डॉ. पंजाबराव अमेरिकेत गेले. अमेरिकन लँड ग्रँट कॉलेज सिस्टिमप्रमाणे चालणाऱ्या कृषी विद्यापीठाने त्यांचे लक्ष आकर्षित केले. अशा प्रकारची कृषी विद्यापीठे भारतात चालवण्यासाठी त्यांनी प्रयत्न सुरू केले.''[१२३] आणि कृषी विद्यापीठाच्या संशोधनात व उत्पादन वाढीसाठी शासनाच्या दृष्टीने एक जिनशीपणा यावा म्हणून आय.सी.ए.आर. ने लँड ग्रँट कॉलेज सिस्टिमबद्दल एक कायदा तयार केला आणि प्रत्येक राज्याला एक कृषी विद्यापीठ देण्यात यावे अशी शिफारस करण्यात आली. डॉ. पंजाबराव देशमुख यांनी आणलेले कृषी महाविद्यालय बियाणीने

---

१२२. *मोहिते वीर उत्तमराव , जागतिक कृषक क्रांतीचा विधाता लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख, पृष्ठ – ४२३.*

१२३. *कित्ता, पृष्ठ – ४१, २, ४१८, ४२९, ४५२, ४५३.*

अकोल्यास नेले म्हणून शिवाजी शिक्षण संस्थेतर्फे अमरावतीला खाजगी संस्थेचे पहिले महाविद्यालय उभे केले.

''इ.स. १९६० साली घाटगे समितीने महाराष्ट्रास तूर्त कृषी विद्यापीठाची गरज नाही असा अहवाल दिला. डॉ. पंजाबराव देशमुखांना विदर्भातील लोक कृषी विद्यापीठाचा जनक त्यांच्या कृषी विषयक दीर्घ उद्योगामुळे मानतात. इस. १९६५ च्या १० एप्रिलला पंजाबरावांचे निधन झाले.''[१२४] आणि त्यांचे स्वप्न अपूर्ण राहिले.

या पंजाबरावांच्या कार्याचा उत्तमराव मोहिते यांना चांगलाच परिचय होता. उत्तमराव व पंजाबराव यांनी अशा विषयी चर्चा ही केली असावी व कार्य ही. कारण पंजाबराव देशमुखांसोबत उत्तमराव बहुतेक वेळी असायचे एवढेच नव्हे तर ते 'पंजाबरावांचे मुखपत्र होते' पंजाबराव देशमुखांना निडर कॅडर हवे होते तसे उत्तमराव होते म्हणूनच असे ही म्हटले जाते ''उत्तमराव मोहिते पंजाबरावांचे दार्शनिक खड्ग हस्त तर दौलतराव गाळे ड्राफ्टिंग कॉम्प्युटर संबोधले जात.''[१२५] उत्तमरावांच्या अनेक वाईट प्रसंगात पंजाबरावांनी मदत केली आणि वैचारिक जवळीकता तसेच समसमान ध्येय होते. त्यामुळे पंजाबराव व विदर्भातील समाज याबाबत उत्तमराव जागृत होते आणि पंजाबरावांच्या मृत्यूनंतर सहा महिन्यातच रिपोर्ट बाहेर आला १२ ऑक्टो. १९६६ मध्ये कॅबीनेट समोर ठेवण्यात आला. डॉ. पंजाबरावंनी अमरावती हे ठिकाण निश्चित केले असताना २ जुलै १९६८ रोजी राहुरीचा निर्णय जाहीर झाला.

अमरावतीमध्ये असणारे उत्तमराव मोहिते या सर्व गोष्टींकडे डोळेझाक करून गप्प बसणारे नव्हते. विदर्भातील राजकीय पुढाऱ्यांना काय करावे समजत नसताना ''अमरावतीच्या तीन वेडे पीर आणि नागरपूरचा एक या तीन वेडे पीरांनी संग्रामाचा निर्णय जाहीर केला व आंदोलनाची प्रखर ज्योत श्री. सुधाकर भुयार, देविदास कावरे व कांकाणी या छात्रांच्या हातात दिली व दि. १८ जुलै विदर्भ बंद दिन जाहीर झाला''[१२६]

---

१२४. *कित्ता, पृष्ठ – ४५४.*

१२५. *मोहड सुधाकर, डॉ. पंजाबराव देशमुखांच्या शिवकुटुंबाचा 'मालुसरा' दौलतराव उपाढ्य, दादासाहेब गोळे, पृष्ठ – १२.*

१२६. *मोहिते वीर उत्तमराव, राहुरीचा निर्णय विदर्भातील जनतेविरूद्ध एक भयंकर षडयंत्र, पृष्ठ – १०.*

व उत्तमराव मोहिते कृषी विद्यापीठ आंदोलनात पडले. ''प्रसिद्धीपराङ्मुखता हा त्यांचा स्वभाव असल्याने ते प्रसिद्धीच्या झोतात आले नाहीत''[१२७] पण उत्तमराव मोहिते ''विदर्भातील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या उग्र संघर्षात एक सेनानी होते.''[१२८] असे सुधाकर मोहड सांगतात. तर या आंदोलनात ''बापूराव बाजीराव विधाते, दादा रामचंद्र देशमुख, रामराव देवराव राऊत, दौलतराव गोळे यांनी सर्वस्व पणाला लावण्याचा निर्णय घेतला. दौलतराव गोळेंनी मुंबईपर्यंत जाऊन या निर्णयामागील खलनायकांच्या षंडयंत्राचा तपास केला. वास्तविक हेच कृषी विद्यापीठ आंदोलनाचे जनक होते.''[१२९]

यावरून उत्तमरावांची भूमिका स्पष्ट होते व त्यांच्या मित्रा करवे हे कार्य घडले. दौलतराव गोळे यांनी जास्तीचे कष्ट घेतले. दौलतराव गोळे सांगतात, ''या आंदोलनात मनाभावाने काम करणारांमध्ये वीर उत्तमराव मोहिते यांचे नाव प्रथम घेतात.''[१३०] हे आंदोलन प्रभावीपणे झाले. या आंदोलनात एकट्या अमरावती जिल्ह्यात पोलिसांच्या लाठीमार, अश्रुधूर, गोळीबारात ८ हुतात्मे झाले. यात पोलिसांनी निर्दयी लाठी हल्ला केला, गोळीबार केला. सरकारनेही याकडे डोळेझाक केल्याचे दिसते. शेवटी कृषी विद्यापीठ कोठे उभारायचे यावर विचार झाला आणि अमरावती ऐवजी अकोला हे ठिकाण कृषी विद्यापीठ स्थापन्यासाठी योग्य समजले व तशी सहानुभुती दिली. दौलतराव गोळे म्हणतात, आमची मनिषा अमरावतीला व्हावी अशी होती पण पंजाबराव काय एकट्या अमरावतीचे पुढारी नव्हते. विदर्भाचे तसेच राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय होते. म्हणून अमरावती ऐवजी अकोल्याला हे विद्यापीठ झाले असते तरी बरे राहील असते असे दौलतराव गोळे यांना वाटते, पण तसे झाले नाही. राहुरीच विद्यापीठ निश्चित झाले. याबाबतच्या दि. १६ सप्टेंबर १९६८ च्या राहुरी का या महाराष्ट्र सरकारने

---

१२७. *मोहिते वीर उत्तमराव, जागतिक कृषक क्रांतीचा विधाता लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख, प्रस्तावना, पृष्ठ – १६.*

१२८. *कित्ता, पृष्ठ – १६.*

१२९. *कित्ता, पृष्ठ – ४४९.*

१३०. *गोळे दौलतराव यांची हस्तलिखित अप्रकाशित डायरी, पृष्ठ – ८१.*

बारा पाणी चोपडे प्रसिध्द केले. याबाबत उत्तमराव मोहिते म्हणतात, ''या चोपड्यावरूनही राहुरीची गुणवत्ता सिध्द होत नाही. राहुरीच्या अन्याय निर्णयावर तरी मल्लीनाथी नसून सारवासारव आहे. राहुरीचा निर्णय न्याय आहे असे ठासून सांगण्याचे धाडस महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसलाही झाले नाही.''[१३१]

यावरून उत्तमराव मोहिते कृषी विद्यापीठ आंदोलनात संघटन करण्याबरोबर स्वत: सेनानी म्हणून लढले व या घटनेची समीक्षा करून विद्यापीठ राहुरीला नेण्याचे एक षडयंत्र होते. या षडयंत्रात निष्पाप अशा अमरावतीतील जनतेची बालकांची प्राणहानी झाली. असे स्पष्ट करून राजकारणी लोक व त्यांची मानसिकता स्पष्ट करण्याबरोबर ब्रिटिशांच्या अन्यायी राजवटी विरूध्द लढून देशाला स्वातंत्र्य मिळाले पण स्वकियांची समतूल्य दृष्टि अजून विकसित झाली नाही याचा परिचय देतात.

एकंदरीत उत्तमराव मोहिते सतत कार्यतत्पर दिसतात. त्यांनी या लढ्यात महत्त्वाची भूमिका घेतली. दौलतराव गोळेंना पुढे करून त्यांना मदत करून हे आंदोलन चालवले. स्वत: या आंदोलनापासून अलिप्त राहिले नाहीत तर एक सेनानी म्हणून कार्य केले. या आंदोलनासंदर्भात त्यांनी सरकारशी पत्रव्यवहार केला. यावरून त्यांची कार्यक्षमता दिसून येते. ''उत्तमराव मोहिते यांनी १५ ऑगस्ट १९६८ मध्ये यशवंतराव चव्हाणांना पत्र लिहिले.''[१३२] ''०७/०९/१९६८ मध्ये इंदिरा गांधी यांना''[१३३] तर ''०२/१०/१९६८ मध्ये Memorandum to the President of India New Delhi यांना पत्र लिहिले.''[१३४] या सर्व बाबींवरून त्यांची भूमिका स्पष्ट होते. उत्तमराव मोहिते हे एक कृषी विद्यापीठ आंदोलनात महत्त्वपूर्ण योगदान देणारे ठरतात.

२.८.१३ डॉ. पंजाबराव देशमुख वैज्ञानिक संस्कृती पीठ व उत्तमराव मोहिते

उत्तमराव मोहिते समाजाच्या, संस्कृतीच्या, देशाच्या सेवेसाठी सतत तत्पर असल्याचे दिसतात. त्यांनी अनेक माध्यमातून आपल्या मनातील कल्पना साकार

---

१३१. मोहिते वीर उत्तमराव, राहुरीचा निर्णय विदर्भातील जनतेविरूद्ध एक भयंकर षडयंत्र, पृष्ठ – १५.

१३२. मोहिते वीर उत्तमराव यांचे यशवंतराव चव्हाण यांना पत्र, दि. १५ ऑगस्ट १९६८.

१३३. मोहिते वीर उत्तमराव यांचे इंदिरा गांधी यांना पत्र, दि. ०७ सप्टेंबर १९६८.

१३४. मोहिते वीर उत्तमराव यांचे प्रेसिडेंटला पत्र, दि. ०२ ऑक्टोबर १९६८.

करण्याचा प्रयत्न केला. डॉ. पंजाबराव देशमुख यांनी राजश्री शाहू महाराजांच्या निधनानंतर सांस्कृतिक परिवर्तनाची संकल्पना विकसित केली. मराठा विज्ञान मंदीर त्याचाच भाग आहे. डॉ. पंजाबराव देशमुख यांचा चरित्रग्रंथ प्रकाशित करीत आहे. या ग्रंथासाठी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रावसाहेब इंगोले यांनी दहा हजार रुपये ॲडव्हॉन्स म्हणून दिले. याशिवाय कोणाचीही मदत मिळाली नाही. ''या क्रांतिकारक ग्रंथापासून आम्हांस जो निधी मिळेल त्याचा डॉ. पंजाबराव देशमुख प्रोसिडियम ऑफ कल्चरल ट्रस्ट स्थापन करण्याचे आम्ही ठरवले आहे. या ट्रस्ट मार्फत सांस्कृतिक क्रांतीचा प्रसार करण्याचे आम्ही ठरवले आहे असे वीर उत्तमराव मोहिते दि. ०१/०४/१९८३ रोजी सांगतात.''[१३५]

उत्तमराव मोहिते यांची ही संकल्पना पुढे १९८७ मध्ये साकार होताना दिसते. रूरल इन्स्टिट्युट सभाग्रह अमरावती येथे सोमवार दि. ०३ ऑगस्ट १९८७ रोजी सकाळी १० वाजता कार्यक्रम निश्चित झाला. याच दिवशी राजश्री शाहू जयंती उत्सव मराठा विज्ञान मंदिराच्या वतीने रूरल इन्स्टिट्युट सभाग्रहात साजरा झाला. याचवेळी ''डॉ. पंजाबराव देशमुख वैज्ञानिक संस्कृती पीठाचे औपचारिक उद्‌घाटन झाले.''[१३६] आणि ज्यांच्या प्रेरणेने हे पीठ उभा झाले त्या वीर उत्तमराव मोहिते यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्याचे शिक्षण मंत्री व जिल्ह्याचे पालक मंत्री माननीय प्रा. राम मेघे होते तर उद्‌घाटक विदर्भ संघटक, मुस्लीम सत्यशोधक समाज श्री. शेख वजीर पटेल तर अध्यक्ष म्हणून रावसाहेब इंगोले होते. वैज्ञानिक संस्कृती पीठाचे सचिव दौलतराव गोळे असून प्रमुख विनित प्रा.मा.म. देशमुख, भालचंद्र देशमुख, सौ. भाग्यरेखा देशमुख, एम.सी. शेख, मानवेंद्र देशमुख इ. होते.

यावरून उत्तमराव मोहिते यांच्या प्रेरणेतून व दौलतराव गोळे आणि शंकरराव

---

१३५. *मोहिते वीर उत्तमराव यांचे अप्रकाशित साहित्य (हस्तलिखित), पृष्ठ – ४.*

१३६. *गोळे दौलतराव(प्रेषक) सचिव डॉ. पंजाबराव देशमुख वैज्ञानिक संस्कृती पीठ, अमरावती कार्यक्रम पत्रिका.*

इंगोले यांच्या सहकार्याने निर्माण झालेले पंजाबराव देशमुख वैज्ञानिक संस्कृतीपीठ म. फुले, राजश्री शाहू यांना अपेक्षित असलेल्या सांस्कृतिक रचना करण्याचे कार्य हे पीठ करत असे.

दौलतराव गोळे म्हणतात, ''इ.स. १९८६ साली आम्ही मंडळींनी महात्मा फुले यांच्या सत्यशोधक समाजाचे पुनरूज्जीवन केले. अमरावतीच्या डॉ. पंजाबराव देशमुख वैज्ञानिक संस्कृती पीठ या संस्थेच्या घटनेनुसार सत्यशोधक समाजाला अभिप्रेत असलेले कार्य सुरू केले. अर्थातच आमचे मूळ प्रवर्तक वीर उत्तमराव मोहिते होते.''[१३७]

''अ.म. जमादार यांनी डॉ. पंजाबराव देशमुख वैज्ञानिक संस्कृती पीठ अमरावती येथे पत्रव्यवहार करून उत्तमराव मोहिते यांना पीठाच्या माध्यमातून निर्माण साहित्याची यादी द्यावी''[१३८] असे म्हणतात. तर ''दौलतराव गोळे अ.भा. सत्यशोधक समाजाच्या विदर्भ विभागीय पहिल्या अधिवेशनात दि. ०२ ऑक्टो. १९८९ रोजी म्हणतात''[१३९], अमरावतीचे सुप्रसिद्ध लेखक वीर उत्तमराव मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही काही मंडळींनी डॉ. पंजाबराव देशमुख वैज्ञानिक संस्कृती पीठ या नावाने एक संस्था उभी केली आहे. म. फुले, राजर्षी शाहू व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानणाऱ्या सर्वांना या संस्थेत प्रवेश घेता येईल. महात्मा फुले यांचेच तत्त्वज्ञान राजश्री शाहू पासून ते विदर्भात डॉ. पंजाबराव देशमुखापर्यंत ज्या पद्धतीने पुढे आले. त्याचीच नव्या संदर्भात पुनर्मांडणी करून तरूण पीढीपुढे वैज्ञानिक पद्धतीने मांडण्याची कामगिरी काही प्रमाणात हे संस्कृती पीठ करणार आहे.

नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एम.ए. चॉन्सरकार उत्तमरावांना पत्र पाठवतात व म्हणतात,

Thank you for your Letter No. 251/87 dated 1st February, 1987

---

१३७. *प्रा. मोहड सुधाकर, डॉ. पंजाबरावांच्या शिवकुटुंबाचा 'मालुसरा' दौलतराव उपाढ्य, दादासाहेब गोळे, पृष्ठ – ५.*

१३८. *जमादार अ.म. यांचे मोहिते वीर उत्तमराव यांना पत्र, दि. २५ फेब्रुवारी १९८८.*

१३९. *गोळे दौलतराव, अ.भा. स. समाजाचे अधिवेशन (विदर्भ विभागीय) पहिले अधिवेशन अध्यक्षीय भाषण , पृष्ठ – ११.*

& a copy of your thesis on Atheismin Indian Philosopyhy I am glad to know that you have established a trust known as Dr. Panjabrao Deshmukh vaidnyanic Sanskruti Peeth at Amravati with a motive to have Philosophical conceptions in tune with changing times.

I wish you all success in this endeavour.

with my regards.

यावरून उत्तमराव मोहिते यांनी डॉ. पंजाबराव देशमुखांच्या नावे काढलेले संस्कृती पीठ हे अचानक काढलेले नसून इ.स. १९८३ पासून त्यांच्या मनात ही इच्छा होती ती पुढच्या चार वर्षात पूर्ण झाली. बहुजन समाजाच्या अधोगतीचा विचार करून त्यांना नवीन वैज्ञानिक मूल्य दिल्याशिवाय त्यांची प्रगती होणार नाही अशी त्यांची अंतरिक इच्छा होती. या पीठामुळे ती पूर्ण झाली. हे जमादार व चॅन्सरकार यांनी केलेल्या पत्रव्यवहारावरून समजते. उत्तमरावांचे विचार सध्या काळाच्या पुढचे असल्याची प्रचिती येते. मागील काळात फुले, शाहू, आंबेडकर, पंजाबराव यांनी केलेल्या कार्याला नव्या पद्धतीने समाजाला देण्यासाठी त्यांचा हा प्रयत्न पूर्णत्वास गेला असे म्हटले तर योग्य होईल.

उत्तमरावांच्या मृत्युनंतर एक वर्षाच्या आत हा ट्रस्ट बंद झाला. उत्तमराव थकलेले असताना त्यांचा वारसा म्हणून ''मैनाबाई मोहिते व मुलीचा मुलगा (नातू) भालचंद्र व मानवेंद्र यांना बोलवून इंगोले व गोळे यांनी तशी बैठक घेतली आणि दि. २२ मार्च १९९७ रोजी ही संस्था कायमस्वरूपी बंद केली.''[१४०] ''ही संस्था बंद करण्याचा विचार मागील एक वर्षापासून सुरू होता.''[१४१]

यामधून उत्तमरावांनी आपले सर्वस्वपणाला लावून ही संस्था चालवली. त्यांच्या मृत्युनंतर योग्य मार्गदर्शन न लाभल्याने ही संस्था बंद पडली असे म्हणता येईल. वीर उत्तमराव मोहिते यांनी आयुष्यभराचा अभ्यास व अनुभवाच्या आधारावर

---

१४०. डॉ. पंजाबराव देशमुख वैज्ञानिक संस्कृती पीठाचे मैनाबाई मोहिते यांना पत्र, दि. १५ मार्च १९९७.

१४१. दौलतराव गोळे यांचे इंगोले यांना पत्र, दि. २३ मे १९९६.

डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या नावाने वैज्ञानिक संस्कृती निर्मितीसाठी आवश्यक असणारे संघटन निर्माण केले. या संस्थेला, संघटनाला अपेक्षित असणारे कार्य म्हणजे सर्वसामान्य समाज जो आजतागायत प्रस्थापित व्यवस्थेने (वैदिक व्यवस्थेने) दाबून ठेवला. अशा समाजाला वैचारिक टणकत्व देऊन स्व:अस्तित्वाची जाणीव निर्माण करून देऊन प्रगतीचा निश्चित मार्ग दाखवणाऱ्या महात्मा फुले, राजर्षी शाहु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याला उजाळा व सध्या परिस्थितीत पंजाबरावांचे कार्य यातून कणखर व खंबीर महाराष्ट्र निर्माण करण्यासाठी फुले, शाहु, आंबेडकर यांना एकविसाव्या शतकाच्या अनुषंगाने मांडले. म्हणून एकविसाव्या शतकातील फुले, शाहु, आंबेडकर वादाचे भाष्यकार म्हणून उत्तमरावांचे कार्य महत्त्वाचे ठरते.

२.८.१४ उत्तमराव मोहिते एक योगी

वीर उत्तमराव मोहिते यांनी आयुष्यभर स्वत:चा व संसाराचा विचार न करता देशसेवा व सामाजिक कार्यास वाहून घेतले. त्यांनी जे कार्य केले त्यातील महत्त्वाचे एक कार्य म्हणजे त्यांचे ''योग''. उत्तमराव मोहिते यांच्या दिनचर्यत व्यायाम महत्त्वाचा असे आणि वेगवेगळ्या प्रकारची योगासने त्यांना येत असत. ''एखादा योग करतानाच त्यांना समाधी लागल्याचे त्यांच्या पत्नी सांगतात.''

उत्तमराव मोहिते योगाबाबत म्हणतात, ''योग ही मानसिक व शारीरिक अभ्यासाची विशिष्ट पद्धती आहे. योग अभ्यासाने माणूस शारीरिक व मानसिक व्याधीतून मूक्त होतो. शारीरिक व मानसिक शक्ती सुदृढ बनतात. योग अभ्यास करणाऱ्या माणसाच्या क्रियाशक्ती व कल्पकता जागृत होतात. या शक्ती क्रियाशील ठेवणाऱ्या विशिष्ट अभ्यासाला 'हठयोग' हे नाव आहे. उत्तमराव मोहिते यांना योगाबाबत असणारी अंधश्रद्धा मान्य नव्हती. ते योग या महत्त्वपूर्ण व जीवनोपयोगी विषयाला सार्वत्रिक करण्याचा प्रयत्न करतात. परंतु मुख्य गाभ्यापासून अलग होऊन अंधश्रद्धायुक्त विचार मांडले असल्याने योगाचे खरे महत्त्व बाजूला सारले असे सुचवतात.''[१४२]

---

१४२. *वीर मोहिते उत्तमराव, जागतिक कृषक क्रांतीचा विधाता लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख, पृष्ठ – ५३४.*

''तथाकथित स्वयंभू योगी आम्हाला 'दिव्यत्वाचे' दर्शन झाले आणि दिव्यत्वाच्या साक्षात्काराचे वरदान मिळाले असे सांगतात. परमेश्वराचे दर्शन झाले अथवा साक्षात्कार झाला असे सांगतात पण उत्तमराव मोहिते हे मान्य करत नाहीत ते योगविज्ञानाचा परमेश्वराशी कवडीचाही संबंध नाही असे सांगतात.''[१४३]

'''योग' बाबत ग्रंथात आदिनाथाचा 'हठयोग' आणि 'कपिलाचे सांख्य' याची वास्तवता व सुसंगती तर्कशास्त्र आणि प्रत्यक्ष प्रयोग यांनी सिद्ध करता येते.''[१४४] याचा अर्थ उत्तमरावांना योगासंदर्भात कल्पनाविलास मान्य नव्हता व योगाचा कल्पना विलास केल्याने योगाबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. म्हणून 'योग' संदर्भात ते 'अदिनाथ व कपिल' यांना योग्य समजून अन्य योग थोतांड आहे असे सुचवतात. योगाच्या नावावर जटा वाढवणारे आणि साधू म्हणवून घेणारे संत, महंत पोटभरु असून त्यांना योगातील वास्तविकता समजलेली नसते. खरा योग मागे राहून योगाच्या नावाने जनतेची फसवणूक होत असल्याचे प्रतिपादन करतात. त्यांच्या विचारावर वैज्ञानिक प्रभाव असून चमत्काराला स्थान नाही.

''योगसिद्धीसाठी झाली। बाई जोगीण मी पुरी।।
भगव्या ग कफनीत। नागफणा जटाधारी।।
हिमालयी कोणी मला। नाही योगी सापडला।।
पायी हिंडून मी आले। पायथ्याशी जंगलाला।।
पांडुरंग रूखमाई। योग संन्यास साधीत।।
कंठी उत्तम जीवन। संसाराच्या उद्यानात।।''[१४५]

उत्तमरावांना योग अभ्यासासाठी डोंगर दऱ्यात जंगलात जाण्याची, संसार सोडून भगवे वस्त्र परिधान केल्याने योग मिळत नाही. हिमालयात हिंडणारे आणि भगवे वस्त्र परिधान करून जटा वाढवणारे योगी नाहीत. त्यांना योग तर कळत नाही. उलट ही

---

१४३. *वीर मोहिते उत्तमराव, Atheism In Indian Philosophy, page - 18.*

१४४. *कित्ता, पृष्ठ – १९.*

१४५. *मोहिते वीर उत्तमराव, जीवनगाथा, पृष्ठ – २५.*

घातक प्रवृत्ती आहे. खऱ्या ज्ञानापासून वंचित असून वरवरचा देखावा असल्याचे त्यांना सांगावयाचे आहे. म्हणून 'सांख्य' यात जीवनाचा अर्थ आहे ते योगासाठी उपयोगी असल्याने त्याचा प्रसार व प्रचार होण्याची गरज असल्याचे प्रतिपादन करतात.

''भारतात परमहंसाची मानसिक अवस्थता वास्तविक योग्याची नाही.''[१४६] असे सांगतात. उत्तमराव मोहिते यांना अन्य योग विषयांचा परिचय असल्याचे दिसते ते म्हणतात, ''भारतीय वाङ्मयात हठयोग, पंतजलीची योगसूत्रे, भगवद् गीतेच्या दुसऱ्या अध्यायातील सांख्य योग आणि विवेकानंदाच्या दुसऱ्या भागातील राजयोग यांना योगाचे अधिकार ग्रंथ म्हणून मानतात. परंतु त्यापैकी 'हठयोग' योगाचा प्रमाण ग्रंथ होय.''[१४७] योग आणि भोग एकच आहे असे मानणारे योगी नाहीत आणि मानवी जीवनात आवश्यक उपभोग नाकारतात तेही योगी नाहीत.

योगी होण्यासाठी आचरण महत्त्वाचे आहे. त्यासाठी आचार आणि विचार, स्वभावात उतरले पाहिजेत तसेच आहाराबाबत बंधने पाळली पाहिजेत. या नंतरच योग अभ्यास सुरू होतो. योग अभ्यासात 'गुढवाद' दिव्यत्व, अमरत्व, अद्वैत, यांचा संबंध नाही तर ''स्वत:ला विसरणे हे योगाचे साध्य आहे या स्वत:ला विसरण्याच्या प्रक्रियेला समाधी म्हणतात. यासाठी उत्तमराव 'आर्किमिडिज' चे उदाहरण देऊन स्पष्ट करतात.''[१४८]

एकंदरीत उत्तमराव मोहिते यांच्या मते, 'योग' संदर्भात असणाऱ्या गैरसमज व अंधश्रद्धा यामुळे योगाचे खरे रूप पुढे येत नाही. यामुळे कल्पनाविलास वाढून नको त्या गोष्टीकडे समाजाचा कल जातो. यासाठी योग विज्ञान आहे. त्यात चमत्कारिक किंवा दैवी असे काही नसून ती गाठवयाची एक प्रक्रिया आहे. संन्यास, भगवेकपडे यांची योगासाठी आवश्यकता नसून मर्यादित भोग घेऊन संसार करून योग करता

---

१४६. *मोहिते वीर उत्तमराव, जागतिक कृषक क्रांतीचा विधाता लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख, पृष्ठ – ५३५.*

१४७. ***Mohite Veer Uttamrao, ATHEISM IN INDIAN PHILOSOPHY, Page - 19.***

१४८. *कित्ता, पृष्ठ – २०.*

येतो. यासाठी मनाची दृढ इच्छा महत्त्वाची असून इंद्रिय नियंत्रणाला महत्त्व असल्याचे सांगतात. उत्तमराव मोहिते यांनी यासाठी 'हठयोग' हा योगाचा महत्त्वपूर्ण अभ्यास असल्याचे प्रतिपादन केले. प्रत्येकाला आपल्या कामात योग मिळू शकतो हे त्यांनी सिद्ध केले. आपल्या कार्यात तन्मय होणे, बाकी सर्व बाबींचा विसर ज्या परिस्थितीत पडतो ती योग्याची अवस्था असते. यामुळे मिळालेला योग पुन्हा मिळतो असे नाही. तो मिळेनही पण त्यासाठी आचार, विचार, आहार आणि स्वभाव तसा ठेवावा लागतो.

खऱ्या योगाचा प्रचार करण्यासाठी उत्तमरावांनी अनेक कार्यक्रम केले. त्यांना परिस्थितीमुळे ठराविक केंद्र लाभले नाही. पण आपले घर अनेक विषयांचे केंद्र बनवले. त्यांच्या घरी चालू असलेल्या मराठा विज्ञान मंदिराबरोबर 'योग विज्ञान मंदीर' चालवले. याची पोच रमेशचंद्र सोरदे यांनी पाठवलेल्या पत्रातून येते. तसेच ते उत्तमरावांना म्हणतात, ''पावसाळ्याच्या दिवसात एक–दोन महिन्याचे एखादे योग साधनेचे शिबीर असल्यास कळवावे.''[१४९] यावरून उत्तमराव मोहिते शिबीर घेत होते असे म्हटले तर चूक ठरत नाही. याला पुष्ठी मिळते ती संतोषराव पाटील माजी आमदार दलितमित्र उत्तमरावांना म्हणतात, ''योगामुळे स्पाँड्यॉलिससचा आजार कमी झाला.''[१५०]

एकंदरीत समाजाच्या संभ्रममय अवस्थेत प्राचीन काळापासून चालत आलेला वारसा पण देव, धर्म, अध्यात्म, चमत्कार, बुवाबाजी इ. मुळे मुळचे स्वरूप विकृत होऊन त्यातील वैज्ञानिकतेचा होणारा ऱ्हास टाळावा म्हणून भारतीय परंपरेतील योगविद्या विज्ञानयुगात लोकांना कळावी व धावपळीच्या जीवनात त्याचा उपयोग व्हावा म्हणून योग परंपरेला उजाळा देऊन एकविसाव्या शतकाच्या अनुरोधाने मांडतात. म्हणून २१ व्या शतकातील एक महान योगी म्हणून उत्तमरावांचे नाव प्रामुख्याने घ्यावे लागते. यावरून उत्तमराव योगाचे अभ्यासक आहेत असे म्हणता येईल.

२.८.१५ उत्तमराव मोहित्यांचे अंतिम दिवस व मृत्यु

उत्तमराव मोहिते यांनी आयुष्यभर समाजसेवा, देशसेवा केली. विदर्भामध्ये

---

१४९. *सोरदे रमेशचंद्र, (मानवजोडो अभियान साहूर, वर्धा) यांचे उत्तमराव यांना पत्र, दि. २२ जुलै १९९२.*

१५०. *पाटील संतोषराव (माजी आमदार दलितमित्र), चिखली, यांचे उत्तमरावांना पत्र, दि. २८ जून १९९३.*

सामाजिक चळवळीला गती प्राप्त करून दिली. सर्वांगीण विकासाचा विचार उत्तमरावांनी पेरला. वेळप्रसंगी त्रास सहन करावा लागला. देशाकरीता घराचा त्याग करून हसतमुखाने कर्तव्य समजून कारावास भोगणारे उत्तमराव मोहिते समाज, धर्म, राजकारण, संस्कृती, व्यक्तिगत जीवन या बाबत सतत जागरूक असल्याचे दिसतात. मोठ्या धाडसाने कार्य पार पाडण्याची उत्कठता त्यांच्या अंगी होती. त्यांनी प्रत्यक्ष कृती बरोबर युक्ती व आपली लेखनी चालवली. स्वत:च्या घराचा फारसा विचार केला नाही तर हा देश माझे घर आहे म्हणून माझ्या कुटुंबाचा विकास म्हणजेच देशाचा विकास अशी आशा मनाशी बाळगुण उत्तमरावांची वाटचाल होत असे. अनेक अवघड काम उत्तमरावांनी सवघड केले. त्यात सहकार्यापेक्षा विरोध झाला. प्रतिस्पर्धकांच्या किंवा विरोधकांच्या विरोधाबरोबर स्वकियांचा विरोध सहन करावा लागला. मोहिते आपल्या भावना व्यक्त करतात.

''एकलाच हिंडे बोले मी मनाशी।
उभी पुण्यराशी विरोधाला।।
रंजले गांजले यांची करू सेवा।
जिवनाचा मेवा चारू कैसा।।
भाऊबंद सगे माझे एकती ना।
हाडाच्या दुष्याना साथ त्यांची।।''[१५१]

यावरून उत्तमराव मोहिते यांनी अनेक समस्यांना तोंड देत आपले जीवन पुढे नेले. आप्तस्वकियांची त्यांना साथ मिळाली नाही. पण मनातील आत्मविश्वास ही कमी झाला नाही. त्यांना दु:खा कष्टामध्ये जीवन जगणाऱ्या व्यक्तिचा विकास घडवायचा होता अशा भावना व्यक्त करतात. आयुष्यभर त्यांनी सार्वजनिक जीवन जगले. जीवन जगताना त्यांनी वाईटाचा त्याग केला.

''उत्तम उत्तम जे जे मला दिसे। ते ते टिपतसे जीवनात।।''[१५२]

---

१५१. *मोहिते वीर उत्तमराव, जीवनगाथा, पृष्ठ – ०१.*

१५२. *कित्ता, पृष्ठ – १२.*

उत्तमरावांनी आपल्या जीवनात अनेक चांगल्या गोष्टीचा संचय केला. शील, चारित्र्य व बौद्धिक विचार उत्तमरावांनी योग्य राखल्याचे दिसते. उत्तमरावांनी तत्त्वज्ञान, इतिहास, सामाजिक बाबींवर प्रकाश टाकून वाट काढण्याचा प्रयत्न केला. हे करत असताना स्वत:च्या कुटुंबाची पाहिजे तेवढी काळजी घेता आली नाही. पैसा कमवणे उत्तमरावांचे ध्येय नव्हते म्हणून आपल्या कुटुंबाविषयी ते म्हणतात,

''तुला पाहिजे ते नाही माझ्या पाशी।
दारिद्र्याच्या राशी फुगलेल्या।।
वाया मी घातला मानवाचा जन्म।
साचले ना धन तुम्हांसाठी।।
तत्त्वज्ञानाचे मी भरिले भांडार।
ते का भक्षणार भुकेपायी।।
कळते हे सारे, परिक का वळेना।
छंद हा सुटेना उत्तमाचा।।''[१५३]

यावरून जीवनात पैसा कमवला नाही. तत्त्वज्ञानाचे भांडार भरले ते तुम्हाला जीवन जगण्यात तुमची भूख भागवण्याच्या कामाचे नाही असे उत्तमरावांना वाटत होते. आपल्या पिला लेकरांसाठी उत्तमराव म्हणतात,

''पिलांचे होईल माझ्या मागे कसे।
हेच एक पिसे वेड लावी।''[१५४]
''स्वत:साठी नाही आतां मी जिवंत।
पहाया देहांत उत्सुकलों।।
परतोनी घरा आणतो मी चारा।
घासघास पुरा होत नाही।।''[१५५]

---

१५३. *कित्ता, पृष्ठ – १३.*
१५४. *कित्ता, पृष्ठ – १४.*
१५५. *कित्ता, पृष्ठ – १४.*

एकंदरीत उत्तमराव मोहिते सार्वजनिक जीवनात यशस्वी झाले. कुटुंबात ही ते म्हणावे तेवढे मागे राहिले नाहीत पण म्हणावी अशी कुटुंबाची प्रगती करू शकले नाहीत. जो व्यक्ती सर्वांचा असतो. त्याच्या कुटुंबात अडचणी असतात हेच उत्तमरावांच्या बाबतीत घडले. अशा सार्वत्रिक जीवन जगणाऱ्या मनाला वैयक्तिक प्रेम होते. पण या वैयक्तिक प्रेमापेक्षा उत्तमरावांना समाजाची काळजी जास्त होती. एक बाप, एक पती, एक कुटुंबप्रमुख म्हणून या भावनाही त्यांच्या मनात आल्या पण या भावनांच्या आहरी उत्तमराव गेले नाहीत. उत्तमराव मोहिते ग्रामीण भागातील असून ग्रामीण जीवनाची चांगली ओळख त्यांना होती. समाजाची अधोगती यास कारण काय याची ओळख उत्तमरावांना असल्याने ते बदलाच्या संदर्भात उत्सुक असत. मोहिते जीवनभर कधी निराशावादी जीवन जगले नाहीत.

मंत्रयुग गेले यंत्रयुग आले । तंत्राचे फुटले पेव आता ।।[१५६]

हे उत्तमरावांचे विधान बदलास अनुकूल असून आधुनिकतेचे स्वागत करणारे आहे असा धाडशी कर्तबगार व्यक्ती जेव्हा वयाच्या उतारात पडतो, शरीर साथ देत नाही अशा वेळी कौटुंबिक दुष्टचक्र फिरायला लागतात. मुलगा प्रमोद व उत्तमराव यांच्यातील दरी वाढत जाते. प्रमोदचे फक्त उत्तमरावांबरोबर जुळले नाही असे नव्हे. बहीण भाग्यरेखा देशमुख व भाच्चे यांच्याबरोबर जुळले नाही. मोर्शी येथील जमीन तसेच गाडगे नगरातील घर यामुळे तंटा वाढला. उत्तमरावांनी मुलगा मुलगी भेद न करता समानता बाळगली व प्रमोद ऊर्फ पंजाबराव मोहिते हा वारसा हक्काचा दावेदार मुलगा म्हणून म्हणवत. बहुतेक हेच कारण त्यांच्यातील बेबनावास असावे. शेवटचा कालावधी अंतर्गत कलहाचा व तणावपूर्ण परिस्थितीत उत्तमरावांना घालवावा लागला.

उत्तमराव मोहिते महाराष्ट्रातील पडद्याआड राहिलेले कर्तबगार व्यक्तिमत्व होते. उत्तमरावांच्या विचार व कार्यामुळे तत्कालीन ''मुख्यमंत्री शरद पवार यांनी उत्तमराव मोहिते यांची त्यांच्या निवासस्थानी १९९४ च्या गुडीपाडव्या दिवशी भेट घेतली व

---

१५६. *कित्ता, पृष्ठ – १५.*

दीर्घायुरोग्यासाठी शुभेच्छा दिल्या. याचवेळी मराठा सेवा संघाने मुख्यमंत्र्यांकडे उत्तमरावांच्या कार्याबाबत 'पद्मश्री' द्यावा अशी मागणी केली.''[१५७]

विदर्भातील एक धडाडीचे सामाजिक कार्यकर्ते, स्वातंत्र्य संग्राम सेनानी वीर उत्तमराव मोहिते परिस्थितीशी लढता लढता अखेर दि. २९ एप्रिल १९९६ रोजी यांचे निधन झाले. त्यांचे अंत्यसंस्कारावेळी त्यांचा मुलगा प्रमोद याने चितेला अग्नी दिला. त्यांच्या अस्थि विसर्जन त्यांचा नातू भालचंद्र देशमुख यांनी पूर्णा नदीत केले.

वयाच्या ८ व्या वर्षी म्हणजे इ.स. १९१८ मध्ये कुरळपुर्णा हे गाव सोडले पण शेवटपर्यंत ते कुरळवर प्रेम करत राहिले. उत्तमराव मोहिते यांच्या निधनाची वार्ता कळताच अनेकांचे मन गहिवरले हळहळले. अनेकांनी आपल्या भावना व्यक्त केल्या तर साधना अभावी अनेकांनी मनोमन श्रद्धांजली वाहिली.

प्रा. सुधाकर मोहड, ''वीर उत्तमराव मोहिते यांच्या निधनाने विदर्भातील एक अग्नीपुरुष, क्रांतीचा दुर्लभ योजक नाहिसा झाल्याचे नमूद करून श्रद्धांजली अर्पण केली.''[१५८] तर ''क्षत्रिय मराठ्यांचा हिरा, वीर उत्तमराव मोहिते हरपला''[१५९] अशी दै. हिंदुस्थानची बातमी आली व आत्म्याला शांती लाभो अशी परमेश्वरास विनंती केली. ''विदर्भातील पुरोगामी चळवळीतील कार्येकर्ते प्रखर व बुद्धिप्रमाण्यवादी आणि स्वातंत्र्य संग्राम सेनानी, तर्कशुद्ध विचार करणारे आणि सामाजिक चळवळीत कडवे क्रांतिकारक म्हणून परिचित असलेले आबासाहेब उपाख्य उत्तमराव मोहिते यांनी डॉ. पंजाबराव देशमुख यांचे अभ्यासपूर्ण जीवन चरित्र लिहिले होते. साक्षेपी विचारवंत, व्यासंगी विद्वान, कर्डेवक्ते, शिक्षक, कवी अशा विविध भूमिका आपल्या आयुष्यात वठवून श्री मोहिते यांनी जनतेच्या मनात आपले वेगळे स्थान निर्माण केले.''[१६०] तर ''वीर उत्तमराव अनंतात विलीन झाले ते विदर्भाचे 'चार्वाक-लोकायत' अणू-परमाणूत विलीन झाले. डॉ. पंजाबरावांचे प्रथम चरित्रकार, शिक्षक समाजाला

---

१५७. *दै. लोकपथ, दि. १२ एप्रिल १९९४.*

१५८. *दै. तरूण भारत नागपूर, दि. ३० एप्रिल १९९६.*

१५९. *दै. हिंदुस्तान नागपूर, दि.३० मार्च १९९६.*

१६०. *दै. लोकसत्ता, नागपूर, दि. ०१ मे १९९६.*

अखेरपर्यंत शिकवत राहिला.''[१६१] ''जनवाद सत्यशोधक समाजाच्या कार्यात गतीमान असलेले अमृतकर वकील, अकर्ते वकील, पंजाबराव सदातपूरे, श्री. शिवाजी हायस्कूल मोर्शीचे मुख्याध्यापक नानासाहेब कानफोडे यांच्यासारखी मातब्बर मंडळी मोर्शी येथील श्री. मोहिते यांची साथीदार होती अशा वीर उत्तमराव मोहित्यांचे निधन झाले.''[१६२] उत्तमरावांबाबत लोकमत म्हणतो, ''भारतीय तत्त्वज्ञ व मार्क्स दर्शनाचे गाढे अभ्यासक वीर उत्तमराव मोहिते यांचे २८ एप्रिल १९९६ ला मध्यरात्री निधन झाले.''[१६३] ''जनमाध्यम याने पंजाबरावांचे जवळचे स्नेही व निष्ठावान स्वातंत्र्य संग्राम सेनानी वीर उत्तमराव मोहित्यांच्या निधनाबाबत दु:ख व्यक्त केले.''[१६४] पिंपळगव्हान येथील उमेश मेश्राम ता. अंजनगाव सुर्जे म्हणतात, ''स्वातंत्र्यासाठी लढ्यासह जीवनभर बहुजनांकरीता लढा देणारे ते तेजस्वी सूर्य होते. जाती, रूढी, परंपरा या जोखडातून मूक्त करून मानवजातीला एकत्र करण्यात हयात घालवली.''[१६५] वीर उत्तमराव मोहिते यांना कोल्हापूरात भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. ''या शोकसभा कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. रमेश जाधव हे होते. फुले, शाहू, आंबेडकर विचारमंचाचे अध्यक्ष दादासाहेब जगताप, राष्ट्रीय विचार प्रबोधिनीचे अध्यक्ष माजी महापौर बळीराम पोवार, भिकासेठ पाटील, झोपडपट्टी संघाचे अध्यक्ष जी.एम. बेग, पी.सी. पाटील, जयसिंगराव बागल आदी कार्यकर्त्यांनी उत्तमरावांना श्रद्धांजली अर्पण केली.''[१६६] उत्तमराव मोहिते यांनी हजारो वर्ष केलेल्या लबाडीचा व खोट्या इतिहासाचा समाचार घेतला. तर ''भौतिक विज्ञानाचे प्रखर भाष्यकार व समाजक्रांतिकारक वीर उत्तमराव मोहिते हा मराठ्यांचा बुलंद आवाज कायमचा संपला.''[१६७] अशा आपापल्या भावना

---

१६१. *दै. नागपूर पत्रिका, दि. ०१ मे १९९६*

१६२. *दै. जनवाद, दि. ०५ मे १९९६.*

१६३. *दै. लोकमत, दि. ०१ मे १९९६.*

१६४. *दै. जनमाध्यम, दि. ४ मे १९९६.*

१६५. *उमेश मेश्राम यांची प्रतिक्रिया (उत्तमरावांचा दस्तऐवजातील एक चिठ्ठी).*

१६६. *जगताप दादासाहेब (संपा.),बहुजन समाज (साप्ताहिक), दि. ५ मे १९९६,*

१६७. *खेडेकर पुरूषोत्तम (संपा.), मराठा मार्ग (मासिक), जून १९९६.*

अनेकांनी व्यक्त केल्या. ''डॉ. पंजाबरावांचा युद्धा, महाराष्ट्रातील एक पुरोगामी विचारवंत, हाडाचा सत्यशोधक आणि प्रभावी वक्ता व मूलगामी विचारसरणीचा लेखकापासून विदर्भाच नव्हे तर महाराष्ट्र पारखा झाला. आबा ईश्वर, देव, धर्म या कल्पना ओलांडून गेलेले थोर महापुरुष होते.''[१६८] डॉ. ए.एस. पाटील म्हणतात, ''किर्ती हाच स्वर्ग खरा असे राष्ट्रसंत तुकडोजींच्या ओवीचा दाखला देतात व उत्तमरावांनी किर्ती प्राप्त केली त्यांना शांती लाभावी म्हणून प्रार्थना करतात.''[१६९] ''उत्तमरावांच्या निधनाची बातमी ऐकून मन दु:खी झाले. त्यांची भाषणे आम्ही अनेक वेळा आयोजित केली होती. पत्राद्वारे आमची चर्चा होत असे. निधनाची बातमी कळवून त्यांच्या कार्यास अभिनंदन करण्याची संधी दिली. उत्तमराव मोहिते हे अनेकांना उर्जा देणारे होते. त्यांच्या मित्र परिवारात ते अग्रस्थानी असत.''[१७०] दौलतराव गोळे म्हणतात, ''वीर उत्तमराव मोहित्यांची सोबत मिळाली खूप शिकायला मिळाले, वाचनाचा नाद होता. राजकीय, सामाजिक चळवळीकडे लक्ष होते. शक्य तेवढ्या प्रामाणिकपणे जगलो, खपलो व लढलो वीर उत्तमराव गेल्यावर आताशी थोडा थकवा जाणवायला लागला.''[१७१]

उत्तमरावांच्या मृत्युबाबतच्या प्रतिक्रिया पाहिल्यावर असे दिसून येते की, उत्तमराव मोहिते केवळ अमरावतीपुरते मर्यादित नसून महाराष्ट्रातील लोकमनावर त्यांच्या व्यक्तिमत्वाचा व व्यासंगीपणाचा ठसा कायमचा उमटला असे दिसते. त्यांनी समाज हिताच्या कार्याचा आयुष्यभर ध्यास घेतला म्हणूनच अनेकांनी त्यांना जसे वाटले तसे मनमोकळ्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या.

एकंदरीत वीर उत्तमराव मोहिते यांचा जीवनपट पाहिला असता स्वत:साठी कमी पण समाजासाठी जास्त वेळ दिला. भारतीय स्वातंत्र्य चळवळ, भारतीय

---

१६८. घोरपडे एकनाथ यांचे भाग्यरेखा देशमुख यांना पत्र , दि. २४ एप्रिल १९९६.

१६९. डॉ. पाटील ए.एस. यांचे मैनाबाई मोहिते यांना पत्र, दि.०३ मे १९९६.

१७०. डॉ. पाटील भिकाशेठ (माजी महापौर कोल्हापूर) यांचे भाग्यरेखा देशमुखांना पत्र, दि. ०५ जून १९९६.

१७१. प्रा. मोहड सुधाकर, डॉ. पंजाबरावांच्या शिव कुटुंबाचा मालुसरा, डॉ. दौलतराव उपाख्य, दादासाहेब गोळे, पृष्ठ – ९.

सामाजिक परिवर्तन, धार्मिक व्यवस्थेचे खंडन, तत्त्वज्ञानाचा महाकोष, राजकीय व्यवस्थेवर चिंतन यातून वैज्ञानिक समाजनिर्मितीचे स्वप्न उराशी घेऊन कुटुंबाची पर्वा न करता सतत खडतर वाट चालताना उत्तमराव मोहिते दिसतात. स्वातंत्र्यानंतर आज जवळपास ६५ वर्ष व उत्तमरावांच्या मृत्युला १६ वर्ष पूर्ण झाली तरी उत्तमराव मोहिते यांची कोंडलेली ज्ञानगंगा महाराष्ट्रात झाकून राहिली.

महाराष्ट्राला भूषण ठरावे व देशाच्या विकासात योग्य मार्गदर्शन होईल अशी उत्तमराव मोहिते यांची ग्रंथसंपदा सर्वांसाठी खुली झाली पाहिजे व महाराष्ट्र शासनाने पुरोगामी महाराष्ट्राचा हा वारसा शासकीय माध्यमातून उत्तमराव मोहिते यांचे समग्र वाङ्मय प्रकाशित करून एका वैज्ञानिक भक्कम विचाराचा परिचय महाराष्ट्राला करून देणे शासनाचे कर्तव्य आहे असे वाटते.

२.९ उत्तमराव मोहिते यांना मिळालेले मान सन्मान

उत्तमराव मोहिते हे महाराष्ट्रातील तडफदार, व्यासंगी, विद्वान, तत्त्वज्ञ, बहुजन समाजाचे मार्गदर्शक, अशा अनेक बाबींनी परिचित आहेत. एक स्वतंत्र संग्राम सेनानी व समाजक्रांतिकारक म्हणून ओळखले जात. यामुळे अनेक प्रतिष्ठान, महाराष्ट्र शासन, भारत सरकार यांनी पुरस्कार प्रदान केले. स्थानिक, स्टेट, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ओळख स्वत:च्या कर्तृत्वाने निर्माण करणारे उत्तमराव पुढील पुरस्कारांनी सन्मानांनी गौरविण्यात आले.

उत्तमराव पांडुरंगजी मोहिते यांना दि. १२/०४/१९६७ मध्ये महाराष्ट्र शासनाने स्वातंत्र्य संग्रामात केलेल्या कामगिरीच्या गौरवार्थ सन्मानपत्र देण्यात आले. तर भारत सरकारच्या वतीने स्वातंत्र्य संग्रामात स्वस्मरणीय माग घेतल्या बाबत श्रीमती इंदिरा गांधी यांनी स्वातंत्र्याच्या २५ व्या वर्धापण दिनानिमित्त दि. १५ ऑगस्ट १९७२, २९ श्रावण, १८९४ शके मध्ये श्रीमती इंदिरा गांधी यांनी ताम्रपट भेट दिला. तर बहुजन समाजाच्या हितासाठी आयुष्यभर झगडणाऱ्या उत्तमरावांना द्वितीय बहुजन अधिवेशन

समिती, नागपूर यांनी मानपत्र देऊन सन्मानित केले. उत्तमराव मोहिते यांना साहित्य क्षेत्रातील कामगिरीत जीवन खर्च केले त्यांच्या या कार्याबाबत महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ पुणे यांनी १९९० मध्ये सन्मानित केले.

मराठा सेवा संघ, मराठा महिला सांस्कृतिक संमेलन रविवार दि. १३ फेब्रुवारी १९९४ रोजी सन्मानीत करण्यात आले. तर सर्व शाखीय कुणबी युवा समाज (विदर्भ) यांच्या वतीने वीर उत्तमराव मोहिते यांना दि. ३० एप्रिल १९९५ रोजी समाज गौरव उपाधी मानवस्त्र व मानपत्र देऊन सन्मानीत केले. उत्तमराव मोहिते यांचे कृतीशील पांडित्य व विद्वता आणि त्यांचे लेखन यांना विचारात घेऊन दि. ०७/०५/१९९० रोजी पंजाबराव देशमुख वैज्ञानिक संस्कृती पीठाद्वारे वैज्ञानिक संस्कृतीचा आचार्य ही पदवी प्रदान करण्यात आली. तर यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांनी पुरस्कार प्रदान केला. जीवन यात्रा संपल्यानंतर उत्तमरावांना मरणोत्तर मानपत्र मिळाले. डॉ. पंजाबराव प्रज्ञा हे मरणोत्तर मानपत्र दिले.

एकंदरीत वीर उत्तमरावांना मिळालेली मानपत्रे व त्यांचा झालेला सन्मान विचारात घेतला असता असे दिसून येते की, उत्तमराव मोहिते यांचे कार्य आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत महत्त्वाचे आहे. भारत सरकार, महाराष्ट्र शासन, वेगवेगळ्या संस्था यांच्या वतीने त्यांना दिलेली मानपत्रे त्यांचे कार्य मानवहितासाठी असल्याचे स्पष्ट होते. वीर उत्तमराव मोहिते कोण्या एका कप्प्यात बसवता येत नाहीत आणि तसे त्यांचे कार्य ही नाही. प्रत्येक क्षेत्रात ते असल्याने प्रत्येकाला आपले वाटणारे आहे.

ताठरता, करारीपणा, भडकपणा, रोखठोक व्यक्तिमत्व, निडरपणा यामुळे उत्तमराव मोहिते यांच्याबाबत गैरसमज होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यांची हिंदू धर्म, धर्मग्रंथ, वैदिक व्यवस्था, देवदेवता, अध्यात्म, ब्रह्मवाद या बाबींवर तिखट व जहाल लेखन आहे. तरी या लेखनामागे सामाजिक हीत व राष्ट्राची उन्नती असल्याचे दिसते.

उत्तमराव मोहिते आधुनिक महाराष्ट्राला घडवणाऱ्या पुरोगामी व्यक्तिमत्वातील

एक महत्त्वपूर्ण व्यक्तिमत्व आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

२.१० उत्तमरावांचे मित्र व सहकारी

उत्तमराव मोहिते यांनी आपल्या एकूण ८६ वर्षाच्या काळात कुटुंबात कमी आणि बाहेर जास्त राहिले. आपले घर सुद्धा सार्वजनिक कामाचे कार्यालय बनवले. त्यांच्या जीवनात अनेक सुख दु:खाचे प्रसंग आले. कधी अत्यंत वाईट वेळ आली. अशावेळी उत्तमराव कधीच डगमगले नाहीत. आपल्या दु:खाची दुसऱ्याला झळ पोहचू नये म्हणून सतत जागरूक राहणारे उत्तमराव मोहिते ऊर्फ आबा यांनी अनेक जीवाभावाचे मित्र बनवले. तसेच विचार पटल्याने एकमेकांकडे आकर्षित होऊन अनेक मित्र बनले. रामदास शिवाजी प्रकरण, भारतीय स्वातंत्र्य संग्राम, मराठा विज्ञान मंदीर, डॉ. पंजाबराव देशमुख, संयुक्त महाराष्ट्र, कृषी विद्यापीठ आंदोलन, शिवाजी शिक्षण संस्था, सत्यशोधक चळवळ, विज्ञान यज्ञ, डॉ. पंजाबराव देशमुख वैज्ञानिक संस्कृती पीठ आणि स्वत: एक शिक्षक प्रभावी वक्ते असल्याने उत्तमरावांचा मित्र परिवार मोठा निर्माण झाला.

२.१०.१ उत्तमराव मोहित्यांचे रामदास शिवाजी वादातील मित्र

उत्तमराव मोहिते यांना रामदास शिवाजी वादाकडे खेचणारी घटना त्यांच्या मित्रांमुळे घडली असे म्हणता येईल. ती घडली असती पण पुढे वेळ लागला असता. उत्तमरावांचा इथपर्यंत अभ्यास बऱ्यापैकी झाला होता आणि इ.स. १९३८ मध्ये उत्तमराव अमरावतीहून मोर्शीला आले होते. त्यांना या होणाऱ्या घटनेची कल्पना नव्हती.

''बाळकृष्ण कडू, शामरावजी नागापूरे, ॲड. ज.सी. अकर्ते आणि मारोतराव केचे यांना निमंत्रण असल्याने महाराष्ट्रातील ख्यातनाम प्रवचनकार म्हणून ज्यांना ओळखले जायचे ते रामदासांच्या जीवनावर प्रवचन करणार होते. उत्तमरावांना आमंत्रण नसताना उपरोक्त मित्र मंडळींनी घेऊन गेले आणि रामदासांच्या जीवनावरील चमत्कार

शंकर देवांनी सांगत असताना उत्तमराव मोहिते यांनी ते चमत्कार बुध्दिवादाच्या कसोटीवर सिद्ध करून दाखवावे असे आव्हान केले. यात उपरोक्त मित्रांनी साथ दिली म्हणून शंकर देवांना आपले प्रवचन करता आले नाही.''[१७२] यामुळे उत्तमरावांचा आत्मविश्वास वाढला. एवढ्यावरच हे प्रकरण थांबले नाही. ''भगवा झेंडा'' चित्रपट विरोधी मोहिमेत चंपतराव नागापूरे, शंकरराव इंगोले, एल.एम. देशमुख, गुणवंतराव वैद्य, देवराव सदातपुरे, शामराव यादवराव गुंड, पंजाबराव देशमुख, बाबासाहेब महाल्ले, नित्यानंद विठोजी मोहिते, काशीराव बापू देशमुख यांनी उत्तमरावांना मदत केली. तर मराठा विज्ञान मंदिराने Exposition of Cosmic Truth हे पुस्तक प्रकाशित केले. प्रा.मा.म. देशमुख यांनी मध्ययुगीन भारताचा इतिहास या ग्रंथात संदर्भ घेतला. यामुळे महाराष्ट्रात वाद उफळला. यावेळी उत्तमरावांना वृत्तपत्रीय मदत कोल्हापूरचे बहुजन समाज साप्ताहिकाचे संपादक दादासाहेब जगताप यांनी मैत्रीचा हात पुढे केला व उत्तमरावांच्या विचारांना प्रसिद्धी दिली. तर दौलतराव गोळे यांनी नागपूरात उत्तमरावांच्या विरोधकांचा धिक्कार केला.

यावरून उत्तमराव मोहित्यांना मदत करणारी व सोबत लढणारी अनेक जीवाभावाचे मित्र लाभल्याने अगोदर कार्यक्षम असणारे उत्तमराव द्विगुणीत कार्यरत झाले असे म्हणता येईल.

२.१०.२ आबा, काका, बापू अमरावतीतील त्रिमुर्ती

वीर उत्तमराव मोहिते, दौलतराव गोळे, शंकरराव इंगोले हे अमरावतीतील वास्तव्य करणारे मित्र आहेत. तिघांचा आधार एकच होता डॉ. पंजाबराव देशमुख. गोळे आणि मोहिते यांचा स्वभाव एकमेकांना आवडत नसे. दोघांची थोड्या थोड्या गोष्टीवरून भांडण व्हायचे त्यांचे भांडणे होत. म्हणजे सकाळचे भांडण दुपारी मैत्री असेच होते. 'तुझे माझे जमेना आणि तुझ्या वाचून करमेना' अशी मैत्री जमली.

---

१७२. *मोहिते वीर उत्तमराव, जागतिक कृषक क्रांतीचा विधाता लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख, पृष्ठ – २२२.*

अमरावतीच्या गाडगे नगरात आजही जवळ–जवळ त्यांची घरे आहेत. ही गाडगे नगरातील त्रयी 'विज्ञानवादी त्रयी'[१७३] म्हणून ओळखली जाते.

उत्तमराव मोहिते व दौलतराव गोळे जिवलग मित्र असून गोळे मोहित्यांना ज्येष्ठ स्थान देतात. तसेच वयात ही ०४ वर्षांनी गोळे लहान होते. १९ डिसें. १९१४ या पहिल्या जागतिक महायुद्धावेळी गोळे जन्मले. उत्तमराव मोहिते व त्यांचा संबंध इ.स. १९३८ ते १९४० च्या दरम्यान आला असावा. तसेच शंकरराव इंगोले यांचा संबंध इ.स. १९३५–१९३६ च्या दरम्यान आला असावा. ''उत्तमराव मोहिते नेहमी म्हणायचे गोळेसाहेब आणि बापूसाहेब इंगोले सोबत होते म्हणून माझे जीवनकार्य सुलभ आणि सहज बनले.''[१७४] मराठा विज्ञान मंदीर या संस्थेत गोळे, इंगाले, मोहिते यांनी मनापासून कार्य केले. मैनाबाई मोहिते सांगतात, ''उत्तमराव मोहित्यांच्या अनुपस्थितीत मराठा विज्ञान मंदिराचे साहित्य त्यांनी घरी नेले.'' पण यामुळे त्यांच्यात कुठलाही वाद झाल्याचे दिसत नाही. ''श्री. शिवाजी शिक्षण संस्थेचा विस्तार होण्यास ज्या प्रामाणिक व विश्वासू व्यक्ती पंजाबरावांना लाभल्या त्यात गोळे, इंगाले व मोहिते महत्त्वपूर्ण आहेत.''[१७५] दौलतराव गोळे व शंकरराव इंगोले यांनी उत्तमरावांना मदत केली. ''कृषी विद्यापीठ आंदोलन संयुक्त महाराष्ट्र चळवळ या कार्यात त्रयी अग्रेसर राहिली उत्तमरावांना मदत करताना त्यांचे मित्र कशाचीही अपेक्षा न ठेवता मदत करतात.''[१७६] ''डॉ. पंजाबराव देशमुख वैज्ञानिक संस्कृती पीठ ही संस्था उघडताना उत्तमरावांच्या प्रेरणेतूनच गोळे व इंगोले यांनी पुढाकार घेतला.''[१७७] ''त्यांनी मराठा विज्ञान मंदिराचे कार्य जोमाने केल्याचे दिसते.''[१७८]

---

१७३. *मोहिते वीर उत्तमराव, मराठ्यांच्या सांस्कृतिक क्रांतीचा इतिहास, प्रस्तावना, पृष्ठ – २.*

१७४. *मोहड सुधाकर, डॉ. पंजाबरावांच्या शिवकुटुंबाचा 'मालुसरा' – दौलतराव उपाख्य, दादासाहेब गोळे, पृष्ठ – ४.*

१७५. *कित्ता, पृष्ठ – ३३.*

१७६. *दौलतराव गोळे, (अप्रकाशित डायरी), पृष्ठ – ८१.*

१७७. *मोहड सुधाकर, पूर्वोक्त, पृष्ठ – ०५.*

१७८. *मोहिते वीर उत्तमराव, जागतिक कृषक क्रांतीचा विधाता लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख, पृष्ठ – ४३२, ४३३.*

आबा, बापू, काका यांना प्रा. राम मेघे, बापूराव विठोबा पाटील, तायवाडे यांच्या सारखी अनेक सहकारी लाभले व उत्तमरावांच्या अनेक कल्पना त्यांच्या मित्र व सहकाऱ्यांनी पुढे नेल्या. विज्ञान यज्ञ डॉ. पंजाबरावांच्या नावे साजरा केला. यात उत्तमरावांना दौलतराव गोळे, शंकरराव इंगोलेची मदत झाली. जसे उत्तमराव मित्र होते तसेच मार्गदर्शक व प्रेरकही होते. ''वीर उत्तमराव मोहिते यांच्या जीवनकार्यापासून ज्वलंत प्रेरणा घेऊन बहुजन समाजाला विज्ञान निष्ठ व मानवी मूल्याचे रक्षण व संवर्धन करण्यासाठी मित्राने पुढकार घेतला.''[१७९]

एकंदरीत जीवन जगताना व्यक्ती समाजासाठी जगावा आणि समाजाला तो आपला वाटावा यात व्यक्तीची कसोटी असते. सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक मानवी जीवनाशी संबंधित कार्य करताना उत्तमरावांना काका व बापूंची खूप मदत झाली. एखादे उचललेले कार्य तत्परतेने सिद्धीस नेण्यास त्यांचे मित्र सहकार्याच्या भावनेने तत्पर राहिल्याचे दिसते. यावरून उत्तमराव मोहिते यांनी जीवाभावाच्या व्यक्ती जोडल्या होत्या असे म्हटले तर खरे ठरेल.

२.१०.३ पंढरीनाथ पाटील

पंढरीनाथ सीताराम पाटील यांचा जन्म २० सप्टें. १९०३ रोजी भाद्रपद वद्य चतुर्दशी शके १८२५ दुपारी १२ वाजता जन्म झाला. इ.स. १९१२ साली वयाच्या ९ व्या वर्षी विवाह झाला. लहानपणापासून किर्तनाचा छंद होता. ''सामाजिक प्रथेविरुद्ध पहिला बंड मावस बहीणीचा पुनर्विवाह घडवून आणला आणि सामाजिक कार्याला वाहून घेतले.''[१८०] सत्यशोधकीय विचार त्यांच्या मनाला भावला आणि शेवटपर्यंत कार्यात समरस झाले. अशा सत्यशोधकांची उत्तमरावांची भेट केव्हा झाली यांची निश्चित नोंद नाही, आहे ती उशीराची त्यांची भेट त्यापुर्वी झाली असावी. उत्तमरावांपेक्षा पंढरीनाथ पाटील ७ वर्षांनी मोठे होते. कारण ''पंढरीनाथ पाटील व उत्तमराव मोहिते यांनी पंजाबराव देशमुख यांना काँग्रेस प्रवेश करावा म्हणून पत्रे पाठवली

---

१७९. डॉ. काठोळे नरेशचंद्र (संपा.), श्री. दौलतराव गोळे परिचय पुस्तिका (शेवटची दोन पाने)

१८०. दांडगे ना.जा., पंढरीनाथ पाटलांचे चरित्र, पृष्ठ – १२.

होती. पंजाबराव काँग्रेस प्रवेशास तयार झाल्यावर त्यांनी उत्तमरावांना पंढरीनाथ पाटलांकडे पाठवले तेव्हा पंढरीनाथ पाटील उत्तमरावांना म्हणतात, 'गड्या उत्तम.'''[१८१] यामुळे उत्तमराव व पंढरीनाथ पाटील यांचा अनेक वर्षांपासूनचा संबंध असावा कारण पहिल्या भेटीत कोणी असे बोलणार नाही. ही भेट इ.स. १९४५ च्या सेंट्रल असेंब्ली निवडणुकी पूर्वीची होती. म्हणजे निवडणुक अगदी जवळ आली असता उमेदवारी निश्चित करताना भेट झाली. यामुळे निवडणुकी पूर्वी एक ते दोन महिना आधी पंढरीनाथ पाटलांशी उत्तमरावांची भेट झाली असावी असे म्हणता येईल.

उत्तमराव मोहिते व पंढरीनाथ पाटील यांनी डॉ. पंजाबरावांना काँग्रेसमध्ये आणण्याचे कार्य केले. यामुळे काँग्रेसमध्ये राहून पंजाबरावांनी जे कार्य केले. त्यात उत्तमराव पंढरीनाथ पाटील यांना महत्त्व प्राप्त होते. ''पंजाबराव देशमुखांनी जिल्हा काँग्रेस कमेटीच्या दिलेल्या राजीनाम्याची बातमी वऱ्हाडच्या चार जिल्ह्यात पसरली. येथे पंढरीनाथ पाटील देशमुखांकडे भेटायला आले तर उत्तमराव मोहिते पी. के. देशमुखांचे समर्थन मिळवण्यासाठी भेटायला गेले होते.''[१८२] येथे दोघे ही पंजाबरावांसाठी कार्य करताना दिसतात. ''डॉ. पंजाबराव देशमुखांनी हैद्राबादचे युवराज अमरावतीला आणण्यासाठी आमंत्रण दिले पण ते येणार नाहीत असे समजल्यावर पंढरीनाथ पाटलांवर स्थानिक जबाबदारी सोडून गेले.''[१८३] तर युवराजास घेऊन आल्यावर त्याच्या बंदोबस्तासाठी उत्तमरावांना ठेवले असावे. कारण पंजाबराव उत्तमरावांच्या इमानी कार्याला ओळखून होते आणि निजामाच्या युवराजाला त्रास होऊ नये यासाठी विश्वासू मंडळीची गरज होती. येथे पंढरीनाथ पाटील व उत्तमराव मोहिते एकाच कार्यक्रमात वेगवेगळ्या भूमिका वटवट होते. उत्तमराव मोहिते म्हणतात, ''चिखलीची अनेक विद्यालये व महाविद्यालयांचा विस्तार पंढरीनाथ पाटलांच्या निष्काम कार्याचा परिपाक आहे.''[१८४] ''विदर्भातील दोघे कार्यकर्ते संयुक्त महाराष्ट्र

---

१८१. *मोहिते वीर उत्तमराव, पूर्वोक्त, पृष्ठ – २८५.*

१८२. *कित्ता, पृष्ठ – ३१७.*

१८३. *कित्ता, पृष्ठ – ३३७.*

१८४. *कित्ता, पृष्ठ – ३५९.*

निर्माण करण्यासाठी लढले आणि पंजाबराव देशमुख हीरक महोत्सवात उत्तमराव आयोजक तर पंढरीनाथ पाटील मान्यवर म्हणून उपस्थित होते.''[१८५] पंढरीनाथ पाटलांना समाजभूषण ही उपाधी वर्धेच्या सत्यशोधक ब्राह्मणेत्तर परिषदेत दिली. इ.स. १९२५ तर उत्तमराव वीर म्हणून ओळखले जात. पंढरीनाथ पाटलांनी महात्मा फुलेंचे पहिले चरित्रकार होण्याचा मान घेतला तर ''उत्तमरावांनी पंजाबरावांच्या 'संदेश' साप्ताहिकात पंढरीनाथ पाटलांचे चरित्र इ.स. १९४९ मध्ये प्रसिद्ध केले.''[१८६] पंढरीनाथ पाटील विदर्भातील सत्यशोधक चळवळीचे महत्त्वाचे घटक होते. उत्तमराव मोहिते यांच्या सत्यशोधकीय कार्याबाबत पंढरीनाथ पाटील म्हणतात, ''राजश्री शाहू महाराजांनी बहुजन समाजाच्या उद्धाराचे तत्त्वज्ञान विसाव्या शतकाच्या सुरूवातीस सांगितले आहे. त्याच मार्गाने आजचा महाराष्ट्र वाटचाल करत असून उत्कर्षाची एकेक पायरी तो चढू लागला आहे. म्हणून राजश्री शाहू महाराज हे द्रष्टे पुरूष होते हे सिद्ध करण्यासाठी निराळा पुरावा देण्याची गरज नाही.''[१८७] यावरून उत्तमराव मोहिते व पंढरीनाथ पाटील यांच्यात सत्यशोधकीय विचारावरून चर्चा चालत असे हे दिसून येते.

पंढरीनाथ पाटील उत्तमरावांना पत्र पाठवतात त्यात म्हणतात, "ATHEISM IN INDIAN PHILOSOPHY हा ग्रंथ अंधारात चाचपडत चाललेल्या माणसाला जसा मशालीचा उपयोग होतो तसा धर्मभोळेपणाच्या खाईत पडलेल्या माणसाला आपला प्रबंध मार्गदर्शक होईल. तत्त्वज्ञानातील रूढ कल्पनांना कलाटणी देणारा हा प्रबंध विचार क्षेत्रात फार मोठी क्रांती करील या बाबत मला शंका वाटत नाही. भारतीय तत्त्वज्ञानातील ग्रंथात याचे स्थान अनन्य राहील.''[१८८]

एकंदरीत पंढरीनाथ पाटील व उत्तमराव यांनी एकाच ध्येयाने विदर्भात काम केले. उत्तमराव वयाने लहान असले तरी पंढरीनाथ पाटलांशी सहकार्याचे नाते

---

१८५. कित्ता, पृष्ठ – ३९४, ४३४.

१८६. डॉ. चोपडे अशोक, विदर्भातील सत्यशोधक चळवळीचे साहित्य, पृष्ठ –१३१.

*१८७. **MOHITE VEER UTTAMRAO, CULTURAL RENAISSANCE, PAGE - 41.***

१८८. पाटील पंढरीनाथ यांचे मोहिते वीर उत्तमराव यांना पत्र, दि. १६ सप्टेंबर १९५७.

पंजाबरावांमुळे जुळले आणि तसे मिळून कार्य ही केले. दोघांचे गाव वेगळे अपुरी वाहतूक असताना आपला संबंध शेवटपर्यंत टिकवून ठेवला आणि बहुजन समाजाच्या हिताच्या कार्याला वाहून घेतले. उत्तमरावांनी पंढरीनाथ पाटलांना प्रसिद्धीस नेले. तर कष्टकरी, अन्यायग्रस्त शेतकरी, दुबळ्या दीन–दलितांच्या सेवेसाठी आपले आयुष्य घालणारे सहकारी ठरले असे म्हटले तर योग्य होईल.

२.१०.४ मा.म. देशमुख

''मारोती महादेव देशमुख हे मा.म. देशमुख या नावाने महाराष्ट्राला परिचित आहेत. यांचा जन्म ११ जुलै १९३६ रोजी नागपूर जिल्ह्यातील खापरखेडा वीज केंद्राजवळील इसापूर गावी झाला.''[१८९] मा.म. देशमुख यांच्या विचारांवर उत्तमराव मोहित्यांचा स्पष्ट प्रभाव जाणवतो. ''उत्तमराव मोहिते व मा.म. देशमुख यांचा संबंध इ.स. १९६५ पूर्वी आला असावा. इ.स. १९५८ मध्ये प्रकाशित झालेल्या Exposition of Cosmic Truth या मोहिते यांच्या पुस्तकाच्या आधारावर मा.म. देशमुख यांनी इ.स. १९६८ मध्ये मध्ययुगीन भारताचा इतिहास हा ग्रंथ प्रकाशित केला.''[१९०] यामुळे ग्रंथ निर्माण कार्य व प्रकाशन यासाठीचा कालावधी पकडता त्यांची ओळख १९६५ पूर्वी झाली असावी. उत्तमराव मोहिते यांच्यापेक्षा मा.म. देशमुख २६ वर्षांनी लहान होते.

''उत्तमराव मोहिते मा.म. देशमुख यांना आपले मानसपुत्र मानत होते. तर देशमुख उत्तमरावांना गुरू मानत. उत्तमरावांची अंतिम इच्छा मा.म. देशमुखांनी आपला अत्यंविधी करावा असा होता.''[१९१] पण ते करू शकले नाहीत. यावरून उत्तमराव मा.म. यांचे संबंध जवळीकतेचे होते आणि मैत्रीपूर्ण होते असे म्हणता येईल. तर आचार्य अत्रे म्हणतात, '''त्या मारेकऱ्याचा गुरू' असा उल्लेखही करतात.''[१९२] यामुळे

---

१८९. *शिंदे इंद्रजित, शिवधर्माची महाराष्ट्रातील वाटचाल एक अभ्यास, अप्रकाशित, पृष्ठ – ६८.*

१९०. *मोहिते वीर उत्तमराव, जागतिक कृषक क्रांतीचा विधाता लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख, पृष्ठ – २३०.*

१९१. *देशमुख भाग्यरेखा यांची मुलाखत, दि. ११ ऑगस्ट २०११.*

१९२. *अत्रे आचार्य, दै. मराठा, दि. २८ जाने. १९६९.*

उत्तमराव व मा.म. देशमुख एक वैचारिक गुरू–शिष्य असून त्यांचे कौटुंबिक संबंध जिव्हाळ्याचे होते.

''इ.स. १९६९ मध्ये मा.म. देशमुखांच्या मध्ययुगीन भारताचा इतिहास या ग्रंथावरून महाराष्ट्रात वाद निर्माण झाला. मा.म. देशमुखांनी उत्तमरावांच्या ग्रंथांचा आधार घेतला होता. महाराष्ट्र शासनाने या ग्रंथावर बंदी घातली. ही बंदी मा.म. देशमुखांच्या पुस्तकावर होती पण संदर्भ मोहित्यांचा असल्याने उत्तमराव मोहिते यांनी संदर्भ पुरवण्याचे कार्य केले.'' उत्तमरावांचे बुलढाण्याचे मित्र उत्तमराव लहाने सांगतात, ''या वेळी उत्तमरावांनी शेकडो ग्रंथ गोळा केले होते.''[१९३] तसेच पुस्तकाच्या समर्थनार्थ ३० जाने. १९६९ रोजी अमरावतीत सभा आयोजित करून ठराव बिनविरोध संमत केला. या सभेचे संयोजन उत्तमराव मोहिते यांनी केले. तत्कालीन मुख्यमंत्री यांना पत्र पाठवले. ''शेवटी दि. ९ सप्टें. १९७० रोजी बंदी हुकुम रद्द होऊन मध्ययुगीन भारताचा इतिहास हा ग्रंथ मोकळा झाला.''[१९४] यावरून उत्तमराव मोहिते यांच्या कार्याचा पुढे चालवलेला वारसा मा.म. देशमुख असून मा.म. देशमुखांच्या ग्रंथावर उत्तमरावांचा प्रभाव दिसून येतो. मा.म. देशमुख धनवटे नॅशनल कॉलेजमध्ये नागपूर येथे इतिहासाचे प्राध्यापक असून त्यांना उत्तमराव मोहित्यांच्या विद्वतेचा व व्यासंगाचा फायदा झाला. मा.म. देशमुख उत्तमरावांबाबत म्हणतात, ''बहुजन समाजाच्या इतिहासासंबंधी सर्व जातीय इतिहास लेखकांकडून कळत न कळत झालेला अन्याय दूर करण्यासाठी सतत चिंतन, लेखन आणि तसे वर्तन करणारे सत्यशोधक इतिहास संशोधक आहेत.''[१९५]

एकंदरीत २०–२२ वर्षांची सोबत उत्तमराव व मा.म. देशमुखांची राहिली. आज ही मा.म. देशमुख उत्तमरावांचे अर्धवट कार्य पूर्णत्वास नेताना दिसतात. बहुजन समाज सुधारला पाहिजे. शिक्षण, धर्म, सामाजिक स्थान, अंधश्रद्धा यात अडकल्याने

---

१९३. *लहाने उत्तमराव यांची मुलाखत, दि. ११ ऑगस्ट २०११.*

१९४. *देशमुख मा.म., मनुवाद्यांशी लढा, पृष्ठ – ५९, ७०, ८१.*

१९५. *देशमुख मा.म. यांची मुलाखत, दि. २२ फेब्रुवारी २०१२.*

बहुजनांची प्रगती झाली नाही. त्यांना योग्य दिशा दाखविण्यासाठी आणि उत्थानासाठी एकमेकांच्या साहाय्याने कार्य करत राहिले असे म्हणता येईल.

२.१०.५ उत्तमराव मोहिते यांचे जेलमधील मित्र व सोबती

उत्तमराव मोहिते यांनी दोन वेळा सश्रम कारावास, एक वेळा साधी कैद आणि २० महिने स्थानबद्ध अशी एकूण ३९ महिने जेल भोगली. यात त्यांचे अनेक मित्र झाले. त्यात नागपूरचे कृष्णानंद सोख्ता, मध्यप्रदेश गोटेगावचे माणिकचंद जैन, वर्धायेथील महादेवराव ठाकरे यांची मैत्री झाली. या मैत्रीत ते देशाची स्थिती याबाबत वेगवेगळ्या अंगांनी विचार करत. या मित्राच्या धडाडीचा फायदा त्यांच्या मित्रांनी घेतला असावा. उत्तमरावांनी कॉम्रेड बाळासाहेब हुद्दार व कॉम्रेड शंकरराव दिघडेंना घरी भूमिगत आश्रय दिला. यामुळे उत्तमरावांचा मित्र परिवार वाढला. उत्तमराव मित्रांना कधी दु:खावत नव्हते किंवा स्वत:चा त्रास देत नव्हते म्हणूनच अनेकांशी त्यांची मैत्री झाली व ती टिकली. ''नागपूरच्या सेंट्रल जेलमध्ये 'क' वर्गाची शिक्षा भोगत असलेले 'मारोतराव कन्नमवार' हे विदर्भ प्रांतिक काँग्रेस कमेटीचे जनरल सेक्रेटरी होते. उत्तमरावांची त्यांच्याशी चर्चा चालायची याच एका चर्चेत कन्नमवार उत्तमरावांना म्हणतात, पंजाबरावांना काँग्रेसमध्ये आणायला पाहिजे उत्तमरावांचा तसा विचार होता. याचा परिणाम पुढे पंजाबरावांच्या काँग्रेस प्रवेशाने बहुजनांला राष्ट्रीय पक्षाचा कर्तबगार नेता मिळाला.''[१९६]

एकंदरीत उत्तमराव मोहित्यांना त्यांच्या कार्याला पुष्टी देणारे त्यांच्या सारखे शूर, धाडशी, कर्तबगार मित्र मिळाले आणि यामुळे उत्तमराव मोहित्यांना जीवन, समाज, धर्म, देश व आपले कर्तव्य साध्य करण्यास मदत झाली असे म्हणता येईल.

२.१०.६ उत्तमरावांचे बुलढाणा येथील मित्र

उत्तमराव मोहिते जसे उत्कृष्ठ लेखक होते तसे क्रांतिकारक व प्रभावी वक्ते होते. यांच्या वक्तृत्वातून निर्माण झालेली मैत्री बुलढाण्यातील ''आत्माराम अर्जुन

---

१९६. *मोहिते वीर उत्तमराव, जागतिक कृषक क्रांतीचा विधाता लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख, पृष्ठ – २८२.*

बाहेकर, उत्तमराव लहाने, ना.जा. दांडगे यांची मैत्री इ.स. १९७२ मध्ये झाली.''[१९७] या तीन व्यक्तिंनी उत्तमरावांना व्याख्यानासाठी आमंत्रित केले व कायमचे मित्र झाले. उत्तमराव मोहिते शिक्षक होते व ते परिणामकारक अध्यापन करत सेवानिवृत्त झाल्यावर त्यांचा अध्यापनाचा छंद कायमच होता. समाजाला विद्यार्थी समजून सतत अध्यापन करत असत असे बाहेकर सांगतात. त्यांच्या व्याख्यानाने प्रवृत्त होऊन आम्ही त्यांचे मित्र झालो.

उत्तमराव लहानेंना उत्तमराव मोहित्यांचा चांगलाच छंद लागला होता. लहानेंचा जन्म इ.स. १९३५ सालचा उत्तमराव मोहिते त्यांना २५ वर्षांनी वडील होते. लहानेंना आवडले ते महाराष्ट्रातील तीन नास्तिक, संडासमध्ये देव टाकणारे, त्यात केशवराव धोंडगे, माधवराव बागल, उत्तमराव मोहिते हे होत. त्यांना विचारले असता उत्तमराव मोहिते म्हणाले, ''हे देव दररोज खातात (नैवेद्य) पण संडास करत नाहीत म्हणून त्यांना संडास करण्यासाठी मध्ये टाकले.'' यावरून उत्तमराव मोहिते वास्तविक विचार करणारे होते असे म्हणता येईल. उत्तमरावांच्या मनातील विचाराला विचारपीठ उपलब्ध करून देण्याचे कार्य या मित्रांनी केले म्हणून उत्तमरावांचे विचार समाजापर्यंत पोहचवण्यास मदत झाली.

बुलढाण्यातील उत्तमरावांचे मित्र व सहकारी नारायण जानू दांडगे यांचा जन्म २५/०३/१९३८ मध्ये झाला. नारायण दांडगे यांनी बी.ए., बी.एड्. शिक्षण घेतले व अध्यापक विद्यालयात अध्यापक म्हणून कार्य करत दांडगे हे मानव धर्माचे पालन करणारे आहेत. स्पृश्य अस्पृश्य अशा बाबतीत भेद न करता समानता निर्माण करण्याचा प्रयत्न करणे, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करणे तसेच वैचारिक परिवर्तनासाठी उपक्रम बहुजन महापुरुषांच्या कार्याची उजळणी करत, व्याख्यानमाला घेत, दलित साहित्यिकांना प्रेरणा आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन, हुंडा विरोधी चळवळ, अशा सामाजिक कार्यात तत्पर असत.

---

१९७. लहाने उत्तमराव यांची मुलाखत, दि. ११ ऑगस्ट २०११.

''वृत्तपत्राच्या बाबतीत ते बुलढाणा येथे साप्ताहिक बुलढाणा पत्रिका चे संपादक राहिले. तसेच मराठा महासंघ मुंबई, सत्यशोधक समाज औरंगाबाद, भारत कृषक समाज दिल्ली अशा संघटनेचे अजीव सभासद असणारे दांडगे जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित आहेत.''[१९८] ना.जा. दांडगे व उत्तमराव मोहिते यांची भेट इ.स. १९७३ साली झाली. दोघांचे विचार व कार्य एकमेकांस पूरक आहेत. उत्तमराव, दांडगे यांचे मित्र, सहकारी तसेच मार्गदर्शक झाले.

''सत्यशोधक समाजाच्या विसाव्या अधिवेशाला ना.जा. दांडगे व उत्तमराव दोघे उपस्थित होते. येथे उत्तमराव मोहिते यांचा सत्यशोधक म्हणून सत्कार झाला.''[१९९] उत्तमराव मोहीते व दांडगे यांची वैचारिक जवळीकता होती.

एकंदरीत उत्तमरावांच्या मनातील भावना व्यक्त करण्यासाठी व ती लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी व्याख्याने आयोजित करून दांडग्यांनी महत्त्वपूर्ण कार्य केले. तत्कालीन परिस्थितीत उत्तमराव व त्यांच्या सारख्या विचारधारेच्या व्यक्तींना वरिष्ठ वृत्तपत्रे प्रसिद्धी देत नव्हती. यामुळे विचार समाजापर्यंत जाण्यास व्याख्यान प्रभावी माध्यम होते. ते मित्रांमुळे अनेक वेळा मिळाले व विचार पेरण्यास मदत केली असे म्हणता येईल.

२.१०.७ भाई माधवराव बागल

भाई माधवराव बागल हे महाराष्ट्राला परिचित असणारे पुरोगामी व्यक्तिमत्व असून ''राजश्री शाहू महाराजांचे एक दिवसाचे मुख्यमंत्री म्हणून कार्य केले.''[२००] त्यांनी भारतीय असमानता का आहे, याचा अभ्यास केला त्यात त्यांना दिसले की, ''बहुसंख्य समाज हिंदू असून हिंदू धर्मात देव, आत्मा, यांना जागा असून मनुष्य जीवाला जागा नाही. कारण हिंदू धर्माचा पाया मुळात असमानतेवर आधारलेला आहे. म्हणून जोपर्यंत हिंदूधर्म आहे तो पर्यंत महारवाडा, मांगवाडा राहणार हा नष्ठ

---

१९८. दांडगे ना.जा. यांचे दलित मित्र पुरस्कारासाठीचे (अप्रकाशित साहित्य)

१९९. वाघमारे आ.कृ. (संपा.), दै. मराठवाडा, शहर आवृत्ती, दि. २८ नोव्हें. १९८८.

२००. लहाने उत्तमराव यांची मुलाखत, दि. ११ ऑगस्ट २०११.

होत नाही. तोपर्यंत सामाजिक विषमतेचे उच्चाटन होणार नाही.''[२०१] यावरून बागल यांनी समाजाचा विकास कशामुळे थांबतो आहे याचे विवेचन केले आणि प्रगती साध्य करण्याचा मार्ग ही सुचवला. ''आमच्या राज्यघटनेत देवाच्या अस्तित्वाचा कर्तृत्वाचा कोठेही नामोल्लेख नाही पण आमचे आमदार, खासदार मंत्री व नेते हे आदेश गुंडाळून कोणत्याही शहराला भेट दिली की प्रथम तेथील देवालयाला भेटतात मग जनता त्यांचे अनुकरण करते.''[२०२] माधवराव बागल यांना 'पद्मविभूषण' दिला होता. यावरून त्यांच्या व्यक्तिमत्वाची कल्पना करता येईल.

उत्तमराव मोहिते यांच्याच तोडीचे एक पाऊल पुढे असणारे बागल ही महाराष्ट्राला परिचित आहेत. स्वातंत्र्य संग्रामात त्यांनी जीवाची पर्वा न करता उडी घेतली. त्यांच्या पुस्तकातील संदर्भ घेऊन मा.म. देशमुखांनी लिहिलेल्या ग्रंथ मध्ययुगीन भारताचा इतिहास आणि या संदर्भाने महाराष्ट्रात उडलेले वादळ अशा वेळी भाई माधवराव बागल यांनी उत्तमरावांना मदत केली. त्यांच्या विरोधी लेखन करणारे ''आचार्य अत्रे यांच्या 'मराठा' दैनिकावर बंदी घाला अशी मागणी केली तर दत्ता बळ आपल्या उत्तमबुवा ते बागुलबुवा यात दोघांना एकत्र गुंफतात.''[२०३] यावरून उत्तमराव मोहिते व माधवराव बागल बागल यांचा एकत्रित उल्लेख दोघांची ऐक्य दर्शवतो.

''उत्तमराव मोहिते व माधवराव बागल संयुक्त महाराष्ट्र निर्माण करण्यासाठी प्रयत्न करतात. उत्तमराव मोहिते यांनी आरंभीलेल्या डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती मंचाच्या विद्यमानाने विज्ञान यज्ञात वाचलेल्या संदेशात माधवराव बागलांचा संदेश होता.''[२०४]

यावरून उत्तमराव मोहिते व माधवराव बागल यांनी आजचा महाराष्ट्र पुरोगामी महाराष्ट्र घडवला असे म्हणता येईल.

---

२०१. धोंडगे केशवराव (संपा.), साप्ता. जयक्रांती (विशेषांक), दि. १३ सप्टें. १९८३, पृष्ठ – ५.

२०२. कित्ता, पृष्ठ – ६.

२०३. अत्रे आचार्य, दै. मराठा, दि. १७ मार्च १९६९.

२०४. मोहिते वीर उत्तमराव, पूर्वोक्त, पृष्ठ – ३९४, ५३०.

२.१०.८ केशवराव शंकरराव धोंडगे

केशवराव शंकरराव धोंडगे हे मराठवाड्यातील नांदेड जिल्ह्यातील कंधार तालुक्यात वास्तव्यास आहेत. ''ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक, माजी खासदार व आमदार म्हणून जनसेवा केली. अशा देश सेवा व जनसेवा करणारे केशवरावांचे आज तीस पेक्षा जास्त ग्रंथ प्रकाशित झाले असून इ.स. १९५८ पासून 'जयक्रांती' नावाने साप्ताहिक चालवतात. यांचा जन्म १६/०७/१९२३ रोजी झाला.''[२०५] उत्तमराव मोहिते यांच्या पेक्षा केशवराव धोंडगे तेरा वर्षांनी लहान आहेत. त्यांनी १९/०७/२०१२ या वर्षी ९० व्या वर्षात पदार्पण केले. तरी त्यांचा जोश अजून तरूणासारखा आहे. उत्तमराव मोहिते यांच्याकडे केशवराव धोंडगे येत असत. इ.स. १९५२ च्या काळात शिक्षणासाठी केशवराव अमरावतीला होते. येथे उत्तमरावांची त्यांची चांगलीच मैत्री जमली. धोंडगे यांनी श्री शिवाजी मोफत एज्युकेशन सोसायटी ता. कंधार येथे स्थापन केली. या संस्थेत व्याख्यानासाठी उत्तमराव मोहिते यांना आंमत्रित करत असत. या संस्थेत अकरावे वार्षिक स्नेह संमेलनासाठी 'वीर उत्तमराव मोहिते' प्रमुख पाहुणे म्हणून बोलावण्यात आले होते. तसेच सोळावे (१६) वार्षिक स्नेह संमेलन इ.स. १९७० मध्ये प्रमुख पाहुणे म्हणून उत्तमरावांना बोलावले होते.

''उत्तमराव मोहिते यांच्या व्याख्यानासाठी जाहिरात केली त्यात त्यांना विदर्भ केसरी उत्तमराव मोहिते असे संबोधले आहे.''[२०६] तशी त्यांची व्याख्याने कंधार येथे झाली. उत्तमराव मोहिते यांना अनुकूल कार्य केशवराव करत असत. ''उत्तमरावांचे समर्थन केल्यामुळे आचार्य अत्रे यांनी उत्तमरावांबरोबर केशवराव धोंडग्यांवर टीका केली याला उत्तमराव आगपाखडली असे म्हणतात.''[२०७] संयुक्त महाराष्ट्राच्या लढाईत केशवराव धोंडग्यांनी सहभाग घेऊन उग्र लढा दिला. यामुळे उत्तमरावांसारखाच केशवराव धडाडीचा राष्ट्रभक्त व समाजक्रांतिकारक असल्याचे दिसते. केशवरावांचे

---

२०५. *डॉ. धोंडगे केशव शंकर, उपेक्षित शहिदे आजम : युगपुरूष छत्रपती संभाजी महाराज, पृष्ठ –*

२०६. *शिवाजी हायस्कूल, कंधार यांच्या वार्षिक स्नेह संमेलनाची पत्रिका.*

२०७. *मोहिते वीर उत्तमराव, पूर्वोक्त, पृष्ठ – २४०.*

उत्तमराव मोहिते यांचे घरापर्यंत जाणे येणे होते. मैनाबाई म्हणतात, माझ्याकडे जेवायला येत असत. तर उत्तमराव मोहित्यांच्या निधनांची बातमी समजताच ते अमरावतीला आले. यावरून त्यांच्यातील जवळीकता समजते.

उत्तमराव मोहिते यांच्या मित्र परिवारातील मित्र आणि जीवाभावाचे साथी असणारे केशवराव धोंडगे तत्कालीन परिस्थिती, अज्ञान, अंधश्रद्धा, कर्मठपणा यांच्या विरोध जोरदार लढाई करत होते. दोघेही भारतीय स्वातंत्र्यासाठी झगडणारे लढवय्ये अजून त्यांना खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य मिळाले नव्हते. गरीब समाज आणि त्यांच्या वेदना यांना बदलण्याचा प्रयत्न करत होते. सर्वांची दु:ख दारिद्र्याची कारणे शोधून बदलात्मक उपाय करण्याचा प्रयत्न करताना दिसतात.

२.१०.९ सुधाकर मोहड

सुधाकर शेषेराव मोहड यांचा जन्म २९ ऑगस्ट १९३१ रोजी कुरळपुर्णा या अमरावती जिल्ह्यातील लहानशा खेडेगावी झाला. वडीलांचा व्यवसाय शेती होता. उत्तमराव मोहिते यांच्या जवळचे म्हणजेच भावकीतले होते. अर्थशास्त्र विषयात नागपूर विद्यापीठातून एम.ए. झाले. यांनी भारतीय सैन्यात १९४९ ते १९५४ या कालावधीत नोकरी केली. यानंतर धनवटे नॅशनल कॉलेज नागपूर येथे प्राध्यापक व्यवसाय पत्करला. सुधाकर मोहड यांनी अनेक संस्थाच्या माध्यमातून जनविकास करण्याचे कार्य केले. ते भारत कृषक समाज, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती, अखिल भारतीय मराठा महासंघ, मुंबई, कुणबी युवा समाज नागपूर या संस्थाचे आजीव सभासद राहिले. तसेच अनेक शासकीय समिती मध्ये कार्य केले. महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोष निर्मिती मंडळ, मुंबई, महाराष्ट्र राज्य शिक्षण सल्लागार समिती, पुणे यांचे कार्य पाहिले.

सुधाकर मोहड यांनी अनेक ग्रंथ लिहिले. त्यात विदर्भाचा अग्निपुरूष, उत्तमराव मोहिते यांच्यावर महत्त्वाचे पुस्तक आहे. तसेच जागतिक कृषक क्रांतीचा विधाता लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख या ग्रंथाला त्यांची २०० पानांची प्रस्तावना आहे. मोहड यांनी उत्तमरावांच्या कार्य कर्तृत्व नोंदवून ठेवले. ते उत्तमरावांच्या जवळचे

असल्याने उत्तमराव व त्यांची परिस्थिती चांगली माहित होती. डॉ. पंजाबराव देशमुख, दौलतराव गोळे यांच्यावर पुस्तक, ग्रंथ, लिहून त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा आलेख मांडण्याचा प्रयत्न केला. त्यांचे अनेक लेख व जीवनपट पाहिले असता ते एक व्यासंगी विद्वान असल्याचे दिसते.

सुधाकर मोहड यांचे हस्तलिखित व त्यांची मुलाखत यावरून त्यांना इतिहासाविषयी ज्ञान असल्याचे समजते. ''डॉ. पंजाबराव देशमुख वैज्ञानिक संस्कृती पीठाच्या माध्यमातून घडवून आणलेला विज्ञान यज्ञ यात मोहडांचा सहभाग होता.'' मोहड उत्तमरावांबाबत म्हणतात, ''मानसशास्त्र, तत्त्वज्ञान, संख्यायोग, इतिहास आणि सतत अभ्यासाची पक्की बैठक म्हणजे उत्तमराव''[२०८] आणि या ग्रंथाला (जागतिक कृषक क्रांतीचा विधाता लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख) लिहिलेली प्रस्तावना ही आहे.

एकंदरीत उत्तमराव मोहिते यांना सुधाकर मोहड हा जसा कुटुंबातील व्यक्ती होता तसेच त्यांच्यासाठी उत्तम मित्र होता. अनेक बाबींवर चर्चा करायचे. यामुळे मोहडांचे सहकार्य उत्तमरावांना लाभले आणि उत्तमरावांच्या मृत्युनंतरही त्यांनी उत्तमरावांना विसरले नाहीत. मोहड आज हयात असून नागपूरात वास्तव्यास आहेत. ते उत्तमरावांना प्रत्यक्ष लढताना आणि कार्य करताना पाहणारे असल्याने त्यांच्या लिखाणात बनावटी नाही तर प्रत्यक्ष पाहिले अनुभवले ते लिहिले.

२.१०.१० ज.सी. अकर्ते

जगन्नाथ सीताराम अकर्ते हे उत्तमराव मोहिते यांच्यापेक्षा मोठे असावेत. ''१९२४ च्या मध्यप्रांत वऱ्हाड येथे भरलेल्या ब्राह्मणेत्तर परिषदेत केशवराव वागडे यांच्याशी वाद घातला. यावेळी उत्तमराव मोहित्यांचे वय १४ वर्षाचे होते आणि नागपूरचा हिलॉप कॉलेजमध्ये शिकत होते. येथे त्यांनी ब्राह्मणेत्तर विचारांनी प्रभावित होऊन कार्य करत याच कॉलेजमध्ये महात्मा जोतीराव फुले यांचे तैलचित्र लावण्यासाठी

---

२०८. *कित्ता, पृष्ठ – ५१९.*

अकर्ते यांनी यशस्वी आंदोलन केले.''[२०९] यावरून अकर्ते हे वयाने उत्तमरावांपेक्षा मोठे होते हे समजते आणि त्यांच्यात बहुजन समाजाविषयी चांगली जाण निर्माण झाली होती असे दिसून येते.

अकर्ते आणि उत्तमराव यांची भेट केव्हा झाली. याबाबत निश्चित उल्लेख मिळत नाही. अकर्ते यांना ब्राह्मणेत्तरांबाबत चांगली जाण झाली असली तरी ब्राह्मणेत्तर विचारधारा पूर्णपणे रूजली नव्हती जर रूजली असती तर डॉ. पंजाबराव देशमुख जो ब्राह्मणेत्तर तत्त्वाला पोषक कार्य करणाऱ्या शेतकरी दीन–दुबळ्यांना आधार देणाऱ्या ''पंजाबराव देशमुख यांच्या विरोधात प्रचार केला नसता.''[२१०] हा काळ १९३६,३७ चा होता. यावेळी उत्तमराव मोहिते २६ वर्षाचे होते आणि डॉ. पंजाबराव देशमुखांशी निकटचे संपर्क होते. अकर्तेच्या विरोधामुळे याच सुमारास उत्तमराव मोहित्यांनी त्यांची भेट घेतली असावी असे वाटते. या भेटीमुळे पुढे १९३८ मध्ये अकर्ते उत्तमरावांची बाजू मांडत होते. ते शंकरदेवांना म्हणतात, ''रामदास यांच्यावर तुम्ही तुमचे विचार मांडा आम्हाला काही आक्षेप नसेल तर आम्हांस बोलण्याची गरज नाही.''[२११] उत्तमरावांनी शंकरराव देवांना प्रश्न विचारला असता शंकर देवांनी तुमची बाजू मांडा असे सांगितले त्यावर अकर्ते यांनी वरील विधान केले. यावरून अकर्ते आता उत्तमराव मोहित्यांशी चांगले जुळले होते.

उत्तमराव मोहिते यांच्या विचाराला अकर्ते यांनी पाठिंबा दिला होता आणि यामुळेच पंजाबराव देशमुखांचे महत्त्व त्यांना पटले म्हणूनच त्यांनी १९४५ च्या सेंट्रल असेंब्लीच्या निवडणुका वेळी पंजाबराव काँग्रेसमध्ये यावे असे वाटत होते. नामांकन पत्र भरण्याच्या दिवशी मुद्दाम अकर्ते अकोल्यावरून अमरावतीस आले होते आणि डॉ. पंजाबराव देशमुख यांना म्हणाले, ''भाऊसाहेब तुम्ही आम्हांला काँग्रेसमध्ये हवे आहात काँग्रेस उमेदवाराच्या विरोधात तुम्ही निवडणुक लढले तर तुम्ही स्वत:चे नुकसान

---

२०९. *कित्ता, पृष्ठ – १२२.*

२१०. *कित्ता, पृष्ठ – २१०.*

२११. *कित्ता, पृष्ठ – २३३, ३४.*

करणार नाहीत तर त्यात वऱ्हाडातील साऱ्या श्रमजीवी बहुजन समाजाचे नुकसान निश्चित होणार आहे.''[२१२] यावरून अकर्ते यांना उत्तमरावांशी मैत्री झाल्याने या बाबी समजल्या म्हणून त्यांनी पंजाबरावांना आपले उमेदवारी मागे घ्यायला लावली असावी असे म्हणता येईल.

अकर्ते आणि उत्तमराव यांचा संपर्क शेवट तुटला नाही. इ.स. १९८४ मध्ये उत्तमरावांना पत्र पाठवतात आणि राष्ट्र संत तुकडोजी महाराजांच्या अमृत महोत्सवास इंदिरा गांधी यांना नेण्याचा प्रयत्न होत असल्याचे सांगतात. तसेच अमरावती कॉर्पोरेशन साडेतीन लाख रूपये खर्च करून वीर वामनरावाचा पुतळा उभा राहणार आहे. सध्या त्यांचा पुतळा जोशी बाजारात आहेच आणि म्युनिसिपालटीने ते केला आहे. या पैशात भाऊसाहेबांचा पुतळा उभा राहावा कारण गावात त्यांचे काहीच नाही. ''यासाठी डॉ. राम धोंडे यांना उत्तमरावांची भेट घेण्यास सांगतात व गाळेसाहेबांना कळवावे असे सांगतात.''[२१३] यावरून जशी पंजाबरावांप्रती उत्तमरावांची बहुजन हिताच्या दृष्टीने निष्ठा होती तशीच अकर्ते यांची असल्याचे दिसते आणि भाऊसाहेबांचा पुतळा १९८६ साली पत्र पाठवून अकर्ते म्हणतात, ''सुदाम सावरकर व तुम्ही लिहिलेल्या दोन्ही चरित्राचे वाचन करत आहे. तुमचे पुस्तक वाचून मी स्तंभितच झालो.''[२१४]

एकंदरीत ज.सी. अकर्ते व उत्तमराव एका वैचारिक दृष्टीने वाटचाल करत असून बहुजन समाजाच्या हितासाठी विचारांचा प्रसार करतात. समाजाचा विकास साध्य करण्यासाठी उत्तमरावांनी आपल्या आयुष्यात जास्तीत जास्त वेळ दिला. या कार्यात त्यांना ज.सी. अकर्ते यांची मदत झाली असे म्हणता येईल.

२.१०.११ दादासाहेब जगताप

दादासाहेब जगताप हे कोल्हापूरचे असून बहुजन समाजाच्या उत्थानाचे कार्य करणारे आहेत. उत्तमराव मोहिते व दादासाहेब जगताप यांचा संपर्क इ.स. १९६९ च्या

---

२१२. *कित्ता, पृष्ठ – २८७, ८८.*

२१३. *अकर्ते ज.सी. यांचे मोहिते वीर उत्तमराव यांना पत्र, दि. ०९ मे १९८४.*

२१४. *कित्ता, दि. २९ ऑक्टोबर १९८६.*

दरम्यान आला. मा.म. देशमुख यांना लिहिलेल्या मध्ययुगीन भारताचा इतिहास या ग्रंथात उत्तमराव मोहिते यांच्या Exposition of Cosmic Truth या ग्रंथातील संदर्भ घेतला आणि शिवाजी महाराजांचे गुरू रामदास स्वामी नाहीत असे सांगितले. या ग्रंथावर तत्कालीन महाराष्ट्र शासनाने बंदी घातली. महाराष्ट्रातील सर्व प्रतिगामी एक होऊन मा.म. देशमुख व उत्तमरावांवर प्रहार करू लागली. उत्तमरावांना ही नैतिक व ऐतिहासिक जबाबदारी आपल्यावर असल्याचे जाणवून प्रतिगामींच्या विरोधाला जवाब देणे गरजेचे होते. मा.म. देशमुखांनी आचार्य अत्रे यांना उत्तमरावांच्या ग्रंथाच्या प्रती पाठवून उत्तमरावांना या बाबीकडे आकर्षित केले होते. उत्तमराव तयार होते या विराधाचे खंडण करण्यासाठी ज्या वृत्तपत्रांनी टीका केली त्या वृत्तपत्रांची नैतिक जबाबदारी असते की, विरोधकांच्या विचाराला प्रसिद्धी देणे. पण हा शिष्टाचार वृत्तपत्रकारांनी पाळला नाही.

उत्तमराव मोहिते यांच्याकडे असे प्रसिद्धीचे माध्यम नव्हते आणि उत्तर दिले नाही तर गैरसमज होण्याची शक्यता असते. अशावेळी दादासाहेब जगताप यांनी उत्तमरावांच्या विचाराला प्रसिद्धी देण्याचे कार्य केले. साप्ताहिक बहुजन समाजमध्ये जगताप म्हणतात, ''वीर उत्तमराव मोहिते यांच्या लिखाणाबाबत कोणाचे काही मतभेद जरूर असू शकतील ! पण या माणसांना अर्धशिक्षित म्हणणारे बेहरे स्वत: अर्धवट आहेत एवढेच उत्तर त्यांना पुरेसे ठरावे ! वीर उत्तमराव यांचे वाचन आणि व्यासंग व इंग्रजी वरचे प्रभुत्व एवढे उल्लेखनीय आहे की, बेहरेसारख्यांनी त्यांच्या हाताखाली धडे घ्यावे.''[२१५] बहुजन समाज या साप्ताहिकाने उत्तमरावांवर होणाऱ्या टिकांना तोंड देऊन उत्तमरावांना प्रसिद्धीची बाजू सांभाळून त्यांचे विचार बहुजनांपर्यंत नेऊन पोहचण्यास मदत केली तसेच ''उत्तमरावांनी मा.म. देशमुख यांच्या ग्रंथावरील बंदी घातल्याच्या निषेधार्थ पत्र मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांना लिहिले. मा.म. देशमुख यांच्या पुस्तकावरील बंदी म्हणजे बहुजन समाजाच्या विचार स्वातंत्र्याला विचार प्रकट

---

२१५. *जगताप दादासाहेब (संपा.), बहुजन समाज (साप्ताहिक), पृष्ठ – १.*

करण्याला व प्रकाशनाला स्पष्ट नकार देणेच होय.''[२१६] उत्तमरावांचे हे विचार पुढे न्यायालयाचे निकालावरून खेरे वाटतात. न्यायालयाने पुस्तकावरची बंधी उठवली. न्यायालयाने न्याय करण्याआधी रास्त बाजू बघून त्या न्याय दिला. तसेच उत्तमरावांच्या अनेक पत्रांना व लेखांना प्रसिद्धी दिली.

उत्तमराव मोहिते यांनी जो संयुक्त महाराष्ट्राचा लढा दिला. या लढ्यामध्ये दादासाहेब जगताप सहभागी होते. त्यांनी कोल्हापूरातून लढा दिला. केवळ शिवाजी रामदास वादाच्या संदर्भानेच नव्हे तर संयुक्त महाराष्ट्र व धार्मिक व सामाजिक लढ्यात दादासाहेब जगताप सामील झाल्याचे दिसतात. हिंदू धर्म व्यवस्थेने व्यक्तीला गुलाम बनवले असून या गुलामीतून समाजाला बाहेर काढण्याचा प्रयत्न उत्तमराव करताना दिसतात. हे उत्तमरावांचे विचार सार्वत्रिक विचार बनवण्यास जगतापांचे बहुजन समाज सतत तयार राहिले.

'''ब्रह्मविद्या कामशास्त्राचे विकृत स्वरूप आहे' हा प्रबंध बहुजन समाज या साप्ताहिकाने प्रसिद्ध केला तो अनुक्रमे पाच लेखांकात.''[२१७] महाराष्ट्रातील महापंडितांनी यावर आक्षेप घेतला नाही ! अशाप्रकारे उत्तमरावांच्या राजकीय, सामाजिक, इतिहासविषयक धार्मिक, सांस्कृतिक परिवर्तनाच्या लढ्यामध्ये मदत करून खरा मित्रपणा सिद्ध केला. या मित्रत्वामध्ये जो आकर्षित करणारा घटक होता तो म्हणजे बहुजन हिताची चळवळ यामुळे वैचारिक बाबतीतून निर्माण झालेल्या मित्राने मैत्री टिकवली व निभवली असे म्हणता येईल.

एकंदरीत वीर उत्तमराव मोहिते यांचा जीवनवृत्तांत व यात त्यांच्या मित्र व सहकार्याची भूमिका अभ्यासली असता सर्व महाराष्ट्रभरातून वीर मोहिते यांना वैचारिक जवळीकता लाभली होती. अत्यंत खडतर जीवन जगले. सामाजिक, धार्मिक, राजकीय, सत्यशोधकीय व सांस्कृतिक जीवन बदलण्याचा प्रयत्न केला. वीर उत्तमराव मोहिते ज्या परिस्थितीत आपल्या विचारांची पेरणी करत होते ती परिस्थिती पोषक

---

२१६. *कित्ता, दि. ०३/०८/१९६९.*

२१७. *मोहिते वीर उत्तमराव, पूर्वोक्त, पृष्ठ – ५३४.*

नव्हती. माळरानावरती उन्हाळी पीक पाण्याची वाहतुक करून टँकरच्या पाण्यावर घ्यावे व माळरान फुलावे असा अवघा महाराष्ट्र फुलवला.

कौटुंबिक वातावरणात रमण्यापेक्षा ते सार्वजनिक वातावरणात जास्त रमले तरी आपल्या पाल्यांना योग्य शिक्षण देऊन लायक बनवले आणि सामाजिक, स्वातंत्र्यविषयक प्रश्न तलवार व लेखणी उचलून खंडन–मंडन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. पंजाबराव देशमुख यांनी पुरोगामित्वाचा चालवलेला वारसा पुढे काळाच्या व परिस्थतीच्या संदर्भाने चालू ठेवला.

उत्तमराव मोहिते यांनी आपल्या विचाराने अनेक जिवलग मित्र बनवले. मित्रांना मदत व मित्रांची मदत असा वैचारिक आदान प्रदानाच्या माध्यमातून एक वैचारिक व सांस्कृतिक परिवर्तनाची चळवळ उभी केली. व्यक्तीबरोबर अनेक संस्था निर्माण केल्या व महाराष्ट्रात मानवतावादी विचार निर्मितीची चालना दिली. आजच्या पुरोगामी चळवळीला उत्तमराव एक मार्गदर्शक वाटतात तर प्रतिगामी विचारधारा उत्तमरावांच्या विचारांना लोकांचा विचार बनू नये म्हणून सतत तत्पर असल्याचे दिसते. म्हणूनच की काय आज डॉ. आंबेडकर, डॉ. पंजाबराव, फुले, शाहू यांचा वारसा महाराष्ट्राला अपरिचित राहिला असे म्हणता येईल.

***

प्रकरण तिसरे

इतिहास लेखन परंपरा व उत्तमरावांचे इतिहास लेखन

मानवाची व्युत्पत्ती पृथ्वीवरील महत्त्वाची घटना ठरली. मानवाने निसर्गाशी संवाद करत आपली जीवनपद्धती निश्चित केली. या जीवनपद्धतीला तात्विक आधार दिला व जीवन व्यवहारासाठी दैनंदिन नियम त्यात समाविष्ट करून स्वत:ला अफाट निसर्गात साचेबद्ध करून घेतले आणि निसर्गाचे कोडे उलगडू लागला. नव्या माहितीने नाविण्य आणले आणि यानुसार जीवन पद्धतीत व तत्त्वात बदल होत राहिले. हे बदल स्मरणाने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हजारो वर्ष वारसा, आठवण, सत्य, घटना सुखदायक, दु:खदायक पद्धतीने जतन केले आणि कालांतराने ते शब्दबद्ध व अक्षरबद्ध झाले. यात मानवी जीवनाशी संबंधीत बाबी व विशेष मानवी जीवनावर प्रकाश टाकला याला इतिहास असे नाव दिले. या संस्कृत शब्दाचा विग्रहात्मक अर्थ याची प्रचिती देतो. इतिहास या शब्दाचा विग्रह केला असता इति ह आस हे असे घडले यात घडलेल्या सर्व गोष्टी आल्या आणि त्या जशा घडल्या तशाच सांगणे इथे अभिप्रेत आहे. प्राचीन काळापासून आजतागायतच्या घटना व प्रसंगांची नोंद वेगवेगळ्या पद्धतीने घेतली आहे. या नोंदी म्हणजे इतिहास होत नाही. म्हणून इतिहास लेखन काय आहे याचा उलगडा आवश्यक होतो.

३.१ इतिहास लेखन म्हणजे काय?

वेगवेगळ्या इतिहासकारांनी इतिहासाच्या व्याख्या केल्या. राजकीय व्यक्ती, समाजशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ यांनी ही इतिहासाचा नेमका अंदाज घेण्याचा प्रयत्न केला. इतिहासाच्या स्वरूप व उद्दिष्टे यांचा अभ्यास करून इतिहास लेखन करता येते पण यात गोंधळाची स्थिती असल्याचे दिसते. यामुळे अनेक व्याख्यांच्या अभ्यासातून

इतिहास लेखन म्हणजे काय हे स्पष्ट होते. इतिहास लेखन, धारणाएँ तथा पद्धतीयाँ या ग्रंथात ''डॉ. के. एल खुराणा व डॉ. आर. के. बंसल''[१] म्हणतात, इतिहासाच्या व्याख्यांचा अभ्यास केला असता एकही व्याख्या परिपर्ण नाही परंतु या आधारावर असे म्हणू शकतो की, ''जगातील विभिन्न समाजांच्या वर्तमानाचा नि:पक्षपाती कालक्रमानुसार निष्पक्ष आणि चिकित्सक वर्णन इतिहास आहे.'' खुराणा, बंसल यांनी वेगवेगळ्या नामांकित इतिहासाशी संबंधीत व्याख्या घेऊन आपली व्याख्या सांगितली. यावरून हे निश्चित इतिहास मानवी जीवनाशी निगडीत आहे. मानवाला जीवन जगताना येणाऱ्या अडचणी व त्या सोडवण्यासाठी ज्याच्या आधारे प्रयत्न केले ते आधार इतिहासाशी संबंधीत बनतात. मानवी कृतीचा अभ्यास इतिहासात होतो असे म्हणता येईल.

इतिहास लेखन करत असताना त्यातील सत्याचा विपर्यास होण्याची शक्यता नाकारता येत नाही. कारण इतिहास लिहिणारा कोणत्या विचाराने प्रभावित झाला आहे. यावरून लेखन त्या प्रभावाने होण्याची शक्यता असते. वस्तुनिष्ठता असण्यासाठी प्रो. ब्लेक, विल्यम ड्रे, पोलिबिअस यांनी मांडलेले विचार व यानुसार झालेले लेखन इतिहास म्हणता येते.

३.२ इतिहासकार कोणास म्हणावे?

गतकाळाविषयी माहिती देणारा प्रत्येकजण इतिहासकार असतो असे संभवते मग स्वत:च्या जीवनातील गतअनुभव सांगणारा प्रत्येकजण इतिहासकार ठरेल. व्यापारी, व्यापारी संस्था, संघटना, शिक्षणसंस्था स्वत:चे अनुभव, जमाखर्च, प्रवासवर्णन यांची नोंद करणारा याला इतिहासकार म्हणावे लागेल. पण तसे म्हणता येत नाही. कारण, जे जाणीवपूर्वक भूतकाळाची पुर्नबांधणी, पुर्नमांडणी करण्याचे कार्य करताना इतिहास लेखनशास्त्राची तत्त्वे विचारात घेऊन करतात त्यांनाच इतिहासकार (Historian) असे संबोधता येईल.

---

१. *खुराणा के.एल., बंसल आर.के., इतिहास लेखन धारणाएँ तथा पद्धतीयाँ, पृष्ठ – ५.*

कष्ट सहन करण्याची क्षमता, शांत, नम्र, धीर गंभीर व चौकस असावा पूर्वग्रह असू नये, त्रयस्थपणा असला पाहिजे, केवळ निंदा, नकार अशी बाजू असू नये. या गुणांबरोबर कार्यातून पुढीलपैकी एखादी गोष्ट केली पाहिजे.

- नवी माहिती उजेडात आणणे. (Addition of New Data or Sources)
- माहिती असलेल्या घटनांचा अन्वयार्थ लावणे. (New interpertation of known data or sources)
- उपलब्ध घटनांना एखाद्या तत्त्वांचे रूप देणे. (Subordination of data or sources to a principle)

आपले लेखनातून जो असे कार्य दर्शवतो आणि लेखनात ज्या पुरव्यांचा आधार आहे. त्यातून जे सत्य बाहेर येते तेच मांडावे अशी अपेक्षा असते.

''इ.एच. कार म्हणतो, It is the Historian who speaks through the facts.''[२] प्रत्येक नवा इतिहासकार गतकाळाला नवे प्रश्न विचारतो आणि घटनांचा आपल्या परीने अर्थ लावण्याचा प्रयत्न करतो. अनेक प्रश्न व प्रश्नांची साखळी तयार करून समाधानकारक उत्तरे मिळवतो व ऐतिहासिक सत्याच्या अधिकाधिक जवळ जातो. वीर उत्तमराव मोहिते यांनी गतकाळाला नवे प्रश्न विचारले. त्यांच्या भारतीय तत्वज्ञानातील निरिश्वरवाद या छोट्या प्रबंधातून त्यांनी भारतीय तत्त्वज्ञानाला नवे प्रश्न विचारून प्रश्नांची मालिका तयार केली व विश्वोत्पत्तीच्या कारणांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. यामुळे उत्तमराव मोहिते इतिहासकाराच्या मालिकेत बसतात.

यावरून असे म्हणता येईल की, मानवाने मानवी जीवनाशी निगडित बाबी गतअनुभवावरून वास्तव वर्तनासाठी व भविष्यास मार्गदर्शन ठरवण्यात म्हणून केलेली नोंद इतिहास असून एखाद्या व्यक्तीच्या मर्जीनुसार नव्हे तर सत्य आहे म्हणून ज्या नोंदी केल्या त्या नोंदी करणारांना इतिहासकार म्हणून संबोधले आहे, म्हणून उत्तमराव मोहिते इतिहासकार असल्याचे दिसून येते.

---

२. *गाठाळ एस.एस., इतिहासाचे तत्त्वज्ञान, पृष्ठ – १३०,१३१.*

३.३ भारतीय इतिहास लेखन परंपरा

प्राचीन काळापासून इतिहास आजतागायत मानवासाठी मार्गदर्शक राहिला. ग्रीक, रोमन यांच्या सारखा भारतालाही प्राचीन वारसा आहे. लेखन कार्य ही प्राचीन काळापासून भारतात झाल्याचे दिसून येते. पण इतिहासाच्या चौकटीत लेखन झाले का? हा भारतीय इतिहास लेखनात महत्त्वाचा प्रश्न आहे. प्राचीन ग्रीक, रोम यांच्याप्रमाणे शास्त्रीय इतिहास लिहिला गेला नाही. मग भारतीयांना इतिहास लेखन करण्याची दृष्टी होती की नाही. प्राचीन भारतातील इतिहास लेखन कितपत ऐतिहासिक दृष्टिकोनात उतरते हे प्राचीन साहित्य अभ्यासल्यावर समजेल.

भारतीय प्राचीन साहित्यात वेद वैदिक वाङ्मय, महाकाव्ये, पुराणग्रंथ, कथा कादंबऱ्या, नाटके, दंतकथा, चरित्रग्रंथ, स्थानमहात्म्य, पोथ्या इ. प्रकारचे लेखन विपुल प्रमाणात झाले आहे. यात शास्त्रशुद्धपणा नाही. रंजकता, अवास्तवता, काल्पनिकता यातून झालेले आहे. म्हणून प्राचीन भारतीयांना इतिहासदृष्टी आहे का नाही हे पाहणे ही महत्त्वाचे ठरते.

प्राचीन भारतीयांनी इतिहास लेखन केले नाही. ''भारतात दैवी शक्तीवर विश्वास होताच''[३] यामुळेच भारतीय लेखनावर दैवी प्रभाव पडून निसर्गातील बदलाची नोंद घेत या दैवी शक्ती मानवी जीवन नियंत्रित करतात म्हणून मानवाला व त्याच्या कृतीला विशेष स्थान न देता दैववादाला प्रधान्य दिले. यामुळे लेखनामध्ये काल्पनिकता आली. शास्त्रशुद्ध लेखनात काल्पनिकतेला स्थान नसल्याने भारतीयांना इतिहासलेखनाची दृष्टी नव्हती असे मानले जाते. अनेक गहन विषयावर भारतीयांनी अभिजात वाङ्मयाची निर्मिती केली आणि मानवी जीवनाच्या वेगवेगळ्या पैलुंवर प्रकाश टाकला व दर्जेदार ग्रंथ निर्माण केले. पण ''खऱ्या अर्थाने इतिहास म्हणता येईल असा एकही ग्रंथ निर्माण केल्याचे आढळून येत नाही.''[४] इतिहास ग्रंथाचा अभाव

---

३. *आठवले सदाशिव, इतिहासाचे तत्त्वज्ञान, पृष्ठ – ३१.*

४. *डॉ. कोठेकर शांता, इतिहास तंत्र आणि तत्त्वज्ञान, पृष्ठ – १२८.*

प्राचीन भारतात होता. आता ''कौटिल्याचा अर्थशास्त्र व कल्हणचा राजतरंगिणी''[५] या ग्रंथांना इतिहासग्रंथ म्हणून मान्यता मिळू लागली आहे. हा अपवाद वगळला तर प्राचीन भारतीय इतिहास शास्त्रशुद्ध पद्धतीने लिहिला नाही असेच म्हणावे लागेल. प्राचीन काळातील इतिहासाची वैशिष्ट्यामध्ये ''धार्मिक तत्त्वज्ञान, अध्यात्मिक दृष्टिकोनातून साहित्य लेखन, टीकात्मक दृष्टिकोनाचा अभाव आदर्शवादावर जोर''[६] सांगता येईल. यामुळे देव, आत्मा आणि त्याची शुद्धता आणि नैतिकता यावर विशेष भर दिला. काल्पनिक आणि गृहित तत्वावर आदर्शवादी लेखन केल्याचे दिसते. हे लेखन परंपरा भारतीयांमध्ये विपुल प्रमाणात होती. वास्तवतेचा अभाव, काल्पनिकता, आदर्शवाद ही हिंदू वैदिक साहित्यात प्रतिबिंबित झाले.

वैदिक हिंदू विरोधी प्राचीन भारतात जैन व बौद्ध यांनी काही बाबतीत लावण्यात जुन्या कल्पनाच स्वीकारून त्यांना अधिकच विचित्र स्वरूप दिले. एकंदरीत प्राचीन भारतीय लेखन परमेश्वराला सर्व कर्तृत्व देऊन मानवी इतिहासाचा निर्माता तोच जीवदान देणारा जीव घेणारा पालनकर्ता व तारणहार असल्याचे मानले आहे आणि यावर लेखन परंपरा आधारित असल्याचे स्पष्ट दिसते.

कल्हण हा एकमेव इतिहासकार आहे. पुराणांनी गुप्तकाळापर्यंतच्या राजवंशाची वंशावळीची नोंद घेतली आहे. पुराणकथा काल्पनिक आहेत. यामुळे त्यावर कोणी विश्वास ठेवणार नाही. धार्मिक तत्त्वज्ञानासंबंधी अध्यात्मिक दृष्टिने व राजा, दिनचर्या, युद्ध, दरबार यासंबंधी नोंदी असून सामाजिक जीवन, रूढी परंपरा, यांच्याकडे दुर्लक्ष केले असून वास्तवापेक्षा काल्पनिक आदर्शवादावर साहित्यिकांचा भर असल्याचे दिसून येते.

मध्ययुगीन काळात व्यक्तीच्या कर्तृत्वाला वाव मिळाला नाही. सरंजामशाही शासन व्यवस्था निर्माण झाली. याचबरोबर अत्यंतिक धर्मनिष्ठा या कालखंडात जोपासली गेली. इस्लामी आक्रमणे व त्यांच्या सोबत आलेले विद्वान यांनी इतिहास

---

५. *कित्ता, पृष्ठ – १३१.*

६. *डॉ. खुराणा के.एल., बंसल आर.के., पूर्वोक्त, पृष्ठ – ११०, १११.*

लेखन केले. इ.सनाचे बारावे शतक ते अठरावे शतक या काळात इतिहास लेखनात नव्या युगाचा उदय झाला. ''मध्ययुगात झालेल्या ख्रिस्ती व अरब इतिहास लेखनाने जागतिक इतिहास लेखनाचे दाखल समृद्ध केले. बाराव्या शतकानंतर तुर्के, इराणी, अरब लेखनकला येथे प्रवाहित झाली.''[७] भारतात झालेली परकीय आक्रमणे केवळ युद्धच करणारी नाही तर राजकारणाबरोबर घडलेल्या घटनांची नोंद ठेवणारी होती. वास्तविक जीवन व जग यामध्ये रस असणारे आक्रमणकारी इतिहास लेखनात मागे राहिले नाहीत.

भारतात झालेले इतिहास लेखन मध्ययुगीन चौकटीत अभ्यासत असताना इतिहास लेखन कोणी केले. भारतातील विद्वान व राजकर्ते यांची इतिहासदृष्टी दैवी व पारलौकीक होती. मानवी जीवनाशी संबंधीत घटनांना महत्त्व नव्हते. या घटनांमागे ईश्वरी प्रयोजन असल्याने मानवी कृतींना महत्त्व नव्हते. मग या वैदीक विचाराशिवाय वास्तव जीवनात इहवादी विचारानुसार चालणारा इस्लाम शासनकर्ते यांनी इतिहास लेखनास उत्तेजन दिले. ''भारतातील इतिहास लेखन कट्टर धर्मनिष्ठ मठवासियांनी नव्हे तर लौकीक जीवनात रस असलेल्या व त्यात सहभागी असलेल्या मंडळींनी केले.''[८] या इतिहास लेखनाची काही वैशिष्ट्ये सांगता येतील.

- इस्लामनिष्ठा असूनही दैववादाऐवजी माणसाच्या कर्तृत्वावर अधिक भर दिसतो.
- राजकीय लेखन, दरबारी कट–कारस्थाने यांची नोंद प्रामुख्याने केली.
- आश्रित लेखनाने स्तुतीयुक्त लेखन झाले.
- नीतिमूल्ये शिकवणे हा हेतू
- वर्तमान काळ भूतकाळाची देण असते याची जाण असल्याचे दिसत नाही. तरी कालगणनेचे भान ठेवल्याने ऐतिहासिक दृष्टी निदर्शनास येते.

---

७. *डॉ. कोठेकर शांता, पूर्वोक्त, पृष्ठ – १४९.*

८. *कित्ता, पृष्ठ – १४९.*

या काळातील बहुतेक लेखक प्रत्यक्ष घटनेचे स्वत: साक्षीदार होते. इराणी लेखनाचा प्रभाव जाणवतो. मुघलकाळाच्या शेवटी धार्मिकदृष्टीचा प्रभाव ओसरलेला दिसतो. सुलतानशाहीपेक्षा मोघलशाहीतील इतिहास लेखन इतिहासाच्या अधिक जवळ आलेले आहे. मराठ्यांच्या इतिहासावर झालेले लिखाण बहुतांशी बखरी,काल्पनिक व अवास्तव वाटतात तर याच काळातील इस्लामी इतिहासलेखन काही प्रमाणात अवास्तव असले तरी काल्पनिक व दंतकथात्मक स्वरूपाचे नाही असे म्हणता येईल.

ब्रिटिशांच्या भारतातील प्रवेशाने भारतात वैचारिक प्रबोधन घेऊन सर्व क्षेत्रामध्ये चिकित्सक विचारांची वाढ झाल्याचे दिसते. यामुळे भारतीय इतिहास शोध व बोध घेण्यास सुरूवात झाली याचा परिणाम म्हणून भारताचा इतिहास समृद्ध असल्याचा भक्कम पुरावा सिंधू संस्कृतीने दिला. आधुनिक काळात शास्त्रशुद्ध पद्धतीने इतिहास लेखनावर भर देण्यात आला.

इतिहास शास्त्र की कला, इतिहास वस्तूनिष्ठ बनवण्याचा प्रयत्न इतिहासाविषयाच्या आधुनिक दृष्टिकोनानुसार होऊ लागला. यामुळे इतिहास मानवी जीवनात महत्त्वाची भूमिका असल्याने मानवी संस्कृतीच्या सुधार बिघाडाची प्रमाणबद्ध नोंद म्हणजे इतिहास अशी इतिहासाची व्याख्या करता येईल.

आधुनिक काळापूर्वी जागतिक इतिहास आधुनिक काळाइतका शास्त्रशुद्ध नव्हता. खऱ्या अर्थाने युरोपातील धर्मसुधारणा चळवळीने शास्त्रशुद्धतेचा विचार दिला आणि चिकित्सक दृष्टिकोन रूजवला. याचा परिणाम इतिहास लेखनावर झाला. भारतातही भक्ती चळवळीतील काही संतानी हा दृष्टिकोन जोपासला व वास्तवता आणि चिकित्सकदृष्टी बाळगुण लिखाण केले. यात संत नामदेव म्हणतात ''म्हणविता देव मोठे मोठे पुंजितात दगड गोटे,'' अशी चिकित्सक दृष्टी रूजत होती पण तिला आध्यात्मिक आधार असल्याने ती काल्पनिकतेकडे झुकली. केमालपाशाने मुस्लिम धर्माविरुद्ध केले आणि तिसरा राजर्षी शाहू महाराजांनी हिंदूधर्माची आध्यात्मिक सत्ता

असलेला कुर्तकोटी शंकराचार्य यांची गादीच नष्ट केली.''[९] असे सांगतात. यातून जागतिक अध्यात्माविरुद्ध प्रबळ बंडात भारत सहभागी असल्याचे निदर्शनास आणतात व या बाबींची चांगली ओळख सर्वसामान्य भारतीय नागरिकांना करून देण्यासाठी तसे साहित्य व इतिहासाने प्रयत्न करण्याची गरज असल्याचे त्यांच्या इतिहास लेखनातून दिसून येते.

भारतीय मन, कला व संस्कृती अध्यात्मामुळे विकृत झाली. यामुळेच हिंदूस्थानात धार्मिक लूट एक भयंकर संकट बनले. या संकटातून भारतीयांची मूक्तता इतिहासाच्या माध्यमातून होऊ शकते. पण इतिहास हा वस्तुनिष्ठ व शास्त्रीय दृष्टीने लिहिला गेला पाहिजे अशी उत्तमरावांची प्रामाणिक इच्छा आहे. भारतीय तत्त्वज्ञान विज्ञानाच्या दृष्टीने तत्त्वज्ञानाचा मुलभूत प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. यासाठी उत्तमराव ''भौतिकवाद व आध्यात्म यांच्यातील संघर्ष स्पष्ट करतात.''[१०] भारतीय भौतिकवादी चार्वाक तसेच जागतिक डेमोक्रेटस् हिरॅक्लिटस् ॲरिस्टॉटल, निकोलस कोपर, फ्रान्सीस बेकन, थॉमस हॉब्झ, जॉन लॉक, बेनिक्ट स्पिनोझा याने निसर्गच स्वत:चे निसर्गाचे कारण आहे. या स्पिनोझाच्या प्रबंधाने परमेश्वरी कल्पनेची बौद्धिक क्षेत्रातील हाकालपट्टी केली. फ्रेंच भौतिकवाद, रशियाचा भौतिकवाद, जर्मनीचा भौतिकवादाचा अध्यात्माशी सामना व फ्युरबारवचा भौतिकवाद इ. चा अभ्यास करून जगताच्या मुळाशी भौतिक तत्त्वच कारणीभूत आहे आणि आध्यात्म मानवी प्रगतीला सांसारिक जीवनाला मोठा अडथळा असल्याचे सांगतात.


आधुनिक भारतीय इतिहासलेखनास अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात सुरुवात झाली. ब्रिटिशांचे प्लासीच्या युद्धाने भारतात पाय रोवले आणि ब्रिटिशांचे अधिपत्य भारताच्या भूभागावर पसरले. ज्या प्रदेशावर आपण राज्य करतो त्या प्रदेशाची माहिती असणे गरजेचे असते म्हणून या प्रदेशातील साहित्याचा अभ्यास केला. यामुळे इतिहास

---

९. *मोहिते वीर उत्तमराव, मराठ्यांच्या सांस्कृतिक क्रांतीचा इतिहास, पृष्ठ – १६०.*

१०. *मोहिते वीर उत्तमराव, कार्लमार्क्सचा भौतिकवादी वैज्ञानिकतेचा सिध्दांत, पृष्ठ – १२.*

लेखनाला गती व शास्त्रशुद्धता आली. या बरोबरच अनेक प्रवाह इतिहास लेखनात सुरु झाले.



आधुनिक भारतात प्रामुख्याने या प्रवाहांच्या माध्यमातून इतिहास लेखन होत असे, होऊ लागले. तसेच पारंपरिक पद्धत ही कार्यरत होती. प्राचीन काळी साहित्य निर्मितीत किंवा इतिहासात दैव दैववाद होता तसाच आधुनिक काळातही ''ईश्वरीसूत्र कालचक्र या कल्पना आधुनिक काळातसुद्धा मानवाचा पुष्कळसा भूतकाळ पुष्कळ विश्वसनीय साधनांनी बराचसा सत्य स्वरुपात पुढे आलेला असताना मान्य करणारे विचारवंत निघाले.''[११] आधुनिक काळातही शास्त्रशुद्ध लेखनाबरोबर काल्पनिक लेखनाची पद्धत सुरू राहिली म्हणून आधुनिक इतिहासलेखन व शास्त्रशुद्धता किंवा वस्तुनिष्ठता इतिहासात कितपत आहे याची तपासणी करणे महत्त्वाचे ठरते.

३.४ इतिहासलेखनातील शास्त्रीय दृष्टिकोन

इतिहास लेखनातील समप्रमाणता व विश्वसनीयता वाढवण्यासाठी शास्त्रीय दृष्टिकोनाचा अवलंब करण्याचा विचार एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी काही प्रमाणात रूजत होता.

---

११. *आठवले सदाशिव, इतिहासाचे तत्वज्ञान, पृष्ठ – ३६.*

''जे.बी. ब्यूरी यांनी इतिहास विज्ञान असल्याचे जोरदार समर्थन केले.''[१२] यानंतर लियोपोल्ड रँके, सीले, कॉम्टे यांनी इतिहासात शास्त्रीय दृष्टिकोन असल्याचे आणि आणण्याचे समर्थन केले. यामुळे इतिहास केवळ रंजक वर्णन, काल्पनिक कथा, दंतकथा यापेक्षा तो विज्ञानाच्या जवळ नेण्यात आला आणि इतिहासात वस्तुनिष्ठता आणण्यासाठी प्रयत्न केले. म्हणून आधुनिक इतिहासलेखन वस्तुनिष्ठतेच्या कसोट्या पूर्ण करताना दिसते. इतिहासाच्या लिखानात शास्त्रीय दृष्टिकोन आल्याने विश्वसनीयतेच्या व सप्रमाणतेच्या आधारे इतिहास वस्तुनिष्ठ बनत असल्याचे दिसते.

प्राचीन काळात भारतात शास्त्रशुद्ध इतिहासलेखनाचे प्रयत्न झाले नाहीत. प्राचीन भारतीय विचार तत्त्वज्ञान याची प्रगल्भता आश्चर्यकारक असली तरी पाश्चात्यासारखे इतिहासलेखन भारतात झाले नाही. प्राचीन भारताचा इतिहास अंधकारमय राहिला. आधुनिक काळातील इतिहासाच्या नव्या पद्धतीने प्राचीन भारतीय इतिहासलेखन आधुनिक काळात होऊ लागले. जागतिक इतिहासाचा प्रभाव भारतीय इतिहासलेखनावर होत राहिला. इतिहासकारांनाच इतिहासाच्या व्याख्यांत व त्यांच्या स्वरूपात भिन्नत्व दिसू लागले. अनेक नवप्रवाह इतिहासाचा बोध घेऊन इतिहासाची मांडणी करू लागले.

३.५ भारतीय इतिहास लेखनाबाबत उत्तमरावांचा दृष्टिकोन

इतिहास ही बौद्धिक स्वरूपाची स्वतंत्र ज्ञानशाखा आहे. या ज्ञानशाखेचा मानवी जीवनाशी घनिष्ठ संबंध आहे. मानवी जीवनाची कथा इतिहासात शब्दबद्ध केलेली असते. अनेक विद्वान व इतिहासकार यांनी आपापल्या परीने व्याख्या करण्याचा प्रयत्न केला. भारतीय इतिहासाचा प्राचीन काळापासून अभ्यास करून वीर उत्तमराव मोहिते भारतीय इतिहासाची व्याख्या करतात. ''**मानवजातीचा इतिहास हा वैज्ञानिक**

---

१२. *CHANDRASHEKHAR Y.K., HISTORICAL RESEARCH THEORY AND METHODS, PAGE - 51.*

भौतिकवाद, ब्रह्मवाद व अध्यात्म यांच्यातील तात्त्विक संघर्षाचा इतिहास आहे.'' मोहिते भारतीय इतिहासाच्या अंतरंगात डोकावतात. इतिहासाचे लेखन हे जबाबदारी असल्याचे सांगतात. इतिहासकारांना ''मानवशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, मानसशास्त्र, भूगोल, त्या प्रदेशातील जमातीचे जीवन या बाबत ज्ञान असावे.''[१३] यावरून उत्तमराव मोहिते यांना शास्त्रीय इतिहास लेखनपध्दती अपेक्षित होती. केवळ कथात्मक रंजक व काल्पनिक बाबींची नोंद इतिहासात होत नाही, अशी त्यांची स्पष्ट भूमिका आहे. वाङ्मय म्हणजे इतिहास नाही ते इतिहासाचे साधन होऊ शकते याची स्पष्ट कल्पना उत्तमराव मोहिते यांना होती.

उत्तमराव मोहिते इतिहासाला पुराव्यानिशी वस्तुनिष्ठ इतिहासलेखनाची अपेक्षा करतात. आचार्य पी.के. अत्रे, मा.म. देशमुख यांच्या मध्ययुगीन भारताचा इतिहास या ग्रंथाबाबत टीका करून रणजित देसाई यांच्या कादंबरीचा उल्लेख करतात तेव्हा वीर मोहिते म्हणतात, ''अत्रे जेव्हा कादंबरीकार रणजित देसाईंचा आधार देतात तेव्हा त्यांच्या इतिहासज्ञानाची कीव येते.''[१४] यातून कादंबरी इतिहास होऊ शकत नाही हे सांगून त्यांचा इतिहासाविषयीचा शास्त्रीय दृष्टिकोन समोर येतो.

उत्तमराव मोहिते इतिहास लेखनाची आपली भूमिका स्पष्ट करतात. ते म्हणतात, ''जमिनीत पुरून ठेवलेला क्रांतिकारी इतिहास आम्हांला उजेडात आणावयाचा आहे.'' यातून उत्तमराव इतिहासातील विस्मरण झालेल्या किंवा जाणीवपूर्वक वगळलेला इतिहास पुराव्यांच्या आधारे लिहिण्याची धमक उत्तमराव व्यक्त करतात. यातून एका इतिहासकारास जे गुण आवश्यक आहेत ते उत्तमरावांकडे असल्याचे दिसतात.

इतिहासाकडे वस्तुनिष्ठ व शास्त्रशुद्ध दृष्टिने पाहताना कल्पकता, रंजकता, अतिशयोक्ती असू नये. वास्तवता दर्शन करणारे इतिहासाचे लेखन असावे. ''चमत्कार हा इतिहासाचा शत्रू आहे.''[१५] यातून कल्पनाविलास दंतकथा यांना स्थान नसून ढोंगी,

---

१३. *मोहिते वीर उत्तमराव, जागतिक कृषक क्रांतीचा विधाता लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख, पृष्ठ – २३६.*

१४. *कित्ता, पृष्ठ – २३५.*

१५. *कित्ता, पृष्ठ – २३७.*

बुवाबाजी, चमत्कार असे इतिहासाचे विषय नसून सप्रमाण सिध्द करता येईल आणि पुराव्याने सिध्द होईल असेच विषय इतिहासाचे असावेत असा उत्तमरावांचा दृष्टिकोन असल्याचा दिसतो.

उत्तमराव मोहिते या दृष्टिने इतिहासाकडे पाहतात व लिहितात. भारतीय इतिहासाकडे पाहताना भारतीय धार्मिक दृष्टिकोन तपासण्याची गरज त्यांना निर्माण झाली. जो धार्मिक दृष्टिकोन अध्यात्मावर आधारित आहे त्या अध्यात्माबाबत मोहिते अध्यात्म म्हणजे काय? याची व्याख्या करतात, ''नैसर्गिक वास्तवाला व सांसारिक वैज्ञानिकता यातील मूलभूत समस्यांची उत्तरे ज्याला देता येत नाही त्या विचारपरंपरेला अध्यात्म म्हणतात.''[१६] या अध्यात्मिक परंपरेला प्रधान मानून प्राचीन भारतीय प्रभावित करण्यात आले. या व्यवस्थेने विचारस्वातंत्र्याचा बळी घेतला आणि बुध्दिला वाव न देता परमेश्वर या नावाखाली सर्व घडते ते कोणाच्या हातात नाही अशी मनोभूमिका भारतीयांची बनली. उत्तमराव मोहिते म्हणतात, ''मानवाच्या इतिहासात बौध्दिक पतन आणि नैतिक अध:पतनाचे परमेश्वराची कल्पना सर्वात मोठी साधन बनली. भौतिक वैज्ञानिकतेशी प्रतारणा करणे परमेश्वराच्या संकल्पनेचा मूळ स्वभाव आहे.''[१७]

भारतीय विचारधारा व इतिहास लेखनात ही पध्दत असल्याने इतिहास वस्तुनिष्ठतेपासून आलेला आहे. अध्यात्म बह्मवाद, देव या संकल्पना भारतीय लेखनाचा प्रमुख आधार असल्याने या संकल्पनांच्या मुळाशी असणारी वस्तुस्थिती उत्तमराव तपासण्याचा प्रयत्न करतात. अंतिम सत्याचा शोध घेण्याचा भारतीय इतिहासातील प्रयत्न चार हजार वर्षांपासून चालू आहे. ''मानवी संस्कृतीच्या प्राथमिक अवस्थेत बुध्दिला जी गृहीत तत्त्वे गवसली असली तीच अंतिम सत्य आहे असे आतापर्यंत वाटत आले. आजही याच गृहित तत्त्वांना महापंडितांचा वर्ग प्रमाण मानतो. याबाबत उत्तमराव मोहिते म्हणतात विश्वाच्या मुळाशी असणाऱ्या सत्याचा शोध

---

१६. *कित्ता, पृष्ठ – २७९.*

१७. *मोहिते वीर उत्तमराव, भारतीय तत्वज्ञानातील वैज्ञानिकतेचा सिद्धांत अथवा निरिश्वरवाद, पृष्ठ – ५.*

घेतला. त्या गृहितकास तर्कशास्त्र, प्रत्यक्ष व्यवहार, मनोविज्ञान, वैज्ञानिकता या चार कसोट्यांवर तपासून मगच स्वीकारावे. या कसोट्यावर भारतीय दर्शन तपासले असता पूर्वमीमांसा आणि बह्मसुत्रे ही शेवटची दोन ईश्वरवादी असून कसोट्यावर उतरत नाहीत. सांख्य आणि योग या विचार सरणींनी विश्वाच्या अंतिम सत्याचे स्वरूप उघडे करून ठेवले होते. परंतु बह्मवादाने हे उज्ज्वल तत्त्वज्ञान विकृत करून ठेवले. आज ते शोधून घ्यावे लागते.''[१८]

उत्तमराव मोहिते आपल्या Universal Songs Of Life & Truth या ग्रंथात म्हणतात,

''ब्रह्मत्त्व नव्हे जगताचे मूळ।
वासना केवळ वांझोटीच।।
सगुणत्व सत्य द्रव्याचा हा खेळ।
सृष्टीचे राऊळ शृंगारिले।।
द्रव्य आणि गति तत्वार्थ सांगती।
याच्याहुनी अन्य तत्व नाही।।
प्रयोगशाळेत प्रमेय दर्शन।
सारे अभिमानात उत्तमाचा।।''[१९]

विश्वाचे अंतिम सत्य द्रव्य असल्याचा स्पष्ट आणि प्रमाणशीर दावा उत्तमराव आपल्या ATHEISM IN INDIAN PHILOSOPHY या ग्रंथात करतात.

इतिहासलेखन करताना साधन महत्त्वाचे मानले जाते. इतिहास पूर्णत: साधनांवर अवलंबून असतो म्हणून मिळालेले प्रत्येक साधन सत्य व प्रमाणबद्ध आहे असे मानून त्या आधारे लेखन करणे चुकीचे ठरते. मिळालेले साधन सत्य आहे का हे तपासून खात्री झाल्यावर त्यावर आधारित लेखन करावे लागते. इतिहासामध्ये शास्त्रीय

---

१८. *कित्ता, पृष्ठ – २.*

१९. ***Veer Mohite Uttamrao, Universal Songs of Life & Truth, Page - 20.***

पध्दतीचा अवलंब केल्यास ''वस्तुनिष्ठता व कार्यकारणभाव यांच्या आधारे अन्वयार्थ लावला गेला नाही तर इतिहासाला शास्त्राचा दर्जा प्राप्त होत नाही.''[२०] म्हणून भारतीय इतिहासातील घटना ज्या आधारे लिहिल्या आणि त्या घटनेचे अन्य कालांतराने उपलब्ध साधन यांची खात्री करून इतिहासाचा नव्याने अन्वयार्थ लावून इतिहासाला शास्त्राचा दर्जा मिळवण्यासाठी उत्तमरावांचे भारतीय अध्यात्म, देव, दैववाद, ब्रह्मवाद यांच्याशी चाललेला भौतिकवादी वैज्ञानिकतेचा संघर्ष व यातून बाहेर पडणारे पुराव्याधिष्ठित सप्रमाण सत्य मांडून इतिहासाला विश्वसनीयतेकडे नेण्याचा उत्तमराव मोहिते यांचा प्रयत्न महत्त्वपूर्ण असल्याचे दिसते.

उत्तमराव मोहिते विश्वाच्या मुळाशी ब्रह्मत्त्व नाही असे स्पष्ट करतात आणि 'द्रव्य आणि गति' हे विश्वोत्पत्तीचे सार आहे आणि सप्रमाण ते दाखवता येते असा स्पष्ट दावा करून भारतीय इतिहासलेखन परंपरेला एक नवा आयाम देऊन इतिहासाकडे पाहण्याची नवी दृष्टी देतात.

भारतीय अध्यात्मिक इतिहासाबाबत लिहिताना उत्तमराव जागतिक विचारही करतात आणि अध्यात्माला ऐतिहासिक कसोट्यावर तपासतात. जागतिक अध्यात्माचा आढावा घेऊन मराठ्यांच्या सांस्कृतिक क्रांतीचा इतिहास या ग्रंथात म्हणतात, ''इतिहासात अध्यात्मिक सत्तेविरूद्ध तीन वेळा बंड झाले. त्यातील पहिला बंडखोर मार्टिन ल्युथरने ख्रिश्चन धर्मगुरू पोपची (His Holiness) ची अनियंत्रित सत्ता झुगारून दिली. दुसरे बंड तुर्कस्थानचा गाझी मुस्तफा केमलपाशाने मुस्लीम धर्माविरूध्द केले. तिसरे बंड हिंदू धर्माची अध्यात्मिक सत्ता असलेल्या शंकराचार्य यांची गादी राजर्षी शाहू यांनी नष्ट केली.

उत्तमराव आध्यात्म व भौतिकवाद यांच्यातील संघर्षाचा आढावा घेऊन मानवजातीच्या इतिहासाकडे वळतात तेव्हा ते म्हणतात, ''मानवजातीच्या समाज जीवनाची सुरुवात श्रम व सहकार्य या तत्त्वांवर झाली. परंतु २० व्या शतकापूर्वीच्या

---

२०. डॉ. सरदेसाई बी.एम., इतिहासलेखनशास्त्र, पृष्ठ – १०५.

समाजरचनेचा आधार देव, धर्म व आध्यात्माच्या परंपरेवर आधारलेल्या संस्कृतीत विज्ञान व श्रम यांना महत्त्वाचे स्थान नव्हते.''[२१] यावरून स्पष्ट दिसून येते की, विज्ञान व श्रमावर आधारलेली संस्कृती ही वास्तविक व सांसारीक जीवनात उपयुक्त ठरणारी असून अध्यात्मिक व दैववादी विचारधारा काल्पनिक असल्याचे स्पष्ट करून भारतीय इतिहासाला वैज्ञानिक दृष्टीने मांडण्याचा प्रयत्न करताना उत्तमराव दिसतात.

भारताच्या इतिहासात पुष्यमित्र एकदाच ब्राह्मण राजा झाला पण त्याने ब्रह्मविद्येचे विषारी बीजे भारतात कायमचे पेरून ठेवलीत. पुष्यमित्रानंतर ब्रह्मविद्याच्या हातात राजसत्ता आणून देणारा बाळाजी विश्वनाथ ब्रह्मविद्येचा दुसरा महापुरूष होय. भारताच्या इतिहासात एवढी अनियंत्रित राजसत्ता, भटांच्या वंशावळीत कधीच आली नव्हती. श्रीमंत नानासाहेब पेशवे यांच्या राजवटीत ब्रह्माचं राज्य सुरू झालं. पेशवाई इतक अद्‌भुत राज्य जगात झालं नाही. अरेबियन नाईटस कथासरितासागर आणि ब्रहत् कथा संग्रहातील कथा पेशवाईपुढे फिक्या वाटतात. यावरून पेशवाईचे राज्य किती काल्पनिक, विलासी व वास्तवापासून दूर गेलेले होते असे स्पष्ट दिसून येते.

भारतीय इतिहासात ब्राह्मणी राज्य क्रुर व कपटी असल्याचे सांगून नीतीमत्तेचा ऱ्हास या राज्यात झाला. कल्पनाविलास यातच राजकीय शक्ती गुंतुन पडल्याने विकासाकडे व सामान्यांच्या हिताकडे दुर्लक्ष झाल्याचे उत्तमराव नमूद करतात.

''उत्तमराव मोहिते भगवदगीतेला अहंकारवादी मानतात आणि मथुरेचा श्रीकृष्ण समतावादाचा पुरस्कर्ता असल्याचे सांगतात.''[२२] मोहिते भारतीय इतिहासावर प्रकाश टाकताना त्यांची विशेष दृष्टी आहे. ते देव व दैववाद या काल्पनिक बाबींना बाजूला सारतात. भगवदगीता व त्यातील तत्त्वज्ञान अध्यात्मवादी व अहंकारी असल्याचे प्रतिपादन करताना श्रीकृष्णाबाबत समतावादी असा उल्लेख असा विचार करावयास भाग पाडते की गीतेतील विचार व श्रीकृष्ण यांच्यात तफावत असून गीता निर्मितीची

---

२१. *मोहिते वीर उत्तमराव, जागतिक कृषक क्रांतीचा विधाता लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख, पृष्ठ – ५२३, ५१३.*

२२. *मोहिते वीर उत्तमराव, मराठ्यांच्या सांस्कृतिक क्रांतीचा इतिहास, पृष्ठ – ६७.*

कहाणी काही वेगळीच असावी. पण याबाबत मोहित्यांची स्पष्ट भूमिका दिसत नाही, तरी कृष्णास समतावादी मानतात हे नक्की.

मानवाची निर्मिती व पुढे मानवीजीवन व्यवहाराच्या रीती आणि त्यात आलेली काल्पनिक वलय काढून सांसारिक जीवन व्यावहारिक जीवन व भौतिकवादी वैज्ञानिक तत्वप्रणाली मानवी जीवनात कशी आग्रहाची व प्रधान आहे याचे स्पष्टीकरण देतात. यात 'द्रव्य' सर्वात असून तेच प्रधान आहे. 'आत्मा' गौण आहे हे उत्तमरावांचे चिंतन भारतीय इतिहासलेखनात भौतिकवादी विचारधारेवर आधारित असून 'वैज्ञानिकते'च्या आधारे आपले इतिहास लेखन करतात. वैदिक धर्म व त्याच्या काल्पनिक अवास्तव कल्पना यामुळे जीवनव्यवहारात विकृती आली आणि संस्कृतीत बिघाड झाला.

''केवळ अध्यात्मच सत्य आहे हा आत्मनिष्ठ दृष्टिकोन संस्कृत पंडितांचा असल्यामुळे ब्रह्मज्ञानी पांडित्याला विज्ञानाची गोड फळे कधीच आले नाहीत.''[२३] अध्यात्म विचारधारेने चिकित्सा अमान्य केली. ईश्वरनिर्मित बाबींवर संशय घेणे पाप असते म्हणून भारतीय साहित्य साहित्यच राहिले ते इतिहास झाले नाही. 'वेद' ईश्वरनिर्मित असल्याने वेदाची चिकित्सा करण्याचा आधुनिक काळापर्यंत कोणी प्रयत्न केला नाही. ''वेद आणि उपनिषदे यांनी हिंदू जमातीवर फारसा प्रभाव पाडला नाही. पण रामायण व महाभारत या अध्यात्मिक साहित्याने संपूर्ण जमात बौद्धिकदृष्ट्या वेडी करून ठेवली. तसेच हिंदू धर्मातील साऱ्या पौराणिक कथा सत्य आहेत हे मानण्याइतका भारतीय अब्राह्मण समाज मूर्ख होता हे भारताचे सर्वात मोठे दुर्दैव होय.''[२४] यावरून अब्राह्मण समाज अज्ञानी असून धर्मग्रंथात जे आहे ते सत्य असून ते ईश्वरनिर्मित आहे म्हणून त्यात बदलही होत नाही, अशी पक्की धारणा समाजाची बनली. यास संस्कृत साहित्यावर व एकंदरीत ज्ञानाच्या साधनावर मक्तेदारी असणाऱ्या वर्गाने अब्राह्मण समाजाला अध्यात्म, बह्मवाद, दैववाद या बाबी हजारो वर्ष सांगितल्या.

---

२३. *कित्ता, पृष्ठ – ११९.*

२४. *मोहिते वीर उत्तमराव, मराठ्यांच्या सांस्कृतिक क्रांतीचा इतिहास, पृष्ठ – ११९, १२३.*

राजाच्या दैवी अधिकाराचा सिद्धांत प्रस्थापित केला. पण इतिहासात दैवी, आदिदैवी अशा कल्पनांना थारा नसून वास्तवता हा इतिहासाचा प्राण असून जे घडले ते मांडणे उत्तमराव महत्त्वाचे मानतात. असे झाले असते, तसे होईल या बाबी इतिहासात शोभत नाहीत. उत्तमराव राजसत्तेबाबत म्हणतात, ''राजसत्तेचा उगम ना अध्यात्मातून ना धर्मातून झाला. देव, धर्म राजसत्तेची जन्मस्थाने नाहीत. ती उगवली क्षत्रियांच्या पौरूषातून, ती रूढ झाली लोकसत्तेने आणि तिचा विकास झाला लोकहिताने बहुजन हिताय बहुजन सुखाय या सिद्धांताने राजसत्तेला लोकमान्यता मिळवून दिली.'' अध्यात्म व राजकारण या दोन्ही वेगळ्या संकल्पना असून अध्यात्म ही समाजाला गुलाम बनवते. मानसिक व बौद्धिक पंगूत्व आणले तर राजसत्ता गुलामी झुगारून स्वतंत्र विचार निर्माण करते असा उत्तमरावांचा विचार असल्याचा दिसतो.

संस्कृती म्हटले एक विचार मनात येतो. मानवी जीवनाची वाटचाल पण या मानवी जीवनात अनेक भेद निर्माण झाल्याने संस्कृती अंतर्गत संस्कृती व मानवाअंतर्गत मानव अशी मानवीजीवनाची रचना झाल्याचे दिसते. ''लोकसंस्कृती व पंडितसंस्कृती यात भयानक विरोध आहे. ढोंग फसवणूक पंडित संस्कृतीचे अधिष्ठान आहे. दु:ख व दास्यविमोचन लोकसंस्कृतीचे कार्य आहे. अध्यात्माने श्रमजीवी जनतेला गुलाम करावे. त्या गुलामगिरीतून कष्ट करणाऱ्या लोकांना सोडविण्याचा लोकसंस्कृतीने प्रयत्न करावा हे चक्र हजारो वर्षांपासून चालू आहे.''[२५] हा लोकसंस्कृती व अध्यात्म यांचा संघर्ष प्राचीन काळापासून आजतागायत चालू असल्याचे सांगतात. मानवजातीचा इतिहास म्हणजे दुसरे काही नसून अध्यात्म व वैज्ञानिकता, भौतिकता यांच्यातील संघर्ष आहे, असे इतिहासाबाबत आपले मत व्यक्त करून तसे दाखलेही देतात.

वेदवेद काय बोंबले निर्बुद्ध। वेदापेक्षा बुद्ध श्रेष्ठ आहे. वेद विचारापेक्षा बुद्धाची विचारधारा वैज्ञानिक व सत्य आहे. मानवी जीवनात नवचैतन्य निर्माण करणारी आहे कारण कलाविज्ञानाला जन्म दिला ज्याने''[२६]

---

२५. *मोहिते वीर उत्तमराव, मराठ्यांच्या सांस्कृतिक क्रांतीचा इतिहास, पृष्ठ – १५४.*

२६. ***Veer Mohite Uttamrao, Universal Songs of Life & Truth, PAGE - 69.***

भारतीय बौध्द विचार परंपरा ही अध्यात्मवादाविरोधी आहे. तशीच ती लोकसंस्कृती व लोकजीवन यांना महत्त्वपूर्ण असल्याने तिला वैज्ञानिक सत्याजवळ नेले असे उत्तमरावांच्या विचारावरून समजते. तर आधुनिक काळात छत्रपती शाहू महाराजांनी लोकसंस्कृती सुरळीत चालावी म्हणून अध्यात्माविरोधी लोकचळवळ उभी केली. हा अध्यात्मिक संस्कृती व लोकसंस्कृती यांच्यातील संघर्ष आहे, असे मोहिते यांना स्पष्ट करावयाचे आहे.

उत्तमराव मोहिते यांचे भारतीय इतिहासाबाबतचे कार्य भारतीय इतिहासाची सांस्कृतिक दृष्टीने व वैज्ञानिक पद्धतीने मांडणी करण्याचा प्रयत्न करतात. भारतीय जीवनपध्दतीत गूढ, अद्‌भूत, चमत्कार, दैवी, देव, धर्म, अध्यात्म, ब्रह्मवाद, अंधश्रद्धा यामुळे विकृत झालेली संस्कृती मूळ स्वभाव न बदलता संस्कृती अंतर्गत संस्कृती म्हणून वाटचाल करत आहे. या सांस्कृतिक मूल्यांवर प्रकाश टाकून भारतीयांचा सांस्कृतिक इतिहास उत्तमराव मोहिते यांनी रेखाटला आहे. इतिहासलेखनशास्त्राच्या चौकटीत राहून त्यांनी आपले लेखन केल्याचे दिसते.

भारतीय संस्कृती अध्यात्म व विज्ञान यांच्यात प्राचीन काळापासून संघर्ष होत आला आहे. यात वैज्ञानिक संस्कृतीची जोपासना बुध्द, जैन, अशोक, चार्वाक, सांख्य, कपील, चक्रधर, नामदेव, तुकाराम, छत्रपती शिवाजी, छत्रपती शाहू, फुले, आंबेडकर इ. परंपरा सांगतात. अध्यात्मिक संस्कृतीचे दृढीकरण करण्याचे सातत्याने व कसोशीने प्रयत्न आजतागायत सुरू आहेत. पण या विचारसरणीतून मानसिक व बौध्दिक पंगूत्व येते आणि राष्ट्र व संस्कृती गुलाम बनते. अध्यात्मिक विचाराने राजकीय वर्चस्व प्राप्त केल्याने परकीयांच्या गुलामी भारतीयांनी भोगावी लागली, असा विचार आपल्या लेखनात मांडला आहे.

आधुनिक काळापर्यंत दैव, दैववाद अध्यात्मिक विचारांच्या प्रभावाने व वैज्ञानिक मूल्य यापासून दूर राहणारा भारतीय ब्रिटिशांच्या भारत प्रवेशाने वैज्ञानिक मूल्याची रूजवण होऊ लागली. याबाबत वीर उत्तमराव मोहिते म्हणतात, ''भारतात

इंग्रजाचे राज्य आले नसते तर ब्रह्मनंदात तल्लीन झालेला भारतीय पुरूष आफ्रिकेतील निग्रो आणि भारतीय पंडित यांच्या सांस्कृतिक जीवनात फारसा फरक दिसला नसता.''[२७] ब्रिटिशांनी भारतात एकछत्री साम्राज्य निर्माण करून भारतीय अज्ञान दूर करण्याचा प्रयत्न केला. हजारो वर्षांपासूनचा सांस्कृतिक संघर्ष ब्रिटिशांच्या आगमनाने वेगवान झाला. इ.स. १८१८ पर्यंत संपूर्ण भारत ब्रिटिशांनी आपल्या अंमलाखाली आणला आणि कंपनी सरकारचं राज्य भारतावर प्रस्थापित झालं. ही भारतीय इतिहास जीवनपध्दती, संस्कृती, मानवीजीवन यात आमुलाग्र बदल घडवणारा ठरला. तरी देशाभिमान, राष्ट्रप्रेमाच्या भरात 'ही भयंकर वाईट गोष्ट झाली' असं आजचा भारतीय म्हणेल. पण उत्तमराव मोहिते म्हणतात, ''ज्यावेळी इंग्रजी अंमल प्रत्यक्ष भारतात सुरू झाला त्यावेळी भारतीय प्रजा आनंदाच्या भरात नाचत होती. भारताचे सांस्कृतिक पतन झाले होते व या सांस्कृतिक पतनाचा स्वाभाविक आविष्कार होता.''[२८]

ब्रिटिशांकडे सर्वसमावेशकता व त्यांच्या प्रगतीची कारणे सांगतात आणि भारतावर वर्चस्व का निर्माण केले त्याची कारणे देताना म्हणतात,

- युरोपातील धर्मसुधारणा चळवळीचे यश
- औद्योगिक क्रांती
- वैज्ञानिक विचारसरणी
- मराठे राज्याअंतर्गत कलह
- भाऊबंदकी
- मोगल व मराठे यांचा अंतर्गत कलह
- भारतीयांची स्वार्थांधता
- भारतीयांचे अज्ञान
- देवधर्म अध्यात्म व ब्रह्मविद्या या रोगांनी संपूर्ण भारत किडला होता.
- भारतीय अप्रशिक्षित फौज

---

२७. *मोहिते वीर उत्तमराव, मराठ्यांच्या सांस्कृतिक क्रांतीचा इतिहास, पृष्ठ – ७९.*

२८. *कित्ता, पृष्ठ – ७९.*

❁ सुसज्ज व प्रशिक्षीत इंग्रजांची फौज

❁ तंत्रज्ञानाचा वापर

यामुळे ब्रिटिशांना भारतीयावर राज्य करणे सुलभ झाले. आपल्या मायदेशातील अध्यात्मिक सत्तेविरूद्ध बंड करून अध्यात्मिक सत्तेचा बिमोड करणाऱ्या इंग्रजांना भारतीय अध्यात्मिक विचारप्रणाली स्वाभाविक आवडली नाही. म्हणून त्यांनी परिवर्तनकारी पवित्रा घेतला. ब्रिटिशांनी भारतात सुधारणावादी विषयांना हात घातला तेव्हा भारतीय जनता अज्ञानी होती. सुधारणा म्हणजे काय? आणि त्या कराव्या इतपत ज्ञान नव्हते. भारतात पुढारलेली व सुधारित म्हणून ब्राह्मण जातीला ओळखले जात असे. उत्तमराव मोहिते म्हणतात, ''आंग्लाईतील ब्राह्मण जातीच भौतिकीकरण भारताच्या इतिहासातील अपुर्व घटना आहे. महाराष्ट्रात त्यांच्या इतकी जागृत जातीयवादी जमात दुसरी नाही. ब्राह्मण जातीने स्वत:च्या जातीचे जसे पाश्चात्यीकरण करून घेतले तसे ब्राह्मण जातीने केले नाही.''[२९]

उत्तमराव हे स्पष्ट करतात की, ब्रिटिश भारतात आल्यावर परंपरा व त्यांचे जतन करणारा आणि करवून घेणारा सुधारित ब्राह्मण समाजात स्वत: जागृत असल्याने आणि अध्यात्मातील फोलपणा माहित असणार पण स्वत:च्या फायद्यासाठी दुसऱ्यांवर लादणारा समाज ब्रिटिशांच्या वैज्ञानिक ज्ञानाकडे आकर्षित झाला. पण अब्राह्मणांनी याकडे आकर्षित न होण्यास अज्ञान व देवभोळेपणा कारणीभूत असल्याचे सांगतात.

कष्टकरी समाज देशाच्या पाठीचा कणा आहे. हा कणाच मोडून पडला तर काय होईल हे उघडच आहे. ''ज्या समाजात शारिरीक कष्ट करणारे लोक कमी तो समाज काळाच्या पोटात गडप झाल्याशिवाय राहत नाही. देश केवळ पांढरपेशा जमातीवर जगत नसतो. शारीरिक 'श्रम' करणारा वर्ग देशाचा बलवान आधार असतो. जेव्हा पांढरपेशा वर्ग श्रमिकांची पिळवणूक करतो तेव्हा अवनीतीने देश पारतंत्र्यात जातो आणि पुढारलेला पांढरपेशांचा वर्ग स्वत:चे हित जोपासतो याकडे उत्तमरावांचे

---

२९. *कित्ता, पृष्ठ – ८५.*

लक्ष जाते. राष्ट्रीय पक्ष व ब्राह्मणेत्तर पक्ष याबाबत सांगताना म्हणतात, ''काँग्रेसच्या डावपेचांच्या बैठकी गुप्त असत. त्यांचे डावपेचही गुप्तपणे ठरविण्यात येत. ब्राह्मणेत्तर पक्षाचा सारा बाजार उघडा होता. राष्ट्रीय पक्षाचे कार्यकर्ते भिन्न गोट्यात शिरून लावालावी कशी करावी आणि खोट्या अफवा कशा पसराव्या यात तरबेज होते.'' ब्रिटिशांच्या ज्ञानाने वैज्ञानिक विचारसरणीमुळे भारतीय बहुजन विकास मार्गावर चालत असताना राष्ट्रीय पक्ष त्या विरोधात गुप्त कट करत असे आणि राष्ट्रीय पक्षात पुढारलेल्या जाती, ब्राह्मणांचे वर्चस्व असल्याने बहुजनांचा अब्राह्मण विचारधारेला विरोध होत असे. ''बळवंतराव टिळकांच्या हयातीपर्यंत महाराष्ट्राची काँग्रेस एकजात टिळकपंथीच होती''[३०] आणि टिळकांच्या सनातनी व परंपरावादी विचारांचा प्रभाव त्यावर असल्याने त्या चळवळीला लोकचळवळीचे स्वरूप प्राप्त झाले नाही.

महात्मा गांधी यांचे नेतृत्व लोकप्रिय होऊ लागले. याबरोबरच पुण्याच्या केसरी कंपूचे वजन घटू लागले आणि महाराष्ट्रातील ब्राह्मणेत्तर पक्षातील तरूणांची ओढ महात्मा गांधींकडे लागली. यासाठी उत्तमराव मोहिते कारण देताना म्हणतात, 'तो लोकप्रियतेचा सोपा मार्ग होता' अस्पृश्यता निवारण हा ब्राह्मणेत्तर पक्षांचा मूलभूत कार्यक्रम होता. गांधीजींनी याकडे आस्थेने पाहावे म्हणून भास्करराव जाधव यांच्या चिरंजीवांनी लिहिलेली दोन पत्रे प्रसिद्ध झाली होती. ''महात्मा गांधी अत्यंत व्यवहारी, मुत्सदी व राजकारण धुरंधर माणूस होता.'' या काळात ९९% लोक देवभोळे व धर्मभोळे होते. खरी सामाजिक दृष्टी देणाऱ्याचे समाजात काही चालत नसे. म्हणून व्यवहारी, व्यवसायी राजकारणी पुढारी अर्धवट मार्ग स्वीकारत त्यामुळेच सनातनी धर्ममार्तंडाचा पुरोगामी ब्राह्मणेत्तर विचारसरणीला विरोध होता.'' सनातनी विचारांचा इतका प्रभाव होता की, महात्मा गांधी या प्रभावाला मनोमन दचकत असावे. या प्रभावाच्या विरूद्ध गेलो तर लोकसहानुभूती गमवावी लागेल म्हणून महात्मा गांधी ''मी पक्का चातुर्वर्ण्यवादी आहे''[३१] असे जाहीरपणे सांगत.

---

३०. *मोहिते वीर उत्तमराव, जागतिक कृषक क्रांतीचा विधाता लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख, पृष्ठ – २९०.*

३१. *कित्ता, पृष्ठ – १९०.*

आधुनिक भारतात सांस्कृतिक परिवर्तनाची गरज व त्यास आवश्यक वातावरण तयार होत असताना गांधीजींसारखे सुद्धा अध्यात्मिक, पुरोगामी, विचाराच्या दडपणाखाली असल्याने कणखरपणे पुरोगामी विचार सहसा कोणी मांडत नव्हते. सुधारणा, अस्पृश्योद्धार पुरोगामी दृष्टि प्रतिगामी विचारांच्या आधिन राहून पुरोगामी विचार मांडण्याची पध्दत असल्याचे दिसून येते. यामुळे हिंदू समाजातील अज्ञान कमी झाले नाही. फक्त सुधारणा केल्याचे ढोंग असल्याचे दिसते.

वीर उत्तमराव मोहिते आधुनिक भारतीय इतिहासात हिंदू जमातीतील विस्कळीतपणा व सामाजिक दरी दूर करण्याचा आणि ''हिंदू जमातीला अेकजिनसी बनविण्याचा खराखुरा प्रयत्न प्रथम स्वामी दयानंद सरस्वतीने केला''[३२] पण यातून परिपूर्ण परिवर्तन न झाल्याने उत्तमराव आपल्या जीवनभराच्या अभ्यासातून व अनुभवातून हे स्पष्ट करतात की, आधुनिक भारतातील संघर्ष दुसरा तिसरा काही नसून ''हिंदूराष्ट्रवादी आणि नवमानवतावादी क्रांतिकारी यांच्यातील तत्वप्रणालीचा संग्राम आहे.''[३३] भारतीय इतिहासकार जोतीराव गोविंदराव फुले यांना 'महात्मा' म्हणतात. पण उत्तमराव मोहिते मात्र फुलेंबाबत महात्मा न वापरता ते फुले यांना ''महान भौतिकवादी क्रांतिकारक'' मानून भारतीय इतिहासाबाबतची आपली भूमिका स्पष्ट करून निर्भिडपणे व तटस्थपणे आपले विचार स्पष्ट करताना दिसतात.

'अध्यात्म आणि ब्रह्मविद्येचा कोणताही सिद्धांत अनुभव आणि विज्ञान यांच्या कसोटीवर टिकू शकत नाही.''[३४] असा सिद्धांत मांडून वीर उत्तमराव मोहिते अध्यात्माचा समूळ नाशाचा व मानवमुक्तीचा विचार सांगताना म्हणतात, क्रांतिकारक विचारांचा प्रचंड लोकसमुदाय जेव्हा ब्रह्मविद्येच्या गुलामगिरी विरूद्ध लढा देईल किंवा जेव्हा एक बलशाही राजकीय पक्ष स्वत:च्या जीवनमरणाचा प्रश्न भौतिक तत्वप्रणालीचे वैज्ञानिक निशाण हातात घेईल तेव्हाच अध्यात्माचा नायनाट शक्य आहे. राजर्षी शाहू

---

३२. *मोहिते वीर उत्तमराव, मराठ्यांच्या सांस्कृतिक क्रांतीचा इतिहास, पृष्ठ – १०५.*

३३. *कित्ता, पृष्ठ – १४७.*

३४. *कित्ता, पृष्ठ – ११४.*

महाराजांनीच फक्त या महाक्रांतीची बीजे महाराष्ट्रात पेरून ठेवली आहेत. त्या बीजांना कधीकाळी पेरून ठेवली आहेत. त्या बीजांना कधीकाळी जीव फुटला तर तो प्रथम महाराष्ट्रातच फुटेल.

उत्तमराव मोहिते अध्यात्मापासून भारतीय संस्कृतीचे पतन कसे झाले आणि वैज्ञानिक व नैसर्गिक मूल्यांच्या विचारसरणींचा अध्यात्माशी समान सातत्याने होत आला हिंदू माणूस जन्मापासून मरणाऱ्या क्षणापर्यंत देवधर्म व धार्मिक संस्कार करतो. पण त्याच्या वाट्याला आलेले दु:ख काही कमी होत नाही. ''हिंदू जमातीत मूर्तिपूजा सर्वसामान्य आणि सर्वमान्य घेऊन वसली आहे. तेहतीस कोटी देवांना जन्म देणारा भारत हा जगातील एकमेव व अजब देश आहे. प्राचीन भारतातही यज्ञभाग आणि कर्मकांडांना ऊत आला होता. भारतीय जमातीला या सर्वांचा यत्किंचितही फायदा झाला नाही. या कर्मकांडानेच भारतीयांचे अध:पतन घडवून आणले. या एकमेव पतनातून भारताला मूक्त करणे हेच खरे मानव जातीचे मुक्ती आंदोलन होय.''[३५] यासाठी भारतीय इतिहासात झालेली प्रयत्न उत्तमरावांच्या लेखनीतून सुटत नाहीत. सांख्यदर्शनाचा संस्थापक कपीलाने वैज्ञानिकतेचा मानवी संस्कृतीच्या अध्यात्माच्या गुलामीतून मूक्त करण्याचा प्रयत्न झाला. तंत्रशास्त्राचा शक्तीवर काचेच्या बाटलीत मानव बनविण्याचे प्रयत्न झाले आहेत. असा एकतरी पराक्रम अध्यात्माच्या इतिहासात अध्यात्माने केला आहे का? म्हणून भौतिककत्वाशिवाय विकास नाही. ''भौतिक विकासच मानवी संस्कृतीचा आधारभूत सिद्धांत बनला आहे.''[३६] ''द्रव्य आणि गति अथवा पुरूष आणि प्रकृती हा सांख्याचा निष्कर्ष आणि कार्ल मार्क्सचा भौतिक वैज्ञानिकतेचा सिद्धांत येथे एकरूप झाला आहे.''[३७] उत्तमराव मोहिते भारतीय इतिहासाची सांस्कृतिक मांडणी करताना प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत इतिहासात अध्यात्मामुळे संस्कृतीत झालेला बिघाड दर्शवतात आणि वैज्ञानिक बाबी

---

३५. *कित्ता, पृष्ठ – २०२.*

३६. *मोहिते वीर उत्तमराव, भारतीय तत्वज्ञानातील वैज्ञानिकतेचा सिध्दांत अथवा निरिश्वरवाद, पृष्ठ – २३.*

३७. *कित्ता, पृष्ठ – १०.*

मानवी जीवन व संस्कृती आणि सभ्यता यांना उपयुक्त ठरून मानवी प्रगती झाली हे निदर्शनास आणून देताना प्राचीन काळातील विचारसरणी आधुनिक काळात जागतिक पातळीवर कशी एकरूप हेते यासाठी कपील आणि कार्लमार्क्स यांचा उल्लेख करतात.

उत्तमराव मोहिते यांच्या भारतीय इतिहासाविषयाचा दृष्टिकोन अभ्यासला असता त्यांनी मांडलेला सिद्धांत उपयुक्त आहे असे म्हणावे लागेल. कारण त्यांनी अध्यात्म व वैज्ञानिकता यांचा चिकित्सक अभ्यास केला असता तसा अनुभव येतो म्हणून सांस्कृतिक दृष्टीने भारतीय इतिहासाची मांडणी वैज्ञानिक व भौतिक पद्धतीने करणारे वीर उत्तमराव मोहिते भौतिकवादी इतिहासकार असल्याचे निदर्शनास येते.

वीर उत्तमराव मोहिते यांच्या उपरोक्त विवेचनाला अधिक पाठबळ मिळते ते बुद्धी, प्रेरणा, क्रांती या ग्रंथातून ''मानवाने अगदी प्रारंभी निर्माण केलेली तत्वज्ञान म्हणजे अलौकिक शक्तीच्या सहाऱ्याशिवाय निसर्गातील घडामोडी भौतिक कारणांनी घडतात हे समजून घेण्याचे मानवी बुध्दिचे अगदी प्रारंभिक प्रयत्न होते. निसर्ग ही बुध्दिप्रमाण आणि नियमबद्ध पद्धत आहे. हा विश्वास या प्रयत्नाचा प्राणबिंदू होता. असा विश्वास बाळगणे मानवला त्यावेळी शक्य झाले. कारण त्यावेळी मानवी मन अध्यात्मिक गूढ गोष्टींनी अद्याप भ्रांतचित्त झाले नव्हते किंवा धार्मिक मायाजालाने मोहमुग्ध झाले नव्हते.

यावरून वीर उत्तमराव मोहिते यांचे सांस्कृतिक इतिहास लेखन वैज्ञानिक, भौतिकवाद, वस्तुनिष्ठता आणि नैसर्गिक नियम यांना तडा न जाता या नियमांमध्ये राहून इतिहासाच्या कसोटीवर उतरत असल्याने उत्तमराव भारतीय इतिहासकार ठरतात.

३.६ मराठ्यांच्या इतिहासलेखनाबाबत उत्तमरावांची भूमिका

वीर उत्तमराव मोहिते यांनी इतिहासलेखनात मराठ्यांच्या सांस्कृतिक इतिहास लेखनावर भर दिला आहे. महाराष्ट्रातील विद्यापीठांनी अभ्यासक्रमामध्ये केवळ राजकीय इतिहास न ठेवता मागील १०–१५ वर्षांत सांस्कृतिक इतिहास विशेष भर

दिल्याचा दिसून येतो. मराठ्यांचा इतिहास हा मध्ययुगीन भारताच्या इतिहासाच्या भाग आहे. मराठ्यांचे राज्य मध्ययुगात झाल्याने मध्ययुगीन काळाची छाप तत्कालीन समाज, संस्कृती व लेखनावर असणे स्वाभाविक आहे. यामुळे इथे भारतीयांना इतिहासलेखनाची कला होती का? हा प्रश्न उपस्थित होतो. याचे उत्तरही यापूर्वी शोधले व त्यावर आधारित स्पष्टीकरण दिले आहे.

भारतीयांना विशेषत: हिंदूना १९ व्या शतकापर्यंत इतिहासलेखनाची कला अवगत नव्हती, असे म्हटले जाते. या बाबी अर्धसत्य आहेत म्हणून १९ व्या शतकापूर्वी इतिहासलेखन झाल्याचे सांगण्यात येते, पण हे नक्की. ऐतिहासिक घटनांच्या नोंदी भारतीय इतिहासात घेतल्या असल्या तरी संलग्नपणे प्रमाणबद्ध व पुराव्याधिष्ठीत शास्त्रीय पध्दतीने इतिहासाचे लेखन झाले नाही हे आपणाला मान्य करावे लागते. जसे भारताच्या सलग इतिहासलेखनाचे प्रयत्न अपुरे आहेत तसाच मराठ्यांचा इतिहास यापासून वेगळा राहणे शक्य नाही. यासाठी उत्तमराव मोहिते यांचा मराठ्यांच्या इतिहासलेखनाप्रतीचा दृष्टिकोन अभ्यासण्यापूर्वी महाराष्ट्रात मराठ्यांच्या इतिहास लेखनाच्या परंपरेचा थोडक्यात परिचय करून घेणे आवश्यक ठरते. म्हणून उत्तमराव मोहिते यांच्यापूर्वी मराठ्यांच्या इतिहासकारांची भूमिका, समकालीन इतिहासकारांची भूमिका व उत्तमराव मोहिते यांची भूमिका व तेच वेगळेपण पाहणे आवश्यक आहे.

३.६.१ मराठ्यांचे इतिहासलेखन

मराठ्यांच्या सत्तेचा उदय मध्ययुगात झाला. या कालखंडातील भाषांचा इतिहासलेखनावर प्रभाव आहे. मराठी आणि संस्कृत या भाषांमध्ये बहुतांश लेखन झाले. यातून छत्रपती शिवाजीराजे भोसले यांच्या राजकीय कारकीर्द नोंदवण्यास महत्त्व देण्यात आले. यामुळे महाराष्ट्रात इतिहासलेखनास वेग आल्याचे दिसते. तत्कालीन काळातील लेखकांनी धार्मिक दृष्टिकोनातून, काल्पनिक इतिहासाच्या नोंदी केल्याचे आढळून येते.

परमानंद, जयराम पिण्डये, गागाभट्ट, निश्चलपूरी, रघुनाथपंत हणुमंते, केशव

पंडित यांनी घेतलेल्या नोंदीच्या आधाराबरोबर अन्य दक्षिण भारतीय लेखकांनी या कालखंडाची नोंद केली आहे. तसेच अनेक परकीय इतिहासकार, लेखक, प्रवासी यांनी या कालखंडाची नोंद घेतल्याचे दिसते. तसेच मुघल इतिहासलेखनाने या कालखंडाच्या नोंदी घेतल्या आहेत.

मराठ्यांच्या इतिहासावर बखर वाङ्मयाचे लिखान अधिक असल्याचेही दिसते. बहुतांशी लेखक बखरीबाबत म्हणतात, ''बखर हा खबर या अरबी शब्दापासून मराठीत बातमी, हकिगत, आख्यायिका, अर्ज इत्यादीसाठी वापरण्यात येतो.''[३८] डॉ. पटवर्धन, य.रा. दाते, य.न. केळकर, द.वा. पारसनिस, वा.सी. बेंद्रे, वि.का. राजवाडे, र.वि. हेरवाडकर, वि.ल. भावे, गो.रा. सरदेसाई, गं.ब. ग्रामोपाध्ये, वा.ना. खरे, का.ना. साने, श्री.रं. कुलकर्णी, डॉ. बापुजी संकपाळ, न.चि. केळकर, व्ही.टी. गुणे, य.मा. काळे, ओतूरकर, डी.व्ही. आपटे, ग.द. खरे, म.गो. रानडे, लोकहितवादी, महात्मा फुले, डी.डी. कौसंबी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, वि.वा. मिराशी, भावे वा.कृ., जोशी ना.वी., ढेरे रा.चि., सेतू माधवराव पगडी, न.र. फाटक, पेंडसे श.दा., ना.गो. चाफेकर, सपकाळ बापूजी, गोरे दादा (संपा.) निवडक बखर वाङ्मय सर जदुनाथ सरकार, इत्यादींनी मराठ्यांच्या इतिहासावर लेखन केले. मराठ्यांचे संपूर्ण इतिहासलेखन करण्याचे फार मोठे प्रयत्न झालेले दिसत नाहीत. सी.ए. किंकेड, द.ब. पारसनीस, गो.स. सरदेसाई, नाडकर्णी आर.व्ही. यांचे संपुर्ण इतिहासलेखन करण्याचे प्रयत्न महत्त्वाचे आहेत. यात वा.सी. बेंद्रे यांचे नाव महत्त्वपूर्ण आहे.

अ.रा. कुलकर्णी यांच्या मराठ्यांचे इतिहासकार (इतिहासलेखन पद्धती) या ग्रंथात आधुनिक काळातील मराठ्यांचा इतिहास भारतीय दृष्टिकोनातून सांगतात. यात इतिहास लेखनाचा हेतू ''धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष सांगताना अंतिम घेण्याकडे जाण्याचा मार्ग सुचवलेले असतात.''[३९] असे सांगून वैदिक धर्मातील पुरूषार्थ इतिहासलेखनाचा आधार असल्याचे सांगवतात.

---

३८. सपकाळ बापूजी, गोरे दादा (संपा.), निवडक बखर वाङ्मय, पृष्ठ – ६.

३९. कुलकर्णी अ.रा., मराठ्यांचे इतिहासकार, पृष्ठ – २४३.

मराठ्यांचा इतिहास लिहिताना प्राचीन वैदिक/हिंदू धर्म आणि त्याचे तत्वज्ञान प्रथमस्थानी मानून समाजाची वाटचाल होती. यांनाच प्रमुख मानुन लेखक आपली लेखनी चालवत असे. शास्त्र, महाकाव्य, पुराण इ.च्या आधारे वैदिक धर्मीयांची वाटचाल होत असून या नियमामध्ये चालणारा माणूस, राजा श्रेष्ठ असतो अशी कल्पनाही होती. याचा परिणाम तत्कालीन वाङ्मयावर व इतिहासलेखनावर दिसून येतो.

या इतिहासलेखनात ब्राह्मणी वर्चस्व असल्याचे दिसून येते. उपरोक्त इतिहासकारांतील महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आणि त्यांच्या दृष्टीने लिहिणारे तसेच सेतू माधवराव पगडी यांचा या लेखनपरंपरेत उल्लेख करता येत नाही. या लेखनपरंपरेला छेद देऊन नवीन परंपरा व नवा दृष्टिकोन फुले, आंबेडकर यांनी दिल्याचे स्पष्ट आहे.

३.६.२ मराठ्यांचे इतिहासकार उत्तमराव मोहिते यांचे लेखन

वीर उत्तमराव मोहिते मराठ्यांचे इतिहासलेखन सांस्कृतिक दृष्टिने करतात व इतिहासाबाबतची आपली भूमिका स्पष्ट करतात. ''मानवजातीचा इतिहास हा अध्यात्मिक विचार व वैज्ञानिक, भौतिकवादी विचार यांच्यातील हजारो वर्षांचा संघर्षाचा इतिहास आहे.'' म्हणून मराठ्यांच्या इतिहासाबाबत ते सांस्कृतिक दृष्टिने विचार मांडतात. हे मांडत असताना ते तटस्थ राहतात व अल्प माहिती खरी असल्याचे जोर देऊन सांगत नाहीत तर माहित नाही, अवघड आहे, तर्कावर असावे असा विचार मांडून इतिहास लेखनाची विश्वसनीयता वाढवतात.

३.६.३ मराठा राज्याचा उष:काल

'मराठा' राज्याचा उप:काल दक्षिणेत झाला आणि विकास होत समग्र भारतभर मराठा पोहचला, हे स्पष्ट आहे. 'देशमुख' हा मराठा राज्यातला प्रमुख असल्याचे सांगताना त्याचे स्वरूप स्पष्ट करतात. ''देशाचा कारभार करणारा शासकीय प्रमुख त्याला देशमुख म्हणत. देशाच्या दृष्टिने तोच खरा शासक होता. बाहेरील सत्ता आक्रमण

करीत नाही तोपर्यंत त्या प्रदेशाचा तो राजाच होता. बाहेरील सत्तेने आक्रमण केल्यास देशमुख त्या प्रबळ सत्तेचा मध्यस्थ म्हणून कारभार करी.''[४०] इथे आक्रमण हा शब्द ताबा या अर्थाने वापरलेला दिसतो.

मराठ्यांच्या इतिहासाचा प्राचीन काळापासूनचा आढावा घेताना मराठ्यांच्या विचारसरणीचा उल्लेख करताना उत्तमराव मोहिते म्हणतात, ''संस्कृत साहित्य कन्याकुमारीपर्यंत चालत गेल तरी उत्तरेकडील आर्य विचारसरणीचा परिणाम मराठ्यांच्या जीवनावर झाला नाही. जैन व बौध्द विचारांचा प्रभाव पडून आर्यांनी मांसाहार सोडला पण मराठ्यांनी मात्र आजपर्यंत मांसाहार निषिद्ध मानला नाही.''[४१]

यावरून प्राचीन काळात आर्यसंस्कृती स्वत:च्या संस्कृतीच्या प्रसाराबरोबर जैन व बौध्द धर्माच्या तत्त्वप्रणालीचा प्रभावाने वाटचाल केली. दक्षिणेत मराठ्यांनी मात्र आपली स्वभाववृत्ती आर्य, जैन किंवा बौध्द यांच्या तत्त्वप्रणालीनुसार आपल्या जीवनव्यवहारात बदल केला नाही. मात्र वेदांताच्या प्रचाराने शासनकार्यात निवृत्ती मार्ग बोकाळला. व्रतवैकल्यांचे थोतांड माजले. ही एक समस्या मानून या समस्येचे निराकरण करण्याचा प्रश्न निर्माण झाल्यावर आर्याचे संस्कृत साहित्याचा अभ्यास करून कर्मकांडाला उत्तर देण्याचा अनेक बंडखोर पुरूषांनी प्रयत्न केला.

मराठवाड्यात वैदिकतेविरूद्ध बंड पुकारल्याचे दिसते. वैदिकतेच पीठ याविरूद्ध जैन, शैव व महानुभव तत्वप्रणालीचा संघर्ष मराठा मुलखात सुरू झाला. विदर्भातही गोविंद प्रभूंनी वैदिक संस्कृतविरूद्ध बंड केले. ''महानुभवांचा त्रिमुखी दत्त शिकारी पारध्याचे प्रतिक आहे आणि ज्ञानबा नावाच्या महानुभवाने गीतेचे संपूर्ण मराठी भाष्य केले होते. कालांतराने महानुभवच गूढ कटूवादाच्या आहारी गेला. यास उत्तमराव मोहिते वाङ्मयी संग्राम म्हणतात.''[४२] या संग्रामात मराठा समाजाचे दोन भाग पडले. एक चमत्कारांच्या मागे गेला आणि एक सुधारणावादी राहिला.

---

४०. *कित्ता, पृष्ठ – २४३.*

४१. *मोहिते वीर उत्तमराव, मराठ्यांच्या सांस्कृतिक क्रांतीचा इतिहास, पृष्ठ – ८.*

४२. *कित्ता, पृष्ठ – ८.*

उत्तमराव मोहिते यांचा उपरोक्त चिंतनाचा विचार केला असता मराठा हा मूळ दक्षिणेतील असावा आणि आर्यांची आक्रमणे दक्षिणेकडे होत असताना तसेच जैन व बौध्द यांच्या विचारांचा प्रसार होत असताना दक्षिणेत मराठ्यांनी आपली आचारसंहिता कायम ठेवल्याचे दिसते. कालांतराने मराठ्यांमध्ये वेगवेगळ्या विचारधारा निर्माण होऊन चमत्कारीक अध्यात्मिक विषयांना महत्त्व देणारा मराठा व पूर्णत: सुधारणावादी विचार करणारे मराठ्यांचे पूर्वज भारतीय इतिहासातील मौर्य असल्याचे सांगण्यात येते. यामुळे इ.स.पूर्वीपासून दक्षिणेत मराठा आपल्या जीवनशैलीने जगत असल्याचे दिसते. इ.स. १० व्या शतकानंतर मराठ्यांमध्ये क्रांतिकारी बदल होत असल्याचे समजते.

वेदांताविरूद्ध, वैदिक धर्माविरूद्ध मराठा देशात व्यापक चळवळ निर्माण झाली. ''वेदान्ताविरूध्द पंढरपुरने पेट घेतला. विठ्ठल रूखमाईचे भौतिक दैवत उभे करून पुरूष प्रकृतीच्या काल्पनिकतेभोवती वारकरी पंथाने भौतिक क्रांती केली.''[४३] यातून महाराष्ट्राचा, मराठ्यांचा उदय प्रभावी राजकीय सत्ताधीश म्हणून होण्यापूर्वी मराठा राज्याची स्थिती भौतिक विचाराकडे आकर्षित झाली आणि पुढे या विचारधारेवर राज्यकारभार चालला हे मराठ्यांच्या उदयाची कारणे उत्तमराव आपल्या भौतिकवादी विचारातून देताना दिसतात. वैदिक धर्मातील भेदाभेद, तिरस्कार अशा गोष्टीत वाढ झाली व राजा ही या बाबींना प्रधान मानत असल्याने प्रजा राजावर खुष नव्हती. अशा परिस्थितीत मुस्लिमांच्या स्वाऱ्या दक्षिण भारतीय इतिहासावर परिणामकारक ठरल्या. भारतीय सांस्कृतिक जीवनात परिणाम इस्लामांच्या आक्रमणाने झाला.

वैदिक धर्म व धार्मिक नियम यांचा सामान्य माणसाला त्रास होत होता. धर्मगुरू, पुरोहित स्वार्थी होऊन समाजाची पिळवणूक करत होते. यापासून मुक्ती म्हणून बौध्द, जैन यांनी आपल्या अलग विचारांचे प्रसार व प्रचार केला. दक्षिण भारतात आर्यांचे आगमन व संस्कृत मराठी संघर्ष झाला. या परिस्थितीत इस्लामाचे आक्रमण होऊ

---

४३. *कित्ता, पृष्ठ – १०.*

लागले. कोणतेही आक्रमण सांस्कृतिक परिणाम करणारे असते. तसे इस्लामचे आक्रमणांनी भारतीय सांस्कृतिक स्थितीत परिवर्तन घडवून आणले. या आक्रमणामुळे एका नव्या विचाराचा, तत्त्वज्ञानाचा, जीवनव्यवहाराचा परिचय झाला. इस्लामचे आक्रमणाने वैदिक/हिंदू धर्माच्या काल्पनिक पण विश्वसनीय बाबींवर आघात केल्याने याबाबतची नैतिकता ओघानेच कमी झाली. याबाबत उत्तमराव मोहिते म्हणतात, ''महमंद गझनीच्या स्वाऱ्या सुरू झाल्या त्यावेळी मंदिरे समाजरचनेची मर्मस्थाने होती. सार्वभौमत्त्व प्रस्थापित करण्यासाठी महम्मद गझनीला या मर्मस्थानावर घण घालणे इष्ट वाटले आणि भारतीय गांजलेल्या प्रजेची समजूत अशी झाली. देवदुताप्रमाणे मध्य आशियातील इस्लाम सामाजिक समतेचा झेंडा उत्तरेकडून घेऊन येत आहे. इस्लामी सत्तेची स्थापना जनतेच्या सहानुभूतीतून इ.स. १३ व्या शतकात भारतात स्थिर झाली. पण प्रत्यक्षात अपेक्षेपेक्षा घडले उलटेच. भट, पुरोहितांचा वर्ग आक्रमकांच्या स्वाधीन झाला. देवळाच्या देणग्या, पुरोहितांची वर्षासने आणि वंदनीय साधुसंत यांची वर्षासनं मुसलमान बादशहाकडून मंजूर करून घेतली.''[४४]

यावरून भारतीय जनता वैदिक धर्माला कंटाळून मुस्लिम राजसत्ता व धर्म स्वीकारण्यास स्वइच्छेने तयार होती आणि असे प्रयोगही झाले. याचा भारतीय संस्कृतीवर गंभीर परिणाम झाला. लोकांचे धर्मांतर हे वैदिक धर्माचे अपयश होते. खरे तर वैदिक धर्माचे रखवाले भटपुरोहित यांनी वैदिक धर्म बुडतो की काय अशी भीती वाटल्याने स्वत:चा स्वार्थ इथेही साधल्याचे दिसते. ''संस्कृत पंडितांनी अल्लाऊद्दीन खिलजीच्या आक्रमणाचा स्वीकार केल्यामुळे दक्षिणेतील पैठणी पंडितांचे वजन समाजात चांगले वाढले. वर्णप्रभुत्वासाठी पुरोहितांनी प्रयत्न केलेत. काही मराठे पुरोहितांच्या बाजुला गेले. ब्राह्मण कुराणांच्या कलमाही पडू लागले.''[४५]

ब्राह्मणांनी मुस्लिम आक्रमकानंतर ही आपले स्थान कायम ठेवले. मराठ्यांत मात्र फुट पडली. मुस्लिमशाही व भटशाही यांच्या राज्यव्यवस्थेचे समर्थन केले नाही

---

४४. *कित्ता, पृष्ठ – १०.*

४५. *कित्ता, पृष्ठ – १५.*

असा मराठा समाज समाजव्यवस्थेपासून दूर ढकलला गेला. अशांना मुली विवाहासाठी मिळेना अशी स्थिती निर्माण झाली. यास वैदिक धर्म व त्याचे काटेकोर व रूढीप्रिय नियम कारणीभूत आहेत. पुरोगामी विचारांचे मराठा यांनी समाज अमान्य स्त्रियांशी विवाह केले. विधवा विवाहाला या मराठ्यांनी प्रोत्साहन दिले. यामुळे मराठ्यांची ही शाखा खानदानी वतनदारांपासून अलग पडली आणि ''ताट, पाट, हाट आणि रहाट खानदान हीनतेची लक्षणे मानल्या जाऊ लागली.''[४६]

समाज अमान्य मराठे निर्माण झाले सांगताना उत्तमराव स्पष्ट करतात की, इस्लाम आक्रमणाचा स्वीकार न करणारे तसेच वैदिक धर्म अमान्य करणारे मराठे राजकीय व वैदिक धर्मातून दूर गेले. पण सुधारणेची तीव्रता मनामध्ये होती. म्हणून नवक्रांती घडवून आणण्याचा त्यांचा मानस पक्का असल्याने त्यांनी तसे प्रयत्न केले. केवळ सत्ता मिळवणे नाही तर प्रत्येक नागरिक जबाबदार बनावा यासाठी प्रबोधन मार्ग स्वीकारला.

खानदानहीन समजलेल्या मराठ्यांनी जगदंबेसमोर गोंधळ घालायला सुरूवात केली. वाघ्या, मुरळी व गोंधळाची फळी मदतीला घेऊन कार्य केले. या कार्यात शेतकरी ''शेती करणारे कुळ कुणबी झालं, बागाईतदार माळी बनला, मासेमारी करणारा दर्यावर्दी कोळी झाला. मराठा रागीट असल्याने मराठा–मराठ्यांत कायमचे वैर झाले.''[४७]

उत्तमराव मोहिते यांना अभिप्रेत असणारी 'मराठा' संकल्पना नेमकी कशी आहे याचा विचार केला असता त्यांनीच स्पष्ट केले आहे. ''समाजात सुतार, लोहार, सोनार, पाथरवट, तांबटकर, कुंभार, आदि मराठे'' यावरून मराठा भू–प्रदेशामध्ये राहणाऱ्या आणि वैदिक धर्मापासून अलग असून शेतीशी निगडीत जीवन जगणाऱ्या तसेच गावगाड्यात धार्मिक कृत्य सोडून अन्य कार्यास हातभार लावणाऱ्या आजच्या

---

४६. *कित्ता, पृष्ठ – १५.*

४७. *कित्ता, पृष्ठ – १६.*

जाती मराठा म्हणून संबोधतात. यातून उत्तमराव मोहिते यांचा मराठा हा आजचा बहुजन असल्याचे स्पष्ट होते.

शिवशाहीच्या उदयापूर्वी महाराष्ट्राचा दक्षिण भारतीय परिस्थितीचा उल्लेख करताना मराठ्यांमध्ये फुट पडली असा उल्लेख केला आहे. आज मराठा–मराठ्यांमध्ये अकरामासी व बारामासी असे भेद यातूनच निर्माण झाले. जो क्रांतिकारी विचाराच्या परंपरा, रूढी न मानता नवविचारांचा स्वीकार करणारा मराठा 'अकरामासी' हालका संबोधताना जो मुस्लिम, ब्राह्मण व वैदिक विचारांपुढे झुकला तो खानदानी समजत. हे आजही महाराष्ट्रीयन जीवनात दिसून येते.

उत्तमराव मोहिते क्रांतिकारी मराठ्यांना सुधारकांच्या यादीतही बसवतात. 'भ्रूणहत्या' विरोधी सुधारवादी क्रांतिकारी मराठ्यांनी कार्य केलेल्याचा उल्लेख करतात व मराठ्यांच्या मोकळ्या स्वभावाची वैशिष्ट्ये स्पष्ट करतात. ''शिवशाहीच्या उदयापूर्वी आणि प्राचीन काळापासूनचा आढावा घेऊन उत्तमराव मोहिते हे स्पष्ट करतात.''[४८]

- मराठा राज्याच्या उप:काल दक्षिणेत झाला.
- वैदिक पीठाविरूद्ध मराठ्यांनी बंड केला.
- बौध्द, जैन, महानुभाव व वारकरी पंथ हे वैदिक विरोधी सांप्रदाय दक्षिणेत होऊन गेले.
- ज्ञानबा नावाच्या महानुभवाने गीतेचे संपूर्ण मराठी भाष्य केले होते.
- शिवाजी महाराजांच्या राज्यस्थापनेआधी दक्षिणेत अनेक मराठा राज्य होते.
- मराठ्यांच्या महाराष्ट्रातील संसार वसवायला दीड हजार वर्ष लागले असावेत.
- खिलजीचे आक्रमण व मराठ्यांतील गटबाजी.
- समाजबहिष्कृत मराठा सुधारक व क्रांतिकारी बनला.
- शासक मुस्लिम असला तरी खरी सत्ता मराठ्यांच्या हाती होती व सत्ताधीश मराठा, ब्राह्मण व मुस्लिमांच्या अधीन राहिला.

---

४८. *कित्ता, पृष्ठ – १८.*

❀ तुळजापूर, पंढरपूर, जेजूरी, गोंधळी, वारकरी व वाघ्या, मुरळी यांनी मराठ्यात जागृती करून क्रांतिकारी विचार पेरले.

एकंदरीत उत्तमराव मोहिते शिवशाहीच्या उदयापुर्वी मराठ्यांचा आढावा घेताना मराठा–मराठा असे खानदानी व खानदानहीन भेद सांगून सर्वस्व गमावलेल्या मराठ्यांनी क्रांती केली हे स्पष्ट करतात. पूर्वापार चालत आलेले देशमुख हे मुसलमान व ब्राह्मणांची मर्जी राखून सत्ताधीश राहिला. या अनेक मराठा राजांना, पुरोहित, ब्राह्मण व मुस्लिम यांना कंटाळलेला अन्य मराठत्त समाज नव्या क्रांतीची वाट पाहत होता असे स्पष्ट करतात. यातून त्यांनी आतापर्यंत मराठ्यांच्या इतिहासावर व शिवशाहीच्या पूर्वीचा राजकीय इतिहासाच्या नोंदीपेक्षा उत्तमरावांची सांस्कृतिक दृष्टिने केलेली मांडणी महत्वाची वाटते.

शिवशाहीच्या उदयापूर्वी धर्मभोळी जनता होती. जगणे, मरणे व जीवनमरणाचे कार्य करणे यासाठी धर्म सर्वस्वी मानून त्याचा मोकळेपणाने अंगीकार करणारा समाज भौतिक वाढ गमावून बसला होता, स्मृतीचे कायदे यामुळे त्रस्त झालेला समाज बदलाची अपेक्षा करत होता. त्रस्त समाज बदल मागतो हे जागतिक इतिहासावरून दिसून येते. यामुळे राजकारण धर्मकारणाच्या अधीन होवून राजसत्ता दुबळी बनते. या बाबींकडे लक्ष वेधून उत्तमराव मोहिते मराठ्यांच्या इतिहासाची मांडणी करतात. यात पुरोगामी व प्रतिगामी असा संघर्ष असल्याचे स्पष्ट करतात.

भोसले आणि जाधव संबंध हे विनोदातून निर्माण झाले व त्यांच्यात संघर्ष झाल्याचे सांगतात. उत्तमराव मोहिते मराठ्यांच्या इतिहासाची मांडणी करताना मराठ्यांतील संघर्ष ही सांगतात यात ''वतनदारांची स्पर्धा''[४९] सुरू असल्याने अनेक मराठे मराठ्यांच्या विरूध्द लढताना मराठा राज्यातील राजकीय अस्थिरता स्पष्ट करतात.

वीर उत्तमराव मोहिते छत्रपती शिवाजी महाराजांच्या कालखंडावर आपली मते नोंदवतात. तेव्हा महाराष्ट्राच्या इतिहासावर, मराठ्यांच्या व शिवशाहीच्या

४९. *कित्ता, पृष्ठ – २०.*

इतिहासावर नोंदणी करताना लेखन करणाऱ्या इतिहासकारांकडून त्यांची मते भिन्न वाटतात. जशी त्यांची मते भिन्न वाटतात तशी साम्यही वाटतात. छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म हा आज मराठ्यांचा इतिहासात वादग्रस्त बनलेला विषय याबाबत मोहिते आपले मत सांगतात. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्माबाबत म्हणतात, ''मराठ्यांचा कलहाग्नीत वैशाख शुध्दबीजेला शके १५४९ रोजी शिवनेरीवर जिजाऊच्या पोटी शिवरायाचा जन्म झाला.''[५०] म्हणजे १५४९ म्हणजे इ.स. १६२७ मध्ये झाल्याचे स्पष्ट करतात.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या गुरुपदावर कोणास बसवावे यासाठी महाराष्ट्रातील इतिहासकारांनी आणि मराठ्यांच्या इतिहासकारांनी कागदपत्रांची तपासणी केली आणि आपापली मते नोंदवली. आजपर्यंतच्या लेखनावेगळी भूमिका उत्तमराव घेतात आणि आपल्या Exposition of Cosmic Truth या ग्रंथात त्याचे स्पष्टीकरण करतात. छत्रपती शिवाजी महाराजांना जिजाऊंनी घडवले. त्यांचे या व्यतिरिक्त अन्य गुरु नाहीत. शिवाजीच्या चरित्रावर जिजाऊंचा प्रभाव दिसतो आणि जिजाऊंनी शिवार्जीना सर्वसामान्यांचे कल्याण व समतेचा संदेश दिला. यावरून जिजाऊंवर वारकरी संप्रदायाचा प्रभाव असावा आणि तुकाराम महाराजांची विचारधारा छत्रपती शिवाजी महाराजांना उपयुक्त ठरली असावी. उत्तमराव मोहिते समर्थ रामदास शिवाजी महाराजांचे गुरू नसल्याचे स्पष्ट करतात. हे मराठ्यांच्या इतिहासात नाविन्याची भरच आहे व उत्तमराव मोहिते यांच्या अभ्यासाचा परिपाक असल्याचे दिसते.

छत्रपती शिवाजी महाराज यांनी तत्कालीन परिस्थिी काय बदल केला याबाबतीत वीर उत्तमराव मोहिते म्हणतात, ''छत्रपती शिवरायाने तत्कालीन जीवनाची मूल्येच पार बदलून दिली.'' शिवाजी महाराजांच्या इतिहासाकडे मोहिते मुगल बादशाहाविरूद्ध मराठा किंवा मुस्लीम विरोधी मराठा असे न पाहता तटस्थ राहून पाहतात. तेव्हा शिवाजी महाराजांचा लढा राजकीय पातळीवर इस्लामसोबत नव्हता.

---

५०. *कित्ता, पृष्ठ – १८.*

बादशाहा व त्यांच्या राजवटीविरूध्द असेल पण हिंदू विरूद्ध इस्लाम नाही असे सांगून स्वत:चाच समाज जो हिंदू या नावाने ओळखला जातो आणि अन्य म्हणजे मुस्लीम समाजातील गरीब नीतीमान व्यक्ती ज्या जीवनाचा प्रश्न म्हणून इस्लामशी संबंध ठेवतात पण अनेक अन्यायाने त्रस्त अशांना जवळ केले व सामान्य माणसांची दयनीय अवस्था व त्यासाठीची कारणे त्यांनी शोधली. ही कारणे त्यांना जीवनाचे मूल्ये आहेत असे वाटले. जेव्हा मूल्यव्यवस्था नाहीशी होते तेव्हा अज्ञान व अंधश्रद्धा नंगानाच करतात. याप्रमाणेच समाजाची उभारणी चुकीच्या मूल्यावर झाली तर समाज व सामाजिक व्यवस्था खिळखिळी होते हे सामाजिक सूत्र शिवाजींना माहित असावे म्हणूनच हजारो वर्षांपासूनची मूल्यव्यवस्था बदलून नवी मूल्ये देण्याचे धाडस केले.

- वतनदारी बंद केली.
- जैन, शैव, वारकरी, महानुभाव, गोंधळी, तमासगीर, पठाण, महार, मांग, तेली, तांबोळी या सर्वांची सहानुभूती घेतली. ''महार, मांग, रामोशी यांना लष्करीपेशा करण्याची स्मृतीची आज्ञा नव्हती. ती भारताच्या इतिहासात प्रथम शिवरायांनी अधिकाराच्या जागा देण्याची संपूर्ण मोकळीक दिली.''
- मुसलमान शिपायांस गोमांस खाण्यास बंदी नव्हती.
- खान बजाबास मराठा बनवले.
- ब्रह्महत्या पाप हा सिद्धांत मोडला.

शिवशाहीच्या पूर्वीचा समाज आणि त्यांची मूल्ये वैदिक धर्म, स्मृतीग्रंथावर आधारित व प्रभावीत होती. यामुळे त्रस्त समाजाला या त्रासातून मूक्त करणारी आणि प्रभावीत, परिणामकारक व सुखसमाधानाने जगता येणारी व्यवस्था हवी होती. ती ब्राह्मणी, वैदिक धर्मावर हल्ला करून मानवतावादी मूल्यांवर आधारित सांस्कृतिक वाटचाल छत्रपती शिवाजी महाराजांनी केली असल्याचे दिसून येते.

३.७ महाराष्ट्राच्या/मराठ्यांच्या इतिहासलेखन व इतिहासाबाबत उत्तमरावांचा विचार

- ''महाराष्ट्रातील जीवन आणि वाङ्मय म्हणजे जातीवादी मनोवृत्तीने वस्तुस्थितीचा केलेला विपर्यास होय.''
- ''भिक्षूक इतिहासकारांना मानसशास्त्र कळत नाही. उत्तमराव मोहिते वैदिक व्यवस्था, धर्मप्रमाण मानून त्याआधारे केलेल्या इतिहासाला भिक्षूक इतिहास व इतिहासकारास भिक्षूक इतिहासकार म्हणतात. ज्या भारतीय पंडिताकडे इतिहास लेखनाचे काम आले त्यांना समाजशास्त्र, राज्यशास्त्र, मानसशास्त्र, जीवशास्त्र यांचे ज्ञान नाही.'' यावरून भारतीय पंडितवर्गाने धार्मिकदृष्टिने केलेले लेखन काल्पनिक असल्याने तो इतिहास होऊ शकत नाही.
- ''सोवळे इतिहासकार'' यातून ब्राह्मण इतिहासकार जे वैदिक धर्म व त्यांचे तत्त्व प्रमाण मानतात आणि ते ईश्वरनिर्मित असून त्यात कोणत्याही स्थितीत बदल होणे शक्य नाही. म्हणून पारंपरिक व सनातनी दृष्टिने इतिहासाचे लेखन करणाऱ्यांना सोवळे इतिहासकार म्हणतात.
- ''कपोलकल्पित घटनांवर विश्वास ठेवणाऱ्या इतिहासकाराला वस्तुस्थितीचे मर्म कसे कळणार.''

महाराष्ट्राचा मराठ्यांच्या इतिहास वस्तुस्थितीपासून दूर असल्याचे समजते. याबाबत उत्तमराव मोहिते म्हणतात, ''महाराष्ट्रातील फॅसिस्ट जातीवादी इतिहासकारांनी शिवाजी महाराजांची बदनामी केली. त्यांनी जो इतिहास लिहिला तितका काळाकुट्ट इतिहास वैज्ञानिकदृष्ट्या परकीयांनी लिहिला नाही.'' म्हणून उत्तमराव मोहिते मराठ्यांच्या सांस्कृतिक क्रांतीचा इतिहास लिहिण्याचा प्रयत्न करतात आणि त्यात वैज्ञानिक दृष्टिने भौतिकवादी वस्तुनिष्ठ इतिहास लिहिण्याचा प्रयत्न करतात.

''मराठ्यांच्या इतिहासावर पुरोहितांनी लिहिलेल्या ग्रंथांना वैज्ञानिक आधार मुळीच नाही. कपोलकल्पित दंतकथा, पोथ्या, पुराणे व दीर्घकाळानंतर खोट्या बखरी

यांच्या आधारावर लिहिलेला ग्रंथ इतिहासच नाही.''[५१] असा मोहिते यांचा विश्वास आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र हिंदूत्वाच्या चौकटीत बसवण्याचा प्रयत्न केला. पण हे चरित्र सर्वसमावेशक क्रांतिकारी, समतावादी व प्रागतिक असल्याचे मोहिते प्रतिपादन करतात आणि मराठ्यांच्या इतिहासाची चिकित्सकदृष्टीने तपासणी करतात. उत्तमराव मोहिते यांची विधाने अभ्यासनीस व विचार करावयास लावणारी आहेत.

वीर उत्तमराव मोहिते यांनी मराठ्यांच्या व छत्रपती शिवाजीच्या इतिहासातील अनेक प्रसंगाची मांडणी वेगळ्या पद्धतीने करतात. छत्रपती शिवाजी महाराज यांची आग्रा भेट व सुटका याबाबत आपले मत उत्तमराव देतात, तेव्हा त्यांच्या वेगळेपणाची जाणीव येते. शिवाजी महाराजांची आग्रा भेट, कैद व सुटका या ऐतिहासिक घटनेतील राजकीय संबंध इतिहासकारांना उलगडता आले नाहीत असा इतिहासकारांवर आरोप करून स्वत: या घटनेचा उलगडा करतात आणि ''राजसंस्था उत्कर्षाला येतात आणि त्यांचे पतनही होते.''[५२] ते नेमके शरीरसंबंधातून ही बंधने कडक होतात तेव्हा राजसंस्थेचे पतन होते. हे संबंध उदार होतात तेव्हा राजसंस्था प्रभावशाली, विकासशील आणि बलवान होते. एका जातीचे राष्ट्रीयत्व आकुंचित, दुबळे आणि हीणकस असते त्याच्या उलट अनेक जातीजमातीचे राष्ट्रीयत्व अत्यंत बलवान आणि सुदृढ असते. ''त्यावेळी शिवाजींचे लक्ष दिल्लीकडे आकर्षित होते. पण शिवाजींची ही प्रतिभावान महत्वाकांक्षी कल्पना कोणाही राजधुरंधराला खरी वाटेना कारण ती शिष्टसंमत नसून सामान्य व्यवहाराच्या पलीकडे होती. प्रतिक्रियावादी हिंदूत्ववादाने तिच्यावर धर्मभंजकतेची पूट चढवली होती.''[५३] असे प्रतिपादन करतात यातून हे स्पष्ट आहे की, छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य इतिहासकारांनी कार्य म्हणून न पाहता त्याला धार्मिक अधिष्ठान देऊन त्या पाठीमागे हिंदूत्व विचार इतिहासात घुसडला असल्याचे सांगून

---

५१. *कित्ता, पृष्ठ – २०.*

५२. *कित्ता, पृष्ठ – २६.*

५३. *मोहिते वीर उत्तमराव, मराठ्यांच्या सांस्कृतिक क्रांतीचा इतिहास, पृष्ठ – ३०.*

प्रतिक्रियावादी हिंदूत्ववादाने शिवाजीचा इतिहास लिहिला असल्याने वस्तुस्थितीपासून दूर असल्याचे दिसते.

औरंगजेब बादशाहाच्या 'दिवाण इ खासमध्ये' छत्रपती शिवाजी महाराजांनी बादशाहाचा अपमान केला म्हणून अटक करण्यात आली आणि मिठाईच्या पेटाऱ्यात बसून पळून गेले ही कपोलकल्पित घटना असून वास्तव यापेक्षा वेगळे आहे. छत्रपती शिवाजी महाराजांना बादशाहाच्या ताकदीची पूर्ण कल्पना होती व स्वभावही ज्ञात होता. तेथील रीवाज व पध्दती माहित असताना राजकारण धुरंधर शिवाजीमहाराज स्वत:हून स्वत:चा जीव विनाकारण धोक्यात घालण्या इतपत अज्ञ नव्हते. त्यांनी दरबारात बादशाहाचा अपमान केला नाही. अटक करण्यामागे काही वेगळेच कारण असावे. हे कारण सांगताना उत्तमराव मोहिते म्हणतात, ''राजकुंवर छत्रपती महाराजांना प्रत्यक्ष मागणी घालते आणि शिवाजी महाराज उदार अंत:करणाने मान्यता देतात.''[५४] यावरून शिवाजी महाराजांचा बादशाहाशी नाते जोडण्याचा प्रयत्न असून त्या माध्यमातून दिल्लीवर वर्चस्व निर्माण करण्याचा कट आलमगीर बादशाहा शिवाजीसारखा व त्यापेक्षाही अधिक चतुर असल्याने फसला म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांना अटक केली. महाराजांनी आग्रा येथून उत्तरेकडे जाऊन मग स्वराज्याकडे परत आले. या कामात उत्तर भारतीय ब्राह्मणांचा महत्वाचा वाटा असल्याचे सांगतात. महाराष्ट्रीयन ब्राह्मण आणि उत्तर भारतीय ब्राह्मण यांच्यात उत्तर भारतीय ब्राह्मणांचा शिवाजीवर लळा असल्याचे सांगतात. ब्राह्मण म्हणून तिरस्कार, राग उत्तमरावांच्या मनात नसून त्यांचा पुरोगामित्व व प्रतिगामित्व या दृष्टिने नोंद घेतात. म्हणून उत्तमराव मोहिते इतिहासाची मांडणी नि:पक्षपाती पध्दतीने करताना दिसतात.

उत्तमराव मोहिते इतिहास लिहिताना मनमानी करत नाहीत किंवा स्वत:च्या इच्छेनुसार इतिहास लिहिण्याचा प्रयत्नही करत नाहीत. जे घडले त्याला पुराव्यानिशी आणि पुरावा नसेल तेथे साह्याकारी शाखा आणि स्वत:ची बुध्दी वापरताना दिसतात.

---

५४. *मोहिते वीर उत्तमराव, जागतिक कृषक क्रांतीचा विधाता लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख, पृष्ठ – २३६.*

हे कार्य आधुनिक काळात इतिहासकाराची जबाबदारी पार पाडताना उत्तमराव मोहिते दिसतात. एखादी घटना पुराव्याआधी आकसयुक्त दृष्टिने ते इतिहासात घुसवत नाहीत. त्यांना न उलगडणारी गोष्ट ते तटस्थ राहून सांगतात आणि त्यावर आपला तर्क देतात. हे करत असताना डळमळीत बाबींना ठाम विश्वास देऊन न सांगता असावे, असू शकते असे सांगतात. ''शिवाजी महाराजांना गुडघीचा आजार होऊन मरण आले म्हणतात. पण महाराजांना विषप्रयोग झाल्याचाही काहींचा प्रवाद आहे. काय असेल ते असो, पण तीन महिन्यांपर्यंत संभाजीस वडिलांच्या मृत्यूची कल्पना असू नये, यावरून मोरोपंती षडयंत्राची कल्पना येते.''[५५] उत्तमराव मोहिते घटना स्पष्ट करून दोन्ही मते सांगून आपले मत सकारण सांगतात. हे वस्तुनिष्ठ, सर्वमान्य इतिहासकाराचे गुण त्यांच्या लिखानात जाणवतात हे नक्की.

वीर उत्तमराव मोहिते छत्रपती शिवाजी महाराजांच्या नंतरच्या आणि पेशवाईच्या उदयापूर्वीचा इतिहास हा कटकटीचा व अशांततेचा असल्याचे सांगतात. छत्रपती संभाजी महाराज शूर, वीर, पंडित असल्याचे सांगतात. मोगल सम्राटाला व साम्राज्याला जबरदस्त धक्का छत्रपती संभाजीने दिली. म्हणून संभाजी महाराजांची राजवट आलमगीर बादशाहासाठी ''शिवाजी महाराजांच्या राजवटीपेक्षा मोठी आपत्ती आली असे बादशाहाला वाटले''[५६] यावरून छत्रपती शिवाजींपेक्षा छत्रपती संभाजीची धसकी औरंगजेबाने घेतली आणि संभाजीला विरोध स्वराज्यात झाला. ''फितूर मराठ्यांनी संभाजीस पकडून दिले. मराठी कथा कादंबरीकारांनी कलुषाकब्जीच्या नावानं खोटाचा कांगावा केला. कवी कलष हाच खरा संभाजी महाराजांचा इमानदार सल्लागार होता.''[५७] उत्तमराव मोहिते इथे महाराष्ट्रातील ब्रह्मवृंदांना जबाबदार धरून त्यांनी अशा नोंदी केल्याचे स्पष्ट करताना दिसतात. ''मराठी साहित्यानं (गोविंदराव सरदेसाई आणि अर्जुनराव केळुसकर सोडून) छत्रपती संभाजी महाराजांचा काळाकुट्ट इतिहास रंगवला.

---

५५. *वीर उत्तमराव मोहिते, मराठ्यांच्या सांस्कृतिक क्रांतीचा इतिहास, पृष्ठ – ३७.*

५६. *कित्ता, पृष्ठ – ३८.*

याला शास्त्रीय वास्तविक आधार मुळीच नाही. संभाजीसारखा क्रांतिकारक, पराक्रमी महावीर मराठा रियासतीत जन्मालाच आला नाही.''[५८]

यावरून मोहिते छत्रपती संभाजीस क्रांतिकारक मानतात. छत्रपती संभाजीने महाराष्ट्राच्या व मराठ्यांच्या इतिहासात हजारो वर्षांचा कायदा तोडून सांस्कृतिक क्रांतीची जोपासना करण्याचा धाडसी प्रयत्न केला. यापूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांनी असे प्रयत्न केलेत. ब्रह्महत्या पाप नसून छत्रपतींनी राज्यकारभार करताना जर ब्राह्मणांनी अपराध केला तो अपराधा मृत्यूदंडास योग्य असेल तर तो दिला आणि संभाजी महाराजांनी संस्कृत विद्या ब्राह्मणांची मक्तेदारी नसून ती एक भाषा आहे व ती शिकणाऱ्याची असा हजारो वर्षानंतर क्रांतिकारक पवित्रा घेतल्याचे मोहिते स्पष्ट करून मराठ्यांच्या सांस्कृतिक क्रांतीची नोंद घेतात. म्हणून उत्तमराव मोहिते इतिहास लिहिताना मराठ्यांचा इतिहास लिहिताना राजकीय इतिहासापेक्षा सांस्कृतिक इतिहास प्राधान्य देतात हे स्पष्ट दिसते.

छत्रपती संभाजीनंतर मराठेशाहीला ग्रहण लागले. तरी राजाराम व ताराबाई यांनी मराठा मुलुख सुरक्षित ठेवला. छत्रपती संभाजी यांनी अनियंत्रित अध्यात्मिक अस्मितेचं आव्हान स्वीकारून एक हजार वर्षातील अध्यात्मिक रीत बदलण्याची धाडसी भूमिका घेतली. पुढे राजाराम व ताराबाई यांचा कालखंड सततच्या युद्धात गेला. छत्रपती शाहुंची सुटका आणि मराठ्यांच्या इतिहासात भाऊबंदकीचा ऊत आला.

छत्रपती शाहू आणि बाळाजी विश्वनाथ हे मराठ्यांच्या सांस्कृतिक इतिहासात महत्त्वाची भेट मानली जाते. छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेली मूल्यव्यवस्था बदलून हळूहळू बाळाजीने पेशव्यांची मक्तेदारी निर्माण केली. बाळाजीच्या फितूरीने पेशवाईचा उदय झाला. ''बाळाजी विश्वनाथानं भटवंशाचा इतिहास बदलला'' म्हणून भटवंशातील कर्तबगार व्यक्ती म्हणून बाळाजीची नोंद उत्तमराव घेतात. पहिल्या

---

५७. *कित्ता, पृष्ठ – ४०.*

५८. *वीर उत्तमराव मोहिते, मराठ्यांच्या सांस्कृतिक क्रांतीचा इतिहास, पृष्ठ – ४२.*

बाजीरावाने छत्रपतीच्या सार्वभौमत्वाला तडा जाऊ दिला नाही. यापुढे मात्र पेशवाईचा राजकीय दर्जा जाऊन रूढ धार्मिक स्वरूप प्राप्त झालं. नानासाहेब पेशव्यांच्या राजवटीत आदिब्रह्माच राज्य सुरू झाल आणि भारताच्या इतिहासाला भयानक स्वरूप प्राप्त झाल. ''पेशवाई इतक अद्‌भूत राज्य झाल नाही. कारकून सार्वभौम होतो हे जगाच्या इतिहासात नाही. मराठ्यांच्या इतिहासात घडलं.''[५९] पेशव्यांनी हिंदू धर्म व चातुवर्ण्य यावर जोर दिला, यामुळे अनेक संकटे निर्माण झाली. पानिपतचा पराभव याचाच भाग असल्याचे दिसते.

उत्तमराव मोहिते पेशवे ब्राह्मण म्हणून टीका करत नाहीत तर वस्तुस्थितीचा शोध घेतात आणि योग्य निर्णयाचे व नेतृत्वाची नोंद करतात. मग तो ब्राह्मण का असेना. पानिपतबाबत 'लढाईऐवजी काशीयात्रेची तयारी' असा उल्लेख करून योग्य नेतृत्वाची दखलही घेतात. मोहिते म्हणतात, पानिपतच्या लष्करी तळावर औषधालाही महार सेनापती सापडायचा नाही. इब्राहीमखान गारदी चालतो पण महार नको. अशी पेशवाईची भूमिका होती. सर्वसमावेशक विचार करणारे पेशवे असल्याचे उत्तमराव निदर्शनास आणून देतात. ''सिदनाक महार सेनापती चालत नसेल तर सारे भट लष्करातून निघून जा म्हणणारा बाजीराव कोठे आणि पुरंदरे पटवर्धनाशिवाय दुसरा चालत नाही म्हणणारा सदाशिवरावभाऊ कुठं!''[६०]

यावरून वीर उत्तमराव मोहिते यांची चिकित्सा इतिहासातील नियमांना अनुसरून आहे. त्यांनी सांस्कृतिक दृष्टिने इतिहासाची मांडणी करताना सर्व बाबतीत वर्चस्व तेव्हाच असेल जेव्हा सांस्कृतिक स्थिती खेळीमेळीची असेल आणि असे नसेल तर सर्वच बाबतीत पतन. असेच मराठ्यांच्या इतिहासात पेशवाईच्या काळात सांस्कृतिक पतन होऊन राजकीय पतनही झाल्याचे दिसते. म्हणून उत्तमराव मोहिते म्हणतात, ''तमाम मुस्लीम जमात खतम करायला पेशव्यांच्या जनानखान्यातील

---

५९. *कित्ता, पृष्ठ – ४२.*

६०. *कित्ता, पृष्ठ – ५५.*

पलटण चालली.''[६१] यावरून युद्धमैदानावर 'स्त्री' नसावी हा छत्रपती शिवाजी महाराजांनी घालून दिलेले मूल्य पेशवाई विसरल्याचे दिसते. शूर, धाडसी युद्ध करणारी स्त्री मैदानावर जमेल पण कामभोगासाठी युद्धावेळी स्त्री नसावी. ही ओळख पेशवे विसरले आणि महाराष्ट्राच्या मराठ्यांच्या वाट्याला राजकीय व सांस्कृतिक पराभव आला असे स्पष्ट करतात.

मराठ्यांच्या इतिहासातील पेशवाईचा इतिहास हा रंगेल, अद्‌भूत व सोवळा इतिहास आहे, असेच उत्तमरावांना सांगावयाचे आहे. हे सांगताना धाडसी, साहसी, मानवीय विचार करणाऱ्या पेशव्यांची आणि निर्णयांची वेगळी दखल घेताना उत्तमराव दिसतात. मध्ययुगीन काळातील मराठ्यांच्या इतिहासावर उत्तमराव मोहिते सांस्कृतिक अंगाने प्रकाश टाकून या कालखंडातील अनेक घटना व त्यांची कारणमीमांसा अन्य इतिहासकारांपेक्षा वेगळ्या पध्दतीने करून स्वत:चा एक ठसा इतिहासलेखनात निर्माण केला. यात मराठ्यांच्या उदयापासून अस्तापर्यंत अनेक घटना व प्रसंगाचे वेगळेपण आपल्या खास शैलीमध्ये सांगतात आणि इतिहासलेखनाला अधिक वस्तुनिष्ठ व जीवनोपयोगी बनविण्याचा प्रयत्न करतात. हे करत असताना त्यांची लेखनी धारदार असून कोणतीही तडजोड आमान्य करताना दिसते. ब्राह्मण, हिंदूधर्म/वैदिकधर्म, चातुवर्ण्य यावर चिंतन व परीक्षण करत मराठ्यांच्या इतिहासाची मांडणी सांस्कृतिक दृष्टीने करतात.

३.८ पेशवाईनंतरचा महाराष्ट्र

वीर उत्तमराव मोहिते मराठ्यांच्या सांस्कृतिक इतिहासाचा शिवाजी महाराजांपासून पेशवाईच्या अस्ताबरोबर सलग पुढे मांडतात. दुसऱ्या बाजीरावाच्या काळात पेशवाईचा अस्त झाला आणि बाळाजीपंत नातू यांनी इंग्रजांचा झेंडा शनिवार वाड्यावर फडकावला. याबरोबरच या मुलखावर राज्य प्रस्थापित होऊन इंग्रजी अंमल

---

६१. *कित्ता, पृष्ठ – ५६.*

सुरू झाला. ब्रिटिश सुधारणावादी धोरणे व भारतीय, महाराष्ट्रीयन सनातनवाद यात खूप अंतर तर होतेच पण सनातनवाद मानवीयता नष्ट करून विषमता जोपासणारा ठरला. या उलट ब्रिटिशांची विचारधारा सुधारणावादी होती. अनेक समस्यांमध्ये लक्ष घालून सुधारणा करण्यास ब्रिटिशांनी सुरूवात तर केली पण यासुधारणा पारंपरिक चौकटीत बसवून घेण्याचा प्रयत्न होत होता. याबाबत वीर उत्तमराव मोहिते म्हणतात,

- कॉलेजकुमारींनी जोडा घालावा.
- डोक्यावर छत्री घ्यावी.
- विधवांनी कुंकू लावावे.
- बायकांनी एक कसोटा घालावा की पोकळ ठेवावा.
- केसाचा भाग तिरपा ठेवावा की सरळ.

अशा सुधारणा म्हणजे मोठे धाडस वाटत असे. पण या ''शुद्रादिशुद्रांच्या कोट्यावधी गुलामांची मूक हाक त्यांच्या कानाला कधी ऐकू आली नाही. आंग्लाईत ब्राह्मणी धर्मांची सोयीची चालीरीती कायद्यात रूपांतरीत झाली व भारतीय कायद्यावर पुन्हा मनुस्मृतीची सावली पडली. सर्वोच्च अधिकारी इंग्रज असले तरी हाताखाली खर्डेखाशी करणारी सारी जानवीच होती. आंग्लाईतील ब्राह्मण जातीचं भौतिकीकरण भारताच्या इतिहासातील अपुर्व घटना आहे. महाराष्ट्रात त्यांच्या इतकी जागृत जमात दुसरी नाही.''[६२] यावरून ब्रिटिशांच्या सुधारणांचा आणि ज्ञानाचा फायदा प्रथम ब्राह्मणांनी मिळवला. तसे इंग्रजी राजवटीत सर्वांना शिक्षण घेण्यास मुभा होती. ब्राह्मणांनी प्रथम पाश्चात्य शिक्षण घेतले. यामुळे पुर्वीप्रमाणे अन्य समाजाला शिकवण्याची जबाबदारी त्यांच्यावर आली आणि त्यांनी पारंपरिक नियमांचा वापर केला. स्वत: सुधारणा करण्यासाठी उत्सुकता दाखवून अशा सुधारणा की ज्याने जीवनमूल्यात काही फरक पडणार नाही उचलून धरल्या. पण शेतकरी, कष्टकरी, कामगार, शूद्र अतिशूद्र यांचा बहुसंख्य वर्ग सुधारण्याकडे लक्ष दिले नाही.

---

६२. *कित्ता, पृष्ठ – ८३, ८५.*

वीर उत्तमराव मोहिते म्हणतात, ''विसाव्या शतकात जो नवीन भारत निर्माण होणार होता त्याला सनातन तत्वज्ञान चिपळूणकर, टिळक यांसारखे नष्ट करत होते. यात गरज होती भौतिक संस्कृतीची. ही भौतिकतेची ज्योत जोतीराव फुले यांनी उजळली आणि शूद्र–अतिशूद्र यांच्या प्रश्नाला वाचा फोडून समस्या सोडवण्याचा प्रयत्न केला. ''देव, धर्म, अध्यात्म, ब्रह्मविद्या विरूध्द फुलेंनी निसर्गवाद सांगितला''[६३] आणि सर्वसामान्य शूद्र, अतिशूद्र, अस्पृश्य यांच्या जीवनाची कैफीयत मांडून दु:ख–दारिद्रयात जीवन जगणारी कष्टाळू संस्कृती फुले यांनी आपल्या लेखनीतून साकारल्याचे सांगतात.

हिंदू जमात विस्कळीत, विभक्त बनल्याचे आणि त्यास कारण त्याच जमातीच्या व्यवस्थेत असल्याचे स्पष्ट आहे. इंग्रजांच्या आमदानीत या पारंपारिक मूल्य व्यवस्थेत फारसा फरक पडला नाही. म. फुले यांच्या प्रयत्नाने थोडाफार फरक पडून नवीन सांस्कृतिक मूल्य समाजाला दिली. म्हणून आधुनिक महाराष्ट्राची सुरूवात खऱ्या अर्थाने महात्मा फुले यांनी केल्याचे उत्तमराव मोहिते यांच्या लेखनातून दिसून येते, ते योग्य आहे असे म्हणता येईल.

विस्कळीत हिंदू जमातीला एकजिनसी बनवण्याचा प्रयत्न दयानंद सरस्वतींनी केल्याचा उल्लेख करून अनेक प्रयत्नांनी हिंदू जमात एकजिनसी न झाल्याचे हजारो वर्षांचा वारसाच्या आधारे सांगतात, हे मोहिते यांचे चिंतन योग्य वाटते. महात्मा फुले यांनीच आधुनिक महाराष्ट्र निर्माण करण्याचा प्रथम प्रयत्न केला. त्यांचा महाराष्ट्र ब्रह्मवादी, दैववादी, अध्यात्मवादी नसून भौतिकवादी असल्याने मोहिते फुले यांना ''महात्मा ऐवजी महान भौतिकवादी'' म्हणतात.[६४] महात्मा फुले यांच्या संदर्भातील मोहिते यांचे विधान फुले यांचे कार्य पाहिले असता तंतोतंत बरोबर आहे असे म्हणावे लागते.

महात्मा फुले यांच्या विचारांचा वारसा पुढे चालू लागला. वेळ, प्रसंग आणि

---

६३. *कित्ता, पृष्ठ – ९९.*

६४. *कित्ता, पृष्ठ – ८३, ८५.*

कार्य करणाऱ्या व्यक्तीच्या कार्यक्षमतेवर या विचारांची पेरणी प्रभावित व्यक्ती करत होते. यात मोहिते राजर्षी शाहू यांची नोंद करतात, भारताच्या इतिहासात ''सिध्दार्थानंतर राजर्षी शाहू'' यांची नोंद घेतात. वैदिक धर्माने गांजलेल्या समाजाला भौतिक व तात्त्विक आचार राजर्षी बुध्दानंतर राजर्षी शाहू यांनीच दिला. छत्रपती राजर्षी शाहू यांनी वैदिक धर्माच्या तत्त्वाविरूद्ध युद्ध पुकारले. याबाबत मोहिते म्हणतात, ''हिंदूराष्ट्रवादी व नवमानवतावादी क्रांतिकारक यांच्यातील तत्त्वप्रणालीचा संग्राम''[६५] म्हणून आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासाकडे पाहून आधुनिक मूल्यांवर आधारित सांस्कृतिक वाटचालीची नोंद उत्तमराव मोहिते घेतात.

एकंदरीत वीर उत्तमराव मोहिते आणि पारंपरिक इतिहासलेखन यांचा विचार केला असता वीर मोहिते यांच्या लेखनात वेगळेपण असल्याचे दिसते. पारंपरिक पध्दतीत लिहिलेल्या आणि शास्त्रीय चौकटीत न बसणाऱ्या लेखनावर टीका सप्रमाण करतात आणि आपल्या लेखनाचा वेगळा ठसा निर्माण करतात. मराठ्यांच्या सांस्कृतिक क्रांतीचा इतिहास हा ग्रंथ मराठ्यांच्या इतिहासाची सांस्कृतिक मांडणी करतो. वीर उत्तमराव मोहिते या ग्रंथातून मराठ्यांच्या इतिहासाची सामाजिक, धार्मिक, आर्थिक काही प्रमाणात राजकीय घटनांची मांडणी करून मराठ्यांची संस्कृती व मराठ्यांची सांस्कृतिक क्रांती स्पष्ट करतात.

३.९ इतिहास लेखन प्रवाह व वीर उत्तमराव मोहिते

आधुनिक काळात भारतातच नव्हे तर जागतिक पातळीवर इतिहास लेखनामध्ये वेगवेगळे प्रवाह निर्माण झाले. त्या प्रवाहाला स्वत:ची एक स्पष्ट भूमिका असल्याने आणि प्रत्येक विचारधारेत काही तथ्य असल्याने त्या इतिहासाशी संलग्न व अभ्यासविषयात समाविष्ट झाला. याप्रमाणे वीर उत्तमराव मोहिते यांच्या चिंतनातून या लेखनप्रवाहाबाबत कोणती भूमिका घेतात हे पाहताना त्यांचा वैज्ञानिक दृष्टिकोन

---

६५. *कित्ता, पृष्ठ – १४४.*

दूर ठेवता येत नाही. ऐतिहासिक घटना, प्रसंग, मानव व त्याची वाटचाल, निसर्ग, ब्रह्मांड या बाबींना समजून घेण्यासाठी विज्ञान महत्त्वाचे आहे. कारण विज्ञान काल्पनिक बाबींना, भावनिक बाबींना जबाबदार न राहता वस्तुस्थितीशी प्रत्यक्ष जबाबदार असते. म्हणून मोहिते यांचे लेखनावर प्रत्यक्षवादी विचारधारेचा प्रभाव दिसतो.

वीर उत्तमराव मोहिते सर्व ज्ञानाचे वैज्ञानिक पध्दतीने विश्लेषण व्हावे अशी अपेक्षा दर्शवतात व त्या पध्दतीने कार्य ही करतात. तर ''सर्व ज्ञानाचे वैज्ञानिक दृष्टीने विश्लेषण करण्याचा एकमेव मार्ग जर कोणता असेल तर तो प्रत्यक्षवाद''[६६] अशी कॉम्पची भूमिका आहे. यावरून उत्तमराव मोहिते प्रत्यक्षवादी विचारांना भारतीय परिस्थितीशी मांडतात व प्रत्यक्षवादी विचारातून इतिहासाची मांडणी करतात, असे म्हणता येईल.

ब्रिटिशांच्या भारत आगमनाने आणि भारतीयांच्या पाश्चात्य शिक्षणाने भारतीय सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक चिंतन करणारा वर्ग तयार झाला. ब्रिटिशांपेक्षा आपली संस्कृती कमी नाही. आपणालाही उज्ज्वल वारसा आहे, या भूमिकेतून आत्मशोधाची एक चळवळ सुरू झाली. ब्रिटिशांनी भारताचा लिहिलेला इतिहास शास्त्रशुद्ध असला तरी नि:पक्षपाती नसून एकांगी लिहिला म्हणून तो आपला इतिहास आपण लिहिला पाहिजे अशी भावना निर्माण झाली.

ब्रिटिश भारतीय धर्माची अवहेलना करीत होते. देवदेवतांची उपहासाने टवाळी करीत होते. हा अपमान मानुन आपल्या संस्कृतीबाबत चांगुलपणाने लिहिण्याचा प्रघात झाला. ''राष्ट्रवादी इतिहासलेखनाचा प्रारंभ हा प्रामुख्याने साम्राज्यवादी इतिहासलेखनाची प्रतिक्रिया होती''[६७] आणि उत्तमरावांना काल्पनिकता, अतिशोयक्ती, अप्रमाणता मान्य नसून 'वास्तववादी, प्रत्यक्षवादी' विचारांवर इतिहास लिहिला पाहिजे अशी भूमिका होती. यामुळे राष्ट्रीय भावना जोपासायची असली तरी त्यातील दोष स्वीकारले पाहिजेत. देव, धर्म, अध्यात्म यातील काल्पनिक बाबी

६६. *कित्ता, पृष्ठ – १७७.*

६७. *डॉ. कोठेकर शांता, पूर्वोक्त, पृष्ठ – २०८.*

आपल्या आहेत म्हणून त्या खऱ्या आहेत असे न मानता त्यातील वस्तुस्थिती जाणून प्रत्यक्ष प्रमाणाने सिद्ध होणाऱ्या बाबी इतिहास असू शकतो अशी भूमिका उत्तमरावांनी घेतली.

वैज्ञानिक दृष्टि गणिती जी घोकी ।
काल्पनिक बाकी वजा करा ।।
वास्तवीक ज्या ज्या असती घटना ।
अवास्तव ताना तोडू नका ।।
अनुक्रम जोडा वर्गवारी काढा ।
सामान्य निवडा स्वाभाविक ।।
दैवी चमत्कारा येथे नाही थारा ।
उत्तमच्या घरा वस्तुपण ।।[६८]

यावरून वीर उत्तमराव मोहिते जो भारतात राष्ट्रवादी लेखनप्रवाह सुरू झाला तो इतिहासाच्या बाबतीत नसावा. 'राष्ट्रवाद' जोपासताना कमकुवत किंवा अवमान करणाऱ्या बाबी असतील तशाच मांडाव्या. त्यात मोडतोड करून चांगल्या दाखवू नयेत म्हणून राष्ट्रवादाला वास्तव व प्रत्यक्षवादाची जोड देऊन मांडणी करतात. तेव्हा भारतीय इतिहासातील काल्पनिकतेवर प्रहार करताना दिसतात, हे योग्य आहे असे मानावे लागेल.

''इंग्रज लेखकांनी केलेल्या आरोपांचे खंडन करणाच्या अभिनिवेशात कधी वस्तुनिष्ठतेचे भान सुटले; काही अतिशयोक्त विधाने केली; कधी तर्काला न पटणारे भाष्य केले गेले.''[६९] यावरून राष्ट्रवादाबाबत उत्तमरावाची भूमिका योग्य वाटते व राष्ट्रवादी इतिहास मांडताना वास्तवापासून व प्रत्यक्षप्रमाणापासून दूर नसावा असा इतिहासकारांना सल्ला देतात.

---

६८. *मोहिते वीर उत्तमराव, जीवनगाथा, पृष्ठ – ७.*

६९. *डॉ. कोठेकर शांता, पूर्वोक्त, पृष्ठ – २२२.*

आधुनिक काळात इतिहासात आलेला महत्त्वपूर्ण विचारप्रवाह म्हणून मार्क्सवादाकडे पाहिले जाते. मार्क्स याने मानवीजीवनावर आधारित जीवनाच्या विकासामागील आर्थिक हेतुमूलकतेचा आणि भौतिकवादी विरोधविकासाचा सिद्धांत हे मानवी समाजाच्या अध्ययनाचे मौलिक आधार आहे. ही त्यांची वैचारिक निष्ठा आहे. या विचारांना उत्तमराव मोहिते व्यावहारिक रूपात मांडतात, ''मोहिते म्हणतात जीवनातील अनुभव, प्रयोगशाळेतील वैज्ञानिक प्रयोग, विशिष्ट विज्ञानाची प्रगती आणि विशिष्ट विज्ञानाने केलेले विक्रमी शोध यांच्या सामान्यीकरणातून मार्क्स दर्शनाचा उदय व विकास झाला. या दर्शनाने संशोधनाची वैज्ञानिक पध्दती मानवजातीला उपलब्ध करून दिली.'' यामुळे नैसर्गिक विज्ञानाचा संशोधक भौतिकवादी असलाच पाहिजे असे झाले आहे. कार्लमार्क्स यांनी मांडलेली विधाने आणि सिद्ध केलेले निर्णय यांची घोकपट्टी करून पांडित्य करणे म्हणजे मार्क्सवादी नव्हे. त्याचे वर्म व मर्म समजून घेऊन प्रत्यक्ष सामाजिक जीवनात त्यांची अंमलबजावणी करणे महत्वाचे आहे. कार्लमार्क्सच्या भौतिकवादाला वैज्ञानिकदृष्टिने मांडून तो विचार भारतीय अध्यात्म, ब्रह्मविद्या, देवधर्म यांच्याशी लावून ''कार्लमार्क्सच्या भौतिकवादी वैज्ञानिकतेचा सिद्धांत या ग्रंथातून भारतीय संदर्भात मांडला म्हणून उत्तमराव मार्क्सवादाच्या अगदी जवळ जातात व समाजवादी समाजरचनेचा पुरस्कार करतात. ''श्रम व सहकार''[७०] या तत्त्वावरील समाजाची अपेक्षा करतात. मानवजातीच्या जीवनाकडे नैसर्गिक, प्राकृतिक व स्वाभाविक दृष्टिकोनातून बघणे याला वैज्ञानिक दृष्टिकोन म्हणतात व मानवजातीचे समाजजीवन प्राकृतिक कायद्याप्रमाणे चालते. देव, धर्म व अध्यात्म याने शोषण व लुटीचे स्वरूप दिले व मानवी समाजजीवनाची मूल्य बनविली. याऐवजी वैज्ञानिक समताधिष्ठित मूल्याची गरज प्रतिपादन करून भारतीय देव, धर्म, अध्यात्म यावर सडाडून टीका करतात आणि समाज क्रांती घडवून आणण्यासाठी समाजवादी समाजरचनेचे भौतिक तत्त्वज्ञान समजून घेतल्याशिवाय

---

७०. *मोहिते वीर उत्तमराव, जागतिक कृषक क्रांतीचा विधाता लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख, पृष्ठ – ५१४.*

गत्यंतर नाही. वीर उत्तमराव मोहिते केवळ कामगारांची हुकूमशाही आणण्याच्या बेतात नाहीत तर उपयोगीता लक्षात घेऊन ''वैज्ञानिकता अथवा विज्ञानदर्शन नवीन समाजरचनेचा पाया आहे''[७१] असे सांगून मार्क्सच्या तत्त्वज्ञानाला विज्ञानाची जोड देऊन प्रत्यक्षात व्यवहारात उतरण्याचा प्रयत्न करतात.

वीर उत्तमराव मोहिते यांचा विचार कोणत्याही एका प्रवाहात स्थिर दिसत नाही अथवा त्या प्रवाहापासून पूर्णत: वेगळा दिसत नाही. मार्क्सवादाला कृषकवादाची जोड देताना उत्तमराव दिसतात. नवीन समाजक्रांती विज्ञानाच्या आधारावर निर्माण होते असे सांगून समाजवादी समाजरचेनची अपेक्षा कृषक, कष्टकरी समाज निर्माण करू शकतो पण यातील अडथळाही स्पष्ट करताना राजकीय विचार अडसर असल्याचे सांगताना म्हणतात, ''भारताच्या इतिहासात भारतीय शासनकर्त्यांनी आतापर्यंत खेळलेले लपंडाव पुरे झाले! यापुढील काळ अशा नेतृत्वाला क्षमा करणार नाही.''[७२] यावरून बदलता काळ व परिस्थितीनुसार वेगवेगळ्या विचारप्रवाहांना मांडताना उत्तमराव दिसतात.

डॉ. आंबेडकर व डॉ. पंजाबराव या दोन महापुरूषांच्या विचारांचा सखोल अभ्यास व त्यांचा सहवास उत्तमराव मोहिते यांना लाभला म्हणून शुद्रातिशूद्र, कृषक यांच्यावर लिखान करताना त्यांची लेखणी विषयात घुसते व आंबेडकरवाद आणि पंजाबराववाद स्पष्ट करते.

वीर उत्तमराव मोहिते यांच्या लेखनातून राष्ट्राविषयी प्रेम दिसते पण आंधळे प्रेम नाही. म्हणून आपल्या राष्ट्रातील पारंपरिक बाबी ज्या मानवी प्रगती व विचाराधारा खुंटीत करतात अशा निदर्शनास आणून त्यागन्याचा व काहींचा समुळ नाश करण्याचा प्रयत्न करतात व दोषस्थानांवर बोट ठेवतात. हा त्यांचा इतिहासकार म्हणून महत्त्वाचा गुण मानता येईल. राष्ट्रवादावर लिहिताना शेतकरी, कष्टकरी, शूद्र, अतिशूद्र, समाजमान्य व समाज अमान्य अशा बहुजन दृष्टिने राष्ट्रवाद मांडतात. तसेच

---

७१. *कित्ता, पृष्ठ – ५१४.*

७२. *कित्ता, पृष्ठ – ५१५.*

मार्क्सवादाबाबत जशास तसा घेत नाहीत, त्याला वैज्ञानिक दृष्टिने मांडतात. कार्ल मार्क्स उद्योगधंदे व यंत्रउद्योगाचा धिक्कार करतात तर वीर उत्तमराव मोहिते स्वागत,

''मंत्रयुग गेले यंत्रयुग आले।.....
श्रमजिवियांना द्यावा हो आराम।।
तेव्हाच विश्राम समाजाला।।''[७३]

उद्योग व्यवसायांच्या भरभराटीस यंत्र महत्वाचे असून श्रमीकांना त्यामुळे कामी कष्ट पडणार असून काम सहज होईल असे प्रतिपादन विज्ञान व तंत्रज्ञानाला मान्य करून कामगाराचे हीत जोपासतात. डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषीविषयी व डॉ. बाबासाहेबांची मागास समाजाबाबतची भूमिका मोहिते यांच्या अभ्यासात समाविष्ट होते. पण 'राष्ट्रवादी' समाजवादी, आंबेडकरवादी, पंजाबरावववादी अशा कोणत्याच एका साच्यात त्यांना बसवता येत नाही. या सर्वांबरोबर असून यापेक्षा वेगळा विचार त्यांच्यात असल्याने त्यांची एक स्वतंत्र विचारधारा बनते.

वीर उत्तमराव मोहिते वंचित इतिहास प्रवाह (Subaltern History) प्रवाहीत होण्यापूर्वी असा विचार व्यक्त करत होते. १९४२ च्या क्रांतीबाबतचे विधान उत्तमराव मोहिते यांना वंचित इतिहासकार म्हणविते. १९४२ च्या क्रांतिकुंडात असंख्य कष्टकऱ्यांचे बलिदान आहे पण त्यांची नोंद नाही. ''मानवजातीच्या इतिहासात जी क्रांतिकारक परिवर्तने घडून आलीत त्यांचे श्रेय तत्कालीन अंतिम नेतृत्वाला मिळत असलं तरी तत्पुर्वी त्या क्रांतीच्या कुंडात अनेक तपस्व्यांचे बलिदान झालेले असते.''[७४] यावरून स्पष्ट आहे की वीर उत्तमराव मोहिते यांचे लेखन तळागाळातील लोकांना न्याय देणारे आहे. त्यांचे जागतिक कृषक क्रांतीचा विधाता लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख या ग्रंथात ज्ञात असणाऱ्या सर्वांना विषयाच्या संदर्भाने न्याय देण्याचा प्रयत्न करतात. मराठ्यांच्या सांस्कृतिक क्रांतीचा इतिहास, भारतीय तत्वज्ञानातील निरिश्वरवाद,

---

७३. *जीवनगाथा, पृष्ठ – २५.*

७४. *मोहिते वीर उत्तमराव, जागतिक कृषक क्रांतीचा विधाता लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख, पृष्ठ – २८०.*

कार्लमार्क्सच्या भौतिकवादी वैज्ञानिकतेचा सिद्धांत या ग्रंथातून त्यांची ही भूमिका अधिक स्पष्ट होते.

वीर उत्तमराव मोहिते वंचित, सबाल्टर्न, शोषितांना न्याय देणारे इतिहासकार असले तरी उत्तमराव यांच्या बाबतची शोकांतिका शोषितच आहे. शोषितांना न्याय देणारा न्यायाधिश वंचित राहिला. व्यवस्थेने उत्तमराव मोहिते व त्यांचे साहित्य वंचित ठेवले, असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही. मराठा विज्ञान मंडळ व डॉ. पंजाबराव देशमुख सांस्कृतिकपीठ वंचित, दुर्लक्षित घटकांना न्याय देण्यासाठी उत्तमराव मोहिते यांनी तत्पर ठेवले होते.

''नियतवादासंबंधीच्या विचारसरणीनुसार जगातील घटनांचे विच्छेदन करता येत नाही. कारण, या घटना दैव व देव यांनी ठरवलेल्या असतात. म्हणून घटनांवर मानवी नियंत्रण असू शकत नाही किंवा त्यांची संपूर्ण माहिती घेता येत नाही. मानवातील या प्रवृत्तीला दैववादी प्रवृत्ती असे म्हणतात. असा हा दैववाद पूर्वनियोजित तत्त्वाच्या जवळचा आहे व त्यामुळे कोणताही बदल होऊ शकत नाही.'' अशी पौर्वात्य नियतवादी विचारधारा आहे.

नियतवादात देव, धर्म, अध्यात्म, दैवी चमत्कार व घटनांचा नियंत्रक परमेश्वर घटना कोणती घडणार व का घडली? या मागे ईश्वराची इच्छा हे एकमेव कारण आहे. जशी घटना नियतीनुसार घडते तसे कारण सुद्धा ईश्वर अथवा परमेश्वर निश्चित आहे. या बाबींकडे उत्तमराव मोहिते अधिक चौकस पध्दतीने विचार करतात.

''विश्वातील घटना स्वयंनियंत्रित असून त्या पाठीमागे कोणताही देव, धर्म अथवा चमत्कार नाही. निसर्गाचे निश्चित नियम आहेत व तो त्यानुसार वाटचाल करतो. या नियमांचा उलगडा विज्ञान करू शकते.''[७५] असे उत्तमराव मोहिते म्हणतात मानवी संस्कृतीच्या आरंभापासून अवकाश युगाच्या विज्ञानापर्यंत कोणत्याही दार्शनिकाने परमेश्वराची संकल्पना तार्किक व वैज्ञानिक रीतीने सिद्ध केले नाही. भौतिक

---

७५. डॉ. सरदेसाई बी.एम., इतिहास लेखनशास्त्र, पृष्ठ – १८१.

वैज्ञानिकतेशी प्रतारणा करणे परमेश्वराच्या संकल्पनेचा मूळ स्वभाव आहे. म्हणून भौतिक विकासच मानवी संस्कृतीचा आधारभूत सिध्दांत बनला आहे. म्हणून देव, धर्म, अध्यात्म, ब्रह्मविद्या, कर्मकांड यांच्यातून भारतीयांना मूक्त करणे हेच खरे मुक्ती आंदोलन आहे.

मानवी संस्कृती व निसर्ग यांची कारणमीमांसा विज्ञानाच्या आधारावर होत असल्याने नियतवाद अमान्य करून उत्तमराव मोहिते भौतिकवादी वैज्ञानिकता इतिहासलेखनात उपयुक्त मानतात व त्यावर आधारित लेखन करतात.

३.१० इतिहासाच्या पुर्नलेखनाची गरज

वीर उत्तमराव मोहिते यांनी लिहिलेल्या 'जागतिक कृषक क्रांतीचा विधाता लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख', 'मराठ्यांच्या सांस्कृतिक क्रांतीचा इतिहास', ATHEISM IN INDIAN PHILOSOPHY, जीवनगाथा, EXPOSITION OF COSMIC TRUTH या ग्रंथातून इतिहासाच्या पुर्नलेखनाची गरज प्रतिपादन केली आहे. भारतीय इतिहास हा आत्मनिष्ठ विचारातून लिहिला गेला आहे. देव, धर्म, अध्यात्म, ब्रह्मविद्या, काल्पनिकता यांचा प्रभाव असल्याने वस्तुनिष्ठतेच्या कसोट्यापासून दूर राहिला आहे. मानवी जीवनाची वाटचाल सांस्कृतिक अंगाने होत असते आणि जगातील प्राचीन इतिहास हा अनेक संस्कृतीचा इतिहास आहे. भारतीय इतिहास राजकीय दृष्टीने लिहिला आहे पण सांस्कृतिक दृष्टिने इतिहासाची मांडणी करण्यासाठी इतिहासाच्या पुर्नलेखनाची गरज प्रतिपादन करतात.

अध्यात्मवाद, साम्राज्यवाद, वसाहतवाद, राष्ट्रवाद, व्यक्तीवाद यावर आधारित इतिहासलेखन पुष्कळ प्रमाणात होऊन यामुळे अनेक घटक यातून दुर्लक्षित राहिल्याने त्यांचे कार्य, कार्य करण्याची पध्दत, विचारसरणी, जीवन जगण्याची पध्दत जर दूर राहिली तर इतिहासाला पूर्णत्व येणार नाही. म्हणून भारतीय वर्णवर्चस्व व वर्गवर्चस्व यांच्या लेखनापेक्षा बहुजनकेंद्रीत इतिहासाचे लेखन होणे गरजेचे आहे.

भारतीय इतिहास हा प्राचीन काळापासून आजतागायत पाहिला असता अध्यात्म व विज्ञान यांच्यातील संघर्षाचा इतिहास उत्तमराव मोहिते यांना दिसला. या प्रदीर्घ काळात वैज्ञानिक विचारसरणी समाजापर्यंत न पोहचल्याने अध्यात्मिक विचारांचा प्रचंड प्रभाव भारतीय समाजावर आहे. आधुनिक काळात विज्ञानाचे महत्त्व व वैज्ञानिक विचारधारा समाजात रुजविण्यासाठी अनेक प्रयत्न झाले व प्रयत्न करण्यासाठी नवीन माध्यमे भारतात आली. म्हणून वस्तुनिष्ठ, वास्तववादी प्रत्यक्ष प्रमाणावर, वैज्ञानिक विचारधारेवर आधारित सर्वांगीण इतिहास सांस्कृतिक इतिहासाच्या माध्यमातून पुन्हा लिहिण्याची गरज प्रतिपादन उत्तमराव मोहिते आग्रहाने करतात व त्यासाठीचा अल्पसा प्रयत्न वैयक्तिक पातळीवर व स्थानिक पातळीवर केल्याचा दिसतो.

एकंदरीत वीर उत्तमराव मोहिते जागतिक इतिहासाचे अभ्यासक असून भारतीय व महाराष्ट्राच्या इतिहासाचा सखोल अभ्यास करतात. मानवी जीवन व निसर्ग इथपासून मानवाशी संबंधीत विषय व घटक आजतागायतच्या इतिहास लेखनाच्या परंपरा अभ्यासतात आणि भारतीय इतिहाससंदर्भात आपली मते नोंदवताना देव, धर्म, अध्यात्म, ब्रम्हवाद, कर्मकांड यांच्या प्रभावातून बहुतांशी लेखन झाल्याने प्रत्यक्ष प्रसंग व घटना यांचा अन्वयार्थ पाहिजते तसा किंवा आहे तास न लावल्याने इतिहासाला विकृत स्वरूप प्राप्त झाले.

इतिहासातील विकृती, प्रकृती बनवण्यासाठी अध्यात्म व वैज्ञानिकता यांचा प्राचीन काळापासूनचा संघर्ष तटस्थ वृत्तीने अभ्यासून इतिहासाची सांस्कृतिक दृष्टीने मांडणी करण्याचा प्रयत्न केला असून वैज्ञानिकता, वस्तुनिष्ठता, सप्रमाणता यांच्या इतिहासाने ठरवलेल्या कसोट्यात उतरतो. इतिहासातील अनेक नवप्रवाह पाहता वीर उत्तमराव मोहिते यांचे केलेले लिखाण आजतागायत वर्ग, वर्ण, साहित्य, धर्म, इतिहास यांच्यातून वंचित राहिलेला आणि दुर्लक्षित घटकांना प्रकाशात आणण्याचा प्रयत्न केला आणि भौतिकवादी वैज्ञानिक, सांस्कृतिक इतिहासलेखनाचा सिद्धांत प्रतिपादन

करून इतिहासाच्या पुर्नलेखनाची आवश्यकता व्यक्त करून पुर्नलिखान करण्याचा प्रयत्न केला असे म्हणता येईल.

बहुजन समाजाच्या इतिहासासंबंधी सर्व जातीय इतिहासलेखकांकडून कळत नकळत झालेला अन्याय दूर करण्यासाठी सतत चिरंतन लेखन आणि ते वर्तन करणारे सत्यशोधक इतिहास संशोधक प्रामुख्याने ब्राह्मण पंडितांच्या ऐतिहासिक कट कारस्थानाविरूध्द आपली लेखनी वापरणारे उत्तमराव पद, पैसा, प्रसिद्धी आणि प्रतिष्ठा यासाठी ब्राह्मणांची मर्जी संपादन करणाऱ्या ब्राह्मणेत्तर लेखकाविरूध्द सुद्धा प्रत्यक्ष कृती करायला मागेपुढे पाहत नसत. अमरावतीला यज्ञ करणाऱ्या स्वकियांविरूध्द ते लढले. फुले, शाहु, आंबेडकर हे त्यांचे आदर्श होते. परंतु, त्यांच्या कार्याची कदर करणारा बहुजन समाज त्याकाळी तेवढ्या प्रमाणात निर्माण झाला नव्हता. आज मात्र जसजसा बहुजन समाज सुशिक्षित होत आहे तसतसे उत्तमरावांच्या विचारांचे महत्त्व वाढत आहे.

***

प्रकरण चौथे

उत्तमरावांच्या ग्रंथांची चिकित्सा

साहित्यातून समाजाचे प्रतिबिंब दिसते. सर्जनशील साहित्यिक आपल्या साहित्य कृतीतून तत्कालीन काळाचे पारदर्शी दर्शन घडवतात. त्या साहित्यावर आणि साहित्यिक तत्कालीन संस्कृतीचा, प्रगतीचा मापदंड मानला जातो. लिहिण्याची कला मानवाला अवगत होण्यापूर्वी साहित्य मौखिक होते. तेव्हापासून मुद्रणकला अस्तित्वात येण्यापर्यंत साहित्य महत्त्वाचे राहिले. हे साहित्य कोणी, कोणासाठी, का बनवले आणि त्या साहित्याचा आधार घेवून कोणी आपले आचरण कसे ठेवावे इथपर्यंतचे विषय साहित्यात होते तसेच मानवी जीवनाशी संबंधीत संकल्पना, धर्म, समाजकारण, अर्थकारण, राजकारण इ. विषय ही त्यात दिसतात.

मुद्रणकलेच्या विकासाने साहित्याचे क्षितिज विस्तारू लागले. साहित्याला नवनवे आयाम प्राप्त होऊ लागले. कथा, कादंबऱ्या, कविता, नाटक अशी कल्पनाविष्काराने गुंग करणाऱ्या साहित्याबरोबर भेदक व वास्तवाचे चित्रण करणारे लेखन होऊ लागलं, कारण विविध थरांतील लेखक लिहू लागल्याने त्या त्या थरातील प्रश्न समोर येऊ लागले. यातून साहित्यिकांच्या अनुभवाची दाहकता सामाजिक परिपक्वता निर्माण करू लागली. समाजातील सुख–दु:खे, नव्या–जुन्या अशा उलथा–पालथीचे घुसळण होऊन एक परिणामकारक चित्र निर्माण होऊ लागलं. मानवाला संस्कृत, सुसंपन्न बनविण्याचं मानवी जीवनाकडे मानवतेने पाहण्याचा दृष्टिकोन साहित्याने दिला. पिळवणूक, फसवणूक, अंधश्रद्धा इ. ची निर्मिती खंडन–मंडन होऊन नव्या रुपाने नवे साहित्य निर्माण होऊ लागले. साहित्याच्या माध्यमातून साहित्यिक धाक दाखवून लादलेली गुलामी झुगारण्याचे साहित्यिकाने साहित्याच्या माध्यमातून केले. वीर उत्तमराव मोहिते यांनी ही विपुल प्रमाणात लेखन केल्याने

त्यांचा साहित्यिक दृष्टिकोन व त्यांची साहित्यकृती यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

४.१ जीवनगाथा

वीर उत्तमराव मोहिते यांनी जीवनगाथा हा 'अभंग संग्रह' करून स्वजीवन व तत्कालीन समाजजीवन यावर प्रकाश टाकला आहे. या अभंगमय रचनेचे इंग्रजीमध्ये विश्लेषण देऊन मराठी व इंग्रजी असा UNIVERSAL SONGS OF LIFE & TRUTH या ग्रंथाची निर्मिती केली. या दोन्ही ग्रंथातील फरक म्हणजे इंग्रजी विश्लेषण. प्रस्तावना तीच आहे. इंग्रजी मराठी ग्रंथासाठी ती इंग्रजीतून दिली आहे.

हा ग्रंथ इ.स. १९५७ मध्ये प्रकाशित झाला. पूर्णत: मराठी जीवनगाथा ३१ पृष्ठसंख्या असून इंग्रजी मराठी ग्रंथाची ९४ पृष्ठसंख्या आहे. मराठी ग्रंथावर किंमत दिलेली नाही. दोन्ही ग्रंथाचे प्रकाशन मराठा विज्ञान मंडळ, शिवाजी नगर अमरावती (मुंबई प्रदेश) झाले. ल.मा. देशमुख यांनी श्री शिवाजी प्रिटींग प्रेस अमरावती येथे मुद्रित केले. इंग्रजी विश्लेषण दिलेल्या ग्रंथावर किंमत दिली आहे. ती १.५० पैसे आहे आणि सर्व हक्क प्रकाशकाधीन आहेत.

''हा ग्रंथ स्वातंत्र्य, समता व बंधुप्रेमाचा अखिल मानव समाजाला संदेश देणारा पहिला भारतीय भौतिकवादी क्रांतिकारक संतसम्राट तुकाराम महाराज यांच्या चरणी समर्पण'' यावरून वीर उत्तमराव मोहिते यांच्या ग्रंथ लेखनाचा व त्यांच्या मानसिकतेचा अंदाज घेता येतो. याच गाथेत वीर उत्तमराव तुकारामांविषयी अभंग क्रमांक ४, ६, ७ आणि ९ मध्ये वर्णन करतात. स्वत: वारकरी झालो म्हणत पुढे ब्रह्मससुंदर तुकारामाने प्राशियला म्हणतात आणि तुकारामाचे अभंग हे शस्त्र आहे. डॉ. पंजाबराव देशमुख वीर उत्तमरावांना अभंग रचून बरे केले केले असे म्हणत हे आधुनिक अभंग असा उल्लेख करतात.

'जीवनगाथा' या ग्रंथास ''डॉ. ज्वालाप्रसाद यांनी प्रस्तावना लिहिली आहे. ते अत्यंत आनंदी होतात आणि ग्रंथासंबंधी म्हणतात''

- ही जीवनगाथा श्रमजीवी बहुजन समाजाच्या उद्धारासाठी आहे.
- समाजात ज्यांना तुच्छ लेखण्यात आले आणि ज्यांचा अनन्वीत छळ झाला त्यांना नैसर्गिक माणुसकीचे न्याय हक्क द्या हा त्यांच्या जीवनगाथेचा दावा आहे.
- धर्मलंड कर्मठांनी शिरोधार्य मानलेल्या कालमान्य श्रद्धा व संस्था यांच्यावर ते जेव्हा टीकेचे प्रहार करतात तेव्हा ते फार कठोर वाटतात पण त्यांनी पाहिलेली व भोगलेली सामाजिक व धार्मिक स्थितीचा विचार करता त्यांची टीका क्षम्यच आहे.
- धार्मिक दुराग्रह व ब्रह्मज्ञान यांच्यावर हल्ले चढविणारा बुध्दिधान भौतिकवादी दृष्टिकोन मोहितेंचा स्वभाव आहे.
- सामाजिक व धार्मिक खलप्रवृत्तीविरूद्ध जे महावीर धैर्याने लढले त्यांच्याबद्दल नितांत आदर मोहिते यांना वाटतो.

एकंदरीत ज्वालाप्रसाद यांनी उत्तमराव मोहिते यांचा स्वभाव व जीवनगाथा ग्रंथात मांडलेला विचार हा रास्त आहे असे अनुमोदन दिले आहे.

उत्तमराव मोहिते यांचा जीवनगाथा हा आधुनिक अभंग संग्रह गाडगे महाराज यांच्यापासून प्रेरणा घेऊन तयार झाला. या ग्रंथात अभंगांच्या माध्यमातून प्रामुख्याने पुढील बाबीवर प्रकाश टाकला आहे. वास्तवता, वैज्ञानिक विचार, समता, एकात्मता, तर्कशास्त्र, मानवतावाद, क्रांतिकारी विचार, स्वजीवन, देव व अध्यात्म, ग्रामविकास, इतिहास, वाचनसंस्कृतीची निर्मिती कल्पना, राजकारण व शेतकरी व कामगार इ. विषयांना उत्तमराव मोहिते यांनी अभंगातून मांडल्याचे दिसते. ११८ अभंगातून मानवी जीवन व त्यातील अडथळे आणि व्यक्तीला घ्यावयाची भूमिका वीर उत्तमरावांनी स्पष्ट केली आहे.

एकंदरीत वीर उत्तमराव मोहिते यांचे अभंग ही सहजपणे त्यांच्या मनातून निघालेले वाटतात. त्यात कृत्रिमता नाही किंवा व्याकरणीक पांडित्य नसून व्यवहारिक

जीवन त्यातून दृष्टीगोचर होते. त्यांनी आपल्या गाथेत, शेतकरी, कष्टकरी, खेडूत जनतेत विकासाची अपेक्षा केली आणि अधोगतीची कारणमीमांसा करताना ते देव, हिंदूधर्म, अध्यात्म, संत, बाबा यांच्या माध्यमातून सर्वसामान्यांची पिळवणूक झाली असून समाजाचे तुकडे पाडून विषमतावादी समाज व्यवस्था निर्माण झाली. ही दूर होऊन समता निर्माण होण्यासाठी आणि एकात्मतेच्या वाढीसाठी मानवतेचा विकास झाला पाहीजे. पण तसे न होता देव, धर्म, अध्यात्म वर्णवर्चस्व यांचाच विकास होत आला. या ब्राह्मण्य विचारापासून आणि काल्पनिक जगापासून समाजाला वास्तवतेची जाण देण्याचा प्रयत्न करतात. क्रांतिकारी विचार तर्कशास्त्र व वैज्ञानिक जीवनाचा आधार घेऊन गतइतिहासाचे नव्याने अवलोकन करतात. यात सध्याचे राजकारण दोषयुक्त असून ते सुधारण्याचा मार्ग म्हणजे सर्वसामान्याची सत्ता यातून ग्रामविकास व शेतकरी, कष्टकरी समाजाचा विकास करण्याचा मार्ग मोकळा करून बहुजन समाजात वाचन संस्कृतीचा विकास करण्यासाठी ते प्रयत्नशील असतात असे त्यांच्या लिखानावरून दिसून येते. ते आपल्या जीवनगाथेत ६३ व्या अभंगात म्हणतात,

''मंत्रयुग गेले यंत्रयुग आले।
तंत्राचे फुटले पेव आता।।
व्रत वैकल्याचें काय आता काम।
देवळांत राम राहिला ना।।
श्रमजीवियांना द्यावा हो आराम।
तेव्हाच विश्राम समाजाला।।
खेडुतांत माझ्या करा रे जागृती।
उत्तमाची छाती होई थंड।।''[१]

यावरून उत्तमरावांची देव, धर्म, अध्यात्म या बाबतची भूमिका नकारात्मक असून विज्ञान, तंत्रज्ञान, श्रमजीवी समाजाच्या सुखासाठी प्रयत्न करून ग्रामीण विकास

---

१. *मोहिते वीर उत्तमराव, जीवनगाथा, पृष्ठ – १५.*

साधण्याचा प्रयत्न जीवनगाथेतून करतात असे म्हणता येईल. वीर उत्तमराव मोहिते यांना स्वजीवनात आलेले अनुभव आणि समाजाचा दृष्टिकोन या पारंपरिक काल्पनिक समाजव्यवस्थेला वास्तवाचे भान देऊन देव, धर्म व अध्यात्म यापेक्षा मानवता सर्वश्रेष्ठ आहे. मानवी जीवन विज्ञानाने सुखी बनवले. पण अध्यात्मिक गुलामगिरी व हिंदूत्व यामुळे मानवता नष्ट होत असल्याने हा विचार त्यागून वैज्ञानिक समाजवाद निर्माण करण्याचा विचार जीवनगाथा देते.

एकंदरीत जीवनगाथेचा विचार केला असता भारतीय परिस्थिती आणि तत्कालीन काळाचे चित्र समोर उभे करून समाजास योग्य दिशा देण्यास जीवनगाथा महत्त्वाची असल्याचे दिसते. अभंगाने सर्वकष विषय घेऊन नव्या मानवी आयामाला मजबूत करण्यास उपयुक्त ठरते. यात वीर उत्तमरावांचे विचार एकांगी विषयाला सर्वांगीण बनवणारे आहेत. ते आक्रमक होतात पण विनाकारण अनावश्यक टीका न करता काव्य सुद्धा वास्तवात करतात. त्यांचे आधुनिक अभंगाने उपदेशक व मार्गदर्शक म्हणून महत्त्वाची भूमिका घेतली असे म्हणावे लागते.

४.२ देवीच्या देवळात गोहत्या

उत्तम पांडुरंग मोहिते यांनी लिहिलेले 'देवीच्या देवळात गोहत्या' ही पुस्तिका त्यांची प्रथम काव्यपुस्तिका असून रामराव मोहिते यांनी विदर्भ प्रेस अमरावती येथून प्रकाशित केली. उत्तमराव यावेळी मोर्शी येथे वास्तव्यास होते. इ.स. १९३८ मध्ये प्रकाशित झालेली ही छोटीशी पुस्तिका तत्कालीन काळासाठी मोठ्या ग्रंथालाही मागे सारणारी ठरली. ज्या काळात प्रस्थापित व्यवस्थेविरूद्ध एखादे वाक्य म्हणणे अवघड होते अशा वेळी १२ पृष्ठामधून ३२ काव्य म्हणजे ढोंगी विचाराचे उच्चाटनासाठीचा हा प्रयत्न महत्त्वाचे आहे. ज्यांना समाजसुधारक म्हणून तत्कालीन काळात गणले जाई. अशांची सुद्धा हा विचार देण्याचे सहज धाडस होत नसे ते उत्तमराव मोहिते यांनी केले.

या पुस्तिकेतून भोळा किसान, महामूर्ख, अभक्त, सद्‌भक्त, आंधळेमन, न पटणारी गोष्ट, गोहत्या अशा विषयांमधून सामाजिक, धार्मिक व शेतक्यांच्या स्थितीवर प्रकाश पडतो. शेतकऱ्यांची सर्वात जास्त फसवणूक, पिळवणूक व मानहानी धार्मिकतेतून होते हे सांगताना म्हणतात,

''जसा वावरा नेयि झाडून नाला
तसे नाडती संत ढोंगी तयाला
शवा फाडती काक आणि गिधाड
तसे नाडती धर्मकोल्हे लबाड''[२]

शेतकऱ्याची पालापाचोळ्याप्रमाणे झालेली स्थिती सांगून अन्याय झुगारण्याचा सल्ला देऊन या पुस्तिकेने कृषकांचे प्रबोधन केले. त्यांना जाणीव जागृती देऊन नवचेतना निर्माण करण्यास महत्त्वाचे ठरले असे म्हणता येईल. तर मूर्तिपूजेत मोहणारा मूर्ख असतो असे सांगतात. अंगास राख लावणे आणि समाजाकडून मान आणि धन मिळवणे यात स्वत:चा नाश असल्याचे सांगतात. हे भक्तपण नाही तर हा खरा अभक्त आहे म्हणून या प्रवृत्तीला फेटाळून देतात आणि 'लोकसेवा' हा भक्ताचा मार्ग असल्याचे सांगतात.

टाळ, वीणा वाजवून मंदीरात जाऊ नका आणि वेळ वाया घालवू नका आपले काम महत्त्वाचे आहे ते सोडू नका असा उपदेश देतात. खरा धर्म अंतरंगात आहे. स्वत:वरून विश्व जाणा कोणाला त्रास देऊ नका आणि त्रास सहन ही करू नका असा संदेश देतात. अहिंसेबाबत म्हणतात, 'दुष्टांचा संहार हीच रे अहिंसा' दुष्टांचा संहार करून समताधिष्ठित मानव बना असा उपदेश गोहत्या या पुस्तिकेतून करतात. गोहत्या या काव्यामधून स्त्री व्यथा मांडली. जाती, धर्म व पंथियतेच्या कक्षा ओलांडून मानवतेचा महान संदेश दिला. अगदी छोट्याशा पुस्तिकेतून मानवी समाजाची व्यथा मांडतात. भक्त, धर्म, देव, मानसिकता , शेतकरी, अंधश्रद्धा इ. विषय या छोट्याशा

---

२. *मोहिते उत्तम पांडुरंग, देवीच्या देवळात गौहत्या, पृष्ठ – ३.*

पुस्तिकेतून मांडून जागृतीमध्ये हातभार दिला. भावी आयुष्यात प्रभावी लेखनाचा पाया वीर उत्तमरावांनी या पहिल्या प्रयत्नात घातला असे म्हणता येईल.

प्रा. कोलते, एम.ए. (मराठी), एल.एल.बी. अध्यापक –किंग एडवर्ड कॉलेज, अमरावती यांनी या पुस्तिकेला अभिप्राय दि. १३ डिसेंबर १९३८ मध्ये दिला. त्यात ते म्हणतात, ''श्री मोहिते यांनी लिहिलेल्या या पुस्तकातील कविता मी वाचल्या. पहिला प्रयत्न या दृष्टीने त्या त्यांना भूषणावह आहेत यात संशय नाही. रचनेच्या दृष्टीने व विषयाच्या दृष्टीनेही त्या मला आवडल्या हे लिहिण्यास आनंद वाटतो. त्याचे पुढील प्रयत्न अधिक यशस्वी होतील तसे ते होवोत हीच मन:पूर्वक इच्छा.''[३]

कोलते यांचा अभिप्राय समर्पक वाटतो आणि तत्कालीन काळात लिहिण्याची आणि प्रकाशनाची तयारी ही त्यांची खंबीर मनोभूमिका दृष्टीस येते. प्रवाहाविरूद्ध विचार मांडण्याचे धाडस महत्त्वाचे आहे. या पुस्तीकेतील विचार थोडका व तुटपुंजा आहे. एखाद्या विषयात न घुसता अनेक विषयांना स्पर्श करून उत्तमरावांनी पहिला प्रयत्न केला. प्रथम प्रयत्न उत्तमरावांचे वय, तत्कालीन परिस्थिती, कौटुंबिक परिस्थिती इ. विचार करता महत्त्वाचा प्रयत्न मानता येईल.

४.३ भारतीय तत्त्वज्ञानातील निरिश्वरवाद (ATHEISM IN INDIAN PHILOSOPHY)

'धर्म' प्रत्येक मानवी समाज जीवनाचे अत्यंत महत्त्वाचे अंग आहे. धर्माशिवाय समाज ही संकल्पना संभवत नाही. प्राचीन व आधुनिक काळात त्याला विशेष महत्त्व आहे. धर्माने मानवी जीवनावर कायमचा व खोलवर ठसा उमटवला आहे. स्वत:स नास्तिक म्हणविणारा सुद्धा परमेश्वराचे अस्तित्व नाकारने त्याचा धर्म बनतो आणि प्रत्येक 'धर्म' तत्त्वावर आधारलेला असतो. या ''तत्त्वज्ञानाचा त्यातील विविध घटकांचा विविध धर्मग्रंथांचा सखोल अभ्यास करणाऱ्या धर्म अनुयायांचे प्रमाण अत्यंत

---

३. *कित्ता, पृष्ठ – १२.*

अल्प आहे. बहुसंख्य धर्माचे अनुयायी परंपरेने चालत आले म्हणून धर्मगुरू व पुरोहिताने सांगितले म्हणून, कारणमीमांसेच्या खोलात न जाता धार्मिकता पार पाडताना दिसतात.''[४]

''हिंदू धर्माचे अंतिम उद्दिष्ट मोक्ष प्राप्ती आहे.''[५] हिंदू विचार प्रणालीप्रमाणे मानवी जीवन नश्वर आहे. म्हणून त्याला महत्त्व नाही. या विचारानुसार पूर्वजन्म व पुनर्जन्म मानवाला घ्यावे लागतात. शरीर नश्वर व आत्मा अविनाशी किंवा अमर आहे. तो एका शरीराचा त्याग करून दुसऱ्या शरीरात प्रवेश करतो. सृष्टीत एकूण ८४ लक्ष जन्म घेतो. हिंदू सामाजिक संघटनेची मूलभूत तत्त्वामध्ये ''वर्णव्यवस्था आश्रमव्यवस्था पुरूषार्थ मोक्ष अध्यात्मवाद कर्म व पुर्नजन्म संस्कार प्रणाली''[६] आहेत. तत्त्वज्ञान अपूर्णत्वाची जाणीव करून देते त्याची इच्छा अनिवार्य असून नवचिंतनाने टिकून राहते.

यावरून असे म्हणता येते की, भारतीय तत्त्वज्ञान ही धर्माआधी निर्माण झाले व धार्मिक भाग बनले. यात ईश्वरीय अंश असल्याने याची चिकित्सा किंवा बदल करण्याचा प्रयत्न केला नाही तसा धर्माने दंडकही घातला आणि अंतिम सत्याचा शोध होत राहिला.

उत्तमराव मोहिते म्हणतात, विश्वाच्या मुळाशी असलेल्या अंतिम सत्याचा शोध घेण्याचे काम गेल्या चार हजार वर्षांपासून चालू आहे. मानवी संस्कृतीच्या प्राथमिक अवस्थेत बुद्धीला जी गृहीत तत्त्वे गवसली भासली तीच अंतिम सत्य आहेत असे आतापर्यंत वाटत आले आहे आणि आजही त्याच गृहीत तत्त्वांना महापंडीतांचा शोषक वर्ग उराशी बाळगून बसला आहे. ''विश्वातील अंतिम सत्याचा शोध घेण्याचा व मिळालेली गृहीतके (Hypothesis) सत्य आहेत हे सिद्ध करण्याच्या चार कसोट्या

---

४. *कुलकर्णी पी.के., भारतातील धर्म, पृष्ठ – १.*

५. *कित्ता, पृष्ठ – २३.*

६. *कित्ता, पृष्ठ – २४, २५.*

(Tests) आहेत. पहिली तर्कशास्त्र, दुसरी प्रत्यक्ष व्यवहार, तिसरी मनोविज्ञान आणि शेवटची कसोटी वैज्ञानिकता होय''[७]

उत्तमराव मोहिते यांनी इथे असे सूचित केले की, प्राचीन भारतात मानवी जीवन निसर्ग आणि व्यवहार यातून प्रारंभी जी तत्त्वे मिळाली ती तत्त्वे गृहीत असून त्याची पडताळणी आणि चिकित्सक दृष्टिकोनातून तपासणी होण्याची गरज आहे. देव, धर्म, अध्यात्म, ब्रह्मत्व, द्वैत, अद्वैत, विशिष्टदैवत अशी तत्त्वज्ञानाची रूपरेषा आहे आणि विश्वाच्या मुळाशी असलेल्या अंतिम सत्याचा शोध घेण्यात आला. त्यातून आत्मा, पुनर्जन्म, पुर्वजन्म, मोक्ष अशा संकल्पना प्रस्थापित होऊन यासाठी अनेक मार्ग कर्म, ज्ञान, भक्ती सांगितले व व्यवहारिक जीवनात असमतोल निर्माण होऊन मानवासाठी तत्त्वज्ञान म्हणजे खिचडी झाली. यामुळे सामान्यांच्या जीवनात कमालीचे अज्ञान व अंधश्रद्धा वाढली आणि देशाचे अतोनात नुकसान झाले. यामुळे यातील सत्य तत्त्व शोधणे महत्त्वाचे झाले.

उत्तमराव मोहिते यांनी भारतीय तत्त्वज्ञानाकडे पाहिले असता विश्वाच्या मुळाशी असणाऱ्या सत्य तत्त्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न भारतीय इतिहासात झाल्याचा दिसून आला. या प्रयत्नात भारतीय दर्शनाचा समावेश होतो. ह्या सहा दर्शनापैकी पूर्वमीमांसा आणि ब्रह्मसूत्रे ही शेवटची दोनच ईश्वरवादी आहेत. या ईश्वरवादालाच ब्रह्मविद्या (Theology) अथवा वेदान्त (Absolutism) असे दुसरे नाव आहे. न्याय, वैशेषिक, सांख्य आणि योग ही चार दर्शने निरिश्वरवादी आहेत असे मत उत्तमराव मांडतात.

भारतीय तत्त्वज्ञान नास्तिकवादी आणि निराशावादी निरिश्वरवादी आहे असे संभवण्याची शक्यता नाकारता येत नाही. उत्तमराव मोहिते यांना 'भारतीय दर्शनातील वैज्ञानिकतेचा सिद्धांत अथवा निरिश्वरवाद' असा विचार आहे. भारतीय तत्त्वज्ञानाचा विचार करता ''भारतीय तत्त्वज्ञानात अंतर्भाव झालेला नाही अशी एकही विचारप्रणाली

---

७. मोहीते वीर उत्तमराव, भारतीय दर्शनातील वैज्ञानिकतेचा सिद्धांत अथवा निरिश्वरवाद, पृष्ठ – १.

नाही या अनेकांगी विकासामध्ये एक वेदमूलक विचार प्रवाह आणि दुसरा वेदनिरपेक्ष विचार प्रवाह असे दोन प्रवाह स्पष्ट दिसतात.''[८]

वेदांना मानणारा आस्तिक आणि न मानणारा नास्तिक अशी नावे देता येतात. भारतीय दार्शनिक विचारात ''बौद्ध मत उघड उघड निरिश्वरवादी आहे.''[९] म्हणूनच पुनर्जन्मासारख्या बाबीवर आणि परलोकांवर बौद्धाचा विश्वास नाही. मोक्ष नाकरतात. यावरून बौद्ध विचार वास्तववादी आहे आणि वैज्ञानिकता त्यात असल्याचे दिसते. भारतीय सहा दर्शनापैकी 'न्याय, वैशेषिक, सांख्य आणि योग' ही दर्शने निरिश्वरवादी आहेत पण कालांतराने त्यात वेदांतवाद्यांनी भेसळ करून ठेवली आहे असे उत्तमराव म्हणतात. ''उपनिषदांत कल्पनांची समृद्ध खाण आहे, उपनिषदाने लोकांना बाह्य धार्मिक विधीकडून अध्यात्माकडे वळवले. ब्रह्म स्वयंसिद्ध भावरूप अस्तित्व असते. जगाच्या निर्मितीचे कारण ईश्वराची मुक्त इच्छा''[१०] हे विषय ही भारतीय तत्वज्ञानात अंतर्भुत असून ब्रह्म, अध्यात्म, ईश्वर या बाबींनी तत्त्वज्ञानाची पूर्तता होत नाही आणि हे तत्वज्ञान वास्तवतेपेक्षा काल्पनिक जास्त आहे. यामुळे जीवन व्यवहारापासून खूप दूर असल्याचे सांगून भारतीय तत्त्वज्ञानाच्या प्रस्थापित पद्धतीला उत्तमराव छेद देतात आणि भारतातील या विरूद्ध तत्त्वज्ञान प्रणालीचा अभ्यास करून तत्त्वज्ञानाच्या इतिहासाला नवी दिशा देतात.

वीर उत्तमराव 'सांख्य' आणि 'योग' या भारतीय दर्शनावर प्रकाश टाकतात आणि म्हणतात ही जीवनोपयोगी तत्त्वज्ञान तत्कालीन काळात व्यवहारात उतरले होते. परंतु, कालांतराने यात वैदिकतेची भेसळ झाल्याने या दर्शनातील वैज्ञानिक पद्धतीचा आधार घेऊन या दर्शनातील वैज्ञानिकता समाजासमोर ठेवली पाहिजे तसा ते प्रयत्न करतात. ''सांख्य, योग हे दर्शन एका काळी अतिशय प्रभावी होते आज याचा विशेषत: सांख्य मताचा फारसा प्रसार दिसत नाही.''[११] सांख्य आणि योग या विचारसरणीने

---

८. *केतकर भा.ग., भारतीय तत्वज्ञानाची रूपरेषा, पृष्ठ – ४.*

९. *कित्ता, पृष्ठ – ६.*

१०. *जोशी ग.ना. (संपा.), डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे तत्वचिंतन, पृष्ठ – २९.*

११. *केतकर भा.ग., पूर्वोक्त, पृष्ठ – २७५.*

विश्वाच्या अंमित सत्याचे स्वरूप उघडे करून ठेवले होते. परंतु, ब्रह्मवादाचे हे उज्ज्वळ तत्त्वज्ञान विकृत व विद्रुप करून ठेवले हे शोधणे आवश्यक आहे. पण 'श्रद्धा' हा सत्यशोधनातील सर्वात मोठा अडथळा आहे हा अडथळा दूर करून पाहिले तर भारतीय दर्शनात निरिश्वरवाद दिसेल. न्याय दर्शनाने कार्यकारणाच्या कायद्याला दार्शनिक क्षेत्रात प्रथम स्थान दिले तर जग अणूंचे बनले असा सिद्धांत प्रथम कणादाने मांडला. म्हणून सांख्य, न्याय, योग, वैशषिक दर्शनाने ब्रह्मविद्येचा शून्यवाद जो वेदांतवाद्यांनी विश्वाचे अंतिम सत्य शोधताना मांडला तो मोहित्यांनी नाकारला.

वीर उत्तमराव मोहिते काल्पनिक बाबींना थारा देत नाहीत. प्रत्यक्ष मानवी व्यवहारात आणि जीवनात याचा प्रत्यक्ष अनुभव येतो तेच सत्य होय. मानवी जीवनात ज्याचा कधीच अनुभव येत नाही आणि येण्याची शक्यता नाही याला सत्य म्हणता येत नाही. मानवी संसारात परमेश्वर कल्पनेचा सदुपयोग मुळीच होत नाही. या काल्पनिक बाबींना थारा न देता 'वैज्ञानिकता' हा उत्तमरावांच्या लिखानातला महत्त्वाचा गाभा आहे. 'मानवी संस्कृतीचा खरा आधार' सांगताना भाषा व चिंतन सांगतात. भाषेने वस्तूचा बोध होतो पण गुणधर्म केवळ शब्दांनी व्यक्त होत नाहीत. ज्ञान हे 'वस्तू आणि प्रतिमेतून' होते या दोन्हीत साम्य नाही भौतिक आणि मानसिक अस्तित्व आहे. अध्यात्माने प्रतिमेचे अस्तित्व मानले. पण भौतिक शरीर लवकर संपत नाही. शरीरातील द्रव्याचे परिवर्तन चालू असते. द्रव्य पूर्णपणे नष्ट होत नाही तर ते एका अवस्थेतून दुसऱ्या अवस्थेत रूपांतरीत होते. म्हणून शरीर नष्ट होत नाही. अध्यात्मवादी शरीरातून लोप पावणाऱ्या जाणीवेलाच अक्षर ब्रह्म मानतात.

वीर उत्तमराव अध्यात्मवादाविरूद्ध आपला सिद्धांत मांडतात. द्रव्य हे गतीशील असते आणि शरीर द्रव्यापासून बनलेले असल्याने शरीराचा म्हणजे भौतिकाचा ऱ्हास होतो. हा अध्यात्मवादाचा सिद्धांत खोडतात आणि मृत्यू निर्मिती संहार, विकास, विलय आणि अंत आदि ही भौतिकतेची अंगे आहेत, असे सांगतात.

वीर उत्तमराव वेदांबाबत म्हणतात, ''वेद सुद्धा मानवाच्या एका प्राचीन

ऐतिहासिक काळातील मानवनिर्मित कल्पनाच होत.''[१२] अध्यात्मिक शब्दांना तंतोतंतपणा (Precision), निश्चितता (Surety), खात्री (Certainty), भेद (distinetion) आणि स्पष्टता (Clarity) हे गुण नाहीत असे सांगतात. योगाबाबत उत्तमराव म्हणतात, ''योगविज्ञानाचा परमेश्वराशी कवडीचाही संबंध नाही. शारीरिक व्यायाम आणि शरीर रचनाशास्त्राचे रुपांतर कल्पित व कर्मठ सिद्धांतात केले आहे. खरे तर योग हे अध्यात्म नसून विज्ञान आहे.'' भारतीय वाङ्मयात हठयोग, योगसुत्रे, भगवत्गीतेच्या दुसऱ्या अध्यायातील संख्यायोग आणि विवेकानंदाचा राजयोग यांना योगाचे अधिकार ग्रंथ म्हणून मानतात. परंतु हठयोग हाच योगाचा प्रमाण ग्रंथ असल्याचे सांगतात आणि योग अभ्यासात गुढवाद कोठेच येत नाही आणि परमेश्वराचे दर्शन मुळीच घडत नाही. तसेच दिव्यत्व, अद्वैतत्व आणि अमरत्व याचा कोठेच संबंध नाही. ''मनाची एकाग्रता प्राप्त करून घेणे योगाचे साध्य आहे. एकाग्रतेत स्वत:ला विसरतो या विसरण्याच्या प्रक्रियेला समाधी म्हणतात.'' उत्तमराव हे चिंतन अनुभवातून करतात. ते ''स्वत: योगी होते आणि त्यांना समाधी लागली होती.''[१३]

'वेदांताचा घटक पूर्ण अथवा पुज्य' याचे कोणत्याही स्थितीत मूल्य बदलत नाही. मूलतत्त्व केवळ ब्रह्म किंवा आत्मा आहे असे वेदांताने मानले. शून्याच्या शोधाने गणित शास्त्रात पूज्याचे महत्त्व वाढले. वैदिक पंडितांनी पूज्यालाच अहंकार (Ego) अथवा ॐ कार मानले. अहंकार, ओंकार, ब्रह्म आणि आत्मा ही सारी अहंकाराचीच रूपे आहेत. इंग्रजीतही Ego, self & soul हेही अंहकाराचीच रूपे होत. या चार शब्दात रूपात्मक फरक आहे, गुणात्मक नाही. अहंकार अथवा ओंकार सर्व ज्ञानाचे बीज आहे असे ब्रह्मवाद्याचे म्हणणे आहे. १० हा वेदांताचा सिद्धांत (Anti thesis) यात एक समान आहे आणि शून्य परस्परांच्या विरुद्ध आहेत. म्हणून वेदांत आणि केवळ प्रकृतीवाद ही दोनही प्रमेये चूक आहेत.

एकदशांश यातील एक ही गती असून दशांश चिन्ह हा पुरुष अथवा द्रव्य

---

१२. मोहिते वीर उत्तमराव, पूर्वोक्त, पृष्ठ – १०.

१३. मोहिते मैनाबाई यांची मुलाखत, दि. ११ ऑगस्ट २०११.

(Matter) होय. द्रव्य आणि गति अथवा पुरुष आणि प्रकृती हा कपिलाच्या सांख्याचा निष्कर्ष आणि कार्ल मार्क्सचा भौतिक वैज्ञानिकतेचा सिद्धांत येथे एकरूप झाला आहे. सांख्याचा निष्कर्ष आणि मार्क्स ची भौतिक वैज्ञानिकता सत्य ठरली असे उत्तमराव मोहिते म्हणतात. सांख्य दर्शनातील वैज्ञानिकतेचा सिद्धांत सांगताना विश्वरचनेच्या सिद्धातांत तीन विधाने आहेत १० वेदांत हा प्रबंध (Thesis) आहे. ०१ केवळ प्रकृतीवाद (Antithesis) हा त्याचा व्यत्यास आहे. म्हणून १ निष्कर्ष (synthesis) आहे.

उत्तमराव मोहिते यांनी भारतीय तत्त्वज्ञानातील वैज्ञानिकतेचा सिद्धांत या ग्रंथामधून तत्त्वज्ञानामध्ये निर्माण झालेली अंधश्रद्धा आणि तत्त्वज्ञानाला मिळालेला ईश्वररूपी पूर्णविराम कसा चुकीचा आहे हे सांगून विश्व हे परिवर्तनशील आहे, हे दर्शविले. विश्वात स्थिर असे काहीच नाही, म्हणून बदल निसर्गाचा नियम आहे, त्यामुळे वेद ईश्वरनिर्मित आहेत आणि ते सत्य असून त्यात कसलाही बदल होणे शक्य नाही ही विचारधारा व त्यावर आधारित चिंतनाला वीर उत्तमरावांचे चिंतन छेद देते. वीर उत्तमरावांचा हा ग्रंथ भारतीय तत्वज्ञानाच्या इतिहासात क्रांतिकारी परिवर्तन मानता येईल.

४.३.१ भारतीय तत्त्वज्ञानातील निरिश्वरवाद या ग्रंथाबाबतच्या प्रतिक्रिया

४.३.१.१ डॉ. पंजाबराव देशमुख

निबंधलेखनाची शैली, भाषेचे कौशल्य व मांडणी आणि धार्मिक भाष्य हे माझ्या मनाला भावून गेले. हा ग्रंथ भारतीय विद्यार्थ्यांचे भारतीय तत्त्वज्ञानाकडे लक्ष खेचू शकतो. यासारखा प्रबंध यापूर्वी माझ्या पाहण्यात व वाचनात आलेला नाही हे वीर मोहित्यांचे कठोर परीश्रम आहेत.

४.३.१.२ डॉ. वैकुंठराव ठाकरे

वीर मोहिते यांचे भौतिक तत्त्वज्ञान संपूर्ण जगताला योगदान ठरणार आहे हा भारतीय वैज्ञानिक विचार आहे. निरिश्वरवाद, भौतिकवाद आणि विज्ञान या समानार्थी संकल्पना आहेत. निरिश्वरवादाबाबत सुद्धा मोहित्यांनी सकारात्मक योगदान दिले

आहे. त्यांच्या विवेचनात एकही अर्थहीन वाक्य सापडत नाही. त्यांचे तर्क कायम नैसर्गिक सत्यावर आधारलेले आहेत.

४.३.१.३ डॉ. ज्वालाप्रसाद

या प्रबंधात तात्त्विक विचारांचे स्वातंत्र्य व तत्त्वज्ञानाची सांख्यकिय व्यवस्था दिसून येते.

४.३.१.४ महापंडीत त्रिपिटकाचार्य राहूल सांकृत्यायन

ही पुस्तिका प्रचंड विचारप्रवर्तक आहे ती आपल्या भाषेत भाषांतरीत व्हावी.

४.३.१.५ पाठसकर एच.व्ही.

हा सखोल अभ्यास आणि विचार आहे. आपल्या देशाला अशा अभ्यासू विचारप्रवर्तक लोकांची गरज आहे.

४.३.१.६ डॉ. डी.जी. लोंढे

आपले प्रयत्न प्रशंसा आणि प्रेरणा देण्यास योग्य आहे.

४.३.१.७ देशमुख ए.डब्ल्यू.

आपला सखोल अभ्यास स्वच्छ दृष्टी, वैज्ञानिकता आणि मूलभूत तत्त्वज्ञानाला नवी दिशा देण्यास अत्यंत महत्त्वाचे आहे.

४.३.१.८ देशपांडे जी.टी.

अशा तत्त्वज्ञानिक विचाराला वाचकापुढे ठेवण्याची अपेक्षा करतो.

४.३.१.९ समाजभूषण पंढरीनाथ पाटील

हा प्रबंध पारंपरिक संकल्पनांना धक्का देणारा आहे. यामुळे विचाराच्या शाखेत मूलभूत बदल घडून येतील. या ग्रंथाला भारतीय तत्त्वज्ञानिक साहित्यामध्ये अढळ स्थान राहील.

४.३.१.१० डॉ. शिवाजीराव पटवर्धन

जर आपल्या सारखे स्वतंत्र विचार करणारे शूर व्यक्ती जन्माला आले तर आपला समाज आणि देश यांची पूर्नबांधणी सहज शक्य होईल.

४.३.१.११ योजना आयोगाचे उपाध्यक्ष मनमोहन सिंग

३ फेब्रुवारी १९८७ रोजी पत्र पाठवून पुस्तक मिळाले म्हणून धन्यवाद देतात.

४.३.१.१२ मार्गारिट अल्वा

महिला आणि बालविकास विभाग भारत सरकार नवी दिल्ली ११ फेब्रुवारी १९८७ रोजीच्या पत्रात म्हणतात, भारतीय तत्त्वज्ञानतील निरिश्वरवाद पुस्तक मी मोठ्या आवडीने वाचले.

४.३.१.१३ सुनील अहमद

अलाहबाद विद्यापीठ दि. ९ फेब्रुवारी १९८७ रोजीच्या पत्रात म्हणतात की, मी हे पुस्तक तत्त्वज्ञान विभागाकडे पाठवत आहे.

एकंदरीत उत्तमराव मोहिते यांचा ATHEISM IN INDIAN PHILOSOPHY (Supreme Doctrine Of Indian Dialectic) आणि त्यावरील मराठी भाष्य या तत्त्वज्ञानिक ग्रंथाची भाषाशैली ओघवती असून आशय आणि विषयाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे. या ग्रंथाचे प्रकाशन मराठा विज्ञान मंदिराने केले. यातील मराठी भाग ४६ पृष्ठामध्ये दिला आहे. यातून त्यांनी भारतीय तत्त्वज्ञान जे भारतीयांना विश्वोत्पतीच्या मागील कारण शोधताना धरलेली गृहीतके व काढलेला निष्कर्ष याचा अभ्यास करून भारतीय तत्त्वज्ञान उत्कृष्ठ व भौतिकवादी आहे. जे आतापर्यंत तत्त्वज्ञानातील 'अध्यात्मवाद' व ईश्वर याला मान्यता होती. यापेक्षा वेगळा सिद्धांत सांगताना वेदांत प्रकृतीवाद यापेक्षा अपूर्णांक एक असा निष्कर्ष देऊन त्याचे सामान्यीकरण करतात आणि भारतीय तत्त्वज्ञानाची उज्ज्वल, विज्ञानवादी, भौतिकवादी परंपरा दर्शवून भारतीय तत्त्वज्ञानाच्या इतिहासात त्यांचे वेगळे स्थान निर्माण करतात. त्यांच्या एकंदरीत लेखनावरून व वाचकांच्या प्रतिक्रियेवरून असे म्हणता येईल की, 'एकविसाव्या शतकाच्या तत्त्वज्ञानाचा विश्वकोष हे सुधाकर मोहडांचे विधान' योग्य वाटते.

४.४ कार्ल मार्क्सचा भौतिकावादी वैज्ञानिकतेचा सिद्धांत

कार्ल मार्क्सचा भौतिकवादी वैज्ञानिकतेचा सिद्धांत हा वीर उत्तमराव मोहिते यांनी लिहिलेला ग्रंथ असून प्राध्यापक भाग्यरेखा अविनाश देशमुख या उत्तमरावांच्या मुलीने मराठा विज्ञान मंडळाची अध्यक्ष असताना दि. २७ डिसेंबर १९७७ रोजी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या ७९ व्या जयंतीनिमित्त प्रकाशित केला. हा ग्रंथ भौतिकवादी विचारावरचा असून राजर्षी शाहू महाराज व डॉ. पंजाबराव देशमुख यांना अर्पण केलेला आहे.

या ग्रंथाची मांडणी एकूण ९ प्रकरणात केली असून पृष्ठ मर्यादा १६५ आहे. १६५ पृष्ठामध्ये उत्तमराव मोहिते यांनी कार्ल मार्क्स आणि त्याचा वैज्ञानिक भौतिकवाद याला २१ व्या शतकाच्या कालमापनाने आणि काळातील बदलाने समाजासमोर ठेवला आहे. असा हा मोहिते यांचा ग्रंथ तत्त्वज्ञानिक व व्यवहारिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण ठरतो.

हा ग्रंथ रेखाटताना वीर उत्तमराव अतिशय जागरूक राहून तटस्थपणे आपला तोल न ढळू देता मार्क्सवाद समाजापुढे ठेवतात. भौतिकवाद केव्हापासून चालत आला आणि त्याला कोणते अडथळे आले याची मीमांसा करताना दिसतात. उत्तमराव मोहिते तत्त्वज्ञानातील मूलभूत प्रश्न सांगतात, ''विश्वातील साऱ्या वस्तू आणि सारे दृश्य विषय भौतिक आहेत किंवा मानसिक आहेत. भौतिकाचे अस्तित्व मानवी मनापासून स्वतंत्र आहे. ज्याचे अस्तित्व मानवी मनावर अवलंबून आहे त्याचा संबंध मानसिक प्रक्रियेत होतो आणि त्याचा संबंध आत्म्याशी येतो त्यांना अध्यात्म म्हणतात. भौतिक व अध्यात्मिक यांचा संबंध काय आणि अध्यात्माचा उदय भौतिकतेतून झाला की भौतिकतेचा जन्म आध्यात्मातून झाला? विचारांचा वस्तूशी किंवा आत्म्याचा भौतिकाशी यांचा सबंधाचे गुणवैशिष्ट्ये हा तत्त्वज्ञानाचा मूलभूत प्रश्न आहे.''[१४]

वीर मोहिते भौतिकता व अध्यात्म या दोन विचार प्रवाहातील प्रमुख विचार

---

१४. *मोहिते वीर उत्तमराव, कार्ल मार्क्सचा भौतिकवादी वैज्ञानिकतेचा सिद्धांत, पृष्ठ – १.*

निश्चित करण्याचा मानस आहे. विश्वाच्या मुळाशी आध्यात्म की भौतिकता या प्रश्नाची उकल या ग्रंथातून करण्याचा प्रयत्न करतात. हे करत असताना द्रव्य आणि आत्मा या दोन्हींपैकी एक प्रधान आहे हे नक्की पण वैज्ञानिक पद्धतीने भौतिक की अध्यात्मिक याची उकल उत्तमरावांनी या ग्रंथात केली. या प्रश्नाला छेडणाऱ्यामध्ये कार्ल मार्क्स असल्याने नव्या काळात नव्याने मांडलेले तत्त्वज्ञान याचा संदर्भ घेऊन मोहिते प्रधान हेतू शोधतात.

द्रव्य प्रधान आहे, द्रव्याच्या ऐतिहासिक विकासातून आत्म्याचा जन्म झाला. आत्म्याला जन्म आहे, मरण आहे. आत्मा पराकष्टेच्या जटिल गुंतागुंतीचा मानवी मेंदूचा गुणधर्म आहे असे सांगून पुढे उत्तमराव मोहिते म्हणतात, ''आध्यात्मिक दार्शनिकांच्या मते, आत्म्याचे अस्तित्व द्रव्याच्या अगोदर आहे. जगात जे अस्तित्वात आहे त्याला आधार आत्मा आहे. परंतु आत्मा जग निर्माण करतो याबाबतीत आध्यात्मिक दार्शनिकात मतभेद आहेत.''[१५]

उत्तमराव मोहिते म्हणतात, ''संपूर्ण विश्वाचे सार जाणून घेण्याची शक्ती मानवात आहे. भौतिकवाद्याचे हे मत सर्वमान्य होऊ लागले आहे. तर विश्वाचे ज्ञान होणे शक्य नाही असे मानणाऱ्या आध्यात्माला अज्ञेयवाद म्हणतात.''[१६]

कार्ल मार्क्सचा भौतिकवादी वैज्ञानिकतेचा सिद्धांत मांडताना द्रव्याला प्रधान मानतात जर 'द्रव्य' प्रधान असेल तर विश्वोपत्तीच्या संदर्भात असणाऱ्या दुसऱ्या सिद्धांताला दुय्यम स्थान प्राप्त होते. हा दुसरा सिद्धांत 'अध्यात्म' आहे. पण अध्यात्मवादी द्रव्याअगोदर 'आत्मा' मानतात म्हणून भारतीय तत्त्वज्ञानात 'द्रव्य कि आत्मा', 'भौतिकवाद कि अध्यात्म' विश्वरचनेचा आधार हा प्रश्न सोडवून द्रव्याचे प्रधानत्व स्वीकारून मानवी बुद्धीला आकलन होणारे विश्व आहे अशी मांडणी उत्तमरावांची असल्याचे दिसते. हा विश्वाच्या रचनेमागची बाजू अभ्यासताना ज्ञेय व

---

१५. *कित्ता, पृष्ठ – ८.*

१६. *कित्ता, पृष्ठ – २.*

अज्ञेय अशा दोन बाजूतील ज्ञेय बाजूची मांडणी उत्तमराव करतात हे करत असताना तठस्त राहून मतमतांतराची चर्चा करतात.

इ.स. १८१८ रोजी जन्मलेल्या कार्ल हेन्रीच मार्क्स यांनी इतिहास लेखनात जो नवप्रवाह सुरू केला. याला मार्क्सवादी इतिहास लेखन म्हणून संबोधले जाते. मार्क्सने भौतिकवाद मांडला. भौतिकवाद म्हणजे द्रश्य स्वरूपातून जे काही दिसते ते होय. जे डोळ्यांना दिसते. त्याचेच अस्तित्व मान्य करायचे. दिसणारी कोणतीही गोष्ट, बाब जशी दिसते ती तशीच मांडणे या अशा सदृश्य स्वरूपासाठी भौतिकवाद ही संज्ञा वापरली जाते. म्हणून उत्तमराव मोहिते यासाठी भौतिकवादाबरोबर वैज्ञानिक शब्दप्रयोग करतात. ते भौतिकवादी वैज्ञानिक असा उल्लेख करतात.

सत्यशोधन करताना डायलेव्टिक्स या रीतीचा उल्लेख करतात. प्राचीन काळी युरोपातील पद्धती असून त्याचा प्राचीन भारतीय सांख्य दर्शनाशी संबंध आहे, पण सांख्य तत्त्वज्ञान नष्ट करण्यात आले. यामुळे त्यास या पद्धतीत बसवता येणार नाही असे सांगून ''डायलेव्टिक्स (Dialectics) या शब्दासाठी 'वैज्ञानिकता' हाच शब्द करण्याचे मी ठरवले आहे.''[१७] यावरून उत्तमरावांना कार्ल मार्क्सच्या तत्त्वज्ञानात वैज्ञानिकता दिसून येते. ही मार्क्सची विचारधारा सत्यशोधनाची विचारधारा आहे असे उत्तमरावांना सांगावयाचे आहे. मानवी जीवनाच्या गत इतिहासाचा अभ्यास करून प्रत्यक्ष कृती आणि अनुभवाबरोबर विज्ञानाचे प्रायोगिक विक्रम याचा आढावा घेऊन वैज्ञानिक भौतिकवादाने सिद्धांत मांडला. ''वैज्ञानिक भौतिकवादाला जगतात अद्वैत असे काही नाही. प्रत्येक वस्तूचे गुणधर्म वस्तुत्वातच संक्रमणशील असतात.''[१८] उत्तमराव मोहिते यांनी जगात अद्वैत नाही असे सांगतात म्हणजे जीव व ब्रह्म एकच आहे हे मत नाकारतात. जीव व ब्रह्म यांना महत्त्व देत नाहीत कारण या बाबी वैज्ञानिकतेच्या कसोटीवर उतरत नाहीत. यामुळे यात सत्यता नसते, कल्पनाविलास असतो. मानवी मनाशी व मनाच्या कल्पनाशी निगडीत विचार आहे. मार्क्सदर्शन

---

१७. *कित्ता, पृष्ठ – ५.*

१८. *कित्ता, पृष्ठ – ६.*

वैज्ञानिक असल्याने त्यांनी अद्वैत मान्य केले नाही. मग मार्क्सदर्शन ''विकासाची प्रक्रिया व नाविन्याचा जुन्याशी संघर्ष यांचे स्पष्टीकरण वैज्ञानिक भौतिकवाद करतो.''[१९] 'भौतिकवाद' हा विचार सतत कार्यरत व नवनव्या बाबींचा शोध घेणारा आहे आणि शोधातून मिळालेली अनुभवजन्य माहिती समाजासाठी उपयुक्त व्हावी पण जुन्याशी म्हणजे जे बदल नको व ते शक्य नाही अशा विचारांशी मार्क्सचा भौतिकवाद संघर्ष करतो. 'द्रव्य व आत्मा' याची उकल करून द्रव्य प्रधान मानतो. हे मोघम पद्धतीने नव्हे तर वैज्ञानिक पद्धतीने पण ही वैज्ञानिक पद्धत कोणती असा सहज प्रश्न पडतो तेव्हा मार्क्स दर्शन इतर विज्ञानापासून भिन्न असल्याचे उत्तमराव सांगतात व त्याचा शोध घेतात. तेव्हा वास्तविकपणे व वैज्ञानिक कसोट्यांचा आधार घेऊन मार्क्स दर्शन द्रव्य, आत्मा या बाबींचा विचार करतो असे सूचवतात.

मार्क्सवाद काय आणि कसा अभ्यास करतो याची मीमांसा उत्तमराव करतात आणि वैज्ञानिक भौतिकवाद असे सांगताना 'तत्त्वज्ञानाचा वैज्ञानिक अभ्यास' हे सूत्र मार्क्सवादाला लावतात. सत्यशोधन, द्रव्य, आत्मा या बाबी मानवाशी निगडीत असल्याने आणि मानव सामाजिक असल्याने ''समाजाच्या प्रगतीचे सर्वमान्य सिद्धांत म्हणजेच कार्ल मार्क्सचा ऐतिहासिक भौतिकवाद होय असे मत उत्तमराव मोहिते देतात. पुढे ते असेही म्हणतात''[२०]

- सर्वच क्षेत्रात मार्क्स दर्शनातील सिद्धांताचा अंमल चालतो.
- संशोधनाची वैज्ञानिक पद्धती मानवजातीला उपलब्ध करून दिली.
- विज्ञान व तत्त्वज्ञान विभक्त होऊ शकत नाहीत.
- नैसर्गिक विज्ञानाचा संशोधक भौतिकवादी असलाच पाहीजे असे झाले आहे.
- मार्क्सपूर्व भौतिकवाद व अध्यात्म यांच्यातील संघर्ष.
- कार्ल मार्क्सची वैज्ञानिकता भौतिक व नैतीक क्षेत्रातील फक्त सर्वात सामान्य बंधनाचा अभ्यास करते.

---

१९. *कित्ता, पृष्ठ – ७६.*

२०. *कित्ता, पृष्ठ – १०.*

- कायद्याची आंधळी पूजा, मानवाच्या बुद्धीमत्तेवरील अविश्वास वैज्ञानिकतेच्या कायद्याच्या बोधाची मानवाची शक्ती नाकारणाऱ्या दैववादाचा वैज्ञानिक भौतिकवाद विरोध करतो.
- मार्क्सच्या वैज्ञानिकतेचे आधारभूत कायदे सांगतात.
- समाजवादी समाजाची प्रगती सरळ दिशेने होते ही कल्पना चूक आहे. येथे सुद्धा नागमोडी स्वरूप दिसून येते.

भौतिकवाद हा निसर्गाचे अस्तित्व मान्य करणारा विचार आहे. निसर्ग म्हटले की, ग्रह, तारे, चंद्र, सूर्य, पृथ्वी, समुद्र, पाणी, प्राणी विविध वृक्ष आणि विचार करता या सर्वांवर नियंत्रण करणारी कोणत्याही प्रकारची मानवी शक्ती परमेश्वर, ईश्वर, परमात्मा वगैरे काही नाही यांचा कसलाही संबंध नाही हा वास्तविक बुध्दिवाद आहे. मानवाशी संबंधीत नैसर्गिक बाबींचा आणि प्रत्यक्ष व्यवहार मार्क्स ने मांडला. हा मार्क्सचा सिद्धांत आणि या संबंधाने येणारा वर्ग संघर्ष याची चिकित्सा करत उत्तमराव वरील विचार मार्क्सवादाबाबत देतात. आज कार्ल मार्क्स सामाजिक शास्त्रांच्या सर्वच शाखात आहे. तसेच भाषा विषयांत ही अभ्यासास असल्याचा दिसतो. म्हणून उत्तमरावांची उपरोक्त विधाने योग्य वाटतात.

''मार्क्सपूर्वीचा भौतिकवाद व अध्यात्म यांच्यातील संघर्ष''[२१] याचा अभ्यास करत मार्क्सदर्शनाचा उदय, विकास व त्या संबंधाने द्रव्य व आत्मा मार्क्सची वैज्ञानिकता विकास व शाश्वत संबंधाचा सिद्धांत सांगतात व मार्क्सच्या वैज्ञानिकतेला आधारभूत असणाऱ्या कायद्यावर चर्चा करून भौतिकवादी वैज्ञानिकतेचे प्रकार स्पष्ट करतात. इथपर्यंत चिंतन करून वैज्ञानिक भौतिकवादाचा ज्ञानाचा सिद्धांत सांगतात. वेगवेगळ्या देशात या विचारप्रवाहाचे नेमके स्वरूप अभ्यासतात.

उत्तमराव इथे भौतिकवादास वैज्ञानिक पद्धतीच्या कसोटीवर ठेवून असा निष्कर्ष देतात की, कार्ल मार्क्सचा भौतिकवाद वैज्ञानिक आहे. म्हणून ते त्याचे समर्थन ही

---

२१. *कित्ता, पृष्ठ – १२.*

करतात. पण भौतिकवाद कसाही असो त्याचे समर्थन करतात असे नव्हे. ज्या पद्धतीने अध्यात्म आणि त्यातील अश्लीलता नाकारतात. ''अश्लील भौतिकवाद व अध्यात्म निराधार आहेत.''[२२] कोणतेही ज्ञान असो ते प्रत्यक्ष व्यवहारात कसे आहे यावर त्याची गुणग्राहकता अवलंबून असते. प्रत्यक्ष व्यवहारीक ज्ञानावर विशेष भर असावा असा त्यांचा विचार आहे.

मार्क्सवाद भौतिकवाद, समाजवाद भारतात यशस्वी होऊ शकत नाही हे मत त्यांना मान्य नाही. एखादी संभव वाटणारी गोष्ट आणि वास्तवता यात फरक आहे. संभव वाटणे म्हणजे होणे नव्हे ते होऊ शकते अथवा होऊ शकत नाही असा अर्थ संभवाचा असतो असे उत्तमराव मोहिते म्हणतात. ''समाजवादी परिस्थितीत संभावाचे वास्तवतेत रूपांतर होते यासाठी रशियाचे उत्तम उदाहरण आहे.''[२३] समाजवादी समाज रचनेचा उत्तमराव जागतिक अभ्यास करतात व समाजवादी समाजरचना असंभव नसून ती प्रत्यक्ष व्यवहारात येऊ शकते असे सांगतात. त्यांचा वैयक्तिक दृष्टिकोन व त्यांची जीवनशैली या विचारधारेवर केंद्रीत झाल्याचे दिसते.

ज्या भौतिक आधारामुळे भ्रम व सत्य यांच्यातील भेद समजणे शक्य होते. तिच सत्याची कसोटी आहे. ही कसोटी मानवी मनावर अवलंबून नाही. मानवी मन आकसयुक्त होऊ शकते. पण ती बाब व्यवहारात उतरली आणि टिकली तर तिची सत्यता उघड होते. सत्याची व्यवहार ही प्रयोगशाळा आहे. ''मार्क्स लेनिनच्या सिद्धांताची प्रामाणिक सत्यता खास जीवनात आणि आंतरराष्ट्रीय साम्यवादी आंदोलनाची प्रत्यक्ष खात्री पटते. भांडवलशाहीतून साम्यवादाकडे जाण्यासाठी मानव जातीचे आंदोलन चालू आहे. ही महान जिवंत शक्ती मार्क्स लेनिनच्या शिकवणुकीचे महान सत्य याचा हा जिवंत पुरावा आहे.''[२४]

जगात अध्यात्मिक, भांडवलदार, मध्यमवर्ग हे श्रमजीवी समाजाचे हितशत्रू

---

२२. *कित्ता, पृष्ठ – ६२.*

२३. *कित्ता, पृष्ठ – १४५.*

२४. *कित्ता, पृष्ठ – १६५.*

आहेत. जगाच्या कारणाचा अभ्यास अन्य कारण अभ्यासकांपेक्षा मार्क्सचा वेगळा आहे. अनेकांनी धार्मिकतेतून प्रत्येक वस्तूचे कारण ईश्वर आहे. ईश्वर ही वास्तविक नसून काल्पनिक आहे आणि तो व्यवहारात उतरत नाही. ऐतिहासिक विकासाच्या संपूर्ण मार्गाने अथवा भौतिक कारणांनी ते निश्चित होतात. मानव जातीचे महान ध्येय साम्यवाद असे उद्दिष्ट आहे की, भौतिक कारणत्वाच्या संपूर्ण स्पष्टीकरणावर आणि विकासावर अंमल गाजवणाऱ्या कायद्यावर ते आधारले आहे.

एकंदरीत कार्ल मार्क्सचा भौतिकवादी वैज्ञानिकतेचा सिद्धांत हा वीर उत्तमराव मोहिते लिखित ग्रंथ मार्क्सवादी विचारधारेचे व्यवहारिक जीवनात उपयोग असल्याचे सांगतो. एखादा चांगला विचार आदर्श म्हणून सांगण्या बोलण्यासाठी व बौध्दिक पांडित्यासाठी विशेष लौकिक होईल. पण प्रत्यक्ष व्यवहारात तो आदर्शवाद टिकत नाही. वास्तवस्थिती, सामाजिक जीवन, आजचे जग, अनेक समस्या आणि पोटाच्या प्रश्नासाठी संघर्ष करणारा मानव ही मानवी जीवनातील समस्या आणि हजारो वर्षापासून अध्यात्मिक सत्तेच्या आधारे आपले सुखी जीवन बनवण्याच्या आशेत दयनीय झालेला सर्व सामान्य मानव यांच्यासाठी ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान मानवीजीवन व्यवहार सुलभ बनवण्यासाठी असल्याने पारंपरिक आशावादाने निराशा निर्माण करून शेतकरी, कामगार यांना जीवस्फूर्तीचा नवसंदेश देऊन एकंदरीत ग्रामीण भागातून वसलेल्या भारतासाठी आणि प्रशासन व्यवस्थेसाठी मार्गदर्शक होऊ शकतो असे म्हणता येईल.

४.५ राहुरीचा निर्णय विदर्भातील जनतेविरूद्ध एक महाभयंकर षड्यंत्र

राहुरीचा निर्णय विदर्भातील जनतेविरूद्ध एक महाभयंकर षड्यंत्र हे वीर उत्तमराव लिखित पुस्तक वीर उत्तमराव मोहिते यांनीच प्रकाशित केले. या ग्रंथाचे मुद्रण बाबाराव भागवत यांनी आशोक मुद्रण, रेल्वे ब्रिज, अमरावती येथे करून 'मराठा विज्ञान मंदीर' गाडगे नगर अमरावती येथून दिनांक १० नोव्हें. १९६८ रोजी प्रकाशित केले. या ग्रंथाची

पृष्ठसंख्या २१ असून कृषी विद्यापीठ आंदोलनात शहीदांसाठी विनम्र श्रद्धांजलीसाठी ३ पृष्ठे तर यशवंतराव चव्हाण, इंदिरा गांधी, ममोराइडम प्रेसीडेंट ऑफ इंडिया यांना केलेला पत्रव्यवहार यात सात पृष्ठे आहेत असे एकूण ३१ पृष्ठाचे पुस्तके आहे.

या पुस्तकाच्या प्रारंभी लेखक बोलक्या भाषेत सुरुवात करतो आणि प्रश्नही विचारतो वीर उत्तमराव मोहिते म्हणतात, ''मराठी माणसा कृषी विद्यापीठाची कर्म कहाणी मी तुला कशी सांगू? वैदर्भी लोकनेत्याच्या रक्ताचे थेंब आणि जनतेच्या डोळ्यातील अश्रू यांचा जेथे रूद्रात्मक भावाने संयम झाला ती दारूण काहाणी मराठी आम जनतेला माहित व्हावी म्हणून सांगून टाकतो एकदाची ही काहाणी दारूण तेवढीच करूण आहे. बा शिवबाच्या महाराष्ट्रा! तू विदर्भाच्या धरतीपुत्राला न्याय देशील का?''

यावरून सहज समजते की विदर्भात कृषी विद्यापीठासाठी संघर्ष झाला असून या कहाणीत वैदर्भी लोकनेत्याच्या म्हणजे डॉ. पंजाबराव देशमुखांच्या रक्ताचे थेंब आणि लोकांच्या डोळ्यातील पाणी या दोन्हीचा रूद्रात्मक म्हणजे रागीट प्रचंड संगम झाला आणि त्यातून निर्माण झालेली परिस्थिती विदर्भातील जनतेसाठी संकटमय व त्याची कीव करण्यासारखी असल्याचे समजते. पण याकडे कोणी लक्ष घालत नसल्याने लेखक म्हणतो, 'शिवबाच्या महाराष्ट्रा' यातून समता, स्वातंत्र्य व न्यायाचे राज्य शिवबाचे होते आणि तशी सवय सर्वांना लावली होती. म्हणून दु:खी होऊन हताश होऊन न्यायाची अपेक्षा आहे इथे उत्तमराव भावनिक होताना दिसतात.

कृषी विद्यापीठ डॉ. पंजाबराव देशमुख यांना विदर्भात अमरावती येथे सुरू करण्याची इच्छा होती व त्यासाठीचे कृषी महाविद्यालये त्यांनी सुरू केले होते. एक महाविद्यालय ब्रिजलाल बियाणी यांनी अकोल्याला नेले. चार कृषी महाविद्यालये, दोन रूरल इन्स्टीट्युटस्, तीन ग्रामसेवक ट्रेनिंग सेंटर्स, एक जनता कॉलेज आणि अनेक कृषी विद्यालये सुरू केली होती. ''वीर उत्तमराव मोहिते म्हणतात विद्यापीठाला पोसणाऱ्या या संस्था आहेत. १९४७ पासून डॉ. पंजाबरावांच्या डोक्यात ही कल्पना खेळत होती.''[२५] पण डॉ. पंजाबरावांचे १० एप्रिल १९६५ रोजी निधन झाले. यापूर्वी

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री असताना पंजाबरावांनी विचारणा केली होती. पण प्रतिसाद मिळाला नव्हता. पण डॉ. पंजाबरावांच्या निधनानंतर कृषी विद्यापीठाच्या प्रक्रियेला वेग आला. ''डॉ. घाडगे कृषी विद्यापीठ समिती हालचाली करू लागली. घाडगे यांनी अण्णासाहेब शिंदे यांचा कानोसा घेतला. अण्णासाहेब शिंदे भारताचे नवे कृषीमंत्री होते. त्यांनीही हालचालीस वेग दिला.''[२६] १२ ऑक्टोबर १९६६ हा निर्णय कॅबीनेटसमोर ठेवण्यात आला. यापुर्वी १९६५ सालचा डॉ. घाडगे समितीच्या शिफारशी कृषी विद्यापीठ विदर्भात जाणार नाहीत अशा होत्या. हे विद्यापीठ राहुरीला नेण्याचे ठरले. याबाबत उत्तमराव मोहिते म्हणतात, ''वेड्या महंमदाने दिल्लीची राजधानी दौलताबादला नेली त्यातलाच हा प्रकार''[२७] यावरून कृषी विद्यापीठ अमरावती, अकोला येथे योग्य असून यासाठी अनुकूल वातावरण आहे आणि विदर्भातील जनतेची मागणी व डॉ. पंजाबरावांचे कष्ट या मागे होते म्हणून विदर्भातील विद्यापीठाबाबत विशेष जिव्हाळा लागला होता.

अण्णासाहेब खेडकरांच्या मागणी वरून वैद्य समिती आली आणि अकोल्याची पाहणी करून गेली आणि अमरावतीबाबत उत्तम अभिप्राय दिला. तरी दि. २ जुलै १९६८ रोजी राहुरीचा निर्णय दिला आणि विदर्भातील जनता नाराज झाली. नाराज जनतेने आंदोलन करण्याचे ठरवले. यात उत्तमराव मोहिते यांचा महत्त्वूपर्ण सहभाग होता. २१ ऑगस्ट १९६८ ला कृषी विद्यापीठ आंदोलन समितीने विदर्भ बंदचा निर्णय घेतला. १७ ऑगस्ट ते २३ ऑगस्ट १९६८ च्या दरम्यान विदर्भ पेटला. ''लाठीमार, अश्रुधूर, गोळीबार आणि लष्कराचा उपयोग गृहखात्याने केला.''[२८]

विदर्भातील जनतेने एकजुटीने हे आंदोलन लढले. काँग्रेस आणि अन्य पक्ष आणि पुढारी मात्र यापासून अलिप्त असताना जनतेच्या स्वयंस्फूर्तीचे हे आंदोलन

---

२५. *मोहिते वीर उत्तमराव, राहुरीचा निर्णय विदर्भातील जनतेविरुद्ध एक महाभयंकर षड्यंत्र, पृष्ठ – २.*

२६. *कित्ता, पृष्ठ – ३.*

२७. *कित्ता, पृष्ठ – ४.*

२८. *कित्ता, पृष्ठ – १२.*

महाराष्ट्र शासनाने दडपले. एखादे आंदोलन दडपणे हे शासनाचे कर्तव्य आहे. शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक असते. त्या बरोबरच जनता आणि त्यांचे अधिकार व त्यांच्या मागण्यांची पूर्तता एखादी मागणी पूर्ण होणारच नाही किंवा विलंब लागेल पण मागणीसाठी आंदोलन करणाऱ्यांना मृत्युदंड देणे हा न्याय वाटत नाही. या आंदोलनात गोळीबाराचे मृत्यू असे आहेत.

४.५.१ गोळीबारातील शहीद

अ.क्र.	मृत्यूचे कारण	शहीदाचे नाव	गाव	वय	संख्या
१	छातीत गोळ्या लागून	नरेंद्र देशमुख सुरेश कऱ्हे	राजापेठ, अमरावती	२१ १६	२
२	गळ्यात गोळी लागून	शेख रफिक	नागपुरी गेट, अमरावती	१२	१
३	मस्तकात आरपार गोळी लागून	नेमीचंद गोपाल	राजापेठ, अमरावती	२१	१
४	पोटात गोळी लागून	भेरूमल रिझुमल	रामपुरी कॅम्प अमरावती	२१	१
एकूण					५

याशिवाय,

अ.क्र.	शहीदांचा वयोगट	संख्या
१	०५ ते ०९	१
२	१० ते २०	१३
३	२१ ते ३०	०५
४	३१ ते ४०	०५
	एकूण	२४

या व्यतिरिक्त अन्य ३६ शहीद असून शहिदांची संख्या ६५ झाली. त्यात ४० वर्षाच्या आतील असून सर्वाधीक २० वयोगटाच्या आतले हे विद्यार्थी आहेत.

विद्यार्थ्यांचे हे आंदोलन दडपले ते क्रुरपणे असे उपरोक्त आकडेवारीवरून म्हणता येईल. यासंबंधी यशवंतराव चव्हाण यांनी दिलेली सारी उत्तरे उत्तमराव मोहिते यांना ''शेक्सपीअरच्या ऑथेल्लो नाटकातील खलनायकालाच शोभून दिसतात. एवढे संबोधून थांबत नाहीत तर त्यांना उत्तमराव मोहिते महाराष्ट्राचा एकमेव सुलतान म्हणतात.''[२९]

हा सारा प्रकार झाला कृषी विद्यापीठासाठी एवढे बळी देऊनही कृषी विद्यापीठ झाले नाही. मेलेले विसरतील, माराचे वळ बुजतील पण कृषी विद्यापीठाचे षड्यंत्राने विदर्भाच्या मनावर केलेला आघात भरणार नाही असा भावनिक आवाज लेखक देतात. मोहिते यांनी या प्रकरणासंबंधी श्रीमती इंदिरा गांधी (पंतप्रधान) व यशवंतराव चव्हाण यांना पत्रे पाठवून परिस्थिती कळवली व जाब विचारला.

एकंदरीत कृषी विद्यापीठ आणि त्या संदर्भाने झालेले आंदोलन हे महाराष्ट्राच्या इतिहासात महत्त्वपूर्ण आहे. यातून महाराष्ट्रातील राजकर्त्यांची स्वार्थी मानसिकता व संकुचित दृष्टिकोन समोर येतो आणि ज्या विद्यार्थ्यांना व तरुणांना मारले यावरून त्याची खात्री पटते. उत्तमराव मोहिते हे विदर्भातील आहेत त्यांनी या विद्यापीठाच्या स्थापनेची सर्व सूत्रे सांगितली. डॉ. पंजाबरावांबरोबर वावरणारा व त्यांच्या विश्वासातले असल्याने डॉ. पंजाबरावांच्या अपेक्षा व त्यांचे कार्य चांगले माहीत होते. म्हणून त्यांना हा जाणीवपूर्वक केलेला कट वाटतो. उत्तमराव यात सहभागी असल्याने प्रत्येक घटनेचे ते साक्षीदार आहेत म्हणून हे विश्वसनीय आहे. त्यांच्या लेखनाचा विषय आशय व भाषा मनाला भावणारी आहे व काही प्रमाणात विदर्भाची बाजू डॉ. पंजाबरावाचे स्वप्न त्यांनी दाखवून दिले असल्याचे दिसते.

४.६ EXPOSITION OF COSMIC TRUTH (कलगीतुरा)

EXPOSITION OF COSMIC TRUTH (कलगीतुरा) हे वीर उत्तमराव मोहिते यांनी लिहिले असून एल.एम. देशमुख यांनी शिवाजी प्रिटींग प्रेस येथून मुद्रित

---

२९. *कित्ता, पृष्ठ – १९, ९.*

केले आहे. हा ग्रंथ दौलतराव गोळे यांनी मराठा विज्ञान मंडळाच्या माध्यमातून प्रकाशित केला. या ग्रंथास व्ही. सुब्बाराव यांनी प्रस्तावना दिली आहे. हा ग्रंथ कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज यांना अर्पण केला आहे.

या ग्रंथात एकूण ९३ पृष्ठे असून ९४ व्या पृष्ठावर Maratha Vadnyan, Mandal, Amravati the Acadmy of folk arts, folk literature & folk culture या संबंधीचे उद्देश दिले आहेत. तर अमृतलाल यांचे उत्तमरावांना आलेले पत्र तीन पृष्ठात तर, उत्तमरावांचे अमृतलाल यांन दोन पृष्ठांचे पत्र छापले आहे व नंतर अमृतलाल यांनी उत्तमरावांना पत्र पाठवले एकूण १०० पृष्ठसंख्या असणारा ग्रंथ तयार झाला.

इ.स. १९५७ साली प्रकाशित झालेल्या या ग्रंथाच्या नावातच 'विश्वासंबंधी जे ऐहिक, लौकिक सत्य खरे विधान आहे त्याचे वर्णन स्पष्टीकरण, प्रदर्शन असा होतो' यावरून या ग्रंथात उत्तमरावांना वाटणाऱ्या सत्य गोष्टीबाबत स्पष्टीकरण असावे. यालाच 'कलगीतुरा' असेही संबोधले आहे. कलगी आणि तुरा या शब्दापासून बनला. 'कलगी' या शब्दाचा अर्थ पागोट्यावर बांधावयाचे रत्नखचित भूषण, तुरा. शृंगारिक लावणी असा असून 'तुरा' या शब्दाचा अर्थ गुच्छ, मंजिरी, एक शिरोभूषण शृंगारीक लावणीचा प्रकार असा होतो. यावरून 'कलगीतुरा' 'शिरोभूषण असा एकत्रित विचार जो लावणीच्या माध्यमातून सांगणे' असा होईल. म्हणजे विश्वासंबंधी असणारे ऐहिक व लौकिक सत्य लावणीच्या माध्यमाने सांगणे असा अर्थ घेता येईल.

EXPOSITION OF COSMIC TRUTH (कलगीतुरा) या ग्रंथाच्या प्रती आता उपलब्ध नाहीत ही प्रत उत्तमराव मोहिते यांच्या स्वत:च्या संग्रहातून मिळवली आहे. या ग्रंथाचे पुनर्मुद्रण ७ सप्टें. २००६ वीर उत्तमराव मोहिते जयंती दिन व २४ सप्टें. २००७ शिवधर्म प्रवर्तन समारोह या निमित्ताने गंगाधर बनबनरे यांनी संपादन केले व या ग्रंथास 'रामदासाचा राष्ट्रद्रोह' EXPOSITION OF COSMIC TRUTH (कलगीतुरा) असे नाव दिले. जिजाई प्रकाशन पुणे येथून किशोर कडू यांनी प्रकाशित केले.

वीर उत्तमराव मोहिते यांच्या स्वत: हयात असताना मराठा विज्ञान मंदीराने प्रकाशित केलेल्या ग्रंथातील फरक वैश्विक सत्याचे स्पष्टीकरण अशी प्रस्तावना गंगाधर बनबरे यांनी दिली आहे. तसेच ग्रंथाच्या शेवटी आदिलशाही मुस्लीम वेषातील एक रामदासी चित्र QUARTERLY of the Bharata Hihasa Samshodhaka Mandala, Pune, Vol. ६१, No. १, July १९८२ या संदर्भाने दिले आहे. मलपृष्ठाच्या आतील भागावर जिजाई प्रकाशनच्या अन्य ग्रंथांची यादी व मलपृष्ठावर जिजाई प्रकाशन कडून वैश्विक सत्याचे स्पष्टीकरण असा मोहित्यांच्या ग्रंथाबाबत अभिप्राय दिला आहे.

वीर उत्तमराव मोहिते यांच्या क्रांतिकारक ग्रंथातील 'कलगीतुरा' हा ग्रंथ आहे. या ग्रंथातून बदलाची अपेक्षा उत्तमराव मोहिते करतात. हा बदल सामाजिक, ऐतिहासिक, धार्मिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक असल्याचे दिसते. त्यांना वैज्ञानिक आधारावरील समाज अपेक्षित असल्याचे समजते ते म्हणतात,

''वादावादात चाले भारी झगडा।
मोठमोठ्यांचा होई यात रगडा।।
ब्रह्मवाद जुना
पुन्हा लावी चुना
मोडला रे कणा
विज्ञानाचा हा प्रसाद तगडा।।''[३०]

''विज्ञानाचा वाजवितो डंका।
अणुयुगाची पुकार ऐका।।
काल्पनिक उणं
प्रत्यक्षाचं धनं

---

३०. *Mohite Veer Uttamrao, EXPOSITION OF COSMIC TRUTH (कलगीतुरा), Page - 4.*

लावणीची लावण राखा ।।''[३१]

उत्तमराव मोहिते इथे भारतीय धार्मिक विषय सांगून हिंदू धर्मातील 'ब्रह्मवाद' या महत्त्वूपर्ण बाबीकडे लक्ष देऊन हा प्राचीन काळापासून चालत आला आणि पुन्हा लोकांची फसवणूक व पिळवणूक चालू असल्याने यामुळे लोकांचा कणा मोडला म्हणजे लोक अपंग झाले व अपंग व्यक्ती हताश होतो. तो जगतो पण मरण येत नाही म्हणून आणि भविष्यात काही बदल होईल अशी अशा मनाशी बाळगूण पण त्याच्या जीवनात निराशा आल्याने या आशावादाऐवजी विज्ञानवादी विचार या अणुयुगात उत्तमराव सांगतात की, कल्पना येथे उण्या पडल्या आहेत. प्रत्यक्ष जीवन व्यवहार हा खरा असतो तो सर्वस्व आहे. यासाठी काही तत्त्व पाळावे लागतील. जे जसे आहे त्याकडे तसे पाहावे लागेल. या काव्यातून वैज्ञानिक विचारांची लावण केली आहे. याचा अंगीकार करा असा संदेश देऊन वीर उत्तमराव जनमानसांना दु:ख कष्टातून वैज्ञानिक विचार सोडवतो असे सांगतात.

लावणी हे कलेचे उत्तम साधन व प्रबोधनाचे प्रभावी माध्यम आहे. या साधनाला राजाश्रय मिळाला तर कला प्रभावी होते व राज्य प्रबोधित होण्यास मदत होते. कलेचा आनंद घेता येतो व कलाकारही आनंदी राहतो. पण राज्यव्यवस्था जर भोगी बनून विलासात गुंग झाली तर कला व कलाकार मृत होतात असे इतिहासावरून दिसते.

''पेशव्यांच्या पडली मी पायी ।
नाना बाजी भोग माझा घेई।।
.....
चांडाळांनी बनविले दाई ।।''[३२]

---

३१. *कित्ता, पृष्ठ – ४.*

३२. *कित्ता, पृष्ठ – ५.*

यावरून पेशवाईच्या काळात नानासाहेब व बाजीराव दुसरे यांनी कलाकारांचा वापर दास म्हणून तर लावणी म्हणणाऱ्यांचे लैंगिक शोषण केले. आश्रय देणे तर दूर पण वासनेच्या भावनेने कला व कलाकार यांना बदनाम करण्यात आले. एकीकडे देव, धर्म, अध्यात्म यांचा छंद आणि दुसरी भोग विलास यामुळे बुचकळ्यात पडण्यासारखे चित्र होते. श्रृतिस्मृति, पुराणे, गीता या वैदिक धर्माचा अंगीकार करून चालणारे यांनी कलेची केलेली थट्टा योग्य नाही असे उत्तमरावांना सांगावयाचे असल्याचे दिसते. पण जेव्हा छत्रपती शाहू महाराजांनी लावणी व कलेला त्यांच्या नैसर्गिक हक्काप्रमाणे ठेवले. तेव्हा खरोखरच ते प्रबोधनाचे माध्यम बनले म्हणून म्हणतात,

''राजा पाटलि उभा शिलेदार
कला चढली चावडीवर
बहुजन हिता
कंबळजा येता
शारदेचा पिता
नतमस्तकता
श्रृतिस्मृतिभिता
दचकली गीता
डुले फुले राजदरबार ।।''[३३]

ग्रामीण जीवनात पाटील प्रमुखस्थानी असून त्याच्या आश्रयाने लावणी म्हणणारी स्त्री जिला विलासी असे नामाभिधान केले जाते. पण ती त्या शब्दासारखी नसून परिवर्तनवादी सुधारकाच्या भूमिकेत उत्तमराव त्याकडे पाहतात. ती जेव्हा चावडीवर जाते त्यावेळी ब्रह्मदेव, नतमस्तक होतो आणि श्रृतिस्मृती आणि गीता भयभित होतात. म्हणजे ती इतकी प्रभावी व लोकमनाला स्पर्श करणारी असते की,

---

३३. *कित्ता, पृष्ठ – ७.*

पारंपरिक विचारधारा जोपासणारा वर्ग यामुळे भयभयीत होतो असा प्रभाव लावणीचा आहे. मात्र याकडे संकुचित दृष्टीने पाहिले जाते. पण हा विलासीपणा कशासाठी?

''गांजल्याच्या साठी
कंबळजा पोटी
येई जगजेठी
ब्रह्मवादाला चढे जेव्हा माज ।।''[३४]

यावरून लावणी व लावणी म्हणणारी स्त्री यांचा शुद्ध व परिवर्तनवादी हेतू दिसतो. ब्रह्मवादाचा अज्ञानपणा व त्याने चालवलेले शोषण या विरुद्ध आवाज उठवून परिवर्तनाची वैज्ञानिक रीत कलेतून सांगितली जाई.

उत्तमराव मोहिते लावणी बाबत म्हणतात,

''मोरोपंता नको तुझी आर्या ।
नाही शोभत मला ती भार्या ।।
गूढ भावांनी वाझोटी न्हाली
नाना मंत्रांनी नकली नटली
लावणीचे लावण्य ना भाली
तिची देवाने भोगली काया''

.....

''लावणी तू लोकवाणी राणी ।
वेदमंत्र रडती पुराणी ।।''[३५]

यावरून उत्तमराव मोहिते यांना पांडित्य जे जीवन व्यवहारामध्ये येत नाही. भाषा ही मानवासाठी उपयुक्त असते. जसे एखाद्याचे लग्न लावून दोघांना जीवनभर एकमेकांपासून दूर ठेवावे मग त्या लग्नाचा जो अर्थ होतो. तोच अर्थ मोरोपंताच्या

---

३४. *कित्ता, पृष्ठ – ६.*

३५. *कित्ता, पृष्ठ – ९.*

पांडित्याचा व आर्याचा होतो. या पांडित्यातील कल्पना नकली आहे. ज्यात व्यक्तिजीवनाची तळमळ आहे ती लावणी आहे. लोकांची भाषा त्यांचा हृदयात भिडणारी इथे मंत्र पुराणात रडतात. त्याचा प्रत्यक्षात उपयोग नाही. लावणी लोकजीवनाशी, लोकमनाशी, लोकभावनाशी जोडलेली आहे असे सांगून ती परिवर्तनवादी आहे म्हणून उपयोगी आहे.

Lawani is the culmination of beauty. Truth can never be separated from beauty. Truth, good & beauty are aspects of the same single entity. It is life. Life is both delightful & miserable. My lawani has the power to do away with misery. Nothing is more unchaste than divine fairy in life. Divinity which wells in spiritual brothers doesnot stand to lawani's chastity.

Oh Brahamn, do not touch my lawani. Find well! if you try to touch her. You will suffer dire consequences. My beloved lawani has on irresisible pass in for truth. your pompous divinty is a perfect negation. Lawani's luminous valour flahes at every step.[३६]

लावणीने अध्यात्मिक शास्त्रावर हल्ला करून त्यातील ढोंग उघडे केले आहे. ब्राह्मणी मजबूत व्यवस्था जोडली असून जगाच्या उत्पत्तीचा वेध घेण्याचा प्रयत्न वैज्ञानिक पद्धतीने लोकप्राप्त व लोकभावना यांचा विचार करून केला.

"If you try to pursue the idea of the origin & growth of evolution, theologists would explain that the divinity goods the evolution of this extended universe, they have continuously been insisting that the material evoution is an illusion which is caused by the will of god.

---

३६. *कित्ता, पृष्ठ – १३.*

This subjective explaination of cosmic truth is invalid & different from that of naturalists who deal with the real problems of life."[३७]

वीर उत्तमराव मोहिते यांचे उपरोक्त विचार तात्विक व वैज्ञानिक आहेत. नैसर्गिक सत्यावर आधारित या विचारांना वास्तावाचे पूर्ण भान आहे. म्हणूनच ते म्हणतात जगाची उत्पत्ती ही नैसर्गिकपणे 'योनी'तून होते. पण ब्रह्माचे तसे नाही. त्याच्या तोंडातून जगाची उत्पत्ती झाली. हे विधान आजतागायत मानण्यात येते व त्याचा प्रसार आणि प्रचार केला जातो पण कार्यकारण संबंधाचा विचार करता कोणत्याही कारणाने असे शक्य नाही. ही पद्धत आंधळी आहे. येथे बुध्दिचे दिवाळे निघाले तरी ते मानतात. ही आत्मवादाची खोटी अवास्तव कार्य वास्तव मानतात हे उघडे करून सत्य सांगण्याचा प्रयत्न करतात.

''पत्निवीन झाली यास बाला।

भोग त्यानं तिच्याशीच केला।।''[३८]

इथे ब्रह्मदेवाच्या कृती आणि वृत्तीची ओळख देतात. ज्याचे नावे अध्यात्म आहे तो ब्रह्मपासून उत्पन्न झालेला आहे आणि ब्रह्मदेवाने स्वत:च्या मुलीशी भोग केला हा व्याभिचार आहे. आदर्श नाही असे वीर मोहिते सांगतात. त्यांचे विचार वैज्ञानिक व जीवनव्यवहारात योग्य असल्याचे दिसते.

ब्रह्मवादाविरोधात विश्वमित्र, गौतमबुद्ध यांनी आपले सिद्धांत सांगितले व ब्रह्मवादाची चूक उघड केली आणि वास्तविक सत्यावर आधारित जीवन जगण्याचा उपदेश व मार्ग दिला. या आधारावर वीर उत्तमराव उपदेश करताना दिसतात.

''विज्ञानाची वाट चाल गंगे।

प्रगतीचा प्रवाह ना भंगे।।

कारणांची माळा

---

३७. कित्ता, पृष्ठ – ४०.

३८. कित्ता, पृष्ठ – ४१.

अनुक्रमे जोडा

टळे ब्रह्मपीडा

शशीकला संसारात रंगे ।।''[३९]

उत्तमरावांचा विचार विज्ञानावादी वाटेवर महिलांना घेण्याचा आहे. त्यांच्या विधानातील गंगे व शिशिकला त्याचेच द्योतक आहेत. यासाठी अंध अनुकरण न करता समस्याची, प्रश्नांची मालिका तयार करून शोध घेतल्याने आणि त्यांचा संबंध जोडल्याने ब्रह्मपीडा टळतात व संसार सुखाने चालतो असे वीर उत्तमराव मोहिते सांगतात. यात वास्तववादी विचार व वैज्ञानिकतेचा आधार आहे.

भारतीय इतिहासाकडे पाहताना ते अध्यात्म विरूद्ध भौतिकवादी असे पाहतात. अध्यात्म ज्या तत्त्वावर अवलंबून आहे. त्या तत्त्वांचा आधार घेऊन चालणारी राज्यपद्धती यांचे सतत खडके उडतात. कारण दोन्ही परस्पर विरोधी विचार आहेत आणि दोन्हीचे तत्त्व वेगळे. प्रत्येक युद्ध हे तत्त्वाचे असते पण जनताहिताचे तत्त्व प्रधान मानले जाते.

''अत्याचारी ब्रह्मवाद मूळ

पुष्यमित्रे मारिला भुपाळ

.....

मौर्य वंशाच शुंग हा काळ''[४०]

प्राचीन भारतीय इतिहासात अध्यात्म आणि भौतिक विचार यांच्यातील संघर्ष सांगताना अध्यात्म हा अन्यायी असून वास्तविक व जनहिताचे राज्य भौतिक विचाराने, सुखाने चालताना पुष्यमित्र शुंगाने आक्रमण करून अत्याचारी कपटी विचारधारेने राज्य केले. असा विचार देऊन भारतीय इतिहासात अध्यात्मवादी विचारधारा व राज्यकारभार अन्यायी असतो याचे विश्लेषण देतात. हे विचार सत्य आहेत असे म्हणता येते.

---

३९. *कित्ता, पृष्ठ – ५५.*

४०. *कित्ता, पृष्ठ – ६४.*

शासन जेव्हा अध्यात्मिक विचाराऐवजी अलग विचाराने चालते तेव्हा अध्यात्मिक विचार कट कारस्थानाने नैतिक व लोकहितदक्षक विचारावर तुटून पडतो यासाठी ते म्हणतात,

''शिव शककर्ता

तुकाराम गाथा

देई मानवता

इतिहास पुण्यवान थोर।।''[४१]

शिवाजींच्या राज्यात स्त्री, शुद्र, शेतकरी, कामगार सर्व समाजबांधव सुरक्षित व सुखी होते. संत तुकाराम महाराज यांचा वैचारिक प्रभाव छत्रपती शिवाजींवर होता व संत तुकाराम मानवतावादी होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी संत तुकाराम महाराज यांच्या समताधिष्ठित मानवतावादी विचारावर राज्य केले. अध्यात्मिक विचाराने पेशवाईने राज्य चालवले. पुन्हा अनुभवायास मिळाले की सत्य इथे दाबले आणि प्रबोधन करणारी लावणी 'भोग' अशी संकल्पना दृढ केली.

एकंदरीत वैश्विक सत्याचे स्पष्टीकरण करताना वीर उत्तमराव मोहिते अध्यात्म व भौतिकवादी या दोन विचारधारा सांगताना अध्यात्मातील अश्लिलता व भोगी स्वरूप उलगडून दाखवतात आणि वैज्ञानिक विचार मानवतेसाठी कल्याणकारी असल्याचे सांगतात. प्राचीन भारतात गौतम बुद्ध यांनी सांगितलेला समताधिष्ठित मार्ग सर्वसामान्याच्या कल्याणाचा होता व जैन अनुयायांनी सांगितलेला समृद्धी व सत्याच्या मार्गाने चालणारे राज्य अध्यात्मिक विचाराने भारावलेल्या पुष्यमित्र शुंगाने घेतले तसेच संत तुकारामांच्या विचाराने चालणारे मराठ्यांचे राज्य पेशवाईने नेले आणि जिथे कलेला महत्त्व होते. त्या ठिकाणी भोगविलास आला. EXPOSITION OF COSMIC TRUTH (कलगीतुरा) यात जे वैश्विक सत्य ते असेच. अध्यात्मिक विचार भोगवादी अश्लील आहेत. व्याभिचारी असल्याने विलासी बनले. यात

४१. *कित्ता, पृष्ठ – ६६.*

जनतेच्या इच्छा आकांक्षांना फारसे महत्त्व नाही. येथे धार्मिकता देव, ईश्वर सर्वस्वी आहे. वास्तवात या कल्पना टिकत नाहीत वीर उत्तमराव मोहिते यांचा वास्तविक विचार या ग्रंथातून मांडतात, असे दिसून येते.

वीर उत्तमराव मोहिते यांचा हा ग्रंथ मराठ्यांच्या इतिहासाबाबत एक नवप्रवाह मांडतो. समर्थ रामदास व छत्रपती शिवाजी संबंधावर मोहिते विचार मांडताना छत्रपती शिवाजींच्या राज्यस्थापनेत समर्थ रामदासांचा हातभार नाही उलट ते परसत्तेचे हेरगिरी करणारे आहेत असे मत मांडतात.

''रामदासी इतिहास लिहिला।
मराठ्यांचा अपमान केला।।
परडीच्या गडा
ब्रह्मवादी कांडा
सैतानाचा हंडा
मोगलांचा हेर होता साला।।''[४२]

''हरिभक्त नाही रामदास
फकिराचा सारा गणवेश
लिंगायत नाही
नागनाथ नाही
हलचाली पाही
परसत्तेचा हा हेर खास।।''[४३]

''विजापूर अदिलशाहा व रामदास यांची भेट''[४४]

''औरंगजेब बादशाहा आणि रामदास भेट''[४५]

---

४२. *कित्ता, पृष्ठ – ६८.*
४३. *कित्ता, पृष्ठ – ६९.*
४४. *कित्ता, पृष्ठ – ७०.*
४५. *कित्ता, पृष्ठ – ७१.*

असे संदर्भ घेऊन उत्तमराव समर्थ रामदास व छत्रपती शिवाजी यांच्या संबंधाचा अभ्यास करून शिवाजी महाराजांच्या राज्यात रामदास हेरगिरी करत असत असे सांगतात.

मोहिते यांनी इथे काही प्रमाण दिले आहेत आणि इतिहासामध्ये छत्रपती शिवाजी व समर्थ रामदास यांच्याविषयी वाद आहे. समर्थ रामदास शिवाजी महाराजांचे समर्थक व शिवाजी महाराजांचे शत्रू अशी विचारधारा आहे. शिवाय दोन्ही व्यक्ती महाराष्ट्राच्या स्वाभिमानाशी निगडीत आहेत समर्थ रामदासासंदर्भात गुरू नसणे व हेर असणे हे उत्तमरावांचे मत आहे. या मताबाबत आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांच्याशी वीर उत्तमराव मोहिते यांचा वृत्तपत्रीय वाद झाला. या वादात अत्रे यांनी पुराव्याऐवजी शिव्यांचा भडीमार केला. वीर उत्तमराव मोहिते यांची ठाम भुमिका असल्याचे दिसते. तसेच त्यांचे विचार न्यायालयाने मान्य केल्याने उत्तमरावांचे विचार योग्य आहेत असे म्हणावे लागते.

वीर मोहिते म.फुले, राजर्षी शाहू, डॉ. आंबेडकर यांचा मार्ग वास्तवाशी व लोककल्याणकारी असल्याचे सांगतात. फुले, शाहू, आंबेडकर परिवर्तनवादी भूमिका घेऊन वैज्ञानिक मानवतावादी समाजनिर्मिती करण्याचा प्रयत्न करतात. तर बाळ गंगाधर टिळक प्रतिगामी नेतृत्व करतात.

''कोठे ज्योतिराव अनमोल।
शाहू क्रांतीची मशाल लाल।।
बहुजन शीला
अग्नी भडकला
भयंकर ज्वाला
कोठे पोत्याचा टिळक बाल।। ''[४६]

पारंपरिक विचारधारा व परिवर्तनवादी वैज्ञानिक विचारधारा यांबाबत फरक

---

४६. *कित्ता, पृष्ठ – ८०.*

स्पष्ट करतात आणि टिळक सुधारणा करत होते. पण पारंपरिक चौकटीत राहून सुधारणा करत होते. पण याने भागणार नसून चौकट मोडण्याची गरज होती. यामुळे वीर मोहिते म. फुले, राजर्षी शाहू, डॉ. आंबेडकर यांचे समर्थन करतात आणि स्वातंत्र भारतात अणुयुगाची, विज्ञानयुगाची आशा करतात असे दिसते.

''अणूयुगाची नवी चिनगार।
विश्वशांतीची ज्योत चेतणार।।''[४७]

प्राचीन काळापासूनचा संघर्ष सांगून विज्ञानवादी विचारधारा स्वातंत्र भारतात म. फुले, राजर्षी शाहू, डॉ. आंबेडकर, डॉ. पंजाबराव यांच्या विचाराने निर्माण होऊन आता समतेचा मार्ग प्रगत होऊन शांतता येण्याची अपेक्षा ठेवताना दिसतात.

एकंदरीत वीर उत्तमराव मोहिते यांचे EXPOSITION OF COSMIC TRUTH (कलगीतुरा) हे इंग्रजी मराठी पुस्तक प्रमाणबद्ध आहे. यातील काव्य मराठीच्या 'यमक' अलंकारात रचले असून प्रत्येक काव्यात ठराविकता आहे. एक काव्य प्रमाण आहे. खरे म्हणजे काव्य म्हटलं की, अलंकारिकता व कल्पना समोर येतात. पण वीर उत्तमराव मोहिते यांचे काव्य हे वास्तव आहे. इतके वास्तव काव्य लिहिणारे स्वतंत्र भारतातील पहिले कवी व लेखक उत्तमराव असतील असे वाटते.

उत्तमराव मोहिते यांनी या ग्रंथातून मांडलेले वैचारिक विचार तठस्त व कसलीही भीड न ठेवता अत्यंत कठोरपणे मांडले आहेत. मोहिते महान विद्रोही विचारवंत वाटतात. चार्वाकापासून तुकारामापर्यंत वैज्ञानिक विचाराची मालिका म. फुले, राजर्षी शाहू, डॉ. आंबेडकरांनी फुंकर घालून तेवत ठेवली व उत्तमराव मोहित्यांनी त्यावर जाळ लावून काल्पनिक व कर्मठ बाबी जाळल्या असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही.

४.७ मराठ्यांच्या सांस्कृतिक क्रांतीचा इतिहास

वीर उत्तमराव मोहिते लिखित मराठ्यांच्या सांस्कृतिक क्रांतीचा इतिहास हा

---

४७. *कित्ता, पृष्ठ – ९१.*

ग्रंथ मराठा विज्ञान मंडळ, शिवाजीनगर अमरावती येथून दौलतराव गोळे यांनी डॉ. पंजाबराव देशमुख जयंती निमित्त दि. २७ डिसें. १९८८ रोजी प्रकाशित केला. या ग्रंथाचे मुद्रण दोघांकडून केले. श्री पापळकर यांनी पृष्ठ १ पासून १७२ पृष्ठांपर्यंत यापुढील कार्य श्री.आर.जी. कडूकर यांनी सुचित्रा प्रिंटींग प्रेस नवाथे प्लॉट्स अमरावती येथून केले. या ग्रंथाचे मुखपृष्ठ नागपूर येथील राजरतन मोटघरे यांनी केले.

वीर उत्तमराव मोहिते यांचा हा ग्रंथ एकूण २२५ पृष्ठांचा असून त्याची विक्री किंमत ५० रू. ठेवली आहे. मुखपृष्ठावर संस्कृतीचे संकेत चिन्ह व छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचा पासपोर्ट साईज फोटो डाव्या कोपऱ्यात वरच्या बाजूला आहे. मुखपृष्ठाच्या आतील बाजूस स्वातंत्र्य सैनिक वीर उत्तमराव मोहिते यांच्या कार्याचा थोडक्यात परिचय दिला आहे. या ग्रंथाच्या प्रारंभी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांच्याकडून वीर उत्तमराव मोहिते यांना दिलेला पुरस्कार त्या निमित्ताने प्रतिष्ठानचे सचिव प्रा. पी.बी. पाटील (सांगली) यांचे विचार देण्यात आले आहेत. यानंतर पुढील पानावर डॉ. पंजाबराव देशमुख वैज्ञानिक संस्कृतीपीठाचा प्रधान उद्देश दिला आहे. यानंतर प्रा. मा.म. देशमुख यांची अठरा पृष्ठे प्रस्तावना आहे. यात प्रकरणानुसार ग्रंथाचा आढावा घेतला आहे. ग्रंथाच्या शेवटी परिशिष्टामध्ये चार विषय दिले आहेत.

- घटना परिषदेत डॉ. आंबेडकर
- मराठा महासभा एक निवेदन
- सत्यशोधक परिषद : औरंगाबाद
- एक प्रचंड संदर्भ ग्रंथ : प्रा. भाऊ भालेराव

परिशिष्टानंतर शुध्दिपत्रक, मा.म. देशमुख लिखित ग्रंथाची यादी, सुधाकर मोहड यांच्या ग्रंथाची यादी व शेवटी मलपृष्ठाच्या आतील भागावर उत्तमराव मोहिते यांच्या प्रकाशित व अप्रकाशित ग्रंथाची यादी दिली आहे.

वीर उत्तमराव मोहिते यांच्या मराठ्यांच्या सांस्कृतिक क्रांतीचा इतिहास या ग्रंथाचे पुनर्मुद्रण १ सप्टे. २००७ रोजी मराठा सेवा संघ वर्धापन दिन निमित्ताने किशोर

कडू यांनी केले. जिजाई प्रकाशन, पुणे येथून मूळप्रत व पुनर्मुद्रण यातील फरक म्हणजे पुनर्मुद्रण केलेल्या प्रतिवर मुखपृष्ठावर छत्रपती शाहूंचा फोटो नाही. ग्रंथाचे नाव प्रथम व लेखकाचे नंतर असे असण्याऐवजी लेखकाचे नाव प्रथम देण्यात आले आहे. यात पुरूषोत्तम खेडेकर यांची 'सांस्कृतिक इतिहास समजून घेताना' हा सात पृष्ठांचा भाग दिला आहे. वीर मोहिते यांचा अल्प परिचय मलपृष्ठाच्या आतील भागावर दिला असून मुखपृष्ठाच्या आतील भागावर जिजाऊ वंदना दिली आहे आणि मलपृष्ठावर पुरूषोत्तम खेडेकर यांचा अभिप्राय आहे.

शिवशाहीचा उदय आणि अस्त हा वीर उत्तमराव मोहिते लिखित ग्रंथ त्यांच्या मराठ्यांच्या सांस्कृतिक क्रांतीचा इतिहास या ग्रंथातील दोन प्रकरणे आहेत. 'शिवशाहीचा उदय' व 'मराठीशाहीला ग्रहण' हे दोन प्रकरणे घेऊन हा ग्रंथ तयार केला आहे. १० मे २००९ मध्ये याचे प्रकाशन किशोर कडू यांनी जिजाऊ प्रकाशन, पुणे येथून केले. मुखपृष्ठावर शहाजी राजे भोसले, राष्ट्रमाता जिजाबाई, छत्रपती शिवाजी, छत्रपती संभाजी, महाराणी ताराबाई या छत्रपतींची छायाचित्रे असून शिवराज्यभिषेकाचा फोटो व राजमुद्रा आहे. मलपृष्ठावर प्रकाशकांचा अभिप्राय आहे.

वीर उत्तमराव मोहिते यांच्या या ग्रंथात एकूण बारा प्रकरणे आहेत. मानवजातीचा अरूणोदय, शिवशाहीचा उदय, मराठेशाहीला ग्रहण, ब्रह्मविद्येचे सुंदर कांड, वैज्ञानिक युगाची संवेदना, जोतीरावांनी भौतिकतेची ज्योती उजळली, परस्परविरोधी प्रवृत्ती अध्यात्म आणि विज्ञान, वैज्ञानिक संस्कृतीचा दार्शनिक राजर्षी शाहू छत्रपती, राजसत्ता आणि अध्यात्म यात श्रेष्ठ कोण, वैज्ञानिकतेचा सिद्धांत मांडणारा भारतीय दार्शनिक, वैज्ञानिक संस्कृतीसाठी शाहू छत्रपतींची हाक, हिंदू–मुस्लीम ऐक्याचे एक आगळे–वेगळे दर्शन, या प्रकरणांच्या माध्यमातून मराठ्यांच्या सांस्कृतिक क्रांतीचा इतिहास वीर उत्तमराव मोहिते यांनी रेखाटला आहे.

वीर उत्तमराव मोहिते यांचा हा ग्रंथ त्यांच्या अभ्यासाचे आणि चिंतनाचे प्रकट रूप आहे. त्याचा अनेक वर्षाचा अभ्यास आणि त्याचे फळ आहे. त्याचे वय आत ८०

व्या वर्षात प्रवेश करत आहे. वयाने थकलेल्या पण विचाराने मजबूत झालेल्या उत्तमरावांनी तरूणाचे साहस दाखवले. 'मानवजातीचा अरूणोदय' या प्रकरणात काव्यमय भाषेत मानवाची उत्पत्ती झाली. निसर्गनियमांचे अनुकरण व निसर्गाकडून शिकत राहिला, आपले दैनंदिन कार्य करू लागला. यासाठी ''पुस्तकाचा जन्मच झाला नव्हता, सोयीची रूढी होती, रूढीची चाल नव्हती. बुध्दीला वाव होता पण पांडित्याला जागा नव्हती, अनुभवांची भरती होती.''[४८] यातून मानवासाठी कोणताही आधारभूत ग्रंथ नसून मानव नैसर्गिक अनुभवावर जगत होता. या अनुभवाची रूढ बनली पण ती रूढीची चाल नव्हती. सोयीनुसार जगणारा मानव होता असे सांगतात आणि पुढे भाषा आकाराला आली. राज्याची कल्पना आली राज्य निर्माण झाले आणि हे राज्य राजाकडून पुरोहिताकडे गेले याचे विवेचन करतात. ''गणराज्यातील ऋषी होता संशोधक, कृषक होता उत्पादक, पुरोहितशाहीने कृषकांचा फडशा पाडला. ऋषींचे शिरकाण केले. रूढींचा कायदा बनला व पुस्तकी कायदा आला, कायद्याची स्मृती बनली, जबरेची नीती आली, व्रतवैकल्यांना ऊत आला, सोंगाढोंगाचे पेव फुटले, भिक्षुकांची पूजा सुरू झाली. पुरोहित एकदाच राजा झाला पण पुरोहिताची गुलामगिरी बोकांडी बसली. निसर्गाचा ग्रंथ मिटला. सत्याची भेट नाही अनुभवाची गाठ नाही, श्रद्धा जीवनाचे मूल्य बनलं.''[४९] म्हणजे इथे ग्रंथ निर्माण झाले. जीवन व्यवहार ग्रंथानुसार ग्रंथ पुरोहितानुसार आणि पुरोहित त्याच्या सोयीनुसार आणि त्याची सोय त्याच्या सुखात आणि त्याचे सुख इतरांच्या दु:खात असे समीकरण बनल्याचे दिसते. यात पुरोहिताची उत्पत्ती सांगून राजावर आलेली आपत्ती लेखकाने सांगितली आहे.

उत्पन्न झालेली ही परिस्थिती व्यक्ती जीवन कुंठीत करणारी होती. या परिस्थितीपासून मानव जातीच्या सुटकेचा प्रयत्न झाल्याचे सांगताना लेखक म्हणतात,

---

४८. *मोहिते वीर उत्तमराव, मराठ्यांच्या सांस्कृतिक क्रांतीचा इतिहास, पृष्ठ – ४.*

४९. *कित्ता, पृष्ठ – ०७.*

''मराठा देशात वेदान्ताविरुद्ध पंढरपूरने पेट घेतला. पंढरपूरला विठ्ठल रखूमाईचे भौतिक दैवत उभे करून पुरूष प्रकृतीच्या प्राकृतिक कल्पनेभोवती वारकरी पंथाने भौतिक क्रांती उभी केली. ही लोकक्रांती असून याचा प्रमुख नामदेव होता''[५०] असे स्पष्ट करतात आणि मानवाच्या मूळ नैसर्गिक हक्क व गरजा त्याच्या दैनंदिन जीवन व्यवहारास उपयुक्त ठरतात. त्याची मुभा त्यांना मिळाली पाहिजे. हे कार्य पंढरपूर क्रांतीने केले. असा विचार सांगताना ते ''देवगिरी राज्यात ब्रह्मविद्येच्या व्रत वैकल्यांना ऊत आला''[५१] पुढे ते म्हणतात, ''मुस्लीम शासकांना भट पंडिताचा वर्ग शरण गेला. देशमुख ही शरण गेले आणि जे गेले नाहीत ते क्रांतिकारक देशोधडीला लागले''[५२] आणि ''संस्कृत पंडितांनी अल्लाउद्दीन खिलजीच्या आक्रमणाचा स्वीकार केल्यामुळे दक्षिणेतील पैठणी पंडिताचे वजन चांगलेच वाढले.''[५३] महाराष्ट्राची राजकीय परिस्थिती सांगताना म्हणतात, ''मुस्लिम शासक नावालाच होते खरी सत्ता होती राजे जाधव, मोऱ्यांच्याच हाती''[५४] मोहिते यांच्या उपरोक्त विधानांचा विचार केला असता असे दिसून येते की, पंडीत वर्ग, ब्राह्मण यांचे राजसत्तेवर वर्चस्व निर्माण होऊन सर्वसामान्य जनतेची पिळवणूक झाली. मानवात विषमता निर्माण झाली. ही दूर करण्यासाठी पंढरपूरातून नामदेवाने सुरुवात केली. पण जसे पंढरपूर सुधारवादी होते तसे पैठण सनातनी होते. मुस्लीम राजवटीने पैठणच्या संस्कृत पंडितांचे समर्थन केले. अनेक मराठे त्यात सहभागी झाले. या भागावर शासक मुस्लीम होते. पण खरी सत्ता मराठ्यांच्या हाती होती. पण मराठ्यांची वृत्ती मात्र बदलली होती. अनेक मराठा शासक आपापसात लढण्यात धन्यता मानत होते. ''मराठ्या इतका अंत:कलह दुसऱ्या कोणत्याच जातीत नाही. मराठा जातीचा इतिहास म्हणजे मराठ्यातील भाऊबंदकीच्या कथा होत.''[५५]

---

५०. *कित्ता, पृष्ठ – १०.*

५१. *कित्ता, पृष्ठ – १४.*

५२. *कित्ता, पृष्ठ – १५, १६.*

५३. *कित्ता, पृष्ठ – १४.*

५४. *कित्ता, पृष्ठ – २२.*

५५. *कित्ता, पृष्ठ – १६.*

यावरून असे म्हणता येईल की, वीर उत्तमराव मोहिते यांनी या प्रकरणात मानवाच्या उदयापासून ते मराठेशाहीच्या उदयापूर्वी महाराष्ट्राचा अभ्यास केला आणि नैसर्गिक जीवन जगणारा मानव ग्रंथातील नियमाने जगू लागला. ते नियम कमालीचे अन्यायी असल्याने आणि त्याला धर्माचा आधार दिल्याने इस्लाम राजवटीत त्याचे अधिक दृढीकरण झाले व मराठ्यांची फुट पडून नुकसान झाले व पुरोहितांचे वर्चस्व निर्माण झाले असे सांगतात. व्रतवैकल्य, धर्मभोळेपणा, मराठ्यांची भाऊबंदकी, पांडित्याचा जोर, सामान्यांची हेळसांड, पोती–पुराणांना कमालीचे महत्त्व, ब्राह्मणांचे वाढते वर्चस्व, कर्मकांडाचे स्तोम यामुळे मृतप्राय झालेल्या समाजाला नवसंजीवनी देण्याचे कार्य पंढरपूरने केले. ''वारकरी पंथाची लोकप्रियता शिगेला पोहचत होती. समाजाची भौतिक वाढ खुंटली होती, मुस्लीमांना मराठा बनवण्याची व्यवस्था स्मृतीत नव्हती. पंढरपूरचा विठोबा मुळची बौद्धांची शिल्पकृति. पंढरपूरचा विठू महार झाला म्हणून महाराष्ट्राचा भट भिक्षुक बोलत होता. पण पंढरपूर निर्गुण निराकार व अक्षर ब्रह्मा विरुद्ध बंड होतं.''[५६]

उत्तमराव मोहिते वास्तव परिस्थिती व वारकरी क्रांती यांच्या कार्याचा आढावा घेऊन सांगतात की, वैदिक धर्म व कर्मकांडाविरूद्ध वारकऱ्यांनी क्रांती सुरू केली. यात जात, धर्म, पंथाचे बंधन तोडून मनवतेचा संदेश पंढरपूर क्रांती देऊ लागली. या वातावरणातून छत्रपती शिवाजी महाराजांची जडण–घडण झाली आणि मराठ्यांना एकत्र केले. दूर राहतील. त्यांना पराभूत करून छत्रपती शिवाजींनी स्वराज्य निर्माण केलं. ब्राह्मण जातीचं श्रेष्ठत्व प्रतिपादन करणारा सांप्रदाय याच वेळेला नवीन स्वरूपात अस्तित्वात आला. ''या पंथाच्या संस्थापकाचा वेश म्हटला तर मुस्लिम फकिरासारखा आणि म्हटला तर हिंदू गोसाव्यासारखा हे हिंदूंना हिंदू व मुस्लीमांना मुस्लिम आहोत असे सांगायचे. ब्राह्मणाच श्रेष्ठत्व सांगणे हा या संघटनेचा बाणा होता. या दास पंथाचा आणि वारकरी सांप्रदायाचा छत्तीसचा आकडा होता.''[५७]

---

५६. *कित्ता, पृष्ठ – २७.*

५७. *कित्ता, पृष्ठ – २८.*

म्हणजे ज्या प्रमाणे ब्राह्मण पुरोहिताने राजकीय वर्चस्वावर आपले वैचारिक वर्चस्व ठेवले तेच झुगारण्याचे कार्य वारकरी करत होते. तर त्याचे दृढीकरण करण्याचे कार्य दासपंथ करत होता. वारकऱ्यांची समतेची शिकवण घेऊन शिवाजी महाराजांनी राज्य निर्माण केले आणि स्मृतीचे कायदे मोडले. ''जैन, शैव, वारकरी, महानुभाव, गोंधळी, तमासगीर, पठाण, महार, मांग, तेली, तांबोळी यांची सहानुभुती शिवरायांना मिळाली. महार, मांग, रामोशी यांना लष्करी पेशा करण्याची स्मृतीची आज्ञा नव्हती ती शिवरायांनीच प्रथम भारताच्या इतिहासात लष्करी संघटनेत अधिकाऱ्यांच्या जागा देण्याची संपूर्ण मोकळीक दिली.''[५८] शिवरायांच्या या कृतीने पारंपरिक कर्मकांडी पद्धती क्षीण झाली आणि हाजारो वर्षाच्या इतिहासात बदल झाला. आता धर्माचे वर्चस्व राजकीय वर्चस्वावर राहीले नाही. पुरोहितापेक्षा राजसत्ता श्रेष्ठ ठरली. धार्मिक बाबतीत न्याय देण्याची सत्ता राजाकडे आली. ही अभूतपूर्व क्रांती छत्रपती शिवाजी महाराजांनी केली. एवढा मोठा आणि धाडशी निर्णय घेण्यामागे छत्रपती शिवाजी महाराजांची मनोभूमिका कोणी तयार केली हा हजारो वर्षाचा कायदा मोडून नवीन कायदा प्रस्थापित केला. हे मोठे धाडस एखाद्या मार्गदर्शकाशिवाय होत नाही. यामागे कोणाचे मार्गदर्शन होते. ''राजमाता जिजाबाई सोडून शिवाजी महाराजांना कोणताही गुरू नव्हता अथवा सल्लागार नव्हता.''[५९] म्हणजे जिजाबाई यांच्या मार्गदर्शनाने शिवाजींनी राज्य चालवले. जिजाबाई चिकित्सक होत्या, रूढीवादी नव्हत्या हे त्यांच्या जीवनचरित्रावरून दिसून येते. त्यांनी शहाजी राजे यांच्या मृत्यूनंतर सती गेल्या नाहीत. यावरून उत्तमराव मोहिते यांचे उपरोक्त विचार स्वीकारता येतात.

मराठ्यांच्या राज्याची मुहर्तमेढ रोवण्यासाठी वारकरी संप्रदायाची मदत झाली आणि जिजाबाईंच्या निर्भीड व क्रांतिकारी विचारातून छत्रपती शिवाजींनी परिस्थितीत परिवर्तन घडवून जे राज्य निर्माण केले ते कोण्या एका व्यक्तीचे, जातीचे, धर्माचे,

---

५८. *कित्ता, पृष्ठ – ३१.*

५९. *कित्ता, पृष्ठ – ३३.*

पंथाचे, एकाकी विचाराचे नसून समता व सर्वांगीण विचाराचे राज्य पुरोहिताशी व वैदिक धर्माशी लढा देऊन निर्माण केले व पुढे अनेक वर्ष चालले. म्हणून या लोककल्याणकारी राजाचा विरोध वर्णवर्चस्ववादी व संरजामदारी वर्गाने केला असे दिसून येते.

'मराठेशाहीला ग्रहण' या प्रकरणात उत्तमराव मोहिते पेशव्यांची कुटील कारस्थान सांगताना म्हणतात, ''भटांनी मुसलमानांचा कितीही द्वेश केला, करावा, इस्लाम धर्माला कितीही नावे ठेवावीत, तरी इस्लामपेक्षा हिंदूधर्म श्रेष्ठ ठरूच शकत नाही. हिंदू धर्मानं रचलेल्या चातुर्वर्ण्य समाजव्यवस्थेनेच हिंदूधर्माचं नष्टचर्य ओढवलं. यात तिळमात्र शंका नाही.''[६०] वीर मोहिते यांनी केलेले विधान जातीपातीत अडकलेला हिंदू धर्म समतेपासून दूर गेला आणि विषमतेमुळे मानवा–मानवातील दरी वाढत गेली व एकता भंग पावली. जेव्हा एकता भंग पावते तेव्हा शत्रूंचा विजय निश्चित होतो याचे भारतीय इतिहासात अनेक उदाहरणे आहेत. पानिपतच्या पराजयात एकतेचा अभाव हे ही कारण सांगितले जाते. त्याचबरोबर पेशव्यांची विलासी वृत्ती आहे. छत्रपती शिवाजींनी निर्माण केलेले समतेचे राज्य नष्ट होऊ लागले आणि ''नानासाहेब पेशव्यांच्या राजवटीत अदि ब्रह्माचं राज्य सुरू झालं. छत्रपतीचं नाव पुसून ब्रह्मदेवाच धर्मराज्य सुरू झालं.''[६१]

धर्म राज्य म्हणजे जोतिषावर शुभ, अशुभावर आधारित राज्य असे. त्याला कार्य व कर्तृत्वापेक्षा मुहुर्ताला महत्त्व असे राज्य वास्तावापासून दूर राहते. देव पाठीशी आहे पूजा, अर्चा, होम, हवन, यज्ञ ही ज्यावेळी राज्यकारभारात येतात तेव्हा राज्य निष्क्रिय होतं आणि देव आपले राज्य चालवतो, सांभाळतो अशी भावना निर्माण होते व राज्यकर्ते विलासी व आळशी बनतात. वीर उत्तमराव मोहिते म्हणतात, ''तमाम मुस्लीम जमात खतम करायला पेशव्यांच्या जनानखान्यातील पलटण चालली.''[६२]

---

६०. *कित्ता, पृष्ठ – ५७.*

६१. *कित्ता, पृष्ठ – ५३.*

६२. *कित्ता, पृष्ठ – ५५.*

पेशव्यांनी पानिपत युद्धावर स्त्रीया घेऊन गेले. पेशवे काम व भोगाच्या आहारी गेले आणि देव व धर्म यांच्या आधारे भविष्यावर राज्य चालवू लागले. म्हणूनच राज्य दुबळे बनले व परकीय आक्रमकांना सहज राज्य मिळवता आले हे यातून सांगण्याचा प्रयत्न केल्याचे दिसते.

उत्तमराव मोहिते 'ब्रह्मविद्येचे सुंदरकांड' सांगतात. हे सांगताना बळीराजा पाताळात घातला तो चांगले उत्पादन करणारा राजा मस्तावला. पेशव्यांचे सुंदरकांड ''सत्शील आणि उद्योगप्रिय राजाला पाताळात घालतो. तो अवतार अशी ब्रह्मविद्येची अवताराची कल्पना आहे.''[६३] येथे एक अर्थ सूचित होतो तो म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांनी एक कष्टकरी काम करणाऱ्यांचे समृद्ध राज्य निर्माण केले ते पेशव्यांनी बुडवले असा लेखकाचा मानस असल्याचे दिसते तसा निर्वाळा ते देतात व पेशवाईतील दुराचारावर वीर उत्तमराव मोहिते यांनी प्रकाश टाकला.

छ. शिवाजींनी निर्माण केलेले भक्कम राज्य पेशव्यांनी बुडवले. पेशवाईने ब्राह्मणत्वाचे समर्थन केले होते. पेशवाई गेल्यामुळे ब्राह्मणत्वाला जायला पाहिजे. त्यांचे दिवाळे निघाले असे व्हायला पाहिजे पण तसे न होता ब्राह्मण्य पुन्हा सुरूच राहिले. 'वैज्ञानिक युगाची संवेदना' या पाचव्या प्रकरणात उत्तमराव मोहिते सांगतात की, ''पेशवाई गमावली ब्राह्मणांनीच, इंग्रजांचे राज्य आणले त्यांनीच आणि इंग्रजी राज्याचा फायदाही उचलला त्यांनीच''[६४] पेशवाई गेली याचं दु:ख बाळगून न बसता यानंतरच्या प्रभावी राज्यकर्त्यांशी हातमिळवणी करून ब्राह्मणांनी आपला कार्यभार साधला आणि यास त्यांची पुर्वीचाच शिक्षितपण उपयोगी आला असे म्हणता येईल.

उत्तमरावांची भाषा मनाला भावणारी व वाचनाची आवड निर्माण करणारी आहे. कारण त्यांनी जो विषय मांडला त्याला वाचणीय बनवले आहे. म्हणून ती कल्पनारंजन करणारी आहे असे नाही. वास्तविक व सत्य विषय ते वाचनीय

---

६३. *कित्ता, पृष्ठ – ६५.*

६४. *कित्ता, पृष्ठ – ८३.*

बनवण्यासाठी त्यांच्या ठगदार शैलीत सांगतात. हे त्यांचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये आहे. निरस कंटाळवाणा वाटणारा विषय सुद्धा ते वाचनीय बनवतात. ते सुभाषितांच्या माध्यमातून अनेक बाबी स्पष्ट करतात. इतिहासात तशी पद्धत आहे. 'होता जीवा म्हणून वाचला शिवा' हे इतिहासात वापरलेले सुभाषित ऐतिहासिक घटना समोर ठेवते. 'बचेंगे तो और भी लढेंगे' अशी वर्णने आढळतात. तसेच उत्तमराव सुभाषितांच्या माध्यमातून उत्कृष्ट लेखन करताना दिसतात.

वीर उत्तमराव मोहिते म्हणतात, ''आंग्लाईत भारतीय कायद्यावर पुन्हा मनुस्मृतीची सावली पडली. सर्वोच्च अधिकारी इंग्रज असले तरी त्यांच्या हाताखाली खर्डेघाशी करणारी जाणवी होती.''[६५] जाणवी या शब्दातून उत्तमराव मोहिते ब्राह्मण, पुरोहित, सनातनी वृत्तीचा हा अर्थ घेतात. इंग्रजांच्या राज्यात ही शिक्षण, सामाजिक विषय, आर्थिक विषय व धार्मिक विषयात सल्लागार म्हणून ब्राह्मणच अग्रेसर राहीले. इथे सर्वसामान्य अजून अज्ञानातच राहीला आणि याकडे फारसे लक्ष दिले नाही. अज्ञान व अंधश्रद्धा वाढत राहीली. यामुळे महाराष्ट्रीयन समाज दु:खी व कष्टातच जीवन जगत राहीला.

उत्तमराव मोहिते म्हणतात, ''आंग्लाईतील ब्राह्मण जातीच भौतिकीकरण भारताच्या इतिहासातील अपूर्व घटना आहे. महाराष्ट्रात त्यांच्या इतकी जातीयवादी जमात दुसरी नाही आणि मराठ्यांइतकी फुटीर, विस्कळीत, मूढ व अध्यात्माचे गुलाम बनलेली जमात दुसरी नाही''[६६] असे सांगतात. मराठा समाजाच्या या वृत्तीला त्यांच्यातील अज्ञान कारणीभूत आहे आणि पारंपरिक व्यवस्थेने त्यांना शिक्षणापासून वंचित ठेवले. इंग्रजांच्या आगमनाने शिक्षणास गती मिळूनही तो आहे तसाच आहे यास सुधारण्यासाठी वरिष्ठानी प्रयत्न केले नाहीत. चिपळूणकरांचे विचार आणि सुधारणा वरिष्ठ वर्गासाठी होत्या. त्याच टिळकांनी उचलल्या. शेतकरी, कष्टकरी समाजाच्या दीन–दुबळ्यांना सक्षम बनवण्यासाठी शिक्षणाची गंगोत्री घेऊन येणाऱ्या

६५. *कित्ता, पृष्ठ – ८३–८४.*

६६. *कित्ता, पृष्ठ – ८५.*

महात्मा फुले यांच्या युगप्रवर्तक कार्याची उत्तमराव मोहिते माहिती देतात आणि म्हणतात, ''ज्योतिरावांनी प्रथम ब्राह्मण जातीलाच अध्यात्मिक गुलामगिरीतून मूक्त केले.''[६७] महात्मा फुले यांनी महाराष्ट्रीयनांना शिक्षित केले व ब्राह्मणी धर्माच्या गडावर व रखवालादारांवर हल्ले करून वास्तविकता समोर मांडली. ''प्रायमरी शिक्षण सक्तीचे करण्यात यावे ही मागणी मुंबई इलाख्यात महात्मा फुले यांनी प्रथम मांडली.'' यामुळे महाराष्ट्रात शिक्षणाची गंगा वाहिली व अनेक शिक्षित मंडळी निर्माण होऊन अध्यात्म व देवधर्म या माध्यमातून सांगितलेले कर्मकांड नाकारण्यास सज्ज झाली.

उत्तमराव मोहिते इथे परिस्थिती समोर मांडून त्यात महात्मा फुले यांनी बदल केल्याचे सांगतात आणि महात्मा फुले यांना 'भौतिकवादी क्रांतिकारक' म्हणून गौरवित करतात तर चिपळूणकर, लो. टिळक यांना पारंपरिक वर्णवर्चस्वाची चौकट मजबूत करण्याबाबत त्यांच्यावर कडक शब्दात टीका करतात आणि प्रस्थापित व्यवस्थेला हदरे देण्याबरोबरच प्रचलित गैरसमजुतीचा चेंदामेंदा करतात.

वीर उत्तमराव मोहिते यांनी तत्त्वज्ञानावर स्वतंत्र ग्रंथ ही लिहिला आहे. भारतीय तत्त्वज्ञान (हिंदू तत्त्वज्ञान) अध्यात्मावर आधारित आहे आणि अध्यात्म पिळवणुकीवर, पिळवणुकीचा आधार चतुर्वर्ण्य, चातुर्वर्ण्य वेदावर आधारित असून पिळवणुकीची ही मालिका आहे याचे बुड ब्रह्मविद्या त्यालाच अध्यात्म म्हणतात. अध्यात्म विकृत असून व्यवहारिक जीवनाशी त्याचा मेळ बसत नाही असा तात्त्वज्ञानिक विचार मांडला. ''अध्यात्म व विज्ञान या परस्परविरोधी प्रवृत्ती आहेत''[६८] असे सांगून हिंदू धर्मातील अज्ञानाबाबत वीर उत्तमराव मोहिते म्हणतात, ''हिंदूधर्मातील साऱ्या पौराणिक कथा सत्य आहेत हे मानण्या इतका भारतीय अब्राह्मण समाज मुर्ख होता हे भारताचे सर्वात मोठे दुर्देव होय.''[६९]

अध्यात्म, वर्णवर्चस्व, हिंदूत्व या विषयात अडकलेल्या समाजाला

---

६७. *कित्ता, पृष्ठ – ९८.*

६८. *कित्ता, पृष्ठ – ९९.*

६९. *कित्ता, पृष्ठ – १२३.*

नवविचारांची गरज होती हे नक्की. म. फुले यांच्या कार्यातून तशी प्रेरणा मिळाली होती. इंग्रजांची शिक्षणविषयक भूमिका मदतीला होती. आता अब्राह्मणांची पुढे होण्याची गरज होती. तेव्हाच शिक्षण सर्वदूर जाणार होते. हे काळाच्या पडद्यावर स्पष्ट दिसत असताना हजारो वर्षाचा गंज घासणार कोणी धाडशी येण्याची काळ वाट पाहत होता. त्याला सनातन्यांच्या विरोधातून मार्ग काढायचा होता हे नक्की. अशावेळी शाहू छत्रपती यांचे आगमन व त्यांची कार्यपद्धतीमुळे श्रद्धा, भावना ऐवजी श्रम व वास्तवता याला त्यांनी महत्त्व दिले. वीर उत्तमराव मोहिते वैज्ञानिक संस्कृतीचा दार्शनिक शाहू छत्रपती महाराज असा उल्लेख करतात. लेखकाच्या धाडशी वृत्तीचे दर्शन होते. इथे राजसत्ता व अध्यात्म यात श्रेष्ठ कोण? यात शाहू महाराजांनी धर्मसत्तेला राजसत्तेपेक्षा कनिष्ठ ठरवून राजा श्रेष्ठ व प्रजाहितदक्षक असल्याचे दाखवून दिले. ''दिनांक ६ मे १९०२ रोजी खास फर्मान काढून महाराजांनी राजोपाध्यायाचे वतन खालसा केले.''[७०]

यावरून वीर मोहिते यांनी असे सूचित केले आहे की , अध्यात्मिक सत्ता पिळवणुकीची असून म. फुले यांनी याचा उलगडा केल्यावर त्याचा भक्कमपणा शाहू छत्रपतीनी देऊन देव, धर्म, वेद, पुराणे, अध्यात्म यावर आधारलेल्या संस्कृतीतून अनेकांची होणारी पिळवणूक व फसवणूक थांबवण्यासाठी शाहूंनी कार्य हाती घेतले आणि समाजाचे गेलेले सत्व, त्यांचे नैसर्गिक अधिकार त्यांना परत मिळवून देण्यास सुरुवात केली. हे शाहूंची प्रचंड क्रांतिकारी कार्य वैज्ञानिक, वास्तविक जीवनासाठी उपयुक्त होते. म्हणून शाहूंनी अध्यात्माऐवजी विज्ञान महत्त्वाचे मानले.

वीर उत्तमराव मोहिते यांनी ''वैज्ञानिकतेचा सिद्धांत मांडणारा भारतीय दार्शनिक शाहू''[७१] असे संबोधून क्षात्रजगद्गुरूची स्थापना, सत्यशोधक लग्नविधी, भास्करराव जाधवांची तत्वनिष्ठा, देव चोरीला जाणे, ज्योतिषाची फजिती, मत्स्यपुराण, अनत्रदान व पुरोहितशाहीला हदरा, अस्पृष्यता निवारण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अशा वेगवेगळ्या प्रसंगाने राजर्षींची भाषणे इ. प्रसंग लेखकाने आपल्या विशेष व ढंगदार

---

७०. *कित्ता, पृष्ठ – १५३.*

७१. *कित्ता, पृष्ठ – १७४.*

शैलीने मांडले आहेत. या कार्यातून राजर्षी शाहू अब्राह्मण समाजाला हाक देऊन सांगतात, ''वैज्ञानिक क्रांतीसाठी राजर्षी शाहू यांनी हाक दिली''[७२] असे सांगून शाहूंच्या हाकेला प्रतिसाद दिल्यास त्यांच्या कार्याला पूर्णत्व मिळु शकते, अशी वीर उत्तमराव मोहिते यांना सांगावयाचे असल्याचे दिसून येते. छत्रपती शाहुंच्या विचारांची पूर्तता करण्यासाठी आत्मभानाची गरज आहे. ''माणसाच्या स्पर्शाने माणूस बाटतो ही आमची थोर वैदिक संस्कृती व अध्यात्म यात थोतांडापेक्षा काहीच नाही.''[७३] हे दाखवून देते. थोतांड बाहेर काढण्यासाठी तपासणी करून त्याची चिरफाड केली पाहिजे तरच अध्यात्मापासून माणुसकी वाचते असा विचार मांडतात व शाहूंच्या काळात हिंदू मुस्लीम यांचे ऐक्य या प्रकरणात दाखवतात. शाहूंच्या कारकिर्दीतील हिंदू मुस्लीम ऐक्याचे आगळे वेगळे दर्शन हा शेख शब्बीर यांचा लेख देतात.

एकंदरीत वीर उत्तमराव मोहिते यांचा मराठ्यांच्या सांस्कृतिक क्रांतीचा इतिहास या ग्रंथाचा अभ्यास केला असता यात प्रचलित इतिहास लेखनाला छेद दिला आहे. अनेक नव्या संकल्पना त्यांनी आपल्या ग्रंथात नमूद केल्या आहेत. या ग्रंथाची भाषा काव्यमय आहे. यामुळे ग्रंथ वाचनीय झाला आहे. अनेक ठिकाणी भाषा भडक व कडक असल्याची दिसते. तर काही ठिकाणी रागात येऊन लेखन केल्याचे दिसते.

वीर उत्तमराव मोहिते यांनी अनेक कष्टांना तोंड देत ग्रंथ पूर्ण केला पण पूर्ण केल्यावरही अनेक वर्ष धुळखात पडला याला प्रकाशित करण्यास उशीर झाला. हा ग्रंथ सत्यशोधकी विचारांचा आहे. या ग्रंथाचे औपचारिक प्रकाशन २७ व २८ नोव्हें. १९८८ रोजी औरंगाबाद येथे झालेल्या सत्यशोधक परिषदेत पी.बी. पाटील यांच्या हस्ते झाले. हा ग्रंथ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अर्पण केला आहे. या ग्रंथातून मराठ्यांची मानसिकता आणि त्याचा वापर या बाबतही लेखन केले आहे.

मराठ्यांच्या सांस्कृतिक क्रांतीचा इतिहास हा ग्रंथ वस्तुनिष्ठतेच्या कसोटीवर उतरतो. वैज्ञानिक पद्धतीचा अंगीकार लेखकाने केला. ग्रंथाची भाषा काव्यमय व

---

७२. *कित्ता, पृष्ठ – १९०.*

७३. *कित्ता, पृष्ठ – १९५.*

सुभाषित वजा असल्याने गोंधळ होण्याची शक्यता आहे. यासाठी हा ग्रंथ वाचण्यासाठी मनाची तयारी असणारा वाचक वर्ग समजू शकतो. नसणाऱ्यांचा गोंधळ होईल असे वाटते.

या ग्रथातील अनेक शब्द स्पष्ट नाहीत. वाचकाला लेखक काय म्हणतो याबाबत भ्रंम वाटण्याची शक्यता आहे. उदा. षंढ परमहंस, जाधव घराण्याच्या पराक्रमाबाबत विचारूच नका. अशा शब्दांचा व वाक्यांचा वापर गोंधळ निर्माण करतो. पण या मागील त्यांची पोटतीडकी व सत्य मांडण्याची तळमळ विचारात घेता त्यांच्या मांडणीतील आशय शुद्ध असून प्रसंग वास्तविक आहेत. सांगण्याची पद्धत ओघवती आल्याने असा संभ्रम वाटण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या ग्रंथातून निदर्शनास आलेली बाब म्हणजे लेखकाच्या स्वतंत्र व निर्भीड विचार कोणत्याही शक्तीला अथवा दबावाला बळी न पडता तटस्थ राहून स्वकीयांबाबतही ठोस निर्णय घेताना दिसतात.

वीर उत्तमराव मोहिते कुठल्याही जातीय बंधनात अडकत नाहीत अथवा जातीला दोष देत नाहीत. चांगल्या ब्राह्मणाचे ते कौतुक करतात हे खरे की, त्यांना इतरांपेक्षा ब्राह्मणामध्ये अधिक दोष आढळतात ते परखडपणे मांडतात. यामुळे ब्राह्मणावर राग ओकल्यासारखे दिसते. पण समजून घेताना नीट समजून घेतले तर ते वास्तव परिस्थिती मांडताना दिसतात. अत्यंत कठीण परिस्थिती त्यांनी मराठ्यांच्या इतिहासावर संस्कृतीवर टाकलेला प्रकाश आजपर्यंतच्या इतिहासापेक्षा थोडासा वेगळा असून जनजागृती व सत्यकथन हे उद्देश असल्याने आजच्या तणावपूर्ण परिस्थितीला मोकळे करून महाराष्ट्राच्या पुढील वाटचालीला योग्य दिशा देणारा आहे असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही.

४.८ जागतिक कृषक क्रांतीचा विधाता लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख

स्वातंत्र्यसंग्राम सेनानी वीर उत्तमराव मोहिते यांचा डॉ. पंजाबराव देशमुख

यांच्या चरित्रावरील ग्रंथ आहे. याची प्रथमावृत्ती गणतंत्र दिन्नानिमित्त १९८३ साली भाग्योदय मुद्रण, नागपूर येथे तयार झाली आणि मराठा विज्ञान मंदीर शिवाजीनगर अमरावती येथून प्रकाशित केला. या ग्रंथाचे हक्क प्रकाशकाकडे प्रा. भाग्यरेखा देशमुख अध्यक्ष मराठा विज्ञान मंदीर अमरावती यांच्याकडे आहेत.

या ग्रंथाला प्रस्तावना सुधाकर मोहड यांनी लिहिली आहे. प्रस्तावना प्रदीर्घ असून एक स्वतंत्र पुस्तक होऊ शकते. २१० पृष्ठांची प्रस्तावनेतून उत्तमराव मोहिते व डॉ. पंजाबराव देशमुख यांचे जीवनचरित्र उलगडून दाखवतात. हा ग्रंथ इ.व्ही. रामस्वामी नायकर 'पेरियार' यांना समर्पण केला आहे. श्री. छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख, पंडित जवाहरलाल नेहरू, पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी, वीर उत्तमराव मोहिते, श्री दौलतराव गोळे, सौ. भाग्यरेखा देशमुख, श्री भाऊसाहेब गुंड आणि शंकरराव इंगोले यांची छायाचित्रे दिली आहेत.

वीर उत्तमराव मोहीते लिखित जागतिक कृषक क्रांतीचा विधाता लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख या ग्रंथात डॉ. पंजाबरावांच्या जीवनाचे वर्णन वास्तविकपणे केले आहे. लेखकांचा परिचय ग्रंथातून होतो. एकूण २७ प्रकरणांमधून व ५३६ पृष्ठातून विषयाची मांडणी केली आहे. प्रकरण एकमध्ये वऱ्हाडचा पूर्वइतिहास दिला आहे. वऱ्हाडचा राजकीय इतिहास सांगून सद्य:परिस्थिती पर्यंत राजकारणाचा आढावा या ग्रंथात घेण्यात आला आहे.

दि. २७ डिसें. १९९८ रोजी शुक्रवारी पंजाबराव देशमुख यांचा जन्म झाला. या दिवशी गीता जयंती होती. म्हणून पंजाबरावांचे व्यक्तिमत्व प्रचंड झाले असे म्हटले जाते. केवळ पंजाबरावच नाही अनेक महान झालेल्या व्यक्तीच्या कुंडलीचा प्रताप दाखवला जातो. ही लेखकाचे कौशल्य असते. जास्तीत जास्त चरित्र ग्रंथात अशी वर्णने मिळतात. पण डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या चरित्रग्रंथात मात्र असे वर्णन नाही आणि असे वर्णन लेखकाला मान्य नाही ते म्हणतात, ''पंजाबराव देशमुख यांचा जन्म झाला त्याच दिवशी त्याच क्षणी आणि त्याच मुहूर्तावर शेकडो बालके जन्माला

आलीत. पण त्यांचे व्यक्तिमत्व मात्र पंजाबरावांएवढे विकसित झाले नाहीत. माणूस मुहूर्ताने मोठा होत नाही तर कर्तृत्वाने व परिश्रमाने मोठा होतो.''[७४] उत्तमराव मोहिते यांना कर्तृत्ववान व्यक्तिमागे असणारी दैवी किंवा ग्रह, नक्षत्र व मुहर्त या अमान्य आहेत. ते डॉ. पंजाबराव देशमुख यांना हाडामासाचे कर्तृत्ववान मानव मानतात. यातून वीर उत्तमराव मोहिते यांचा दृष्टिकोन तटस्थ व वास्तविक असल्याचा दिसतो.

डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जीवनाची सुरुवात वीर उत्तमराव मोहिते नोंदवतात. यात वातावरण कसे लाभले व विद्यालयीन आणि महाविद्यालयीन जीवन कसे जगले याची सविस्तर चर्चा करतात. डॉ. पंजाबराव देशमुख कारंजाला इंग्रजी शाळेत प्रवेश ते इंग्लंडमधील उच्च शिक्षण इथपर्यंतची माहिती देतात. इथे वीर मोहिते एकांगी किंवा पंजाबरावांवरचे प्रेम म्हणून आपला तोल सोडत नाहीत. एकंदरीत परिस्थितीचे वास्तव चित्र आपल्या लेखनीतून उभे करतात. डॉ. पंजाबराव यांच्या घरगुती सवयी, आई, वडील, कुटुंब यांच्या सोबतची संभाषणे अत्यंत बोलक्या शब्दात नमूद करतात. वीर उत्तमराव मोहिते इथे तत्कालीन काळात शिक्षणास उत्तेजन देणाऱ्या छत्रपती शाहू यांचा उल्लेख करून ''या काळातील महाराष्ट्राचा बहुजन समाज अत्यंत अडाणी, निरक्षर, देवभोळा व धर्मवेडा होता.''[७५] अशा परिस्थितीतीत डॉ. पंजाबराव देशमुख शिक्षणासाठी इंग्लंडला निघाले. भारतात ब्रिटिशांविरुद्ध लढा, तसाच महाराष्ट्रात इथे लोकमान्य टिळक व राजर्षी शाहू यांच्या परस्परविरोधी विचाराने महाराष्ट्र ढवळून निघत होता. शेतकरी, कष्टकरी यांची स्थिती वाईट होती. यापासून पंजाबराव अनभिज्ञ नव्हते.

या काळात मराठ्यांची दयनीय स्थिती होती. मराठ्यांची तलवार थंड होती. सर्वदूर पराक्रम करणारा मराठा हताश झाला होता. याबाबत उत्तमराव म्हणतात, ''मराठा म्हणजे जणू काय समाजातील रेडाच बनला. भीमकाय शरीर, मनगटात

---

७४. *मोहिते वीर उत्तमराव, जागतिक कृषक क्रांतीचा विधाता लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख, पृष्ठ – १०.*

७५. *कित्ता, पृष्ठ – ३३.*

रेड्याच्या मानेइतके बळ, विद्येचा गंध नाही, नव्या विचाराचा छंद नाही, गावातील भटजी व जोशी सांगेल तीच त्याची बुद्धी होती. दस्तऐवज लिहिण्याचे काम गावात कुलकर्ण्याशिवाय कोणालाच येत नसे.''[७६] यावरून असे दिसून येते की, गावामध्ये राहणारा मराठा समाज जो तलवारीच्या बळावर नवे राज्य उभा करून सर्वसमावेशक शासन नियुक्त करत होता. तो आज हाताश झाला असून तो सांगकाम्या बनला आहे. डोकं असून चालत नाही अशी अवस्था आहे. बळाने शेती करावी व उत्पनाचे वितरण व वाटप करण्यासाठी डोकं मात्र दुसऱ्याचं आणि त्या उत्पन्नाचा कमीत कमी फायदा त्याचा आणि अन्य उत्पादन अनेक मार्गाने जात असल्याने शेती व शेतकरी दिवाळखोर झाला. शिक्षणाचा गंध नव्हता, शिक्षणापासून समाज दूर होता आणि त्या उत्पन्नाचा कमीत कमी फायदा त्याचा आणि अशा स्थितीत पंजाबराव देशमुख शिक्षण घेण्यासाठी परदेशात निघाले. यामुळे येथील धर्मव्यवस्था, समाजव्यवस्था यांचा अभ्यास त्यांना होता.

शेतकरी कुटुंबाचे काय हाल होतात याची जाणीव देण्याची पंजाबरावांना गरज नव्हती. ''२४ फेब्रु. १९२० रोजी एकशे पाच एकर तीन गुंठे एकशे तेवीस रुपये चार आणे शेतसाऱ्याची जमीन चंदनमल शेटजी जवळ दहा हजार रुपयात शामराव देशमुखाने स्वाक्षरी करून गहाण टाकली.''[७७] या वरून सहज समजते की, शंभर एकर जमीनवाल्याकडे दहा हजार रुपयांची वाण असे. जर शंभर एकरवाल्याकडे दहा हजार रुपयांची वाण असे. जर शंभर एकरवाल्या शेतकऱ्याची ही अवस्था तर सामान्य ५,१० एकरवाल्या शेतकऱ्यांच्या स्थितीचा विचार करता ते स्वत:चे पोट भागवण्यास महाग असतील असे म्हटले तर चुकीचे होणार नाही. म्हणून पंजाबराव देशमुख यांना शेती व शेतकऱ्यांच्या स्थितीचा अभ्यास केला आणि आपण शेतकऱ्याचे शेतमजुरांचे जीवन बदलले पाहिजे असा विचार मनाशी घट्ट झाला होता हे चरित्र लेखकाने दाखवून दिले आहे.

---

७६. *कित्ता, पृष्ठ – ४४.*

७७. *कित्ता, पृष्ठ – ४८.*

ब्राह्मण्याविरूद्ध महाराष्ट्रात संघर्ष सुरू झाला. यामुळे नवयुगाची प्रभात होत होती तर डॉ. पंजाबराव देशमुख यांचे ''वैदिक साहित्यातील धर्माचा उगम व विकास''[७८] या विषयावर पीएच.डी. मिळाली. यात धर्माची परिभाषा व उत्पत्ती सांगून मंत्र व मांत्रिक युगावर प्रकाश टाकला आणि पंजाबरावांनी सांगितले निसर्ग शक्तीची स्तुती हा पुरोहिताचा व्यवसाय आहे. धर्म या संकल्पनेत बौद्ध धर्म बसत नाही. ईश्वरभक्तीचा उगम हिंदी इराणी देवता, ब्राह्मणे आणि अरण्यकांची पैदास देवदेवता कशा उत्पन्न झाल्या? अशा प्रश्नांचा आढावा घेऊन पंजाबराव देशमुख यांनी भारतीय जनतेला स्वत:च्या बळावर विसंबून राहण्याचा सल्ला देऊन कोणी देव–देवता आपली प्रगती करण्यास येणार नाही असे सूचवतात हा विषय चरित्र लेखकाने गंभीरपणे व समजेल अशा भाषेत मांडला आहे.

डॉ. पंजाबराव देशमुख यांचा सामाजिक चळवळीकडे प्रवेश याबाबत प्रकरण सात मध्ये नोंदवतात. वीर उत्तमराव मोहिते यांच्या चरित्रग्रंथामध्ये केवळ पंजाबराव देशमुख यांचे जीवनचरित्र रेखाटतात असे नाही, डॉ. पंजाबराव देशमुख हा प्रमुख विषय आहे. त्याचबरोबर अमरावती व विदर्भाचा इतिहास रेखाटताना दिसतात. त्यांचा हा चरित्रग्रंथ विदर्भाच्या इतिहासावर प्रकाश टाकतो म्हणून हा इतिहासग्रंथ ही आहे. चरित्र म्हटले की कथा व रंजकता यांचे मिश्रण असते व चरित्र लेखक नायकाला सर्वश्रेष्ठ दाखवण्याचा प्रयत्न करतात. पण उत्तमराव मात्र वस्तुस्थिती दर्शक माहिती चरित्रात नोंदवतात. अमरावती शहराला राजकीयदृष्ट्या मोठा इतिहास नाही असे सांगून ''वीर उत्तमराव मोहिते म्हणतात''[७९] पौराणिक वाङ्मयामधून अमरावतीचा संबंध इंद्राच्या राजधानीशी येत असला तरी तो काल्पनिक आहे. रूक्मिणीचे कृष्णाद्वारे अपहरण ही अख्यायिका आहे पण ऐतिहासिक पुरावा नाही. कौडण्यपूरला मात्र इतिहास आहे व अनेक शतकापासून सांस्कृतिक महत्त्व कायम ठेवले आहे असे सांगतात.

यावरून उत्तमराव मोहिते यांच्या लिखाणाची दिशा समजते. केवळ चरित्र

---

७८. *कित्ता, पृष्ठ – ८९.*

७९. *कित्ता, पृष्ठ – १०१.*

असा चरित्रग्रंथ नाही तर चरित्राबरोबर सामाजिक व सांस्कृतिक स्थितीची ऐतिहासिक दृष्टीने मांडणी केली आहे.

डॉ. पंजाबराव देशमुख यांनी इ.स. १९२६ पासून पुढे भारतीय समाज व्यवस्थेत परिवर्तनाच्या दिशेने पावले उचलली. डॉ. देशमुख यांना अपेक्षित असणारा समाज ''Farmers Fourteen points programme''[८०] या पत्रकात दिला. यावरून शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षण ते ही मोफत व शासकीय व सहकारी संस्थेमध्ये ८०% जागा राखून ठेवणे व समस्यामुक्त शेतकरी बनवणे हा त्यांचा हेतू होता आणि यासाठी त्यांचा अभ्यासही झाला होता. याचे कारण वैदिक धर्म व धार्मिक कार्य असल्याने दयनीय शेतकरी झाला. हे पंजाबरावांचे विचार व 'भारतीय तत्त्वज्ञानातील निरिश्वरवाद' हे वीर उत्तमराव मोहिते यांचे विचार एकमेकास पूरक असल्याचे दिसतात. चरित्र नायक व चरित्र लेखक यांच्या वैचारिक जवळीकतेची साक्ष पटते. चरित्र लेखकांचा गुण इथे दृष्टिगोचर होतो. तो म्हणजे चरित्रातील घटना व प्रसंग बोलके उभे करतात आणि सत्य असल्याचे प्रमाण देतात. या पूर्ण ग्रंथातून डॉ. पंजाबराव देशमुख यांनी शेतकऱ्याविषयक भूमिका स्पष्ट केली आहे आणि बहुसंख्य असणारा हा वर्ग वगळून भारताची प्रगती अशक्य असल्याने शेतकऱ्यांचे जीवनमान सुधारण्यासाठी केलेल्या अनेक प्रसंगांची व घटनांची तपशीलवार माहिती देतात व सामाजिक व सांस्कृतिक मूल्य बदलाच्या कार्यात डॉ. पंजाबरावांची भूमिका व कार्य स्पष्ट करतात. ''इंग्लंडमध्ये संस्कृत वाङ्मयाचा अभ्यास करताना क्षणाक्षणाला मला ही जाणीव बोचत होती की, ऋग्वेदातील साध्या सरळ व नैसर्गिक मनाला नंतरच्या बदललेल्या ब्राह्मणी कर्मकांडाने अत्यंत विकृत वळण लावले आहे. पुढील ब्राह्मणी ग्रंथांनी आमची मुळची नैसर्गिक संस्कृती विकृत करून टाकली. या आत्मनिष्ठ स्वार्थी पुरोहितशाहीचा बिमोड करून त्या ठिकाणी स्वभाविक नैसर्गिक मूल्यांची स्थापना करणे मी माझे कर्तव्य समजतो.''[८१]

---

८०. कित्ता, पृष्ठ – १०२.

८१. कित्ता, पृष्ठ – १०२.

समाजाचे निरीक्षण, अनुभव व समाज जीवनाची तत्त्वे देणारा प्रमुख ग्रंथ वेद व वैदिक वाङ्मय यांचा अभ्यास करून डॉ. पंजाबराव देशमुख यांना संस्कृती विकृतीच्या मार्गावर जोरात धावताना दिसली. याला रोखून विकृतीचे वलय काढून मूळ संस्कृती प्रत्यक्ष व्यवहारात आणावयाची होती. निसर्गाकडून शिकणारा माणूस हवा होता आणि त्याच्या नैसर्गिक हक्काची पायमल्ली रोखून ते हक्क त्याला परत देण्याचे प्रयोजन डॉ. पंजाबराव याचे असल्याचे दिसते म्हणून हा चरित्रग्रंथ इतर चरित्र ग्रंथाहून वेगळा आहे. या चरित्राचा नायक व चरित्राचा लेखक यांच्या विचार सरणीत ऐक्य आहे आणि एकाच ध्येयाने प्रेरित असल्याने चरित्रग्रंथाला अधिकच सुलभता, सत्यता, सौंदर्य प्राप्त झाल्याचे दिसते.

या चरित्रग्रंथातून लेखकाने विसाव्या शतकातील सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक स्थिती व त्या संदर्भातील कार्य याचा अभ्यास केला आहे. ते जुन्या समाजव्यवस्थेने नव्याने होऊ घातलेले बदल व जुन्या व्यवस्थेतील समाजजीवन व बदलत्या परिस्थितीतील समाज जीवन यांचा अभ्यास करून होणारे बदल जुन्या व्यवस्थेतील नेतृत्वासाठी लाभदायी आहेत आणि अन्य समाज नव्याने पुन्हा गुलामगिरीत जीवन जगतो यासाठी म. फुले यांचा प्रयत्न महत्त्वाचा मानुन अशा व याही पुढे जाऊन ठोस निर्णय व कार्य करण्याची लेखकाची इच्छा चरित्रग्रंथातून स्पष्ट दिसून येते.

डॉ. पंजाबराव देशमुख समाजक्रांतीच्या रिंगणात उतरतात तेव्हा त्यांना अपेक्षित बदलाची जाणीव तीव्र होते पण यासाठी पावर, सत्ता हाती असणे महत्त्वाचे असते. हा मनातील हेतू चरित्रकार चितारतात व जेव्हा कॉन्सिलकडून मध्यप्रांत–वऱ्हाडचे शिक्षणमंत्री, कृषीमंत्री पर्यंतची वाटचाल व कार्याचा आढावा घेऊन पंजाबरावांच्या शुरत्वाचा विचार करूनच हा आपले नेतृत्व करणारा योग्य सेनापती आहे म्हणून लोकांनी मंत्रीमंडळात पाठवले. आजचे मंत्री व त्यांच्या बैठका ह्या पंचतारांकित हॉटेलात होतात. त्यांच्या पार्ट्या उच्च दर्जाची विदेशी दारू नर्तकीचा नाच, मटन, काजू, बदाम अशा

होतात. लेखक डॉ. पंजाबरावांच्या पार्टीचा उल्लेख करतात. ''अमरावतीतील चांदूरला 'हुर्डापार्टी' झाल्यावर सोनगावकडे निघालेली मंत्र्याची गाडी पाहून कापसाच्या काही बैलगाड्या घाबरून बाजूने दडू लागल्या. एका म्हाताऱ्याला बैलगाडी आवरेना त्याने कशीबशी वाट करून दिली पण पंजाबरावांची गाडी जागीच थांबली आणि पंजाबराव म्हणाले, गंगाराम मामा ओळखलं नाही मला? आहो मी तुमचा भाचा पंजाबराव यावर म्हातारा म्हणाला, बापा पंजाबराव कारे तू? या गंगाराम महाराचा भाचा मंत्री झाला काय रे? बापा याच्यापेक्षा सोन्याचा दिवस दुसरा दिसणार नाही.''[८२]

उपरोक्त विधानावरून सहज समजते की, डॉ. पंजाबराव देशमुख शेतकऱ्यांशी किती आपुलकीने व तळमळीने वागत. त्यांच्या कार्यात नाटकीपणा नसून वास्तव असल्याचे दिसते. एखादं पद मिळाले की, शेती, शेतकरी विसरून जाणारे ढोंगी पुढारी आणि नसानसात शेतकरी कल्याणाचा विचार करणारे डॉ. पंजाबराव मंत्री झाल्यावरही शेतकरी व शेतीच्या गोडीला विसरले नाहीत. मंत्र्याच्या पार्ट्या होत असे पण शेतात जाऊन शेतीतील उभे पीक खाणारा व त्यांचा सामान्य शेतकऱ्याप्रमाणे आनंद घेणारा मंत्री 'हुर्डापार्टीतून' शेतकऱ्याच्या आधुनिकतेकडे नेणारा दृष्टिकोन देतात तर एका सामान्य माणसाला गाडी थांबवून विचारपूस आणि सामान्य माणूस निरपेक्षपणे सोन्याचा दिवस उगवला म्हणतो यातून त्यांची ग्रामीण भागातील शेतकरी, कष्टकरी यांच्या विषयाची तळमळ स्पष्ट दिसून येते व चरित्र लेखक या घटनेला आपल्या लेखणीने जिवंत बनवतो. हा जिवंतपणा देण्यास लेखणी समर्थ का झाली तर नायक व लेखक बहुतांश वेळी सोबत राहायचे महणून चरित्र लेखकाला चरित्र नायकाचा स्वभाव व प्रत्यक्ष जीवन माहित होते व सोबत जगले म्हणून या चरित्रात कल्पनेला थारा नसून वास्तवतेला अधिक महत्त्व आहे. वीर उत्तमराव मोहिते यांनी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या चरित्रग्रंथात पंजाबरावांचे शेतकऱ्याविषयीचे कार्य दाखवून देताना शेतकऱ्यांची स्थिती अत्यंत वास्तविकपणे मानवी मनाचा वेध घेणाऱ्या ओघवत्या

८२. *कित्ता, पृष्ठ – १५६.*

भाषेत उत्तमराव नोंदवतात. तेव्हा दयनीय शेतकऱ्याची स्थिती व त्याचे दु:खमय जीवन चित्ररूपाने समोर उभे राहते. त्यांच्या पुढील उताऱ्यावरून दिसून येते.

''हिंदूस्थानचा शेतकरी खेड्यात राहतो. ग्रामीण व शहरी जीवन यात जमीन आसमानचे अंतर आहे. जगातील कोणत्याही देशातील समाजाची अन्न ही प्राथमिक गरज आहे. ऊन तहान सहन करून कष्ट करणारा शेतकरी संपूर्ण देशाला पोसतो. गायी, म्हशी पाळून दूध दुभते पुरवितो. संपूर्ण देशाला अन्न पुरवणाऱ्या या अन्नदात्याला त्याच्या मोबदल्यात काय मिळते? त्याच्या मुलाला शिक्षणाच्या सोयी उपलब्ध नाहीत. सरकारी कोर्टकचेरीतील कारकुनापासून वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत त्याच्या रक्ताचा संबंध नाही. त्याच्या मुलाबाळाची नौकरीत दाद लागत नाही. एखादे साधे प्रशस्तीपत्र किंवा प्रमाणपत्रही त्याला कोठे मिळत नाही. नागरी व सांस्कृतिक विकासापासून नागवलेल्या ग्रामीण शेतकऱ्याला व त्याच्या मुलाला शासन संस्थेत कोणताही हक्क नव्हता. कोणतीही सवलत नव्हती. साधा शिपाई आपल्या मुलाला विद्यालयीन शिक्षण देतो पण खेड्यात राहणारा ४० एकर शेताचा मालक मुलाला विद्यालयात शिकवू शकत नाही. ''[८३]

वीर मोहिते यांना शेतकऱ्याविषयी असणारी तळमळ स्पष्ट दिसते आणि या तळमळीला वाचा फोडून शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्यासाठी पंजाबराव देशमुख यांचे कार्य महत्त्वपूर्ण असल्याचे लेखक मानतात. शेतकरी व शेती यांची स्थिती सुधारण्यासाठी पंजाबराव देशमुख यांनी जास्तीत जास्त निर्णायक प्रयत्न केले. यातून तत्कालीन शेतकरी याचे चित्र डोळ्यासमोर उभे करण्यात उत्तमराव यशस्वी होतात असे म्हणता येईल. उत्तमराव मोहिते यांच्या लेखनाचा सारांश म्हणजे अध्यात्मिक विचाराने व्यक्तीस गुलाम बनवले आणि धर्म, देव यांचा धाक देऊन मनुष्याचे सत्त्व व स्वत्त्व हरण केले जात. यामुळे समाज दारिद्र्यामध्ये जीवन जगत असे. उत्पादित केलेल्या मालाचे धर्म, देव या नावाने देवळातून जमा होत असे व यावर पुरोहिताची

---

८३. *कित्ता, पृष्ठ – १५८.*

मालकी म्हणून देव व देवळे हे कृषकांचे व सामान्यांचे द्रव्य हरण करणारे आहेत. हरण केलेली संपत्ती देवळरूपी गोदामात एकवटली हे वीर उत्तमरावांनी त्यांच्या लिखानातून अनेक ग्रंथातून स्पष्ट केले आहे. ''डॉ. पंजाबराव देशमुख यांनी इ.स. १९३२ साली मध्यप्रांत वऱ्हाडच्या कायदे कॉन्सील समोर हिंदू देवस्थान बील Hindu Endowment Bill आणले आणि प्रांतातील सारी हिंदू देवस्थाने शासकीय नियंत्रणाखाली आणून त्यांच्या संपत्तीचा उपयोग प्रजेच्या शिक्षण कार्यासाठी व्हावा असा या बीलाचा प्रमुख उद्देश होता.''[८४] यावरून डॉ. देशमुख व वीर मोहिते यांच्या विचारातील साम्य समजते. या बिलाबाबत उत्तमराव मोहिते म्हणतात, बिल पास झाले असते तर देवमंदीराचे रूपांतर विद्यामंदीरात झाले असते. यामुळे देव, धर्म, अध्यात्म नष्ठ झाले असते तर कष्टकरी वर्गाचे काय बिघडले असते या बिलाच्या पास होण्याने नव्या युगाचा नवा माणूस प्रथम या प्रांतात उदयास आला असता, नव्यायुगाची नवी मूल्य आली असती पण तसे झाले नाही याचे दु:ख व्यक्त करतात. ''कर्जलवाद विधेयक''[८५] मंजूर होण्याची आवश्यकता स्पष्ट करतात व हा खऱ्या अर्थाने कृषक ऋणमुक्तीचा कायदा असल्याचे स्पष्ट करतात.

चरित्र लेखक या ग्रंथातून चरित्र नायकाबरोबर तत्कालीन परिस्थिती व सामाजिक जीवन, राजकीय घडामोंडीवर टिप्पणी करतात. उत्तमराव मोहिते यांनी केवळ ब्राह्मणांचा विरोध केला असे नाही तर जीवन व्यवहारात अडथळा निर्माण करणाऱ्या व्यवस्थेचा विरोध करतात. ब्राह्मण जातीचा नाही. यात अडथळा निर्माण करण्याच्या बाबींना ब्राह्मण जवळ बाळगून त्याचा प्रसार करतात म्हणून ते ब्राह्मणावर रागावल्यास त्यांचा द्वेष करतात असे वाटू शकते पण त्यांना सत्य व विकास हवा असल्याने व्यवस्था नीट समजून न घेता जनहिताच्या कार्यात पडलेल्यांना ते सतत फटकारताना दिसतात. वीर उत्तमराव म्हणतात, ''केवळ ब्राह्मण जातीच्या विरोधातच ब्राह्मणेत्तर पक्ष आहे; ही अर्धवट कल्पना त्या वेळच्या ब्राह्मणेत्तर पक्षातील पुढाऱ्यांनी

८४. *कित्ता, पृष्ठ – १५९.*

८५. *कित्ता, पृष्ठ – १७१.*

उराशी बाळगली. ब्राह्मण जातीपेक्षा ब्राह्मणी धर्माने जे जहर हिंदू संस्कृतीला पाजले; ते समूळ नष्ट करण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी ब्राह्मणेत्तर पक्षाला जन्म दिला.''[८६] यावरून लेखकाचा निरपेक्ष दृष्टिकोन समोर येतो. मानवातील ठराविक एका मानवसमुहाशी त्यांचा कसलाच द्वेष नव्हता व तसे लिखाण ही ते करत नाहीत पण ब्राह्मी धर्मानुसार होणारी पिळवणूक थांबावी अशी त्यांची प्रामाणिक इच्छा आहे पण तसे न होता पिळवणूक पुढे चालू राहिल्याने ते टोकाची भूमिका घेताना दिसतात व इथेच ते रागावल्यासारखे किंवा रागावलेले दिसतात पण उपरोक्त विधानावरून ते मूळ समस्येकडे वळतात व एखाद्याच्या विधानाचा कविपर्यास करत नाहीत. त्यांचा स्वाभाविक गुणधर्म आहे. विकृतीवर सडेतोड कोणालाही न घाबरता लिहितात. यातून ते एक अशी समताधिष्ठित संस्कृती निर्माण करण्याचा विचार देतात. यात त्यांना डॉ. पंजाबराव देशमुख त्या मार्गावर चालताना दिसतात म्हणून असे विचार व कार्य सर्वज्ञान झाले पाहिजे म्हणून त्याच्यावर लिहितात. म्हणूनच पंजाबरावांबाबत वीर उत्तमराव म्हणतात, ''उपेक्षितांची नि:शुल्क वकिली करणारा बॅरिस्टर''[८७] असे संबोधतात. यातून सामन्याविषयी व त्यांची स्थिती बदलण्यासाठीची तळमळ समजते.

वीर उत्तमराव मोहिते या संपूर्ण ग्रंथात तठस्त राहतात. डॉ. पंजाबराव देशमुख यांच्याशी जवळीकता असताना सुद्धा त्यांचे उदात्तीकरण किंवा गौरवीकरण यात न गुंतता त्यांच्या कार्याची ओळख तत्कालीन परिस्थितीच्या कालमापनाने करून देताना विचलीत होत नाहीत. एवढेच नाही तर अपूर्ण माहिती सांगण्याचे टाळतात व टाळणे शक्य नसेल तर जेवढी आहे तेवढी देतात. म्हणून वीर मोहिते लिखित चरित्र ग्रंथ हा इतिहास ग्रंथ ठरावा हे त्यांच्या पुढील विधानावरून समजते. ''वऱ्हाडच्या इतिहासात अमरावती शहराला राजधानीचा मान कधीच नव्हता. तरीही वऱ्हाडचे लोक अमरावतीला वैदर्भी रीतीच्या सांस्कृतिक राजधानीचा मान देतात हा मान कसा प्राप्त

---

८६. *कित्ता, पृष्ठ – १७७.*

८७. *कित्ता, पृष्ठ – १८०.*

झाला; हे सांगता येत नाही.''[८८] यावरून स्पष्ट होते की, उत्तमराव मोहिते यांना ऐतिहासिक दृष्टी व इतिहास लेखनातील तठस्तता, वस्तुनिष्ठता व सत्यकथन बाबी चांगल्या माहीत असून, त्यांच्या स्वभावाचा गुणधर्म या बाबी असल्याचे दिसते.

कष्टकरी समाज देशाचा कणा असतो. शेतकरी व कष्टकरी यावर देश अवलंबून असतो. पण जिथे शरीर श्रमाचा त्याग केला जातो व ज्या समाजात श्रमवृत्ती राहात नाही तो काळाबरोबर टिकत नाही. हा आजपर्यंतचा इतिहास सांगतो आणि जर या श्रमिक , कष्टकरी, शेतकरी वर्गावर संकटे असतील तर ते सोडवण्याचा प्रयत्न शासनाचा असतो पण जेव्हा शासन याकडे दुर्लक्ष करते तेव्हा देशाचा, समाजाचा विनाश होत असतो. विनाशापासून वाचवण्यासाठी डॉ. पंजाबराव प्रयत्नशील असल्याचे लेखक सांगतात व या कार्यात डॉ. पंजाबरावांना प्रखर विरोधास तोंड द्यावे लागते. अशा प्रतिकूल परिस्थितीतील लढा उत्तमराव आपल्या लेखणीने उकलतात तेव्हा पंजाबरावांना कोणाचा विरोध हा प्रश्न पडतो तेव्हा लेखक म्हणतो, ''साऱ्या प्रतिगामी शक्ती विरोधात एकवटल्या.''[८९] यावरून पंजाबरावांच्या पुरोगामी विचाराला तत्कालीन परिस्थितीत प्रतिगामी जो देव, धर्म, अध्यात्म जुने कायदे कालबाह्य झाले तरी ते देववाणी म्हणून उपयुक्त ठरतात व पवित्र मानून जीवन व्यवहाराचे नियंत्रण करण्यासाठी अशा विचाराचे समर्थन करतात. जे आज उपयुक्त ठरत नाहीत उलट अडसर ठरतात. या सर्व शक्तीला पंजाबराव देशमुख यांनी आपल्या हिंमतीने एकाकी लढताना दाखवतात. वीर मोहिते म्हणतात, ''डॉ. पंजाबराव जी विधाने करीत ती काल्पनिक नसून वस्तुस्थितीचे यथार्थ दर्शन असे आयुष्यभर त्यांच्या भाषणात कल्पना विलास कधीच दिसला नाही.''[९०] यावरून पंजाबराव यांना वास्तवाचे चांगले भान असून सत्य परिस्थितीपासून ते पाठ फिरवत नाहीत. ते सत्य तत्त्वावर कार्य करणाऱ्यांना प्रोत्साहन देतात. त्यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहून एक मजबूत फलटन निर्माण करण्याचा प्रयत्न करतात.

---

८८. *कित्ता, पृष्ठ – २०१.*

८९. *कित्ता, पृष्ठ – २०६.*

९०. *कित्ता, पृष्ठ – २१०.*

या चरित्रग्रंथातून एक बाब स्पष्ट करावी वाटते ती म्हणजे चरित्रनायकाच्या भोवती स्तुतीपाठकांची संख्या नाही. एक नाही दोन नाही त्यांना स्तुतीपाठक नव्हता. नायकाजवळचा मित्र परिवार नायकासारखा परखड व वास्तववादी होता. म्हणूनच सर्व समविचारी एका विचाराने लढा देतात. या ग्रंथाचा लेखक असाच वास्तवाचे भान असणारा असल्याने चरित्रामध्ये कल्पनाविलास न होता वास्तवचित्रण करण्याचा प्रयत्न केला. म्हणून आज पर्यंतच्या चरित्र ग्रंथातील इतिहासाजवळ नेणारा किंवा ऐतिहासिक कसोटीवर उतरणारा कदाचित पहिला चरित्रग्रंथ असावा असे म्हटले तर चुकीचे होणार नाही.

जसा बहुजन समाज, शेतकरी, कष्टकरी, वंचित यांना सुधारण्याची तळमळ असणारा खंबीर राजकीय नेतृत्व डॉ. पंजाबराव होते. तसेच सामाजिक व धार्मिक चालीत बदल झाल्याशिवाय खऱ्या अर्थाने विकास साध्य होणार नाही म्हणून या बदलासाठी इतिहासात कारणे शोधणारे उत्तमराव मोहिते सत्य शोधताना म्हणतात, वरिष्ठ वर्गाने कधी सामान्यजणांचे महत्त्व मान्य केले नाही. जर बहुजन समाजात कर्तृत्ववान व्यक्ती उदयास आली तर त्याला देवाचे व धर्माचे वलय लावले नाही तर त्याचा मार्गदर्शक वरिष्ठ ठरवला असा सिद्धांत मांडून महाराष्ट्राच्या इतिहासात अशा घटनेकडे लक्ष वेधतात. तेव्हा ''शिवाजी रामदास यांचा वाद''[९१] व यातील वीर उत्तमरावांच्या भूमिकेचे समर्थन डॉ. पंजाबराव करतात. इथे लेखकाच्या धाडशी व अभ्यासू वृत्तीचे दर्शन तर घडतेच पण अशा धाडशी व्यक्तींना सहकार्य लाभले तर देशाची स्थिती सुधारू शकते. म्हणून पंजाबराव देशमुख खंबीर साथ देतात. यामुळे लेखक व चरित्रनायक समकालीन सोबत कार्य करणारे असल्याने घटना व प्रसंगाचा स्वत: लेखक साक्षीदार असल्याने हा चरित्रग्रंथ केवळ चरित्र न राहता इतिहास ग्रंथ व इतिहासाचे साधन बनतो.

वीर उत्तमराव मोहिते डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या कार्यावर या ग्रंथातून

---

९१. *कित्ता, पृष्ठ – २२२.*

प्रकाश टाकतात. तेव्हा स्वत:चे कार्य ही स्पष्ट करतात. कारण त्यांना तसे करणे अपरिहार्य आहे. त्यांच्या कार्यात डॉ. देशमुख यांचा सहभाग असल्याने आधुनिक भारताच्या निर्मितीत जशी डॉ. पंजाबराव देशमुख यांची भागीदारी आहे तशी वीर उत्तमराव मोहिते यांचा आधुनिक भारताच्या निर्मितीला भक्कम आधार आहे. महाराष्ट्राच्या संदर्भाने ''मराठा मागास असून महाराष्ट्रात समाज क्रांतीची मशाल मराठा नेतृत्वाने घेतल्याशिवाय खरेखुरे परिवर्तन घडून येत नाही.''[९२] यातून सामाजिक सुधारणेत स्वयंप्रेरणेने जोपर्यंत मराठा समाज परीवर्तनशील भूमिका आचारणात व विचारात ठेवत नाही तोपर्यंत परिवर्तन अशक्य हे विधान आजही सत्यता पटवून देते.

भारतीय स्वातंत्र्य लढा या ग्रंथातून स्पष्ट करण्यात आला आहे. या लढ्यातही सामान्य समाजाची भारतीय बहुसंख्य जनांची दुहेरी पिळवणूक होत असे. एक येथील वरिष्ठ वर्गाकडून होणारी व दुसरी ब्रिटिशांकडून होणारी म्हणून भारताच्या स्वातंत्र्यासंदर्भात दुहेरी स्वातंत्र्य मिळाल्याशिवाय खरे स्वातंत्र्य नाही असा लेखकाचा मनोमन व कृतीयुक्त विचार असल्याचे दिसते. इंग्रज सत्याग्रहींशी भेदात्मक वागताना इथे इंग्रजांची निती स्पष्ट करतात. ''तळातील सत्याग्रहींना झोडून काढायचे आणि उच्च स्तरातील पुढाऱ्यांना जपून वागवायचे असा दुहेरी मापदंड इंग्रज सरकारने ठेवला होता.''[९३] असे भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासावर प्रकाश टाकून शेवटच्या घटकाचा विचार वीर उत्तमराव मोहिते करतात.

महाराष्ट्रातील 'मराठा' व 'दलित' यांच्यातील तिरस्काराचा प्रश्न उपस्थित करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या या नामकरणासाठी मराठवाड्याची अस्मिता जाते असा विचार प्रबळ होतो. हा तिरस्कार मुळातला नसून 'मराठा' व 'दलित' यांच्यात तो निर्माण केलेला आहे असे सांगताना उत्तमराव मोहिते म्हणतात, ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मराठ्यांचे नाहीत? हा लोकोत्तर माणूस मराठी मुलुखात जन्माला आला हा मराठ्यांचा अभिमान नाही? बडोदा नरेश सयाजीराव

९२. *कित्ता, पृष्ठ – २६१.*

९३. *कित्ता, पृष्ठ – २५१.*

गायकवाड आणि राजर्षी शाहू महाराजांनी उत्तुंग उंचीचा पुरुष निर्माण केला. याचा अभिमान आजच्या मराठ्यांना नाही? भारताच्या इतिहासात दलित समाजाची गुलामगिरी नष्ट करण्याचे काम प्रथम मराठ्यांनीच केले.''[९४] असा निर्वाळा देतात आणि 'दलित मराठा' यांच्यात वाद नसून वर्णश्रेष्ठत्वाच्या दंभाने जाणीवपूर्वक पेटवला तो मराठा जातीच्या मारेकऱ्यांनी, म्हणून यातील सत्याची जाणीव समाजाला करून देण्यासाठी मोहिते प्रयत्नशील राहताना दिसतात.

उपरोक्त आशयावरून वीर उत्तमराव मोहिते यांना 'समाजक्रांती' महत्त्वाची वाटते. कारण सर्व बाबी अर्थ, धर्म, राजकारण, संस्कृती या समाजावर अवलंबून असतात. जर समाजच विकृत असेल तर सर्वच बाबीमध्ये विकृती येते म्हणून भारताच्या स्वातंत्र्यासाठी दुहेरी लढा महत्त्वाचा मानून समाजक्रांतीची आवश्यकता मांडतात. ते म्हणतात, ''जगाच्या इतिहासात समाजक्रांतीच्या कल्पना विद्यापीठातील महापंडितांच्या डोक्यात जन्मल्या नाहीत. समाज क्रांतिकारक जन्माला आलेत समाजाच्या तळातील बुध्दिमान स्तरातून. बुकर टी वॉशिंग्टन, मार्टिन ल्युथर व जोतिराव फुलेंचा जन्म ब्रह्मदेवाच्या तोंडातून अथवा विष्णूच्या बेंबीतून झाला नाही. समाजाच्या ज्या स्तरात दु:ख, दारिद्रय व त्याचे दुष्परिणाम ज्या अंतकरणात प्रतिबिंबीत होतात तेथे समाज क्रांतीची आग पेट घेते म्हणून समाज परिवर्तन घडून यावयाचे असेल तर तळातील कष्ट करणाऱ्या समाजातच उच्च शिक्षणाची सोय होणे आवश्यक असते.''[९५] एकंदरीत जगाच्या इतिहासाचा अभ्यास करून वीर मोहिते भारतीय स्थितीचे परीक्षण करतात आणि शेवटच्या घटकाचा विचार करतात. त्यांचे हे लिखाण नव्या समाजनिर्मितीस उपयुक्त आहे. लेखनाची दिशा वंचित इतिहास लेखनाकडे जाते असे म्हटले तर योग्य व्हावे.

इतिहासाचा प्रवाह एका माणसाच्या इच्छेप्रमाणे बदलत नाही. समाजात क्रांतिकारक बदल घडवून आणण्यासाठी प्रथम समाज तयार करावा लागतो. तेव्हाच

---

९४. *कित्ता, पृष्ठ – ३५२.*

९५. *कित्ता, पृष्ठ – ३५६.*

नेतृत्वाचे श्रम व क्षण कारणी लागतात. इथे समाज तयार करण्याचे काम उत्तमराव मोहिते करतात तर त्याचे नेतृत्व डॉ. पंजाबराव देशमुख असे म्हणता येईल. यासाठी वीर उत्तमराव मोहिते ''राजर्षी शाहूच्या पाऊलवाटेवर सडक बनवण्याचा प्रयत्न करतात''[९६] आणि असा समाज जो मनाने तयार झाला की त्याला त्याच्या कार्याला योग्य वळण देता येते असे कार्य झाल्यावर बहुसंख्य समाज ज्या प्रमुख शेतीवर अवलंबून आहे त्याची योग्य व्यवस्था झाली की वैचारिकतेबरोबर आर्थिक असा विषय उत्तमरावांचा विचार असल्याने ते इथे ''जागतिक कृषी प्रदर्शनाचा वैभवशाली सोहळा''[९७] स्पष्ट करतात. यात डॉ. पंजाबराव देशमुख आग्रस्थानी राहून कृषक परिवर्तनाच्या कार्याला वेग दिला. म्हणून त्यांच्या कार्याला उजाळा व त्यांच्यापासून मार्गदर्शन मिळवण्यासाठी ''डॉ. पंजाबरावांचा हीरक महोत्सव आणि जागतिक संघटनांचे नेतृत्व''[९८] स्पष्ट करतात आणि स्वत: कार्यशील राहून विशेष लक्ष व प्रमुख स्थान घेऊन कार्य करतात. यामुळेच डॉ. पंजाबराव देशमुख वीर उत्तमरावांबाबत म्हणतात, ''वीर उत्तमराव मोहित्यांची सामाजिक व सांस्कृतिक, क्रांतिसाठी सारखी धडपड चालू आहे. त्यांना माझा संपूर्ण पाठिंबा आहे.''

उपरोक्त विधानांचा विचार करता नायक व लेखक दोघांनी सोबत कार्य केले आहे. दोघांना अपेक्षित असणारे कार्य सामान्यांचा विकास हे आहे. एकमेका साहाय्य करून ध्येयाकडे पोहोचण्याचा प्रयत्न करतात आणि चरित्र नायक व चरित्र लेखक या दोघांना अपेक्षित असणारे मानवी जीवन स्पष्ट करतात. हे करताना मानवी जीवन भ्रामक, दिशाभूल, अंधश्रद्धा या बाबींपासून दूर ठेवून ''मानवी जीवनाची वैज्ञानिक क्रांतिकारी मूल्ये मांडतात''[९९] या मूल्यावर आधारित समाजाची रचना करून कल्पनेला तिलांजली देऊन वास्तवाचे भान असणाऱ्या संस्कृतीची मूल्ये रुजण्याची आवश्यकता

---

९६. *कित्ता, पृष्ठ – ३९६.*

९७. *कित्ता, पृष्ठ – ४१२.*

९८. *कित्ता, पृष्ठ – ४३०.*

९९. *कित्ता, पृष्ठ – ४८०.*

प्रतिपादन करून ''सांस्कृतिक परिवर्तनाची संकल्पना स्पष्ट करतात.''[१००] काल्पनिक मूल्यांची होळी करून समाजाला वास्तवता शिकवतात हा वीर मोहिते यांचा प्रयत्न भारताच्या इतिहासातील पहिला प्रयत्न मानता येईल.

एकंदरीत वीर उत्तमराव मोहिते लिखित जागतिक कृषकक्रांतीचा विधाता लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जीवन कार्याचा परिचय परिवर्तन व वैज्ञानिक दृष्टिकोनातून करून देतात. तसेच या ग्रंथात अनेक व्यक्तिरेखा व त्याच्यावर प्रकाशही टाकण्यात आला आहे. म्हणून हा ग्रंथ केवळ डॉ. पंजाबरावांचे चरित्र नव्हे चरित्राबरोबर विदर्भ, महाराष्ट्र व भारत यात चित्रित केला आहे. उत्तमराव मोहिते यांनी पंजाबराव देशमुख यांच्यावरची अनेक ग्रंथ अभ्यासले पण त्यात त्यांना संपूर्ण पंजाबराव दिसले नाहीत म्हणून त्यांनी हा ग्रंथ लिहिला.

वीर उत्तमराव मोहिते यांनी प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध युद्ध पुकारले व विज्ञान यज्ञावेळी कर्मकांड, बुवाबाजी, अध्यात्मिक ढोंग, चमत्कार, देव या मानवातील मानवता तोडणाऱ्या वैदिक धर्माचे दहन केले. वीर मोहिते यांचे विचार जहाल, करारी व टोकाचे वाटतात. पण यातील मतितार्थ अत्यंत मऊ व समाजहीताचा, मानवतेचा संदेश देणारा आहे. पण ''वीर मोहिते वरिष्ठ वर्गात जन्माला आले असते तर सर्व महापंडित त्यांना डोक्यावर घेऊन नाचले असते. त्यांच्यावर उलट सुलट लिहिण्याचे कोणत्याही भारतीय महापंडिताने धाडस केले नाही'' असे शंकरराव इंगोले म्हणतात. यावरून त्यांच्या विचाराची पक्वता समजते. भाऊ भालेराव त्यांच्या या ग्रंथास 'एक प्रचंड संदर्भ ग्रंथ' असे म्हणतात. खरोखरच हा ग्रंथ ग्रामीण समाजासाठी ज्ञानकोष ठरावा. त्यांना देवद्रोही व धर्मद्रोही म्हटले पण मानवता, समता, बंधुभाव निर्माण करण्यासाठी वैज्ञानिकतेचा स्वीकार करणाऱ्याला असे अनेकदा म्हटले आहे. कल्पनेत वावरणाऱ्यांना वास्तवाची जाण करून देणे, मानवी सुखाचा मार्ग सांगणे, मानवाला एक मानवता सूत्रात बसवणे. यासाठी त्यांना देवद्रोही व धर्मद्रोही म्हटले जाते. या सर्व

---

१००. कित्ता, पृष्ठ – ५१३.

बाबी नाकारणारा तो सात्विक व अध्यात्मिक असे सात्विक होणे उत्तमराव मोहिते यांना केव्हाच पचले नाही. त्यांनी संपूर्ण आयुष्य समाजासाठी खर्च करून भारतीयांच्या अधोगतीचा अचूक अंदाज घेतला आहे. सनातन्यांची वरवरची टीका असून उत्तमराव मोहिते यांनी सोबत चर्चा करण्यास अनेकवेळा परंपरावाद्यांना बोलावले पण कोणीही आव्हान स्वीकारले नाही. उलट चर्चा करताना अनेकांनी पलायन केल्याचे दिसते.

या ग्रंथातून उत्तमरावांचे वैचारिक श्रेष्ठत्व दृष्टीस येते. ते आत्मविश्वासू होते. त्यांचा अभ्यास या पाठीमागे असल्याचा दिसतो. वीर मोहिते वास्तवाचे भान असणारे संयमी व तठस्थ लेखक असल्याने सूड भावनेने लेखणी चालवत नाहीत. त्यांच्या प्रत्येक परिवर्तनवादी विचाराला कारण परंपरा व ती का केली याची मीमांसा वैज्ञानिक दृष्टिकोनातून त्यांनी केली आहे.

या ग्रंथातून उत्तमरावांची शैली खास त्यांची विशेष आहे. त्याचबरोबर मुन्सी प्रेमचंद, कपील, चार्वाक यांची छाप ही दिसून येते. हा ग्रंथ म्हणजे एक विचार किंवा एका व्यक्तीचे चरित्र एवढ्यापुरता मर्यादित न राहता यातून ''उत्तमराव मिशन'' असल्याचे दिसते.

या ग्रंथाचे प्रस्तावनाकार चरित्र ग्रंथाकडे व चरित्र नायक व लेखक यांना पाहून त्यांच्या मुखावाटे उत्स्फूर्तपणे सहज उद्‌गार निघतात, ''हा सूर्य आणि हा सूर्यप्रकाश'' यातून पंजाबराव व उत्तमराव यांच्यातील विचारात्मक, कार्यात्मक, सहवासातून एकजीव झालेले दिसतात असे म्हटल्यावर गौरवीकरण केल्यासारखे वाटेल पण जेव्हा डॉ. पंजाबराव देशमुख यांची स्तुती याला स्तुती म्हणता येणार नाही. यास हकीकत ती स्तुतीकरण्यास योग्य होते. तसेच मानव म्हटला की परिपूर्ण नसतो तसे डॉ. पंजाबराव यांना केव्हा केव्हा सिगारेट ओढण्याची सवय असल्याचे वीर मोहिते ग्रंथात नमूद करून आपला तोल राखल्याचा व तटस्थतेचा पुरावा मिळतो.

वीर उत्तमराव मोहिते यांचा हा ग्रंथ ऐतिहासिक कसोटीवर ठेवला तर प्रमाणशीर उतरतो आणि इतिहासाच्या सबाल्टर्न उपेक्षित, वंचित इतिहास लेखनाशी त्यांचा संबंध

असल्याचे दिसते. तसे उत्तमराव राष्ट्रवादी ही आहेत पण आधुनिक काळात निर्माण झालेल्या राष्ट्रवादापेक्षा वेगळा दृष्टिकोन त्यांना अपेक्षित आहे. राष्ट्रवादात सर्वसामान्यांचा समावेश असणे गरजेचे आहे. आधुनिक काळातील राष्ट्रवाद उच्चवर्णीय यांच्या मानसिक व वैचारिकतेतून निर्माण झाला आहे असे मानतात. मार्क्सवादाचा चांगला अभ्यास असल्याने भारतात त्यांची आवश्यकता असल्याचे स्पष्ट ही करतात. राष्ट्रवाद, सबाल्टर्न, मार्क्सवाद या विषयाबरोबर मानवतावाद, वास्तववाद यांचाही विचार येतो हे सर्व विचार भौतिकवादात समाविष्ट होऊ शकतात. त्यामुळे भौतिकवादी इतिहास लेखनाच्या प्रवाहात समाविष्ट होऊ शकते.

४.९ CULTURAL RENAISSANCE

वीर उत्तमराव मोहिते यांनी जो मराठा विज्ञान मंडळाच्या वतीने सांस्कृतिक सप्ताह सुरू केला. मराठा विज्ञान मंडळाने केलेल्या सांस्कृतिक कार्याची नोंद 'Cultural Renaissance' या ग्रंथात घेतली आहे. हा ग्रंथ एकूण ७२ पृष्ठांचा आहे. मराठा विज्ञान मंडळ यांनी प्रकाशित केला आहे. तो शिवाजी प्रिंटीग प्रेस अमरावती येथे मुद्रीत एल.एम. देशमुख यांनी केला. हा ग्रंथ छत्रपती शाहू महाराज यांना अर्पण करण्यात आला आहे.

CULTURAL RENAISSANCE या ग्रंथाची पहिली सात पृष्ठे सांस्कृतिक सप्ताहात आलेले संदेश दिले आहेत. Brief Report of the culture week – १९५८ याची माहिती पृष्ठ ८ ते १० पर्यंत दिली असून पृष्ठ ११ ते १८ पर्यंत Welcome Address दिला असून श्री.ग.त्र्यं. माडखेलकर संपादक तरूण भारत यांचे भाषण १९ ते २३ पृष्ठांपर्यंत दिले आहे. तमाशा परिषदेचे अध्यक्षीय भाषण बांधकाम मंत्री–मुंबई राज्य नामदार डी.एस. देसाई यांचे भाषण दिले ते पृष्ठ २४ ते २६.

पृष्ठ २७ पासून Cultural Fair 1959 चे Messages २९ पर्यंत आणि ३० पासून ३४ पर्यंत दिले आहेत. पृष्ठ ३५ पासून ३९ पर्यंत वीर उत्तमराव मोहिते यांचे

भाषण देण्यात आले आहे. पृष्ठ ४० पासून Cultral Fair, 1960 चे Messages दिले ते ४१ पर्यंत. पृष्ठ ४२ पासून the Vidarbha Warkari Conference, 1960 संदर्भात ४५ पर्यंत माहिती दिली आहे. ४६ ते ४९ पृष्ठात डॉ. पंजाबराव देशमुख हीरक महोत्सवाबाबत असून ५० ते ५३ लोकक्रांतीचा पोवाडा दिला आहे. यानंतर भूपाळी ५४ व ५५ पृष्ठांवर आहे.

The Warkari confernce 1961 पृष्ठ – ६९ ते ७२ पर्यंत आहे व भैरवी असे एकूण ग्रंथाचे स्वरूप आहे. मुखपृष्ठाच्या मागील बाजूस राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे उत्तमराव मोहिते यांना आलेले पत्र दिले आहे.

वीर उत्तमराव मोहिते यांनी या ग्रंथात मराठा विज्ञान मंडळ अमरावतीच्या माध्यमातून घेण्यात आलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांचा आढावा घेतला आहे. यात त्यांनी तमाशाचे ऐतिहासिक कार्य स्पष्ट केले आहे. लोकसंस्कृती बाबत म्हणतात, ''अन्न संपादन, प्रजोत्पादन आणि स्वरक्षण हे तीन प्रधान विकार आहेत. या विकारांना समाज जीवनासाठी योग्य वळण देणे हेच लोकसंस्कृतीचे मूल प्रयोजन आहे.''[१०१] समाजात मात्र वैचारिक गोंधळ सतत सुरू आहे. या तीन विकारांबरोबर अन्य विकारांची योग्य ठेवण कशी करायची याबाबत सद्‌गुण व दुर्गुण यांचा झगडा चालताना दिसतो. निसर्ग नियमन व त्यावर आधारित नैसर्गिक जीवन हा सद्‌गुण आहे पण निसर्गाच्या नियमांकडे दुर्लक्ष करून ठराविक समुहाच्या फायद्यासाठी केलेले नियम हा दुर्गुण आहे. एखादे साहित्य निर्माण करताना ताणून निर्माण करणे व सहज निर्माण करणे असा प्रकार दिसतो.

आधुनिक काळात अनेक कवी, साहित्यिक एकांत लाभावा, वातावरण निर्माण व्हावे म्हणून ठराविक ठिकाणी लिहितात. पण असे लेखन आहे जे काम करत करत सहजपणे आपल्या मुखावाटे जे बाहेर पडते. हे नैसर्गिक पद्धतीचे काव्य अथवा साहित्य असते. वीर मोहिते म्हणतात, ''अभंग आणि लावणी मानवी मनाचा नैसर्गिक

---

१०१. Mohite Veer Uttamrao, Cultural Renaissance, Page no. 35

अविष्कार होय असे सांगून अभंग व लावणीच्या कार्याबाबत म्हणतात साहित्यात वैदिक कल्पनावादाच्या गुलामगिरीविरूद्ध बंड पुकारण्याचे काम अभंगाने केले तर त्याच सैतानी सामर्थ्यावर आक्रमण करून अध्यात्मवादाला पराभूत करण्याचे कार्य लावणीने केले.''[१०२]

वीर मोहिते लावणी ही शुद्ध व चारित्र्य संपादन असून कर्मकांड, ढोंग, अध्यात्मावर हल्ला करून मानवी समाजाला नैतिक मार्ग दाखवणारी असताना तिची साहित्यिक उपेक्षा झाली. कारण, साहित्यामध्ये ब्रह्मवादी विचारांचे प्राबल्य वाढल्याने शेतकऱ्याच्या सामान्याच्या ऱ्हदयाची बोली बोलणारी लावणी वंचित राहिली. काबाडकष्ट करणाऱ्या कष्टाळूंच्या कार्यातून त्याला नव प्रेरणा देऊन समृद्धीकडे नेणाऱ्या आणि वीर रसातून कर्तृत्ववान मानसिकतेची पेरणी करणाऱ्या लावणी व पोवाडा मराठी मातीत मराठी माणसाचे सौंदर्य व कर्तृत्व होते. हे सौंदर्य व कर्तृत्व गडप झाले आणि या ऐवजी मानसिक व शारीरिक गुलाम बनवणारे तत्त्वज्ञान आले. मग मुळचे हे विचार कुठे गेले. या संदर्भात वीर मोहिते म्हणतात, ''मराठ्यांनी याचा संग्रह करून ठेवला नाही हा दोष समशेर बहाद्दरांचा नसून लेखणी बहाद्दरांचा आहे.''[१०३]

वीर मोहिते यांनी महाराष्ट्राच्या साहित्यिक क्षेत्रामध्ये लोकांच्या भावभावना ज्या लोकबोलीतून व्यक्त झाल्या त्या सहज निघालेल्या वास्तविक भावना काळाच्या ओघात नष्ट झाल्या. याला कारण या भावना ज्यांच्या होत्या त्यांच्या हातात तलवार असून ते आपले काम चोखपणे करत पण या केलेल्या कार्याची नोंद घेण्याचे कर्तव्य लेखणीवाल्यांचे असल्याने आणि लेखणीवाला ब्रह्म विद्येच्या नादी लागल्याने आणि ब्रह्मविद्या आणि वास्तवता यांच्यात तफावत असल्याने लेखणीवाल्यांनी लोक कलेचा नायनाट साहित्यातून केला. पण हीच लोक कला मानवी मनाचा वेध घेऊन प्रगतीस न नवनिर्मितीस वळण देणारी असते आणि अध्यात्म कुचकामी असून जीर्णतेकडे

---

१०२. कित्ता, पृष्ठ – ३५.

१०३. कित्ता, पृष्ठ – ३७.

समाजाला घेऊन जाते. म्हणून अध्यात्मासी सामना लावणी करते आणि अध्यात्मिक गुलामगिरीत अडकलेल्यांना मार्ग मोकळा करते.

महाराष्ट्राच्या इतिहासात लोक कलेचे महत्त्व प्रतिपादन करताना वीर मोहिते म्हणतात, ''लोक कलेचा उपयोग लोक शिक्षणासाठी झाला पाहिजे हा दावा मराठ्यांच्या इतिहासात छत्रपती शिवरायांनीच पुरा केलेला दिसतो. तानाजी मालुसरे हा छत्रपती शिवरायांच्या दरबारात लोकशाहीर म्हणून चमकला. तर शाहू महाराजांनी तमाशा हे लोक शिक्षणाचे पवित्र व्यासपीठ वनविले.''[१०४] अशा पद्धतीने वीर उत्तमराव मोहिते यांनी सांस्कृतिक कार्यक्रमात लोप पावत जाणाऱ्या संस्कृतीला उजाळा देऊन लोककलेविषयी निर्माण झालेला गैरसमज दूर करून लोककला हे प्रभावी शिक्षणाचे, प्रबोधनाचे व आत्मउन्नतीचे खरे साधन असते हे दाखवून एखादे राज्य निर्माण करण्यात व निर्मित राज्यात समृद्धी व भरभराटी आणण्यास लोककला महत्त्वाची असते. असे सांगून गूढ वादात गुंतून पडलेल्या व स्वत्त्व आणि आत्मभान हरवलेल्या जीर्ण सामाजिक मानसिकतेला चेतना देऊन नव महाराष्ट्राच्या वाटचालीत नाविन्य आणण्याचे कार्य केले असे म्हणता येईल.

मराठा विज्ञान मंडळ अमरावतीच्या माध्यमातून २०–२७ डिसेंबर १९६० जो सांस्कृतिक सप्ताह आयोजित केला. त्यात वारकरी कॉन्फरन्स महत्त्वाची ठरली आणि २७/१२/१९६० रोजी डॉ. पंजाबराव देशमुख हीरकमहोत्सव साजरा करून वीर उत्तमराव मोहिते यांनी लोककलेला सार्वजनिक स्वरूप देण्याचा प्रयत्न केला. आधुनिक भारताच्या इतिहासात व साहित्यात हा अभिनव प्रयोग म्हणावा लागेल.

या सांस्कृतिक कार्यक्रमाला अनेक कलाकार स्वयंप्रेरणेने सहभागी झाले होते. यात महाराष्ट्राचा लोकशाहीर तुलसीदास जाधव चाळीसगाव येथून तर कमलकलाचा प्रसिद्ध सोंगाड्या पांडुरंग महादू कासार व लोकनाट्याचा अभिजात सरदार सावळाराम काळे, विदर्भाची लाडकी नर्तकी म्हणून नाव लौकिक केलेली कु. लक्ष्मी जावळकर

---

१०४. कित्ता, पृष्ठ – ३९.

कोल्हापूर येथून तर ज्यांना लोककलेचे महाभूषण म्हणून ओळखले जाते अशा जयश्री कोल्हापूरकर व लोककलेची रंगदेवता कला चंदनकर जळगाव येथून आल्या होत्या. जवळपास महाराष्ट्रातून कलाकार व श्रोते या कार्यक्रमास उपस्थित होते.

या कार्यक्रमास जे प्रत्यक्ष उपस्थित राहू शकले नाहीत अशांनी आपले संदेश कार्यक्रमासाठी पाठविले ते Cultural Renaissance या वीर मोहित्यांच्या ग्रंथात दिले आहेत. या कार्यक्रमासाठी डॉ. राधाकृष्णन सांस्कृतिक कार्यक्रमासाठी शुभेच्छा देतात तसेच डॉ. पंजाबराव देशमुख यांच्याही शुभेच्छा संदेशरूपाने येतात. विजया राजे सिंधीया महाराणी ग्वाल्हेर, के.जे. मंगलमूर्ती कुलगुरू नागपूर, सय्यद फजल अली राज्यपाल आसाम, श्री ब्रिजलाल बियानी एम.एल.ए. मुंबई, व्ही.पी. नाईक कृषीमंत्री, मुंबई सरकार, छत्रपती सुमित्रादेवी राणीसाहेब भोसले सातारा, ए.के. सेन कायदामंत्री भारत सरकार, एस.के. वानखेडे विकास व नियोजन मंत्री बॉम्बे, बी. रामकृष्णराव उत्तरप्रदेश गव्हर्नर इ. चे संदेश कार्यक्रमासाठी आले. त्यातून कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शुभेच्छा दिल्या व मराठा विज्ञान मंडळाच्या वतीने आयोजित केलेल्या कार्यक्रमाबाबत वीर मोहित्यांना प्रबलन व प्रेरणा दिल्या. यावरून वीर मोहित्यांचे हे कार्य केवळ महाराष्ट्रासाठीच नव्हे तर देशासाठी व मानवतेसाठी महत्त्वाचे आहे याची दखल आजही घेण्याजोगी आहे असे म्हणता येईल.

एकंदरीत मराठा विज्ञान मंडळाच्या माध्यमातून वीर उत्तमराव मोहिते यांच्या पुढाकाराने जो इ.स. १९५८ पासून १९६१ पर्यंत जे सांस्कृतिक महामंथन झाले ते भारतीय लोककलेला पुनरूज्जीवन देणारे ठरले यातून महापुरुषांच्या व कर्तबगार व्यक्तीच्या कार्याची नोंद घेऊन भावी समाजाला उपभोग घेता यावा यासाठी या कार्यक्रमांतील घडामोडी वीर मोहिते यांनी संकलित केल्या आणि लावणी, पोवाडा, गोंधळ अशा लोककलांवर प्रकाश टाकून या माध्यमातून सामाजिक पतिवर्तन व सांस्कृतिक परिवर्तन घडविण्याचा प्रयत्न केला.

ग.त्र्यं. माडखेलकर या तरुण भारत वृत्तपत्राच्या संपादकाने या

कार्यक्रमानिमित्ताने केलेल्या भाषणात ''संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती आता अटळच आहे.''[१०५] यावरून उत्तमरावांना सांस्कृतिक बदल तोडून मोडून करायचा नसून जोडून करायचा आहे असे समजते तर तमाशा केवळ मनोरंजन नसून समाज प्रबोधन व परिवर्तन यासाठीचे प्रभावी माध्यम आहे. त्यात विकृती असल्याने ती दूर करून प्रकृतीला साजेल अशी संस्कृती निर्माण करू शकते अशा विचार वीर मोहित्यांनी दिला म्हणूनच तमाशा परिषदेचे अध्यक्षीय भाषण करताना बालासाहेब देसाई बांधकाम मंत्री, मुंबई राज्य हे म्हणतात, ''तमाशा तमाशा म्हणून जगला पाहिजे त्याचे नाटक होऊ देवू नका.''[१०६]

यावरून अनेक वर्षाच्या इतिहासात व साहित्यात मृतप्राय अवस्थेत पोहचलेल्या लोककलेला नवसंजीवनी देऊन नवसंस्कृतीच्या निर्मितीसाठी प्रबळ विचाराचा भक्कम आधार बनविण्याचे कार्य वीर मोहिते यांनी केले आहे. म्हणून एकंदरीत त्यांचे कार्य पाहता लोककलेची स्थिती, लोकसाहित्याची स्थिती, वर्तमान स्थितीचा विचार करून व लोकभावनेचा आदर करून वीर मोहिते यांचे कार्य दखल घेण्या योग्य आहे असे म्हणता येईल. त्यांनी Cultural Renaissance या ग्रंथांतून प्रामुख्याने अध्यात्म, ब्रह्मवाद यामुळे लोककलेचा ऱ्हास झाल्याचे स्पष्ट करून नव्याने लोककलेला मजबूत करण्यासाठी नैसर्गिक हक्क देणारी संस्कृती निर्मितीची अपेक्षा त्यांच्या लेखनातून दिसून येते.

उपरोक्त ९ ग्रंथा व्यतिरिक्त उत्तमरावांचे लिखाण आहे. अतिशय छोट्या छोट्या पुस्तिकेतून काव्यमय पद्धतीने केलेले हे लिखाण महत्त्वपूर्ण आहे. 'इंदिरे, तुझाच जयजयकार' ही आठ पानी पुस्तिका मराठा विज्ञान मंडळाने प्रकाशित केली आहे. शिवाजी प्रिंटीग प्रेस अमरावती येथून मो.वि. ऐडखे यांनी मुद्रित केली आहे. या पुस्तिकेत उत्तमराव इंदिरा गांधी यांचे कार्य समर्थ भारत निर्माण करण्यास योग्य आहे असे सांगताना निधर्मी भारत, समाजवादी समाज रचना, सत्य इतिहास, मानवता या

१०५. *कित्ता, पृष्ठ – १९.*

१०६. *कित्ता, पृष्ठ – २४.*

बाबी निर्माण होतील अशी लेखकांची अपेक्षा आहे. दैनिकातील खोट्या बातम्या, गुलामगिरी वेठबिगार यावर अंकुश ठेवून कुप्रथा बंद केल्या, ऋणमुक्ती संततीनियमन, नसबंदी, बँकांचे राष्ट्रीयकरण, अणुबॉम्ब, कृषी व औद्योगिक क्रांती, वीस सूत्रांचा कार्यक्रम, साधुंचा विरोध अशी विकासाभिमुख कार्य इंदिरा गांधीने केले याचा आढावा घेऊन सक्षम भारत निर्मितीची वाटचाल असल्याचे सांगातात.

यावरून उत्तमराव मोहिते जसे काव्य, तत्त्वज्ञान, इतिहास या विषयात आपले मत देतात तसेच सद्य:स्थिती राजकारण व सक्षम भारतास उपरोक्त विषय अनुकूल असल्याचे सांगून आधुनिक भारताच्या निर्मितीत इंदिरा गांधीचे स्थान दर्शवतात यातून उत्तमरावांची आधुनिक भारताविषयाची बदलात्मक भूमिका स्पष्ट होते. तसेच वीर मोहिते यांनी लिहिलेला 'गोंधळ' हा लोककला व साहित्याच्या प्रकारातून नव्या येऊ घातलेल्या विश्व संस्कृतीचे दर्शन गोंधळातून सर्वसामान्यांना घडवण्याचा हा प्रयत्न आहे.

४.१० क्रांती–गीता

हा वीर उत्तमराव मोहिते लिखित भीमराव पाटील यांनी प्रकाशित केला. तो अमरावती येथून या ग्रंथाची किंमत एक आणा आहे. या पुस्तिकेतून वेगवेगळे विषय काव्यातून मांडले आहेत. 'घोडदौड' हे काव्य नाना पाटलांच्या कार्यावर प्रकाश टाकते. तर राज्य स्थापू जनसमतेचे, धनि खरे, क्रांतीचा प्राण, दाण दे अभंग, वाट पाहि क्रांती देवि असे विषय ७ (सात) पृष्ठांतून मांडतात. यात त्यांना समतेचे राज्य अपेक्षित असून यासाठी प्रयत्न करणारांचा गौरव करत क्रांतीची वाटचाल करण्यास सूचवतात.

एकंदरीत त्यांची ही पुस्तीका छोटी पण क्रांतिसारखा महान संदेश समतेच्या मार्गाने देते. म्हणून यातील विचार आजही उपयुक्त आहेत असे म्हणता येईल.

वीर उत्तमराव मोहिते यांचे शिवाजी की रामदास ७ पानी पुस्तिका छत्रपती शिवाजी व समर्थ रामदास स्वामी यांच्यातील संबंधावर प्रकाश टाकून इतिहासाला

नवसंदर्भ पुरवते. या विषयावर अन्यत्र ग्रंथात लिखान आल्याने यांचा उल्लेख पुरा व्हावा असे वाटते.

शिवशाहीचा उदय आणि अस्त हे मराठ्यांच्या सांस्कृतिक क्रांतीचा इतिहास या ग्रंथातील दोन प्रकरणे मराठा, सेवा संघ यांनी प्रकाशित केले आहेत. मराठ्यांच्या सांस्कृतिक क्रांतीच्या इतिहास या ग्रंथाच्या चिकित्सेत याचा उल्लेख आहे.

Universal song of life and truth ग्रंथ जीवनगाथा या ग्रंथातील काव्याचे इंग्रजीमध्ये विश्लेषण दिले आहे. यापूर्वी याचा अभ्यास झाला आहे.

एकंदरीत वीर उत्तमराव मोहिते जसे स्वातंत्र्य संग्रामात आणि अनेक चळवळीत महत्त्वपूर्ण योगदान दिले तसेच ते साहित्य संग्रामातही मागे राहिले नाहीत. त्यांचे एकंदरीत उपलब्ध साहित्य अभ्यासले असता त्यामधून नवनिर्मितीची उर्मी स्पष्टपणे दिसून येते. साहित्य, काव्य, पोवाडे, लावणी, गीत, तत्वज्ञान, संशोधन इ. उत्तमरावाच्या साहित्यातील ठळक वैशिष्ट्ये असून भारतीय जीवनपद्धती आणि त्यातील अंधश्रद्धात्मक गुलामगिरी व तिची कारणमीमांसा करून २१ व्या शतकात सामाजिक, धार्मिक, साहित्यिक, इतिहास, तत्वज्ञान इ. मार्गाने नवसंस्कृती निर्मितीचा भक्कम पाया घातला.

त्यांच्या ग्रंथातून वास्तविकता, मानवता, बंधूभाव, चिकित्सकवृत्ती, कठोरता, प्रमाणबद्धता, हिंदू धर्माबद्दल तिरस्कार, अन्यायाबद्दलची चीड, सामान्याबद्दल कळवळ, निपक्षपातीपणा इ. वैशिष्ट्ये दिसून येतात. वीर उत्तमरावांच्या लिखाणातून भारतीय तत्वज्ञानाला नवी दिशा दिली आहे.

मोहिते यांच्या विचारातील सत्यशोधनाविषयीची तळमळ सत्यशोधक चळवळीबाबतची भूमिका त्यांच्या कर्तव्यातून स्पष्ट होते ते खरे सत्यशोधक होते. यामुळेच आयुष्यभर लिहित राहिले. त्या लिखाणात बहुजन सामाजाविषयी तळमळ त्यांच्या साहित्यातून दिसून येते. तसेच वैदिक धर्म, चातुवर्ण्य व्यवस्था, बुवाबाजी, साधूचा ढोंगीपणा इ. वर लिहिताना ते आक्रमक होताना दिसतात.

वैज्ञानिक संस्कृतीची निर्मिती आणि दैनंदिन जीवन व्यवहारासाठी वैज्ञानिक दृष्टिकोन हा उत्तमराव मोहिते यांच्या लिखानाचा आत्मा आहे. कोणतीही तडजोड त्यांना मान्य नाही. जसे आहे तसे मांडणे हे त्यांचे वैशिष्ट्ये असल्याचे दिसून येते.

वीर उत्तमराव मोहिते यांचे लिखाण तत्कालीन काळाला मार्गदर्शक दीपस्तंभ ठरतो. त्यांचे वैचारीकत्व त्यांच्या वृत्तपत्रीय सवाल जबाबातून दिसून येते. आचार्य अत्रे आणि वीर उत्तमराव मोहिते यांच्यातील इ.स. १९६९ साली झालेल्या वृत्तपत्रीय संघर्षात उत्तमरावांची भूमिका सनदशीर, संयमी, प्रमाणबध्द असल्याचे दिसते. अत्रे यांनी शिव्यांचा भडीमार केला तरी उत्तमरावांचे संतुलन बिघडले नाही.

वीर मोहिते यंच्या ग्रंथातील प्रमाणिकता व विद्वत्तेबाबत अनेकांनी अभिप्रायही दिले आहेत. तसेच त्यांच्या दोन ग्रंथांना रशियाचा पूरस्कारही मिळाला आहे. येथे असे म्हणावे वाटते ज्याप्रमाणे भगवान बुद्धाचा जन्म भारतात झाला आणि मानवतेचा संदेश दिला. संदेशाची कदर मात्र परकियांनी केली तसेच भारतात जन्मलेल्या आणि भारतीय परिस्थितीबाबत चिंतन करून मानवमुक्तीचा संदेश देणाऱ्या मोहिते यांची कदर परकियांनीच घेतल्याचे दिसते.

येथे असे म्हणावे वाटते, महाराष्ट्र सरकारने उत्तमराव मोहिते यांच्या समग्र ग्रंथांना महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या माध्यमातून व अन्य शासकीय माध्यमातून समग्र साहित्याला प्रसिद्धी द्यावी.

***

प्रकरण पाचवे

उत्तमराव मोहिते यांचे सामाजिक, धार्मिक, सत्यशोधकीय व राजकीय क्षेत्रातील योगदान

५.१ सामाजिक योगदान

मानवी समाजाचा इतिहास पाहिला असता असे दिसून येते की, समाजामध्ये समाजधुरिणांच कार्य मोलाचं ठरलं. समाजाला उन्नत अवस्थेकडे नेण्यासाठी त्यांनी अथक परिश्रम घेतले. वंश, वर्ण, जाती, जमाती, वर्ग, धर्म, लिंग, गरीब, श्रीमंत या बाबींवर समाज श्रद्धा ठेवून राहीला आणि विभागला. यामुळे भेदाभेदाचे आधार कधीच सहज गळून पडले नाहीत. वेगवेगळ्या धर्म, पंथ व प्रांतातील समाजसुधारकांनी लोकांचे प्रबोधन करून एकजीव समाज निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या प्रयत्नामुळे समाज सुधारणेची प्रक्रिया हळूहळू सुरू झाली.

समाजसुधारकांनी धर्मांध–कर्मठ प्रवृत्ती आणि धर्मांतर्गत चालणाऱ्या दडपशाहीच्या विरोधात भूमिका घेऊन जनजागृती केली. सामान्य जनांना अनिष्ठ रूढी, प्रथा, कर्मकांड यातून मूक्त करण्यासाठी प्रबोधनाचा मार्ग हाती धरून दीन, दलित, श्रमिक यांना आधार दिला. यामुळे अनेक नवे विचार, पंथ यांना वाटा मिळाल्या आणि गुलामगिरीच्या गर्तेत जीवन जगणाऱ्यांना वाट मोकळी केली. यामुळे गुलामगिरीला उघड विरोध झाला. याचाच परिणाम म्हणून एकोणिसाव्या शतकात सुधारणावादी चळवळी सुरू झाल्या. यात स्त्रियांनाही त्यांच्या हक्काची जाणीव करून देवून जागृत केले. विसाव्या शतकामध्ये सुधारणावादी चळवळीने जग पादक्रांत केले. सर्व जगामध्ये सुधारणेचे वारे वाहू लागले आणि समाजाला भेडसावणाऱ्या समस्या सोडवण्यासाठी अनेक समाजसुधारक पुढे आले.

विचारक्षमता ही मानवाच्या प्रत्येक प्रगतशील पावलांसाठी महत्त्वाची ठरली

आहे. भौतिक प्रगती ही वैचारिक प्रगतीचं दृष्य रूप असते. म्हणून भौतिक प्रगतीची पूर्व अवस्था ही वैचारिक प्रगती असते. ही वैचारिक प्रगती त्या–त्या काळानुसार बदलत असते, तर असे ही विचार असतात जे काळ बदलला तरी उपयोगी असतात आणि अनेक विचार काळानुसार बदलावे लागतात. विचाराचं अधिष्ठान लाभलेल्या मानवाचा निरंतर ध्यास हा समताधिष्ठित तसेच न्याय समाज रचनेशी निगडित आहे.

सामाजिक व नैतिकता कोणती यासाठी लावलेले निकष काळाबरोबर बदलत राहिले. यामुळे नैतिकतेचे नवे मापदंड, नवा साचा निर्माण होण्याचे सुरू राहिले. म्हणजे जुने मूल्य कालबाह्य झाले म्हणून मूल्यच नाही असे नव्हे इथे नवीन मूल्य निर्माण होत गेले. हे जुन्यातून नवे होण्याचे कधी थांबले नाही आणि थांबेल असे वाटत नाही. या नैतिक चौकटी निर्माण करण्याची जबाबदारी समाजातील विचारवंतावर येऊन पडली. म्हणून आपले निष्कर्ष समाजासाठी नवीन वाटले धक्कादायक वाटले तरी ते मांडण्याचे धैर्य दाखवणं हे विचारवंतांना क्रमप्राप्त ठरलं. या बाबतीत इतिहास पाहिला तर जे विचार समाजात रूजले आहेत. त्या विचारांना धक्का देणारा विचार धैर्याने मांडणाऱ्या विचारवंतांचा समाजाने छळ केल्याचे दिसते. पण यात त्यांच्या विचारांचा विजय झाल्याचे दिसते.

महाराष्ट्राचा विचार करता आधुनिक काळात येथील प्रस्थापित व्यवस्थेला धक्का देण्याचे कार्य महात्मा जोतीराव फुले यांनी केले आणि हजारो वर्षाच्या चालत असलेल्या व्यवस्थेला धक्का दिला. ही महाराष्ट्राच्या इतिहासात महत्त्वाची घटना असून या पासून प्रेरणा घेऊन अनेक नवविचार मांडले. यात राजश्री शाहू यांचे नाव महत्त्वाचे ठरते. म.फुले–राजर्षी शाहू यांच्या विचारांचा वसा घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी परिवर्तनवादी कार्य आरंभिले म्हणून नव्या महाराष्ट्राचा विचार करताना प्रथम फुले, शाहू व आंबेडकर यांचा विचार क्रमप्राप्त होतो. फुले, शाहू व आंबेडकर यांच्या विचारांची सांगड घालून व येणारा काळ समोर ठेवून मागच्या सुधारणावादी विचारांना येणाऱ्या काळाच्या संदर्भाने मांडण्याचा प्रयत्न झाला.

महात्मा जोतीराव फुले यांनी महाराष्ट्राच्या समाज व्यवस्थेचा आणि सांस्कृतिक स्थितीचा अभ्यास करून ''प्रतिसंस्कृतीचा सिद्धांत मांडला.''[१] आणि हजारो वर्षापासून स्थितप्राय राहिलेल्या प्रतिगामी समाज रचनेला धक्का दिला.छत्रपती शाहू यांच्या जीवनातली बदलात्मक विचाराची घटना म्हणजे ''वेदोक्त प्रकरण''[२] यामुळे शाहूंचा सामाजिक बदलाकडे अधिक कल वाढला व त्यांनी अनेक बदल आपल्या कृतीतून केले. महात्मा फुले यांच्या सत्यशोधक विचारांना उत्तेजन दिले. आंबेडकरांनी याच अनुषंगाने कार्य केले.

फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारांना एकत्रितपणे साकारण्याचे प्रयत्न उत्तमराव मोहिते यांनी केले. हे करत असताना काळाची ओळख ठेवून झालेला बदल व भविष्याचा अंदाज घेऊन त्यांनी महाराष्ट्रीयन समाज जीवन स्थिर व वैचारिक पायावर उभा करण्याच प्रयत्न केला.

बहुजनांची आजची स्थिती गुलामीची आहे. ही स्थिती बदलण्यासाठी उत्तमराव मोहिते प्रयत्न करतात. स्वातंत्र्य आंदोलनाच्या काळात ''प्रथम राजकारण व मग समाजकारण असा वाद उपस्थित केला.''[३] यातून राजकीय सूत्र आपल्या हाती घेऊन आपणाला पाहिजे तसा कायदा करून या समाजावर आपण राज्य करू या विचाराला हजारो वर्षाचा वारसा कायम ठेवून प्रतिगामी राज्य करण्याचा मानस परंपरावाद्यांचा असल्याचा दिसतो. म्हणजे एखाद्या सुधारकाला सहज साध्य होईल असे वातावरण नव्हते. येथील समाज व्यवस्था चातुवर्ण्यात विभागली असून त्यात अनेक जाती व पोटजाती निर्माण झाल्या होत्या आणि वर्णव्यवस्थेतील ब्राह्मणांचे वर्चस्व समाजावर निर्माण झाले होते.

उपरोक्त विषयावर विचार केला असता हे स्पष्ट दिसून येते की, येथील बहुजन समाज अज्ञानी आहे आणि ब्राह्मण विद्वान आहेत. बहुजनांच्या अज्ञानामुळे ब्राह्मण

---

१. *गेल ऑमव्हेट , वसाहतिक समाजातील सांस्कृतिक बंड, पृष्ठ – ८८.*

२. *पवार जयसिंगराव, राजश्री शाहू स्मारक ग्रंथ, पृष्ठ – ३६.*

३. *चौधरी नागेश (संपा.), समतेसाठी बहुजन संघर्ष (पाक्षिक), पृष्ठ – २७.*

वर्चस्व गाजवतात पण बहुजन समाज अज्ञानी का आहे? या बाबत खुलासा केला जात नाही याचे कारण काय? बहुसंख्य समाज अज्ञानी कसा राहीला? तो शिकण्याच्या योग्यतेचा नाही काय? असा प्रश्न उपस्थित झाल्यावर आणि बहुजन समाजाचा इतिहास पाहिला असता बहुजनांमध्ये ही विचार करणारे विद्वान झाल्याचे दिसते. पण त्यांचे विचार दडपून ब्राह्मणी विचारांचा प्रसार करण्यात ब्राह्मणांना यश आल्याचे दिसते. कारण शिक्षणाची सत्ता अधिकार स्वत:कडे ठेवल्याने बहुजन समाज या पासून दूर सारला गेला आणि धर्म व अनेक कर्मकांडाचा अवलंब करून बहुजनांना अज्ञानी ठेवल्याचे दिसते.

ब्रिटिशांच्या आगमनाने बहुजनांच्या शिक्षणाचे प्रमाण वाढले. यामुळे शिक्षित झालेला बहुजन ओळखू लागला की, आपल्याला शिक्षणाशिवाय पर्याय नाही म्हणून बहुजनांच्या शिक्षणाची व्यवस्था करण्यासाठी ''महात्मा फुले यांना समाजाचा त्रास सहन करावा लागला आणि ब्राह्मणांच्या विरोधाला सामोरे जावे लागले.'' महात्मा फुले यांच्या विचारांचा प्रभाव व यातून निर्माण केलेले ''क्षात्रजगतगुरू पद''[४] हे राजश्री शाहूंनी काळानुसार टाकलेले पाऊल होते.

५.१.१ शेतकऱ्यांची स्थिती सुधारणाविषयक विचार

उत्तमराव मोहिते यांना लहानपणापासूनच पुरोगामी विचाराचा वसा मिळाला होता. यामुळे त्यांचे मन सामाजिक प्रश्नांकडे लवकरच आकर्षित झाले. समाजामध्ये वावरत असताना त्यांना अनेक प्रश्नांची मालिका दिसली. या प्रश्नांबाबत विचार करू लागले. त्यांचे लक्ष्य भारतीय शेतकऱ्यांकडे आकर्षित झाले. स्वत: शेतकरी असल्याने शेतकऱ्यांच्या वेदना त्यांना अनुभवायला मिळाल्या. या वेदना त्यांनी काव्यात्मक पद्धतीने शेतकऱ्यांची स्थिती कशी आहे हे आपल्या पहिल्या पुस्तिकेत मांडतात. उत्तमराव मोहिते म्हणतात,

---

४. *सावंत गरूड, महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास, पृष्ठ – १४८.*

''नदी वाहते मंद जैशी अखंड

नभी तापतो सूर्य जैसा प्रचंड

तसा राबतो सावळा हा किसान

जगा पोसण्या रोज हाडे झिजून ।।१।।''[५]

उत्तमरावांचे सामाजिक निरीक्षण पाहता भारतीय समाज हा कृषीप्रधान समाज आहे आणि इथला प्रमुख व्यवसाय व बहुसंख्य समाजाचा मुख्य आधार शेती आहे. येथील शेतीत राबणाऱ्या शेतकऱ्याला कोणत्याही सुखसोयी नसून काबाड कष्टापासून त्याची सुटका नाही. बारमाही वाहणारी नदी, संत पण सतत वाहते एक दिवसाचा खंड पडत नाही. सूर्याचे तेज जसे सतत तप्त असते तसा शेतकऱ्याला त्याच्या कामातून विश्रांती नसते. असे काम करणारा शेतकरी जगाला अन्न–धान्य पुरवितो आणि स्वत: मात्र दयनीय जीवन जगतो हे कार्य शेतकऱ्यासाठी असाह्य आहे. आवश्यकतेपेक्षा जास्त भार तो उचलतो दिन–रात्र मेहनत करतो यातूनच त्याची हाडे झिजून गेली आहेत हे निदर्शनास आणून देतात. ते पुढे म्हणतात,

''जसे मास बाराहि येती क्रमाने

तसा राबतो कलयंत्रा प्रमाणे

मनाचा पुरा मोकळा हस्तिदंत

जगी ऐकला धर्म हा मूर्तिमंत ।।२।।''[६]

शेतकऱ्यांची स्थिती अत्यंत नाजूक असून कामाचा भार असाह्य होणारा शेतकरी तरीही कष्ट करतो. त्यात माणूस विश्रांती नसून तो यंत्राप्रमाणे काम करणारा बनला आहे. दिवस–रात्र, ऊन–वारा अशा प्रतिकूल परिस्थितीशी झगडणारा कृषक हा मूळ आधार असताना तो हलाखीचे जीवन जगतो. या प्रश्नाकडे उत्तमरावांचे लक्ष वेधले. ते सांगतात, 'किसान' हा दयाळू , मायाळू आहे. निसर्गावर प्रेम करणारा तो मनाने

---

५. *मोहीते उत्तम पांडुरंग, देवीच्या देवळात गोहत्या, पृष्ठ – २.*

६. *कित्ता, पृष्ठ – २.*

मोकळा आहे. पण त्याची लुबाडणूक आणि पिळवणूक होते. शेतकऱ्यांची, कष्टकऱ्यांची पिळवणूक कोणाकडून होते याबाबत उत्तमराव म्हणतात,

''जसा वावरा नेयि झाडून नाला
तसे नाडती संत ढोंगी तयाला
शवा फाडती काक आणि गिधाड
तसे नाडती धर्मकोल्हे लबाड ।।५।।''[७]

पिळवणुकीची माहिती देताना उत्तमराव उदाहरण देऊन सांगतात की, वारा सुटल्यावर रानामध्ये पडलेला पालापाचोळा झाडून एखाद्या नाल्यात जातो आणि एखादे 'शव' गिधाडाला दृष्टीस पडल्यावर तो जसा निर्भयपणे भक्षण करतो हे करताना त्याला कसलीही दया, माया, प्रेम वाटत नाही. उलट भक्षण करण्यास मिळाले म्हणून आनंदी होतो. तशाच निर्दयी पद्धतीने शेतकऱ्यांचे लचके धार्मिकता जोपासणारे तोडतात. त्यांना कष्टाने झिजणाऱ्या कष्टकऱ्यांचे दु:ख दिसत नाही. फक्त आपल्या सुखाचा विचार करतात. शेतकऱ्यांना आडवून धार्मिक भिती दाखवून त्यांना लुबाडतात अशांना उत्तमराव 'लबाड धर्मकोल्हे' म्हणून संबोधतात.

''किसाना जनांचे लुबाडून वित्त
पहा बांधले उंच हे देवत्त
करा मोकळे कान तुम्ही मनाचे
इथें घूमती शब्द दु:खी तयांचे''[८]

भारतीय शेतकरी साधा, अशिक्षित असल्याने धर्माचा धाक त्याच्या मनावर बुद्धीवर बसवला यामुळे धार्मिक कृत्य करणे शेतकऱ्याला बंधनकारक झाले. तसेच धर्माच्या नावाने शेतकऱ्यांकडून अन्नधान्याबरोबर पैसा ही घेतला. यातून पुरोहितांचे कायमस्वरूपी साधन मंदीर निर्माण केले. पण हे करत असताना शेतकरी किती

---

७. *कित्ता, पृष्ठ – ३.*

८. *कित्ता, पृष्ठ – ५.*

काबाडकष्ट सहन करतो याचा विचार केला नाही. यासाठी उत्तमराव सांगतात की, मनाने मनाचा विचार करता हे कळेल शेतकऱ्याचे दु:ख, अज्ञान, दारिद्रय, वाट्याला आलेले काबाड कष्ट आणि या काबाड कष्टातून होणारी अल्प मिळकत यातून जाणारा देवधर्म यांच्यावरील खर्च पाहता शेतकरी दिवाळखोर व कर्जबाजारी त्यातून सावकारांचा तगादा अशा मरणकळाला टेकलेला असल्याचे दिसते. उत्तमराव सांगतात, ''नागरी व सांस्कृतिक हक्कापासून नागवलेल्या ग्रामीण शेतकऱ्याला व त्याच्या मुलाला शासनसंस्थेत कोणताच हक्क नव्हता आणि कोणतीही सवलत नव्हती. सरकारी कचेऱ्यातील साधा शिपाई आपल्या मुलाला विद्यालयीन शिक्षण देतो. पण खेड्यात राहणाऱ्या ४० एकर शेतीचा मालक मुलाला विद्यालयात शिकवू शकत नाही.''[९] यावरून शतकऱ्यांच्या दु:खद स्थितीचा अंदाज येतो.

उत्तमराव मोहिते परिस्थिती पाहून विचार तर करतच पण उपायात्मक योजना केल्या पाहिजेत असे त्यांचे विचार आहेत व असे कार्य करण्यास ते तत्पर असत. डॉ. पंजाबरावांनी विदर्भात शैक्षणिक आणि भारतात कृषक क्रांती घडवली. या कार्यात डॉ. पंजाबरावांचा दांडपट्टा असणाऱ्या उत्तमराव मोहिते यांनी आपल्या नातीचे नाव क्रांती ठेवले. ''डॉ. पंजाबरावांनी ज्या ज्या कल्पना त्यावेळी मांडल्या त्या उत्तमराव मोहिते यांनी उचलून धरल्या.''[१०] उत्तमराव पंजाबरावांबाबत म्हणतात,

''पंजाबराव अनिवार महा झुंजार
नेमू या त्याला जनतेचा नेता अपुला
शेतकऱ्यांचे राज्य करावे
कामकऱ्यांचे राज्य करावे
यासाठी झुंजला ।।१ ।।''[११]

---

९. *मोहिते वीर उत्तमराव, जागतिक कृषक क्रांतीचा विधाता लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख, पृष्ठ – १५८.*

१०. *मोहड सुधाकर, डॉ. पंजाबरावांच्या शिव कुटुंबाचा 'मालुसरा' : दादासाहेब उपाख्य, दौलतराव गोळे, पृष्ठ – २.*

११. *मोहड सुधाकर, विदर्भाचा अग्नी पुरुष स्वातंत्र्यसंग्राम सेनानी वीर उत्तमराव मोहिते, पृष्ठ – १५.*

यावरून पंजाबरावांच्या कार्यात उत्तमरावांचा सहभाग असून पंजाबरावांच्या निर्णयाचे उत्तमराव स्वागत करतात. १९२० सालानंतर कापूस बाजारात मंदीची प्रचंड लाट आली. कापसाचा भाव २५० वरून २५ वर आला आणि वऱ्हाडचा संपूर्ण कृषक वर्ग कर्जबाजारी झाला आणि सावकाराच्या घशात अडकून पडला. या शेतकऱ्याला कर्जमूक्त कसे करावे या बाबत कोणी विचार व कृती करत नव्हते. शेतसारा देण्याची कुवत शेतकऱ्यात राहिली नाही. सहकारी बँकांनी शेतकऱ्यांच्या जमिनी कर्जापायी हराशीत काढल्या. त्या काळात अहोरात्र रक्त ओकणाऱ्या या शेतकऱ्यांचा कळवळा दुसऱ्या कोणत्याही पुढाऱ्याला आला नाही. वऱ्हाडात शेतीत राबणारा शेतीचा मालक हा शेतकरी वर्गच पूर्णपणे नष्ट होतो की काय अशी भयानक परिस्थिती उपस्थित झाली. शासन व सुशिक्षित समाज या दोघांचेही लक्ष या प्रश्नाकडे केंद्रीत झाले नाही. ''शासन परकीय इंग्रजांचे होते. सुशिक्षित वर्ग वरिष्ठ जातीतून आला होता; आणि सावकार परप्रांतातून आला होता.''[१२] शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे आत्मीयतेने पहाणारा कोणी नव्हता आणि होते ते पंजाबराव देशमुख एकटेच झगडत होते. म्हणून उत्तमरावांनी पंजाबरावांना शेवटपर्यंत साथ दिली.

उत्तमरावांना कृषी क्षेत्रातील क्रांतीची अपेक्षा होती. शेतकऱ्यांना उत्पादन वाढविण्याबरोबर स्वत:चे अज्ञान अंधश्रद्धा झुगारून वैज्ञानिकतेचा अंगीकार करणारा शेतकरी हवा होता. केवळ शेतकऱ्याला शासनामार्फत वेगवेगळ्या योजना देऊन किंवा अमिष दाखवून शेतकऱ्यांचा दर्जा सुधारणार नाही याची पक्की खात्री उत्तमरावांना असल्यामुळे शेतकऱ्यांना शिक्षण व त्यातून वैज्ञानिक सुपीक विचार शेतकऱ्यात रूजल्याशिवाय खरा शेतकऱ्यांचा विकास होणार नाही. म्हणून पंजाबरावांनी विदर्भासाठी कृषी विद्यापीठाची मागणी केली व मंजुरीच्या बेताने पावले उचलली. यामुळे विदर्भाच्या शेतकऱ्यांत परिवर्तन होण्यास मदत होणार होती. पण हे विद्यापीठ पंजाबरावांच्या मृत्यूनंतर राहुरीला नेले. या ''विद्यापीठासाठी जे आंदोलन झाले त्यात

---

१२. *मोहिते वीर उत्तमराव, पूर्वोक्त, पृष्ठ – १७०.*

एक सेनानी म्हणून उत्तमराव लढले.''[१३] आणि राहुरीचा निर्णय विदर्भातील जनतेविरूद्ध एक भयंकर षडयंत्र हे पुस्तक लिहून प्रकाशित केले. जागतिक कृषक क्रांतीचा विधाता लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख यांचे चरित्र व त्यात शेतीचे वर्णन वास्तवात व तळमळीने केलेले दिसते.

उत्तमराव मोहिते यांना शेतकऱ्यांची स्थिती अज्ञानी, अंधश्रद्धाळू का राहिली. यामुळे त्याच्या वाट्याला दु:ख आले याची कारणे हजारो वर्षाच्या परंपरेत शोधून उत्तमराव म्हणतात, ''कृषक क्रांती म्हणजे सनातनवादाचे उच्चाटन''[१४] सनातनवादामुळेच शेतकरी अन्याय, दारिद्र्य, अज्ञान व गुलामगिरीच्या विळख्यात सापडला यासाठी खरी शेतकऱ्यांची प्रगती ही सनातनवादाच्या उच्चाटनानेच होणार असल्याचे प्रतिपादन करतात.

उत्तमराव मोहिते यांनी शेतकऱ्यांची स्थिती सुधारावी म्हणून संघटनात्मक कार्यात सहभागी झाले. विदर्भामध्ये ''विदर्भ विभागीय शेतकरी प्रतिनिधी चर्चासत्र बलराम जाखड यांच्या प्रमुख अतिथीत्वाखाली विदर्भ विभागीय सहकारी बोर्डाचे सभागृह अमरावती येथे दि. १८ फेब्रुवारी १९८७ रोजी पार पडले. यात उत्तमरावांनी सहभाग घेऊन चर्चा घडवली.''[१५] उत्तमरावांनी शेतकऱ्यांचे प्रतिनिधी म्हणून कार्य केले. तसेच 'भारत कृषक समाज' याचे सदस्य उत्तमराव मोहिते होते.

उत्तमराव मोहिते यांनी कृषक समाजासाठी केलेल्या कार्याबद्दल त्यांना 'समाजगौरव पुरस्कार' दि. ३० एप्रिल १९९५ रोजी प्रदान करण्यात आला.

एकंदरीत समाज व्यवस्थेला टिकवून धरणारा समाजाचा पोशिंदा शेतकऱ्यांच्या स्थितीचा अभ्यास करून उत्तमराव मोहिते यांनी शेतकऱ्यांच्या मागासपणाची कारणे शोधली व त्यांच्या प्रगतीसाठी सनातन विचाराचे उच्चाटन झाले पाहिजे या शिवाय खऱ्या अर्थाने शेती व शेतकरी सुधारणार नाही. यासाठी त्यांनी वैयक्तिक व संघटनात्मक प्रयत्न केले.

---

१३. *कित्ता, प्रस्तावना, पृष्ठ – १६.*

१४. *कित्ता, पृष्ठ – ४०,४४.*

१५. *विदर्भ विभागीय शेतकरी प्रतिनिधी चर्चासत्रातील वीर उत्तमराव मोहिते यांच्या संग्रहातील फोटो.*

५.१.२ प्रस्थापित समाजव्यवस्थेत परिवर्तनाची गरज

'वर्ण' या शब्दाचा अर्थ समाजाचा वर्ग किंवा विभाग असाही घेतला जातो. हिंदू समाजाचे ब्राह्मण, क्षत्रीय, वैश्य आणि शुद्र हे चार वर्ग प्राचीन काळी अस्तित्वात आले. त्यांना 'वर्णव्यवस्था' म्हणतात आणि त्यावर आधारित समाज रचनेला 'चातुवर्ण्य' म्हणतात. ''निरनिराळ्या कामांसाठी लागणारे निरनिराळे गुण भिन्न–भिन्न मानव समुहात आढळतात व ते अनुवांशिक असतात अशा भिन्न वर्गातील स्त्री–पुरुषांच्या संगतीत ते गुण उतरत नाहीत तर संवर्ण दांपत्तीच्या मुलात वर्णाचे गुण प्रकर्षाने राहतात या कल्पनावर चातुवर्ण्य व्यवस्था आधारलेली आहे.''[१६] यात ब्राह्मण, क्षत्रीय, वैश्य व शूद्र या चार वर्णांची अनुक्रमाने रचना आहे.

''ब्राह्मण हा चातुवर्ण्यातील अग्रण्य वर्ण आहे. ब्रह्म मंत्र किंवा स्त्रोत रचणारे ब्राह्मण''[१७] हा सर्व अधिकार संपन्न वर्ण आहे. ब्राह्मणांनी आपले वर्चस्व समाजावर निर्माण करण्यासाठी ब्राह्मणाचे वर्चस्व/महत्त्व वाढविले व सर्वात श्रेष्ठ ब्राह्मणास ठरवले. ''यज्ञसंस्थेच्या विकासाबरोबर ब्राह्मणांचे महत्त्व वाढत गेले''[१८] आणि हिंदू समाजावर ब्राह्मणांची चांगली पकड निर्माण झाली. आपली पकड कायम ठेवण्यासाठी ''ब्राह्मणांनी यज्ञ केले नाही तर सूर्य उगवणार नाही''[१९] असे विचार समाजामध्ये दृढ केले मग तो ब्राह्मण कसा ही असो. ''ब्राह्मण केवळ जन्माने श्रेष्ठ मानावा हा विचार प्रबळ केला.''[२०] यामुळे हिंदू समाजात ब्राह्मणांचे वर्चस्व वाढले. या वाढत्या वर्चस्वामुळे ब्राह्मणांनी हिंदू समाजाला अज्ञान अंधश्रद्धेमध्ये कायम ठेवले. आधुनिक काळात ही स्थिती बदलली नाही. अनेक विचारवंतांनी ती बदलून सर्वांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. पण त्याचा दीर्घकाळ टिकेल असा परिणाम झाला नाही. जर ही परिस्थिती

---

१६. *जोशी पंडित महादेव शास्त्री, भारतीय संस्कृतीकोष, खंड – ६ वा, पृष्ठ – ३२५.*

१७. *जोशी पंडित महादेव शास्त्री, भारतीय संस्कृतीकोष, खंड १० वा, पृष्ठ – ३२२.*

१८. *कित्ता, पृष्ठ – ३२३.*

१९. *कित्ता, पृष्ठ – ३२३.*

२०. *कित्ता, पृष्ठ – ३२४.*

बदलायची असेल तर ठोस पावले उचलली पाहिजेत आणि जनजागृती व्हावयास हवी.

''देशातील बहुजन समाज धार्मिक गुलामगिरीच्या विळख्यात सगळ्यात जास्त जायबंदी झालेला दिसतो. त्यातून त्याला बाहेर काढण्याचे प्रयत्न आजपर्यंत झाले नाहीत असे नाही पण ते अपुरे पडलेत असे म्हटल्याशिवाय राहवत नाही. म. फुले, राजश्री शाहू, पेरिअर रामास्वामी, मानवेंद्रनाथ रॉय, बाबासाहेब आंबेडकर, पं. नेहरू, डॉ. पंजाबराव देशमुख या सर्वांनी अध्यात्मिक शक्तिशी झुंज देण्याचे आपापल्या परिने प्रयत्न केले. पण त्यांचे प्रयत्न अपुरे पडलेत म्हणूनच आपणाला ज्या नवक्रांतीची निकडीची गरज आहे असे बंड भारताच्या इतिहासात घडून यायचे आहेत असे दौलतराव गोळे म्हणतात.''[२१] भारतातील अनेक समस्यांचे मुळ आणि सामाजिक अधोगतीचे कारण धार्मिक असल्याने जोपर्यंत येथील धार्मिक व्यवस्था सामाजिक समानता स्थापू इच्छित नाही तोपर्यंत परिवर्तन होण्याची शक्यता दिसत नाही. परिवर्तनकाऱ्यांनी मुळावर घाव घालण्याची इच्छा दौलतराव गोळे व्यक्त करताना दिसतात.

आता आपणास स्वातंत्र्य मिळाले यामुळे जुनाट बाबींना थारा नाही मग उगाच कशाला धर्म, समाज, परिवर्तनाच्या विचाराकडे जायचे. परिवर्तन हळू–हळू होईल नव्या घटनेने नवा समाज निर्माण होईल असा अंदाज तत्कालीन व्यक्तींनी पाहिला, काढला असेल आणि तशी अपेक्षा करणे चुकत नाही. इथे क्रांतीची आवश्यकता आहे.

समता, स्वातंत्र्य, बंधुता अशी न्यायावर आधारित घटना आमची असेल आणि परकीयांना हाकलून स्वतंत्र पद्धतीने चालता येत असताना आम्ही गुलाम कसे असा प्रश्न जेव्हा स्वाभाविकपणे पडतो तेव्हा ''आजची घटना अंमलात आली तेव्हा इथे संरजामशाही, नौकरशाही, पुरोहीतशाही होती व आजही आहे. हिंदू धर्मानुसार देव, धर्म, चातुवर्ण्य, हजारो जातीपाती या प्रश्नाचा एकदाचा सोक्षमोक्ष झाला पाहिजे. हे

---

२१. *चौधरी नागेश (संपा.), पूर्वोक्त, पृष्ठ – २७.*

सर्व मानव निर्मित असून ते सर्व बदलवण्याचा आपण दृढ निश्चय करू. यातून काही जन जागरूक जरूर झाले. पण कायमचा तोडगा फारसा कोणी सूचवला नाही. याला अपवाद वीर उत्तमराव मोहिते आहेत.''[२२]

एकंदरीत दौलतराव गोळे यांनी सामाजिक परिस्थितीचा अभ्यास सुधारकांना समोर ठेऊन केला. सुधारणा झाल्या पण मुळावर घाव घातला नाही. यामुळे झाडाच्या फांद्या तोडल्याप्रमाणे झाले. यामुळे विस्तार करण्यास बूड कायमच राहिले. हे बूड मुळासकट खणून काढण्याचा प्रयत्न होण्याची अपेक्षा व्यक्त करतात. त्यासाठी क्रांतीची आवश्यकताही व्यक्त करतात. अनेकांनी प्रयत्न केले ते अपुरे पडल्याचे सांगून वीर उत्तमरावांचा पूर्ण बदलाचा प्रयत्न कायमचा तोडगा काढण्यास योग्य असल्याचे समर्थन करतात.

हिंदू धर्माला येथील समाजव्यवस्थेला कंटाळून अनेकांना हिंदू धर्म नकोसा वाटायला लागला. ज्या कारणाने लोक हिंदू धर्माचा त्याग करत आले त्या गोष्टी सुधारल्या गेल्या नाहीत. म. फुले यांच्या मते, ''हिंदू धर्म हा अंतर्बाह्य सडला व विकृत बनला होता. त्यामुळे सुधारणांच्या डागडुजीने आता भागणार नव्हते तरी त्यातील मोठा दोष जाती व्यवस्था दाखवता येईल''[२३] म्हणून फुलेंनी आपले कार्य करताना ''शूद्रांना प्रतिष्ठित जीवन उपलब्ध करून देणे, पद्दलितांचे जीवन उन्नत करणे यासाठी झगडले पण अभिप्रेत असलेली मानवी प्रतिष्ठा त्यांना मिळाली नाही.''[२४]

''राजश्री शाहू महाराज यांनी समाजव्यवस्थेचा अभ्यास करून समाजावर ब्राह्मणी वर्चस्व आहे असा निष्कर्ष काढला व यामुळेच 'ब्राह्मणवर्णश्रेष्ठत्वाचा सिद्धांत' या विरूद्ध आपली भूमिका 'वेदोन्तप्रकरणापासून' जाहीर केली आणि ब्राह्मणेत्तर समाजाच्या विकासासाठी प्रयत्न केले.''[२५] शाहूंचे प्रयत्न खरोखरच चांगले व परिणामकारक होते. पण यामुळे पूर्णत: उच्चाटन झाले नाही म्हणून पुढे डॉ. बाबासाहेब

---

२२. *कित्ता, पृष्ठ – २८.*

२३. *नरके हरि (संपा.), महात्मा फुले साहित्य आणि चळवळ, पृ. १३.*

२४. *कित्ता, पृष्ठ – २३.*

२५. *पवार जयसिंगराव (संपा.), राजश्री शाहू स्मारक ग्रंथ, पृष्ठ – ३८ व ४७.*

आंबेडकर यांनी १९२० ते १९५६ पर्यंत ३६ वर्ष अखंड परिश्रम घेतले. आंबेडकर म्हणतात, ''सामाजिक जीवनात अद्यापही भयंकर विषमता कायम आहे हे २६ जाने. १९५० रोजीचे विधान आहे''[२६] म्हणूनच की काय आंबेडकरांना असे वाटले की, ''हिंदू धर्मात सुधारणा होणार नाही म्हणून समाजात ही सुधारणा होणार नाही म्हणून परकीय धर्माऐवजी भारतीय समता असणारा बौद्ध धर्म स्वीकारला.''[२७]

यावरून काही प्रमाणात सुधारणा झाल्या. महात्मा फुले यांनी येथील समाज व्यवस्थेविरूद्ध लढा दिला. चातुवर्ण्यधिष्ठित समाज व्यवस्थेला भुईसपाट करण्यात त्यांनी आपले आयुष्य खर्चिले. परंतु ब्राह्मणवादाची मजबूत चौकट त्यांना पूर्णत: नष्ठ करणे अशक्य झाले. तरी या चौकटीला तडा देण्यात यशस्वी झाले. याच तड्यावर शाहूंनी दणका दिला व आंबेडकरांनी तडाका यामुळे ही चौकट ढिली झाली. पण पूर्णत: गळून पडली नाही. ती नव्या पद्धतीने जोमाने वाढू लागली.

पी.एस. सरदार म्हणतात, ''भारतात समाजवाद व साम्यवाद यांची झालेली वाताहत पाहता भारतीय समाजाला वेगळ्या तत्त्वज्ञानाची गरज आहे. संपूर्ण समाज जीवन आजही चातुवर्ण्य भांडवलशाही व नोकरशाही यांच्या कडेकोट पाहऱ्यात बंदिस्त आहे.''[२८] यासाठी आता संपूर्ण बिमोड करण्यासाठी नवविचार नवे तत्त्वज्ञान मांडण्याची अपेक्षा काळ करत होता. बदलत्या काळात बदलती गरज पुरवण्यासाठी ठोस विचारांची आवश्यकता होती.

ही समग्र परिस्थिती उत्तमराव मोहिते यांना ज्ञात होती. डॉ. आंबेडकरांचे ते समकालीन होते. सर्व परिस्थितीचा अभ्यास करून त्यांनी सामाजिक बदलाबाबत भूमिका घेतली. हे विज्ञान युग आहे. भारतात विज्ञानशास्त्र ज्ञान ही फार कमी आहे. येथील धर्मपंडीतांनी आमची दिशाभूल केली म्हणून आपण धर्माच्या खुळचट फेऱ्यात सापडलो आहोत. त्या काढून टाकून नवीन समाज रचना केल्याशिवाय खरे शास्त्रज्ञ

---

२६. *कांशीराम (संपा.), बहुजन नायक , पृष्ठ – १४.*

२७. *कित्ता, पृष्ठ – १*

२८. *सरदार पी.एस., बहुजन समाज अधिवेशन (स्मरणिका), १९७७.*

निर्माण होणार नाहीत. राजर्षी शाहू, डॉ. आंबेडकरांनी प्रयत्न करून ही जातीवादाचे रोपटे वाढतच गेले व आज त्याचे रूपांतर वेगवेगळ्या पद्धतीत दिसते. याचे कारण त्या काळात मराठ्यांची फूट होती. आज क्रांतीची अत्यंत आवश्यकता आहे. अध्यात्म हे लुटारूचे तत्त्वज्ञान आहे. संत हे क्रांतीला धोकादायक आहेत. क्रांती नवयुवक विद्यार्थ्यांनी करावयास हवी असे

दि. २७ फेब्रु. १९७० च्या कंधार येथील भाषणात उत्तमराव क्रांतीची आवश्यकता स्पष्ट करतात ते म्हणतात, ''मराठ्यांच्या भटाळलेल्या वृत्तीचा आम्हाला खेद वाटतो. ब्राह्मण या जातीला आमचा विरोध नाही. भटवृत्ती ही सर्व जातीतून दिसून येते. ती नष्ट झाल्याशिवाय समाजवाद येणार नाही. यासाठी मी 'अथेइजम् इन इंडियन–फिलॉसॉफी' ग्रंथ लिहला आणि कोणी धर्मगुरुंनी विरोध केला नाही.''[२९]

उत्तमरावांनी सामाजिक विषमतेचे छदन केले होते. लहानपणापासूनच त्यांना सामाजिकतेची जाणीव आली होती. वयाच्या आठव्या वर्षी त्यांना जातीयतेच्या व अस्पृष्यतेच्या तडाख्यात आठ दिवस घराबाहेर राहावे लागले होते. मूर्तिपूजा हा मुर्खपणा आहे आणि बुवा, साधू यांच्या बाबत ते म्हणतात,

''मुखी आपल्या फासतो राख फाक्या
अहा । शोभेल छानसा रानबोक्या
कसा काय संसार थाटेल याने
तुझा नाश होईल रे या कृतीने''[३०]

जोतिषाविषयी उत्तमराव म्हणतात, "What do yow foreser in the book of palmistry or astrology? your perseverence is an architect of your fortune. Present comes from the Past, Future is under the control of the present can any astrologer predict some definite prophecy? It's

---

२९. *धोंडगे केशवराव (संपा.), साप्ता. जयक्रांती, दि. २७ फेब्रु. १९७०.*

३०. *मोहिते उत्तम पांडुरंग, देवीच्या देवळात गोहत्या, पृष्ठ – ५.*

all jugglery & fraud to deceive that supers titious & ignorant masses the ignorant are bound by the past & future, but the materialist realises the present & masters the situation."[३१]

बुवाबाजी, ढोंग्यावर हल्ला करून ज्योतीषाची हजेरी उत्तमराव घेतात आणि जन्मोजन्मीपासून आम्हाला जो अन्याय सहन करावा लागतो याबाबत ते म्हणतात,

''कल्पनेचे जग जगाची कल्पना।
भेद जानती ना वेदवादी।।
वेदाचाहि अर्थ काय जाणे ब्रह्म।
शुद्राचेच काम असे तेथे।।
.....
उत्तमाला आता पुरा न्याय द्यावा।
भार का वहवा युगोयुगी।।''[३२]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची मसुदा समितीच्या अध्यक्षपदावर निवड झाल्यावर पं. नेहरूंचे सेक्रेटरी एम.ओ. मथाई आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भेट झाली. आंबेडकर मथाईला म्हणतात, ''हिंदूना महाभारत हवे होते तेव्हा त्यांना व्यास मिळाला, रामायणाची आवश्यकता भासली तेव्हा वाल्मिकी मिळाला. आता हिंदूना राज्यघटना हवी आहे त्यावेळी मला बोलावले. व्यास वाल्मिकी व आंबेडकर शूद्र होते.''[३३] प्राचीन काळापासून शुद्रांनी भार वाहिला. वेदाचा अर्थ ब्राह्मणांपेक्षा शुद्राला चांगला कळतो. मोहित्यांच्या विचाराला आंबेडकरांचे विधान अधिक पुष्टी देते व आता शुद्रांनी कोणाच्या दबावात न राहता स्वतंत्र विचाराने राहावे असा सल्ला देतात.

उत्तमराव म्हणतात की, बुवाबाजी जोतिष हा कल्पनेचा खेळ आहे. त्यात

---

३१. *Mohite Veer Uttamrao, Universal songs of life & truth, Page - 18.*

३२. *कित्ता, पृष्ठ – १६.*

३३. *सिंगारे अनिल, महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळीचा इतिहास, पृष्ठ – १९७.*

वस्तुस्थिती काही नाही. वेड्याच्या विचाराप्रमाणे या बाबी असून हे जगच कल्पनेचे आहे व जगाचीही कल्पना वेदवाद्यांनी केली. यातून 'शूद्र'जातीला सर्व सुविधांपासून वंचित ठेवले. खरं तर वेदवाद्यांची कल्पना शूद्रांनी ओळखली. वेदाचा अर्थ ब्राह्मणाला माहित नसून ज्याने त्रास सहन केला त्या शूद्राला माहित आहे म्हणून आता हजारो वर्षापासून आम्हास झालेला त्रास यापुढे सहन करणार नाहीत. म्हणून उघडपणे प्रस्थापित व्यवस्थेविरूद्ध युद्ध पुकारले न्यायासाठी आवाज दिला. न्याय मिळावा समता प्रस्थापित व्हावी असे वाटले पण तसे न झाल्याने बंडाळीची गरज व बंडाचे युद्धात रुपांतर केले असे म्हणता येईल.

हे करत असताना न्याय मार्ग कोणता हा सूचवतात. कल्पना, श्रेष्ठ, कनिष्ठ, लहान, मोठे या धर्माच्या आधारापेक्षा समता वास्तव सांगणारे विज्ञान महत्त्वाचे मानतात, यात फसवणूक नसून जीवनाचे अंतरंग व बाह्यांग जसे आहे तसे अनुभवायास मिळेल इथे कल्पनावाद नसून वास्तवाचे महत्त्व प्रतिपादन करतात.

''अंकातून झाले विज्ञान प्रगत। शब्द फसगत अनेकार्थी।।
प्रयोग संन्यास गणिताच्या रीती। धन ऋण गती प्रवाहात।।
चलचित्रपट जीवन हे सत्य। आदि आणि अंत प्राकृतिक।।
उत्तम द्रव्यत्व शाश्वत ते नित्य। लघुत्व गुरूत्व भेद नाही।।''[३४]

जगाची पृथ्वीची उत्पत्ती व तिचा अंत ही प्राकृतिक असून अमुक एकाने निर्माण केले. त्यामागील दैवी भूमिका नसून तो प्रकृतीचा भाग आहे. लहान मोठे काही नसून शाश्वत नित्य असणारे द्रव्यत्व आहे असे म्हणतात, मग असे असताना सुद्धा भारतातील स्थिती सांगतात.

''India! Why do you regard shudra to binferior? Is it because he has possion for material prosperity? I want to know who elsmantains & sustains humanity. The world cannot do without him

३४. *Mohite Veer Uttamrao, Universal songs of life & truth, Page - 21.*

for a moment leaf a tree does not move without material power. If both the rolef & ruled have a scientific view which is harmonious with the world you will find justice triumphant everywhere. I wish an auspicious day of equality to dawn when humanitarian morality will be considered to be supreme.''[३५] **भारतामध्ये शूद्र समजला जाणारा वर्ग संख्येने जास्त असून त्याला हीनत्वाने वागविले जाते. पण वस्तुस्थिती पाहता शूद्र हा येथील महत्त्वाचा घटक आहे. तो कष्टकरी श्रमिक आहे. तो इतरांना पोसण्याची क्षमता ठेवणारा आहे. स्वत:ला उच्च म्हणून घेणारे शुद्रावर अवलंबून आहेत. शूद्राने कार्य केले नाही तर व्यवस्थाच चालणार नाही असा कर्तृत्ववान शूद्र असताना त्याला हीन संबोधले पण समतेचा दिवस येईल आम्ही तसा प्रयत्न करतो व मानवी जीवन मानवता निर्माण होण्याची वाट पाहतो असे म्हणतात. पुढे ते असेही म्हणतात की, ''उत्तम अधम स्वाभाविक धर्म। आता शूद्र पर्व सुरू झाले.'' यावरून इथे फक्त चांगले आणि वाईट आहे दुसरे काही नाही. उत्तम शुद्रांमध्ये असल्याने आता अन्याय झुगारून शुद्रांचे राज्य प्रस्थापित होणार असे सांगतात. कारण येथील धर्म व गुरू भ्रष्ट झाले आहेत आणि उत्तम असणारे शुद्रांचे विचार व आचार हेच कामी येणार असल्याचे सांगतात.**

इथे शुद्रांचे राज्य म्हणजे कोणाचे असा प्रश्न पडतो तेंव्हा याचे निराकरण वीर उत्तमरावांच्या पुढील विधानाने स्पष्ट होते.

''धर्मगुरु धनवंत सोडूनी सोयरे।
शेतकरी कामकरी पांडुरंग सारे।।
माळी, बारी, कोष्टी, तेली, कुणबी, महार।
धनगर, कोळी, वाणी, पारधी, चांभार।।
कसाब, खाटीक, धोबी, गवळी, मराठे।
सुतार, कुंभार, मांग, म्हाली गोंड वाटे।।

---

३५. *कित्ता, पृष्ठ – २६, २७.*

ग्रामवासी खेडूत हे शूद्र कृष्ण रंग।

जात धर्म नाही एक पांडुरंग।।''[३६]

ग्रामीण भागात वास्तव्य करणाऱ्या पण धर्माचा उपदेश करणारे धर्मगुरू आणि धनवंत, श्रीमंत असे लोक सोडून बाकी सर्व जाती शुद्रामध्ये गणल्या. यातून त्यांनी प्रस्थापित वैदिक व्यवस्था अमान्य केली आणि धनवंतापेक्षा कष्टकरी कामगार कलावंत असे गुणवान व्यक्ती महत्त्वाच्या वाटल्या. यावरून उत्तमरावांना सामान्य समजल्या जाणाऱ्या आणि व्यवस्थेने दूर ठेवलेल्या समाजाचे राज्य अणावयाचे होते. प्रस्थापित व्यवस्थेविरूद्धचा लढा होता.

वीर उत्तमरावांना भेद नसणारे समताधिष्ठित समाज हिताचे विचार मानवता असलेला वैज्ञानिक समाजवाद निर्माण करावयाचा होता असे दिसते ते म्हणतात, नितीचे तत्त्व हे मानवता असते आणि अनिती असेल तर भेद व विषमता निती बरोबर मानवता व अनिती बरोबर विषमता असते. इथे वर्णाश्रम धर्माने अनिती बाळगली आणि विषमतावादी समाजरचना दृढ झाली. यामुळे माणूस माणसाकडे माणुसकीने न पाहता तो अमानुष कार्य करू लागला. मानवच मानवाला पशुपेक्षा जास्त हीन वागणुक देऊ लागला ते म्हणतात,

''नितीचे हे तत्त्व एक मानवता।

भेद विषमता अमानुष।।

वर्णाश्रम धर्म टाका रे गाडून।

याने निसंतान केले सारे।।

शुद्राच्या गळ्याला गाडगा बांधला।

खराटा पायाला, लाज नाही।।''[३७]

ही मानवाला लाजवणारी विषमता मानवच बाळगतो. तेव्हा तो मानव नसून पशु अविचारी किंवा कुविचारी बनलेला असतो. म्हणून वीर उत्तमरावांना अगदी

---

३६. *कित्ता, पृष्ठ – ३०.*

३७. *कित्ता, पृष्ठ – ३५.*

मनापासून वाटत होते आणि ज्याच्या नावे सर्व जाती आणि अनेक धर्माचे लोक बंधुभावाने वागतात. त्या पांडुरंगाजवळ आपले मन मोकळे करतात.

''Dear lord, I earnestly desire that a shudra regime may start soon! Untouchables have been down trodden from centuries together the gardener, barber, oil producer, fisherman, farmer etc. are all shudeas. Having preqched heterodox philosophy, priestly communalists very badly exploited the masses. At the outset, they praised the maratha to be their master; but ultimately he was given a broom to sweep their yards. Temporarily, stay where you are & unit with the universal shudra bond, materialism is our bith right. It only is the truth. Don't forget the pragmatic watchword inscribed below the Ashok Wheel that ultimately only truth will Prevail''[३८]

शूद्राचा जय घोष उत्तमराव करतात तेव्हा त्यांची शूद्रांबाबतची व्यापक कल्पना समोर ठेवली असता खऱ्या अर्थाने ते बहुजन हिताचे समर्थन करतात असे असताना बहुजनांचे हीत म्हटल्यावर अन्य जनांचा विरोध करतात असे नाही. उत्तमराव मोहिते समताधित्त समाजाची अपेक्षा करतात. हे करताना वैयक्तिक किंवा जातीय पातळीवरून ते कोणाची विडबंना करत नाहीत. फक्त समता निर्मितीस मानवीय विचाराला घातक असणाऱ्या अविचारा पासून समाजाला बचावतात असे करत असताना ते कठोर होऊन टिकेचे शस्त्र उचलतात. पण ही टीका मानवी जीवनात सुसाह्यता यावी यासाठी करतात. ते म्हणतात,

''जगात सारे सारेच मित्र।
मानवी एक अभंग सूत्र''[३९]

---

३८. *कित्ता, पृष्ठ – ८६, ८७.*

३९. *कित्ता, पृष्ठ – ८८.*

जगामध्ये मानवता निर्माण झाल्यास कोणी कोणाचा द्वेष किंवा शत्रुत्व करण्याची गरज नाही. कारण असे झाले असता सर्वच मित्र असतील.

एकंदरीत उत्तमराव मोहिते यांना असे सांगावयाचे आहे की, भारतीय समाजामध्ये अनेक जाती निर्माण होणे हे भारतीयांच्या अधोगतीचे लक्षण असून तिचा बिमोड न होण्याचे कारण म्हणजे या व्यवस्थेला पोसणारा प्रबळ विचार इथे आहे. या विचारावर वार करून हा विचार नष्ठ झाला नाही. याला येथील अध्यात्मिक व्यवस्था कारणीभूत आहे. दिशाभूल करणे व हेतू साधणे असा हेतू की जो फायदा थोड्यांचा आणि बहुसंख्यांकांचे नुकसान असणारा विचार साध्य करण्यासाठी मानवता विसरतात आणि अमानुषपणे निर्दयीपणे मानवाला पशुपेक्षा जास्त वाईट वागणुक देतात. शेतकरी, कष्टकरी, कामगार, दीन–दलित, दुबळा याला आपले भक्ष बनवतात. ही व्यवस्था काय निसर्गत: नसून मानवानेच निर्माण केली आहे व मानवतेला घातक असून मानवता प्रस्थापित झाली तर अन्य प्रश्न आपोआपच गळून पडतील आणि समताधिष्टित समाज निर्माण होईल. पण असे होत असताना विषमता ज्यांचे ध्येय आहे असा गट या विचारास विरोध करतो. म्हणून इथे एका बुद्धीच्या जोरावरच्या क्रांतीची अपेक्षा आहे.

मानवी जीवनाच्या सर्वांगाला व्यापणाऱ्या तत्त्वज्ञानाचा पाया महत्त्वाचा असतो. कारण सामाजिक जीवनातील समस्याकडे पाहण्याचे सर्व दृष्टीकोन तत्त्वज्ञानाशिवाय फक्त कल्पना ठरणे शक्य आहे. तत्त्वज्ञान विज्ञान व समाज यांच्यातील संबंधाचा शोध घेणे महत्त्वाचे आहे. मानवी जीवनाचा अभ्यास करत असताना मानव हा विश्वाचा भाग असल्याने मानवाच्या सर्वांगाचा अभ्यास करण्यासाठी विश्वाच्या अंतिम सत्याचा शोध घेण्याचे महत्त्वाचे ठरते आणि तसे कार्य मागील हजारो वर्षांपासून सुरू आहे.

''हिंदू धर्मानुसार ब्रह्मदेवाने सृष्टीची उत्पत्ती केली''[४०] ''हिंदू धर्माच्या

---

४०. *खंदारे साहेबराव, मराठ्यांचा सामाजिक, सांस्कृतिक इतिहास, पृष्ठ – ९१.*

तत्त्वज्ञानाचे मोक्ष हेच अंतिम उद्दिष्ट आहे.''[४१] ''ते मिळवण्यासाठी हिंदू धर्माने कर्म सिद्धांत सांगितला.''[४२] तर ''व्यक्तीच्या वास्तविक जीवनाला किंमत न देता मोक्ष व पुनर्जन्म या बाबी महत्त्वाच्या मानण्यासाठी सनातनी प्रयत्न करत असत. यासाठी कर्मविपाकाचा सिद्धांत दृढ बनवत.''[४३] यामुळे ''मोक्ष मिळवण्याचे नाना सायास, कर्मकांड, जप, जाप्य, यज्ञ यासाठी व्यक्ती जन्माला आली असून सर्वसामान्य हिंदू जनतेला धर्म म्हणजे कधीही न संपणारे जप जाप्य आणि समारंभ बनले. अध्यात्मिक बल किंवा नैतिक शुद्धीचे स्वरूप म्हणून हिंदू धर्माचा जनसामान्यावर कधीच प्रभाव पडला नाही.''[४४] कारण ''हिंदू समाज जातीबद्ध आहे एका जातीला दुसऱ्या जातीसोबत विवाहास मान्यता देत नाही.''[४५] तसेच ''स्त्री ही प्रगतीतील अडथळा आहे असे हिंदूधर्म मानतो.''[४६] या विचारांचा आणि अंतिम तत्त्वचा शोध घेण्याचे कार्य सुरू आहे. याबाबत विचार अनेकांनी मांडले. त्यातील अनेक विचार या हिंदूत्ववादी विचाराला जुळणारे आहेत. तसेच याउलट आधुनिक काळात या विचारांचे मूळ शोधण्यास उत्तमराव मोहिते यांनी सुरवात केली.

५.१.३ मराठा विरूध्द मराठा

उत्तमराव मोहिते म्हणतात, ''भारताच्या वैचारिक क्षेत्रात प्रचंड उलथापालथ चालू आहे. भारतीय समाजव्यवस्थेला प्रचंड धक्के बसत आहेत. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात संघर्ष होत आहे. जे जे जुने आहे ते कोलमडून पडत आहे. नवीन जोमाने नव्या तेजाने नव्याचा जन्म होत आहे. वर्ग संघर्षाच्या अशा अवस्थेत बोल, मराठा देशाच्या क्रांतीपुत्रा तुझे स्थान कोठे आहे? बोल असा सवाल करतात याचे उत्तर शोधले म्हणजे महाराष्ट्राचा इतिहास पाहिला असता मराठा व महाराष्ट्राचा विचार जो की, सामाजिक

---

४१. *केसकर भा.ग. (अनुवादीत), भारतीय तत्वज्ञानाची रूपरेषा, पृष्ठ – ६.*

४२. *साळुंखे आ.ह., हिंदू संस्कृती आणि स्त्री, पृष्ठ –११२.*

४३. *व्होरा राजेंद्र, आधुनिकता आणि परंपरा : एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्र, पृष्ठ – २४५.*

४४. ***Muzumdar R.C., History & Culture of India, Page - 21.***

४५. *जोशी पंडित महादेवशास्त्री, भारतीय संस्कृतिकोष, खंड –९, पृष्ठ – ६१.*

४६. *सांळुखे आ.ह., पूर्वोक्त, पृष्ठ – ११२.*

उन्नती साध्य करेल असा कोणी केला नाही. मराठ्यांच्या विकासासाठी राजश्री शाहू महाराज यांनी प्रयत्न केले.''[४७]

आंग्लाईमध्ये मराठा दोनशे संस्थानिक होते. यातून त्यांना दोन कारखाने, दोन महाविद्यालये चालवता आले नाहीत. उद्योगधंदे, सरकारी नौकरी इ. मध्ये स्थान उरले नाही. मराठा सर्वस्व गमावून बसलेला समाज आहे. सामाजिक संसारात मराठ्यांना गमवायचे काय शिल्लक राहिले आहे. दलित, श्रमजीवी जनतेच्या संसाराचा विध्वंस करून ''अध्यात्मिक वर्गाची समाजव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी परमेश्वराचा अवतार होतो''[४८] अशी मराठ्यांची मानसिकता बनली. यावर उत्तमराव मोहिते म्हणतात, ''राजश्री शाहू महाराज अवतार नव्हते त्यांनी येथील बहुजनांनी कोणती समाज व्यवस्था स्वीकारावी याची जंत्री राजश्री शाहू महाराजांनी तयार करून ठेवली.''[४९] शाहू महाराजांशिवाय जीवनाच्या मूलभूत विचाराला कोणताही मराठा कलाटणी देऊ शकला नाही. याचा अर्थ मराठा हा अविचारी किंवा अळशी आहे असा नाही. मराठा क्षात्र प्रवृत्तीचा आहे. शेतात कष्ट करणारा आहे, वेळ प्रसंगी ढाल–तलवार घेऊन रणांगणावर लढावे आणि राज्यकारभार चालवत असे असा असणारा मराठा ''अध्यात्माच्या आहारी गेला त्यावेळी या समाजाचे पतन झाले.''[५०] एखाद्या समाजाचे पतन झाले म्हणजे नेमके काय होते तर त्या समाजाच्या आधारशिला कोसळतात. राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक आणि सांस्कृतिक दृष्टीने समाजाचे अधिकार व उपभोग नष्ट होतो. म्हणून या सर्वांना एक सुत्रात बांधून एक विचार देणारे नितीमूल्य असतात. जेव्हा हे नितीमूल्य नष्ट होतात. तेंव्हा सर्व बाजूंनी पतन होते.

''नैतिक मूल्य समाज जीवनाच्या भौतिक गरजावर अवलंबून असतात. मराठा

---

४७. *मोहिते वीर उत्तमराव, (अप्रकाशित लेख) मराठा विरुद्ध मराठा, पृष्ठ – १.*

४८. *कित्ता, पृष्ठ – २.*

४९. *कित्ता, पृष्ठ – २.*

५०. *कित्ता, पृष्ठ – ३.*

धर्म नाही तो स्वभाव आहे आणि हिंदू धर्माचे तत्त्वज्ञान मराठा स्वभावाच्या विरुद्ध आहे. हिंदू धर्म मराठा समाजाचे शील हनन करणारा आहे. म्हणून मराठा हिंदू धर्माच्या अधीन झाल्याने त्याचे पतन झाले मराठ्यांना त्यांचा स्वाभाविक गुणधर्माची जाणीव करून देणे महत्त्वाचे आहे.''[५१] ''हिंदू धर्माच्या नरककुंडातून मराठा समाजाला उपसून काढणे मराठा जमातीच्या मुक्तीचे आंदोलन होय. यातून जाती तोडामोडा असा संदेश उत्तमरावांना द्यावयाचा नाही. कारण, जाती तोडून जातीवाद जाणार नाही किंवा आंतरजातीय विवाह केल्याने जातीवाद नष्ट होणार नाही. मागील शंभर वर्षाचा जाती तोडण्याचा प्रयत्न आहे पण जाती तुटल्या नाहीत.''[५२] उत्तमराव मोहिते यांच्या विधानाला पुष्टी मिळते ती ''जात ही एक स्वयंमर्यादित संस्था असल्यामुळे स्वभावत:च तिच्या सभासदावर भोजनादि सामाजिक व्यवहार अंतर्गतच करण्याची मर्यादा पडते म्हणजे ती जातीच्या स्वभावधर्माचाच एक परिणाम आहे.''[५३] तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, ''जात ही मनाची अवस्था आहे, वृत्ती आहे.... जातिविच्छद म्हणजे मनोवृत्तीतील परिवर्तन.... हिंदू जे जातीभेद पाळतात ते बुद्धीहीन व अमानुष आहेत. म्हणून नव्हे, तर ते अतिशय धर्मपरायण असल्यामुळे ते जातीभेद पाळतात. त्यांच्या मनात जातीयवृत्ती रुजवणारा धर्म हाच याला जबाबदार आहे.''[५४]

''ब्राह्मण ही पिळवणूकीची बलवान मनोवृत्ती आहे. म्हणून ब्राह्मण म्हणजे प्रतिगामीत्व तर अध्यात्म हा समाजवादाचा शत्रू आहे. भारतीयांना समाजवाद कळला नाही. वास्तविकपणे भारतीय समाजवादीच समाजवादाचे शत्रू आहेत.''[५५] भारतीय समाजामध्ये सुधारणांपासून पळ काढण्याची भूमिका घेतली जाते. तेव्हा असे म्हटले जाते की, देव, धर्म व अध्यात्म माझे आई–बाप व पत्नी मला सोडू देत नाही. ही पळवाट आहे. ही स्वत:ची व समाजाची केलेली फसवणूक आहे. यासाठी उत्तमराव

---

५१. *कित्ता, पृष्ठ – ३.*

५२. *कित्ता, पृष्ठ – ४.*

५३. *आंबेडकर बाबासाहेब, भगत सुर्यकांत (संपा.),जातिभेद निर्मुलन, पृष्ठ – ७.*

५४. *कित्ता, प्रस्तावना, पृष्ठ – ३.*

५५. *मोहिते वीर उत्तमराव, पूर्वोक्त, पृष्ठ – ५.*

स्वत:बाबत सांगतात, ''वयाच्या १८ व्या वर्षी स्वत:च्या वडीलांचे देव संडासमध्ये नेऊन टाकले त्यामुळे मला चांगला चोप मिळाला. पण महिन्यानंतर वडिलांच्या विचारात चांगला बदल झाला. ते म्हणाले मला या देव धर्माच्या घाणीतून उपसून काढले चांगले झाले.''[५६] मला अध्यात्मिक शापाने काही होणार नाही. असे प्रत्येकाचे मतपरिवर्तन झाल्याशिवाय साम्यवादी क्रांती घडवून आणण्याच्या वल्गना फोल आहेत.

''मराठ्यांचा शत्रू मराठेत्तर जमाती नाहीत तर मराठ्यातील घरंदाज घराणी बहुजन समाजाचे अर्थात श्रमजीवी मराठ्यांचे खरे हितशत्रू आहेत. म्हणून प्रतिगामी मराठ्यांचे नेतृत्व नष्ठ करणे आता आमचे ध्येय आहे.''[५७] उत्तमराव मोहिते यांना वैज्ञानिक मानवतावादी समाज घडवायचा होता त्यासाठी तसे प्रयत्न त्यांनी चालवले होते. हे प्रयत्न करताना दोषस्थळावर ते लक्ष केंद्रिकरण करून तो दुरुस्त होतो का पाहतात आणि होत नसेल तर त्या दोष स्थळांचा बिमोड करण्याचा प्रयत्न करतात. असे करत असताना कोणीही असो त्याला लक्ष करण्याचे कार्य उत्तमराव करतात. ते कोणाची तरफदारी करत नाहीत. सर्वांना समान या न्यायाने ते चालताना दिसतात.

उत्तमरावांचा शुद्ध हेतू पुढील विधानावरून समजतो. ''महाराष्ट्राच्या सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासात मागील शंभर वर्षात सामाजिक परिवर्तन घडून आले. त्याच्या पुढच्या टप्प्यात आम्हांला पदार्पण करावयाचे आहे. यासाठी मराठा तत्समजाती, महार, माळी आणि मुसलमान या भौतिकवादी क्रांतीत सामील होऊन एक झाला तर संपूर्ण भारतातील प्रतिगामी शक्ती पराभूत होतील. साऱ्या श्रमजीवी बहुजन समाजाचे हितसंबंध एक आहेत. श्रमजीवी बहुजन समाजातून जो नवीन पांढरपेशा मराठा जन्माला आला त्याने ही भूमिका समजून घेतली पाहीजे. या मानवतावादी परिवर्तनास जात आडवी येणे घातक आहे. अध्यात्मिक सुखवस्तू वर्ग बहुजन समाजाचा बुद्धीभेद जातीय स्तरावर करून बहुजन समाजात फुट पाडत आहे.''[५८]

---

५६. *कित्ता, पृष्ठ – ६.*

५७. *कित्ता, पृष्ठ – ७.*

५८. *कित्ता, पृष्ठ – ७,८.*

उत्तमराव मोहित्यांच्या वरील विचारांना पुष्टी मिळते ती ''श्रीनिवास हेमाडे''[५९] यांच्या विचारातून ''समाजमंदीर'' हे नाव जातीसूचक असून खरे ती मंदीरे ही नसतात कारण मंदीरे देवाची असतात. समाजाचे जाती जमातीचे मंदीर असू शकत नाही ते सभागृह असू शकते. पण भारतीय कार्यकर्ते आणि विचारकर्ते विनासंकोच समाजमंदीर ही संकल्पना जन्माला घालतात आणि त्याला महत्त्व प्राप्त करून जातीचे महत्त्व वाढवून समर्थन करतात याला भावनिक ब्लॅकमेलींगसाठी वापरतात. यावरून उत्तमरावांचे विचार रास्त असून त्यांना अपेक्षित असणारी समाज रचना निर्माण होत आहे असे म्हणता येईल.

अध्यात्मवाद्यांनी फुट पाडण्याचा प्रयास असतो. पण यातूनही समाज शिकत असल्याचे दिसते आणि त्यांनी समता निर्मितीसाठी वारकारी झाल्याचे योग्य वाटतात. कारण, ''हिंदू–मुस्लीमात ऐक्य वारकारी पंथामुळे होत आहे आणि नव्या काळाला नवा वारकरी उत्तमराव यांच्या विचारांना यश मिळत असल्याचे कुर्मुदासांच्या मंदीरात हिंदू–मुस्लीम ऐक्याचे प्रतीक यावरून दिसते. हे ठिकाण सोलापूर जिल्ह्यातील मंठा येते आहे.''[६०]

महाराष्ट्रामध्ये अनेक ठिकाणी होत असलेले सार्वजनिक शिवजयंती उत्सव यात अनेक जाती धर्माचे लोक एकत्र येऊन साजरे करतात तर अनेक कटआऊट (बॅनर) वर अनेक जातीय व अनेक धर्मीय महामानवांची फोटो व त्याप्रमाणेच वर्तन यावरून उत्तमरावांचे विचार महाराष्ट्रात रुजल्याचे दिसतात. तसेच ''अध्यात्मवादाचा डाव बहुजन ओळखायला लागले व ओळखून वागायला लागले असे राम जन्मभूमीचा न्यायालयाच्या निकालावेळी दंगे होतील म्हणून अनेक ठिकाणी बंदोबस्त होता. अनेक ठिकाणी बंदोबस्त नसतानाही दंगा झाला नाही उलट कमालीची शांतता राहिली.''[६१]

यावरून उत्तमरावांचे विचार समाजात रूजत असून नवसमाज निर्मितीची

---

५९. *डॉ.पाटोळे सुलभा, बायजा (नियतकालिक), मे – जून २००८.*

६०. *महाराव ज्ञानेश (संपा.), साप्ता. चित्रलेखा, दि. २५ जुलै २००५, पृष्ठ – ५.*

६१. *रामजन्मभूमी व बाबरी मशिद वाद व त्यावरील न्यायालयाचा निर्णय, सप्टेंबर २०१०.*

वैज्ञानिक मानवतावादी समता प्रस्थापित होत असल्याचे दिसते. उत्तमरावांनी सर्वांच्या एकत्वाची कल्पना मांडली याला वैज्ञानिक समताधिष्ठित समाज हा मुख्य आधार होता. काल्पनिक व दंतकथांना आधार नव्हता.

लोकमान्य टिळक मात्र समाजात पारंपरिक विचार रुजवत होते. त्यांना हजारो वर्षांपासून चालत आलेली विषमतावादी समाजव्यवस्था दृढ करायची होती. फुले, शाहू यांच्या विचारांनी बहुजन समाज उन्नती साधणार होता. पण यात मराठा महत्वाचा घटक होता आणि शाहुंच्या कार्यामुळे तो समतावादी भूमिका घेण्यास तत्पर झाला होता. ही सुधारणा होऊ नये असे टिळकांना वाटत होते. टिळक म्हणतात, ''ब्राह्मण व मराठे यांची सांगड मागल्या दोन हजार वर्षात तुटली नाही. ती मुसलमानांच्या ऐन भरभराटीत चौदाव्या–पंधराव्या शतकात टिकली असे सांगून आता हे लक्षात ठेवले पाहिजे की, हिंदू समाजाच्या (ब्राह्मण–मराठे) या दोन आधार स्तंभानी उभयंतास हितकर होईल असे वर्तन आजपर्यंत ठेवले तसेच पुढेही ठेवले पाहिजे.''[६२] यावरून टिळकांना पारंपरिक विषमतावादी समाजाची जोपासना मराठयांच्या आधाराने करावयाची होती. मराठ्यांना हाताशी धरून चातुवर्ण्य व्यवस्था मजबूत करावयाची असल्याचे दिसते. यात मराठ्यांची मदत होत असे. म्हणून उत्तमरावांनी मराठ्यांच्या वृत्तीचा विचार मांडून त्यांना बहुजन समाजाच्या हिताचा विचार करण्यास प्रवृत्त करण्यासाठी प्रयत्न केल्याचे दिसते.

समाजाची सर्व पकड धर्म व धार्मिक ग्रंथावर आधारलेली असल्याने सामाजिक परिवर्तन धार्मिक परिवर्तनाशिवाय होणार नव्हते. म्हणूनच उत्तमराव मोहिते यांनी धर्माचा मूळ असणाऱ्या ब्रह्म, अध्यात्म, देव, वेदांत, कर्मकांड या बाबींवर हल्ला चढवून तिचा समुळ नाश करण्यासाठी प्रयत्न करतात आणि नव्या समाजाचा आराखडा बनवतात. मोहिते सांगतात, ''विश्वाच्या मुळाशी असलेल्या अंतिम सत्याचा शोध घेण्याचे काम गेल्या चार हजार वर्षांपासून चालू आहे. यात मानवी संस्कृतीच्या प्राथमिक अवस्थेत

---

६२. *फाटक नरहर रघुनाथ, लोकमान्य, पृष्ठ – ९६.*

बुद्धीला जी गृहीत तत्वे गवसली भासली तीच अंतिम सत्य आहेत असे आतापर्यंत वाटत होते. आजही त्याच गृहीत तत्वांना महापंडीतांचा शोषक वर्ग उराशी बाळगून बसला आहे.''[६३] उत्तमरावांना असे सांगावयाचे आहे की, मानवाचा सर्वांगीण विकास झाला नव्हता. अशा प्रारंभीच्या काळात विश्वासंबंधीचे विचार आणि त्यासाठी केलेल्या कल्पना ह्या सत्य मानण्याचा प्रघात पडला पण त्या सत्य आहेत का? असा पाहण्याचा प्रयत्न झाला नाही.''तर्कशास्त्र (Logic) प्रत्यक्ष व्यवहार, मनोविज्ञान आणि वैज्ञनिकता (Dialectic) या आधारावर भारतीय सहा दर्शनापैकी न्याय, वैशेषिक, सांख्य आणि योग ही चार दर्शने निरिश्वरवादी आहेत. या दर्शनात कालांतराने वेदांतवाद्यांनी आपल्या विचारांची भेसूर भेसळ करून भारताच्या दार्शनिक इतिहासात पराकाष्ठेची घाण निर्माण केली.''[६४] आता नव्या युगात तरी या काल्पनिक बाबी बुद्धीच्या कसोटीवर घासून पाहिल्या पाहिजेत असे पाहिले असता त्या टिकत नाहीत. यामुळे ते सत्य नसून काल्पनिकता आहे आणि ही काल्पनिकता मानवाच्या विकासास हानीकारक असल्याने इथे वैज्ञानिकतेची आवश्यकता असल्याचे सांगतात. यासाठी त्यांनी ATHEISM IN INDIAN PHILOSOPHY हा ग्रंथ लिहून त्यातून वैज्ञानिक समाजनिर्मितीचा संकल्प मांडल्याचे दिसते.

उत्तमराव मोहिते यांनी सामाजीक क्रांती घडवून आणण्याचा प्रयत्न केला. ते म्हणतात, ''भारतात गांधी आणि नेहरू यांच्या नेतृत्वाने राजकीय क्रांती घडून आली आणि भारताला राजकीय स्वातंत्र्य मिळाले. पण भारताच्या सामाजिक क्रांतीचा प्रश्न अत्यंत गंभीर आहे. त्याची जाणीव अजून भारतीय जनतेला आली नाही. यासाठी सामाजिक क्रांतीचा अत्यंत महत्त्वाचा टप्पा पुढाऱ्यांचा, धनिकांचा, मध्यमवर्गीय पांढरपेशांचा नाही. सामाजिक क्रांतीच्या पोटात असलेल्या सांस्कृतीक मूल्याचा हा प्रश्न आहे. सांस्कृतिक मूल्यात बदल घडवून आणणे हा सामाजिक क्रांतीचा महत्त्वाचा

---

६३. *मोहिते वीर उत्तमराव, भारतीय तत्वज्ञानातील निरिश्वरवाद अथवा वैज्ञानिकतेचा सिध्दांत, पृष्ठ – १.*

६४. *कित्ता, पृष्ठ – २.*

टप्पा आहे.''[६५] हा टप्पा गाठण्याचे कार्य मराठा विज्ञान मंदिराच्या माध्यमातून उत्तमरावांनी केल्याचे दिसते.

उत्तमराव म्हणतात, आत्मा, अध्यात्मवाद, ब्रह्मविद्या, दैववादी संकल्पना, योगविद्येचा वास्तविकपणा, कर्मकांड व रूढी यांचा विचार करून आणि या सर्व हिंदूवादात असल्याने क्रांतीसाठी प्रथम ''हिंदूवाद नष्ठ केला पाहिजे तरच क्रांती होईल.''[६६] अशी क्रांती वैज्ञानिक भौतिकवादातून समताधिष्ठीत वैज्ञानिक समाजनिर्मिती हे उत्तमरावांचे सामाजिक विचार असल्याचे दिसतात.

एकंदरीत उत्तमराव मोहिते यांनी समाजव्यवस्थेचा अभ्यास करून व प्रत्यक्ष समाजात राहताना येणाऱ्या अनुभवावरून सामाजिक क्रांतीची संकल्पना मांडली. असे मांडत असताना त्यांनी समाजक्रांती यशस्वी होण्यासाठी देव, धर्म व अध्यात्माच्या परंपरेवर आधारलेल्या समाज व्यवस्थेला या काल्पनिक जगतातून बाहेर काढले. यासाठी विज्ञान दर्शनाची आवश्यकता प्रतिपादन केली आणि नवीन समाजरचनेचा पाया विज्ञान दर्शन हाच ठेवला आणि ही विचारधारा शेतकरी, कष्टकरी समाजात रुजवण्याचा प्रयत्न केला. यावरून उत्तमराव मोहिते यांना पिळवणूक करणाऱ्या वर्गापासून, शोषकांपासून अन्य समाज मूक्त करावयाचा असल्याचे दिसते. इथे उत्तमराव मार्क्सच्या विचारांचा आधार घेऊन भारतीय परिस्थितीतील समस्यांचा विचार करताना दिसतात. म्हणून समाजाच्या प्रगतीसाठी व शोषणातून मूक्त निर्भिड आणि वैज्ञानिक मूल्यांना महत्त्व देऊन समाजाच्या संदर्भात 'उत्तमवाद' मांडल्याचे दिसते.

५.२ धार्मिक योगदान

मानवी उत्पत्ती व प्रगतीचा आलेख समोर ठेवला असता दिसून येते की, मानवी जीवनावर निसर्गाची छाप खऱ्या अर्थाने आहे. प्रारंभिक अवस्था असो की, आजची

---

६५. *मोहिते वीर उत्तमराव यांचे अप्रकाशित हस्तलिखित, दि. २७/०३/१९८३, पृष्ठ – २.*

६६. ***Mohite Veer Uttamrao, New Conception of Indian Revolution, Page - 1.***

विकसित अवस्था निसर्गाचा प्रभाव मानवी बुद्धी व मनावर सतत होत असल्याचे दिसते. निसर्गासोबत संघर्ष व जवळीकता हा जिवीत प्राण्यांचा गुणधर्म आहे. मानव निसर्गाचा अभ्यासक आहे आणि अभ्यासातून निसर्गाचा अंदाज व नियमितता यावर आधारीत जीवन जगण्यासाठी तो आपली बुद्धीपणाला लावतो. यात प्रज्ञावंत तत्त्वज्ञानी दिपस्तंभासारखे माणसाला सुसंस्कृत करण्यासाठी आणि पगल्भ जीवन जगण्यासाठी मार्गदर्शन करतात. सामान्य माणसाला ज्या बाबींचे आकलन होत नाही. अशा बाबी प्रतिभावंत, प्रज्ञावंत तत्त्वज्ञानी आकलन करून देतात. वैयक्तिक, नैसर्गिक संकटांना समोर जाण्याचे मार्ग देतात. यातूनच ईश्वर, निसर्ग, धर्म, परंपरा यासाठी तत्त्वज्ञानांच्या माध्यमातून मार्गदर्शन करतात. धर्माला तत्त्वज्ञानाचा आधार असतो. जगातील कोणताही 'धर्म' तत्त्वावर आधारलेला असल्याचे दिसते. तत्त्वज्ञानाची निर्मिती ही मानव समाजाचे खास वैशिष्ट्य आहे आणि मानव समाजातील निवडक व्यक्ती आपल्या बुद्धीचा वापर करून तत्व शोधतात आणि अन्य समाज त्याचे अनुकरण करतो. ''धर्मा आधी तत्त्वज्ञानाची उत्पत्ती आहे हे मानवी स्वभावात बुद्धी मुलभूत असते हे सिद्ध होते.''[६७]

'धर्म' ही संकल्पना अनेकांनी मांडण्याचा प्रयत्न केला व या शब्दावरून अनेक वेगवेगळे विचार मांडले. धर्म म्हणजे काय? तो कसा असावा याचे विवेचन केले त्यातून 'धर्म' संकल्पना समजण्यास मदत होते. '''धर्म' या शब्दातील 'ध'मराठी वर्णमालेतील एकविसावे व्यंजन आहे.''[६८] या अद्याक्षरापासून धर्म शब्द बनतो. '''धर्म' हा शब्द 'धृ' या धातूपासून बनला असून याचा अर्थ धारण करणे असा होतो. यात लोक पुण्यात्म पुरुषाकडून सांगितलेली समाजधारणेची तत्त्वे, सामाजिक आचारसंहिता स्वीकारतात/धारण करतात तो धर्म''[६९] असा सांगून परमेश्वर प्राप्तीची साधने, विधियुक्त क्रिया, परमेश्वर विषयक दृष्टिकोन, उपासना, रूढी, परंपरा, शास्त्रे यांनी घालून दिलेले

६७. *सुंठणकर वा.र., बुद्धी, प्रेरणा आणि क्रांती, पृष्ठ – ३३.*

६८. *आपटे वा.गो., मराठी मराठी शब्दकोष, पृष्ठ – २८९.*

६९. *जोशी ज.वा., धर्माचे तत्वज्ञान, पृष्ठ – ६.*

नियम, आचार व पवित्र विधी, उपासना व शास्त्रोपचार यामुळे अंगी येणारे नैतिक सद्‌गुण सामाजिक न्यायाची व्यवस्थेची तत्त्व कायदा म्हणजे 'धर्म' असा धर्माबाबत अभिप्राय महाराष्ट्र शब्दकोषाने सांगितला. ''महाभारत धर्माला धारणातम् धर्म इत्याह असे म्हणतो''[७०] ''धर्म म्हणजे मनुष्य आणि ईश्वर यामधील संबंध असे सांगून कर्मकांड वेदांत व नीती या त्रयीचा समुच्चय म्हणजे धर्म''[७१] असे कृ.पा. कुलकर्णी यांचे मत आहे.

यावरून 'धर्म' या बाबींचा मानवाशी घनिष्ठ संबंध असून मानवसमूह आणि सामुहिक वर्तन व वैयक्तिक वर्तनासंबंधी सूचना देण्याबरोबरच परमेश्वर चिंतन व गूढ आणि अद्‌भूत बाबींचा मानवाशी संबंध जोडून चालवलेली मानवी जीवनपद्धतीची आधारभूत संस्था धर्म असल्याचे दिसते.

'धर्म' केंव्हा निर्माण झाला हा सहज पडणाऱ्या प्रश्नाचे उत्तर मात्र सहज देता येत नाही. मानवाच्या उदयाबरोबर धर्माचा उदय झाला का? मानवाने 'धर्म' निर्माण केला का? याचा अभ्यास केला असता असे दिसते की, ''धर्माचे युग सुरू होण्यापूर्वी जादूचे युग होऊन गेले. मानव जात धर्माकडे का वळली याचा शोध घेणे क्रमप्राप्त ठरले. 'फ्रेझर' म्हणतो, निसर्गाचे सत्य तत्व काय? या जिज्ञासेमुळे आणि निसर्गाची साधने आपल्या कामी उपयोगात आणण्यास अधिक उपयुक्त पद्धती सापडावी म्हणून माणसाने दिशा बदलली. मानवाला प्रथम हेच जाणवले निसर्गाला काबूत करू शकत नाही. इथे तो संभ्रमात पडला असावा व कारण शोधताना असे वाटले की, मानव व त्याचे सहकारी यांच्याशिवाय जग चालते. आपल्या पेक्षा शक्तीमान प्राणी अस्तित्वात असले पाहिजेत व अदृष्य राहून सृष्टीचे नियंत्रण करीत असले पाहिजेत. पूर्वी वाटणारा जादूचा प्रभाव आता अदृष्य प्राण्यामुळे घडवून येत आहे असे वाटू लागले.''[७२] 'डॉ.आ.ह. साळुंखे' यांनी धर्माच्या अनेक व्याख्यांचा अभ्यास करून धर्माचे स्वरूप

---

७०. *कित्ता, पृष्ठ – ३.*

७१. *कित्ता, पृष्ठ – ४.*

७२. *सुंठणकर वा.रा., पूर्वोक्त, पृष्ठ – ३२.*

सांगातात, ''कल्पित असून वास्तव मानल्या जाणाऱ्या विशिष्ट अशा अतिमानवी शक्तीला अनुकूल करून घेण्यासाठी मानवाने निर्माण केलेली उपासना पद्धती म्हणजे धर्म होय.''[७३]

वरील विधानांवर विचार केली असता 'फ्रेझर' व 'डॉ. आ.ह. साळुंखे' यांचे विचार मिळते जुळते वाटतात. कारण, जादू आणि अतिमानवी शक्ती यांना आपल्या काबूत करण्यासाठी ज्या तत्त्वावर आधारित पद्धती वापरली त्या तत्त्वाला 'धर्म' म्हणण्याचा प्रघात पडला असे यावरून सूचित होते.

'उत्तमराव मोहिते' या बाबत म्हणतात, ''मानवी संस्कृतीच्या प्रारंभिक अवस्थेत बुद्धीला जी गृहीत तत्त्वे गवसली भासली तीच अंतिम सत्य आहेत असे आतापर्यंत वाटत आले आहे. आजही त्याच गृहीत तत्त्वांना महापंडीतांचा शोषकवर्ग उराशी बाळगूण बसला आहे.''[७४] यावरून उत्तमराव मोहिते यांना उपरोक्त धर्माबाबतचे मत मान्य नाही. ही गृहीत तत्त्व, कल्पनाच सत्य भासवण्याचा आणि तीच कल्पना पुढे चालवण्याचा प्रयत्न झाल्याचे सांगावयाचे आहे. कारण, कोणतेही 'गृहीत तत्त्व' पुराव्यानिशी सिद्ध करण्याचा प्रयत्न केला नाही. म्हणून 'धर्म' ही काल्पनीक पद्धतीने चालणारी व्यवस्था आहे. याचा वास्तवतेशी संबंध जुडत नाही आणि संबंध जोडण्यासाठी ''विश्वातील अंतिम सत्याचा शोध घेण्याचा आणि मिळालेली गृहीतके सत्य आहेत हे सिद्ध करण्याच्या चार कसोट्या सांगतात, तर्कशास्त्र प्रत्यक्ष व्यवहार, मनोविज्ञान आणि वैज्ञानिकता होय.''[७५] वैज्ञानिक पद्धतीने धर्मतत्त्वांची चिकित्सा केली जात नाही आणि कोणी केली तर धर्मतत्त्व टिकत नाहीत. या चार कसोट्यांच्या आधारे वस्तूस्थितीदर्शक विचार समोर येऊ शकतात. ''विश्वाच्या मुळाशी असलेल्या अंतिम सत्याचा शोध घेण्यासाठी भारताच्या इतिहासात प्रयत्न झालेत त्या प्रयत्नात भारतीय दर्शनांचा समावेश होतो. ह्या सहा दर्शनापैकी पूर्वमीमांसा आणि ब्रह्मसुत्रे ही

---

७३. *डॉ. साळुंखे आ.ह., धर्म की धर्मापलीकडे, पृष्ठ – ९.*

७४. ***Mohite Veer Uttamrao, Atheisem in Indian Philosophy, Page - 1.***

७५. *कित्ता, पृष्ठ –१.*

शेवटची दोन 'ईश्वरवादी' आहेत. या ईश्वरवादालाच ब्रह्मविद्या अथवा वेदांत असे दुसरे नाव आहे.''[७६] या दर्शनातील शेवटची दोन अतार्किक, अवैज्ञानिक वाटतात. पहिल्या चार दर्शनात ही भेसळ झाली असून त्याचा चिकित्सक अभ्यासाची गरज असल्याचे सांगून तसा अभ्यासही करतात. यावरून भारतीय धार्मिक स्थिती पाहता प्रारंभिक अवस्थेतील गृहीतकावर अवलंबून असून सत्यशोधनाच्या कसोट्यावर ती उतरते का? हे पाहिले असता आणि धर्माचा जागतिक विचार केला असता ''जगातील सर्वच धर्म दैववादावर विश्वास टाकतात पण दैववादाविषयी ठोस पुरावा देत नाहीत.''[७७] तर ''मूर्तीपूजा, ब्रह्मविद्या, अध्यात्म आणि वेदप्रामाण्य या चार बाबींना हिंदू धर्म अथवा हिंदूत्व म्हणतात.''[७८] या तत्त्वावर आधारलेल्या धर्माची तत्त्वे यात काळाच्या ओघात बदल झाला असेल हा प्रश्न निर्माण होतो. यावर 'उत्तमरावांचे' समकालीन असणारे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' ''धर्म मूलत: प्राचीन असून काल व संस्कृती याची कितीही प्रगती झाली तरी त्याचे वर्णविषयक कायदे आजही जुन्या जोमानेच कार्यरत आहेत.''[७९] यावरून हिंदू धर्म प्रारंभिक अवस्थेपासून वर्णव्यवस्थाविषयक कायदा व त्याचा आधार देऊन जोपासना करत आहे. या व्यवस्थेत ''ब्राह्मण श्रेष्ठत्वाचा सिद्धांत, वेदोक्त व पुराणोक्त यातून श्रेष्ठत्व सिद्ध केले. 'मनुपासून' 'समर्थ रामदासांपर्यंत' हा सिद्धांत समाजाच्या माथ्यावर मारला. त्यासाठी 'धर्मग्रंथ', 'स्मृती', 'पुराणे' वगैरे निर्माण करण्यात आली आणि 'मनुने' सांगितलेले रामदासांनी सुनावले''[८०] अशा कारणाने हिंदू धर्म खिळखिळा बनला होता पण तोच कायम राहावा असा प्रयत्न चालू होता. या धर्मात ''बहिष्कृत, अस्पृष्य, परिया किंवा अतिशुद्र तर अत्यंज, अवर्ण अथवा नामशुद्र म्हणून संबंधित असत. सवर्ण हिंदूंना कुत्रा, मांजर,

---

७६. *कित्ता, पृष्ठ – ३.*

७७. ***Mohite Veer Uttamrao, New Conception of Indian Revolution, Page 1.***

७८. *मोहिते वीर उत्तमराव, जागतिक कृषक क्रांतीचा विधाता लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख, पृष्ठ – ५३७.*

७९. *डॉ. आंबेडकर बाबासाहेब, पूर्वोक्त, पृष्ठ – ९.*

८०. *पवार जयसिंगराव (संपा.), पूर्वोक्त, पृष्ठ – ३८.*

गाय या पाळीव जनावरांच्या स्पर्शाने विटाळ होत नसे. स्पृष्य हिंदू मुंग्यांना साखर अर्पित पण स्वधर्मियांचा स्पर्श ते अपवित्र मानत''[८१] अशी हिंदूची स्थिती असताना 'प्रबोधनकार ठाकरे'म्हणतात, ''हिंदू धर्म हे एक मोठे भटी गौडबंगाल आणि हिंदू संस्कृती म्हणजे बिनबुडाचे पिचके गाडगे यापेक्षा त्यात विशेष असे काहीच नाही.''[८२]

उत्तमराव मोहिते या विचारापासून अनभिज्ञ नव्हते. त्यांनी याबाबींचा अभ्यास केला. हिंदू धर्माचे मुख्य तत्त्वांचा अभ्यासही केला आणि आपले विचार प्रकट केले. शेतकऱ्यांविषयी म्हणतात,

''जगी ऐकला 'धर्म' हा मूर्तिमंत''....

''कृषा राबने 'धर्म' तुझा किसाना''....

''नको गंतवू रे अधर्मात पैसा''....

''खरा धर्म रे नांदतो अंतरंगात ....

सदाचार हा धर्म मानवाचा''

''नामर्दाचा धर्म रडतो पुराणी''[८३]

यावरून असे स्पष्ट आहे की, हिंदू धर्माच्या संदर्भात असलेले तत्त्वे विचार यातून सदाचारा ऐवजी अनाचार होतो आणि धर्माच्या नावाने शेतकरी कष्टकरी, सामान्य माणसांची लूट, पिळवणूक व फसवणूक होत आहे असा धर्म नसून सदाचार, माणुसकी मानवासाठी आवश्यक आहे आणि धर्मासाठी मग तो कोणताही असो. नितीचे तत्त्व महत्त्वाचे असते. कारण, 'धर्म' मानवी जीवनाला योग्य आणि न्याय वळण देण्यासाठी असतो. पण हिंदू धर्मात न्याय नसून विषमता प्रस्थापित झाली. उत्तमराव म्हणतात,

''नीतीचे हे तत्त्व एक मानवता।

भेद विषमता अमानुष।।

वर्णाश्रम धर्म टाका रे गाडून।

---

८१. *कीर धनंजय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पृष्ठ – १.*

८२. *ठाकरे प्रबोधनकार, देवळाचा धर्म आणि धर्माची देवळे, पृष्ठ – २.*

८३. *मोहिते वीर उत्तमराव, देवीच्या देवळात गोहत्या, पृष्ठ – १,२,६,७.*

याने निसंतान केले सारे ।।

शुद्राच्या गळ्याला गाडगा बांधला ।

खराटा पायाला, लाज नाही ।।

अधमाच्यासाठी साऱ्या सवलती ।

उत्तमला देती गोड थापा ।।''[८४]

इथे उत्तमरावांना मानवता प्रस्थापित व्हावी अशी त्यांची इच्छा असल्याचे दिसते. नीती चे तत्त्व भेदभावाचे नसते तर सर्व मानवांसाठी फायद्याचे कल्याणाचे असते. हे विचार देऊन मानवता प्रस्थापित करण्याचे विचार मांडतात. भेद आणि विषमता या मानवतेच्या विरूद्ध असून नीतीला मारक आहेत आणि वर्णाश्रम धर्म यामध्ये विषमता आहे. कारण, मानवाला मानवासारखे न वागवता त्याचा छळ करून त्याची शारीरिक व मानसिक खच्चीकरण करण्याचे विचार वर्णाश्रम धर्माने जोपासले. मानवामानवात भेद केला आणि उच्च वर्णियांनी कनिष्ठ वर्णियांचा छळ केला. गळ्यात गाडगे व पायाला झाडू, बांधला म्हणून उत्तमराव या वर्णाश्रम धर्माचा समूळ नाश करण्याची भाषा बोलताना दिसतात. इथे ते 'सुधारा' असे म्हणत नाहीत कारण, हिंदू धर्मामध्ये सुधारणा होणे त्यांना शक्य वाटत नसावे. उत्तमराव मोहित्यांचे हे विचार एकांगी वाटण्याची शक्यता नाकारता येत नाही. पण वस्तुस्थिती व त्या संबंधी विचार पाहिले पाहिजेत हे पाहता ''हिंदूस्थान धर्मवाद्यांचे पुरातन व सनातन मूळ–पीठ असल्यामुळे हिंदूस्थान इतकी मानवतेची हत्या दुसरीकडे कोठेच झाली नाही. हिंदू धर्माचे पाशवी मूळ इतके खोलवर गेलेले आहे की, विश्वामित्रापासून छत्रपती शाहू राजांपर्यंत धर्मभंजक क्रांतिकारकांनी अनेक वादळे उठवली. पण या विषवृक्षाचे उच्चाटन अजूनही झाले नाही. धर्मक्रांतीचा वारा सुटला की, सनातन मनोवृत्तीने आपला किंचीत रंग बदलावा व बदलेल्या स्वरूपात क्रांतीला कलाटणी द्यावी ही पुरातन धर्मगुरूंची रीत चालत आलेली आहे. यामुळे अजूनही धर्मगुरूंचा धुडगूस हिंदूस्थानच्या रंगभूमीवर

---

८४. मोहिते वीर उत्तमराव, जीवनगाथा, पृष्ठ – ११.

अत्यंत भयानक आधुनिक स्वरूपात चालू आहे.''[८५] हे उत्तमरावांचे विचार महत्त्वपूर्ण वाटतात.

हिंदूधर्माचे स्वरूप सांगताना 'सावरकर' म्हणतात,

''आसिन्धुसिंधूपर्यंता यस्य भारतभुमिका।
पितृभू: पुण्यभूश्चैव स वै हिंदूरिति स्मृत: ।।''

तर लोकमान्य टिळक म्हणतात,

''प्रमाण्य बुद्धिर्वेदेषु साधनानामनेकता।
उपस्यानामनियम एतद्धर्मस्य लक्षणम् ।।''[८६]

''हिंदू धर्माला श्रतीस्मृती पुराणोक्त असे हिंदू धर्माचे स्वरूप आहे.''[८७]

वरील हिंदू धर्माविषयीचे विचार पाहिले असता सावरकरांच्या व्याख्येत भूप्रदेशाचा उल्लेख येतो. तर प्रमाणग्रंथ नसणे, साधनेमध्ये एकवाक्यता नसणे, उपास्यदैवत कोणते या बाबत एकवाक्यता नसणे हे हिंदू धर्माचे स्वरूप आहे. तर श्रतीस्मृती आणि पुराणांचा आधार हिंदू धर्मास असल्याचे दिसते.

वीर उत्तमरावांच्या विचारांशी या बाबींची पडताळणी केली असता हिंदू धर्मात निश्चितता नव्हती याला वीर उत्तमरावांचे उपरोक्त विचार पाहिले असता आणि हिंदू धर्मासंबंधीच्या व्याख्या व स्वरूप पाहता हिंदू धर्माविरोधी अनेक धर्मभंजक क्रांतिकारकांनी हिंदू धर्माविरोधी घेतलेली भूमिका व कार्य यातून अनेक बदल झाले. पण मूळ गाभा मात्र कायम राहिला. या मुळावर घाव घालण्याचा प्रयत्न वीर उत्तमरावांचा असल्याचा दिसतो.

हिंदू धर्मातील देव, धर्म, चातुवर्ण्य हजारो जाती–पाती आणि त्यातून घडलेले समाजाचे विघटन हे सर्व ईश्वर निर्मित आहे की, मानव निर्मित? या प्रश्नाचा एकदा कायमचा सोक्षमोक्ष लावला गेला पाहिजे व तो काल्पनिक किंवा गृहीत तत्त्वावरचे

---

८५. *घोरपडे वा.ना. (संपा.), संदेश (साप्ताहिक), २६ जून १९४९.*

८६. *जोशी पंडित महादेवशास्त्री (संपा.), भारतीय सांस्कृतिककोष, खंड दहावा, पृ.– ३४६.*

८७. *कित्ता, पृष्ठ – ३४६.*

नसून प्रत्यक्ष लोकव्यवहाराच्या दृष्टिने कायमचा निकाल लावण्याची गरज प्रतिपादन करतात आणि या सर्व बाबी मानव निर्मित असून मानवता नष्ठ करणाऱ्या असल्याने त्या बदलण्याचा प्रयत्न करतात. ''या सनातनी वृत्ती विरोधी आणि मानवता प्रस्थापित करण्यासाठी अमरावतीचे वीर उत्तमराव मोहिते यांनी कोणाचीही भीड न ठेवता अत्यंत परखडपणे विचार मांडून ठेवले आहेत.''[८८]

उत्तमराव मोहिते हिंदू धर्माकडे पाहताना हिंदू धर्मात सुधारणा करण्याच्या विचाराकडे जात नाहित. सुधारणा होणे त्यांना शक्य वाटत नाही आणि आजपर्यंत झालेल्या सुधारणांचा विचार करून त्या वरवरच्या तर आहेत पण ज्या कारणाने सुधारणा करण्याची वेळ आली. ती कारणे तपासली असता त्यांच्या मुख्य कारणात दोष असल्याने मुळात गाभा चुकीचा आहे अशी त्यांची धारणा झाली. हिंदू धर्माचे मूळ चुकीच्या तत्त्वावर असल्याने जोपर्यंत ही मुळ तत्त्वे बदलत नाहीत. तोपर्यंत सुधारणा किंवा समानतेवर आधारित मानवतावादी विचार रुजणार नाही. यासाठी गत इतिहासाचा अभ्यास करतात आणि त्यातून त्यांच्या निदर्शनास येते की, ''छत्रपती शिवाजी महाराजांनी वर्णाश्रम धर्माविरूद्ध बंडखोरी केली.''[८९] यानंतर ''छत्रपती शाहू महाराजांनी क्षेत्री धर्मपीठावर कुर्तकोटी नेमून ब्रह्मविद्या हद्दपार करण्याचा प्रयत्न केला.''[९०] पण हिंदू धर्माला म्हणावा असा तडाखा बसला नाही. यातून उत्तमराव मोहित्यांना हिंदू धर्माच्या मुळावर घाव घालून मुळासकट हे विषमतावादी विचार खणून काढावे अशी त्यांची पक्की मनोभूमिका झाली. तत्कालीन परिस्थितीत उत्तमरावांना वैचारिक पाठबळ देणारा विचार 'भाई माधवराव बागल' यांचा असून उत्तमरावांच्या विचारांना अनुकूल विचार देणारे होते. ते म्हणतात, ''सर्व असमानतेचे मूळ चातुवर्ण्यात आहे ते गीतेत श्रीकृष्णाने गोवले आहे. हिंदू धर्माचा पाया मुळात असमानतेवर रोवलेला अहो. या धर्मात देव, आत्मा याला जागा असून मनुष्याला

---

८८. *चौधरी नागेश (संपा.), पूर्वोक्त, पृष्ठ – २८.*

८९. *मोहिते वीर उत्तमराव, जीवनगाथा, पृष्ठ – १६.*

९०. *कित्ता, पृष्ठ – २१.*

नाही. जोपर्यंत हिंदू धर्म आहे, तोपर्यंत महारवाडा राहणारच, जोपर्यंत तो पाळाला जाणार तो पर्यंत या देशातून सामाजिक विषमतेचे उच्चाटन होणार नाही.''[९१]

यावरून हिंदू धर्माने वास्तविक जीवनाला महत्त्व न देता काल्पनिक बाबी सत्य मानून त्या मिळवण्यासाठी व्यक्तिला सांगितलेला मार्ग हा मार्ग न राहता अडमार्ग ठरला. तो असा अडमार्ग जो या मार्गावरून चालतो. त्याला कुठेही विसावा तर नाही पण त्याचे साध्य ठिकाण त्याला मिळत नाही. यामुळे जीवनात निराशा, दु:ख, कष्ट सहन करूनही शेवटी केवळ आशा ठेवूनच जगावे लागते. मानवाने धर्म निर्माण केला. तो जीवन सुखाने व व्यवस्थित जगता यावे म्हणून निर्माण केला. जीवन व्यवहारात सुखरता यावी, सोय व्हावी असा धर्माचा उद्देश असताना हिंदू धर्म जीवन व्यवहाराकडे दुर्लक्ष करतो. यामुळे हा धर्म नको वाटणे स्वाभाविक आहे. पण असा धर्मच नसतो. ''जो धर्म व्यवहारिक मुद्यांकडे लक्ष देत नाही आणि ते मुद्दे सोडवण्याचा प्रयत्न करत नाही तो धर्म नाही.''[९२]

यावरून 'उत्तमराव मोहिते' यांचा विचार जो मानवता प्रस्थापित करणारा असून अंधानुकरण न करता वैज्ञानिक दृष्टिने चिकित्सकपणे जीवन सुलभ विचार त्यात नितीमत्ता महत्त्वाची मानून मानवता प्रस्थापित करण्यास येणारा अडथळा 'हिंदू धर्म' असून तो व्यवहारापासून व वस्तुनिष्ठ जीवनापासून दूर होता तो नाकारतात. यासाठी ज्या बाबी धर्माचा आधार बनल्या त्या बाबींचा विचार करून त्या बाबी मानवास व मानवतेस अनुकूल नसल्याचे सांगतात.

'उत्तमराव मोहीते' हिंदू धर्माबाबत म्हणतात, ''मुर्तीपूजा, ब्रह्मविद्या, अध्यात्म आणि वेदप्रमाण्य या चार बाबींनाच हिंदूधर्म अथवा हिंदूत्व म्हणतात.''[९३] अशी हिंदूत्वाची व्याख्या देऊन यामुळे समाजात होणारी धारणा विकृत पद्धतीने झाली व

---

९१. *धोंडगे केशव शंकरराव (संपा.), जयक्रांती (साप्ताहिक), १३ सप्टें. १९८३.*

९२. *चौधरी प्रकाश (संपा.), दै. लोकपथ, १० डिसेंबर १९९०.*

९३. *मोहिते वीर उत्तमराव, जागतिक कृषक क्रांतीचा विधाता लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख, पृष्ठ – ५३७.*

समाज प्रगतीपासून वंचित झाला. म्हणून स्थितीशील समाजव्यवस्था निर्माण करण्याचे कार्य हिंदू धर्माने केले असे उत्तमराव यांच्या विचारातून स्पष्ट होते.

'मुर्तिपूजा' हा समाजातील धर्माच्या आधाराने चालणारा प्रकार असून हा मानवाच्या मानसिक व बौध्दिक दुर्बलतेतून निर्माण झाला. मुर्तिपूजा हा धर्माचा भाग मानल्याने मानवाच्या बौध्दिक अधोगतीची सहज कल्पना येते. कारण मूर्ति निर्जीव वस्तूपासून बनवलेल्या असतात आणि त्यात कसलाही जीव अथवा संवेदना नसतात. या निर्जीव व संवेदनाहीन मूर्ती मानवास प्रसन्न होतात आणि वाईट परिस्थितीच्या वेळी धावून येतात अशी मानवाची झालेली स्थिती असून अशा व्यक्तिंना सत्य सांगणे पचत नाही. तो आपला वेडेपणा अज्ञानापोटी करतो आणि हा विषय न सोडल्याने तो सज्ञान ही होत नाही. म्हणून मूर्तीपूजा बाबत ते ठणकावून सांगतात,

''जडाच्या ठिकाणी चैतन्य पाहे
महामूर्ख हे मूर्तिपूजेत मोहे ।।२ ।।''[९४]

निसर्गात जे निर्जीव आहे ते सजीवाप्रमाणे वागते, बोलते अथवा कृती करते अशी कल्पना केलेली असते. वस्तुस्थिती निसर्गातील कोणतीही निर्जीव वस्तू भाव, भावना, कल्पना, मनाशी बुद्धीशी निगडीत असणाऱ्या बाबींपासून दूर असते. जडाच्या ठिकाणी चैतन्य पाहणे हा मुर्खपणा आहे आणि असा मुर्खपणाचा विचार डोक्यात आल्याने मूर्तिपूजेत मानव रमतो व वस्तुस्थिती पासून दूर जातो. यामुळे मूर्तीपूजा हा मानवी अधोगतीस महत्त्वाचे कारण असल्याचे मानतात. यावरून वीर उत्तमराव यांना देव विरोधी मानले जावू शकते. वीर उत्तमराव देवाच्या विरूद्ध होते का? देवाविषयी त्यांचे मत काय होते हे पाहिले असता असे दिसते.

''देवासाठी माझी सारी धडपड ।
अनंत पहाड ओलांडले ।।
मठ गोसाव्यांचे देऊळ देवांचे ।

---

९४. *मोहिते उत्तम पांडुरंग, देवीच्या देवळात गोहत्या, पृष्ठ – ४.*

आश्रम मुनींचे भटकलो ।।

नद्यानाले सारे पायतळी गेले ।

ठिकाण नुरले मला आता ।।

पांडुरंगा! तुच उत्तमाला सत्य ।

देवाचे अस्तित्व नाही दुजे ।।''[९५]

यावरून उत्तमरावांची देवाविषयीची भूमिका स्पष्ट होते. देव म्हणजे काय तो कसा आहे हे शोधण्यासाठी वीर उत्तमरावांनी प्रयत्न केले. देऊळ, गोसावी, आश्रम, मुनी, नद्या, नाले असे मानवनिर्मित व नैसर्गिक परिस्थितीचा अभ्यास केल्यानंतर वीर उत्तमरावांना पांडुरंगाशिवाय दुसरा देव नाही असे दिसते. कारण, पांडुरंगाजवळ सर्व जाती धर्माच्या लोकांना थारा होता. त्यांच्यात बंधूभाव होता,भेद नव्हता. दु:खीतांना सहारा होता. कर्मकांडाचे स्तोभ नसल्याने खरी मानवता इथे असल्याचे वीर उत्तमरावांना दिसते. म्हणून पांडुरंगाशिवाय अन्य देव ते नाकारतात. इथे देवाचे सत्य स्वरूप लपवून त्या ऐवजी देव नावाची दुकानदारी झाल्याचे सांगातात,

''उत्तमाचे देव अधमांनी नेले ।

पुजारी बसले मंदिरात ।।

देवळे ही आता पापाची दुकाने ।

तेथे उत्तमाने जावू नये ।।''[९६]

वीर उत्तमरावांना समाजमान्य आणि धर्ममान्य असलेली तत्कालीन काळातील देवाविषयीची संकल्पना मान्य नव्हती. देवाला नवस करणे, अंगात येणे, देवाची कृपा, इच्छा, देव पावणे अशा बाबी वीर उत्तमरावांना मान्य नव्हत्या. देवाची पूजा करणे, जप करणे या माध्यमातून सांगितलेला देव ते मानत नाहीत. त्यांच्या ''स्वत:च्या घरातील देव त्यांनी फेकून दिले.''[९७]

---

९५. *मोहिते वीर उत्तमराव, जीवनगाथा, पृष्ठ – १०.*

९६. *कित्ता, पृष्ठ – १०.*

९७. *लहाने उत्तमराव यांची मुलाखत, दि. ११ ऑगस्ट २०११.*

''फोडा यांची पोटं देव ठेरपोटे। भारीच भामटे अत्याचारी।।

पाठीवरी यांच्या झाडावा हंटर। लक्षुनी कंबर हाणा लाथा।।

देवाला वाजवा एक एक जोडा। संपेल तै पीडा मानवाची।।

दु:खाचे हे मूळ देवाची भावना। अध्यात्म वल्गना भयंकर।।''[९८]

मानवी जीवन दु:खमय बनवण्यास देवाची भावना हे कारण आहे. देव नावाची कल्पना ही चुकीची असून त्यांना विनवणी अथवा मान सन्मान देण्याची गरज नाही. तर कष्टकरी समाजाला मान देण्याची आवश्यकता असून समानता निर्माण करण्याची गरज आहे. असे असताना चित्र मात्र उलट दिसते. कष्टकरी श्रम, कर्तव्यदक्ष असणारा मानव 'देव' या संकल्पनेने अखूड होतो म्हणून देवापेक्षा मानवता श्रेष्ठ आहे. असे वीर उत्तमराव सांगतात. यातून उत्तमराव मोहिते यांना काल्पनिक देव व त्या विषयीच्या संकल्पना मान्य नसून ते समतेचा संदेश देऊन जाती धर्माची बंधने धुडकावणाऱ्या 'पांडुरंग' या देवास मानतात त्याच्या विकृत स्वरूपाला नाही.

हिंदू धर्माच्या संदर्भाने उत्तमराव 'अध्यात्म' या बाबीकडे चिकित्सक दृष्टीने पाहतात आणि अध्यात्माच्या बाबतीत म्हणतात, ''अध्यात्माने मानव जातीचे नैतिक उत्थान केले ही कल्पनाच संसारातील आणि व्यवहारातील सर्वात मोठी थाप आहे ही प्रत्यक्ष लबाडी आहे. संपूर्ण अध्यात्म भयंकर थोतांड आहे आणि भौतिक वैज्ञानिकतेशी प्रतारणा मानव जातीशी केलेला सर्वात मोठा गुन्हा आहे.''[९९] मानवतेसाठी अनभिज्ञ श्रमजीवी बहुजन समाजाला अध्यात्मिक नरककुंडातून काढण्यासाठी भौतिकवादी वैज्ञानिकतेची अनिवार्य गरज निर्माण झाली आहे.

''भोवतालच्या जगाकडे काळजीपूर्वक पाहिले असता दिसून येईल की, विश्वातील साऱ्या वस्तू आणि सारे दृष्य विषय भौतिक आहेत किंवा मानसिक आहेत. भौतिक वस्तू आणि घटना यांचे अस्तित्व मानवी मनापासून स्वतंत्र आहे. याच्या

---

९८. *मोहिते वीर उत्तमराव, पूर्वोक्त, पृष्ठ – १५.*

९९. ***Mohite Veer Uttamrao, Atheism in Indian Philosophy, Page - 6.***

उलट, ज्याचे अस्तित्व मानवी मनावर अवलंबून आहे किंवा ज्यांचा समावेश मानसिक प्रक्रियेत होतो. त्यांचा संबंध आत्म्याशी येतो. त्यांना आध्यात्मिक म्हणतात.''[१००] यावरून उत्तमराव जगाच्या निरीक्षणातून सांगतात, भौतिकता मानवी मनापासून स्वतंत्र असल्याने मनाचा संबंध आत्म्याशी येतो याला अध्यात्म म्हणतात. म्हणून अध्यात्म हा मानवी मनाशी संबंधित असून मनाच्या अविष्कारावर त्याचे स्वरूप व कार्यपद्धती ठरते इथे बुद्धी वस्तुस्थिती यांना फारशे महत्त्व नसून भावनांना महत्त्व असते.

वीर उत्तमराव मोहिते यांना कल्पनावाद किंवा आदर्शवादावर विश्वास नव्हता. जीवनातील प्रसंग 'वास्तव व तर्क' यांच्या माध्यमातून उकलण्याचा प्रयत्न करतात. जेव्हा ते वास्तवता आणि तर्क या कसोट्या धर्माबाबत लावतात. तेव्हा धर्म हा आदर्श व कल्पना यावर आधारीत असल्याने त्यात जीवनाच्या प्रत्यक्ष व्यवहार नसल्याने धर्म व त्यासंबंधीचे विचार अमान्य करतात आणि वैज्ञानिक मार्ग सांगतात. वैज्ञानिकतेमुळे धर्माची चिकित्सा झाली आणि धर्मातील थोतांड बाबी मानवाच्या अधोगती करतात अशी भूमिका घेऊन वीर उत्तमराव मानवी जीवनात धर्माची निष्क्रीयता दर्शवतात.

''धर्मासाठी सतत संघर्ष सुरू राहिला. पण जगभरात धर्मासाठी आणि धर्मामुळे जितकं रक्त सांडलयं, तितकं अन्य कोणत्याही कारणाने सांडले नाही.''[१०१] यावरून धर्माच्या माध्यमातून हिंसा घडून आली. एक धर्म दुसऱ्या धर्माचा शत्रू अशी स्थिती दिसते. अनेक निष्पाप ज्याला 'धर्म' म्हणजे काय हे कळत नाही. अशांना आपल्या प्राणास मुकावे लागते. यास त्या–त्या धर्माच्या तत्त्वज्ञानाचा परिणाम असतो आणि तत्त्वज्ञान ही मानवनिर्मित असल्याने धर्म व देवाचा आधार देऊन मानवांनी वापरले. धर्म, तत्त्वज्ञान, देव या मानवी मनाशी निगडित संकल्पना आहेत. जगातील सर्वच धर्म, दैववादांवर, आत्मा, अध्यात्म यावर विश्वास ठेवतात पण ठोस पुरावा देत नाहीत.

---

१००. मोहिते वीर उत्तमराव, कार्ल मार्क्सचा भौतिकवादी वैज्ञानिकतेचा सिद्धांत, पृष्ठ – १.

१०१. महाराव ज्ञानेश (संपा.), चित्रलेखा, दि. २३ जुलै २००७, पृष्ठ – १०

''ज्यावेळी मानवाला देवाची कल्पना नव्हती. तेव्हा त्याला चांगले वाईट याची तीव्र जाणीव होती. ही जाणीव त्याची सहज प्रवृत्ती होती.''[१०२] यावरून नीती व तत्त्वाच्या मुळाशी मानवी बुद्धी असते ती वाईटाला नाकारून चांगल्या बाबींचा योग्य उपयोगास चालना देते तर देव, धर्म, अध्यात्म या मनाशी निगडित असल्याने कल्पकता व भावनिकता यांना महत्त्व असते. ज्यावेळी मन अशा कल्पक बाबींकडे वळते आणि त्याची तीव्रता वाढते. तेव्हा वास्तवाशी त्याचा संबंध राहत नाही आणि वास्तवाशी संबंध असणे मानवी हिताचे असल्याने धर्म व धार्मिक बाबी उत्तमराव नाकारतात व त्या ऐवजी वास्तववादी विचार प्रामुख्याने स्वीकारतात आणि वैज्ञानिकता यासाठी उत्तम असल्याने वैज्ञानिक भौतिकवादी विचार महत्त्वाचा मानतात.

एकंदरीत वीर उत्तमराव मोहिते यांची धर्मविषयक भूमिका अभ्यासली असता 'धर्म' ही मानवी प्रगतीतील अडसर असून हिंदू धर्म त्याचे उत्तम उदाहरण आहे. हिंदू धर्मातील तत्त्वज्ञान विकृत वळणास पोषक असल्याने त्यांनी हिंदू धर्माचे दहन केले. आजतागायत अनेक वेळा पूर्वीचा धर्म नाकरला असे करत असताना त्याला पर्याय म्हणून नव्या धर्माची किंवा सुधारित धर्माची व्यवस्था करण्यात आली. पण उत्तमराव मोहिते अशी कोणतीही व्यवस्था न देता वैज्ञानिकता व भौतिकवाद हे वस्तुस्थिती दर्शक असल्याने मानवता व वास्तवता या बाबींना महत्त्व देतात.

५.३ सत्यशोधकीय योगदान

भारतामध्ये सत्यशोधकीय विचारांचा वारसा प्राचीन आहे. लोकायत, सांख्य, नाथ, तांत्रिक, बौद्ध, जैन मध्ययुगामध्ये महानुभाव, वारकरी, लिंगायत यांनी सत्यशोधकीय विचार देण्याची कधी सातत्याने तर कधी खंडीत परंपरा कायम ठेवल्याचे दिसते. यामध्ये वर्णभेद, लिंगभेद व भाषा विरुद्ध प्रस्थापित व्यवस्थेविरूद्ध लढा पुकारून समता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. इ.स. १८५३ मध्ये महात्मा जोतीराम

---

१०२. सुंठणकर वा.रं., पूर्वोक्त, पृष्ठ – ३२.

फुले यांनी 'निर्मिकाचा शोध' हे चार पानी पद्य छापले. तसेच 'मनुस्मृतीचा धिक्कार' हा निबंध प्रकाशित केला. आणि यापुढे विस्ताराने लेखन करून ''२४ सप्टेंबर १८७३ मध्ये सत्यशोधक समाजाची स्थापना केली.''[१०३] यातून त्यांना सामाजिक समता, मानवता, विवेकवाद यावर प्रकाश टाकून खरा मार्ग दाखवला. माधवराव बागल महाराष्ट्राचे कार्ल मार्क्स असा फुले यांचा उल्लेख करतात. या विचाराला पुढे नेणारांच्या संख्येत भर पडली आणि विचारात पूर्णता येत गेली. या विचारांचा मुख्य गाभा न हरवता हे विचार लवचिक व उन्नत होत राहिले.

महाराष्ट्रामध्ये स्वातंत्र्याची चळवळ गतीमान असताना सत्यशोधक चळवळीचा विचार प्रभावी होता. हे तत्कालीन वैदीक परंपरेच्या लेखकांच्या लेखनीतून दिसून येते.

''अमरावती येथे काशीरावबापू देशमुख, लढके गुरुजी, ॲड. ज.सी. अकर्ते, मोर्शीचे शामराव यादवराव गुंड, उमेरडचे अमृतराव कोटमकर, बुलढाण्याचे पंढरीनाथ पाटील अशी मंडळी सत्यशोधकीय रणांगणावर लढताना उत्तमरावांनी पाहिली व त्यात ते सहभागी झाले.''[१०४] यामुळे महात्मा जोतीराव फुले यांनी सुरू केलेला सत्यशोधकीय लढा विदर्भात पसरला होता आणि उत्तमराव मोहिते यांनी या सत्यशोधकीय विचाराचे बाळकडू घेतले होते. म्हणूनच उत्तमराव म्हणतात,

''सत्यशोधक मी सत्याचे चिंतन।
सत्यवीण कोण तारी मला।।''[१०५]

उत्तमराव मोहिते सत्य हे तत्त्व जीवनभर जपतात. उत्तमरावांचे सत्य आणि मा. गांधीचे सत्य यात अनेक अर्थाने फरक दिसून येतो. म. गांधी सत्य हा शब्द दैनंदिन व्यवहारात बोलण्यासाठी वापरतात आणि त्या शब्दापाठीमागे अध्यात्म आहे तर उत्तमराव मोहिते 'सत्य' हा शब्द दैनंदिन व्यवहारासाठी तर वापरतातच पण

---

१०३. गुंदेकर श्रीराम, सत्यशोधकीय साहित्य, परंपरा आणि स्वरूप, पृष्ठ – ०९.

१०४. मोहड सुधाकर, विदर्भाचा अग्निपुरुष स्वातंत्र्यसंग्राम सेनानी वीर उत्तमराव मोहिते, पृष्ठ – १.

१०५. मोहिते वीर उत्तमराव, जीवनगाथा, पृष्ठ – ३.

अध्यात्माऐवजी वैज्ञानिक, भौतिकवाद या दृष्टीने तसेच सत्य शोधण्यासाठी उत्तमराव सत्य हा शब्द वापरतात म्हणून गांधीजीपेक्षा वीर उत्तमराव मोहिते यांचा सत्य शब्द अधिक व्यापक वाटतो.

''जन्मताच तुला पाजिले जहर
वेदोक्त संस्कार उरकला
देवधर्म डोळे हिरवेची झाले
ज्ञानचक्षू गेले फुटोनिया
ओतले रे तूप अंधश्रद्धेवर
दैवीक कापूर पेटविला
जीवन आहुती त्यागाच्या यज्ञात
बळी दिला शुद्र उत्तमाचा''[१०६]

येथे उत्तमराव मोहिते सत्य शोधताना शोधनाच्या मूळ गाभ्याकडे जाताना दिसतात. हिंदू धर्माचा प्रमुख आधार वेद असून त्यावर आधारित निर्मित ग्रंथामधून जी फसगत केली. त्याबाबत वरील काव्य पंक्तितून सांगताना दिसतात. मानवामध्ये कसलाही भेद न ठेवता समता तत्वावर आधारित लोकजीवन उत्तमरावांना अपेक्षित असताना सर्वत्र विषमता दिसून आली. या विषमतेचे जहर जन्माबरोबरच पाजले गेले. ज्या जातीत–धर्मात जन्माला त्या जातीतच मरणार यालाच उत्तमराव त्यागाचा यज्ञ असे संबोधतात. कारण एखाद्या गोष्टीची इच्छा असताना सुद्धा जातीमुळे ती करू न शकल्याने त्या इच्छेचा त्याग करावा लागला, आणि त्यामध्येच जीवनातील उत्तम तत्वांचा बळी दिला गेला.

उत्तमराव मोहिते यांनी सामाजिक जीवनामध्ये आमूलाग्र बदलाची अपेक्षा ठेवली. पण बदलाबाबत सांगताना मात्र लोक भाषेत लोकांपर्यंत पोहचण्यासाठी एक

---

१०६. *कित्ता, पृष्ठ – ४.*

प्रकारची बंदीच होती. ही बंदी उत्तमरावांनी तोडून याचे बूड सांगितले आहे. वीर उत्तमराव मोहिते म्हणतात,

''सत्य बोलण्याची मराठीत चोरी
शब्दांना वापरी मोजूनिया
सत्य बोलू जाता ब्रह्म हत्या होई
न्याय निती नाही पंडितांना
जातीवादी येथे भारी मस्तावले
उघडेची केले अंतरंग
जेथे जेथे तुम्हा दिसे अत्याचार
त्याचे सुत्रधार ब्रह्मवादी''[१०७]

असा मुळावर घाव उत्तमरावांनी घातला. मनुष्य हा निसर्गातून निर्माण झालेला आहे. धर्म ही मानवी मेंदूतून उत्पन्न झालेली एक कल्पना आहे. धर्माचे तत्वज्ञान विज्ञानवादी नसेल आणि अंधश्रद्धेवर आधारलेले असेल तर तो अधर्म ठरतो. अधर्म हा विज्ञान विरोधी असतो. प्रतिगामी धर्म मानवास वरदान ठरत नसून शाप ठरतो. म्हणून धर्मतत्त्वे विज्ञानाच्या कसोटीला तपासून घ्या असा संदेश वीर उत्तमराव देतात. तेराव्या शतकात ज्ञानेश्वरांनी मराठीत ज्ञानेश्वरी हा ग्रंथ लिहिला आणि संस्कृत विरोधी बंड केले. ते आपल्या ग्रंथात मराठीचे महत्त्व प्रतिपादन करतात. यामुळे त्यांना ब्राह्मणांचा त्रास सहन करावा लागला. पुढे याच पद्धतीने संत तुकारामांना त्रास सहन करावा लागला. यावरून संस्कृतचा पगडा मिरवणाऱ्या ब्राह्मणवादी विचाराने बहुसंख्य मराठी वाचकाला अज्ञानात ठेवले.

जगातील सर्व तऱ्हेच्या अन्याय व अत्याचारांचे मूळ धर्म हेच आहे. धर्माने मानव जातीची जी हानी केली. तिला इतिहासात तोड नाही. हिंदूस्थान धर्मवाद्यांचे पुरातन व सनातन मूळपीठ असल्याने हिंदूस्थान इतकी मानवतेची हत्या दुसरीकडे

१०७. *कित्ता, पृष्ठ – १५.*

कोठेच झाली नाही. हिंदू धर्माचे पाशवी मूळ इतके खोलवर गेलेले आहे की, विश्वामित्रांपासून ते शाहू राजापर्यंत धर्मभंजक क्रांतिकारकांनी अनेक वादळे उठविली पण या विषवृक्षाचे उच्चाटन अजूनही झाले नाही. अजूनही धर्मगुरूंचा धुडगूस हिंदूस्थानच्या रंगभूमीवर अत्यंत भयानकरितीने आधुनिक स्वरूपात चालू आहे. धर्मगुरूंनी देवधर्माचे विष समाजाच्या रोमारोमात इतके भयानक रीतीने पेरले आहे की त्या करीताच भविष्यकाळात स्वतंत्र जनक्रांती झाल्याशिवाय राहणार नाही.

महाराष्ट्राच्या संदर्भाने सत्यशोधकीय चळवळीबाबत विचार केला असता उत्तमराव मोहिते म्हणतात, ''महाराष्ट्राच्या इतिहासातील दलित जनतेचा क्रांतीकारी उठाव म्हणून सत्यशोधक चळवळ होती.''[१०८] महाराष्ट्राच्या इतिहासातील दलित जनतेचा क्रांतिकारी उठाव म्हणून सत्यशोधक चळवळ होती. दीर्घकाळापर्यंत झोपी गेलेल्या बहुजन समाज सत्यशोधक चळवळीने जागा केला. या क्रांतीकारी आंदोलनाला ब्राह्मण जातीने कसून विरोध केला म्हणूनच ब्राह्मणेत्तर चळवळीचे स्वरुप तिला प्राप्त झाले. मानवता, समता, न्याय बंधुभाव यावर आधारित विचारधारेला धर्मगुरुंनी विरोध केला. जोपर्यंत अशा चळवळीला शेतकरी व कामगार क्रांतीचे स्वरुप प्राप्त होत नाही तोपर्यंत क्रांती यशस्वी होत नाही. भारताच्या सामाजिक क्रांतीचा संघर्ष अत्यंत गंभीर आहे. यासारखा गंभीर दुसरा कोणताही प्रश्न नाही. सुदैवाने दक्षिण भारतात फुले–शाहू–पेरीयार–आंबेडकर–पंजाबराव यांनी हात घातला पण त्यांच्या परिश्रमाला अपेक्षित यश आले नाही. ही फळे यावीत म्हणून उत्तमरावांनी प्रयत्न केल्याचे दिसतात.

५.३.१ सत्यशोधकीय पुर्नमांडणी

उत्तमराव मोहिते यांनी महात्मा जोतीराव फुले यांनी प्रतिपादन केलेल्या सत्यशोधक विचारधारेवरच पण फुले यांच्यानंतर झालेले कार्य बदलता काळ व परिस्थिती विचारात घेऊन सत्यशोधकीय पुर्नमांडणी केली. सत्यशोधक समाजाच्या

---

१०८. घोरपडे वा. न. (संपा.), पूर्वोक्त.

जलशातील नटसम्राट पंढरीनाथ पाटील उत्तमराव मोहित्यांचे समकालीन मित्र होते. उत्तमराव यांनी सत्यशोधक समाजाची तत्त्वे एकविसाव्या शतकाला पुढे ठेवून पुर्नमांडणी केली. ''सामाजिक–सांस्कृतिक, शैक्षणिक, आर्थिक स्वातंत्र्याचे, वैज्ञानिक व मानवतावादी तत्त्वज्ञान उत्तमरावांनी निर्भयपणे समाजापुढे ठेवले.''[१०९]

- भारतीय भटशाही भारतीय भांडवलशाहीला मोलकरीण व देवदासी म्हणून राबविते व नाचविते.
- स्वतंत्र भारतातील पेशवाई जमीनदारी मालगुजारांना 'घरगडी व वेठबिगार' म्हणून वापरते.
- बालपिढीची मने, मेंदू आणि मनगटे यांना मक्तेदारी ब्राह्मणशाहीने विषमतेची व भेदाभेदाची कीड लावून पोखरले व लाचार आणि बधीर बनवले.
- भटशाहीने श्रुतीस्मृती शास्त्रांना बहुजनांच्या गुलामगिरीची शस्त्रे म्हणून वापरले.
- ब्राह्मणशाही म्हणजे बहुमुखी व बहुआयामी शोषण व्यवस्था भारताला आणि बहुजनांना गुलामीत अडकविण्यासाठी ब्राह्मणशाही निष्ठा कौटिल्यपूर्ण रीतीने राबविते.
- जातीस्वार्थ हाच ब्राह्मणशाहीचा मूलाधार व ध्येयवाद! याविरुद्ध उठणाऱ्या ब्राह्मणांना ही ब्राह्मणशाही वाळीत टाकते, बहिष्कृत करते आणि मृत्यूदंड ठोठावते.

जोवर ब्राह्मणशाही आहे तोवर स्वतंत्र भारतात व स्वतंत्र जगात नावालाही स्वातंत्र्य, समृद्धी, समता, सभ्यता नाही. जनशोषण हीच ब्राह्मणशाहीची संस्कृती. ब्राह्मणशाही विकृतीलाच संस्कृती मानून मानवतेचे विडंबन व विटंबन करते आणि उजळ माथ्याने वर सोवळे नेसून वावरते. ''महात्मा फुले यांनी याचेच विश्लेषण दिले वीर उत्तमरावांनी हे उलथवण्यासाठीच लेखणी झिजवली.''[११०] ब्राह्मणशाही व्यवस्थेचा

---

१०९. *मोहड सुधाकर, पूर्वोक्त, पृष्ठ – २.*

११०. *कित्ता, पृष्ठ – ३.*

संहार करून बहुजनशाही व्यवस्थेचे सृजन मंदीर विरूद्ध विद्यामंदीर असा हा मूलगामी व्यवस्था संघर्ष स्वतंत्र भारताला ब्राह्मणीकरणाकडून बहुजनीकरणाकडे वळवायला हवे अशी विचारधारा देतात. उत्तमराव आपल्या विचारातून स्पष्ट करतात की, राष्ट्रीयकरण, खाजगीकरण, नोकरीकरण, शहरीकरण यातून ब्राह्मणशाहीच मदमस्त झाली. मोगलाई, आदिलशाही, निजामशाही, आंग्लाई यांच्यापेक्षा ब्राह्मणशाहीने भारतावर असंख्य आक्रमणे केली. भारताची पहिली फाळणी जातीप्रथेने केली.

अन्नसंपादन, प्रजोत्पादन आणि स्वसंरक्षण हे तीन प्रधान विकार असून या विकारांनी समाज जिवनासाठी योग्य वळण लावणे हे लोकसंस्कृतीचे मूल प्रयोजन आहे. परंतु वास्तवता आणि काल्पनिकता या दोन मनोवृत्ती असल्याने वास्तवता ही वैज्ञानिक संस्कृतीचा मूलाधार बनतो तर काल्पनिकता हा अध्यात्मिक संस्कृतीचा. या देशात प्राचीन काळापासून आजर्यंत या अध्यात्मिक कल्पनावादाविरुद्ध अनेक बंड केले. याला वीर उत्तमराव म्हणतात, ''वैदिक कल्पनावादाच्या गुलामगिरीविरुद्ध बंड पुकारण्याचे कार्य अभंगाने केले तर सैतानी सामर्थ्यावर आक्रमण करून अध्यात्मवादाला पराभूत करण्याचे कार्य लावणीने केले.''[१११]

भारतातील गुलामगिरीच्या उच्चाटणासाठी शिक्षण हा सर्वोत्तम मार्ग आहे. पण हे शिक्षण विज्ञानवादी मानवतावादी असायला पाहिजे. धर्मग्रंथ वाचून हे साध्य होणार नाही उलट ते बळकट झाल्यावाचून राहणार नाही. म्हणून उत्तमरावांनी वैदिक धर्मग्रंथाची चिकित्सा केली व यातून शिकण्यासारखे काही नाही. उलट मानवतेला मारक बाबी यात असल्याचे सांगीतले. उत्तमराव आपल्या जीवन गाथा मध्ये म्हणतात,

''मोक्षाचे ते दार ब्राह्मासाठी खुले।
काय पाप केले शुद्रांनी हो।।१५।।''

''अनुभव हाच ज्ञानाचा उगम।
पुर्ववस्तुपण ज्ञान नाही।।

---

१११. *Mohite Veer Uttamrao, Cultureal Renaissance, Page - 36.*

जन्ममृत्यू नाही मुळीं वस्तुत्वाला ।

संज्ञा ये जन्माला जीवलोकीं ।।

जन्मली वासना वस्तुच्या उदरी ।

बैसली सुंदरी शिरावरी ।।

उत्तम म्हणतो नाही पुनर्जन्म ।

परलोक ब्रह्म ढोंग सारे ।।२२ ।।''

वर्ण पवित्र माणणाऱ्यांना शिकवताना सजातीय वर्ण पवित्र नाही असे सांगून उत्तमराव म्हणतात, विजातीय तत्त्वे विकासाचे मुळ आहे म्हणून

''उत्तम गर्जतो करा रे संकर ।

विकास सुंदर ठरलेला ।।३४ ।।''

उत्तमराव पुढे असेही म्हणतात, विठ्ठल मंदीरात नसून विद्या घेण्याच्या आणि देण्याच्या ठिकाणी आहे कारण,

''भेदाभेद सारे शिक्षणाने जाती ।

पातळींत येती उत्तमराच्या ।।७२ ।।''

''म्हणती पंडीत वाचा धर्मग्रंथ ।

जीवन न त्यात काय वाचू ।।८० ।।''

अशा हिंदू धर्मातील अंधश्रद्धा व अज्ञानयुक्त विषयावर उत्तमराव प्रकाश टाकतात व प्रत्यक्ष जीवन व्यवहारासाठी धर्मग्रंथाचे हिंदूत्वाचे अध्यात्मिक विचार कुचकामी असल्याचे प्रतिपादन करतात. यापेक्षा अन्य विचाराची गरज प्रतिपादन करतात.

''वेदवेद काय बोंबले निर्बुद्ध ।

वेदापेक्षा बुद्ध श्रेष्ठ आहे ।।''[११२]

---

११२. *मोहिते वीर उत्तमराव, जीवनगाथा, पृष्ठ – २३.*

असा संदेश देतात. वीर उत्तमराव बुद्धाला धार्मिक बाबतीत पाहात नाहीत तर कला विज्ञानाला जन्म देणारा म्हणून चिकित्सक दृष्टीने बुद्ध स्वीकारतात.

वीर उत्तमराव मोहिते सत्यशोधकीय विचार स्पष्ट करताना प्राचीन काळापासूनचा आढावा घेतात व कलात्मक संस्कृती ही व्यक्तीचा स्वाभाविक व नैसर्गिक हक्क असून तो अध्यात्मिक संस्कृतीने हिरावला. लावणी व अभंग यांनी अध्यात्माविरूध्द बंड करून तो पुन्हा मिळवण्याचा प्रयत्न केला. कोणतीही जात पात न मानता संकर करून प्रगती साधावी असा उपदेश करतात. जो सर्व विश्वाचे सार वेद असल्याचे वैदिक धर्म मानतो त्याला सुध्दा प्राचीन दाखला देऊन वेदापेक्षा बुध्द श्रेष्ठ आहे, बुध्दाने वैज्ञानिकता जोपासली अशी मांडणी करतात.

५.३.२ चौफेर चिकित्सेचा विज्ञान मार्ग

वीर उत्तमरावांनी सांगितलेला विज्ञानमार्ग म्हणजे केवळ विज्ञानाचा अभ्यास किंवा प्रयोगशाळेतील प्रयोग एवढ्यापर्यंत मर्यादित नाही. सत्यशोधकीय विचार सांगताना जीवन जगत असताना प्रत्यक्ष व्यवहारात अंधानुकरण न करता डोळसपणे चिकित्सकपणे सर्व बाजुंचे परीक्षण करावे हे करताना वैज्ञानिकतेचा आधार असावा म्हणजे वस्तुस्थिती निदर्शनास येईल यासाठी ते स्वत: चौफेर चिकित्सेचा विज्ञानमार्ग अवलंबतात.

''हिंदूधर्म चिकित्सा, ब्राह्मण ब्राह्मण्य चिकित्सा, ईश्वर चिकित्सा करत हिंदू धर्माची विषमताधिष्ठित ब्राह्मण–ब्राह्मणवादी चौकट वीर मोहित्यांनी मोडून टाकली. कणाद सांख्य, चार्वाक, बुद्ध, डार्विन, मार्क्स, फुले, शाहू, आंबेडकर यांचे समग्र दर्शन आबांनी नव्या काळाच्या परिमाणात सुस्पष्ट केले.''[११३]

- ब्राह्मणदर्शनी अपौरूषेय तत्वज्ञान चौफेर नाकारून दशदिशांना उधळून दिले.
- स्वातंत्र्य, समता, बंधुता याद्वारे सनदशीर व्यवस्थेतून सामाजिक, आर्थिक, समता, ईश्वरपूजा व व्यक्तिपूजेचा पाडाव.

---

११३. *मोहड सुधाकर, पूर्वोक्त , पृष्ठ – ३.*

लोकशाही व प्रजातंत्राचा अवलंब, सर्वांचे शिक्षण, प्रशिक्षण, प्रबोधन आणि संघटन अशी मजबूत व्यवस्था मोहिते दर्शनाला अपेक्षित आहे.

५.३.३ ब्राह्मणीझममुळे अतोनात नुकसान

जो विचार समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, मानवता, न्याय मानवाचे मूलभूत अधिकार नाकारतो त्या विचाराला ब्राह्मणीझम असे म्हणतात. अशी ब्राह्मणीझमची व्याख्या उत्तमराव मोहिते करतात. ब्राह्मणीझम अभारतीय व अमानुष आहे. ब्राह्मणांचे भारतीयकरण व मानवीकरण करणे हाच ब्राह्मणीझमच्या पराजयाचा आणि बहुजनवादाच्या विजयाचा खरा मार्ग आहे. भ्रष्ट व्यवस्था तत्त्वज्ञानाची आणि जीवननिष्ठांची विकृती घडली. सुसंस्कार नसल्याने लोककला, लोकसाहित्य, लोकनेतृत्व, लोकशाही व लोकसभ्यता यांचे वाटोळे झाले. राष्ट्र आणि राष्ट्रीयता खिळखिळी झाली. जातीभेद, भाषाभेद, धर्मभेद, प्रदेशभेद यातून भारताला सोडवणारे नेतृत्व सातत्याने निर्माण होऊ शकले नाही. भटशाही परलोकात नसून इहलोकांत व नोकरशाहीत आहे आणि त्याचा सातत्याने दृष्य व अदृष्य धोका असल्याने बहुजनांना ब्राह्मणीझम निर्गुण निराकार सगुण साकार आहे असे उत्तमरावांच्या साहित्यातून दिसून येते.

उत्तमराव मोहिते यांना विज्ञानदर्शनावर आधारित नवी समाजरचना निर्माण करावयाची होती. यासाठी त्यांनी आपल्या साहित्यातून त्यांनी स्पष्ट मांडली केली आहे. उत्तमरावांना अपेक्षित असणारा वैज्ञानिक समाज राजश्री शाहू महाराजांनी केलेल्या कार्यातून निर्माण होऊ शकतो. म्हणून उत्तमरावांनी ''विज्ञान दर्शनाचा अग्रदूत राजश्री शाहू महाराज असा कंधार येथील भाषणाचा विषय ठेवला व तो लोकांनाही आवडला.''[११४] उत्तमराव मोहिते यांनी महात्मा फुले यांच्यावर अनेक व्याख्याने दिली. महात्मा फुले व सत्यशोधक समाज याची त्यांना चांगली ओळख होती. ''बेळगावला त्यांची अनेक व्याख्याने झाली त्यातून ते वैज्ञानिक समाजनिर्मितीचा संदेश देताना

११४. *धोंडगे केशवराव, जयक्रांती (साप्ताहीक), २५ डिसेंबर १९७०, पृष्ठ – ८.*

दिसतात.''[११५] उत्तमरावांचे निरीक्षण महत्त्वपूर्ण असून परिवर्तनासाठी किंवा क्रांती पूर्णत्वास जाण्यासाठी प्रथम धर्मक्रांतीची आवश्यकता प्रतिपादन करून त्यावर आधारित राज्यक्रांती, औद्योगीक क्रांती, तांत्रिक क्रांती असा क्रांतीची क्रमवारीता सांगतात.

दि. २ ऑक्टोबर १९८९ मध्ये अखिल भारतीय सत्यशोधक समाजाचे विदर्भ विभागीय पहिले अधिवेशनात दौलतराव गोळे यांचे अध्यक्षीय भाषण झाले. त्यात ते म्हणतात, ''अमरावतीचे सुप्रसिद्ध लेखक वीर उत्तमराव मोहिते यांचे मार्गदर्शनाखाली आम्ही काही मंडळीनी डॉ. पंजाबराव देशमुख वैज्ञानिक संस्कृती पीठ या नावाने एक संस्था उभी केली आहे. म. फुले, राजश्री शाहू, डॉ. आंबेडकर यांना माणणाऱ्या सर्वांना या संस्थेत प्रवेश घेता येतो. म. फुले यांचेच तत्त्वज्ञान राजश्री शाहू पासून विदर्भात डॉ. पंजाबराव देशमुखांपर्यंत ज्या पद्धतीने पुढे आले. त्याचीच नव्या संदर्भात पुर्नमांडणी करून तरुण पिढीपुढे वैज्ञानिक पद्धतीने कामगिरी काही प्रमाणात हे संस्कृतीपीठ करणार आहे.''[११६] या पीठाच्या प्रधान हेतूतून उत्तमरावांची सत्यशोधकीय भूमिका स्पष्ट होते.

- वैज्ञानिक भौतिकवादाचा, लोककला, लोकवाङ्मय व लोकसंस्कृतीद्वारा परिचय करून देणे.
- वैज्ञानिक भाव व मानवता जनमाणसात रुजवणे.
- सांस्कृतिक क्षेत्रात वैज्ञानिक दृष्टी वाढवणे.
- योगविद्येचा वर्ग चालविणे व त्याद्वारे समाधी व भौतिक वास्तवता यासंबंधी जे गैरसमज आहेत ते दूर करणे.
- मराठा इतिहासाची संशोधन साधने निर्माण करणे.
- वैज्ञानिक संस्कृतीचा विकास होईल असे वाङ्मय प्रकाशित करणे.
- लोकसंगीत व लोकगीतांचा संग्रह करून त्याला प्रोत्साहन देणे.

---

११५. *बिरादार कालगौंडा जीवनगोंडा, साप्ताहिक संग्राम, २५ डिसेंबर १९७०, पृष्ठ – २.*

११६. *गोळे दौलतराव यांचे व्याख्यान, दि. २ ऑक्टो. १९८९.*

❀ नृत्य, संगीत व नाट्याच्या माध्यमातून विज्ञान भावनेचा प्रसार करणे.

❀ वैज्ञानिक क्षेत्रात कार्य करणाऱ्यांचा सत्कार करून प्रोत्साहन देणे.

उत्तमराव मोहिते यांची पंजाबराव देशमुख वैज्ञानिक संस्कृतीपीठाच्या माध्यमातून फुलेंचा सत्यशोधक समाज, शाहूंचा ब्राह्मणेत्तर समाज, आंबेडकरांचा दलित समाज तर पंजाबरावांचा कृषक समाज या सर्वांची गुंफण करून वास्तवाचे भान असणारा व विज्ञान दर्शनावर आधारलेला नव समाज निर्मितीचा विचार महाराष्ट्राला दिला असेच म्हणावे लागेल.

लहानपणापासूनच अस्पृश्यता विरोधी चळवळ व सत्यशोधक चळवळीचे बाळकडू पिलेल्या उत्तमराव मोहिते यांना विषमतावादी समाजात बदल घडविण्याची भावना सतत सतावत होती. दिनांक २७ नोव्हेंबर १९८८ रोजी औरंगाबाद येथे झालेल्या अखिल भारतीय सत्यशोधक समाजाच्या अधिवेशनात खरा सत्यशोधक म्हणून उत्तमराव मोहिते यांचा सत्कार झाला. तर महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने वीर उत्तमरावांबाबत म्हटले, आपण महाराष्ट्रातील सत्यशोधक, ब्राह्मणेत्तर आणि सत्याग्रही आंदोलनाचे नामवंत प्रवर्तक आहात तर कुणबी समाजाच्या वतीने उत्तमरावांना समाज गौरव पुरस्कार देण्यात आला. यावरून उत्तमराव मोहिते हे शोषीत समाज व्यवस्थेचे खरेखुरे नेतृत्व होते असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

''उत्तमराव मोहिते यांनी तमाशा या लोककलेला सार्वत्रिक स्वरूप देवून त्याद्वारे समाजप्रबोधन व विज्ञानवादी विचार समाजात रुजविण्याचे प्रयत्न केले. खालच्या स्तरावरील कलावंत वर आल्याशिवाय खरी सामाजिक प्रगती होणार नाही. यासाठीच त्यांनी मराठा विज्ञान मंडळाच्या वतीने दि. १४ ते २० डिसेंबर पर्यंत सांस्कृतिक सप्ताह रूरल इन्स्टीट्यूट सभागृहात साजरा करण्यात आला. तुळशीराम जाधव या लोकशाहीराचा तर कमलकलाचा प्रसिद्ध सोंगाड्या पांडुरंग महादू कासार व लोकनाट्याचा अभिजात सरदार सावळाराम काळे यांच्या माध्यमातून तसेच लक्ष्मी जावळकर, जयश्री कोल्हापूरकर, कमला चंदनकर यांच्या माध्यमातून विज्ञानवादी

समाज निर्मितीसाठी लोककलेचा उपयोग केला.''[११७]

वीर उत्तमराव मोहिते हे मराठी तमाशा परिषदेचे उपाध्यक्ष राहिले. २५ एप्रिल १९४९ रोजी स्थापन झालेली मराठी तमाशा परिषद रजिस्टर नं. BOM 350-PN महाराष्ट्र राज्य पुणे या अधिकृत परिषदेच्या माध्यमातून तमाशाला चिटकलेले संकुचित विचार दूर केले. वीर उत्तमराव मोहिते म्हणतात, ''तमाशा म्हणजे रावबाजीच्या रंगमहालात रंगणारा नर्तकीचा नाच नसून समाज प्रबोधनासाठी शाहू महाराजांनी निर्माण केलेले ते प्रभावी माध्यम आहे.''[११८] कलेला भोग व विलासातून बाहेर काढून वैज्ञानिकतेच्या आधारे व कलेच्या माध्यमाने भौतिकवादी, वैज्ञानिक समाजाच निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

डॉ. पंजाबराव देशमुख यांनी श्रमजीवी समाजाच्या हितासाठी आपल्या सर्वस्वाची होळी केली. या कार्यात उत्तमराव सहभागी होते. देव, धर्म व अध्यात्म या श्रमजीवी समाजाचे रक्त पिणाऱ्या वर्गाच्या श्रद्धा आहेत. असे असताना पंजाबरावांचे अनुयायी म्हणवून घेणाऱ्या नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू श्री.वा.मो. काळमेघ यांनी सालबरडींला महाशिवरात्रीस महारुद्र यज्ञ केला. याबाबत उत्तमरावांनी त्यांना अनावृत्त पत्र लिहून याची जाणीवही दिली. परंतु, काळमेघांनी यज्ञ पार पाडला. म्हणून उत्तमराव मोहिते यांनी हजारो वर्षात असेच घडत आलेले आहे याचे मुख्य कारण हिंदू धर्म आहे म्हणून डॉ. पंजाबराव देशमुख प्रतिष्ठानच्या विद्यमानाने विज्ञान यज्ञ दि. ०१ ते ०७ फेब्रुवारी रोजी पूर्व कल्पनेसह साजरा केला. ''यात पहिल्या दिवशी वा.मो. काळमेघ (कुलगुरु नागपूर विद्यापीठ) यांची यज्ञ कुंडात आहुती दिली. दुसऱ्या दिवशी श्री. रावसाहेब इंगोले (श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष) यांची आहुती दिली, तिसऱ्या दिवशी श्री. नानासाहेब इंगोले (श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे खजिनदार) यांची आहुती दिली, चौथ्या दिवशी श्री.म.मा. पाटील (श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे सचिव) यांची आहुती दिली, पाचव्या दिवशी संत संस्थेची आहुती दिली, सहाव्या दिवशी धर्म

११७. *Mohite Veer Uttamrao, Cultural Renaissance, Page No. - 35.*

११८. *कित्ता, पृष्ठ – ३५.*

संस्थेची आहुती दिली, सातव्या दिवशी आध्यात्मिक संस्थेची आहुती दिली.''[११९] उत्तमराव मोहिते यांनी केलेले हिंदू धर्माचे दहन हे एकाकी केलेले नसून किंवा आकसातून केलेले नाही. हिंदूत्वासंबंधी अनेकांनी आपले विचार मांडलेले आहेत त्यात विनायक दामोदर सावरकार हिंदू धर्मासंबंधी म्हणतात,

''आसिन्धुसिंधूपर्यंता यस्य भारतभूमिका।

पितृभू: पूण्यश्चैव स वै हिंदूरिती स्मृत: ।।''[१२०]

सिंधू नदीपासून समुद्रापर्यंत पसरलेली ही भूमी पूर्वजांच्या भूमीप्रमाणे वाटते. तो हिंदू या व्याख्येत भौगोलिकता आहे.

तर टिळक म्हणतात,

''प्रामाण्य बुद्धिर्वेदेषू साधनानामनेकता।

उपस्थानामनियम एतद्धर्मस्य लक्षणम् ।।''[१२१]

वेदाविषयी प्रामाण्यबुद्धी साधनांची अनेकता आणि उपासना कोणाची करावी या विषयी निश्चित नियम नसणे हे हिंदू धर्माचे लक्षण होय. यालाच उत्तमराव मोहिते म्हणतात हिंदूत्वाची व्याख्या खावी कशासंगे म्हणजे प्रत्यक्ष जीवन व्यवहारात या पंडिती व्याख्येचा कवडीचाही उपयोग होत नाही. स्थिती मात्र यापेक्षा वेगळी असून ती असाह्य आहे. हिंदू धर्मात उपवास, व्रत, वैकल्य यामुळे हिंदूचे अशक्तीकरण झालेले आहे. यात महिलांची स्थिती अत्यंत वाईट आहे. उपवासाने स्वर्ग मिळतो अशी कल्पना हिंदूची आहे असे झाले असते तर अन्न न मिळाल्याने उपवाशी राहणारे लोक भारतात कमी नाहीत. त्यांचे जीवन पाहता हे चुकीचे वाटते. याबाबत स्वामी विवेकानंद म्हणतात, ''ज्यांच्या अंगात बळ नाही कृतीत उत्साह नाही ते आयुष्यात काही करु शकत नाहीत.''[१२२] यावरून निरुत्साही, अशक्त, दुबळे बनविण्याचा विचार हिंदू धर्मात जोपासला जातो असे निदर्शनास येते.

---

११९. *मोहिते वीर उत्तमराव, जागतिक कृषक क्रांतीचा विधाता लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख, पृष्ठ – ५१९–५२४.*

१२०. *जोशी महादेवशास्त्री, भारतीय संस्कृतिकोष, खंड १० वा, पृष्ठ – ३४६.*

१२१. *कित्ता, पृष्ठ – ३४६.*

१२२. *महाराव ज्ञानेश, चित्रलेखा (साप्ता.), दि. १३ ऑगस्ट २०१२, पृष्ठ – ६.*

''कार्ल मार्क्स धर्माला अफूची गोळी म्हणतो.''[१२३] यावरून व्यक्तिला धुंदीत ठेवण्याचे काम धर्म करतो आणि एखाद्या धुंदीत किंवा नशेत असणाऱ्या व्यक्ती योग्य विचार करू शकत नाहीत. प्रबोधनकार ठाकरे हिंदू धर्माबाबत म्हणतात, ''हिंदू धर्म हे एक भले मोठे भटी गौड बंगाल आणि हिंदू संस्कृती म्हणजे एक बिनबुडाचे पिचके गाडगे यापेक्षा त्यात विशेष असे काही नाही.''[१२४]

''म. फुले यांनी हिंदू धर्मावर कडक टीका करून सार्वजनिक सत्यधर्म काढला. यामधून फुलेंची धर्म संकल्पना ब्राह्मणी हिंदू धर्माविरूद्ध असल्याचे दिसते.''[१२५]

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, ''हिंदू धर्माचे तत्वज्ञान ब्राह्मणी आणि वर्ण वर्चस्ववादी आहे आणि ते नाकारण्यासाठी लागणारा विवेक स्वातंत्र्य हिंदू समाजापाशी नाही म्हणून त्याचा त्याग केला. मी जन्मलो जरी हिंदू म्हणून तरी हिंदू म्हणून मरणार नाही म्हणून त्यांनी बौद्ध धर्म स्वीकारला.''[१२६]

म. गांधी म्हणतात, ''माझ्या मते हिंदू धर्माचे सौंदर्य हे त्याच्या सर्व समावेशक व्यापकतेत निश्चित आहे. इतर कोणत्याही धर्मात जे सार निश्चित आहे ते सर्व हिंदू धर्मात सामावलेले आहे आणि त्यात जे समाविष्ठ केलेले नाही ते सारे गौण व अनावश्यक आहे.''[१२७]

दौलतराव गोळे म्हणतात, ''म. फुले, राजर्षी शाहू, पेरिअर, राम स्वामी, कॉमरेड नाथ रॉय, डॉ. आंबेडकर, पंडीत नेहरू, पंजाबराव देशमुख या सर्वांनी अध्यात्मिक शक्तीशी झुंज देण्याचे आपापल्या परीने प्रयत्न केले. या समाज क्रांतिकारकांनी सामाजिक जीवनात वैज्ञानिक दृष्टीकोन शिकविण्याचे व त्यास उत्तेजन देण्याचे काही प्रमाणात प्रयत्न केले. पण त्यांचे प्रयत्न अपुरे पडले. यापैकी कोणीही अध्यात्मिक शक्ती विरुद्ध जिहाद पुकारला नाही. म्हणून आपल्याला ज्या नवक्रांतीची

---

१२३. डॉ. सिंगारे अनिल, महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळीचा इतिहास, पृष्ठ – ४९.

१२४. ठाकरे प्रबोधकार, पूर्वोक्त, पृष्ठ – २.

१२५. जोंधळे बी.व्ही यांचा दैनिक सकाळमधील लेख, दि. २८/११/२००३.

१२६. कुलकर्णी सुहास, यांनी घडवलं सहस्त्रक, पृष्ठ – २००.

१२७. म. गांधी (अनुवाद तारा धर्माधिकारी), हिंदू धर्म म्हणजे काय?, पृष्ठ – २.

गरज आहे असे बंड भारताच्या इतिहासात घडून यायचे आहेत. यासाठी अमरावतीचे वीर उत्तमराव मोहिते यांनी या संदर्भात भिडतोड व क्रांती योग्य विषय आपल्या लेखनात मांडून ठेवले आहेत.''[१२८]

या सर्वांचा विचार केला असता, आज या सुधारणावादी विषयाची गरज नाही असाही विचार मांडला जातो. स्वतंत्र भारतात घटनेने सर्वांना अधिकार दिलेले असताना पुन्हा अधिकारासाठीचे हे उग्र विषय कशाला असा एक मत प्रवाह तयार झाला आहे. पण वस्तुस्थिती पाहिली असता सुधारणावादी विचारांची आज जास्तीची आवश्यकता असल्याचे दिसून येते.

''१ जानेवारी १९६९ रोजी त्यावेळचे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक यांची मुलाखत मुंबईच्या नवाकाळ मध्ये प्रसिद्ध झाली होती. त्यात अस्पृश्यताच नव्हे तर चातुवर्ण्य व त्यातून निर्माण झालेल्या असंख्य जाती–पाती ईश्वर निर्मितच आहेत व त्यात कोणताही बदल करणे मानवाच्या हातात नाही.''[१२९] असे प्रतिपादन करून विषमतेचे उघड समर्थन स्वातंत्र्योत्तर काळातही होताना दिसते.

''३० डिसेंबर १९९३ रोजी डॉ. मुरली मनोहर जोशी यांनी जाहीर केले. भाजपाचे राज्य आले तर मनुस्मृतीप्रमाणे राज्य चालविन.''[१३०]

१९९८ मध्ये आर.एस.एस. चे सरसंघचालक सुदर्शन म्हणतात, ''विभिन्न जातीयों के बीच समानता नही हो सकती।'' यावरून हिंदूत्वासंबंधी विचार केला असता अनेक पुरोगामी विचारवंतांनी विचार देऊन अनेक बदल सांगूनही हिंदू धर्माच्या कर्मठतेत बदल न झाल्याने हजारो वर्षापासून अन्याय सहन करणाऱ्यांना मूक्त करण्यासाठी उत्तमराव मोहिते यांची कृती योग्य वाटते.

''हिंदूत्व हिंदूत्व हिंदूत्वाला जाळा

बंधुत्वाची कळा नाही त्यात

---

१२८. चौधरी नागेश (संपा.), समतेसाठी बहुजन संघर्ष (पाक्षिक), १५–३० ऑक्टो.१९८७, पृष्ठ – २७,२८.

१२९. कित्ता, पृष्ठ – २७–२८.

१३०. राणा अशोक, शिवधर्म चिंतन, पृष्ठ – ६–७.

हिंदूत्वाची व्याख्या खावी कशासंगे

गुप्त कट मागे सोवळ्यांचा

धर्माची ही अफू चारी धर्मगुरु

भावना लुटारु ब्रह्मवादी

उत्तम म्हणतो उकलले कोडे

खावूनिया जोडे विवेकाचे''[१३१]

हे वीर उत्तमरावांचे १९६० पूर्वीचे विचार त्यांनी १९८० साली पूर्णत्वास नेले असे म्हणता येईल.

उत्तमराव मोहिते यांचे हे कार्य भारताच्याच नव्हे तर जगाच्या इतिहासात प्रथमत: केलेले धर्माविरुद्धचे सर्वात मोठे कार्य असावे. तत्कालीन परिस्थितीचा विचार करता हे कार्य इतके सहज व सोपे नसून प्रतिकूल परिस्थितीत केलेले कार्य आहे. यामुळे म. फुलेंनी वाट पाडली, राजर्षी शाहूंनी वाट तयार केली, डॉ. आंबेडकरांनी पक्का रस्ता बनवला. पण हा मार्ग सर्वसामान्यांना माहित नसल्याने आडमार्गाने जाण्याचा प्रघात अद्यापही सुरुच राहिला. यामुळे सर्वसामान्यांचे जीवन दु:खमय राहिले. हा रस्ता न गवसण्यास येथील हिंदू धर्म व त्याचे तत्वज्ञान कारणीभूत आहे. अनेकवेळा यात सुधारणा करूनही हजारो वर्षापासून स्थितप्राय अवस्थेत राहिल्याने उत्तमरावांनी याचे दहन केले आणि सत्यशोधकीय विचार समाजाला देऊन विज्ञानवादी समताधिष्ठीत मानवी मूल्य जोपासणारा नवसमाज निर्मितीचा पाया घातला असे म्हणावे लागेल.

ब्राह्मणांच्या कर्मठ विचारधारेने संपूर्ण हिंदू समाज पराकाष्ठेच्या दु:खामध्ये जीवन जगतो म्हणून हिंदू धर्माच्या दोष स्थळांवर आजतागायत अनेक झालेले प्रहार यांचा अभ्यास करुन व त्यातील सत्य भूमिका पडताळून ज्यात बंधूभाव नाही, समता नाही अशा हिंदूत्वाची होळी वीर उत्तमराव करतात. ज्ञान–विज्ञानाच्या माध्यमातून सत्य दर्शन घडवून सत्यशोधक चळवळीला गतिमान करतात.

---

१३१. मोहिते वीर उत्तमराव, जीवनगाथा, पृष्ठ – ११.

म. फुले यांच्यानंतर महाराष्ट्रामध्ये वीर उत्तमरावांनी सत्यशोधकीय धुरा आपल्या खांद्यावर घेऊन सत्यशोधकीय विचार समाजाला दिले उत्तमरावांच्या सत्यशोधकत्वा बाबत प्रा. सुधाकर मोहड म्हणतात, ''बहुजनवादाचे संदर्भ–ग्रंथ, संस्कार ग्रंथ आणि प्रबोधन ग्रंथ वीर उत्तमरावांनी एकविसाव्या शतकातील बहुजन सत्तेसाठी आधीच तयार करून ठेवलेत. बहुजन नायकांचे व बहुजन संघटकांचे शिक्षण, प्रशिक्षण आणि प्रबोधन करणारा सत्यशोधकीय दार्शनिक म्हणजे वीर उत्तमराव मोहिते, समाजाला विचारवंत बनविणारा खरा विचारवंत शोभतो, खरा आचार्य समाजाला आचारवंत करतो. ज्ञान आणि विज्ञान दिल्याने व जीवनात वापरण्याने सतत वाढत जाते. सुवर्णतुलेऐवजी भारतीय समाजाची 'ज्ञानतुला' व 'विज्ञानतुला' यासाठीच उत्तमरावांनी तीस वर्षापूर्वी मराठा विज्ञान मंडळ अमरावतीला स्थापन केले.''[१३२]

५.३.४ 'अभंग' ते 'अखंड' सत्यशोधन

उत्तमराव मोहिते स्पष्टवक्ते व सत्यवक्ते सत्यशोधक आहेत. ते म्हणतात निर्दयी आक्रमक म्हणून आर्यभटांचे हजारो वर्षापूर्वी Traitor जीवनकार्य व जीवन तत्त्वज्ञान दोन्ही Traittorous परिभाषा, पक्ष, पोपटांची, पडदानशीनता, मुखवटे, वटवट, वरवर वेगळी दिसलीत तर अंतरंगी हालचाली सायुज्जता एकरूपच आहे! संपूर्ण जात फॅसिष्ट असणारी पृथ्वीवरील नव्हे तर अखिल ब्रह्मांडावरील एकमेव खुनशी जमात म्हणजे बहुजनष्देष्टी ब्राह्मण–ब्राह्मण्यवादी समुदाया जिथे जिथे ब्राह्मण्य तिथे तिथे मानवता, समता, द्रोह! हे उत्तमरावांच्या साहित्यात दिसून येते. त्यांनी तुकारामांच्या अभंगापासून म. फुले यांच्या अखंडापर्यंत सत्यशोधन केले. वीर मोहिते आपल्या 'जीवनगाथा' या ग्रंथात म्हणतात,

'तुकोबाची शक्ति बघतां अपार।
ब्रह्म समुंदर प्राशियेला।।६।।'
'अमोघ हे शस्त्र अभंगाची कला।

---

१३२. *कित्ता, पृष्ठ – २.*

तुकोबाने केला चमत्कार ।।७।।'

'तुकोबाने केले बाई गे नवल ।

सगुणाचें मोल सिद्ध केले ।।'

तुकारामांच्या अभंगापासून म. फुले यांनी प्रतिपादलेल्या भिक्षूकशाही पर्यंत संशोधन उत्तमराव करताना दिसतात.

''देहासह गेला तुका वैकुंठाला । चमत्कार झाला कसा सांगा ।।

शिवाजीचा झाला राज्यभिषेक । झाडून भिक्षुक गेले कोठे ।।

संभाजीची कोणी बदनामी केली । बादशहा दिली वर्दी कोणी ।।

प्रतापसिंह हा साताऱ्याचा राणा । दिला इंग्रजांना पकडून ।।

जोतीराव फुले यांना हो छळले । खडे का मारीले सावित्रीला ।।

शाहूराजाची का बदनामी केली । लाखोली वाहिली कोणी सांगा ।।

आंबेडकराला ठोकर मारिली । काळारामाखाली पाडूनिया ।।

गांधी खून कोणी बोलू नका बोला । स्वर्गांतुनी आला देवदुत ।।

शुद्रांचा उद्धार केला ज्यांनी ज्यांनी । मृत्यूसिंहासनीं बसविले ।।

अधमांचे सांगू किती अत्याचार । उत्तम आचार कुळी नाही ।।''[१३३]

उत्तमराव मोहित्यांनी बहुजन समाज सुधारणा व सुधारकांची स्थिती आणि त्यांना मिळालेली वागणूक याचा अभ्यास करुन असा निष्कर्ष काढला की ज्यांनी–ज्यांनी खालच्या दबलेल्या दलित पीडित लोकांच्या उद्धाराचा प्रयत्न केला त्यांना प्रस्थापित व्यवस्थेने विरोध तर केलाच पण मारण्याला मागेपुढे पाहिले नाही.

५.३.५ सत्यशोधकीय युगकर्तव्य! युगप्रवर्तन

वीर उत्तमराव मोहिते यांनी आयुष्यभर केलेले लेखन सत्यशोधकीय लेखन असल्याचे दिसते. त्यांनी लिहिलेला ''मराठयांच्या सांस्कृतिक क्रांतीचा इतिहास हा ग्रंथ सत्यशोधक व ब्राह्मणेत्तर चळवळीचे धागे उकलून दाखवतो.'' बहुजन समाजाला

---

१३३. *कित्ता, पृष्ठ – २२.*

त्यांनी एक प्रकारची ग्रंथालये व प्रयोगशाळाच उपलब्ध करून दिली असे म्हणावे लागेल. त्यांनी इतिहासातील दोष निदर्शनास आणून दिले व सत्य इतिहास मांडण्याचा प्रयत्न केला. इतिहास हा व्यक्तीच्या कार्याला दिशा देणारा असतो. थोर व्यक्तिंची चरित्रे व त्यांनी बजावलेली कामगिरी म्हणजे इतिहास असा इतिहासाचा अभ्यास करतो. ''थॉमस कालाईल हा विख्यात इतिहासलेखक कल्पनाधिष्ठित रंजक इतिहास लेखनाचे व काळावरील युगपुरुषाच्या प्रभावाचे प्रतिनिधीत्व करतो मानणाऱ्यांच्या कर्तृत्वाचा आलेख आहे''[१३४] म्हणून इतिहासात झालेल्या व्यक्ती व कार्याची माहिती भावी पिढीला उपयुक्त असते. ती माहिती चुकीची असेल तर समाजजीवनावर विपरीत परिणाम होतो. हे उत्तमरावांनी ओळखून व्यक्तींना सत्यदर्शन घडवण्याचा पर्यंत केला.

५.३.६ हे प्रजातंत्र की भटतंत्र

उत्तमराव मोहिते यांनी आपल्या सत्यशोधकीय विचारात भारतीय लोकशाहीचा विचार केला. त्यांनी असे सांगितले की, भारतात लोकशाही मागे पडून भटशाही पुढे येत आहे. रथयात्रा, तीर्थयात्रा यातच गुंतून गेली आहे. ''घराघरातून, गावागावातून आणि रानावनातून विद्यालये, ग्रंथालये, प्रयोगशाळा, क्रीडांगणे उभारण्याऐवजी देवालये उभारल्या जात आहेत. देवाच्या व धर्माच्या नावावर लोकशाहीचा लिलाव व देवघेव सुरू झाली आहे! भारतीय लोकशाही जगणार कशी? भारत शिकणार कसा? भारतीयांना कल्याणकारी लोकशाही मिळणार कधी?''[१३५]

भारतात कमालीचे अज्ञान असताना तिथे वाचन संस्कृतीचा विकास करण्याऐवजी देव, धर्म, अध्यात्माचा, मंदीरांच्या आणि मठांच्या माध्यमातून जोपासून लोकांना अजून काही वर्ष मागे व अज्ञानी ठेवण्याचा प्रयत्न आहे. यामुळे खरी लोकशाही तेंव्हाच येईल जेंव्हा संपूर्ण देश विचार व विचारांचा विचार करेल. हे करण्यासाठी शिक्षण भारदस्थ व सत्यशोधकीय वृत्ती व्यक्तिच्या अंगी बनली पाहीजे आणि

---

१३४. *डॉ. कोठेकर शांता, इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान, पृष्ठ – ४.*

१३५. *मोहड सुधाकर, विदर्भाचा अग्निपुरुष स्वातंत्र्य संग्रामसेनानी वीर उत्तमराव मोहीते, पृष्ठ – ९.*

शिक्षणाला मुक्तदार करून मंदीराऐवजी प्रयोगशाळा व ग्रंथालये वाढले पाहीजेत असा विचार उत्तमराव देतात व हे प्रजातंत्र नसून भटतंत्र असल्याचे सांगतात.

एकंदरीत वीर उत्तमराव मोहिते यांची सत्यशोधकीय भूमिका अभ्यासली असता सत्यशोधकीय चिंतन खोल असून आतापर्यंतच्या विचारांचा मागोवा घेऊन कृती केली. हिंदू धर्माचे असल्याने त्यांना हिंदू मधील दोष व समाजजीवनाची स्थिती अनुभवण्यास मिळाली. जन्मापासूनच विषमतेचे शिक्षण देऊन शूद्रांचा बळी देण्याची तयारी ही व्यवस्था करते याला जातीवाद हे महत्त्वाचे कारण असून यामुळेच अत्याचार होतो यास धर्माचा आधार असल्याने धर्म ही अन्यायी व अत्याचारी आहे. यात पुर्वजन्म, पुर्नजन्म, पाप, पुण्य, स्वर्ग, नरक, आत्मा, परमात्मा, अध्यात्म यामुळे व्यक्तिजीवन कुंठीत झाले म्हणून उत्तमरावांनी चौफेर चिकित्सेचा विज्ञामार्ग अवलंबून अभंग ते अखंड सत्यशोधन ही केले. यात ब्राह्मणीझममुळे आतोनात नुकसान झाल्याने समाजास न्याय देण्यासाठी सत्यशोधकीय पुनर्मांडणी केली व हजारो वर्षाचा इतिहासाचा अभ्यास करून हिंदू धर्मात सुधारणा शक्य नसल्याने हिंदू धर्म जाळला व सत्यशोधनाचे युगकर्तव्य पार पाडले असे म्हणता येईल.

पूर्णच हिंदू धर्म व धर्मग्रंथ टाकावू होता असे नाही. त्यात काही चांगल्या बाबी आहेत पण वाईटांची संख्या जास्त असल्याने आणि हजारो वर्ष प्रयत्न करूनही न बदलल्याने त्याचे दहन करण्याची वेळ आली. एका मधाच्या प्याल्यामध्ये विष मिसळले असता तो मध सेवन करणे संयुक्त ठरत नाही. त्यातील विष वैद्य, शास्त्रज्ञ यांना वेगळे करता आले नाही तर तो मध विषासोबत खड्डा करून पुरावा लागतो. तसेच उत्तमरावांनी हिंदू धर्माचे दहन केले ते संयुक्त आहे असे म्हणावे लागेल.

५.४ उत्तमराव मोहिते यांचे राजकीय योगदान

मानवाला जसजशी निसर्गाची माहिती मिळत गेली तसतशी त्याची महत्वाकांक्षा वाढत गेली. यातूनच आदिम काळापासून माणूस टोळ्यांनी राहिला.

त्यातून समुह, समुहातून समाज व पुढे राज्य, राष्ट्र अशा संकल्पनांनी आकार घेतला यात मानवाची महत्त्वाकांक्षा ही राजकारणाची जननी ठरली. हे राजकारण अनेक पैलूनी प्रकटल्याचे दिसते. यात 'अधिपत्य' हे राजकारणात महत्त्वाचे ठरले. हे अधिपत्य कधी धर्मकारणाच्या पताका फडकावून किंवा धार्मिक तत्वज्ञानातून तर कधी सरमजांमशाहीचे जाळे टाकून साम–दाम–दंड–भेदादी कुटनितीचे अनेक प्रकार विकसित झाले. यातून धर्माचे मानवी जीवनावर वर्चस्व असल्याने आणि राजकारण हा धर्मकारणाचा भाग असल्याने राजकीय पूर्तता म्हणजे धार्मिक पूर्तता ठरत होती.

१८ व्या शतकापासून मात्र वैज्ञानिक क्रांतीमुळे राजकारणाचा चेहरा बदलला आणि औद्योगिक क्रांतीमुळे भांडवलशाही, व्यक्ती स्वातंत्र्य, साम्यवाद, लोकशाही, समाजवाद या संकल्पना प्रकाशात आल्या. औद्योगीक क्रांतीमुळे विकसित राष्ट्रांनी अविकसित राष्ट्रांना आपली हक्काची बाजारपेठ म्हणून वसाहतिक राज्याची सुरुवातही झाली. यातूनच इ.स. १७५७ च्या प्लासीच्या आणि १७६४ च्या बक्सारच्या युद्धाने ब्रिटीशांचे भारतात पाय रोवले व भारतीय राजकारणाला वेगळा रंग चढला. पूर्वापार चालत आलेले धर्मप्रभावीत राजकारण व ब्रिटीशांचे पिळवणुकीचे राजकारण या दुहेरी राजकीय शोषणातून भारतीय माणूस पिळला गेला. ब्रिटीशांमुळे लोकशाही व व्यक्ती स्वातंत्र्याच्या कल्पना भारतातही बळावल्या व स्वकीय राजवटीसाठी देश तयार झाला. याचा पहिला उद्रेक इ.स. १८५७ रोजी झाला.

१८८५ रोजी स्थापन झालेल्या राष्ट्रीय सभेच्या माध्यमातून भारतीय राजकारण वेगळ्या पर्वात आले व अनेक बुद्धीजीवी व श्रमजीवी यांनी राजकारणाला दिशा दिली. यावेळी ब्रिटीशांच्या ताब्यातून देश मूक्त करणे हा राजकारणाचा महत्त्वाचा विषय राहीला. टिळकांच्या आगमनाने भारतीय राजकारणात प्राचीन धार्मिकता आली तर गांधीजीच्या नेतृत्वाखाली भारतीयांनी मोठा लढा उभा केला. गांधीजीच्या स्वातंत्र्य लढ्यात खेड्या–पाड्यातील व शहरातील श्रमजीवी, बुद्धीजीवी वर्गाने सहभाग घेतला आणि देशास स्वातंत्र्य मिळवून दिले. यात ''अमरावतीच्या वीर उत्तमराव मोहिते

यांचा वाटा आहे.'' स्वातंत्र्यासाठी राजकारण, भाषणे करणाऱ्या उत्तमराव मोहिते यांना सहा वर्ष कारावास भोगावा लागला. यामुळेच स्वतंत्र भारताचे राजकारण आकार घेऊ शकले असे म्हणता येईल.

भारतात म. गांधी आणि जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्वाने राजकीय क्रांती घडून आली. पण भारताच्या आर्थिक आणि सामाजिक क्रांतीचा संघर्ष अत्यंत गंभीर आहे. याची जाणीव अजूनही भारतीय जनतेला आली नाही. आजच्या सत्ता स्पर्धेच्या काळात तर भारताच्या नेतृत्वाला सामाजिक संघर्षाचा विसरच पडलेला दिसतो. भारतातील एक पुढारी या संदर्भात हात घालत नाही. ''सामाजिक क्रांती हा प्रश्न सत्तेसाठी धडपड करणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांचा नाही येथील धनिक वर्गाचा नाही आणि ही समस्या मध्यमवर्गीय पांढरपेश्यांचीही नाही. सामाजिक क्रांतीच्या पोटात असलेल्या सांस्कृतिक मूल्यांचा हा प्रश्न आहे आणि डॉ. पंजाबराव हाच एक क्रांतिकारक निघाला ज्याने सांस्कृतिक क्रांती घडवून आणण्यासाठी प्रथम सुरुवात केली.''[१३६] यातून राजकारण धर्मप्रभावित अथवा देवप्रभावित असण्याऐवजी सांस्कृतिक विकासाचे असावे असे उत्तमराव मोहिते यांना अपेक्षित आहे.

उत्तमराव मोहिते जेव्हा आपली नजर राजकारणाकडे वळवतात तेव्हा ते वरवरच्या राजकारणाचा विचार करत नाहीत. तर 'शेवटचा घटक आणि त्याचे हित' समोर ठेवून विचार करतात तेंव्हा त्यांना असे दिसून येते की, भारतीय अध्यात्म, देव देवता, धर्म, हिंदूत्व, बुवा यांच्या प्रभावातून भारतीय राजकारणाची वाटचाल होत आहे.खरे पाहता येथील कष्टकरी, शेतकरी, कामगार हा बहुसंख्य समाज या राजकीय बाबीपासून वंचित असतो. परिणामी या वर्गाची प्रगती होण्याऐवजी अधोगती होते म्हणून राजकारण असे असावे जे हजारो वर्षापासून आपल्याच बांधवांना गुलामीत ठेवण्यासाठी वापरलेले तत्वज्ञान बदलून समतेसाठी संघर्ष व सर्वांची एकता निर्माण व्हावी यासाठी सांस्कृतिक मूल्य बदलण्याचे राजकीय प्रयत्न पाहिजेत पण घडते या विरुद्ध.

---

१३६. *मोहिते वीर उत्तमराव यांचे अप्रकाशित साहित्य (हस्तलिखित), दि. २७ फेब्रु. १९८३.*

''भारतीयांत सामाजिक सांस्कृतिक बदल करण्यासाठी आणि अज्ञान, अंधश्रद्धा यात अडकलेल्या समाजाला बाहेर काढल्याशिवाय खरी लोकशाही येणार नाही असा विचार उत्तमराव मोहिते मांडतात.''[१३७] उत्तमरावांच्या विचारावर विचार करता असे दिसून येते की, मतदान करणारा बहुसंख्य समाज असा आहे त्याला मतदानाचे महत्त्व माहीत नाही. ज्या पक्षाला, ज्या उमेदवाराला तो मत देतो त्याचे ध्येय काय आणि आपल्या समस्या तो सोडवू शकतो का याची समज नाही याला ना त्याला कोणाला तरी मत द्यायचे म्हणून तो मत देतो. यासाठी सामान्य अतिसामान्य शेतकरी, कष्टकरी समाजाला आत्मभान येण्याची गरज आहे. पण प्रस्थापित विचारधारा याविरुद्ध असल्याने खरे राजकारण सामाजिक व सांस्कृतिक मूल्य परिवर्तनासाठी हवे. म्हणून उत्तमराव अशा परिवर्तनासाठी पावले उचलतात.

इ.स. १९५६ मध्ये मराठा विज्ञान मंदीर या नावाचे एक मंडळ काढतात व या माध्यमातून सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तन घडवून समताधिष्ठीत विकासाभिमुख राजकारण व निरपेक्ष राज्यकर्ता निर्माण करण्यासाठी तत्वज्ञानाच्या माध्यमातून प्रयत्न करतात. यासाठी त्यांनी Atheism in Indian Phylosophy हा प्रबंध राजकारणाचा मूळ गाभा म्हणून वापरतात याला कार्ल मार्क्सच्या भौतिकवादी वैज्ञानिकतेचा सिद्धांत या ग्रंथाची जोड देतात. अशा विचारातून राजकारण केले तरच ते भारतीयांसाठीचे राजकारण ठरेल असे उत्तमरावांना वाटते.

''धर्मशास्त्राला अर्थार्जनाचे आणि राज्यशास्त्राला गुलामगिरीचे साधन बनविणे म्हणजे शास्त्राचा विपर्यास करणे असे उत्तमरावांना वाटते.''[१३८] भारतीय धर्मकारणाची व राजकारणाची स्थिती सामान्य माणसाच्या पिळवणूकीतून अर्थप्राप्ती करण्याची आहे हे उघड आहे. जोपर्यंत राजकारण धर्मकारणातून वेगळे होत नाही. तोपर्यंत समाजहिताचे राजकारण होत नाही. भारतात निवडणुका लढवण्यासाठी राममंदीर

---

१३७. कित्ता.

१३८. मोहिते वीर उत्तमराव, जागतिक कृषक क्रांतीचा विधाता लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख, पृष्ठ – ३५.

रथयात्रा असे मुद्दे उपस्थित करुन धर्माचा आधार घेतला जातो. हे चुकीचे आहे असे उत्तमरावांना वाटते. ''आमच्या राज्यघटनेत देवाच्या अस्तित्वाचा कर्तृत्वाचा कुठेही नामोल्लेख नाही. पण आमचे आमदार, खासदार, मंत्री व नेते हा आदेश गुंडळून कोणत्याही शहराला भेट दिली की प्रथम तेथील देवालयाला भेट देतात.''[१३९] हा राजकर्त्यांचा जनतेला धार्मिकता दाखवून त्यांचे मानसिक अपहरण करतात आणि धनिक पुढारी गर्भश्रीमंत लोक याचा फायदा घेतात. यात जनविकास नसतो. भारतीयांच्या मागासपणास येथील वर्णवर्चस्ववादी भूमिका जात व याला जोपासणारे अध्यात्म आहे असा वीर उत्तमरावांचा आपल्या लेखनातून केलेला दावा आहे आणि यावरचा उपाय आहे. 'समता' ही लोकशाही समाजवादाने येईल अशी वीर उत्तमरावांची अपेक्षा आहे. ''भारतातून समाजवाद पळून गेला ह्या देशातील कम्युनिष्ठ पक्ष, काँग्रेस, प्रजा समतावादी पक्ष, जनता पक्ष, जनसंघ, इतकेच नव्हे तर रामराज्य परिषद आणि छोटे मोठे पक्ष भारतात समाजवाद आणण्याचा प्रयत्न करायला निघालेत. ४४ व्या घटना दुरुस्तीत समाजवादी भारत निर्माण करण्याचे घटनेत घातले. त्यामुळे ३५ वर्षात स्वराज्य मिळूनही समाजवाद तर आलाच नाही उलट भांडवलदार त्यांचे हस्तक गुंड नि राजकीय पुढारी समाजवादाच्या गप्पा मारत–मारत भांडवलदारी राजवटीची चौकट मजबूत करत आहेत.''[१४०] यावरून वीर उत्तमरावांनी मांडलेली राजकारणाविषयीची अध्यात्मिक, धार्मिक गुलामगिरी स्पष्ट होते.

भारतात साम्यवाद व समाजवाद यांची झालेली वाताहत पाहिल्यास भारतीय समाजाला वेगळ्या तत्त्वज्ञानाची गरज असल्याचे सहज समजते हे वेगळे तत्त्वज्ञान वीर उत्तमराव देतात आणि यातून भारतीय राजकारणाला वळण देतात. ''संपूर्ण समाजजीवन, राजकारण व अर्थकारण भारतात आजही चातुवर्ण्य, भांडवलशाही व नोकरशाही याच्या कडेकोट पाहऱ्यात बंदीस्त आहे.''[१४१] तेव्हा सहज प्रश्न पडतो की,

---

१३९. *धोंडगे केशवराव (संपा.), जयक्रांती (साप्ता.), दि. १३ सप्टेंबर १९८५.*

१४०. *जोध एस.के. (संपा.), ऋणमोचन (मराठी साप्ता.), दि. ७ जून १९८३.*

१४१. *चांडक श्रीकृष्ण (मुद्रक), देशमुख विठ्ठल (प्रकाशक), बहुजन समाज अधिवेशन, १९७७, पृष्ठ – १.*

रशिया, चीन, पूर्व जर्मनी व व्हिएतनाम यांना मानवलेले साम्यवादी तत्त्वज्ञान भारतास का पचत नाही. याला वीर उत्तमरावांचे विचार हेच उत्तर आहे.

स्वतंत्र भारतात अनेक समस्या आहेत. त्या सोडवण्यास आजचे शासन राजकारण कुचकामी असल्याचे दिसते. उत्तमराव मोहिते यांना छत्रपती शाहू महाराज यांनी चालवलेली राजकीय पध्दत अपेक्षित होती. ब्रिटीशांनी भारतात अन्याय केला, लोकांना दडपून ठेवले. १३ एप्रिल १९१९ रोजी बंदिस्त मैदानातील लोकांवर जे आपली भूमी मागत होते त्यांच्यावर गोळीबार केला. यात कसलीही दया, माया दाखवली नाही तशीच ''अरवाल : स्वतंत्र भारतातील जालियनवाला बाग बनला. १९ एप्रिल १९८६ रोजी बिहार राज्यातील गया जिल्ह्यातील जहानाबाद तालुक्यात 'अरवाल' या गावी चोही बाजूंनी भिंतीनी वेढलेल्या गांधी पुस्तकालयाच्या मैदानावर भुमिहीन दलित शेतमजूरांची सभा सुरू झाली. पोलीस अधीक्षक 'कासवान' याचा गोळीबाराचा आदेश आणि धडाधड कोसळणारे वृद्ध तरुण व कोवळे देह.''[१४२] या दोन्ही घटनेत साम्य आहे. फरक ऐवढाच की, पहिली घटना घडताना राज्य परकीयांचे व अधिकारी गोरे होते. दुसरी घडताना राज्य स्वकियांचे व अधिकारी स्वकीय होते. यावरून स्वतंत्र भारतातील राजकारण समाजहिताचे नसून सामान्य अतिसामान्यांच्या पिळवणुकीचे होते असे म्हटले तर वावगे ठरत नाही. म्हणून उत्तमराव मोहित यांचे समाजवादी राजकारण इथे पूर्ण अर्थाने उपयोगी असल्याचे दिसते.

उत्तमराव मोहीते राजकारण व राजकीय नेत्या बाबत म्हणतात,

- राजकारण आणि राजकीय नेते चोर बाजारात ही कोणी विकत घेणार नाही. नेतेगिरी त्यांचा राजरोस धंदा व व्यापार आहे.
- भारताची सर्वात मोठी बाजारपेठ राजकारणात आहे. सर्वात मोठे नफेदार याच बाजारपेठेत आहेत.

---

१४२. चौधरी नागेश (संपा.), समतेसाठी बहुजन संघर्ष (पाक्षिक), १५ जून १९८६, पृष्ठ – ८.

❀ धर्मवेडी लोकशाही सेक्यूलर भारतात नियोजितपणे निर्माण केली गेली. प्रजातंत्र ओलीस ठेवण्यात आले.

राजकारण्यांनी राजधर्म (प्रजाधर्म) सोडला अशी स्थिती असल्याने भारताची अधोगती आहे. वीर उत्तमरावांच्या मृत्यूनंतर वीस वर्षानंतरही बदलली नाही. म्हणून जनलोकपालसाठी अण्णा हजारे तर काळ्या पैशांसाठी रामदेवबाबा यांना शासनाशी टक्कर द्यावी लागते आहे.

५.४.१ राजकारण आणि धर्मकारण यांचे विभक्तीकरण

राजकारण हे लोकांच्या कल्याणासाठी चालवायचे असते. पण धार्मिक रूढी, धार्मिक स्थळे, धार्मिक व्यक्ती यांच्या विचारानुसार त्यांच्या आधारे चालले तर प्राचीन व मध्ययुगीन काळातील धर्मगुरु व धर्मसत्ता यांनी घालून दिलेल्या नियमानुसार चालते व लोकशाहीची पायमल्ली होऊन दीनदुबळे, गरीब, अज्ञानी, श्रमिक, दलित अशा बहुसंख्य वर्गाला या त्रासास सामोरे जावे लागते. अशा राज्यव्यवस्थेचे उदाहरण म्हणून मध्ययुगीन महाराष्ट्राच्या इतिहासातील पेशवाई सांगता येईल. यांचे विभक्तीकरण केवळ लोकसभेत बील पारित करून कसे होणार? समाज शिक्षणातून विज्ञान–संस्कृती हाच यावरचा तोडगा भारतातील सर्व राजकारणी धार्मिक आहेत आणि सर्व धर्मकारणी राजकारणी आहेत. मग धर्मनीती–राजनीती यांचे गठबंधन कसे तुटणार? सत्तावेड, संपत्तीवेड, धर्मवेड, जातीवेड असे सारेच वेडपट राजकारणात व धर्मकारणात धुमाकुळ घालतात याला ज्ञानी विज्ञानी समाज पायबंध घालू शकेल. ब्राह्मणीझमचा पराभव करून राजनीती व धर्मनीती वेगळी करता येईल असे सुधाकर मोहड वीर उत्तमरावांसंबंधी विचार व्यक्त करताना सांगतात. जाती धर्माचे राजकारण म्हणजे ब्राह्मणीझम (Bharmnism) सारे पक्ष व पुढारी यांचे जाहीरनामे बटीक म्हणून लोकशाहीला निष्ठावंत बनवतात. राजकीय रेडे भारताला काय राजकारण शिकविणार. साधू, संन्याशी राजकारणात घुसतात व राजकारणी साधूचे नाव घेऊन सत्ता भोगतात. यावरून 'समाजत्यागी' व पुढारी भोगी अशी स्थिती भारतीय समाज व राजकारणाची झाली

आहे. प्रजा गरीब आणि साधू गडगंज, लोक उपाशी व धर्मस्थळी सुग्रास नैवेद्य, देशात बेकारी व मंत्र्याच्या बैठकीवर लाखो रुपये खर्च, ''घरे पडकी, शाळा पडक्या आणि जिर्णोद्धार चाललाय मंदीरांचा/धर्मस्थळांचा.''[१४३]

वीर उत्तमराव मोहिते यांना चांगले माहीत होते की, या देशाचा विकास धार्मिक स्थळाचा जिर्णोद्धार करून होणार नाही किंवा नव्याने मंदीरे निर्माण करून होणार नाही तर गावागावात वाडी–वस्तीत, रानोमाळ, घराघरात वैज्ञानिक पद्धतीने जीवनाच्या कसोट्या मांडण्यासाठी प्रयोगशाळा, ग्रंथालये निर्माण झाली पाहिजेत. हे निर्माण न होण्यास भारताची आर्थिक परिस्थिती नाजूक आहे असे दाखविले जाते. पण वस्तुस्थिती पाहता प्रचंड पैसा व संपत्ती भारतात भारतीय धार्मिक स्थळात एकवटलेली आहे. ''इ.स. १९३२ मध्ये पंजाबराव देशमुखांनी हिंदू देवस्थान संपत्ती बील मांडले आणि उत्तमराव मोहिते यांनी हे शेतकरी, कष्टकरी सामान्यांसाठी फायद्याचे कसे आहे हे सांगितले.''[१४४] यामुळे भारताचे दारिद्र्य नष्ट होऊन शिक्षण व आरोग्य याची जोपासना करून समृद्ध भारत बनला असता पण तसे न घडता यास विरोध झाला. देवस्थानात संपत्ती आहे आणि ती जनतेची आहे तरी भुकेल्या व्यक्ती पंचपक्वानाचे ताट पाहू शकतो पण खाऊ शकत नाही अशी स्थिती भारतीयांची आहे. यास उदाहरण म्हणून तिरुपती, पद्मनाभन मंदीर देता येते.

उत्तमराव मोहिते हे गांधीवादी होते. ते गांधीजीच्या काँग्रेसमध्ये राहून देशसेवा करताना दिसतात पण नेतृत्व करत नाहीत. नेतृत्वाला विचार देतात, देशास स्वातंत्र्य मिळवून देणे आणि स्वतंत्र भारतात समाजवादावर आधारलेली लोकशाही त्यांना अपेक्षित होती. भारत ग्रामीण भागात वास्तव करत असल्याने शेतकऱ्यांचा विकास हाच देशाचा विकास होता पण यातील अडथळा म्हणजे अज्ञान–अंधश्रद्धा, धर्मभोळेपणा हे दूर करून वैज्ञानिक विचारांची पेरणी करणारे सरकार हवे होते. देश

---

१४३. *मोहड सुधाकर, विदर्भाचा अग्निपुरुष स्वातंत्र्य संग्राम सेनानी वीर उत्तमराव मोहिते, पृष्ठ – १८–१९.*

१४४. *मोहिते वीर उत्तमराव, जागतिक कृषक क्रांतीचा विधाता लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख, पृष्ठ – १५९,१६०.*

स्वातंत्र्यासाठी गांधी नेतृत्वाकडे पाहिले, समाजवादासाठी नेहरूकडे पाहिले व कृषकांच्या विकासासाठी आणि ग्रामीण विकासासाठी पंजाबरावांकडे पाहिले असे म्हणता येईल.

''डॉ. पंजाबराव देशमुख यांना काँग्रेसमध्ये आणण्यास उत्तमराव मोहिते यांनी व पंढरीनाथ पाटील यांनी विनंती केली होती. इ.स. १९४५ साली सेंट्रल असेंबलीच्या (Central Assembly) च्या निवडणुकीवेळी डॉ. पंजाबराव देशमुख वीर उत्तमरावांना म्हणतात आता मला निवडणुकीला उभे राहायचे आहे. यावर वीर मोहिते म्हणतात मी पक्का काँग्रेसवाला आहे त्यावर देशमुख म्हणाले, मग मी ही काँग्रेसवाला.''[१४५] यावरून असे वाटते की, उत्तमराव मोहिते काँग्रेसप्रेमी आहेत पण उत्तमरावांचे काँग्रेस प्रेम अंध नव्हते. पंजाबराव देशमुख यांच्यात त्यांना खरा राजकारणी दिसला म्हणून त्यांना सहाय्य (support) करण्यासाठी ते आपली लेखनी उचलतात. पंजाबरावाबाबत ते म्हणतात,

''पंजाबराव अनिवार महाझुंजार
नेमूया त्याला जनतेचा नेता आपुला
शेतकऱ्यांचे राज्य करावे
कामकऱ्यांचे राज्य करावे
यासाठी झुंजला''[१४६]

यावरून उत्तमरावांना धर्मनिरपेक्ष समाजहिताचे शेतकरी, कष्टकऱ्यांच्या हिताचे राजकारण अपेक्षित असल्याचे दिसून येते. उत्तमराव यांचे चिंतन मुलगामी असल्याचे दिसते. देशाची प्रगती म्हणजे खेड्यापाड्यातील आणि वाडी वस्तीतील लोकांची प्रगती असते. भारतासारख्या कृषीप्रधान देशातील शेतकरी सोडून प्रगतीचा विचार करणे म्हणजे सप्त सिंधू व हिमालय सोडून उत्तर भारताचा भूगोल अभ्यासल्याप्रमाणे

---

१४५. *कित्ता, पृष्ठ – २८५.*

१४६. *खेडेकर पुरुषोत्तम (संपा.), मराठा मार्ग (मासिक), जून १९९६.*

होईल म्हणून शेतकऱ्यांचे जीवनमानाचे मापन ठरवून शेतकऱ्यांच्या प्रेरणा लक्षात घेतल्या तर ''स्वातंत्र्यानंतरही ३५ वर्षांनी भारतात ७०% लोक निरक्षर आहेत. ५०% दारिद्रय रेषेखाली आहेत. बेकारी, कायदा, शांतता सुरक्षितता यांना आव्हान देत उभी आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी 'सत्ता शहाणी असावी' आमच्या शेतकऱ्यांनी निवडून दिलेले संसद सदस्य शेतकऱ्यांना विसरलेत म्हणून शेतकऱ्यांना शिक्षण व गुलामगिरी नष्ट करण्याचा विचार दिला तर जपानच्या शेतकऱ्याप्रमाणे पार्लमेंटमध्ये जाऊन कायदा करून घेईल.''[१४७] उत्तमरावांना शेतकरीनिष्ठ राजकारण अपेक्षित असल्याचे दिसते. शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती यातूनच सामाजिक व वैचारिक क्रांती यातून राजकीय स्थिती पालटेल अशी अशा व्यक्त करतात. शेतकऱ्यांची जाणीव असणारे नेतृत्व निर्माण केले पाहिजे. ''शेतकऱ्यांच्या शहाणपणातूनच राजकीय नेतृत्व–कर्तृत्व उदयाला येईल. भारतीय शेतकऱ्यांना अशा सुयोग्य नेतृत्वाला सज्ज केले की भारतातील पुरोहितशाहीचा व भांडवलशाही चा मृत्यू अटळ आहे. नेत्यांची सुधारणा हा क्रांतीचा पहिला धडा.''[१४८]

केवळ ग्रंथ निर्माण करून व्याख्याने देऊन, वर्तमानपत्र मासिक, साप्ताहिक, पाक्षिक यातून लेखन करुन भागणार नाही. याबरोबरच राजकीय पुढाऱ्यांना परिस्थितीची जाणीव दिली पाहीजे. त्यांच्या संपर्कात राहून त्यांना कार्य करण्यास प्रवृत्त केले पाहिजे असे उत्तमरावांना वाटते व तसा प्रयत्न ते करतात.

दि. ११ जाने. १९६० काँगेस अध्यक्षा इंदीरा गांधी यांच्या सचिवाकडून पोच उत्तमरावांना मिळाली. भारताचे राष्ट्रपती यांना २ डिसें. १९५८ रोजी मोहितेंचे पत्र मिळताच ६ डिसें. १९५८ रोजी पोच देतात. ४ फेब्रु. १९६० रोजी पंडीत नेहरू यांना पत्र लिहिले त्याची पोच देतात. यशवंतराव चव्हाण, उपराष्ट्रपती सर्वपल्ली राधाकृष्णन यांना पत्रव्यवहार केला. तसेच आजचे पंतप्रधान व योजना आयोगात तत्कालीन वेळी असणारे डॉ. मनमोहन सिंग यांना पत्र पाठवतात याची पोच दि. ३ फेब्रु. १९८७

---

१४७. मोहिते वीर उत्तमराव, पूर्वोक्त,पृष्ठ – ११८.

१४८. कित्ता, पृष्ठ –८३.

रोजी मिळते. मा.श्री. गुलजारीलाल नंदा गृहमंत्रालय भारत सरकार यांना पत्र व्यवहार करतात. पंतप्रधान इंदीरा गांधी १५ मे १९८४ रोजी पत्र लिहितात. भारत सरकारच्या माहिती विभागाला पत्र पाठवतात. पश्चिम बंगालचे राज्यपाल यांनाही पत्र पाठवतात. दि. १६ सप्टें. १९५७ याची पोच दि. २६ सप्टें. १९५७ रोजी पाठवतात. २७ मे १९६० रोजी यशवंतराव चव्हाण उत्तमरावांना पत्र पाठवून सहमती दर्शवतात.

एकंदरीत राजकारणात सक्रीय असणाऱ्या राजकीय नेते व पदाधिकाऱ्यांना उत्तमराव भारतीय समाज त्याची स्थिती व सध्याचे राजकारण आणि राज्यकर्त्यांनी घ्यावयाची भूमिका याबाबत माहिती देतात. चांगल्या निर्णयाचे स्वागत करतात. तर चुकीच्या बाबी निदर्शनास आणून देतात असे दिसून येते. या सर्व बाबतीत वीर उत्तमरावांच्या निर्णयाचे विचारांचे स्वागत करतात. पण त्यांना प्रत्यक्षात उतरण्यात मात्र राज्यकर्ते कच खाताना दिसून येतात. यातून उत्तमराव नाराज झाले पण आपल्या कार्यातून विचलित मात्र झाले नाहीत. पण राजकारण व राज्यकर्ते यांच्या बाबत मात्र अपेक्षांची पूर्तता न करणारे अशा दृष्टीकोनातून पाहतात. मोहिते म्हणतात, ''भारत स्वतंत्र झाल्यापासून भारतातील भिक्षुकी द्विजवर्ण संघटीत होऊन प्रत्येक क्षेत्रात अब्राह्मणावर सतत हल्ले चढवत आहे. बहुतेक सारे राजकीय पक्ष आणि पुढारी तठस्थपणे सारे अत्याचार बघत आहेत असे हे किती दिवस चालणार मनाला नेहमी वाटते. भारताच्या लोकशाहीबद्दल मन उदिग्न होते. असले हे सारे प्रकार बघून साऱ्या राजकीय पक्षाबद्दल मला तिटकारा आला! म्हणून मी स्वत: राजकारण सोडले. यापुढे मी कोणत्याही राजकीय पक्षाच्या व्यासपीठावरून काम करायला तयार नाही. कारण भारतातील सारे राजकीय पक्ष हिंदूत्वाच्या डांबराने बरबटले आहेत. एक पक्ष तरी मला दाखवा त्याने खरोखर धर्मनिरपेक्ष क्रांतिकारक भूमिका घेतली. जोपर्यंत कोणी भौतिकवादी तत्त्वप्रणाली आपल्या पक्षाचे तत्त्वज्ञान म्हणून मान्य करत नाही. तोपर्यंत ब्राह्मणातून भारत मूक्त होण्याची मुळीच आशा नाही.''[१४९] यावरून स्पष्ट आहे की

---

१४९. *बिरादार कालगौंडा जीवनगौंडा (संपा.), पूर्वोक्त.*

भौतिकवादी तत्त्वप्रणाली स्वीकारून पक्षाचे संघटन करण्याची मानसिकता आज तरी कोणत्या पक्षाजवळ नाही आणि म्हणूनच या पक्षीय ध्येय धोरणांना वास्तवता नाही. वास्तवता नसल्याने विकास नाही म्हणून पारंपरिक विचार दृढ आहेत म्हणून वीर उत्तमराव राजकारणापासून अलिप्त राहण्याचा निर्णय घेतात. काँग्रेस पक्षाशी त्यांना जिव्हाळा होता. देशास स्वातंत्र्य मिळवण्यासाठी या पक्षातच कार्य करतात. पंडीत नेहरूंच्या साम्यवादी आशा त्यांना धरून ठेवते. तर पंजाबरावांची कृषक क्रांती प्रेरणा देते. पण या नेत्यांनंतर तळाचा विचार करणारे नेतृत्व कमी झाल्याने आणि यांचे विचार न राबल्याने त्यांना राजकारणाची घृणा वाटते.

यानंतर बहुजन समाज पार्टी वीर उत्तमरावांच्या विचारांशी मिळती जुळती पक्षपद्धती व राजकारण करते. बहुजन समाजासाठी कार्य करण्यास ते सतत तत्पर असत. ''कांशीराम म्हणतात बहुजन समाज पार्टी या बहुजन समाजाच्या पक्षात कार्य करण्याची त्यांची प्रामाणिक इच्छा आहे.''[१५०] कांशीराम यांनी असे स्पष्ट केले. तरी उत्तमराव मोहिते यांनी प्रत्यक्ष राजकारणात भाग घेतला नाही असे दिसते. वीर मोहिते यांनी राजकीय विचार दिला तो आचरणात आणण्यासाठी या विचाराला म. फुले, राजर्षी शाहू, डॉ. आंबेडकर या महाराष्ट्रीयन नेतृत्वाला अपेक्षित असणारे राजकारण काळाच्या बदलानुसार वीर उत्तमराव मांडताना दिसतात.

५.४.२ देशसेवा व समाजसेवा यासाठी राजकारण

मोहिते यांचे राजकीय विचार हे देशसेवा व समाजसेवा यावर आधारलेले आहेत. राजकारणात नसताना राजकारण हे त्यांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. त्यांना स्वत:ची प्रसिद्धी व्हावी असे कधी वाटले नाही. म्हणून त्यांना ज्यांनी चांगले ओळखले असे सुधाकर मोहड म्हणतात, प्रसिद्धी पराभिमुखता हा त्यांचा स्वभावधर्म आहे. यानुसार उत्तमराव शेवटपर्यंत आपले कार्य निष्ठेने केले. आपल्या कार्याच्या पूर्तता करणाऱ्या नेतृत्वाला त्यांनी त्या त्या वेळी मदत केली आणि आपले विचार समाजात

---

१५०. कांशीराम (संपा.), दै. बहुजन टाईम्स, ७ सप्टें. १९८४.

बिंबवून मगच पाहीजे ते राजकारण होईल. त्यांनी ''यशंवतराव चव्हाण यांना काही बाबतीत आधार दिल्याचे दिसते.''[१५१] उत्तमराव यांनी ऑक्टोबर १९४० मध्ये वैयक्तिक सत्याग्रह चळवळ सुरु केली. अमरावतीतून अटक होणाऱ्यांमध्ये उत्तमरावांचा क्रमांक दुसरा होता. यावरून देशासाठीची तळमळ समजते. ''१५ ऑक्टोबरला क्रांतिसिंह नाना पाटलांच्या भेटीला वीर उत्तमराव गेले. त्यापूर्वी १ ऑक्टो. १९४६ मध्ये सातारा प्रतिसरकारचे प्रचार मंत्री शाहीर शंकरराव निकम यांची वर्ध्याला भेट घेतली व कार्यक्रमात वर्धा नागपूर व अमरावती येथे सोबत होते. शेवटी कार्यक्रम आटोपून निघाल्यावर ग्रामराज्य शिबीराची जबाबदारी घेतली. तसेच जिजाबांच्या तमाशात पदे व गाणे लिहिण्याचे स्वीकारले.''[१५२] यावरून त्यांना विदर्भात प्रतिसरकारची स्थापना करावयाची असल्याचे समजते. यासाठी त्यांचा हा प्रयत्न असावा म्हणून वीर उत्तमराव यांचे राजकारण निस्वार्थी होते असे म्हणता येईल.

५.४.३ मराठा विरुद्ध मराठा महाराष्ट्राचे राजकारण

मराठा समाज सांस्कृतिक, धर्म, साहित्य अशा क्षेत्रात मागास आहे. या समाजात अनेक दोष आहेत. व्यापारात मागासलेपण, बिनहिशोबीपणा, पोकळ अभिमान, भाऊबंदकी, परस्पर वैर असल्याने मागास आहे. समाजसुधारणा व अस्पृश्यता निवारण हे दोन मुद्दे सत्ता मिळाल्यावर सोडवण्याची जबाबदारी आहे. बहुजन ही विचारप्रणाली मराठ्यांनी राजकारणात मांडावी, वापरावी कारण 'मराठा' समाज संख्येने जास्त व मध्यवर्ती आहे आणि महाराष्ट्राच्या राजकारणात महत्वपूर्ण असल्याने आज ''धर्म निरपेक्षतेपेक्षा राजकारण निरपेक्षता अधिक जरूरीची आहे.''[१५३] धर्म निरपेक्षता आली आणि सांस्कृतिक मूल्य बदलले तर सर्वच क्षेत्रात निरपेक्ष भावना येवू शकते म्हणून राजकारणात निरपेक्षता ही आपोआप येणार नाही. प्रत्येक राजकारणी हा सामाजिक असतो आणि प्रत्येक सामाजिक हा धार्मिक असतो म्हणून कळत न

---

१५१. *मोहिते वीर उत्तमराव यांचे यशवंतराव चव्हाण यांना पत्र, दि. १० सप्टेंबर १९६०.*

१५२. *मोहिते वीर उत्तमराव, जागतिक कृषक क्रांतीचा विधाता लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख, पृष्ठ – ३०२, ३०३.*

१५३. *चव्हाण रा.ना., चव्हाण रमेश (संपा.), महाराष्ट्र आणि मराठे, पृष्ठ – ३०.*

कळत धार्मिक व सामाजिक ठसा राजकर्त्यांवर उमटत असतो. वरील विधान राजकारणातील गोंधळ स्पष्ट करते.

''महाराष्ट्र 'मराठा देश' या नावाने ओळखला जातो. महाराष्ट्रास राष्ट्रकुट, शिवशाही, पेशवाई, आंग्लाई आणि काँगेसशाही अशी राजकीय परिवर्तने झालीत. पेशवाईपासून मराठा जमातीच्या अध:पतनाला सुरवात झाली आणि आंग्लाईच्या उत्तरार्धात त्याची पराकाष्ठा झाली. आज मराठा जातीची काय अवस्था आहे. याचा विचार राजर्षी शाहू महाराज सोडून कोणीही केला नाही. शेकडो वर्षांपासूनचे स्थित्यंतरात वैचारिक परिवर्तन घडवून आणले. मराठयांचे शत्रू भारतातील मराठेत्तर जमाती नाहीत तर मराठ्यातील धनीक सरजांमी घराणे श्रमजीवी मराठ्यांचे खरे हित शत्रू आहेत.''[१५४] उत्तमराव मोहिते येथे महाराष्ट्राच्या राजकारणासंबंधात मराठ्यांची सत्ता स्पर्धा व मराठ्यांची घरंदाजी हीच मराठ्यांच्या अविकासास पोषक आहे म्हणून महाराष्ट्राचे राजकारण व मराठा या संदर्भाने वीर उत्तमराव मोहिते मराठ्यांच्या वृत्तीत पुरोगामी बदलाची अपेक्षा करतात.

५.४.४ महाराष्ट्राचे शासन, राजकारण

''उत्तमराव मोहिते महाराष्ट्राच्या राजकीय परिस्थितीचा विचार करतात. महाराष्ट्रात बहुजन समाजाचा पहिला मुख्यमंत्री झाला. त्या नामदार यशवंतराव चव्हाणांनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींच्या नेतृत्वाखाली सांस्कृतिक विभाग सुरु केला. या विभागावर लाखो रुपयाचा खर्च केला असेल. या सांस्कृतिक व साहित्यिक विभागाने कोणते दिवे लावले? महाराष्ट्र शासनाकडून या क्षेत्रात काम करणाऱ्यांना कवडीचाही आधार मिळाला नाही. याबाबतीत महाराष्ट्राचा साहित्यिक आणि साहित्यिक विभाग पेशवाईच्या काळाइतकाच मागासलेला आहे.''[१५५]

उत्तमराव मोहिते महाराष्ट्राचे शासन व राजकारणाचा विचार जे साहित्य

---

१५४. *मोहिते वीर उत्तमराव यांचे अप्रकाशित हस्तलिखित, दि. २७ मार्च १९८३.*

१५५. *कित्ता.*

सांस्कृतिक बदलासाठी उपयुक्त आहे असे साहित्य समाजापर्यंत पोहचवण्याची जबाबदारी शासनाची असते. परंतु शासनाने यासाठी जो विभाग सुरू केला. त्या विभागावर परंपरावाद्याचे वर्चस्व असल्याने जनतेपर्यंत परिवर्तनाचा विचार पोहचला नाही आणि खरे साहित्यिक काळाबरोबर मागे पडले. अशी महाराष्ट्राच्या शासन व राजकारणाबाबत भूमिका घेतात आणि सांस्कृतिक बदलासाठी स्वत: लोककलेचा तमाशाचा आधार घेऊन परिवर्तनासाठी प्रयत्न करतात.

एकंदरीत उत्तमराव मोहिते यांचे राजकीय योगदान पाहिले असता असे दिसून येते की, राजकारणात जाणारी व्यक्ती ज्याचे विचार आणि राजकारण हे तत्कालीन सामाजिक जीवन, धार्मिक जीवन याच्या प्रभावातून असते. भारतासारख्या बहुधर्मीय व बहुजातीय देशाला देव, धर्म, अध्यात्म, संत, बुवा या बाबींपासून राजकारण अलिप्त असले पाहिजे. जोपर्यंत या बाबी राजकारणाशी निगडित राहतील तोपर्यंत प्रगती होणार नाही.

महाराष्ट्राचा आधारस्तंभ असलेला मराठा समाज आणि त्यावरील ब्राह्मणी छाप ही मराठ्यांच्या फुटीर वृत्तीला आणि मागासलेपणाला कारणीभूत आहे. यामुळे मराठेत्तर मागास जमाती अत्यंत मागास होत आहेत. मराठा हा मध्यवर्ती असल्याने परिवर्तनाची धुरा या समाजाने उचलावी लागते. हजारो वर्षाच्या गुलामगिरीमुळे विकृत झालेले विचार दुरूस्त करून योग्य राजकारण होऊ शकते. समानता हा राजकारणाचा महत्त्वाचा भाग असावा. जोपर्यंत वर्ण वर्चस्ववादी विचार आहेत तोपर्यंत समानता नसल्याने राजकीय बदल घडवण्यापूर्वी सामाजिक व सांस्कृतिक बदल असा की, ज्यात वैज्ञानिक भौतिकवादावर आधारित सुदृढ समाज रचना आवश्यक आहे. तेव्हाच निरपेक्ष राजकारण येईल असे वीर उत्तमरावांचे राजकारणासंबंधी विचार दिसून येतात.

एकंदरीत उत्तमराव मोहिते यांचे सामाजिक, धार्मिक, सत्यशोधकीय व राजकीय योगदान पाहिले असता मानव हा महत्त्वाचा घटक असून मानवी जीवन सुरळीत चालण्यासाठी या बाबींची आवश्यकता असते. जेव्हा हे विचार विकृत होतात तेव्हा

मानवी जीवन व व्यवहार या बाबीत अडकून पडतो. समाजाला धर्म महत्त्वाचा वाटतो व धर्म जेव्हा अधर्मी बनतो त्यावेळी सामाजिक प्रगती खुंटते आणि मानवी मनोबलावर आक्रमण होते. भारतामध्ये हिंदूत्व हा प्रभावी विचार असून बहुसंख्य लोकांना या विचारधारेत गुंतवून ठेवले असल्याने आणि हिंदूत्वाचा मुख्य आधार देव, अध्यात्म असल्याने यातून अनेक कर्मकांडी विचार समाजात रुजून समाजाचे अतोनात नुकसान झाल्याचे सांगतात. देव, धर्म व अध्यात्म हे समाजहिताचे शत्रू आहेत असे ते मानतात.

सामाजिक व धार्मिक प्रभाव व्यक्तीवर असतो आणि तो व्यक्ती त्या विचारांचा प्रसार करतो. जोपर्यंत त्याला याच्या दुष्ट परिणामाची जाणीव होत नाही. तोपर्यंत त्याला हा विचार प्रभावी वाटतो. म्हणून समाजाच्या प्रगतीचा विचार करणाऱ्यांना दिसून आले की हिंदूत्व अध्यात्म यामुळे समाजाचे नुकसान झाले. यातून समाजाला वाचवण्यासाठी सत्यशोधकीय विचार पुढे आला व अध्यात्म आणि हिंदूत्व यांची हजारो वर्षांची परंपरा पाहून आणि ती बदलण्यासाठी अनेकांनी केलेल्या प्रयत्नांचा अभ्यास करून वीर उत्तमराव अध्यात्म, देव व हिंदूत्वाचा कायमचा निकाल लावतात आणि हिंदूत्वाचे दहन करतात. वर्ण, वंश वर्चस्व यामुळे जाती यातून मानवतेचे पडलेले तुकडे राजकीय माध्यमातून भरून येऊ शकतात. पण त्या आधी समाजाचे नेतृत्व करणारा हा समाजातून जात असतो म्हणून सामाजिक जीवन हे वैज्ञानिक भौतिकवादावर आधारित असावे अशी त्यांची इच्छा व्यक्त होते.

वीर उत्तमराव मोहिते यांची वैचारिकता व परिस्थिती विचारात घेतली असता भविष्यकाळाचा व भूतकाळाचा अंदाज घेऊन वर्तमानात करावयाचे कार्य वीर उत्तमराव स्पष्ट करतात. भारतीय समाजजीवनात आणि हिंदू समाजात असणारी विषमता यामुळे शेतकरी, कष्टकरी, श्रमिक, शूद्र, अस्पृश्य, आणि अज्ञानी समाजाची पिळवणूक सातत्याने सुरू असल्याचे समजते. समाजव्यवस्था, धर्मव्यवस्था व राजकारण यांचा तुटकपणे अभ्यास उत्तमराव करत नाहीत.

समाजव्यवस्थेवर धर्माचा प्रभाव असून हिंदू/वैदिक धर्माच्या व्यवस्थेवर

आधारित समाज आणि या समाजातील राजकारण करणारे नेतृत्व असल्याने या नेतृत्वावर सामाजिक व धार्मिक छाप स्पष्टपणे दिसते. भारतासारख्या बहुधर्मी देशात कोणा एका धर्माची राजवट हिताची नसून सर्वधर्म समभावापेक्षा निधर्मी राजकारण उत्तमरावांना अपेक्षित असल्याचे दिसते.

राजकारण ही सर्वकारणांची किल्ली आहे. म्हणून राज्यकर्ता योग्य व योग्यतेचा निर्माण करण्यासाठी सामाजिक योग्यता तेव्हाच प्राप्त होईल. तो समाज ज्या धार्मिक विचारात वावरतो तो धार्मिक विचार योग्यतेचा असला पाहिजे.

***

उपसंहार

कोणताही समाज, धर्म, राजकारण, अर्थकारण व संस्कृती ही विशिष्ट तत्वावर अवलंबून असते. या तत्वाच्या गुणांवर व त्याच्या प्रभावाने एकंदरीत मानवी जीवन प्रभावीत झालेले असते. एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्रामध्ये ब्रिटिशांच्या व्यवस्थेमुळे आधुनिकता येण्यास प्रारंभ झाला. आधुनिकता स्विकारण्यास महाराष्ट्रीयन मानव सहज तयार झाला नाही तर त्याला स्वत:शी व समाजाशी संघर्ष करावा लागला. पारंपरिक चौकट ओलांडून नव्या तत्वाचा स्विकार ही जीवघेणा प्रसंग होता. अनेक महापुरूषांनी परिस्थितीची पर्वा न करता वैदिक, हिंदू धर्म व तत्वज्ञान आणि अन्य कर्मठ अंधश्रद्धायुक्त विचारांच्या विरोधी मोहिम हाती घेतली. शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली झाल्याने समाजाच्या विविध थरांतून लेखन केले जाऊ लागले आपले जीवन व अनुभव मांडले जाऊ लागले. यामुळे अन्याय झुगारण्याची तयारी सुरू झाली व परंपरा, धर्मांधता, कर्मठता, अंधश्रद्धा, रूढी, परंपरा यांच्या विरोधी भौतिकता, वास्तवता, वैज्ञानिकता व तटस्थता या विचारांचा संग्राम सुरू झाला. महाराष्ट्रातील पराकाष्ठेची प्रतिगामी हिंदूराष्ट्रवादी आणि नवमानवतावादी तत्वप्रणालीचा संग्राम आहे, असे उत्तमरावांचे मत योग्य वाटते. म्हणून, एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्र आधुनिकता आणि पारंपरिकता यांच्यातील संघर्ष असून सांस्कृतिक परिवर्तनाकडे जाण्याचा मार्ग निर्माण करणारा होता असे म्हणता येईल.

विसाव्या शतकाच्या प्रारंभी वऱ्हाडात सुधारणेचे वारे वाहू लागले. याचा अर्थ वऱ्हाडात सुधारणा झाल्या, परिवर्तन झाले असे नाही तर परिवर्तनासाठीचे काही जनमत तयार होऊ लागले. शेती व शेतकऱ्यांची परिस्थिती दु:ख व दारिद्र्याची होती. या परिस्थितीत सर्वसाधारण पारंपरिक विचाराच्या शेतकरी कुटूंबात दि. ७ सप्टेंबर

१९१० रोजी उत्तमराव मोहिते यांचा जन्म पांडूरंगजी व जाईबाई यांच्या पोटी चौथ्या क्रमांकाला झाला.

उत्तमरावांचे आई–वडिल हे पारंपरिक विचाराचे होते. घरची परिस्थितीही सामान्य होती. घरातून उत्तमरावांना पुरोगामी विचार मिळाले नाहीत. या स्थितीत हसत–खेळत गावात फिरत शेताकडे जाणे, नदीवर पोहणे या सवयी लहानपणापासून जडल्या होत्या. यामुळे समाजाचे निरीक्षण उत्तमराव लहानपणापासून करत. भूताटकी, जादूटोना, अंगात येणे या अंधश्रद्धा आहेत, याची कल्पना लहान वयातच उत्तमरावांना आली होती व याचा प्रत्यक्ष प्रयोगही केला. तसेच माणूस–माणसापासून दूर आहे. स्पृश्य–अस्पृश्य याबाबतची समाजाची मानसिकता लहान वयातच अभ्यासली आणि पारंपारिक व्यवस्थेविरूद्ध बंडखोरी केली. कुरळपर्णा हे गाव कर्ज झाल्याने सोडावे लागले व मोर्शी येथे वास्तव्य सुरू झाले. इ.स. १९१८ पासून भाऊसाहेब उर्फ शामराव गुंड यांच्या देखरेखीखाली उत्तमरावांचे जीवन घडू लागले. यात काशीराम बापू देशमुख, लढके गुरूजी, पंढरीनाथ पाटील, शामराव गुंड यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन व्यवस्थेविरूध्द बंड करणारा बालक जीवनाचे ध्येय सत्यशोधन मानून कार्यास लागला. परिस्थितीमुळे १० वी पर्यंतच शिक्षण झाले. तल्लख बुध्दी व मेहनत हा महत्त्वाचा गुण अंगी असल्याने लहान वयापासूनच अंधश्रद्धा निर्मूलन, अस्पृश्यता निवारण, सत्यशोधनाचा छंद, चिकित्सक वृत्ती यामुळे वास्तववादी विचार धारा घेऊन 'धन' मिळवण्यापेक्षा सामाजिक चळवळ लक्ष बनवले.

सामाजिक परिस्थितीकडे जसजसे लक्ष वेधले जाऊ लागले तसे उत्तमराव मोहिते सामाजिक जीवनात गुंतत राहिले व आपल्या जीवनाची दिशा निश्चित केली. गाडगे महाराजांच्या कार्यातून निर्माण होणारी सामाजिकता, उत्तमरावांना सामाजिक कार्याकडे आकर्षित करत राहिली. वयाच्या २८ व्या वर्षी उत्तमराव मोहिते यांनी आपल्या वैचारिक प्रवासास सुरूवात केली व ''देवीच्या देवळात गोहत्या'' हे बारापानी पुस्तिका व त्यातील विषय शेतकरी, कष्टकरी समाजाच्या स्थितीवर प्रकाश टाकून

शेतकऱ्यांचे, कष्टकऱ्यांचे दु:ख उत्तमरावांचे काव्य व्यक्त करतात व दु:खी होण्याची कारणे स्पष्ट करतात. या छोट्या पण वास्तवपरिस्थितीचे केलेल्या चित्रणामुळे डॉ. कोलते नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू अभिप्राय देतात. यावरून उत्तमरावांचा अभ्यास, विचारक्षमता व समाजातील पीडीतांना न्याय देण्याची तळमळ दिसून येते.

इ.स. १९३५ मध्ये उत्तमराव मोहिते यांचा विवाह झाला. पहिला विवाह त्यांना मानवला नाही. एकमेकांना व्यवस्थित समजून घेण्याआधी म्हणजे लग्नानंतर सहा महिन्यात पत्नी त्रिवेणा वारल्या व उत्तमराव उदास झाले पण अभ्यास व सामाजिक चिंतनात वेळ घालवला. अभ्यासाची पक्की बैठक उत्तमरावांजवळ असल्याने एकाकी काळात त्यांनी तत्वज्ञान, इतिहास व मानवीजीवन, भारतीय समाज यांचा बारकाईने अभ्यास केला. हा पारतंत्र्याचा काळ असून समाजाचे सर्व बाजूंनी शोषण होत असे. परकीयांची गुलामगिरी झुगारण्याबरोबर स्वकीयांची दृष्टि मानवतावादी बनवण्यासाठी प्रयत्न उत्तमराव सतत करत असताना दिसतात.

उत्तमराव मोहिते यांनी दुसरा विवाह केला, तो दुसऱ्या महायुद्धाला सुरूवात होताना. मैनाबाई बोंडे ही राजाराम बोंडे रामसाऊर येथील मालगुजाराची मुलगी पत्नी म्हणून उत्तमराव मोहिते यांच्या आयुष्यात आली. दोन मुली व एक मुलगा असा मैनाबाई–उत्तमराव यांचा संसार थाटला. उत्तमराव मोहिते यांनी शिक्षक म्हणून जरूड, वरूड व माहोली येथे नौकरी केली. माहोलीहून ऱ्हटगाव येथे बदली झाली. शिक्षकाची नौकरी त्यांना मानवली नाही. केवळ पगारी नौकरी करून मर्यादीत जीवन जगण्याचे उत्तमरावांचे ध्येय नव्हते. संपूर्ण भारत देशाची स्थिती बदलण्याची अपेक्षा होती म्हणूनच नौकरी सोडून भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात 'सत्याग्रहात' कार्य करू लागले. या बरोबरच मुलाबाळांना उच्च शिक्षण दिले. मुलींना शिकवायचे नाही, नौकरी करू द्यायची नाही हा तत्कालीन काळाचा मापदंड मोडून सामाजिक व राजकीय संघर्षात उतरले. यासाठी त्यांनी ६ वर्ष तुरूंगवासाची शिक्षा भोगली व समाजशिक्षक, राष्ट्रभक्त, स्वातंत्र्यसैनिक म्हणून कार्य केले.

उत्तमराव घर, कुटूंबापर्यंत मर्यादित न राहता पूर्णपणे सार्वजनिक जीवनाकडे झुकले असून पत्नी मैनाबाईसाठी काळजीचा विषय झाला होता. मन खंबीर करून त्या सार्वजनिक कार्यात उत्तमरावांच्या मागे होत्या पण उत्तमरावांनी स्थिर व्हावे अशी मैनाबाईंची अपेक्षा होती. लोंढे व पंजाबराव देशमुख यांच्यामार्फत शिवाजी शिक्षण संस्थेत शिक्षक उत्तमरावांना नौकरी मिळाली. सामाजिकतेची उर्मी असणारे उत्तमराव पंजाबराव देशमुख यांच्याजवळ रमले. यास नौकरी मिळाली हे एवढेच कारण नाही. नौकरी सोडून सार्वजनिक जीवनात पडणारे उत्तमराव नौकरी करून सार्वजनिक जीवन जगता येते कारण पंजाबराव देशमुखांत असणाऱ्या गुणांना मोहिते यांनी ओळखले होते. इथे कुचंबणा होण्याऐवजी कर्तृत्वाला वाव मिळाला.

कोणतेही कार्य एकट्याने करण्यापेक्षा संघटन करून केले तर सोपे जाते. महाराष्ट्रातील संघटना व त्यांचा उद्देश यांचा अभ्यास करून यातून आपले हित होणार नाही, याची उत्तमराव मोहिते यांना कल्पना आली होती. राष्ट्रवादाच्या नावावर हिंदूना अग्रक्रम देऊन वाटचाल करणारी संस्था 'राष्ट्रीय स्वंयसेवक संघ' R.S.S. ही १९२५ साली स्थापन झाली असून या संघटनेतून राष्ट्रीय कार्यापेक्षा रामदासी कार्य चालत असे. म्हणून रामदास स्वामी यांचा इतिहास उलगडून छत्रपती शिवाजींच्या गुरूपदी समर्थ रामदास नसल्याचे ही सांगितले. पेशव्यांनी वर्णवर्चस्वातून, चातुवर्ण्याचे कडक समर्थन करून चालवलेली राज्यपध्दती, समाजव्यवस्था आणि संस्कृती जतन करण्याची व काटेकोर पालन करून घेऊन चालणारी ही व्यवस्था मानवता दुभंगणारी असल्याचे स्पष्ट केले. सर्वसामान्य, दु:खी, अज्ञानी समाजाचे हित जोपासण्यासाठी संघटना आवश्यक मानून स्थानिक पातळीवरील समस्या राष्ट्रीय संघटनेच्या माध्यमातून सोडवता यावी म्हणून डॉ. पंजाबरावांसोबत राहून भारत सेवक समाजाचे कार्य केले. भारताचे भावी पंतप्रधान पंडीत नेहरू यांना महत्त्व पटवून दिले व राष्ट्रीय काँग्रेसच्या बरोबर संघटना नेण्याचा प्रयत्न केला असे दिसून येते.

उत्तमराव मोहिते यांचा अभ्यास विषय महाराष्ट्राचा इतिहास समाज व संस्कृती

आहे. मराठ्यांच्या इतिहासावर उत्तमराव मोहिते आपली मते मांडून वास्तवतेपासून दूर इतिहासाचे लेखन झाल्याचे स्पष्ट करतात. अनेक घटना व प्रसंगाची नव्याने मांडणी करतात. छत्रपती शिवाजी महाराज व समर्थ रामदास यांच्यातील रामदास शिवाजीचा गुरू नसल्याचे स्पष्ट करतात. भगवा झेंडा या बोलपटातून शिवाजी रामदास यांचे गुरूशिष्यसंबंध दाखवल्याने अमरावतीत चित्रपटगृहाचा पडदा फाडतात व शिक्षाही भोगतात. विचाराला कृतीची जोड देऊन ठामपणे ऐतिहासिक व सामाजिक कार्य करतात. मराठ्यांच्या इतिहासाची सांस्कृतिक दृष्टिने मांडणी करून मराठ्यांच्या इतिहासात तुळजापूर, पंढरपूर व जेजूरीचे सांस्कृतिक महत्त्व प्रतिपादन केले. मराठ्यांच्या इतिहासात नवसंशोधन करून वैदिक प्रवाहाऐवजी लोकभावना, लोककला व लोकसंस्कृतीचे राजकीय स्वरूप म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांचे 'स्वराज्य' अशी संकल्पना रूढ करतात.

उत्तमराव मोहिते शुर, धाडसी व अभ्यासक होते. त्यांचे भगवा झेंडा बोलपटातील धाडस व त्यांचा अभ्यास याची दखल अमरावतीतील जाणकार मंडळींनी घेतली. नित्यानंद विठोजी मोहिते, काशीराव बापू देशमुख, पी.के. देशमुख, शिवाजी पटवर्धन व डॉ. पंजाबराव देशमुख यांनी अमरावतीतील नेहरू मैदानावर जाहीर सभा घेऊन हजारो लोकांच्या उपस्थितीतीत डॉ. पंजाबराव देशमुख यांनी उत्तमराव मोहिते यांना 'वीर' पदवी दिली. या पदवीस उत्तमराव मोहिते खरोखरचं योग्य आहेत असे दिसून येते.

वीर उत्तमराव मोहिते यांनी स्वातंत्र्याचा अर्थ व्यापक दृष्टिने घेतला. केवळ इंग्रजांच्या जाण्याबरोबर हजारो वर्षांपासून देशांतर्गत असलेली गुलामी, दडपशाही, अन्याय, दास्यत्व, विषमता, अस्पृश्यता यांना घालवावे लागेल आणि व्यवहारात समता, बंधुभाव निर्माण होईल ते खरे स्वातंत्र्य असेल. उत्तमराव मोहिते इंग्रजांविरोधी लढत राहिले व देशातील कर्मठ तत्वज्ञान, कर्मठ व्यवस्थेशी शेवटपर्यंत लढत राहिले म्हणून दुहेरी अर्थाने 'स्वातंत्र्य सैनिक' म्हणून उत्तमरावांचे नाव घ्यावे लागते. सातारा

येथे क्रांतीसिंह नाना पाटील यांनी स्थापन केलेल्या प्रतिसरकारला विदर्भात लोकप्रिय बनवण्यास मदत केली व प्रतिसरकारच्या मंत्रीमंडळाला व नाना पाटलांना सहकार्य करून लोकराज्य निर्मितीचा विदर्भात प्रयत्न केला. देशपातळीवर असे सरकार बनवण्याची अपेक्षा उत्तमराव मोहिते यांची होती.

मराठा विज्ञान मंडळ/मंदीर ही संस्था वीर उत्तमराव मोहिते, दौलतराव गोळे, प्रा. राम मेघे, बापूराव पाटील यांनी मोहिते यांच्या अध्यक्षतेखाली व मार्गदर्शनाखाली चालवली. यातून उत्तमराव मोहिते यांनी आपले घर या संस्थेचे कार्यालय बनवले. लोककला, लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती या माध्यमातून वैज्ञानिक दृष्टिकोन लोकमानसात पेरला व लोकउन्नतीसाठी कार्य केले. देव, धर्म, अध्यात्माने मानवीजीवन निराशा व दु:खमय बनवले होते. यामुळे लोकांना नवचैतन्य देऊन लोकांना चित्रकला, संगीत, वाद्यकला, नृत्य या ललीतकलांतून होणारा स्वाभाविक आविष्कार स्विकारून वैज्ञानिक संस्कृतीच्या निर्मितीसाठी कार्य केले. भारताचे पंतप्रधान, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, अनेक राज्यातील मुख्यमंत्री, अनेक विद्यापीठांचे कुलगुरू यांनी वीर उत्तमराव मोहिते यांच्या सांस्कृतिक परिवर्तनाच्या कार्याचे कौतूक केले. उत्तमराव मोहिते यांनी या मंडळाच्या माध्यमातून अनेक ग्रंथ प्रकाशित करून नवविचार दिला त्यांचे मराठा विज्ञान मंडळाचे कार्य भारतीय संस्कृती व समाज यांना वैज्ञानिक विचाराकडे नेण्याचा महत्त्वपूर्ण प्रयत्न आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे दलित, शोषित, पीडित समाजाला न्याय देण्याचे कार्य चालु असताना मोहिते त्यांच्या कार्याचे स्वागत करतात व त्यांचे कार्य पुढे चालवण्याची इच्छा ठेवतात. डॉ. आंबेडकरांनी मनुस्मृती जाळली. त्याची पुढची पायरी म्हणून दासबोध जाळतात व महाराष्ट्रातील व भारतातील फुले, शाहु, आंबेडकर, पेरियार यांचे कार्य चालवण्याबरोबरच हिंदू धर्म विषमतेचे बुड आहे म्हणून आजतागायत कोणी केले नाही असे धाडस करतात व हिंदू धर्माचे दहन करतात. ते योग्य असल्याचे दिसते. डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या शेतकरी, कष्टकरी, अज्ञानी समाजाबाबतचे

कार्य उत्तमराव मोहिते स्वत: कर्तव्य समजून करतात व या देशातील अन्यायी समाजाला न्याय देण्याचा प्रयत्न करतात. आंबेडकर आणि मोहिते यांच्यात काँग्रेस पक्ष ही तफावत होती. मोहित्यांना काँग्रेसच्या माध्यमातून परिवर्तनाची अपेक्षा होती म्हणून डॉ. पंजाबरावांना काँग्रेस पक्षात आणण्याचे कार्य केले. उत्तमराव मोहिते यांची काँग्रेसबाबतची भुमिका कायम राहिली नाही. उत्तर आयुष्यात काँग्रेसबाबत खंत व्यक्त केली. डॉ. आंबेडकर, डॉ. पंजाबराव व वीर उत्तमराव यांचे कार्य एकाच विचाराचे असल्याचे दिसते.

वीर उत्तमराव मोहिते यांनी संदेश साप्ताहिकातून लेखन केले. 'महात्मा गांधी वैकुंठाला गेले आता तरी डोळे उघडा', 'डॉ. पंजाबराव देशमुखांच्या मोटारला ब्रेक नाही', 'हिंमत असेल तर बसा', 'दुखते कुठं अन् सांगते कुठं' असे लेखन केले. उत्तमराव मोहिते यांचे लेख लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या सारखे सडेतोड आहेत पण टिळकांचे लेख प्रस्थापित चातुवर्ण्य व्यवस्था मजबूत करण्यासाठी उपयुक्त आहेत तर उत्तमराव मोहिते यांचे विचार दीनदुबळे, दलित, पीडित यांचे हित असून प्रस्थापित व्यवस्थेला तडा देण्याचे कार्य केले व समाजजागृती व राष्ट्रजागृती केली असे दिसते. पंढरपूर हे सगुण दैवत वारकऱ्यांनी वैदिकविरोधी उभे केले आहे आणि वारकरी म्हणजे क्रांतिकारक अशी ओळख समाजाला देऊन स्वत: वारकरी आहेत असे स्पष्ट सांगतात. वारकऱ्यांना त्यांच्या मूळ स्वभावाचा विसर पडला असून मुळ स्वभावाची जाणीव देऊन समाज व सांस्कृतिक परिवर्तन आणण्याचा प्रयत्न महत्त्वाचा ठरला. चातुवर्ण्य व्यवस्था मानवतेची हानी करणारी असल्याने वर्णव्यवस्था अमान्य करून वारकरी संप्रदायाने दैवी चमत्कार, बुवाबाजी, ढोंग नाकारले व पंढरपूर केंद्र बनवून भौतिकवादी विचार समाजात रूजवला याचा विसर समाजास पडला. याची जाणीव देवून वारकरी संप्रदायाचा मूळ आधार उत्तमराव मोहिते स्पष्ट करतात. भारतीय तत्वज्ञानाचा अभ्यास करून 'योग' आणि 'परमेश्वर' यांचा काहीही संबंध नाही 'योग' विज्ञान असल्याचे स्पष्ट केले आहे. देव, धर्म, अध्यात्म, अंधश्रद्धा या बाबी नाकारून

नैसर्गिक सत्याची जाणीव उत्तमराव मोहिते समाजाला करून देतात.

उत्तमराव मोहिते यांच्या जीवनाकडे पाहिले असता सतत संघर्षमय जीवन उत्तमराव जगले. अनेक अडचणी असताना देशसेवा व समाजसेवा आयुष्यभर केली. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले. विदर्भात कृषी विद्यापीठ आंदोलनात उघडपणे विदर्भाची बाजू घेतात आणि त्यासाठी संघर्ष करतात. हा संघर्ष पाहून विदर्भाची बाजू उघडपणे मांडतात असे दिसते. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीत विदर्भ वेगळा नको असे मत मांडतात. यावरून असे स्पष्ट आहे की, एकात्मतेतून विकास साध्य करण्याचा प्रयत्न करतात व मागास भाग सुधारण्याचा प्रयत्न करतात. उत्तमरावांचा महाराष्ट्राच्या इतिहासात सामाजिक व राष्ट्रीय जीवनात योग्य निर्णय असल्याचे दिसते म्हणूनच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री वीर उत्तमरावांच्या विचारांचे स्वागत करतात. यातून उत्तमरावांची भुमिका अधिक स्पष्ट होते.

आधुनिक भारताच्या शिक्षणाच्या इतिहासात अनेक उलथापालथ झाली. नव्याने निर्माण होणाऱ्या भारतात शिक्षणव्यवस्था कशी असावी याबाबत शासन अनेक तज्ञांचा सल्ला घेत असे. या सल्लागार समितीत शिक्षणक्षेत्रातील जाणकार असत. अनेक समित्या नेमूनही शिक्षणात सुव्यवस्था येत नव्हती. या शिक्षण समित्यातील तज्ञांना उत्तमराव मोहिते सल्ला देतात. प्राथमिक शिक्षण व त्याचा दर्जा हा प्रमुख विषय असून भारतीय सामाजिक स्थिती व त्यानुसार शिक्षण असावे असे सांगतात. ग्रामीण व शहरी, श्रीमंत व गरीब अशी वर्गवारी करतात आणि प्राथमिक शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी गणित, विज्ञान, भुगोल या विषयांबरोबर इतिहासातून व मराठी सारख्या विषयात वैज्ञानिकता आली पाहिजे व गणित आणि विज्ञानावर विशेष भर दिला जावा, असे सुचवतात. परीक्षा पध्दतीबाबतही नियमितता व दक्षता आवश्यक असल्याचे प्रतिपादन करतात. यातून आजच्या प्राथमिक व माध्यमिक शिक्षणव्यवस्थेत उत्तमरावांचे विचार दिसतात तर त्यांनी सुचवलेल्या शिफारशींची अजून पूर्तता व्हायची आहे. शासनाचे नापास न करण्याचे धोरण व गुणवत्तेतील ग्रेडेशन पध्दत उत्तमरावांचे

विचार पाहत आज चुकीची ठरते म्हणून महाराष्ट्राच्या शिक्षण व्यवस्थेला उत्तमराव मोहिते यांचे विचार आजही उपयुक्त असल्याचे दिसतात.

आयुष्यभर चिंतन, मनन, संघटन, संघर्ष, वास्तवाचा शोध, सत्यशोधन करत आयुष्याच्या शेवटच्या दशकापर्यंत उत्तमरावांनी अनेक ग्रंथांची निर्मिती करून महात्मा फुले, राजश्री शाहु, डॉ. आंबेडकर व डॉ. पंजाबराव यांना अपेक्षित असणारे कार्य काळाच्या संदर्भाने व नव्या काळाच्या उपयुक्ततेने समाजाला दिले. तत्वज्ञान, इतिहास, लोककला, लोकवाङ्मयातून लोकसंस्कृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला. वैज्ञानिक संस्कृतीची निर्मिती करण्यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख वैज्ञानिक संस्कृतीपीठ सत्यशोधन, सत्यशोधकीय विचार याला दौलतराव गोळे, शंकरराव इंगोले यांच्या प्रयत्नाने उत्तमरावांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. पंजाबराव देशमुख वैज्ञानिक संस्कृतीपीठ कार्यरत राहिले. उत्तमराव मोहिते यांनी आयुष्यभर केलेल्या संशोधनाचे फळ म्हणून त्यांच्या दोन पुस्तकांना रशियन पुरस्कार मिळाला. या संशोधन कार्याची दखल घेऊन उत्तमराव मोहिते यांना 'वैज्ञानिक संस्कृतीचा आचार्य' पदवी बहाल करण्यात आली. डॉ. पंजाबराव देशमुख वैज्ञानिक संस्कृतीपीठ उत्तमराव मोहित्यांच्या दृष्टिने महत्त्वाचे राहिले व यानंतरच्या पुरोगामी विचाराला संघटित करण्यास मदत करणारे ठरले.

भारतीय समाजव्यवस्थेचा अभ्यास केला असता समाजव्यवस्थेच्या अधोगतीचे कारण धर्म व्यवस्थेत असल्याचे दिसते. म्हणून उत्तमराव मोहित्यांनी हिंदू धर्मातील चातुवर्ण्य व्यवस्था दोषयुक्त आहे असे सांगितले व हजारो वर्षापासून या व्यवस्थेच्या जुलमात शेतकरी, कामगार, शुद्र, अस्पृश्य जीवन जगत व या समाजाला समाजव्यवस्थेत महत्त्वहीन लेखले जाई. या समाजाला ही व्यवस्था बदलून नव्याने समतावादी व्यवस्था निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले. यातून असे दिसून आले समाजव्यवस्थेतील दोष अनेकांनी सुधारण्याचे प्रयत्न केले पण फारसा फरक पडला नाही कारण विषमता जोपासणारी पिळवणूकीची बलवान मनोवृत्ती ब्राम्हणाच्या रूपाने कार्यरत दिसली. महाराष्ट्रातील मराठा बहुसंख्य असला तरी मराठाच मराठ्यांचा शत्रू

बनल्याचे दिसले. यास अध्यात्मिक वृत्ती कारणीभूत असून याच्या मुळावर घाव घातल्याशिवाय परिवर्तन होणार नाही म्हणून अध्यात्मिक मूल्यावर आधारित संस्कृतीला वैज्ञानिक मूल्य देवून सामाजिक क्रांती वैज्ञानिक मूल्यांच्या आधारावर निर्माण करण्याचा प्रयत्न उत्तमरावांनी आयुष्यभर केला. समाजाच्या एका कप्प्यात न बसता सर्वांना एका सूत्रात बांधून समता व बंधुत्वाचा संदेश दिला. जातीभेद निर्मूलन, अस्पृश्यता निवारण, आजच्या सार्वजनिक जयंत्या, सामाजिक एकोपा उत्तमरावाच्या वैचारिकतेचा परिणाम म्हणता येईल. समाज क्रांती यशस्वी होण्यासाठी देव, धर्म व अध्यात्माच्या परंपरेवर आधारलेल्या काल्पनिक जगाला विज्ञान दर्शनाचे वैज्ञानिक मूल्य सांगून हाच समाजव्यवस्थेचा पाया सांगितला व उत्तमरावांनी सामाजिक 'उत्तमवाद' मांडल्याचा दिसतो.

मानवाला 'धर्म' महत्त्वाचा वाटतो. आजपर्यंतची धार्मिक व्यवस्था अभ्यासून धर्माबाबत अनेकांनी व्याख्या व अभिप्राय दिले. याहून मोहिते वेगळ्या पध्दतीने धर्माची व्याख्या करतात. 'धर्म' या शब्दाची व्याख्या करण्यात वेळ न घालवता हजारो वर्षापासून मानव धर्म म्हणून जे–जे कार्य करतो त्या कार्यातील चुका निदर्शनास आणुन दिल्या. मानवाची जी कृती धर्म नावाने चालते आणि त्याला हजारो वर्षांचा कायम वारसा असतो अशा वास्तविक धर्मश्रध्देबाबत मत देतात. ग्रंथातील 'धर्म' किंवा कोणा देवदुताच्या सांगण्यावरूनचा धर्म किंवा धर्म शब्दाचा व्याकरणिक किंवा उत्पत्ती अर्थ न धरता जसा दिसला, अभ्यासला प्रत्यक्ष व्यवहारात आला. त्या धर्माबाबत म्हणतात, ''गृहीतत्व, कल्पना सत्य मानून त्या पुढे चालवण्याचा प्रयत्न करताना गृहीततत्व पुराव्यानिशी सिध्द न करता चालवला अशा विचाराला काल्पनिक पध्दतीने चालणारी व्यवस्था म्हणजे धर्म मानतात.'' हिंदूधर्म या उदा. स्पष्ट करतात की, अध्यात्म, ब्रम्हविद्या, देव, दैवी यातील बाबी प्रमाणाने सिध्द होत नाहीत म्हणून हिंदू/वैदिक धर्म ही ब्राम्हण जातीसाठी लाभकारी असून ब्राम्हणेत्तर जातीचे शोषण करणारी व्यवस्था आहे.

उत्तमराव मोहिते यांची धर्मविषयक भुमिका अभ्यासली असता 'धर्म' मानवी प्रगतीतील अडसर आहे व हिंदू धर्म त्याचे उत्तम उदाहरण आहे. आजतागायत अनेक वेळा अनेकांनी धर्म नाकारला. एक धर्म नाकारला असता पर्यायी धर्म निर्माण केला पण उत्तमराव मोहिते हिंदू धर्म व धर्मव्यवस्था नाकारतात पण पर्यायी धर्म सुचवत नाहीत. जीवन जगताना व्यावहारिक वैज्ञानिक मार्ग सुचवतात.

सत्यशोधकीय वृत्तीतून उत्तमरावांनी चिकित्सा केली. व्यक्तीच्या जन्मापासून विषमतेचे विष पाजले जाते व जातीवाद जोपासून मानवतेची चिरफाड होते. पुर्वजन्म, पुर्नजन्म, पाप, पुण्य, स्वर्ग, नरक, आत्मा, परमात्मा, अध्यात्म, ब्रम्हविद्या, बुवा, चमत्कार यामुळे व्यक्ती आपल्या जीवनात जबरदस्त भीती बाळगुण राहतो व आपल्या गुणांना आतल्या आत दाबून ठेवतो यामुळे प्रगती होत नाही. हजारो वर्षांचा इतिहास डोळ्यासमोर ठेवून हिंदू धर्मात प्रगती न झाल्याने त्याचे दहन करून सत्यशोधकीय कर्तव्य पार पाडतात व चौफेर चिकित्सेचा विज्ञान मार्ग जीवन व्यवहारासाठी सुचवतात. हे उत्तमराव मोहिते यांच्या धाडसाचे प्रतिक आहे व अशी निडर व्यक्तींची भारतासारख्या देशाला गरज आहे.

राजकीय दृष्टी मानवी जीवनव्यवहारासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. देश, धर्म, समाज, वातावरण यानुसार राजकारण प्रभावित झालेले असते. राजकारणाची सार्वत्रिक एकसुत्रता दिसून येत नाही. राजकारणात जाणारा व्यक्ती व त्यावरील प्रभाव भावी राजकारणाची दिशा ठरवतो. व्यक्ती समाजशील असल्याने त्या–त्या समाजाच्या धर्माचा प्रभाव असतो पण भारतासारख्या बहुधर्मीय व बहुजातीय देशात धर्मापासून राजकारण अलिप्त असले पाहिजे. देव, धर्म, अध्यात्म, संत, बुवा या बाबीपासून राजकारण अलिप्त असावे. कोणत्याही राजकीय व्यक्तीला सार्वजनिक जीवनात आपल्या धर्माचा किंवा अन्य दुसऱ्या धर्माचा आधार नसावा, धार्मिक बाबी राजकारणाचा जाहीरनामा नसावा. पदावरील व्यक्तीने कोणत्याही धार्मिक स्थळी जाऊन दर्शन घेऊ नये. तो राज्यकर्ता निधर्मी असावा तेव्हाच बहुधर्मी भारताचा विकास

साध्य होईल.

उत्तमरावांचे सामाजिक, धार्मिक, सत्यशोधकीय व राजकीय विचार हे एकमेकांपासून भिन्न नसून ते एकमेकांत अडकलेले आहेत. कोणताचा भाग स्पष्ट वेगळा काढता येत नाही. समाजावर धर्माचा, राजकारणावर समाज व धर्माचा प्रभाव असतो म्हणून तो त्या विचारानुसार वर्तन करतो. त्या वर्तनाचे दुष्परिणाम दाखवून त्यात परिवर्तन करण्यासाठी आणि बहुधर्मीय व बहुजातीय व्यवस्था नष्ट करून मानवतेची निर्मिती करण्यासाठी सामाजिक जीवन वैज्ञानिक भौतिकवादावर अवलंबून असावे असा उत्तमरावांचा विचार असल्याचा दिसून येतो.

वीर उत्तमराव मोहिते यांनी जसे स्वातंत्र्य संग्रामात, सामाजिक, धार्मिक व सत्यशोधकीय संग्रामात महत्त्वपूर्ण योगदान दिले तसेच ते साहित्य संग्रामात मागे राहिले नाहीत. त्यांचा एक–एक ग्रंथ एक सामाजिक धार्मिक चळवळ उभारू शकतो. त्यांचे उपलब्ध साहित्य अभ्यासले असता त्यातून स्पष्टपणे नवनिर्मितीची उर्मी दिसून येते. साहित्य, काव्य, पोवाडे, लावणी, गीत, अभंग, अखंड तत्वज्ञान, संशोधन इ. उत्तमरावांच्या लिखानाचे ठळक वैशिष्टये असून भारतीय जीवनपध्दती आणि त्यातील अंधश्रद्धात्मक गुलामगिरी व तिची कारणमिमांसा करून २१ व्या शतकात सामाजिक, धार्मिक, साहित्यिक, तत्वज्ञान, इतिहास इ. मार्गाने नवसंस्कृती निर्मितीचा भक्कम पाया घातला.

त्यांच्या ग्रंथातून वास्तविकता, प्रमाणबध्दता, मानवता, बंधुभाव, चिकित्सकवृत्ती, कठोरता, तटस्थता, निपक्ष:पातीपणा, सत्यता, हिंदूधर्म तत्वज्ञान व ब्राम्हणांबाबत तिरस्कार, अन्यायाबाबत चीड, सर्वसामान्यांचे सार्वजनिक हित इ. वैशिष्ट्ये त्यांच्या लेखनातून दिसून येतात. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर त्यांच्या ग्रंथाचा गौरव झाला. हजारो वर्षाचा भारतीय तत्वज्ञानातील अधुरा प्रश्न उत्तमराव मोहिते यांनी हजारो वर्षाच्या तत्वज्ञानाच्या अभ्यासातून मार्गी लावला. यामुळे भारतीय तत्वज्ञानाला नवी दिशा मिळाली.

मोहिते यांची सत्यशोधनाविषयीची तळमळ होती म्हणून पदरमोड करून सामाजिक परिवर्तनासाठी लागणारे साहित्य उपलब्ध करून दिले. यातून समजते की, उत्तमराव मोहिते खरे सत्यशोधक होते व आयुष्यभर हे कार्य करत राहिले. बहुजन समाज, शुद्र, अतिशुद्र, अस्पृश्य, शेतकरी कामगार यांच्या स्थितीत सुधारणा करण्याची धमक मोहिते यांच्या लेखनात आहे. महाराष्ट्राच्या संदर्भाने विशेषत्वाने मोहिते यांचे लेखन असून मराठा समाजाच्या मागासपणा, कर्मठपणा व सनातनीवृत्ती यांच्यावर हल्ला करतात आणि मराठ्यांचे खरे शत्रू, श्रीमंत मराठे असल्याचे सांगतात. सद्य परिस्थितीत उत्तमरावांचे विधान योग्य ठरते. मराठ्यांच्या आरक्षणाला मराठ्यांकडून विरोध होतो. बहुसंख्य आमदार, खासदार मराठा असताना आरक्षण मिळत नाही हे उत्तमरावांच्या विचाराला अधिक विश्वसनीय बनवतात.

वैदिक धर्म, चातुवर्ण्य व्यवस्था, बुवाबाजी, साधुंचा ढोंगीपणा यावर प्रहार करताना आक्रमक वाटतात. भारतीय इतिहासाचे वास्तवदर्शन करण्याचा प्रयत्न करतात व मराठ्यांच्या दुर्लक्षीत इतिहास लिहिण्याचा प्रयत्न करून सांस्कृतिक इतिहासलेखनाला विशेष महत्त्व देतात.

दैनंदीन जीवन व्यवहारासाठी वैज्ञानिक दृष्टिकोन उत्तमराव मोहिते यांच्या लेखनाचा आत्मा आहे. कोणतीही तडजोड मान्य करत नाही. जे जसे आहे तसे स्विकारण्याची त्यांची वैचारिकता आहे. उत्तमराव मोहिते यांचे एकुण लेखन मानवता व बंधुभावाची निर्मिती करणारे आहे. तत्कालीन काळाला मार्गदर्शक व भावी काळाला दीपस्तंभ ठरणारे मोहिते यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. त्यांच्यात वैचारिक व्यापकता असून सर्वसमावेशकता आहे. त्यांच्या वृत्तपत्रीय सवाल–जवाबातून वैचारिक व्यापकता दिसून येते. ते आचार्य अत्रे यांच्याबरोबर वीर उत्तमराव मोहिते यांचा इ.स. १९६९ साली झालेला संघर्ष उत्तमरावांची भुमिका सनदशीर, संयमी व प्रमाणबद्ध असल्याचे दिसते. यात अत्रे यांनी मात्र शिव्यांचा भडीमार केला तरी उत्तमरावांचे संतुलन कायम राहिले.

वीर उत्तमराव मोहिते यांच्यावर देवद्रोही व देशद्रोही अशी टीका केली जाते पण या टीकेमध्ये काही तथ्य नसून संपूर्ण आयुष्य देशसेवेसाठी घातले व त्यांच्या संपूर्ण लिखानातून देशहिताची तळमळ दिसून येते. त्यांच्या दोन ग्रंथांना रशियाचा पुरस्कारही मिळाला आहे. उत्तमरावांबाबत असे म्हणावे वाटते ज्याप्रमाणे भगवान बुध्दांचा जन्म भारतात झाला आणि मानवतेचा संदेश त्यांनी दिला. भारतीय व्यवस्थेने मात्र याकडे दुर्लक्ष केले. जगभरात बुध्दाचा संदेश जीवन व्यवहारात उतरला. तसेच वीर उत्तमराव मोहिते यांचे संपूर्ण लिखान मानवता व वैज्ञानिकता यावर आधारलेले असून मानवमुक्तीचा संदेश देणाऱ्या मोहित्यांच्या ग्रंथांना रशियाने पुरस्कार दिला पण भारतीयांनी याकडे पाठ फिरवली. महाराष्ट्र सरकारने महत्त्वपूर्ण असणारे उत्तमरावांचे साहित्य शासकीय पातळीवरून जनहितासाठी व मानवतेसाठी प्रकाशित करावे.

निष्कर्ष :

१) उत्तमराव मोहिते यांचा जन्म रूढीप्रिय, पारंपारिक विचारांच्या सामान्य शेतकरी कुटूंबात झाला.

२) लहान वयापासूनच चिकित्सक वृत्ती व सत्यशोधन उत्तमरावांचा स्वभाव बनला. त्याला अधिक मजबूत शामराव गुंड व काशीराम बापु देशमुख यांनी केले.

३) महाराष्ट्रातील एक निडर व्यक्तीमत्त्व म्हणून उत्तमराव यांचे नाव घ्यावे लागते.

४) उत्तमराव मोहिते यांच्या लिखानात शास्त्रीय पध्दत दिसून येते.

५) समाजवादी समाजरचनेचा पुरस्कार उत्तमराव मोहिते करतात.

६) महाराष्ट्राच्या/मराठ्यांच्या इतिहासाचे इतिहास संशोधक व इतिहासकार म्हणून उत्तमरावांचे कार्य महत्त्वपूर्ण ठरते.

७) विदर्भातील सत्यशोधक चळवळीला खंबीर आधार देऊन ही चळवळ विस्तृत करण्यात महत्त्वाची भूमिका घेतली म्हणून ते या चळवळीचे एक दीपस्तंभ आहेत.

८) उत्तमराव मोहिते यांचे लेखन प्रामुख्याने शोषक व शोषित या समाजगटावर आधारित आहे.

९) उत्तमराव मोहिते दुर्लक्षिलेल्या समाजाचे व व्यवस्थेने टाकलेल्या समाजाचे नायक ठरतात.

१०) उत्तमराव मोहिते बहुजन समाजाचे मार्गदर्शक आहेत.

११) हिंदू धर्म तत्वज्ञान व हिंदूचे व्यवहारिक जीवन हा उत्तमराव मोहिते यांचा अभ्यास विषय असून ते काल्पनिक असल्याचा व वास्तविक जीवनात उपयोगी नसल्याचा दावा करतात.

१२) जागतिक समाज, भारतीय समाज यांचा अभ्यास करून भौतिकवादी वैज्ञानिकता हा समाजरचनेचा पाया असावा, असे मोहिते सूचवतात.

१३) ढोंग, फसवणूक, पिळवणूक, सनातन वृत्ती व प्रतिगामी विचारावर कडाडून हल्ला करतात.

१४) भौतिकवाद व विज्ञानवाद उत्तमराव मोहिते यांच्या लिखानाचा पाया आहे.

१५) जीवनातील अनुभव, प्रयोगशाळेतील वैज्ञानिक प्रयोग, विशिष्ट विज्ञानाची प्रगती आणि विशिष्ट विज्ञानाने केलेले विक्रमी शोध यांच्या सामान्यीकरणातून मार्क्स दर्शनाचा उदय व विकास झाला. या दर्शनाने संशोधनाची वैज्ञानिक पध्दती मानवजातीला उपलब्ध करून दिली. यामुळे नैसर्गिक विज्ञानाचा संशोधक भौतिकवादी असलाच पाहिजे असे झाले आहे.

१६) उत्तमराव मोहिते सामाजिक विषमता, अज्ञान, अंधश्रद्धा, परंपरा व जातीयतेचा उघड विरोध करतात.

१७) उत्तमराव मोहिते यांना देण्यात आलेली वीर ही पदवी योग्य आहे.

१८) भारती स्वातंत्र्य लढ्यात दुहेरी स्वातंत्र्यसैनिक आहेत.

१९) हिंदू धर्म, देव, अध्यात्म, ब्रम्हवाद आणि ब्राम्हण याबाबत लिहिताना आक्रमक होतात व म्हणतात भारतीय समाज साहित्य धर्म व इतिहास हिंदूराष्ट्रवादी व

नवमानवतावादी क्रांतिकारक यांच्यातील तत्त्वप्रणालीचा संग्राम आहे.

२०) सांस्कृतिक परिवर्तनाबरोबर सांस्कृतिक इतिहास लेखनाला महत्त्व प्राप्त करून देतात.

२१) उत्तमराव मोहिते महान योगी आहेत.

२२) महात्मा फुले, राजर्षी शाहू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. पंजाबराव देशमुख वादाचे भाष्यकार आहेत. डॉ. आंबेडकर व डॉ. पंजाबराव यांच्या विचारांचा सखोल अभ्यास व त्यांचा सहवास उत्तमराव मोहिते यांना लाभला म्हणून शुद्रातिशूद्र, कृषक यांच्यावर लिखान करताना त्यांची लेखणी विषयात घुसते व आंबेडकरवाद आणि पंजाबरावववाद स्पष्ट करते.

२३) डॉ. पंजाबराव देशमुखांचे पहिले चरित्रकार तसेच चरित्र ग्रंथाला वस्तुनिष्ठ बनविणारे उत्तमराव मोहिते पहिले चरित्रलेखक असावेत.

२४) व्यक्तीपूजेपेक्षा तत्वाला महत्त्व देऊन विज्ञानाला महात्मा, महात्मा फुलेंना महान मानून २१ व्या शतकातील तत्वज्ञानाचा विश्वकोष उत्तमराव मोहिते ठरतात.

२५) प्रसिध्दी पराडमुखता उत्तमराव मोहिते यांचा स्वभाव आहे.

२६) उत्तमराव मोहिते सगुण साकाराचे वारकरी आहेत.

२७) देवद्रोही व धर्मद्रोही उत्तमरावांवरील अत्रे यांची टीका सुसंगत वाटत नाही.

२८) उत्तमराव सुड भावनेने लेखनी चालवत नाहीत.

२९) लोककला, लोकसाहित्यातून लोकमानस तयार करून लोकराज्य आणण्याचा उत्तमरावांचा विचार आहे.

३०) वीर उत्तमराव मोहिते भारतीय सामाजिक समस्या, विकृत राजकारण, धार्मिक कल्पकता, साहित्यिक कल्पना, विकृत संस्कृती या सर्वांवर एकमेव वैज्ञानिक भौतिकवाद हा पर्याय सुचवतात.

३१) हिंदू धर्माचा हजारो वर्षाचा इतिहास तपासतात. त्यात बदल करण्यासाठी व

जीवन उपयोगी बनविण्यासाठी केलेल्या प्रयत्नांना डोळ्यांसमोर ठेवून धर्म सुधारणे शक्य नाही म्हणून हिंदू धर्माचे दहन करतात पण पर्यायी धर्म सुचवत नाहीत. दैनंदिन समस्या दैनंदिन व्यवहाराच्या माध्यमातून सत्य व वैज्ञानिक भौतिकवादी विचाराच्या माध्यमातून सोडवाव्यात असा सल्ला देतात.

३२) उत्तमराव मोहिते यांना ग्रामीण भागाचे शेतकरी, कामगार व गावगाड्याचे चांगले आकलन आहे म्हणून ते गावागावांमधून, रानांमधून प्रयोगशाळा व संगणकक्ष निर्माण व्हावेत, यासाठी प्रयत्न करतात.

३३) शिक्षण व्यवस्था हीच सर्व मागासपणा, अंधश्रद्धा व प्रगतीत येणाऱ्या अडसरावरील उपाय आहे. शिक्षणात प्राथमिक शिक्षण महत्त्वाचे मानून गणित व विज्ञान यांना विशेष महत्त्व देऊन अन्य विषयांतून बहुजनसमाजाच्या हिताच्या दृष्टिने महामानवांच्या कार्यांची योग्य ओळख व्हायला हवी असा सल्ला देतात.

३४) कृषक क्रांती ही सर्व परिस्थिती बदलण्यास उपयुक्त ठरते म्हणून कृषक क्रांती म्हणजे नव्या अर्थव्यवस्थेची, समाजव्यवस्थेची आणि मूल्यव्यवस्थेची उभारणी करणे होय. परिस्थितीवर मात करून उत्तमराव मोहिते यांचे जीवन कडव्या बौध्दिक लढाया आहेत.

३५) समाज सतत काही तरी नवे मागत असतो आणि समाजाची गरज साहित्यातून पूर्ण होऊ शकते म्हणून सामाजिक परिवर्तनाचे साधन म्हणून वीर उत्तमराव मोहिते यांनी साहित्याकडे पाहिले.

३६) भारत देशात कमालीचे अज्ञान, अंधश्रद्धा व अनेक वेडगळ समजूती आहेत. या घालवण्याचा आणि सक्षम नागरिक निर्माण करण्याचा शिक्षणाच्या माध्यमातून प्रयत्न होतो. शिक्षण व आरोग्य हे राष्ट्रीय हितासाठी उपयुक्त आहेत पण अपुऱ्या सोयींमुळे हे शक्य होत नाही. म्हणून भारतीय देवस्थानातील संपत्ती शिक्षण व आरोग्य यासाठी वापरावी. यातून सक्षम भारत निर्माण होईल.

३७) मानवजातीच्या इतिहासात जी क्रांतिकारक परिवर्तने घडून आलीत त्यांचे श्रेय

तत्कालीन अंतिम नेतृत्वाला मिळत असलं तरी तत्पुर्वी त्या क्रांतीच्या कुंडात अनेक तपस्व्यांचे बलिदान झालेले असते.

३८) विश्वातील घटना स्वयंनियंत्रित असून त्या पाठीमागे कोणताही देव, धर्म अथवा चमत्कार नाही. निसर्गाचे निश्चित नियम आहेत व तो त्यानुसार वाटचाल करतो. या नियमांचा उलगडा विज्ञान करू शकते, असे उत्तमराव मोहिते म्हणतात. मानवी संस्कृतीच्या आरंभापासून अवकाश युगाच्या विज्ञानापर्यंत कोणत्याही दार्शनिकाने परमेश्वराची संकल्पना तार्किक व वैज्ञानिक रीतीने सिद्ध केले नाही.

३९) सामाजिक, धार्मिक, राजकीय, राष्ट्रीय, स्थानिक, जागतिक, आर्थिक व सांस्कृतिक जीवनाच्या दृष्टिने उत्तमराव मोहिते यांचे कार्य अभ्यासले असता पुर्णत: कोणत्याही एका साच्यात बसत नाही म्हणून मानवी मूल्य परिवर्तन करण्याचा प्रयत्न आहे. यासाठी ते सांस्कृतिक बदल म्हणतात म्हणून उत्तमराव मोहिते यांचे समग्र कार्य एक मिशन असल्याने 'वैज्ञानिक संस्कृती' निर्मितीत उत्तमराव मिशन महत्त्वपूर्ण ठरते असे म्हणता येईल.

४०) वीर उत्तमराव मोहिते यांच्या आयुष्यभराच्या चिंतनातून जे विचार साकारले आणि त्या विचारातून साकारणाऱ्या समाजाचा वैज्ञानिकता अथवा वस्तुनिष्ठता पाया आहे.

***

संदर्भ ग्रंथ

अ) अस्सल किंवा प्राथमिक साधने

१. मराठी ग्रंथ

१) मोहिते उत्तम पांडूरंग, ''देवीच्या देवळात गोहत्या'', विदर्भ प्रेस, अमरावती, १३ डिसेंबर १९३८.

२) मोहिते वीर उत्तमराव, ''जीवनगाथा'', मराठा विज्ञान मंडळ, अमरावती (मुंबई प्रदेश)

३) मोहिते वीर उत्तमराव, ''मराठ्यांच्या सांस्कृतिक क्रांतीचा इतिहास'', मराठा विज्ञान मंडळ, अमरावती, प्रथम, २७ डिसेंबर १९८८.

४) मोहिते वीर उत्तमराव, ''कार्लमार्क्सचा भौतिकवादी वैज्ञानिकतेचा सिध्दांत'' मराठा विज्ञान मंडळ, अमरावती, प्रथम, २७ डिसेंबर १९७७.

५) मोहिते वीर उत्तमराव, ''मराठ्यांच्या सांस्कृतिक क्रांतीचा इतिहास'', जिजाई प्रकाशन, पुणे, प्रथम, पुर्नमुद्रण ०१ सप्टेंबर २००७.

६) मोहिते वीर उत्तमराव, ''जागतिक कृषक क्रांतीचा विधाता लोकनेता : डॉ. पंजाबराव देशमुख'', मराठा विज्ञान मंडळ, प्रथम, गणतंत्र दिन १९८३.

७) मोहिते वीर उत्तमराव, ''राहुरीचा निर्णय : विदर्भातील जनतेविरूध्द! एक भयंकर षड्यंत्र'', मराठा विज्ञान मंदीर, अमरावती, प्रथम, १० नोव्हेंबर १९६८.

८) मोहिते वीर उत्तमराव, ''शिवशाहीचा उदय आणि अस्त'', जिजाई प्रकाशन, पुणे, प्रथम, १० नोव्हेंबर १९६८.

९) मोहिते वीर उत्तमराव, ''शिवाजी की रामदास'', (या ग्रंथाचे प्रकाशन वर्ष व प्रकाशक याची माहिती ग्रंथावर उपलब्ध नाही.)

१०) मोहिते वीर उत्तमराव, ''क्रांती गीता'', प्रकाशक – भिमराव पाटील, विदर्भ प्रेस, अमरावती.

११) मोहिते वीर उत्तमराव, ''इंदिरे, तुझाच जयजयकार'', मराठा विज्ञान मंदिर, अमरावती.

२. इंग्रजी–मराठी ग्रंथ

1) Mohite Veer Uttamrao, "Exposition of Cosmic Truth", Maratha Vidnyan Mandal, Amravati, First Edition, 1957.

2) Mohite Veer Uttamrao, "Universal Songs of Life & Truth", Maratha Vidnyan Mandal, Amravati, First, Nov. 1957.

3) Mohite Veer Uttamrao, "Cultural Renaissance", Maratha Vidnyan Mandal, Amravati, First, 1960.

4) Mohite Veer Uttamrao, "Atheism In Indian Philosophy (Supreme Doctrine of Indian Dialectic)", आणि त्यावरील मराठी भाष्य, Maratha Vidnyan Mandal, Amravati, Third Edition, 1987.

5) मोहिते वीर उत्तमराव, गंगाधन बनबरे (संपा.), ''रामदासाचा राष्ट्रद्रोह'', Exposition of Cosmic Truth (कलगीतुरा), जिजाई प्रकाशन, पुणे, पुर्नमुद्रण, २४ सप्टेंबर २००७.

३. इंग्रजी ग्रंथ

1) Mohite Veer Uttamrao, "Atheism In Indian Philosophy", Maratha Vidnyan Mandal, Amravati, IInd Edition, 1958.

2) Mohite Veer Uttamrao, "New conception of Indian Revolution", Maratha Vidnyan Mandir, Amravati, Ist Edi., 1962.

४. अप्रकाशित साहित्य

१) मोहिते वीर उत्तमराव, ''ओंजळ – बालपुरूष काव्यसंग्रह'', (हस्तलिखीत).

२) मोहिते मैनाबाई उत्तमराव, ''जीवनगाथा'', (हस्तलिखीत).

३) मोहिते वीर उत्तमराव, ''मराठा समाजातील टिप्पनी'', (वही) अप्रकाशित.

४) मोहिते वीर उत्तमराव, ''लेखमाला – ब्रम्हविद्या कामशास्त्राचे विकृत स्वरूप आहे'', लेखांक १ ते ५.

५) मोहिते वीर उत्तमराव, ''मराठा विरूध्द मराठा'', लेख, हस्तलिखीत.

६) मोहिते वीर उत्तमराव, ''भारतीय तत्वज्ञानातील निरिश्वरवाद'', हस्तलिखीत, ६ ऑगस्ट १९८२.

७) गोळे दौलतराव, ''माझी जीवनकथा'', डायरी, (हस्तलिखीत).

५. वीर उत्तमराव मोहिते यांचा मराठी पत्रव्यवहार

१) अकर्ते जे.एस. (माजी संसद सदस्य राज्यसभा) यांचे वीर उत्तमराव मोहिते यांना पत्र, दि. ९ मे १९८४.

२) अकर्ते जे.एस. (माजी संसद सदस्य राज्यसभा) यांचे वीर उत्तमराव मोहिते यांना पत्र, दि. २९ ऑक्टोबर १९८६.

३) आवारे पंकज दैनिक महासागर (संपा.) अमरावती यांचे वीर उत्तमराव मोहिते यांना पत्र, दि. २० मे १९८७.

४) इंगळे के.आर. अधीक्षक, दर्यापुर यांचे वीर उत्तमराव मोहिते यांना पत्र, दि. १५ सप्टेंबर १९९०.

५) इंगोले श.बा. यांचे वीर उत्तमराव मोहिते यांना पत्र, दि. २ डिसेंबर १९५९.

६) गोळे दौलतराव यांचे शंकरराव इंगोले यांना पत्र, दि. २३ मे १९९६.

७) घोरपडे ए.के. यांचे वीर उत्तमराव मोहिते यांना पत्र, दि. २७ मार्च १९७८.

८) घोरपडे ए.के. यांचे भाग्यरेखा देशमुख यांना पत्र, दि. २४ एप्रिल १९९६.

९) जमादार अ.म. यांचे वीर उत्तमराव मोहिते यांना पत्र, दि. १८ डिसेंबर १९५९.

१०) जमादार अ.म. यांचे वीर उत्तमराव मोहिते यांना पत्र, दि. २७ जुलै १९९२.

११) न्यायमूर्ती कोळसे पाटील यांचे वीर उत्तमराव मोहिते यांना पत्र, दि. ९ एप्रिल १९९०.

१२) पंजाबराव देशमुख सांस्कृतिक पीठाचे मैनाबाई मोहिते यांना पत्र, दि. १५ मार्च १९९७.

१३) डॉ. पाटील एस.एस. यांचे मैनाबाई मोहिते यांना पत्र, दि. ०३ मे १९९६.

१४) पाटील पंढरीनाथ यांचे वीर उत्तमराव मोहिते यांना पत्र, दि. १६ सप्टेंबर १९५७.

१५) पाटील संतोषराव (माजी आमदार, दलित मित्र) यांचे वीर उत्तमराव मोहिते यांना पत्र, दि. २८ जून १९९३.

१६) मोहिते वीर उत्तमराव यांचे वा.मो. काळमेघ (कुलगुरू, नागपुर विद्यापीठ) यांना अनावृत्त पत्र, दि. ७ जानेवारी १९८०.

१७) मोहिते वीर उत्तमराव यांचे डॉ. विष्णू भिकाजी कोलते (कुलगुरू, नागपूर विद्यापीठ) यांना अनावृत्त पत्र, दि. २५ फेब्रुवारी १९६९.

१८) मोहिते वीर उत्तमराव यांनी जिल्हा कारागृह अमरावती येथून राजारामजी बोंडे यांना पाठविलेले पत्र कैदी नंबर – १९, दि. २८ डिसेंबर १९४२.

१९) मोहिते वीर उत्तमराव यांचे राजारामजी बोंडे यांना अकोला जेलमधून पत्र कैदी नंबर – ४३, दि. २० मे १९४३.

२०) मोहिते वीर उत्तमराव यांचे राजारामजी बोंडे यांना पत्र कैदी नंबर – १३, दि. २३ जुलै १९४३.

२१) मोहिते वीर उत्तमराव कैदी नंबर – ८२ स्थानबद्ध कैदी यांचे राजारामजी बोंडे यांना पत्र, दि. २७ फेब्रुवारी १९४३.

२२) मोहिते वीर उत्तमराव यांचे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना पत्र, दि. २१ नोव्हेंबर १९५९.

२३) श्री राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे वीर उत्तमराव मोहिते यांना पत्र, दि. २ जानेवारी १९६०.

२४) सोरदे रमेशचंद्र (संयोजक मानवजोडो अभियान, साहूर, जि. वर्धा) यांचे वीर उत्तमराव मोहिते यांना पत्र, दि. २२ जुलै १९९२.

६. उत्तमराव मोहिते यांचा इंग्रजी पत्रव्यवहार

1) Letter from All India Congress Committee, New Delhi to Mohite U.P., Date 11 January 1960.

2) Letter from Chavan Y.B. Cheif Minsiter, Maharashtra to Veer Uttamrao Mohite, Date 27 May 1960.

3) Letter from Dr. Punjabrao Deshmukh to Veer Uttarmrao Mohite, Date 12 November 1959.

4) Letter from Dr.(Mrs.) Rosalind Ohanlon Cambridge University in the United Kingdom to Mohite U.P., Date 7 November.

5) Letter from M.A. Chansarkar, Vice - Chancelleor Nagpur University to Mohite U.P., Date 6 February 1987.

6) Letter from Manmohan Singh, Deputy Chairman Planning Commission, New Delhi to Mohite U.P., Date 03 February 1987.

7) Letter from Margaret Alva, Minister of State, Minsitry of Human Resources Development, Dept. of Youth Affairs & sports Women & child development, Government of India, New Delhi to Mohite U.P., 11th February 1987.

8) Letter from Mohite U.P. to Smt. Indira Gandhi Prime, Date 7 September 1968.

9) Letter from Mohite U.P. to Smt. Indira Gandhi Prime-Minsiter of India, Date 7 March 1984.

10) Letter from Veer Uttarmrao Mohite to Y.B. Chavan, Minister for Local Self Government, Bombay State, Bombay, Date - 10 September 1956.

11) Letter from Mohite U.P. to Gulzarilalji Nanda, Union Minsiter for Home Govt. of India, New Delhi, Date 30 November 1964.

12) Letter from Mohite U.P. to Smt. Indira Gandhi, PrimeMinister of India, New Delhi, Date 15 May 1984.

13) Letter from Mohite U.P. to Chavan Y.B., Date 10 Sep. 1960.

14) Letter from Mohite U.P. to Chavan Yashwantrao, Union Home Minister, New Delhi, 1 December 1966.

15) Letter from N. Dorodnitsin, Acting Head of the Information Dept. of the USSR Embassy in India to Mohite U.P., Date 5 October 1957.

16) Letter from Prof. M.D. Amritlal to Veer Uttarmrao Mohite, Date 26 Novemeber 1958.

17) Letter from P.B. SenGupta, Deputy Secretary to the Governor, West Bengal, Raj Bhawa, Calcutta to Mohite U.P., Date 26 September 1957.

18) Letter from President's Secretariat, Rashtrapati Bhavan, New Delhi, Date 24 December 1960.

19) Letter from Prof. M.D. Amritlal to Mohite U.P., Date 30 January 1959.

20) Letter from Suhail Ahmad, Secretary to Vice-Chancellor, University of Allahabad to Mohite U.P., 9 Feb. 1987.

21) Letter from S. Gopal Shashtri, Bharat Yuvak Samaj, President Jawaharlal Nehru to Mohite U.P., Date 4 February 1960.

22) Letter from S. Radhakrishnan, Vice - President of India, New Delhi, to Mohite U.P., Date 18 September 1960.

23) Letter from V. Subbarao to Veer Uttarmrao Mohite.

७. वीर उत्तमराव मोहिते यांचे मराठी वृत्तपत्रातील लेखन

१) दै. कोल्हापूरी दणका, दि. २२ मार्च १९६९.

२) दैनिक जनवाद, नागपूर, रविवार दि. ३ सप्टेंबर १९८९.

३) दै. नवी वाट, दि. २४ एप्रिल १९६९.

४) दैनिक लोकपथ, चौधरी प्रकाश (संपा.), मंगळवार दि. १२ एप्रिल १९९४.

५) दैनिक लोकपथ, चौधरी प्रकाश (संपा.), मंगळवार दि. १ मे १९९०, वर्ष ७ वे, अंक २९१ वा, अमरावती.

६) दैनिक बातमीपत्र, वाटाने आर.ए. (संपा.), वर्ष ५ वे, अंक २६४, गुरूवार, दि. २५ जुलै १९७४, अमरावती.

७) दै. मराठवाडा (शहर आवृत्ती), वाघमारे आ.कृ., वर्ष ४२, अंक १०२, औरंगाबाद, मंगळवार, दि. २९ नोव्हेंबर १९८८.

८) दैनिक शिवनेर, वाबळे विश्वनाथराव.

८. वीर उत्तमराव मोहिते यांचे मराठी साप्ताहिकातील लेखन

१) घोरपडे वा.न. (संपा.), 'संदेश', वर्ष २ रे, अंक ३१ वा, दि. २६ जून १९४९, नागपूर.

२) जगताप दादासाहेब, 'बहुजनसमाज', वर्ष २ रे, अंक ५ वा, रविवार, २३ फेब्रुवारी १९६९, कोल्हापूर.

३) जगताप दादासाहेब, 'बहुजनसमाज', वर्ष २ रे, अंक २२ वा, रविवार, ३ ऑगस्ट १९६९.

४) जगताप दादासाहेब, 'बहुजनसमाज', दि. २ मार्च १९६९.

५) धोंडगे केशव शंकर (संपा.), 'जयक्रांती', अंक २५ वा, वर्ष ३ रे, शुक्रवार, दि. २७ फेब्रुवारी १९७०.

६) धोंडगे केशव शंकर, (संपा.), 'जयक्रांती', शुक्रवार दि. १४ फेब्रुवारी १९७०, कंधार.

७) राऊत दादा, 'हंटर', वर्ष ४ थे, अंक ३ रा, शनिवार २९ मार्च १९६९.

९. वीर उत्तमराव मोहिते यांचे गौरवअंक व विशेषांकातील लेखन

१) जगताप दादासाहेब (संपा.), 'क्रांतीसिंह नाना पाटील', गौरवअंक, १९७६.

२) धोंडगे केशव शंकर, (संपा.), 'जयक्रांती', वर्धापन दिन विशेषांक, वर्ष १५ वे, अंक ४१ वा, दि. १३ सप्टेंबर १९८३.

३) धोंडगे केशव शंकर, (संपा.), 'जयक्रांती', वर्ष २२ वे, अंक १ ला, दि. १३ सप्टेंबर १९८८.

४) धोंडगे केशव शंकर, (संपा.), 'जयक्रांती', वर्ष १७ वे, अंक १ ला, दि. १३ सप्टेंबर १९८५.

१०. वीर उत्तमराव मोहिते यांनी काढलेले पत्रक/पत्रिका

१) मराठा विज्ञान मंदीर, छत्रपती उत्सव साजरा करा यासाठीचे पत्रक, दि. १५ सप्टेंबर १९५८.

२) Subbarao V. (Edi.), Shivaji Patrika, Amravati, Date 1 March 1965.

११. वीर उत्तमराव मोहिते यांनी दिलेले व्याख्यान

१) मोहिते वीर उत्तमराव यांचे शिवाजी कॉलेज कंधार येथील व्याख्यान, इ.स. १९७०.

१२. वीर उत्तमराव मोहिते यांच्या समकालीनांच्या मुलाखती

अ.क्र.	मुलाखत देणाऱ्याचे नाव	पत्ता	मुलाखतीचे ठिकाण	दिनांक
१	दांडगे ना.जा. (ज्येष्ठ पत्रकार)	बुलढाणा	बुलढाणा	२०/०२/२०१२
२	देशमुख मारुती महादेव	नागपूर	नागपूर	२२/०२/२०१२
३	धोंडगे केशव शंकरराव	कंधार	कंधार	१२/१०/२०१२
४	प्राचार्य बाहेकर	बुलढाणा	बुलढाणा	१९/०२/२०१२
५	देशमुख भालचंद्र शंकरराव	बुलढाणा	बुलढाणा	१९/०६/२०११
६	देशमुख भाग्यरेखा	अमरावती	अमरावती	२१/०२/२०१२
७	मोहिते मैनाबाई उत्तमराव	बुलढाणा	बुलढाणा	२९/०६/२०१०
८	मोहड सुधाकर	नागपूर	नागपूर	२२/०२/२०१२

ब) दुय्यम साधने

१. मराठी ग्रंथ

१) अत्रे शुभांगना, रायरीकर कल्पना, ''महाराष्ट्र संस्कृती'', डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथम आवृत्ती, नोव्हेंबर २००८.

२) आठवले सदाशिव, ''इतिहासाचे तत्वज्ञान'', प्रज्ञा पाठशाळा मंडळ, वाई, प्रथम आवृत्ती, १९६७.

३) आपटे वा.गो., ''मराठी शब्द रत्नाकार अर्थात मराठी–मराठी शब्दकोष'', श्रीराम ऑफसेट, पुणे, प्रथम आवृत्ती, १९९९.

४) आंबेडकर भि.रा., ''जातिभेद निर्मुलन'', भगत सुर्यकांत (संपा.), राजप्रकाशन, यवतमाळ, प्रथम आवृत्ती १४ एप्रिल २००५.

५) ऑमव्हेट गेल (भाषांतर पी.डी. दिघे), ''वसाहतिक समाजातील सांस्कृतिक बंड'', सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १९९५.

६) करंदीकर वी.रा. (संपा.), ''समर्थ रामदास विवेक दर्शन'', साहित्य अकादमी, नवी दिल्ली, प्रथम आवृत्ती, १९८२.

७) कमल भागवत, ''क्रांतीसिंह नाना पाटील'', न्यू एज प्रिटिंग प्रेस, मुंबई, प्रथम आवृत्ती, २६ जानेवारी १९७७.

८) काठोळे नरेशचंद्र (संपा.), ''श्री दौलतराव गोळे परिचय पुस्तिका.''

९) कीर धनंजय, ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर'', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, तिसरे पुर्नमुद्रण, २००३.

१०) कीर धनंजय, ''महात्मा जोतीराव फुले : आमच्या समाजक्रांतीचे जनक'', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती, १९७३.

११) कीर धनंजय, ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर – मानस आणि तत्वविचार'', श्री गजानन बुक डेपो, मुंबई, प्रथम आवृत्ती, १ जून १९७३.

१२) कुलकर्णी अ.रा., ''कंपनी सरकार'', राजहंस प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, २०००.

१३) कुलकर्णी अ.रा., ''मराठ्यांचे इतिहासकार'', डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथम आवृत्ती, २००७.

१४) कुलकर्णी पी.के., गंदेवार एस.एन., ''सामाजिक संस्था आणि सामाजिक गट'', विद्याभारती प्रकाशन, लातूर, प्रथम आवृत्ती, २०००.

१५) कुलकर्णी पी.के., ''भारतातील धर्म.''

१६) कुलकर्णी सुहास, चंपानेरकर मिलिंद, ''यांनी घडवल सहस्त्रक'', रोहण प्रकाशन, पुणे, दहावी आवृत्ती, २००७.

१७) केतकर भा.ग. (अनु.), ''भारतीय तत्वज्ञानाची रूपरेषा'', पुणे विद्यापीठ मुद्रणालय, पुणे, प्रथम आवृत्ती, १९७३.

१८) कोठेकर शांता, ''इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान'', साईनाथ प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती, २ ऑक्टोबर २००५.

१९) खंदारे साहेबराव, ''मराठ्यांचा सामाजिक व सांस्कृतिक इतिहास खंड – I'', राजमुद्र प्रायव्हेट लिमिटेड, परभणी, प्रथम आवृत्ती १ मे २००८.

२०) गरूड साहेबराव, सावंत बी.बी., ''महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास'', कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, १९९५.

२१) गवळी पी.ए., ''पेशवेकालीन महाराष्ट्र'', औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, २०००.

२२) गांधी म., धर्माधिकारी तारा (अनु.), ''हिंदू धर्म म्हणजे काय?'', भारतीय इतिहास अनुसंधान परिषद, दिल्ली, नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, प्रथम आवृत्ती, १९९५.

२३) गुंदेकर श्रीराम, ''सत्यशोधकीय साहित्य परंपरा आणि स्वरूप'', पद्मश्री डी.वाय. पाटील प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, २००३.

२४) घोडके ह.मो., ''महाराष्ट्र गाथा'', खंड – १, २, राजहंस प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, नोव्हेंबर २००५.

२५) चव्हाण रा.ना., चव्हाण रमेश (संपा.), ''महाराष्ट्र आणि मराठे'', एस. जयकुमार ऑफसेट, पुणे, प्रथम आवृत्ती, मार्च २०१०.

२६) चोपडे अशोक, ''विदर्भातील सत्यशोधक चळवळीचे साहित्य'' कॅन्डिड प्रकाशन, वर्धा, प्रथम आवृत्ती, २८ नोव्हेंबर २००३.

२७) जोशी ग.ना. (संपा.), ''डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे तत्वचिंतन'', मॅजेस्टीक प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती, ५ सप्टेंबर १९९२.

२८) जोशी ज.वा., ''धर्माचे तत्वज्ञान'', कॅन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १९७५.

२९) जोशी पंडित महादेवशास्त्री (संपा.), ''भारतीय संस्कृतीकोश'', खंड – १, ६, ८, १०, भारतीय संस्कृती कोश मंडळ, पुणे, प्रथम आवृत्ती, १९७९.

३०) जोशी पी.जी., ''भारताचा इतिहास व संस्कृती'' विद्या प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती, जानेवारी २००३.

३१) जोशी बी.आर., तोरणीकर सुलभा (संपा.), ''डायमंड सामाजिक ज्ञानकोश'', डायमंड पब्लिकेशन, पुणे, खंड – २, प्रथम आवृत्ती, २००७.

३२) ठाकरे प्रबोधनकार, ''देवळांचा धर्म आणि धर्माची देवळे'', सुधीर प्रकाशन, वर्धा, द्वितीय आवृत्ती, १४ एप्रिल १९९७.

३३) डांगे स.अ., ''हिंदू धर्म आणि तत्वज्ञान'', महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ करीता ग.ल. ठोकळ, प्रथम आवृत्ती, १९७३.

३४) दाते य.रा., कर्वे चि.ग. (संपा.), ''सुलभ विश्वकोष भाग – २'', प्रसाद प्रकाशन, पुणे, जुलै १९४९.

३५) दांडगे ना.जा., ''महात्मा फुले यांचे आद्य चरित्रकार समाजभुषण पंढरीनाथ पाटील यांचे चरित्र'', पैनगंगा पब्लिकेशन, बुलढाणा, प्रथम आवृत्ती, सप्टेंबर २००५.

३६) दिक्षित दुर्गा (संपा.), डायमंड महाराष्ट्र संस्कृतीकोश, डायमंड प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, ३ जुलै २००९.

३७) देशमुख मा.म., ''मनुवाद्यांशी लढा'', शिवभारती प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती, १९९२.

३८) डॉ. धोंडगे केशव शंकरराव, ''उपेक्षित शहिदे आजम, युगपुरूष, छत्रपती संभाजी महाराज'', नोबल ऑफसेट ॲण्ड पेपर प्रोडक्ट, नांदेड, ऑगस्ट २०११.

३९) नरहर सुजाता, ''पश्चिमेच्या भग्नावशेषातून भारताचा पुर्नजन्म'', मिरा अदिती सेंटर, म्हैसुर, प्रथम आवृत्ती, २००१.

४०) नरके हरी, ''महात्मा फुले आणि चळवळ'', प्रथम आवृत्ती, २००६.

४१) परेरा ए.बी., द. बांग्रस (संपा.), श्री. स.शं. देसाई (अनुवादक), ''मराठ्यांच्या इतिहासाची साधने'', खंड ३ रा, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, प्रथम आवृत्ती, १९६८.

४२) पवार जयसिंगराव (संपा.), ''महाराणी ताराबाई'', ताराराणी विद्यापीठ, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती, १९७५.

४३) पवार जयसिंग भाऊसाहेब, ''राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ'', इंडिया प्रिटिंग हाऊस, मुंबई, द्वितीय आवृत्ती, २६ जून २००७.

४४) फडके य.दि., ''विसाव्या शतकातील महाराष्ट्र'', खंड – I, II, III, V, पुणे, विद्या प्रकाशन, प्रथम आवृत्ती, ३० जानेवारी १९८९.

४५) फाटक नरहर रघुनाथ, ''लोकमान्य'', मौज प्रकाशन गृह, मुंबई, प्रथम आवृत्ती, ऑगस्ट १९७२.

४६) बापट विष्णूशास्त्री, ''सार्थ श्री मनुस्मृती'', गजानन बुक डेपो, मुंबई.

४७) बेंद्रे वा.सी., ''शिवशाहीचा चर्चात्मक इतिहास'', लोकवाङ्मय गृह मुंबई, द्वितीय आवृत्ती, १९७६.

४८) बोबडे प्रकाश, ''भारतीय समाजशास्त्र'', विद्या प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती, १९७४.

४९) मालशे स.ग., आपटे नंदा, ''विधवा विवाह चळवळ १८००–१९००'', ना.द. ठकरशी महिला विद्यापीठ, मुंबई, प्रथम आवृत्ती, १९७८.

५०) मोरे मा.श., ''महाराष्ट्रातील बुध्द धम्माचा इतिहास'', कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद, तृतीय आवृत्ती, २००६.

५१) मोरवंचीकर रा.श्री., ''सातवाहनकालीन महाराष्ट्र'', पुणे, प्रतिमा प्रकाशन, प्रथम आवृत्ती १९३३.

५२) मोहड सुधाकर, ''डॉ. पंजाबरावांच्या शिवकुटूंबाचा मालुसरा : दौलतराव उपाख्य दादासाहेब गोळे'', आशा प्रिंटर्स, अमरावती, द्वितीय आवृत्ती, १९९७.

५३) मोहड सुधाकर, ''विदर्भाचा अग्निपुरूष स्वातंत्र्यसंग्राम सेनानी वीर उत्तमराव मोहिते'', डॉ. पंजाबराव देशमुख वैज्ञानिक संस्कृतीपीठ, अमरावती, मुद्रक आशा प्रिंटर्स, १९९७.

५४) रिंढे नितीन, ''लोकनेते डॉ. पंजाबराव देशमुख'', श्रीगंधर्व प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, नोव्हेंबर २०१०.

५५) लोखंडे हि.गो., ''डॉ. आंबेडकरी सत्याग्रह'', सुधीर प्रकाशन, वर्धा, प्रथम आवृत्ती, ९ ऑक्टोबर २००८.

५६) वैद्य चि.वी., ''शिवाजी निबंधावली खंड – I, II'', कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १९८४.

५७) व्होरा राजेंद्र (संपा.), ''आधुनिकता आणि परंपरा : एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्र'', प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, २८ नोव्हेंबर २०००.

५८) शरद पाटील, ''जातीव्यवस्थापक संमती सेवकत्व''.

५९) शहा मृणालिनी, ''स्त्री सुधारणाविषयक मराठी नाट्यलेखन'', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

६०) शांतीसागरजी महाराज, ''संस्कार भारती'', भाग – १, यशवंत मुद्रणालय, सांगली, सहावी आवृत्ती, २००७.

६१) शिंदे इंद्रजित, ''शिवधर्माची महाराष्ट्रातील वाटचाल – एक अभ्यास'', एम.फिल. अप्रकाशित प्रबंध, २००९.

६२) शिंदे विठ्ठल रामजी, ''भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न'', कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद, २००३.

६३) शिवदे सदाशिव, ''सेनापती हंबीरराव मोहिते'', डायमंड पब्लिकेशन, पुणे, पुर्नमुद्रण, २०११.

६४) शेणोलीकर ह.श्री., देशपांडे प्र.न., ''महाराष्ट्र संस्कृती घडण आणि विकास'', कोल्हापूर, मोघे प्रकाशन, प्रथम आवृत्ती, १९७२.

६५) समाज प्रबोधन संस्था पुणे (संपा.), ''जातीसंस्थेचे बदलते आधार'', सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, जून २०१२.

६६) सपकाळ बापूजी, गोरे दादा (संपा.), ''निवडक बखर वाङ्मय'', कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, २००३.

६७) सरदेसाई बी.एम., ''इतिहासलेखन शास्त्र'', फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती, २००२.

६८) साने रविकिरण, ''लढा संयुक्त महाराष्ट्राचा'', डायमंड प्रकाशन, पुणे, ऑक्टोबर २००९.

६९) साळुंके आ.ह., ''गुलामांचा आणि गुलाम करणाऱ्यांचा धर्म एक नसतो'', सरस्वती ऑफसेट, सातारा, द्वितीय आवृत्ती, २००२.

७०) साळुंके आ.ह., ''हिंदू संस्कृती आणि स्त्री'', लोकवाङ्मय ग्रह, मुंबई, सहावी आवृत्ती, नोव्हेंबर २००५.

७१) साळुंके आ.ह., ''धर्म कि धर्मापलीकडे'', लोकायत प्रकाशन, सातारा, द्वितीय आवृत्ती, १ जून १९९८.

७२) सिंगारे अनिल, ''महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळीचा इतिहास'', अरूणा प्रकाशन, लातूर, प्रथम आवृत्ती, २६ नोव्हेंबर २००९.

७३) सुठंनकर वा.र., ''बुध्दी प्रेरणा व क्रांती भाग – I, II'', महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथम आवृत्ती, १९७०.

७४) सुराणा पन्नालाल, बेडकीहाळ किशोर (संपा.), ''आजचा महाराष्ट्र'', श्रीविद्या प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १९८८.

२. हिंदी ग्रंथ

१) खुराणा के.एल., बंसल आर.के, ''इतिहासलेखन धारनाएँ तथा पध्दतीयाँ'', लक्ष्मीनारायण आग्रवाल प्रेस, आगरा, प्रथम आवृत्ती, २००४.

२) शुक्ल आर.एल. (संपा.), ''आधुनिक भारत का इतिहास'', हिंदी माध्यम कार्यान्वय निदेशालय, दिल्ली विश्व विद्यालय, बारवी आवृत्ती, १९८८.

३. इंग्रजी ग्रंथ

1) Alfred Weber, Frank Thilly (Translated By), "History of Philosophy", Vishvabharti Pub., Delhi, Ist Edi., 2007.

2) Chitnis K.N., "Soci-Economic History of Medival India", Atlantic Pub., New Delhi, 2005, First Edition.

3) Chandrashekar Y.K., “Historical Reasearch Theory and Methods”, Swastik Publications, Delhi, Ist Edi., 2012.

4) Gorge H.S., “Research Methodology in History”, APH Publishing Coporation, New Delhi, First Edition, 2011.

5) Keswani K.B., “History of Moder India 1800-1984”, Himalaya Pub. House, Bombay, First Edition, 1985.

6) Muzumdar R.C., “History and Culture of India”, Popular Publication, Bombay, First Edition, 1965.

7) Sarkar Jadunath, “Shivaji and His Times”, Orient Longman LTD, New Delhi, First Edition, 1973.

४. दैनिक वृत्तपत्र

१) अत्रे आचार्य, दै. मराठा, दि. १५ जानेवारी १९६९.

२) अत्रे आचार्य (संपा.), दै. मराठा, रविवार पुरवणी, दि. ८ एप्रिल १९७३.

३) अत्रे आचार्य, संपूर्ण महाराष्ट्र समितीचे मुखपत्र, दैनिक मराठा, मुंबई, सोमवार, दि. २८ जुलै १९६९, २९ जुलै १९६९, २८ जानेवारी १९६९, २९ जानेवारी १९६९

४) पाटील सा.रे. उर्फ आप्पासाहेब (संपा.), दैनिक इंद्रधनुष्य, दि. १३ जून २००३, कोल्हापूर.

५) पाटील सा.रे. उर्फ आप्पासाहेब (संपा.), दैनिक इंद्रधनुष्य, कोल्हापूर जिल्हा सहकारी प्रकाशन संस्था लि. कोल्हापूर, वर्ष ९ वे, अंक २७, गुरूवार दि. १४ जून १९७३.

६) काशीराम, बहुजन टाईम्स, वर्ष पहिले, अंक ११५, नागपूर, शुक्रवार दि. ७ सप्टें. १९८४.

७) दांडके ना.जा. (संपा.), बुलढाणा पत्रिका, वर्ष २३ वे, अंक ४२, रविवार दि. १७ फेब्रुवारी २००२.

८) दांडके ना.जा. (संपा.), बुलढाणा पत्रिका, वर्ष २२ वे, अंक ४२ वा, रविवार दि. १८ फेब्रुवारी २००१.

९) दै. जनमाध्यम, ४ मे १९९६.

१०) दै. जनवाद, ५ मे १९९६.

११) जोंधळे बी.व्ही., दैनिक सकाळमधील लेख, २८ नोव्हेंबर २००३.

१२) दै. तरूण भारत (नागपूर), ३० मे १९९६.

१३) दै. नागपूर पत्रिका, १ मे १९९६.

१४) दै. लोकसत्ता (नागपूर), १ मे १९९६.

१५) दै. लोकपथ, १२ एप्रिल १९९४.

१६) दै. लोकमत, १ मे १९९६.

१७) वाटाने आर.ए. (संपा.), दैनिक बातमीपत्र, वर्ष ५ वे, अंक २५३, शनिवार, दि. १३ जुलै १९७४, अमरावती.

१८) दै. हिंदूस्थान (नागपूर), ३० मे १९९६.

५. साप्ताहिके

१) कडू जन्मेजय (संपा.), 'वऱ्हाडी माणूस', वर्ष पहिले, अंक १४, १५ वा, दि. १५ ऑगस्ट १९७४, अमरावती.

२) किर्लोस्कर मु.श. (संपा.), 'मनोहर', २३ मार्च १९८०, वर्ष ८ वे, अंक १२ वा, पुणे.

३) जगताप दादासाहेब (संपा.), 'बहुजन समाज', वर्ष २ रे, अंक ९ वा, दि. ३० मार्च १९६९, कोल्हापूर.

४) जगताप दादासाहेब (संपा.), 'बहुजन समाज', वर्ष २ रे, अंक ३ रा, दि. २ फेब्रुवारी १९६९, कोल्हापूर.

५) जगताप दादासाहेब (संपा.), 'बहुजन समाज', वर्ष ३ रे, अंक १२ वा, दि. २४ मे १९७०.

६) जगताप दादासाहेब (संपा.), 'बहुजन समाज', वर्ष ३ रे, अंक १३ वा, दि. ७ जून १९७०.

७) जोध एस.के., 'ऋणमोचन', वर्ष पहिले, अंक १० वा, दि. १३ ऑक्टो. १९८१, अमरावती.

८) जोध एस.के. (संपा.), 'ऋणमोचन', वर्ष २ रे, अंक ३८ वा, ७ जून १९८३, अमरावती.

९) देशपांडे दिपक (संपा.), 'नवासमाज', वर्ष ३९ वे, अंक १५ वा, बुधवार ११ एप्रिल १९९२, अकोला.

१०) धोंडगे केशव शंकर, (संपा.), 'जयक्रांती', वर्ष ५४ वे, अंक ४ था, दि. ७ ऑक्टोबर २०११, कंधार.

११) पाटील–बिरादार, श्री कालगौंडा जिनगौंडा, 'संग्राम', वर्ष २ रे, अंक शेवटचा, २५ डिसेंबर १९७०, सांगली.

१२) बनबरे गंगाधर (संपा.), 'शिवधर्म', वर्ष दुसरे, अंक ५१ वा, दि. १७ मार्च २००२, ठाणे (प.)

१३) महाराव ज्ञानेश (संपा.), 'चित्रलेखा', वर्ष २० वे, अंक ३५ वा, दि. ४ मे २००९, मुंबई.

१४) महाराव ज्ञानेश (संपा.), 'चित्रलेखा', वर्ष २१ वे, अंक ४४ वा, दि. ५ जुलै १९१०.

१५) महाराव ज्ञानेश (संपा.), 'चित्रलेखा', वर्ष १७ वे, अंक २८ वा, दि. ६ मार्च २००६.

१६) महाराव ज्ञानेश (संपा.), 'चित्रलेखा', वर्ष १६ वे, अंक ४८ वा, दि. २५ जुलै २००५.

१७) महाराव ज्ञानेश (संपा.), 'चित्रलेखा', वर्ष २१ वे, अंक ३१ वा, दि. ५ एप्रिल २०१०.

१८) साप्ताहिक अभिजात, १३ सप्टेंबर १९७०.

६. पाक्षिके

१) गोरे नेताजी (संपा.), 'जिजाऊ संदेश', वर्ष पहिले, अंक ३ रा, दि. १५ डिसेंबर २०११, उस्मानाबाद.

२) गोरे नेताजी (संपा.), 'जिजाऊ संदेश', वर्ष पहिले, अंक ६ वा, जुलै २००७.

३) गोरे नेताजी (संपा.), 'जिजाऊ संदेश', वर्ष ३ रे, अंक ४१ वा, नोव्हें. २००६.

४) चौधरी नागेश (संपा.), 'समतेसाठी बहुजन संघर्ष', वर्ष ६ वे, अंक ७ वा, १५ जुलै १९८९, नागपूर.

५) चौधरी नागेश (संपा.), 'समतेसाठी बहुजन संघर्ष', वर्ष ३ रे, अंक ६ वा, दि. १५ जून १९८६.

६) सोमवंशी गु.मा. (संपा.), 'शिवपत्रिका', वर्ष ४ थे, अंक २१ वा, १५ सप्टेंबर १९७९, अमरावती.

७. मासिके :

१) खेडेकर पुरूषोत्तम, मराठा मार्ग (मराठा सेवा संघाचे मुखपत्र), जून १९९६.

२) खेडेकर पुरूषोत्तम, मराठा मार्ग (मराठा सेवा संघाचे मुखपत्र), डिसें. २००१.

३) खेडेकर पुरूषोत्तम, मराठा मार्ग (मराठा सेवा संघाचे मुखपत्र), जाने. २००९.

४) पवार ना.ग. (संपा.), ''फुलेवाणी'', महात्मा फुले विचार प्रसारक मंडळ, अमरावती, वर्ष पहिले, अंक चौथा, जुलै १९८४.

५) भटकळ रामदास गणेश, 'प्रियरसिक', पॉप्युलर प्रकाशन, वर्ष १८ वे, अंक ८ वा, ऑगस्ट २०१०, मुंबई.

६) माहिती व जनसंपर्क संचनालय महाराष्ट्र शासन (संपा.), 'लोकराज्य', वर्ष ६३ वे, अंक १२ मार्च २०१२.

७) वाणी कौशिक (संपा.), 'ऋषिप्रसाद', वर्ष १३ वे, अंक १२१ वा, जाने.२००३.

८. त्रैमासिक

१) श्रीसागर श्री.के. (संपा.), महाराष्ट्र साहित्य परिषदेचे मुखपत्र, महाराष्ट्र साहित्य पत्रिका, वर्ष ३७ वे, अंक १४८ वा, जानेवारी–मार्च १९६४.

२) सिंगारे अनिल (संपा.), संशोधन बॅनर – २०१२.

९. स्मरणिका, विशेषांक व गौरवअंक

१) काशीराम, 'बहुजन नायक', वर्ष १२ वे, अंक १५–१६, रविवार १४ एप्रिल १९९१, नागपूर, विशेषांक.

२) चौधरी नागेश (संपा.), 'समतेसाठी बहुजन संघर्ष', ३० जुलै १९८९, (विशेषांक).

३) चौधरी नागेश (संपा.), 'समतेसाठी बहुजन संघर्ष' (पाक्षिक), बळीराजा विशेषांक, १९८७.

४) देशमुख विठ्ठल (प्रकाशक), 'बहुजन समाज अधिवेश', नागपूर, १९७७. (स्मरणिका)

५) 'बहुजन प्रेरणा', दिवाळी विशेषांक, मोर्शी.

६) माळी गजमल (संपा.), 'अ.भा. सत्यशोधक समाज अधिवेश २०', दि. २७ नोव्हेंबर १९८८. (स्मरणिका)

७) शिर्के एस.एम. (संपा.), 'भारतभूषण' श्री शाहू जयंती विशेषांक, १९६९.

८) सरदार पी.एस. (स्मरणिका), बहुजन समाज अधिवेशन, नागपूर – १९७७.

१०. नियतकालिके

१) पाटोळे सुलभा, 'बायजा', वर्ष ३२ वे, अंक ३ रा, मे–जून २००८.

११. व्याख्यान

१) गोळे दौलतराव यांचे अ.भा. सत्यशोधक समाजाचे विदर्भ विभागीय पहिल्या अधिवेशनातील व्याख्यान दि. २ ऑक्टोबर १९८९.

***

वीर उत्तमराव मोहिते यांचा जीवनपट

- ☛ जन्म ७ सप्टेंबर १९१०.
- ☛ पांडुरंग व जाईबाई आई–वडील.
- ☛ तीन भाऊ व एक बहीण.
- ☛ दोन मुली व एक मुलगा.
- ☛ इ.स. १९१८ मध्ये महारवाड्यात बाटल्यामुळे ८ दिवस अंगणात झोपण्याची शिक्षा भोगली.
- ☛ इ.स. १९१८ कुरळपुर्णा सोडून मोर्शीला वास्तव्यास आले.
- ☛ काशीराव बापू देशमुख यांच्या सहवासात वास्तव्य.
- ☛ इ.स. १९२८ पूर्वी १० वी पास झाले.
- ☛ इ.स. १९२९ देवीच्या देवळात गोहत्या हे पहिले पुष्प प्रकाशित.
- ☛ सरकारी नौकरी केली पण कायम ठेवली नाही. जरूड, वरूड, ऱ्हटगाव व माहोली येथे शिक्षक म्हणून कार्य.
- ☛ इ.स. १९३५ मध्ये धनाढ्य मालगुजार (वर्धा) यांची मुलगी त्रिवेणा हिच्याशी विवाहबद्ध. सहा महिन्यात पत्नी वारली.
- ☛ इ.स. १९३९ मध्ये राजारामजी गंगारामजी बोंडे यांची मुलगी मैनाबाई सोबत विवाह.
- ☛ 'भगवा झेंडा' बोलपट फाडल्याबद्दल दि. १० मे १९४० रोजी १ महिना साधी कैद आणि २५ रू. दंड.
- ☛ युध्दविरोधी सत्याग्रह (Ciril Disobedience Movement) दि. ११ फेब्रुवारी १९४१ ला सहा महिने सश्रम कारावास. Under Section Clause (b) Subrute (i) of 26 D.I.R.
- ☛ युध्दविरोधी सत्याग्रह Under Section (34) 6 (f)(k) r/u rule 38 (1)(A)(5) D.I.R. दि. १ सप्टेंबर १९४२ ला सश्रम कारावास.

- ☛ **स्थानबद्ध** Detained by Secretary to provincial Government C.P. and Berar, Nagpur, Under Section 26(1) D.I.R. **२० महिने बंदिस्त (अमरावती, अकोला आणि नागपूर जेलमध्ये वास्तव्य)**
- ☛ **तुरूंगातील महत्त्वाचे सोबती**
  - * **कृष्णानंद सोख्ता – नागपूर**
  - * **माणिकचंद जैन – गोटेगाव, मध्यप्रदेश**
  - * **महादेवराव ठाकरे – वर्धा**
  - * **कॉम्रेड शंकरराव दिघडे अमरावती, यांना स्वत:च्या घरी भूमीगत आश्रय दिला.**
  - * **कॉम्रेड बाळासाहेब हुद्दार, वर्धा आं.रा. कम्युनिस्ट फ्रँको विरूध्द स्पेनमधील मुक्तीसैनेत लढले भुमीगत आश्रय दिला.**
- ☛ **भारत सेवक दलाचे सदस्य म्हणून कार्य.**
- ☛ **इ.स. १९४० मध्ये वीर पदवी मिळाली.**
- ☛ **उत्तमराव मोहिते स्वातंत्र्यसैनिक.**
- ☛ **इ.स. १९४६ मध्ये वऱ्हाडात प्रतिसरकार निर्मितीचा प्रयत्न.**
- ☛ **इ.स. १९५५ मध्ये मराठा विज्ञान मंदीराची स्थापना (संस्थापक अध्यक्ष)**
- ☛ **शेतकऱ्यांची बाजू बांडणारा नेता काँग्रेसमध्ये आणला. (डॉ. पंजाबराव)**
- ☛ **डॉ. पंजाबराव देशमुख यांनी काढलेल्या संदेश साप्ताहिकाचे संपादक म्हणून कार्य.**
- ☛ **एक 'वारकरी' म्हणून जीवन जगले.**
- ☛ **संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीत महत्त्वपूर्ण योगदान.**
- ☛ **कृषी विद्यापीठ आंदोलनात एक मार्गदर्शक व सेनानी म्हणून कार्य.**
- ☛ **डॉ. पंजाबराव देशमुख वैज्ञानिक संस्कृतीपीठ, उत्तमराव मोहित्यांच्या प्रेरणेतून उभे राहिले.**


☛ वीर उत्तमरावम मोहिते एक 'योगी' म्हणून योगसाधना समाजास शिकवली.

☛ वीर उत्तमराव मोहिते यांना मिळालेले सन्मान.

* स्वातंत्र्य संग्रामातील कार्याबाबत महाराष्ट्र शासनाने सन्मानपत्र दिले.
* पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी ताम्रपट देऊन सन्मान केला.
* द्वितीय बहुजन अधिवेशन समिती, नागपूर यांनी सन्मानपत्र दिले.
* महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, पुणे यांनी सन्मानित केले.
* मराठा सेवा संघ यांच्याकडून वीर मोहिते यांचा सन्मान.
* सर्व शाखीय कुणबी युवा समाज (विदर्भ) यांच्या वतीने समाजगौरव उपाधी व मानपत्र देऊन सन्मानित केले.
* डॉ. पंजाबराव देशमुख वैज्ञानिक संस्कृतीपीठ अमरावतीच्या वतीने 'वैज्ञानिक संस्कृतीचा आचार्य' ही पदवी प्रदान केली.
* यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठाण मुंबई यांनी पुरस्कार प्रदान केला.
* डॉ. पंजाबराव प्रज्ञा मरणोत्तर मानपत्र देण्यात आले.
* महाराष्ट्राचे मुख्यमंत्री शरदचंद्रजी पवार यांनी उत्तमराव मोहिते यांच्या घरी जाऊन सत्कार केला.

***

वंशावळ


परसरामजी मोहिते
पांडूरंग मोहिते
जाईबाई पांडूरंग मोहिते
शामराव मोहिते
कौशल्याबाई मोहिते
पंजाबराव मोहिते
उत्तमराव मोहिते
रामराव मोहिते
उषाताई मोहिते
(शंकरराव देशमुख, मौसांग,
जि. अकोला यांच्याशी विवाह)
भाग्यरेखा मोहिते
(अविनाश देशमुख, मोहपा,
नागपूर यांच्याशी विवाह)
प्रमोद उर्फ पंजाबराव मोहिते
भालचंद्र देशमुख
मानवेंद्र देशमुख
डॉ. क्रांती देशमुख
विक्रांत देशमुख
सारिका मोहिते
सोनल मोहिते
अपुर्वा
अद्वैत
वैभवी
लावण्या
अनला
आनंदी
अनामिका



इतिहासकार वीर उत्तमराव मोहिते

जन्म – ७ सप्टेंबर १९१०

मृत्यु – २८ एप्रिल १९९६

छायाचित्रे




वीर उत्तमराव मोहिते यांच्या वापरातील पेन भालचंद्र शंकररराव देशमुख यांच्या संग्रही बुलढाणा येथे आहे.



वीर उत्तमराव मोहिते यांच्या वापरातील रेडिओ अमरावती येथील घरात आहे.



वीर उत्तमराव मोहिते यांच्या वापरातील खुर्ची व लिखाणासाठीचा त्यांचा खास टेबल अमरावती येथील घरी आहे.



वीर उत्तमराव मोहिते यांनी स्वतंत्रता संग्रामात केलेल्या महत्त्वपूर्ण कार्याबद्दल पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्याकडून मिळालेला ताम्रपट



वीर उत्तमराव मोहिते याच शाळेत शिकले व पुढे शिक्षक होऊन याच शाळेत शिकवले.



गाडगे नगर, अमरावती येथील वीर उत्तमराव मोहिते यांचे घर. हेच मराठा विज्ञान मंडळाचे कार्यालय होते.



वीर उत्तमराव मोहिते सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तनाचे महत्त्व स्पष्ट करताना



छायाचित्रात उजव्या बाजूकडून अनुक्रमे मैनाबाई मोहिते, उत्तमराव मोहिते, प्रतिसरकारचे प्रचारमंत्री शाहीर शंकरराव निकम व प्रतिसरकारमधील अन्य सहकारी



श्री शिवाजी शिक्षण संस्था, कंधार, जि. नांदेड येथील तेराव्या वार्षिक स्नेह संमेलनात प्रमुख व्याख्याते म्हणून वीर उत्तमराव मोहिते व केशवराव धोंडगे आणि प्राध्यापक वृंद.



छायाचित्रात मध्यभागी मैनाबाई उत्तमराव मोहिते, डावीकडून नातू भालचंद्र व त्यांची पत्नी, उजवीकडून मानवेंद्र व त्यांची पत्नी, पाठीमागे भालचंद्र यांची मुले अद्वैत आणि अपुर्वा



वीर उत्तमराव मोहिते यांचा गाडगे नगर, अमरावती येथील घरी आमदार रेखाताई खेडेकर यांनी सत्कार केला. त्याप्रसंगी उत्तमराव मोहिते यांच्या बाजूस मैनाबाई, मुलगी भाग्यरेखा व रेखाताई खेडेकर.



एका निवांत वेळी वीर उत्तमराव मोहिते यांनी आपल्या कुटुंबीयांसोबत काढलेले छायाचित्र



विदर्भ विभागीय शेतकरी प्रतिनिधी चर्चासत्रात उजवीकडून वीर उत्तमराव मोहिते व अन्य मान्यवर



छायाचित्रात डावीकडून अनुक्रमे वीर उत्तमराव मोहिते यांचा मुलगा प्रमोद व मुलगी भाग्यरेखा देशमुख कॉलेजमध्ये रा.सु. गवई व इतर मान्यवरांशी चर्चा करताना.



छायाचित्रात अमरावती येथील उत्तमराव मोहिते यांच्या घरी त्यांचे महत्त्वाची कागदपत्रे निवडताना संशोधक व उत्तमरावांचा नातू भालचंद्र देशमुख.



भाग्यरेखा देशमुख यांची मुलाखत घेताना



मैनाबाई उत्तमराव मोहिते यांची मुलाखत घेताना



श्री उत्तमराव लहाने यांची मुलाखत घेताना



उत्तमराव मोहिते यांचे मित्र शंकरराव इंगोले यांच्या मुलाची मुलाखत घेताना.



प्राचार्य बाहेकर यांची मुलाखत घेताना

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन


सन्मान पत्र

श्री. उत्तम पांडुरंगजी मोहीते अमरावती यांना त्यांनी भारतीय स्वातंत्र्य संग्रामांत केलेल्या कामगिरीच्या गौरवार्थ हे सन्मानपत्र देण्यांत येत आहे.

वसंत नाईक

मुख्य मंत्री
महाराष्ट्र राज्य

सचिवालय
मुंबई.
दिनांक १३.४.९७


समाजगौरव
मा. वीर बुद्धमरावजी मोहिते
आपण आपल्या अंगीभूत गुणांना
सामाजिक बांधिलकीची जोड देऊन आणि
व्यक्तिगत कर्तृत्वाने कुणबी समाजाकरिता
भूषणावह सिद्ध झाला आहात. आपले
कार्य कुणबी-बहुजन समाजांकरिता प्रेरक
ठरले आहे. समस्त कुणबी समाजाच्या
वतीने आपणास 'समाज गौरव' उपाधि,
मानवस्त्र आणि मानपत्र प्रदान करताना
मनस्वी आनंद होत आहे. दीर्घायुषी व्हा!!
शुभेच्छाकांक्षी
सर्व शाखीय कुणबी युवा समाज (विदर्भ)
३० एप्रिल १९९५

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

वीर उत्तमरावजी पांडुरंगजी मोहिते यांस,

सन्माननीय महोदय,

आपण महाराष्ट्रातील सत्यशोधक–ब्राम्हणेतर आणि सत्याग्रही आंदोलनांचे एक नामवंत प्रवर्तक आहात. तसेच आयुष्यभर आपण विज्ञानवादाचा जनसामान्यांमध्ये डोळसपणे पुरस्कार केलात. संत तुकोबा, म. फुले, राजर्षी शाहू आणि डॉ. आंबेडकर यांच्या वैचारिक परंपरेचे आपण पाईक असल्यामुळे, डॉ. पंजाबराव देशमुख यांच्यासोबत आपण निष्ठापूर्वक कार्य पार पाडलेत.

आपल्या अथक प्रयत्नातून उभ्या राहिलेल्या, 'मराठा विज्ञान मंदिर' आणि 'डॉ. पंजाबराव देशमुख वैज्ञानिक संस्कृतीपीठ,' या संस्था आपल्या कार्याची साक्ष देत आहेत.

आपली ग्रंथसंपदा विपुल आहे. प्रामुख्याने 'ॲथेइझम इन इंडियन फिलॉसॉफी', 'योग इन द लाईट ऑफ सायन्स', 'मराठ्यांच्या सांस्कृतिक क्रांतीचा इतिहास', 'कार्ल मार्क्सचा भौतिकवादी वैज्ञानिकतेचा सिध्दांत', यासारख्या, वैचारिक ग्रंथांबरोबरच, आपले ज्येष्ठ सहकारी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्यावरही, आपण चरित्रपर लेखन केले आहे.

आपल्या सडेतोड लेखनामुळे आणि ओघवत्या निर्भीड व्याख्यानांमुळे, अनेक कार्यकर्त्यांना प्रेरणा मिळाली आहे. लेखनाच्या जोडीला, प्रभावी विचारवंत व निष्ठावंत स्वातंत्र्यसैनिक ही आपली प्रतिमा, नव्या कार्यकर्त्यांना सतत स्फूर्ती देत राहील.

तसे तर, इ.स. १९६७ साली, महाराष्ट्र शासनाने आपणास आदरपूर्वक सन्मानपत्र बहाल केले आहे. इतकेच नव्हे तर, भारत सरकारने स्वातंत्र्याच्या पंचविसाव्या वर्धापन दिनानिमित्त १९७२ साली, ताम्रपट देऊन, आपला उचित गौरवही केला आहे.

असे असले तरी, आपणासारख्या 'वीर' पुरुषाचे पुनःपुन्हा स्मरण होणे, हे नेहमीच प्रेरणादायी ठरणार आहे. म्हणून महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, ही गौरववृत्ती आपणास कृतज्ञतापूर्वक अर्पण करीत आहे. आपण तिचा स्वीकार करून मंडळास उपकृत करावे. ही विनंती.

य. दि. फडके
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

अमरावती,
दि. ९ डिसेंबर, १९९०

Dr. Panjabrao Deshmukh
Vaidnyanik Sanskruti Peeth
AMRAVATI (M. S.)



वैज्ञानिक संस्कृतीचा आचार्य

(Doctor of Scientific Culture)


This is to certify that Veer Uttamrao Pandurang Mohite has been awarded Honarary Degree of Doctor of Scientific Culture (वैज्ञानिक संस्कृतीचा आचार्य) *by this Dr. Panjabrao Deshmukh Vaidnyanik Sanskruti Peeth on Examination of his thesis on :*

1) *Atheism in Indian Philosophy and*
2) *His new Conception of Indian Revolution*

Issued this 1st day of May 1990 under the authority and the seal of this Sanskruti Peeth.

Amravati
Dt/ 1-5-90

(B. M. Ingole)
President



द्वितीय बहुजन अधिवेशन, नागपूर

वीर उत्तमराव [illegible] अमरावती

मानपत्र

समारंभ दि. [illegible] डिसेंबर १९७[illegible]

आदरणीय,

भारतातील एक स्वातंत्र्यसूर्य [illegible]
आणि तत्त्वज्ञानाची आपण जीवन [illegible]
स्वातंत्र्याचे आपण पोवाडे. [illegible]
अन्यायाचे रहस्य आपण [illegible]

आपण वैज्ञानिक विचारसरणीने [illegible]
ऋषि आहात. सामाजिक समतेचा विचार [illegible]
महत्त्व कांहीं आपण पेटविली. [illegible]
आपण नायकपदाला आलात. प्रज्ञा, प्रतिभा आणि [illegible]

'आंबा', आपली ग्रंथसंपदा 'अमर' आहे. [illegible]
सांस्कृतिक क्रांतीचा इतिहास'', 'फलगी पुरा', 'रोमनांचा [illegible]
सिद्धांत', 'Atheism In Indian Philosophy', [illegible]
आदी ग्रंथांची शवती बहुजनसमाजात आज रूपांतरीत [illegible]
चरित्राची आम्ही वाट पाहत आहोत. हे ग्रंथ म्हणजे [illegible]
आपण 'लोकायत' (चार्वाक) आहात. [illegible]

बाबासाहेब, अध्यात्म म्हणजे सर्वांत मोठी [illegible]
क्रांतीची लढाई तत्त्वज्ञानाच्या क्रांतीवातून [illegible]
निर्भयता ठेवून आपण बहुजनतत्त्वज्ञानाचा [illegible]
नाही मरण्याला भीत ।।' हाही यापल्या [illegible]

उत्तमराव, आपण योगी आहात. [illegible]
'अलख निरंजन' म्हणू शकलेत. 'ज्याला [illegible]
तत्त्वज्ञान समजून घेतल्याविना क्रांतीकारक [illegible]
विरोध आणि तीव्रतेने हल्ले आपल्या वैचारिक [illegible]
भारताला गुलाम बनविले, हा आपला दावा. 'जिथे म्हणजे [illegible]
अभ्यासाच्या पायावर आपण भौतिकाची पताका [illegible]
बहुजन आपल्या इतिहासाचा जेव्हा शोध आणि बोध घेईल, [illegible]
फाकेल. तेव्हा लोकनाट्यापासून तत्त्वज्ञानापर्यंतचे आपले [illegible]
आपण म्हणजे बहुजनांचे व्यासपीठ, विद्यापीठ, ज्ञानपीठ आणि [illegible]

लोकनेता डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब [illegible]
माणूस आम्हाला आपणात दिसतो. महात्मा [illegible]
दोघांतल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यापासून [illegible]
समृद्ध केलेत. आपण महाराष्ट्र पोहिनात [illegible]
आहात. वर्धा-पूर्णेच्या पाण्यासारखे आपण [illegible]
केलात.

वीर उत्तमराव, खडतर जीवन आपल्या [illegible]
क्रांतीची आपली उग्र तपश्चर्या विलक्षण व [illegible]
बनलात. आपण 'क्रांतीयोगी' झालात. आपले [illegible]
आणि शौर्य यांचे आपण प्रतिक आहात. [illegible]

आपणासा आणि आपल्या कोटुंबियांना [illegible]
आपले मार्गदर्शन मिळावे हीं सदिच्छा आम्ही [illegible]

आपले

[illegible] अधिवेशन, नागपूर

• मराठा सेवा संघ •

नोंदणी कार्यालय : द्वारा - श्री प्रकाश देशमुख, ६/८ विदर्भ हाऊसिंग कॉलनी, रतनलाल प्लाट्स् चौक, अकोला.

मराठा महिला सांस्कृतिक संमेलन

रविवार दि. १३ फेब्रुवारी १९९४

[redacted]

मा. वीर उत्तमरावजी मोहिते,

स्वातंत्र्य संग्रामात उडी घेऊन आपण स्वातंत्र्याच्या चळवळीला वाहून घेतले. कवी, ग्रंथकर्ता, भौतिकी विचारवंत, प्रभावी वक्ता, वैज्ञानिक भौतिक तत्वज्ञानाचा आचार्य, अमरावतीच्या मराठा विज्ञान मंदिराचा संस्थापक, मानवतावादी मराठा माणूस म्हणून आपला नावलौकिक आहे.

लोकनेता डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांचा वारसा चालविणारा भारतीय माणूस आम्हाला आपल्यात दिसतो आहे. राष्ट्रमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज यांना आपण आदर्श दैवत मानले. त्यांच्यापासून तसेच महात्मा ज्योतिबा फुले, महर्षी शिंदे, राजर्षी शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व डॉ. पंजाबराव देशमुख यांच्यापासून आपण स्फूर्ती घेतली व महाराष्ट्राचे वैचारिक प्रबोधन केले.

विदर्भाचा भाई माधवराव बोरकुटे, एक खतरनाक सन्यासी, तापसी, एक अग्निपुरुष व क्रांतीचा दुर्लभ योजक म्हणून लोक आपणास ओळखतात. बहुजन आपल्या इतिहासाचा जेव्हा शोध आणि बोध घेतील तेव्हा आपण लिहून ठेवलेल्या ग्रंथसंपदेला मोल येऊन त्याच्या प्रकाशात महाराष्ट्राचे जीवन उजळून निघेल.

वैचारिक क्रांतीची आपली उग्र तपश्चर्या, विलक्षण व अद्भूत आहे. अश्रू, रक्त आणि घाम यातून आपण 'वीर' बनलात. आपण 'क्रांतीयोगी' झालात. लोकविलक्षण त्याग आणि शौर्य यांचे आपण प्रतीक आहात.

आपल्या हया क्रांतीमय प्रवासास विनम्र अभिवादन !

अमरावती.
दि. १३।२।१९९४

पुरुषोत्तम खेडेकर
अध्यक्ष
मराठा सेवा संघ, महाराष्ट्र

अ ना वृ त प त्र

शिवाजी नगर
अमरावती
दि. ७-१-१९८०

परम प्रिय श्री. वा. मो. काळमेघ,
कुलगुरू नागपूर विद्यापीठ यांना सप्रेम प्रणाम वि. वि.

पत्र लिहिण्यास कारण की, आपण सालबर्डीला येत्या महाशिवरात्रीस महा रुद्र यज्ञ करणार असल्याचे ऐकतो. आपण स्वत:ला डॉ. पंजाबराव देशमुखांचे अनुयायी म्हणविता. कुलगुरुंच्या पदावर त्यांच्याच कृपाप्रसादाने आपण चढलात म्हणून जाहिरात करता, परंतु या पदावर चढल्यापासून आपले वर्तन त्यांची विचारधारा त्यांचे तत्वज्ञान आणि त्यांच्या मिशनविरुद्ध चालले आहे. कष्टकरी बहुजन समाजाच्या हितशत्रूच्या हातात आपण खेळत आहात. गेल्या दीडशे वर्षांत महात्मा ज्योतिराव फुलेपासून डॉ. पंजाबराव देशमुखापर्यन्त श्रमजिवी समाजाच्या हितासाठी ज्यांनी आपल्या सर्वस्वाची होळी केली, त्यांच्याशी आणि त्यांच्या शिकवणुकीशी आपले वर्तन प्रत्यक्ष द्रोहच आहे.

देव धर्म व अध्यात्म श्रमजिवी समाजाचे रक्त पिणाऱ्या वर्गांच्या श्रद्धा आहे. सवंग लोकप्रियतेच्या स्वस्त तालावर नाचणाऱ्या लोकनेत्याचा हचा श्रद्धा सत्यानाश करतात. भावी पिढी असल्या नेतृत्वाच्या तोंडावर थुंकल्याशिवाय राहत नाही. असा समाज परिवर्तनाचा इतिहास सांगतो.

संत संस्था कष्ट करी समाजाच्या शत्रु आहेत. आपण स्वत: गुलाबबाबा सारख्या अनेक संतांना डोक्यावर घेतले. आता सालबर्डीला आपण महारुद्र यज्ञ करणार आहात. असले समाजद्रोही चाळे फक्त बहुजन समाजाचा सत्यानाश करणाऱ्या खल पुरुषाच्या डोक्यातच उत्पन्न होऊ शकतात. आपण नागपूर विद्या पिठाला व श्री शिवाजी शिक्षण संस्थेला या उपद्रवात पाडणार असाल तर याच्या पेक्षा जास्त भयानक डॉ. पंजाबराव देशमुखांच्या व्यक्तीमत्वाला डांबर फासणारे दुसरे दुष्कृत्य असू शकत नाही.

संतसंस्था मानव जातीचे रक्त पिणारी आहे. भारतातील एकाही संताने समाजक्रांति घडवून आणली नाही. डॉ. पंजाबराव देशमुखांच्या लोकविद्यापीठाची आपण घोषणा देत आहात. बुवाबाजीचे विष समाजात पसरविणे हीच डॉ. पंजाबराव देशमुखांच्या लोकविद्यापीठाची संकल्पना होती काय? डॉ. पंजाबराव देशमुखांची शिकवण याच्या विरुद्ध होती. असले समाजद्रोही कृत्य करण्यापेक्षा कष्टकरी समाजाचे हित साधण्यासाठी त्यांनी आपल्या सर्वस्वाचा होम केला तसलाच स्वार्थत्याग करण्यास आपण शिका. आपण विदर्भाचे कुलगुरु आहात, आमचे कुलगुरुच समाजद्रोही कृत्य करायला लागले तर विदर्भाचा कष्टकरी समाज त्यांना क्षमा करणार नाही. डॉ. पंजाबराव देशमुखांचे आपण एकनिष्ठ भक्त नसून त्यांच्या तत्वज्ञानाचे व त्यांच्या मिशनचे क्रूर मारेकरी आहात असा सारा महाराष्ट्र म्हणेल.

आपणाला हें पत्र लिहावे लागले यात मला आनंद नाही. मला पराकाष्टेचे दु:ख होत आहे. पण मी काय करू? मी सत्य बोललो नाही तर डॉ. पंजाबरावांचा एकनिष्ठ सेवक म्हणून मी माझ्या कर्तव्याला मुकलो; मी डॉ. पंजाबरावांच्या विचारधारेशी प्रतारणा करतो म्हणून पिडीत समाज मला दोष दिल्याशिवाय राहणार नाही म्हणून कोणत्याही परिस्थीतीत हे कटु कर्तव्य करण्याचे मी ठरविले आहे.

आपला
उत्तमराव मोहिते

(श्री, अंम.)

Dr.P.Parija.

VICE-CHANCELLOR

UTKAL UNIVERSITY.
CUTTACK.

The 13th November, 1957

NO.V.C.12845

Dear Shri Mohite,

I am grateful to you for having sent me your thesis "Atheism in Indian Philosophy" which I received in due course.

I have gone through your book and I appreciate your arguments in favour of your thesis. While I agree with you regarding the belief in a personal intelligent deity, I do not quite agree that you have proved Atheism in Indian Philosophy. When you refer to Sankhya philosophy and you talk of Prakruti and Purusha and also Mula Prakruti, you do admit the existence of the ultimate existence of something which is at the basis of the creation. Whether you call this Original Cause as God or Mula Prakruti, it is immaterial. This Original Cause may not be intelligence or personal, but all the same it exists. Therefore, I feel that Atheism in Indian Philosophy is not proved by your thesis. What you have successfully argued is against a personal God, but you have admitted all the same the existence of the First Great Cause.


I have enjoyed reading your book and I am thankful to you for having sent it to me.

Yours sincerely,

Parija


13/11/57

Shri U.P.Mohite,
Maratha Vidnyan Mandir Shivaji Nagar,
Amravati (B.S.).
M




सूचना

पाइप पर को लिखा जावे



वीर उत्तमराव मोहिते यांनी अकोला जेलमधून राजारामजी बोंडे यांना पाठवलेले पत्र



XII—158 & 159 Security PRISONER'S LETTER
Jail
स्थानबद्ध कैदी की चिट्ठी.

JAIL

From Prisoner No. 82
स्थानबद्ध कैदीका नंबर ८२


Name Uttamrao Mohite
नाम


Dated 27 February 1943
तारीख

Sanctioned
मंजूर.

Superintendent.
साहब सुपरिन्टेन्डेन्ट.
27.2.43

वीर उत्तमराव मोहिते यांनी अमरावती जेलमधून राजारामजी बोंडे यांना पाठवलेले पत्र





राष्ट्रसंत श्री. तुकडोजी महाराज यांनी वीर उत्तमराव मोहिते यांना पाठवलेले पत्र


यशवंत रवापई ।। श्री ।। अमरावती
अमरावती दिनांक
23-2-86ई.

मा. श्री दौलतरावजी गोळे यांना
सादर नमस्कार

आपला दिलेले वीर उमाशंकर मोहिते यांचे पुस्तकाची पहिली चौदा पाने बारकाईने दोन वेळा वाचली उर्वरीत पाने अजून बारकाईने वाचावयाची आहेत. तरी बरवर चाळून पहिली मग नेमके वाचन नव्हे. पण नक्की सांगतो कि ती पाने सुधा वाचीन. जो भाग वाचला तो फारच आवडला. एक एक वाक्य म्हणजे एक एक सूत्र आहे असे वाटले. माझ्या बुद्धिवर साचलेली धूळ साफ झाला गेली. ही चौदा पाने मराठी भाषेत प्रकाशीत व्हावीत ही सदिच्छा आहे. मी समजत होतो हस्त लेखा मोहिते गुरुजी फारच मोठे लिहाले त्यांना माझे अभिनंदन पोहोचविण्याची तसदी घ्यावी ही विनंती. मी त्यांना स्वतंत्रपणे पत्र लिहून अभिनंदन करणार आहेच. असो. आता राहिला

प्रश्न श्री रेगोले साहेबांना दिलेल्या लिखाणाचा त्यांचेकडे चार पांच दिवसापूर्वी गेलो होतो. त्यांचेजवळ ते लिखाण आता राहिले नाही ती गोष्ट खरी पण ते मूळतः त्यांचेमागे ते लिखाण मी त्यांचे जवळून हारून्या धुरीत परत घेतले व दुसऱ्या कुणाला तरी दिले हे खरे नाही फक्त मी त्यांचा जवळ तशी मानसिकता असल्याची गोष्ट बोलून दाखली माझे कारण मुख्य म्हणजे मी त्यांचे घरी बसलो होतो हे आणि संबंधाने जो रुकावा वर्षे सहकार्य होता तो कायम राहावा; दुरू नये ही मनोमन सदिच्छा हे होते. आता मला उरला तो हा कि कोणत्या भाग्यवानाजवळ ते लिखाण असेल तुम्ही गोष्टीचा छडा लावण्याचा. तुम्ही कामी मला आपण व त्यांनी सहकार्य द्यावे अशी मी याचना करितो. आपण ती पूर्ण कराल ही विनंती. असाच वेळ असतात जेव्हा संयम व धैर्य हे गुणांच्या आधाराने मनाच्या समतोल कायम ठेवावयाचा असतो असे माझे मत नाही तर कार्यकर्ता

संभवतो. मी येवदया काकुळतेने वारंवार लिहित आहे याचे कारण फेब्रुवारी अमरावती येथे आयोजीत प्रीपेड अँड पब्लीसिटी ही संस्था आहे. त्यांचे कानावर हया लिखाणाची वार्ता श्री शिवा इंगोले [सुप्रसिद्ध कवी] यांचे मार्फत गेली. श्री इंगोले मुंबई महानगर परिषदेचे जनसंपर्क अधिकारी आहेत. त्यांनी [अभिजीत प्रकाशनचे मालक प्राध्यापक भोगवे यांनी] मला म्हटले की "सदरहू लिखाण मी स्वखर्चाने छापून प्रकाशीत करितो. पैशाची काही कमी पडू नका ते मला मिळत जातील." श्री भोगले पूर्वी V.M.V. अमरावतीला व आता एल्फिन्स्टन कॉलेज मुंबईला इंग्रजीचे प्राध्यापक आहेत. अशीच आणखीन एक ऑफर आली आहे. असे सुयोग जुळून येत असताना नेमके याच वेळी ही दैवी घटना घडावी काय? माझे काही काम चुकीचे असेल तर मला सहकार्य पाहिजे. पाहे रीति कडावे लोभ असावा विनीत यशवंत.


अन्तर्देशीय पत्र कार्ड
INLAND LETTER CARD

23.2.
35 INDIA 35

To.
श्री दौलतराव गोळे
गाडगे नगर
अमरावती

पिन PIN 4 4 4 6 0 3

FOLD HERE FIRST FOLD

FOLD HERE THIRD FOLD

इस पत्र के भीतर कुछ न रखिए NO ENCLOSURES ALLOWED
पते में पिन कोड लिखें WRITE PIN CODE IN ADDRESS
प्रेषक का नाम और पता :— SENDER'S NAME AND ADDRESS :—

यशवंत बळवंत रवापई
रवापई निवास, राजकमल चौक, अमरावती
पिन PIN 4 4 4 6 0 1

AMRAOTI 24FEB87 II P.M.

FOLD HERE SECOND FOLD

c/o V. Moon
447, Hanuman Nagar
Nagpur
7 November.


Dear Dr. Mohite,

I am an English scholar, from Cambridge University in the United Kingdom. I am in Maharashtra to make a study of non-Brahman movement, 1890 to 1930. I came to Maharashtra some four years ago, to do my doctoral work for Ph.D. on Mahatma Jotiba Phule. Hence I am able to read and write in Marathi. I am anxious now to collect materials concerning non-Brahman movement, especially of Vidharba. There is very little work done in English on these movements, and so I am very much hoping to introduce the English-speaking readers to the achievements of Punjabrao Deshmukh and similar leaders. I have seen your most valuable work, and am naturally anxious to meet you, and to request your help in locating source-materials. I will be coming to Amraoti on Sunday 13 November for 2-3 days, and will call on you.

with best wishes

Rosalind O'Hanlon.

(DR. (MRS.) ROSALIND O'HANLON)



Respected Uttamrao Mohite,

I acknowledge with thanks your letter and am greatly encouraged by your comments about my critical faculty.I hope to get continuous guidence from you in my future academic carrier.

Perhaps I have so many things in common with you.I am a blind adherent to the cult of scientific materialism which in my view is the only living ideology suited to the need of the modern man.I have so much interest in it that I have done my 2nd.M.A.Viz.in Economics which is predominently a materialistic science.With the present combination of qualifications in me i.e.double M.A.in Philosophy and Economics with Sociology,I think that now I am better fitted to contribute something in the philosophy of materialism.I wish to write a paper on the subject and seek your guidence in this respect.

Recently I have written a 30 paged thesis entitled "Bhagvat Gita Versus Nietzche's Zarathustra" which I want to get published in some philosophical Journal.I am also sending one copy of it to Nietzche"s Archives,Wiemer,Germany.But before I proceed further I request you to please glance over it.I will send this paper to you on your reply.You will find in it a very bitter attack on theism and something in accord with materialism.


I beg to differ with the para 3 of your letter that Materialism does not postulate any metaphysical conception.In my opinion the choice is not between "Metaphysics" and " No Metaphysics" but between"Good Metaphysics" and "Bad Metaphysics".So the man who refutes Metaphysics is a bigger metaphysician with a rival theory of his own.Like every other ideology,even Materialism has its own metaphysics;though a better type of Metaphysics.Your views about the absurdity of Metaphysics,however,remind me of A.J.Ayer"s book entitled "Language,Logic and Truth",which you will like to read.Your idea about convening an " All India Materialists Conference" is highly appreciated.In a way it will be a great service to the nation.

Hope to hear you again.

Yours----
(Amrit)

30th.Jany.1959.

Address:-
Prof.M.D.Amrit Lal Swami
227/Sujee Lines,Simla.



To,

Honourable Shri Gulzarilalji Nanda,
Union Minister for Home Govt. of India,
N E W - D E L H I.

Respected Sir,

I, the undersigned most humbly and highly appreciate the stand taken against the Godase cult. It is an appropriate response to the cultural appetite of the masses of this region. The Maharashtrian culture itself is sick of this ugly leprosy because of the Ramdasi schooling. This casteism has defamed the name of Maharashtra. One can very easily find these venomous scorpions in every Maharashtrian club. Now-a-days most of the candidates are selected for military commission from this ungrateful sect. Every priestly Maharashtrian is an ordent devotee of this dangerous cult. I wonder how your honour will annihilate this deeply rooted cancer in the heart of Maharashtra-body-politic. I request your lordship to distinguish the priestly Maharashtrian from Maratha. If your honour go deep at the root and connotation of the term 'Maharashtrian', only the Godase chitpawan culture boast itself to be genuine. Ramdasi Swayam Sevak Sangha (R.S.S.) is their sanctuary and Ramdas is the idol enshrined in this treacherous philosophy. 'Das Bodha' is their moral code. Your lordship will find Ramdasis spread in all institutions and parties; but their allegiance centres into this fascist creed. This most reactionary sect of Maharashtra always reaps the best harvest under different disguises. In the history of entire humanity, nobody finds such a miraculous figure as Ramdas. Though he was a spy of alien power, his disciples have been contriving to manipulate the fabulous history in his favour and strive to depict him to be the preceptor of the temporal hero of Deccan. As a matter of fact there is not a single authentic evidence that can prove it. But the entire intelligentsia of Godase cult has been inculcating this unhistorical untruth. Ramdasi disciples wrote innumerable legends to propagate this falsehood. If your honour sincerely desire to eradicate this atrocious mentality your honour will have to ban the

Ramdasi literature and the pieces of it inserted in our school books and prohibit the activities of R.S.S.

High School education boards and universities are the main sources of this bloody thought. This colossal terrorism gets sufficient fertilizers for its full growth through their twisted trends of history, literature and philosophy. The bulk of the civil and judicial officers of priestly Maharashtrian origin owe themselves to this violent faith. In every day life we see with open eyes top rank public servants waste their valuable energy to the growth of this social evil. Even the present leadership of our flesh and blood tries to appease this anti-masses force. How can the masses of Maharashtra expect a little good from their foolish leaders in the field of culture? I am the man who humbly contributed some service in the independence movement of our nation; but in the present circumstances I am passively watching the undesirable waves overlapping our patriotic life. Masses of Maharashtra will ever be grateful to your lordship, as your honour has taken the very bold and benevolent step in our progressive life. Hoping to be obliged.

Yours faithfully,

Dated, Gadage Nagar
Amravati
The 30th Nov., 1964.

(Veer Uttamrao Mohite)

...

Copy is submitted to

CHIEF MINISTER

MAHARASHTRA

SACHIVALAYA, BOMBAY-32

Camp: Mahabaleshwar.

27th May 1960.

Dear Shri Mohite,

I have read with interest your letter of 20th May 1960 criticising the singing of Vedic Hymns, holding of religious prayers, etc., while ushering in the new State of Maharashtra. I perfectly agree with you that India is a secular State and communal and religious outlook should find no place in the administration of this country. I do hope that in turn, you will agree with me that it would not be out of place to seek the blessings of the Almighty and pray for spiritual and moral strength to shoulder the burden and responsibility of administering the new State.

Yours sincerely,

(Y. B. Chavan)

Shri Uttamrao Mohite,
Shivaji Nagar,
AMRAVATI.

Veer Uttamrao Mohite,
Director:

Maratha Vidnyan Mandir,
Shivaji Nagar:
Amravati (M.S.)

Dated : 15/5/1984.

To,
Her Excellency Smt. Indira Gandhi,
Prime Minister of India,
New Delhi:

Most Revered Madam,

I am a humble freedom fighter and a social Worker who never hankered after money and power, but have been yoked to preach radical rationalism. I have been undergoing innumerable hardships throughout my life. I revere Pandit Jawaharlal Nehru of celeberated momory as my philosophic preceptor. Maratha Vidnyan Mandir which has no wall and no roof is my abode where I live and whatever selfless service I do, I do it through that medium.

Madam, I am given to understand that your excellency is going to visit Shri Gurudeo Seva Ashram, Guru Kunj, Mozari in Amravati Distt. May I humbly tell you that all saints in Hindu [redacted] Community are rank rogues and Tukade Buwa of Mozari was not an exception to them. His devotees were also seasoned exploiters. Almost all the Political Leaders in Indian Politics are the easy victims of these saintly frauds. These divine shrines of socalled Godmen are haunts of political reactionaries. I am sure that your excellency may not hanker after cheap popularity like this.

Do the saintly institutions inculcate scientific view of life? On the contrary these divine institutions are the worst chemies of credulous masses. They feed on the ignorance of the people and never do any good to the humanity. Deception, fraudulency and adultery are the main characteriscs of [redacted] divine theocracy. Divinity is the greatest obstacle to scintific and material progress of human race. All divine and religious hermits are vulgar forces to ruin human life. They breed irrationalism. They are all harmful to human morality and natural progress.

There is no more horrible danger to the moral fall of humanity than the divine shrines. Revered Madam, will you not like to take some substantial steps to eradicate the[redacted]evils? No, doubt, it is the most dificult task but somebody must dare and gallantly accept this challenge, which we do here in our humble way. I know a person of Nagpur who is doing this at the risk of his life. He is known as Shyam Manao Gandhi Nagar, Nagpur Pin:440010: I therefore, invoke your honour not to visit the Mozari Ashram of Tukadoji and not to favour the anti Social Revoke going on in this part of [redacted] country. Thanking you, and hoping to be obliged:

Yours faithfully,

Uttamrao Mohite

(Uttamrao Mohite)

Copy with compliments to:

To,

Hon. Yashawantrao Chavan,
Union Home Minister, New Delhi.

My dear Yashawantrao,

I heartily congratulate your honour for the arrest of His Holiness Shankaracharya of Jagannath Puri in the capital of India. Your honour appear to be the true heir of Rajarshi Shahu Maharaja who sentenced His Holiness Shankaracharya of Karveer to exile and confiscated his property. Spiritualism is the philosophy of exploitation. It opposes to scientific socialism. In our State, antibeef slaughter champaign is a movement of traitors. How can one third of our population be denied beef which contains the best proteins at a very cheap rate? Muslims, Christians, aboriginals, scheduled castes and Buddhists who are part and parcel of free India live on beef. No Government inthe World enforces its people what to eat and what not. Antibeef slaughter champaign is launched by the first rate enemies of our peasantry that persistantly strives hard to produce the best breed of milking cows. The present Indian economy also does not bear the burden to feed dry cows.

Under these circumstances only the pagan is able to lead India on the progressive march of life. India from the very bottom of her heart loved Jawaharlal Neharu because he was a pagan. He was great because he was not a religious man. Spiritualism is nothing less than vulgarity. It be people's raj when our police shoots a saint, priest and astrologer at sight. Maratha does not hate beef eaters because they are his brethren. If a Maratha happens to eat beef; he cannot be converted into Muslim. [illegible]. It was the most radical law of sociology that Shivaji Maharaja dictated to the jurisdiction of that age. This law transformed the entire Maratha race into a mighty revolutionary force in India. In the Arab battalion of Shivaji Maharaja, he never prohibited his Muslim Soldiers from beef eating.

It is a very hard struggle for supremacy between the constitutional sovereign and spiritual authority. The spiritual authority must bow before the dictates of peoples power. I must extend my gratitude to your honour as your honour are facing the most critical war waged by the vedic absolutists. I hope your honour will always stand fast by this radical role. After Jawaharlal Neharu let your honour be the search light of people to enlighten their charming dream of life. Otherwise they have no hope of betterment. I assure your honour that the entire Maratha community will die for your honour's word an ideological revolution.

Yours sincerely,

Uttamrao Mohite

Dated:- 1st December 1966.

(Uttamrao Mohite.)
Shivaji Nagar, Amravati.
(Maharashtra State)

363/62-M.A.

MINISTER FOR AGRICULTURE,
GOVERNMENT OF INDIA.

New Delhi

26th February, 1962.

I am much interested to see the activities in the field of cultural regeneration undertaken by, and at the instance of, Veer Uttamrao Mohite. I have already gone through some of his recent publications and they have impressed me not only because of their fine style of writing and language but his trends of thinking, his utter candour and the ideologies preached through them. They evoke one's admiration for the author.

Vidarbha is an ancient land of culture and a rugged civilisation. During the British period, the rural areas of Vidarbha did not witness much indigenous cultural activity in keeping with the ancient history and traditions of the land.

In my childhood I witnessed many peripetatic groups of visitors such as the Telanga Brahmins enchanting vedic kymns which nobody understood. There were also the visits of various Mahanubhao monks as well as circuses, dancing parties, Veena players of Kannad, certain artists of Saurashtra and so on. My father was never a rich man but by his strenuous work and better agriculture was one of the better-offs in the village. He also was not educated much beyond the primary; but even so he did take great interest in all these programmes. In fact, almost every such party which visited my village appeared mainly to depend on his patronage and support. There were also some saintly figures belonging to various religions and sects including Muslims who came to the place.

My mother had great leaning towards religion and faith in astrology. She was, therefore, always prepared to welcome and spend on those who claimed to be astrologers or spiritual people. It would not, however, be incorrect to say that all this was a one-way traffic. Since I failed to observe much effort which could be regarded as Vidarbha's contribution in any of these fields except the emergence of such sanits as Gadge Maharaj and later Tukdoji Maharaj.

saints

After a lapse of half a century since my childhood, there is no doubt that we are witnessing a tremendous upsurge in the field of education. Although I am not sure that economically the people of Berar are better off today than they were in my childhood, I think,

MINISTER FOR AGRICULTURE,
GOVERNMENT OF INDIA.

- 2 -

they were distinctly happier and more prosperous then than they are now. What I am concerned with here is the psychological make-up of the present day and the place occupied by tradition and religious beliefs.

It is unfortunate that even education does not necessarily change the mental make-up of the people. Their blind faith in any one claiming to be a sant or a miracle-maker has diminished in no way. There are instances when the more highly educated people become more credulous than the poor and the illiterate. It is in this direction that there is very great need of understanding the proper place of religion. Of course, Veer Mohite makes a frontal attack on religious dogmas and pretentions and I personally think that if one desires to shake people up and bring them to the path of rational thinking, certain amount of ruthlessness and outright condemnation of all that has no basis in science has to be welcomed because the malady is of a very long duration. It is in this direction that I appreciate the efforts of Veer Uttamrao Mohite, because I feel they are directed towards educating the people in regard to the proper place and functions of religion as well as philosophy.

(P.S. Deshmukh)
Minister for Agriculture.

वाचनालय अमरावती.

REGD. No. N-103

PRESIDENT,
Dr. P. S. Deshmukh,
M. A., D. Phil. (Oxon.),
LL. D. (Nag.), Bar-at-Law

EDITOR.
V.Subba Rao,
B. A.-(Hons), M. A

DIRECTOR,
S. R. Londhe,
M. A.

शिवाजी पत्रिका

Shivaji Patrika

Annual Subscription Rs. 3
Single Copy 12 Naye Paise

FORTNIGHTLY BULLETIN OF SHRI SHIVAJI LOKA VIDYAPITH, AMRAVATI, INDIA
DEVOTED MAINLY TO THE CAUSE OF EDUCATION, STUDENTS AND AGRICULTURE.

Vol. XI } AMRAVATI, 1ST MARCH, 1965 { No. 15

शिक्षणाचा खेळखंडोबा करू नका

— वीर उत्तमराव मोहिते

राष्ट्रीय शिक्षण योजनेचा आराखडा तयार करण्यासाठी भारत सरकारने भारतांतील नामावंत शास्त्रज्ञ, शिक्षणतज्ञ तसेच भारताबाहेरील लब्धागार सदस्य यांचे एक शिक्षण मंडळ नेमले आहे. हे मंडळ शिक्षणाची सर्व साधारण तत्वे व धोरण या संबंधी सरकारला विस्तृत मसुदा सादर करणार आहे. त्यानुसार डॉ. पंजाबराव देशमुख यांनी शिवाजी शिक्षण संस्थांतर्गत डॉ. वि. भी. कोलते यांचे अध्यक्षतेखाली शिक्षण तज्ज्ञांचे एक मंडळ नेमले आहे. त्या निमित्ताने शिक्षणातील काही बाबींची मी येथे चर्चा करण्याचे ठरविले आहे. त्याचा या मंडळाला काही उपयोग होईल अशी मला आशा आहे.

गेल्या तीस पसतीस वर्षांत शिक्षण क्षेत्रांत अनेक सुधारणा करण्यात आल्यात. त्यांचा देशाला किती फायदा झाला याचा हिशेब आपण घ्यायला हवा ? आपल्या सोयीसाठी आपण शिक्षणाचे चार विभाग पाडूं. त्यातील उपाधीनंतरच्या (Post graduale) शिक्षणाचा उहापोह करणे माझ्या कक्षेबाहेर आहे. मला विशेषतः प्राथमिक शिक्षणाचाच विचार करावयाचा आहे. कारण प्रायमरी शिक्षणच पुढील सर्व शिक्षणाचा पाया आहे. हा मूळ पाया पक्का मजबूत असला तरच पुढील शिक्षणाची इमारत पक्की होईल.

इ. स. १९१९ पूर्वी प्रायमरी शाळेंत लेखन वाचन व गणित या दोनच विषयाकडे प्रामुख्याने लक्ष दिल्या जात असे. त्या काळी चौथा वर्ग पास झालेला मुलगा आजच्या मॅट्रिक पास झालेल्या मुलाला ऐकणार नाही एवढी त्याची तयारी असे. लेखन वाचन या विषयात पहिली सुधारणा डी. सिलव्हा इन्स्पेक्टर ऑफ स्कूल्स बेरार यांनी केली. प्रथम मूळाक्षरे, नंतर शब्दज्ञान व शेवटी वाक्य रचना ही पंतोजी पद्धत त्यांनी चुकीची ठरविली. एकदम वाक्य पद्धतीचा अवलंब करून मुलांना भाषा शिकविणे चांगले असे त्यांचे म्हणणे होते. इन्स्पेक्टर ऑफ स्कूल्स् यांनी सुरू केलेली पद्धति चूक आहे असे म्हणण्याची कोणाची प्रज्ञा होती ?

झाले ! हा प्रयोग यशस्वी करण्यासाठी सारे शिक्षण खाते लागले. सर्व शिक्षकांनी प्रयोगाचे प्रदर्शन मांडून डा. सिलव्हा साहेबांच्या बाजूने निर्णय दिला.या सुधारणेचाच प्रताप की आज मॅट्रिक पास झालेल्या विद्यार्थ्याला १९३५ पूर्वी चौथा वर्ग पास झालेल्या मुलाइतकेहि भाषा ज्ञान होत नाही. आता मुलाने होय नाही-खरे खोटे म्हटले तरी तो चौथा वर्ग पास होतो.

दुसरा महत्वाचा मुद्दा गणिताचा. गणित जीवनातला सर्वांत महत्वाचा विषय आहे. व्यक्तीगत संसारांत आणि राष्ट्रीय जीवनात गणिता इतके महत्व दुसऱ्या कोणत्याहि विषयाला नाही. ज्ञानाच्या क्षेत्रात युक्लिड पायथागोरसादि गणित तज्ज्ञांनी मानव जातीवर जेवढे उपकार केलेत तितके कोणीही केले नाहीत. गणित सर्व विज्ञानांचे विज्ञान आहे. गणित पहिले विज्ञान आहे. तसेच गणितच तत्वज्ञानही आहे. जगातील सर्व तत्व वेत्ते प्रथम गणिती होते नतर ते तत्वज्ञानी झालेत. गणिताच्या पाया शिवाय तत्वज्ञान उभेच राहू शकत नाही. मुलाच्या बुद्धीला गणिता इतकी कसरत दुसऱ्या कोणत्याहि विषयात मिळत नाही बुद्धीची पद्धतशीर वाढ-बुद्धीला योग्य वळण गणितातच लागते. वर्तमान युग विज्ञानाचे आहे. ज्या देशात विज्ञान्यांची संख्या जास्त तो सर्वात सामर्थ्यशाली देश समजल्या जातो. आज भारताला विज्ञानी, तंत्रज्ञ आणि यंत्रज्ञांची फार मोठी गरज आहे. गणित विज्ञानाचा पाया आहे. प्राथमिक शाळांचा अभ्यासक्रम राष्ट्रीय जीवनाचा मूळ आधार आहे. आणि आज शिक्षणाच्या क्षेत्रांत हाच महत्वाचा आधार कोसळून पंडला आहे. प्रायमरी चौथा वर्ग पास झालेल्या मुलाला धड शंभर अंक मोजता येत नाहीत. आठवा वर्ग पास झालेली शेकडा २५ मुलेंही हायस्कूल मध्ये गणित घेत नाहीत. आणि विश्वविद्यालयीन विद्यार्थ्याला आकडे मोड (Calculation) करता येत नाही. मग प्रचलीत अभ्यासाक्रमानुसार प्रचलीत शिक्षण पद्धती गणिततज्ज्ञ विज्ञानी कसे निर्माण करणार ! त्यात पुन्हा प्रायमरी शाळेत चौथा वर्गा पर्यंत सर्व परीक्षा काढून टाकण्यात आल्या आहेत. हा शिक्षण खात्याचा निर्णय भावी पिढीला भयंकर घातक ठरल्याशिवाय राहणार नाही. शिक्षण तज्ज्ञांच्या लहरीवर ठरविण्यात आलेले हे निर्णय समाजाला कोठे नेतील ! याचा थोडा विचार झाला असेल असे कोणालाच वाटत नाही. सरकार लक्षावधी रुपये शिक्षणावर खर्च करते ते सर्व वाया जातील.

प्रायमरी शाळेच्या परीक्षा काढून टाकल्यामुळे शिक्षणाचा दर्जा खालावणार आहे. त्यांत पुन्हा खेड्यांतील मुलांचे नुकसान होणार आहे. जागृत वर्ग स्वतःची मुले कॉन्व्हेंट, मॉंटेसरी अथवा बालोद्यान मध्ये पाठवून तयार करून घेतो. नागरी आईबाप स्वतःच्या मुलांची तयारी स्वतःच करून घेतात. त्यामुळे वरिष्ठ शिक्षणाचा लाभ विशिष्ठ लोकांनाच मिळतो त्यामुळे खेडूत समाज कायमचा मागासला राहील.

माध्यमिक शाळेत गणित विषय आवश्यक असावा. पदार्थ विज्ञान रसायन शास्त्रांना अभ्यास क्रमांत प्रमुख स्थान देण्यात यावे. भूगोल विषय ऐच्छिक असू नये भूगोल हे जिवंत शास्त्र आहे. परंतु माध्यमिक विद्यालयांत भूगोलाला तुच्छ लेखण्यात येवूं लागले. चित्रकलेला मॅट्रिकच्या परीक्षेतून गचांडी देण्यात आली. त्यामुळे यंत्रतंत्र-विद्या शिकताना मुलांना मोठी अडचण जात आहे. मराठी सारख्या भाषाविषयांतून अर्धे पाठ शास्त्रीय विषयावर देण्यात यावेत. वाङ्मय इतिहासाच्या नावावर शुद्ध जातीवादाचे बीष पाजण्यात येते. पाठ्य पुस्तकांतून श्रेष्ठ व्यक्तींचा परिचय करून देण्यात येतो. त्यातील वर्ण्यव्यक्ति आणि लेखन एकाच जातीचे असतात. त्यमुळे एकाच जातीचे श्रेष्ठत्व प्रमुख-विद्यार्थ्यांच्या बुद्धीत बिंबविण्यात येते. जातीवादाच्या आंतरिक हेतुने रामदासा सारख्या अनैतिहासिक व्यक्तीचे स्त्रोम पाठ्य पुस्तकांतून माजविण्यात येते. ज्या व्यक्तींची सामाजिक भूमिका आणि तात्त्विक बैठक अत्यंत जहरी आहे असल्या व्यक्तींना शालेय पुस्तकात मुळीच स्थान देण्यात येवूं नये. महात्मा ज्योतिराव फुले, दयानंद सरस्वती, राजाराम मोहनरॉय

कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. पंजाबराव, राजर्षि शाहू महाराज, कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचे योग्य मूल्यमापन होत नाही व त्याना पाठ्य पुस्तकात स्थानही देण्यात येत नाही म्हणून हा अन्याय नाहीसा करण्यात आला पाहिजे. मागासलेल्या जातीतील महापुरुषांचा गौरवच नव्हे तर केवळ नामोल्लेखही करण्यात येत नाही. आज सरस्वतीच्या मंदिरांत जेवढी विषमता, जातीयता, आणि विषारी तत्वज्ञान यांचा धिंगाणा चालू आहेत जेवढा जीवनाच्या कोणत्याहि क्षेत्रांत नसेल.

ग्रामीण मुलींच्या शिक्षणाकडे सरकारने विशेष लक्ष द्यावे. खेड्यांत शेती करणाऱ्या वर्गावर या बाबतीत अतिशय अन्याय होतो. शेतकरी सर्व देशासाठी शेती पिकवतो हा त्याचा मोठा गुन्हा आहे. कारण तो शहरांत मुलांना पाठवून उच्च शिक्षण देवू शकत नाही. शहरी कनिष्ठ वर्गाला जे शक्य आहे ते सुद्धा साधारण शेतकरी स्वतःच्या मुलाकरिता करू शकत नाही. मराठी चौथीची सामान्य (Common Examination) परीक्षा सुरू करण्यात यावी त्यामुळे प्रायमरी शिक्षणाचा दर्जा उंचावेल.

मुलांत अनीति, बेशिस्तीचे प्रमाण वाढत आहे ही तक्रार फोल आहे. मुलांना बेशिस्तीचे पाठ विद्यापीठातील महापंडितच देतो. बेशिस्तीचे विश्वस्त संस्कृतीच्या उच्च पदावर मंडीत झालेले विद्वतरत्नच होत. डोक्याच्या एका कडावर काळी टोपी परिधान केलेला विद्यार्थी सुसंस्कृत प्राध्यापकाला फार आवडतो. अशा विद्यार्थ्याला सामान्यपणे स्वच्छंद वागण्याचा परवानाच असतो.

इंग्रजी भाषा दिवसेंदिवस जगात पसरत आहे. इंग्रजीचा मुळीच गंध नव्हता अशा रशिया चीनसारख्या देशांत इंग्रजीच्या शिक्षणाची वाढती सोय करण्यात येत आहे. गाझी मुस्तफा केमालपाशा आणि अफगानिस्थानचा राजा अमीर अमानुल्लाने पाश्चात्यकरणाचा प्रचंड उद्योग केला. चांगल्या गोष्टी-श्रेष्ठ मूल्ये-विशिष्ठ लोकांच्या वर देशाच्या मालकीची नसतात. इंग्रजी राज्याच्या द्वेषा बरोबर इंग्रजी भाषा, इंग्रजी सद्गुण आणि विज्ञान यांचा द्वेष करण शुद्ध गाढवपणा आहे. आज इंग्रजी द्वेषाला ऊत आला आहे. जाणत्या पुढाऱ्यांनी व शिक्षण तज्ज्ञांनी याचा दूर दृष्टिने विचार करायला पाहिजे.

विद्यापीठातून इंग्रजी माध्यम काढून टाकल्यामुळे गेल्या १२ वर्षांत काय फायदा झाला याचा मूलगामी विचार व्हायला पाहिजे. केंद्र सरकारच्या पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या परीक्षेत विदर्भातील किती मुले पास होतात ? उच्च शिक्षण घ्यायला परदेशांत किती विद्यार्थी जातात ? प्रदेशाच्या विकासासाठी याचा हिशेब करायला पाहिजे. केंद्र सचिवालयात आणि परदेशी वकिलातीत जर मद्रासी बंगालीच दिसले तर त्यत त्यांचाच दोष आहे का ? संपूर्ण वरिष्ठ क्षेत्रांत आणि बौद्धिक जगांत मराठी माणूस औषधालाहि सापडत नाही. अशास्थितीत मद्रासी बंगाली यांच्या नावाने शिमगा करत राहण्यास आपल्याच शहाणपणाचे प्रदर्शन दिसते ! राजगोपालाचारीसारखा धर्माचा कट्टा उपासक इंग्रजीची वकीली करायला पुढे येतो तरी इंग्रजीचे महत्व इतरांना कळू नये याचे आश्चर्य वाटते. राष्ट्रपति राधाकृष्णनसारखा हिंदु संस्कृतीचा मेरुमणी इंग्रजीचे महत्व जाणतो म्हणूनच भारताची धडगत आहे. जी गोष्ट तामिळी कळधमला कळते ती काशीच्या पैठणी पंडिताला कळू नये या पेक्षा देशाचे दुर्दैव संभवू शकत नाही. म्हणून शिक्षण तज्ज्ञानी सर्व बाबींचा विचार बारकाईने करून मोठ्या सावधगिरीने सुधारणेचे पाऊल उचलावे हीच माझी हात जोडून नम्र विनंती आहे.